# आदर्श

# समाजरचनेच्या शोधांत

## दोन देशांतील प्रवास

## युगोस्ल [illegible] झ्राईल

REFBK-0012189
REFBK-0012189

लेखक

रा. कृ. पाटील

साधना सदन प्रकाशन, वर्धा

१२१८८

१४६१

ग्रं. ३११३४

लि. शु. फाल्गुन

पत्रे. २८५

लिं. ८.८ इं

# आदर्श समाज रचनेच्या शोधांत

## दोन देशांतील प्रवास

युगोस्लाविया

व

इङ्ग्लंड

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्थळप्रत.
अनुक्रम वि:
क्रमांक नों: दि:
REFBK-0012189

लेखक

रा. कृ. पाटील

❀ साधना सदन प्रकाशन, वर्धा ❀

प्रकाशक :
ज्ञानदेव कदम
हिन्दीनगर. वर्धा

किंमत ८ रुपये

मुद्रक :
मोहनलाल भट्ट
राष्ट्रभाषा प्रेस,
हिन्दीनगर, वर्धा

# अनुक्रमणिका


| | | |
|---|---|---|
| | भूमिका | पृष्ठ |

## युगोस्लाविया


| | | |
|---|---|---|
| १ | थोडासा इतिहास | १ |
| २ | सुरुवातीचीं पावलें | ७ |
| ३ | थोडेसें तात्त्विक विवेचन | १० |
| ४ | युगोस्लावियांतील शेतीच्या धारणेंतील स्थित्यंतरें | १६ |
| ५ | कारखाने उद्योग व इतर सामूहिक संस्थांची व्यवस्था | २८ |
| ६ | आदर्श समाजरचनेबाबत कांही विचार | ३७ |
| ७ | युगोस्लावियांतील राज्य-व्यवस्था | ५३ |
| ८ | युगोस्लावियासंबंधीं कांही विचार | ६२ |

## इझ्राईल

| | | |
|---|---|---|
| ९ | इझ्राईलची समाजव्यवस्था | ६९ |
| १० | ज्यू लोकांचा इतिहास | ७२ |
| ११ | आदर्श समाजरचनेकडे | ९३ |

## युगोस्लावियांतील वास्तव्याची दैनंदिनी


| | | |
|---|---|---|
| | नामसूची | १ ते ८ |




नोविसाद येथील सरकारी प्रमुखाशीं चर्चा



बेलग्रेडजवळील दुसऱ्या महायुद्धाचें स्मारक





ल्युब्लियाना येथील हाउसिंग कॉम्युनिटि



लेखक-- रा. कृ. पाटील

**आदर्श समाजरचनेच्या शोधांत**

**दोन देशांतील प्रवास**

★

**युगोस्लाव्हिया**

**व**

**इझ्राईल**

दा. क्र.

# भूमिका


आदर्श समाजरचना कशी असेल ? त्याबाबत इतर देशांत काय कल्पना आहेत ? शोषणरहीत व शासनविहीन समाजरचनेकडे जाण्याकरिता प्रगतीचा मार्ग कोणता व त्या मार्गांत अडचणी काय आहेत ? आक्टोबर-क्रांतीनंतर रशियांत लोकशाहीचीं मूल्यें व व्यक्तिस्वातंत्र्य यांचा उत्तरोत्तर ऱ्हास झाला, व दहशतवादावर आधारलेली सत्ता केवळ एका व्यक्तीच्या हातांत केंद्रित झाली, त्याला कांही पर्याय आहे काय ? तो नसल्यास त्या अभावामुळे समाजवादाच्याच प्रगतीला धोका पोहोचणार नाही काय ? समाजवाद आणि व्यक्ति-स्वातंत्र्य यांचा मेळ बसणें अशक्य आहे काय ?

असे बरेच प्रश्न आदर्श समाजरचनेचा विचार करतांना पुढे येत असतात. सर्व सेवा संघातर्फे माझ्या नेतृत्वाखाली युगोस्लावियांत एक अभ्यास-मंडळ गेलें होतें, त्या प्रसंगानें

या प्रश्नांचा अभ्यास करण्याची व त्यांच्याकडे एका नवीन दृष्टिकोणांतून पाहण्याची संधि मिळाली. मार्क्सवादी समाजरचनेंत व राज्य-पद्धतींत व्यक्तीच्या सर्वांगीण विकासाला जर भरपूर वाव मिळाला नाही तर ती खरी मार्क्सवादी समाजरचना नव्हेच असें नवीन तत्त्व युगोस्लावियांतील मार्क्सवादी नेत्यांनी शोधून काढलें आहे. त्याची 'रिव्हिजनिझम्' म्हणून टीका व कांहीशी टिंगलहि झालेली आहे. मार्क्सवादी साहित्यांत सूचक नांवें शोधून त्यानुसार एखाद्या परिस्थितीचें नामकरण करण्याची कला भरपूर प्रमाणांत आढळते; पण चूक झाली असल्यास ती सुधारणें व योग्य मार्गावर पुन्हा येणें यांतच शहाणपणा आहे. त्या दृष्टीने रशियांतील मार्क्सवादाच्या अनुभवांतून युगोस्लावियाने काय घेतलें व काय टाकलें, मार्क्सवादाला अभिप्रेत, व व्यक्तिस्वातंत्र्याला पोषक अशा नवीन दिशेने कोणते मार्ग हाताळले, त्यांत त्यांचे अनुभव काय आहेत व त्यांचे परिणाम मार्क्सवादाच्या पुढील इतिहासावर काय होतील, याबाबत कांही चर्चा या पुस्तकांत करण्याचा इरादा आहे. हिंदुस्थानाच्या भावी इतिहासाच्या दृष्टीने ती आपल्या राष्ट्रांतील विचारवंतांना चालना देईल अशी आशा आहे.

—रा. कृ. पाटील

# युगोस्लाव्हिया


युगोस्लाव्हिया
१ स्लोविनिया
२ क्रोयेशिया
३ माँटेनिग्रो
४ सर्विया
५ मॅसिडोनिया
६ बॉस्निया हर्सेगोविना
ल्युब्लियाना
झाग्रेब
नोविसाद
बेलग्रेड
सॅराजेव्हो
कोसोव्हो
टिटोग्रॅड
डयुब्रॉव्हनिक
सेंटिन्ये
बुद्‌वा
कोमोनोव्हो
स्कोपिये
स्टिप
होग्रान
इटाली
डॅन्यूब नदी
सॅव्हा नदी
अॅड्रिअॅटिक समुद्र
अरविन्द

# थोडासा इतिहास : १

आधुनिक युगोस्लावियाचा जन्म पहिल्या जागतिक महायुद्धानंतर झाला. युगोस्लाव म्हणजे दक्षिणेंतील स्लाव. यूरोपच्या दक्षिणेंत वास्तव्य करणाऱ्या स्लाव लोकांची एकत्र येण्याची इच्छा बरीच जुनी होती. परंतु तिला मूर्त स्वरूप १९१८ सालीं आलें. हिंदुस्थानाचे व्हाइस-प्रेसिडेंट यांनी जेव्हा युगोस्लावियास भेट दिली तेव्हा ते थट्टेंत म्हणाले की युगोस्लाविया म्हणजे ६ प्रजासत्ताक राज्यें, ५ राष्ट्रें, ४ धर्म, ३ भाषा, २ लिप्या व १ देश. हीं प्रजासत्ताक राज्यें उत्तरेकडून अनुक्रमें खालीलप्रमाणे आहेत. (१) स्लोविनिया, (२) क्रोयेशिया (३) बॉस्निया–हर्सेगोविना (४) सर्विया (५) मॉंटेनिग्रो व (६) मॅसिडोनिया. यांपैकी बॉस्निया-हर्सेगोविनात बहुतेक सर्वच क्रोआट वंशाचेच लोक आहेत. म्हणून तें जरी अलग प्रजासत्ताक राज्य असलें तरी त्यांत राहणाऱ्या लोकांच्या वंशाच्या दृष्टीने बॉस्निया-हर्सेगोविना हा सर्विया व क्रोयेशियाचाच भाग समजला पाहिजे. बॉस्निया-हर्सेगोविनाची राजधानी सेरायेव्हो. वाचकांना आठवत असेल की याच शहरीं १९१४ सालीं ऑस्ट्रिया-हंगारीच्या राजपुत्रावर कांही सर्वियन देशभक्तांनी बॉंब टाकला व तेथूनच पहिल्या महायुद्धाला सुरवात झाली. हा विभाग तेव्हा ऑस्ट्रिया-हंगारीचा भाग होता. व स्लाव लोक एकत्र येण्याच्या मार्गांत ऑस्ट्रिया-हंगारीचें साम्राज्य आड येत होतें, म्हणूनच क्रांतिकारकांनी राजपुत्राचा खून केला.

युगोस्लावियाचा दक्षिण भाग, विशेषत: सर्विया, मॉंटेनिग्रो, मॅसेडोनिया व बरींच वर्षेपर्यंत बॉस्निया-हर्सेगोविना सुद्धा तुर्कस्थानच्या ऑटोमन राज्याचा एक भाग होता. परंतु स्थानिक लोकांचें धर्मांतर फक्त बॉस्निया–हर्सेगोविनांतच झालें. इतर ठिकाणीं धर्मांतर झालें नाही.

एकंदर ४ धर्म युगोस्लावियांत आहेत. (१) मुसलमान (२) क्रिश्चन कॅथॉलिक (३) क्रिश्चन प्रोटेस्टंट व (४) क्रिश्चन ग्रीक चर्च. भाषा तीन आहेत; स्लोविनियन ही स्लोविनियांत, मॅसिडोनियन ही मॅसिडोनियांत व सर्बो-क्रोआट इतर सर्व भागांत. लिप्या दोन; एक सर्बोक्रोआट व दुसरी लॅटिन. येवढा जरी फरक या लोकांत असला तरी सर्व स्लाव लोकांनी एका राज्यांत यावें ही भावना फार प्रबळ असल्यामुळे युगोस्लावियाचें गणराज्य (फेडरल स्टेट) शक्य झालें आहे.

ह्या सहाहि प्रजासत्ताक राज्यांत लोकसंख्येने व क्षेत्रफळाने सर्वियाच सर्वांत मोठा. खालील कोष्टकावरून याची कल्पना येईल.

| | क्षेत्रफळ चौरस किलोमिटर | लोकसंख्या हजारांत |
|---|---|---|
| १ सर्विया | | |
| सर्बिया खास | ५६,१६५ | ४,४५८ |
| व्हायव्होदीना | २१,५०६ | १,७१३ |
| कॉस्मेट | १०,६९० | ८०८ |
| | ८८,३६१ | ६,९७९ |
| २ क्रोयेशिया | ५६,५३८ | ३,९१९ |
| ३ स्लोविनिया | २०,२५१ | १,४६६ |
| ४ बॉस्निया-हर्सेगोविना | ५१,१२९ | २,८४८ |
| ५ मॅसिडोनिया | २५,७१३ | १,३०५ |
| ६ मॉंटेनिग्रो | १३,८१२ | ४२० |
| एकूण | २५५,८०४ | १६,९३७ |

(लोकसंख्येचे आकडे १९५३ सालचे आहेत. आता लोकसंख्या १ कोटी, ८० लक्षांच्या वर गेली आहे.)

दक्षिणेंतील स्लाव लोकांच्या एकीकरणाचा इतिहास जवळ जवळ सर्वियाच्याच प्रयत्नांचा इतिहास आहे असें म्हणणें अतिशयोक्तीचें होणार नाही. चौदाव्या शतकांत (१३३१—१३५५) सर्वियाचा स्टीफन दुशान नांवाचा एक मोठा राजा होऊन गेला. त्याच्या राज्याचा विस्तार, थोडा उत्तरेचा भाग सोडला तर आजच्या युगोस्लावियाएवढा होता. त्याची फौज एवढी भारी होती की कॉंस्टॉंटिनोपलवर सुद्धा चाल करण्याची त्याची तयारी होती. एक मोठा राजा व कायदे पंडित म्हणून त्याची ख्याति होती. सर्बियाचे लोक मोठ्या अभिमानाने सांगतात की स्टीफन दुशानच्या कायद्याचीं तत्त्वें अजूनहि लागू पडतात. बेलग्रेडच्या लोकसंग्रहांत स्टीफन दुशानच्या राज्यारोहणाचीं किती तरी चित्रें मोठ्या अभिमानाने सर्वियन लोक दाखवितात. ह्या अल्पायुषी राजाचा, वयाच्या अवघ्या ४६ व्या वर्षी जर मृत्यु झाला नसतां, तर भविष्यांतील इतिहासाला मोठी कलाटणी मिळाली असती. परंतु १३५५ सालीं, कॉंस्टॉंटिनोपलवर स्वारी करण्याच्या ऐन संधानांत हा राजा विष देऊन मारला गेला. त्यानंतर सर्वियाला जी उतरती कळा लागली ती जवळ

जवळ १९१२ पर्यंत कायम राहिली. उदयोन्मुख तुर्की लोकांच्या फौजांपुढे सर्वियन लोकांचा टिकाव लागेना व १३८९ सालीं कोसोव्हो या गावीं सर्वियन व तुर्कांची एक फार मोठी लढाई होऊन त्यांत सर्वियाचा फार मोठा पराभव झाला. या पराभवानंतर सर्विया दबूनच गेला. त्यांचा शेवटचा झार लाझार हा पकडला गेला व तुर्कांनी त्याला मारलें. त्याच्या मुलीशीं तुर्की सुलतानानें लग्न केलें. या नंतर ५०० वर्षे सर्वियाचे लोक इतिहासांत चमकलेच नाहीत. १९१२ सालीं त्यांची व तुर्कांची एक फार मोठी लढाई कोमोनोव्हो येथे झाली. यांत मात्र तुर्कांचा पूरा बीमोड झाला. सर्वियन भाषेंत अशी म्हण पडली आहे की 'जें कोसोव्होला गमावलें तें कोमोनोव्होला भरून आलें'. १९१२ च्या या लढाईनंतर मॉंटिनिग्रोचें राज्य सर्वियांत मिळालें. त्यानंतर १९१३ सालीं मॅसिडोनियाचा हिस्सा सर्वियांत सामील झाला व पहिल्या जागतिक लढाईनंतर, क्रोयेशिया, स्लोव्हिनिया व बॉस्निया-हर्सेगोविना यांचा समावेश झाल्यानंतर १९१८ सालीं युगोस्लावियाची स्थापना झाली व जुन्या सर्वियन राजघराण्यांतील अलेक्झांडरला या नव्या देशाचा राजा म्हणून कायम करण्यांत आलें.

युगोस्लावियांत सर्ब आणि क्रोआट या दोन वंशांतील लोकांमध्ये फार जुन्या काळापासून स्पर्धा व चढाओढ चालू होती. याशिवाय सर्बियाचे लोक बरींच शतकें तुर्कांच्या हाताखाली राहिल्यामुळे व क्रोआट लोक ऑस्ट्रियन हंगारीच्या राज्यांत असल्यामुळे दोन्ही लोकांच्या आर्थिक प्रगतींत बरेंच अंतर होतें. तुर्की लोकांनी आपल्या राज्यांतील लोकांची आर्थिक स्थिति सुधारण्याचा कधीच प्रयत्न केला नाही. याच्या उलट क्रोयेशियाची आर्थिक प्रगति बरीच झाली होती. अलेक्झांडर हा सर्वियांतील काराजिऑर्जेव्हिक घराण्यांतील राजा असल्यामुळे क्रोआट लोकांना तो पसंत नव्हता. त्या राजाचें धोरण सुद्धा सर्वियाचेंच प्रस्थ वाढविणारें असल्यामुळे तर क्रोऑट लोकांना तो नकोसा झाला होता. त्यामुळे युगोस्लावियांत अलेक्झांडरच्या राजवटींत सर्ब व क्रोआट लोकांचीं भांडणें विकोपाला गेलीं. शेवटीं १९२९ सालीं अलेक्झांडरने पार्लमेंट बरखास्त करून एक नवीन घटना तयार केली, जिच्या अन्वयें त्याला संपूर्ण सत्ता मिळाली. सरतेशेवटीं १९३४ सालीं देशोधडीला लावण्यांत आलेल्या कांही क्रोआट लोकांनी फ्रांसमधील मार्सेल्स शहरीं अलेक्झांडरचा खून केला. त्यानंतर किंग पीटर नांवाच्या मुलाला गादीवर बसविण्यांत आलें व प्रिंस पॉल हा त्याच्यातर्फे रीजंट म्हणून कारभार पाहावयाला लागला. परंतु राजवटींत सर्बियन ऑफिसर लोकांचा बहुतेक भरणा असल्यामुळे सर्वियाचा वरचष्मा वाढविण्याची त्यांची वृत्ति कमी होईना. त्यांतच पुन्हा बॉस्निया–हर्सेगोविनाचा प्रश्न निघाला. या विभागावर सर्बिया व क्रोयेशिया दोन्ही हक्क सांगत होते. शेवटीं १९३९ सालीं एका करारान्वये या विभागाची वांटणी सर्बिया व क्रोयेशियांत करण्यांत आली. १९४१ सालीं जेव्हा जर्मन

फौजा युगोस्लावियांत घुसल्या तेव्हा त्यांनी या दोघांच्या भांडणाचा खूपच फायदा घेतला. या आंतील दुफळीमुळेच केवळ १२ दिवसांत युगोस्लावियाची फौज जर्मनांच्यापुढे नामोहरम झाली. क्रोआट शिपाई सैन्य सोडून चालते झाले. जर्मनांनी क्रोआट लोकांचें एक नवीन राज्य स्थापन केलें, त्यांची फौज तयार केली व या फौजेनें सर्वियन लोकांची फार मोठी कत्तल केली. आश्चर्याची गोष्ट ही की अशा तऱ्हेने आपल्या पक्षाचे लोक जर्मनांनी स्लोव्हिनियांत, क्रोयेशियांत व कांही प्रमाणांत सर्वियांत सुद्धा उभे केले. या सर्व लोकांशीं युगोस्लावियांतील पार्टीझन लोकांना लढावें लागलें. युगोस्लावियांतील कॉम्युनिस्ट पार्टीच्या नेतृत्वाखाली तयार झालेल्या फौजेला पार्टीझन ही संज्ञा होती. जर्मनांशीं लढण्यांत जितके पार्टीझन लोक कामाला आले त्यापेक्षा किती तरी जास्त या आपसांतील यादवींत कामाला आले. पण याचाहि एक अदृश्य फायदाच झाला. पार्टीझनच्या विरुद्ध लढणारे लोक हे वहुतेक मोठे जमीनदार, कारखानदार, व्यापारी या वर्गांतील किंवा या वर्गांशीं सहानुभूति बाळगणारे होते. अर्थातच जसजसा पार्टीझन फौजेचा विजय व्हावयाला लागला तसतसा हा वर्ग एक तर लढाईंत कामास आला किंवा पळून गेला. अशा रीतीने त्याचें आपोआपच उच्चाटन झालें. युगोस्लावियांतील लोकांचा अंदाज असा आहे की या लढाईंत एकंदर १८ लक्ष लोक कामास आले. आजच्या युगोस्लावियांतील लोकसंख्येचा हा दहावा हिस्सा आहे. नवीन राजवट येवढ्या मोठ्या रणकंदनानंतर स्थापन झाली.

नवीन राजवटीने मात्र जुन्या अनुभवापासून धडा घेण्याचें ठरविलें. युगोस्लावियांत सर्बियन लोकांच्या अधिपत्याचा भास होऊं नये म्हणून राज्यांतील पांचहि राष्ट्रांना एका संघराज्याची जरूरी लक्षांत घेऊन जितकी स्वायत्तता देतां येईल तितकी देण्याचें ठरविलें. नवीन राजवटींत राजाचा किंवा राजसंस्थेचा प्रश्नच राहिला नव्हता. लढाई सुरूं होतांच बालवयी पीटर राजा इंग्लंडला पळून गेला. आणि नोव्हेंबर १९४३ मध्येच टिटो व त्यांच्या साथीदारांनी निर्णय घेतला की काराजिऑर्जेव्हिक वंशाच्या राजाने पुन्हा युगोस्लावियांत पदार्पण करूं नये. पूर्वी मॅसेडोनिया व मॉंटेनिग्रो या विभागांना सर्बियाचाच भाग समजत असत. पण आता त्यांनाहि प्रजासत्ताक राज्याचे पूर्ण अधिकार देण्यांत आले. बॉस्निया-हर्मेगोविनाची पूर्वी जी क्रोयेशिया व सर्बिया यांच्यांत वांटणी झाली होती ती रद्द करून त्यांचें अेक नवीन प्रजासत्ताक राज्य बनविण्यांत आलें. व्हायव्होदीना व कोसव्हो मेटोहीजा असे दोन स्वायत्त प्रांत, सर्बियन रिपब्लिकखाली निर्माण करून, सर्बियाच्या विस्ताराने त्याला जें विशेष महत्व येत होतें तें कमी करण्यांत आलें. १९४६ च्या घटनेनुसार संघराज्याचीं दोन सभागृहें कायम करून, दुसऱ्या सभागृहांत सर्व प्रजासत्ताक राज्यांना समान प्रतिनिधित्व देण्यांत आलें. या सभागृहाची मंजुरी

सर्व कायद्यांकरिता लागे व पहिल्या सभागृहाएवढे सर्व दृष्टीने समान अधिकार त्याला होते. जुन्या युगोस्लावियांत ज्या वांशिक भेदामुळे भांडणें व असंतोष धुमसत होता त्याला अशा तऱ्हेने शमविण्यांत आलें. १९५३ च्या कायद्याने यांत थोडा बदल करण्यांत आला आहे. या कायद्याने दुसऱ्या सभागृहांत प्रजासत्ताक राज्याचे प्रतिनिधि नाहीत. प्रत्येक प्रजासत्ताक राज्यांत रिपब्लिकन कौंसिल व प्रोडयुसर्स कौंसिल अशीं दोन सभागृहें असतात. रिपब्लिकन कौंसिलला वरचें सभागृह समजतात व वयांत आलेल्या सर्व स्त्रीपुरुषांना या वरच्या सभागृहाकरिता प्रतिनिधि निवडण्याचा अधिकार आहे. प्रोडयुसर्स कौंसिलकरिता फक्त 'काम करणाऱ्यांनाच' (वर्कर्सनाच) मताचा अधिकार असतो. वरचें सभागृह प्रत्येक प्रजासत्ताक राज्याचें १० लोक व स्वायत्त प्रांतांतर्फे ६ प्रतिनिधि निवडनें अशा ७२ प्रतिनिधीचा समावेश संघराज्याच्या पहिल्याच सभागृहांत केलेला आहे. जेव्हा जेव्हा संघराज्यांचे व प्रजासत्ताक राज्यांचे पारस्परिक संबंध येतात तेव्हा हे ७२ प्रतिनिधि स्वतंत्रपणे राष्ट्रांचें कौंसिल (कौंसिल ऑफ नॅशनॅलिटीज) म्हणून अलग बसतात व त्यांचा निर्णय मान्य करण्यांत येतो.

आज मितीलासुद्धा अगदी खोलांत पाहिल्यास, सर्बिया व क्रोयेशिया हीं दोन्हीं राष्ट्रें, जुना इतिहास संपूर्णपणे विसरून गेलीं आहेत, असें म्हणणें अतिशयोक्तीचें होईल. परंतु एका संघराज्यांत राहण्याची दोघांचीहि इच्छा इतकी दृढ झाली आहे, क्रोयेशियाच्या प्रजासत्ताक राज्याचे अधिकार (इतर प्रजासत्ताक राज्याप्रमाणेच) इतके पुरेसे आहेत व लीग ऑफ कॉम्युनिस्ट्स किंवा सोशालिस्ट अलायन्स ऑफ दि वर्किंग पीपल ऑफ युगोस्लाविया या संघटनांचें येवढें प्राबल्य आहे की आपसांतील जुनें वैर हे दोन्ही वंश विसरत चालले आहेत व तें कालांतरानें नामशेष होईल अशी परिस्थिति निर्माण होण्याची आशा आहे.

नवीन राजवटीचें हेंहि धोरण आहे की युगोस्लावियांतील मागासलेल्या भागांचा विकास लौकर करुन त्यांना इतर भागांच्या बरोबरीला आणावयाचें. बॉस्निया-हर्सेगोविना, मॅसिडोनिया व मॉंटेनिग्रो या विभागाच्या विकासावर संघराज्याचें विशेष लक्ष आहे, कारण हे जास्त मागासलेले आहेत. यामुळे बाकीच्या तीन प्रजासत्ताक राज्यांचें कांही उत्पन्न या मागासलेल्या भागांवर खर्च होत आहे. व त्यामुळे थोडासा असंतोषहि निर्माण झालेला आहे. परंतु संघराज्य या धोरणावर दृढपणे अंमल करीत आहे आणि संघराज्याला त्यामुळे फार बळकटी आली आहे. या तीन प्रजासत्ताक राज्यांपैकी दोन राज्यांत आम्ही गेलों व आम्हांला त्यांनी त्यांच्या विभागांत झालेला विकास फार अभिमानाने दाखविला. प्रत्येक लोकराज्याचा स्वत:चा झेंडा आहे. एकूण लोकराज्यावरचें प्रेम संघराज्याच्या एकीच्या आड येत नाही असा युगोस्लावियाचा अनुभव आहे.

याबरोबरच अल्पसंख्यांकांना सांस्कृतिक संरक्षण देण्याचा पूर्ण प्रयत्न या नवीन राजवटीने केला आहे. प्रत्येक अल्पसंख्यांक लोकांना आपल्या भाषेंत प्राथमिक, माध्यमिक व इतर तऱ्हेच्या शाळा उघडण्याचा अधिकार आहे. जिथे हें शक्य होत नाही तिथे सर्वसाधारण शाळेंत अल्पसंख्यांकांना त्यांची भाषा शिकविण्याची विशेष सोय करण्यांत येते. त्याकरिता खास शिक्षक असून शाळेच्या कार्य-क्रमांत त्याची तरतूद केलेली असते. पक्षसंघटनेंत, फौजेंत व महत्त्वाच्या सरकारी जागा भरण्यांत कुणालाहि पक्षपाताची भावना राहणार नाही याबद्दल फार दक्षता बाळगण्यांत येते. फौज भरतींत सर्वांचे प्रतिनिधि समान दर्जाने घेण्यांत येतात व त्यांचें शिक्षण युगोस्लावियाच्या सर्व भागांत करण्याची पद्धति असल्यामुळे नव्या पिढींत राष्ट्रीय भावना फार जोरांत जागृत होत आहे.

धार्मिक आचरणांत सुद्धा पूर्ण व्यक्तिस्वातंत्र्य आहे. परंतु तरुणांमध्ये धार्मिक भावना प्रखरपणे दिसत नाहीत. कॅथॉलिक चर्चचें प्रस्थ मात्र अजूनहि क्रोयेशिया व स्लोव्हीनिया या विभागांत बरेंच आहे. साहित्यिक, नट, डॉक्टर इत्यादिकांच्या जशा राष्ट्रव्यापी संघटना आहेत, तशी संघटना पाद्र्यांची सुद्धा आहे. जोपर्यंत धार्मिक संघटना राजकारणांत पडत नाहीत, तोपर्यंत त्यांच्यावर कांहीहि निर्बंध नाहीत.

★ ★ ★

# सुरुवातीचीं पाऊलें : २

युगोस्लावियांत कॉम्युनिस्ट पार्टीची स्थापना प्रथम १९२० सालीं झाली व १९२१ पासूनच तिला बेकायदा ठरविण्यांत आलें. तेव्हापासून तो दुसरी लढाई सुरू होईपर्यंत ती बेकायदाच राहिली. आम्ही गेलों असतां युगोस्लावियांत कॉम्यु-निस्ट पार्टीच्या ४० व्या वर्षानिमित्त एक प्रदर्शन भरविण्यांत आलें होतें. त्यांत सुरवातीपासूनच या पक्षाला किती हाल सहन करावे लागले, किती लोकांना क्रूरतेने मारण्यांत आलें याचें चांगलें दिग्दर्शन केलें होतें. कॉम्युनिस्ट पार्टीचा सेक्रेटरी कोणी झाला की पोलिस त्याला मारण्याकरिता टपूनच राहात. परंतु १९३७ पर्यंत युगोस्लावियांतील वंशवादाची झळ याहि पक्षाला लागली होती व अंतस्थ फुटीमुळे हा पक्ष प्रभावी काम करूं शकला नाही. १९३७ सालीं टिटो हे पार्टीचे प्रमुख झाले व तेव्हापासून त्यांनी मोठ्या युक्तीने सर्व पार्टीला एका नियंत्रणाखाली आणलें व तिच्या कामाचें स्वरूप मजबूत केलें. टिटोच्या विशाल संघटनशक्तीचा हा पहिला विजय होता. दुसरा विजय इटाली व जर्मनांच्या फौजेशीं तोंड देण्याकरिता त्याने मोठी पार्टीझन फौज तयार केली व १९४५ सालीं या फौजेला जर्मनी व इटा-लीच्या फौजेवर जय मिळवितां आला. युगोस्लाविया नेहमी अशी बढाई मारतो की इतर देशांत जर्मनांच्या आक्रमणाविरुद्ध मोठा उठाव झालाच नाही. जर्मनांच्या पुढे तेथील लोक टिकाव धरूं शकले नाहीत. लाल फौजांनी त्यांच्या देशांतून जर्मनांना हाकलून लावल्यावरच ते उठले. परंतु युगोस्लावियांत मात्र पार्टीझन फौजेनेच प्रमुखत: जर्मनांना हाकलून लावलें. लाल फौजेची मदत अगदी शेवटीं शेवटीं झाली. या बढाईंत तथ्यांश बराच आहे. १९४२ सालींच पार्टीझन फौजेला इतका आत्मविश्वास वाटावयाला लागला की हंगामी सरकार स्थापन करण्याचा ती विचार करूं लागली. याकरिता त्यांनी एक मोठी सभाहि बोलावली. परंतु ऐन वेळेवर रशियाच्या सूचनेवरून हा विचार रद्द करण्यांत आला. १९४३ सालच्या नोव्हेंबरच्या सभेंत युगोस्लावियाच्या इंग्लंडमध्ये पळून गेलेल्या राजाला परत येण्याची बंदी केली, व आक्टोबर १९४४ मध्ये तिने बेलग्रेड सर केलें. १९४५ ऑगस्टमध्ये पहिला जमीन धारण करण्याचा कायदा पास झाला. त्या अनुसार जमिनीची कमाल मर्यादा २० ते ३५ हेक्टर ठरविण्यांत आली. पहिल्या निवडणुका नोव्हेंबर १९४५ मध्ये झाल्या

व त्यांत टिटोची पार्टी फार मोठ्या प्रमाणांत निवडून आली. १९४६ च्या उन्हाळ्यांत सहकारी शेतीचा कायदा पास करण्यांत आला. आणि त्याअनुसार कलेक्टिव्ह फार्मिंग, मशीन ट्रॅक्टर स्टेशन्स इत्यादि कायम करण्याचे अधिकार घेण्यांत आले. त्याच वर्षी डिसेंबरमध्ये राष्ट्रीकरणाचा कायदा पास झाला, व त्याअनुसार बहुतेक सर्व उद्योग समाजाच्या हातीं आले. तसें पाहिल्यास लढाईच्या दरम्यान हळूहळू राष्ट्रीकरण होतच होतें. जेव्हा लढाई १९४५ सालीं संपली तेव्हा शेकडा ५५ उद्योग हे, मालक गैरहजर आहेत किंवा शत्रूशीं सामील झाले आहेत, या सबबीवर समाजाच्या मालकीचे झाले होते. शेकडा २७ सरकारने जबरदस्तीने जप्त केले व केवळ शेकडा १८ च खाजगी व्यक्तींच्या हातांत राहिले होते. युगोस्लावियाची पहिली पंचवार्षिक योजना एप्रिल १९४७ सालीं जाहीर करण्यांत आली.

आणि मग एकदम युगोस्लावियाच्या आकाशांत रशियाशीं बिनसल्याचे काळे ढग मोठ्या प्रमाणांत दिसावयाला लागले. रशियाशीं कां बिनसलें याबद्दल नक्की सांगणें कठीण आहे. कॉम्युनिस्ट ब्लॉकमध्ये टिटोशिवाय दुसरा बलिष्ठ नेता नव्हता व ही टिटोची शक्ति स्टालिनला सहन झाली नसावी. युगोस्लावियाचें म्हणणें असें की रशियाला युगोस्लावियाचा आर्थिक विकासच नको होता. त्यामुळे या विकासाच्या मार्गांत स्टॅलिनकडून वारंवार अडचणी उत्पन्न करण्यांत आल्या. युगोस्लाविया शेतकीप्रधानच देश राहावा व रशियाला कच्चा माल त्याने पुरवीत राहावें या धोरणांतून रशियन तंत्रज्ञ वागत होते. रशियातर्फे जे फौजी अधिकारी युगोस्लावियांत आले होते ते फितुरी माजविण्याचा प्रयत्न करीत होते व कॉम्युनिस्ट पार्टींत टिटो व त्यांचे सहकारी, यांचें जें वजन होतें तें नामशेष करण्याच्या प्रयत्नांत होते. युगोस्लाविया व रशिया या दोन राष्ट्रांनी मिळून युगोस्लावियांत ज्या कंपन्या उभ्या केल्या होत्या, त्यांत रशियाला फारच जास्त सवलती होत्या व युगोस्लावियाला कांही नव्हत्या असाहि एक आक्षेप होता. हें सर्व भांडण विकोपाला जाऊन मार्च १९४८ मध्ये रशियाने युगोस्लावियांतील आपले सर्व फौजी व मुलकी अधिकारी काढून घेतले व जूनमध्ये * कॉमिनफॉर्ममधून युगोस्लावियाच्या कॉम्युनिस्ट पार्टीला काढून टाकण्याचा ठराव संमत झाला.

आणि यानंतर युगोस्लावियाचा मनु एकदम बदलला. वाघ म्हटलें तरी खातो, वाघोबा म्हटलें तरी खातोच अशी युगोस्लावियाची वृत्ति झाली. जेव्हा समेटाची सर्व आशा निष्फळ ठरली व युगोस्लावियाच्या सरहद्दीवर फौजेची हालचाल व्हावयाला लागली, तेव्हा टिटोने पाश्चिमात्य राष्ट्रांकडे मदतीकरिता धाव घेतली.

---

* कॉमिनफॉर्म ही एक सर्व राष्ट्रांच्या कॉम्युनिस्ट पक्ष्यांची जागतिक संघटणा आहे.

या राष्ट्रांना लोखंडी पडद्यांत आपला हात शिरकावण्याला ही एक चांगली संधि दिसून आली व त्यांनी टिटोला मदत करण्याचें अभिवचन तावडतोब दिलें. इकडे युगोस्लावियांत स्टॅलिनच्या विरुद्ध प्रतिक्रिया सुरू झाली. त्याचे फोटो आणि पुतळे ठिकठिकाणाहून काढून टाकण्यांत आले. अशा तऱ्हेने युगोस्लाविया सोवियत गटांतून निघून पाश्चात्य राष्ट्रांच्या मदतीवर अवलंबून राहिला. १९५० सालीं जेव्हा युगोस्लावियांत अवर्षणामुळे पीक फारच कमी आलें व देशांत दुष्काळ पडला, तेव्हा अमेरिकन सरकारने बऱ्याच मोठ्या प्रमाणांत गव्हाची आयात केली, व टिटोने जाहीर रीतीने ही मदत कबूल करून, असेंहि सांगितलें की या मदतीमागे कसलीहि राजकीय अट नाही. अर्थातच बरेचसे अमेरिकन नागरिक या गव्हाचें वांटप योग्य तऱ्हेने करण्याकरिता युगोस्लावियांत आले व अमेरिकेचे व युगोस्लावियाचे संबंध मित्रत्वाचे झाले.

या सर्व संघर्षांतून एका नवीन तत्त्वज्ञानाचा जन्म झाला. युगोस्लावियाने मार्क्सिझमचीं तत्त्वें सोडलीं नाहीत. उलट रशियाचें अंधानुकरण न करतां नवीन मार्गाच्या शोधाला तो लागला. रशियांत व्यक्तीचें स्वातंत्र्य हिरावण्यांत आलें आहे, जाणून बुजून खोटा प्रचार होतो, लहानांत व मोठ्यांत आर्थिक विषमता फार मोठी आहे, रशियन साम्राज्यवाद कॉम्युनिझमच्या नांवाखाली धुडगूस घालीत आहे, व त्यामुळे इतर राष्ट्रांच्या संस्कृतीवर व राष्ट्रीय वृत्तीवर घाले पडत आहेत, रशियाने मार्क्सवादावर भाष्य करण्याचा कायमचा ठेका घेतला आहे, तेथे मार्क्सवादाची प्रगति न होतां तो खुंटला गेला आहे, लोकांच्या स्वयंस्फूर्त पराक्रमाला तिथे वाव नाही, नोकरशाही व कॉम्युनिस्ट पार्टी यांनी सर्व सत्ता आपल्या हातांत घेऊन लोकांवर जुलूम चालविला आहे, असे सर्व आरोप युगोस्लावियाने रशियावर केले. मार्क्स व लेनिन यांच्या मूलतत्त्वांच्याच अनुषंगाने आम्ही एक नवीन मार्ग चोखाळूं. ज्यांत व्यक्तिस्वातंत्र्य राहील, श्रम करणारा हा खरोखरच आत्मनिर्भर राहील, कॉम्युनिस्ट पार्टीचा व नोकरशाहीचा लोकांवर दबदबा व वरचष्मा न राहतां लोकांचें सेवक म्हणून ते राहतील, व राष्ट्राची व राष्ट्रांतील उद्योगांची विकेंद्रीकरणाकडे प्रवृत्ति राहील. हें सर्व करण्यांत युगोस्लाविया कितपत सफळ झाला, त्याच्या विचारधारेंत व रशियाच्या सनातनी विचारधारेंत फरक कोणते आहेत, या फरकांमुळे युगोस्लावियाच्या समाजरचनेंत व राज्यव्यवस्थेंत कोणते बदल झाले, व्यक्तिस्वातंत्र्य, विकेंद्रीकरण व लोकशाही यांच्या दृष्टिकोनांतून हे बदल वरकरणी आहेत की मूलगामी आहेत याचा आता विचार करावयाचा आहे.

★ ★ ★

## थोडेसें तात्त्विक विवेचन : ३

नवीन धोरणानुसार, युगोस्लावियाने कोणतीं पावलें उचललीं हें पाहण्यापूर्वी, त्याने मान्य केलेल्या मार्क्सवादाच्या मूळ भूमिकेचें थोडेसें परीक्षण करायला पाहिजे. हें वर आलेंच आहे की मार्क्सवाद युगोस्लावियाला संपूर्णपणे मान्य आहे. त्याचें म्हणणें येवढेंच की रशियांत त्याची जी प्रगति खुंटली व त्याला एक भलतेंच आणि विकृत स्वरूप आलें तें टाळून आम्ही खऱ्या मार्क्सवादाच्या अनुषंगाने जात आहोंत.

युगोस्लावियाला मान्य आहेत अशा मार्क्सवादाचीं मूळ तत्त्वें कोणतीं ? मानवसमाजाचा इतिहास वर्गविग्रहांतून झाला आहे व पुढेहि होईल. त्यांना विरोधविकासवाद मान्य आहे. भांडवलशाही समाज हा भूत काळांतला आहे म्हणून त्याची पिछेहाट होऊन आधुनिक काळांतील उदयोन्मुख समाजवादाची प्रस्थापना प्रत्येक देशांत होईल. मानवी समाज समाजवादापासून सुटूं शकत नाही. या दोन वादांतील मुख्य फरक म्हणजे भांडवलशाही समाजांत उत्पादनाचीं साधनें खाजगी व्यक्तींच्या मालकीची असतात व उत्पादन नफ्यावर दृष्टि ठेवून होत असतें. समाजांत असलेली मानवाची प्रतिष्ठा त्याच्या कर्तृत्वशक्तीवर नसून त्याच्याजवळ असलेल्या संपत्तीवर अवलंबून असते. समाजवादाचें प्रमुख लक्षण म्हणजे उत्पादनाच्या साधनांचें सामाजीकरण. म्हणजे व्यक्तींच्या हातांतून तीं साधनें काढून समाजाच्या स्वाधीन करणें. मनुष्याचा आर्थिक दर्जा त्याने केलेल्या कामावर अवलंबून असायला हवा व उत्पादनाचा उद्देश नफा नसून समाजाच्या व्यक्तिगत व सामाजिक गरजा जास्तींत जास्त भागवणें हा असायला हवा. हें परिवर्तन प्रत्येक देशांत केव्हा व कसें होईल हें तेथील परिस्थितीवर व समाजवादी शक्तीच्या विकासावर अवलंबून आहे. विकसित देशांमध्ये जीवनस्तर उंच असल्यामुळे समाजांतील अंतर्गत विरोधाची शक्ति कमी असते, व त्यामुळे उत्क्रांतीच्या मार्गानेसुद्धा अशा देशांत समाजवाद येऊं शकेल. पण अप्रगत राष्ट्रांत साधारणपणे ही गोष्ट शक्य नाही. तेथे क्रांतीनेच हें परिवर्तन घडवून आणावें लागेल. या परिवर्तनांत, मग तें क्रांतीतून घडलेलें असो किंवा उत्क्रांतींतून, कामगार वर्गाची संघटित शक्ति प्रभावीपणे कामीं येऊं शकते.

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्थळमत.
क्रमांक ३७१३८ दि: नों: दि: २९५


भांडवलशाहींतून समाजवादाकडे जाण्याकरिता जीं स्थित्यंतरें होत असतात त्यांतील पहिली पायरी शासनसत्तेवर कबजा मिळविणें ही होय. हा कबजा कायम राखून समाजांतील उत्पादनवाढीकडे प्रथम लक्ष द्यावयास पाहिजे. कारण ज्या प्रमाणांत उत्पादनवाढ व उत्पादनवाढीचा पाया मजबूत होईल, त्या प्रमाणांत समाजवादी संबंधांचा (सोशालिस्ट रिलेशन्सचा) परिपोष करतां येईल (सोशालिस्ट रिलेशन्स डिपेन्ड प्रायमरिली ऑन दि मटेरियल फाउंडेशन्स ऑफ सोसायटी). ज्या प्रमाणांत समाजाचा आर्थिक पाया कच्चा व मागासलेला असेल, त्या प्रमाणांत कामगारवर्गाचें नेतृत्व टिकविणें व वाढविणें हें कठिण होतें व समाजवाद येण्याला वेळ लागतो. या दरम्यानच्या काळांत भांडवलशाही समाजरचनेशीं पुष्कळदा अनेक तडजोडी (कॉम्प्रमायजेस) कराव्या लागतात. लहान मालक, मध्यम वर्ग व सरकारी भांडवलशाही (स्टेट कॅपिटॅलिझम्) या सर्वांवर कमी अधिक प्रमाणांत कित्येकदा विसंबावें लागतें. यामुळे पुष्कळदा अनेक विरोध निर्माण होतात, आणि ते केवळ शासनसत्तेच्या भरवशावर दाबून टाकता येत नाहीत. कारण त्यांचीं पाळेमुळें फार खोल गेलेलीं असतात. जुन्या भांडवलशाही समाजाच्या अवशेषांशीं झगडावें लागतें. विशेषतः, अशा बुद्धिवादी मध्यम वर्गाशीं झगडावें लागतें, की ज्याचा संबंध जुन्या भांडवलशाहीशीं, लहान मालकांच्या स्वार्थाशीं व जमिनीच्या खाजगी मालकीशीं असतो. ज्या प्रमाणांत देश मागासलेला असेल त्या प्रमाणांत हा आंतरिक विरोध वाढतो आणि समाजवादी शक्तींचा आणि भांडवलशाही शक्तींचा झगडा तीव्र होतो. त्यामुळे प्रतिक्रांतीचीसुद्धा भीति निर्माण होते. याशिवाय अनेकदा कामगारांची जाणीवसुद्धा पुरेशी तीव्र नसते व त्यामुळे अनेक अडचणी निर्माण होतात. एका रात्रींतून सर्व जुन्या पुंजीवादी कल्पनाचें उच्चाटन होऊन त्यांच्या जागीं समाजवादी संबंध प्रस्थापित होणें शक्य नसतें. त्यामुळे या परिवर्तनांत मार्ग काढीत असतां अंतर्विरोधांतून होणारी बेबंदशाही (अनार्की) टाळायला पाहिजे व कामगारांची जाणीव हळूहळू वाढवून त्यांना नवीन नवीन समाजवादी स्थित्यंतराकडे प्रवृत्त करायला पाहिजे.

म्हणून या परिवर्तनकाळांत शासनसत्तेला फार महत्त्व येतें. विजयी मजूरवर्गाला शासनसत्तेची जरूरी असते. कारण तिच्या भरवशावरच जुन्या भांडवलशाही समाजाच्या व कल्पनांच्या अवशेषांशीं त्याला झगडतां येतें. आणि तिच्याच भरवशावर नवीनच झालेल्या समाजाच्या मालकीच्या उत्पादनाच्या साधनांतून उत्पादनाला नवीन दिशा देतां येते व उत्पादनवाढ करतां येते. नवीन समाजरचनेचा आर्थिक पाया भरभक्कम तयार होईपर्यंत समाजवादी शासनसत्तेला आर्थिक व्यवस्था व समाजाचें नियन्त्रण हें करायलाच पाहिजे.

या सर्व कारणांमुळे सुरवातीच्या काळांत समाजवादी सरकाराला कमी

जास्त प्रमाणांत उत्पादनाच्या सर्व क्षेत्रांवर ताबा करून त्यांची योजनाबद्ध व्यवस्था करावी लागते. कांही ठराविक आर्थिक अुद्दिष्टें गाठण्याचें एकमेव साधन शासन-संस्था बनते व निर्माण झालेल्या उत्पादनाचें वितरण समाजवादाला अनुकूल असें घडविण्याची जबाबदारीहि तिलाच उचलावी लागते.

यामुळे असा संभव निर्माण होतो की शासनसत्तेच्या प्रबलतेचें व अनिवार्यतेचें पारडें जड होऊन समाजवादाला पुढे नेणाऱ्या आंतरिक लोकशक्तीचें पारडें हलकें होतें. असें झाल्यास जनतेचा उत्साह, तिची स्वयंस्फूर्त कर्तृत्वशक्ति व संघटना यांची शक्ति कमी पडून शासनसत्ता सामाजिक विकासाला विरोधक होते आणि त्यामुळे समाजवाद पुढे जाऊं शकत नाही. युगोस्लावियाचा व इतर समाजवादी राष्ट्रांचा अनुभव हा आहे की समाजाचीं आर्थिक सूत्रें जेव्हा केवळ शासनव्यवस्थांच्या हातीं असतात तेव्हा त्यांची स्वाभाविक प्रवृत्ति जास्त केंद्रीकरणाकडे होते व पक्षसंघटना व शासनसत्ता यांचें एकीकरण होऊन साधारण जनसमाजापासून ते अलग पडतात व त्यांच्यावरच आपला अधिकार चालविण्याची त्यांची प्रवृत्ति होत असते. त्यामुळे शासनसंस्था लोकांची सेवक बनण्याऐवजी ती समाजाची मालक बनते. विशेषत: जर समाजाची आर्थिक परिस्थिति मागासलेली असली, कामकरी वर्गाची सामाजिक शक्ति व प्रभाव कमी असला तर हे परिणाम जास्त स्पष्ट दिसतात.

म्हणून शासनसत्तेवर कामगार वर्गाचा जम व अधिकार पूर्णपणे बसल्यावर समाजवादाच्या प्रगतीच्या दृष्टीने शासनसत्तेचा अधिकार हळूहळू नष्ट होत जाण्याचा प्रश्न(शासनसत्ता सुकत जाण्याचा--विदरिंग अप ऑफ स्टेट पॉवर) फार महत्त्वाचा आहे. आर्थिक क्षेत्रांत त्यामुळे सरकारी भांडवलशाहीवर (स्टेट कॅपिटॅलिझमवर) जय मिळवितां येतो. या सुकत जाण्याला किती काळ लागेल हें बऱ्याच गोष्टींवर अवलंबून आहे. परंतु सुकण्याची क्रिया सुरुं झाल्याबरोबर शासनसत्तेचा शासनांतील हिस्सा (रोल) कमी झाल्याचें दिसलें पाहिजे व तिचीं जीं निरनिराळीं अंगें आहेत त्यांत लोकांची सत्ता प्रस्थापित होण्याच्या दृष्टीने बदल व्हायला पाहिजे. प्रत्यक्ष लोकशाहीला (डायरेक्ट डेमॉक्रसीला) हळूहळू सुरवात व्हायला पाहिजे आणि लोकस्वराज्याच्या (सोशल सेल्फ गव्हर्नमेंटच्या) निरनिराळ्या संस्था निर्माण होऊन त्यांचीं कामें वाढलीं पाहिजेत.

सोव्हियट रशियामध्ये मात्र अनेक कारणांमुळे अशा तऱ्हने लोकशक्तीची वाढ न होतां कॉम्युनिस्ट पार्टीच्या अधिकाराची व शासनसत्तेची वाढ झाली. जाणून-बुजून या वाढीविरुद्ध कसलाहि उठाव न करतां स्टॅलिन स्वत:च तिचा म्होरक्या झाला व आपल्या हातांत सर्व सत्ता त्याने केंद्रित करून घेतली. अशा तऱ्हेनें मार्क्सिझम-लेनिनिझमच्या कांही मूलभूत तत्त्वांत परिस्थितीच्या सबबीवर स्टॅलिनने फेरबदल केला. पहिला बदल शासनसंस्था व पक्ष यांच्या संबंधांत, व दुसरा मार्क्सिझमच्या एकंदर तत्त्वज्ञानांत. मार्क्सिझमच्या तत्त्वज्ञानाप्रमाणे संपत्तिरहितांच्या

अधिसत्तेचा (डिक्टेटरशिप ऑफ दी प्रोलेटॅरियट) उपयोग समाजांतील भांडवलशाहीचा पाया ढासळवून समाजवादी संबंध आर्थिक व सामाजिक क्षेत्रांत निर्माण होण्याकरिता जागा मोकळी करणें हा होता. त्या मोकळ्या जागेवर समाजवादी संबंध जसजसे प्रस्थापित होत जातील तसतशी शासनसत्ता ही सुकायला हवी होती व तिची जागा लोकांच्या स्वयंस्फूर्त संघटनांनी घ्यायला हवी होती. ह्याउलट स्टॅलिनने शोधून काढलेल्या नवीन तत्त्वज्ञानाप्रमाणे शासनसत्तेला सुकण्याची तर जरूरी राहिलीच नाही, पण ती जीवनाच्या सामाजिक, आर्थिक सांस्कृतिक या सर्व क्षेत्रांत दिवसेंदिवस जास्तच प्रबल होत गेली. शासनसत्तेच्या मातहत असलेल्या नोकरशाहीला त्यामुळे समाजवादाच्या रचनेंत जनतेच्या आवाडीपेक्षा महत्त्वाचें अग्रस्थान प्राप्त झालें व त्याचा परिणाम जनतेचा उत्साह मारण्यांत झाला. दुसऱ्या जागतिक महायुद्धानंतर हे दोष सोवियट सरकारच्या परराष्ट्रीय धोरणांत व समाजवादी राष्ट्रांच्या आपसांतील संबंधांत दिसून येऊं लागले. त्यामुळेच स्टॅलिनला युगोस्लावियाविरुद्ध कारवाई करावी लागली व १९४८ सालीं त्याला कॉमिन्फॉर्ममधून काढावें लागलें.

एकदा कामकरी वर्गाच्या हातांत शासनसत्ता आली की तिचा उपयोग जुन्या अर्थव्यवस्थेचा नायनाट करण्यांत, देशांत अराजकता न माजूं देण्यांत, कांही तात्पुरते आर्थिक उद्देश सफल करण्यांत व समाजवादी कल्पनांप्रमाणे उत्पादनाचें विभाजन करण्यांत व्हायला पाहिजे. पण हें झाल्याबरोबरच शासनसंस्था अशी परिस्थिति निर्माण करते की, जींत तिला हळूहळू सुकत जायला पाहिजे. समाजवादाची उभारणी व त्याचा विकास लोकांच्या स्वयंस्फूर्त व स्वावलंबी संघटनांतून व्हावयास पाहिजे. तेव्हाच काम करणाऱ्यांची उत्पादक इच्छाशक्ति व उत्साह पूर्णपणे जागृत होईल व तो व्यक्तिशः व संघशः समाजवादाच्या विकासांत पूर्णपणे भाग घेऊं शकेल. असें न होतां जर शासनसत्ता व नोकरशाही यांचीच सत्ता वाढावयास लागली, तर ते लोकांचे सेवक न बनतां लोक त्यांचे दास बनतील व त्या प्रमाणांत त्यांची उद्योगप्रियता व उत्साह मारला जाऊन ते शासनसत्तेचे व पक्षाचे गुलाम बनतील.

क्रांतीचा किंवा समाजवादी शासनसंस्थेचा उद्देश एका ठराविक साच्याप्रमाणे नवीन समाजरचना करण्याचा मुळीच नसावा; जुन्या समाजाच्या कुशींतून निर्माण झालेल्या आर्थिक व सामाजिक शक्तींना नवीन समाजरचना घडविण्याकरिता प्रकटपणे वाव देणें व समाजवादी समाजरचनेच्या अनुषंगानें त्यांना वळविणें हा असावा. या काळांत शासनसंस्थेचे उद्देश खालीलप्रमाणे असायला हवेत--(१) भांडवलशाहीपासून समाजवादी शक्तींची सुटका करण्याकरिता वाहक बनणें, (२) उत्पादनाच्या साधनांचें समाजीकरण झाल्यावर त्यांच्या निरंकुश विकासावर आलेल्या अरिष्टांच्या प्रतिकाराचें साधन बनणें व (३) लोकांच्या स्वतंत्र व स्वयंस्फूर्त संघटनांना

आकार देणें. म्हणून समाजवादी शासनसंस्था अशा स्वरूपाची असावी की तिची शक्ति हळूहळू कमी होऊन ती सुकत जाईल. तिचें समाजांतील प्रयोजन व घटना अशी असावी की तिचें सुकणें तिच्या चालकांच्या इच्छाशक्तीवर अवलंबून नसावें. म्हणजे त्यांना वाटेल तेव्हा या प्रगतीला खोळ घालतां येणार नाही. हें होण्याकरिता लोकशाहीच्या विकासाला वाव द्यायला हवा. समाज-जीवनांत सामाजिक स्वराज्य (सोशल सेल्फ गव्हर्नमेंट) संस्थांची निर्मिति करायला पाहिजे. युगोस्लावियांत या संस्था कामगारांची व्यवस्था (वर्कर्स मॅनेजमेंट), पीपल्स कॉम्युन्स व धंद्यांच्या संघटना या आहेत.

दरम्यानच्या काळांत समाजवादाला नोकरशाहीपासून फार मोठें भय आहे. केंद्रित नोकरशाहीमुळे समाजवादी लोकशाहीचा विकास व्हावयाला अडचण निर्माण होते व समाजवादी सामाजिक संबंधांत विकृति निर्माण होते. तिचा जर पूर्ण विकास झाला तर तिच्यांतून एक नवीन तऱ्हेची शासनसंस्थेची भांडवलशाही (स्टेट कॅपिटॅलिझम) निर्माण होण्याची भीति असते.

शेवटीं समाजामध्ये समाजवादी विकासाला मदत करणाऱ्या शक्तींचा विचार करून हें प्रकरण संपवायला पाहिजे.

(१) त्यांत पहिला नंबर उत्पादकाचा (प्रोडयुसर)—समाजाच्या मालकीचीं उत्पादनाचीं साधनें तो वापरतो. आपल्या परिश्रमांतून मिळणाऱ्या आर्थिक लाभावरच तो जगत असल्यामुळे समाजवादाचा तो एक मुख्य प्रतिनिधि आहे.

(२) समुदायांत काम करणारे लोक (वर्किंग कलेक्टिव्ह)—हिच्यामार्फत सामुदायिक व्यवसाय चालतो. ही व्यक्तिगत लाभ व सामुदायिक लाभ यांचा समन्वय करते आणि दोघांचीहि उत्पादनशक्ति वाढविते. कांही जरूरीच्या आर्थिक बाबीं हिच्या मार्फत समाज चालवितो.

(३) दि कॉम्यून—समाजाच्या, समाजिक, आर्थिक व राजकीय व्यवस्थेचा हा शेवटला घटक. ह्याच्यांतून व्यक्ति व समाज यांचे सामाजिक संबंध सांधले जातात. या घटकांत उपभोक्ता आणि सामाजिक, सांस्कृतिक व आर्थिक संघटनापासून लाभ घेणारा असा उत्पादकाचा दुहेरी संबंध असल्यामुळे, उत्पादन वाढ व जीवनाच्या स्तराचा विकास या दोहोंशीं उत्पादकाचा निकटचा संबंध येतो. म्हणून, मी एक समाजाकडून केवळ पगार घेणारा आहे, ही त्याची कल्पना जाऊन, समाजाचा एक घटक या भावनेंतून तो समाजविकासाकडे बघत असतो.

(४) समाजवादी सामाजिक संघटना (सोशालिस्ट सोशल ऑर्गनायजेशन्स)—यांत राजकीय, सामाजिक, आर्थिक व सांस्कृतिक या सर्व संघटनांचा समावेश होतो. एका बाजूने या संघटना समाजाच्या निरनिराळ्या गरजा पूर्ण करतात व दुसऱ्या बाजूने समाजाला समाजवादाकडे नेण्यांत त्यांची मदत होते.

या सर्व शक्ति मोकळया तऱ्हेने आपापल्या क्षेत्रांत वावरायला लागल्या; तर या सर्वांना एका सूत्रांत बांधणारी शासनसंस्था त्यांची प्रतिनिधि म्हणून समाजवादाला पुढे आणण्यांत महत्त्वाची ठरेल. आणि याच्या उलट जर शासनसंस्था व नोकरशाही ही या शक्तींच्या स्वतंत्र संचाराच्या आड यावयास लागली, तर मग ती एक स्वतन्त्र आर्थिक शक्ति होऊन बसेल, आणि नोकरशाही लोकांच्या अभिक्रमाला मारक ठरून समाजवादी संबंधाच्या वाढींत अडथळे निर्माण करील.

म्हणून समाजवादी शासनसंस्थेची घटना अशी असायला पाहिजे की (१) वर नमूद केलेल्या सर्व शक्तींना आपापल्या क्षेत्रांत वावरण्यास पूर्ण वाव असावा. अर्थात तो वाव एका योजनाबद्ध सामाजिक व आर्थिक विकासाच्या अंतर्गतच राहील. व (२) त्यांतून संपूर्ण समाजाची प्रगति, उत्पादकांचा एक समाजवादी समाज अशा स्वरूपांत व्हायला पाहिजे. या समाजांत वर्गविग्रह, खेडीं व शहरें यांतील भेद, शारीरिक व बौद्धिक मेहनत यांतील फरक, काम करणारे व देखरेख करणारे, इ. सर्व फरक नाहीसे होतील. अशा संबंधांत मानवी समाज हा बरोबरीच्यांचा उत्पादक समाज होतो, ज्यांत समाजाच्या गरजा निर्माण करण्यांत व त्या भागविण्यांत प्रत्येकाचें एक विशिष्ट स्थान असतें. अशा तऱ्हेने हळूहळू साम्यवादाकडे समाजवादाची प्रगति होईल. त्या परिस्थितींत प्रत्येक व्यक्ति आपल्या शक्तीनुसार समाजाला देईल व गरजेनुसार समाजापासून घेईल.

★ ★ ★

# युगोस्लावियांतील शेतीच्या धारणेंतील स्थित्यंतरें : ४

साधारण समज असा आहे की १९४५ पासून ते १९४८ पर्यंत, म्हणजे रशियाशीं फाटेपावेतो, आर्थिक व सामाजिक प्रगतीच्या सर्व बाबतींत युगोस्लावियाचीं पाऊलें, पहिल्या पंचवार्षिक योजनेच्या वेळीं रशियाची जशीं पडलीं, तशींच पडत होतीं. १९४८ नंतर जेव्हा कॉमिन्फॉर्ममधून योगुस्लाविया बाहेर पडला तेव्हा त्याला स्वत:च्या पायावर उभे राहण्याची व स्वत:ची शक्ति वाढविण्याची जरूरी भासल्यामुळे त्याने नोकरशाहीविरोधी व लोकशाहीची तरफदारी करणारा कार्यक्रम उचलला. आणि एकदा या रस्त्याने गेल्यावर तो हळूहळू पाश्चात्य लोकशाहीच्या मार्गाने जाईल. याचा अर्थ असा की रशियाशीं फाटलें म्हणून युगोस्लावियाने दुसरा मार्ग पत्करला. जर फाटलें नसतें, तर तो त्याच्या मार्गाने गेला असता.

युगोस्लावियाला मात्र हें म्हणणें संपूर्णपणे अमान्य आहे. त्याचें म्हणणें असें की रशियाशीं झगडा झाल्यामुळे आम्हीं दुसरा मार्ग पत्करला. हें बरोबर नसून आमचा मार्गच भिन्न असल्याकारणाने रशियाशीं झगडा झाला. म्हणजे रशियाशीं जो झगडा झाला त्याचीं बीजें पूर्वीपासूनच युगोस्लावियाच्या परिस्थितींत व त्याच्या तत्त्वज्ञानांत होतीं. या दृष्टिकोनातून शेतीविषयक बाबतींत तरी युगोस्लावियाच्या सुरवातीच्या पावलांकडे पाहिलें तर या भिन्न मार्गाचें कांही दर्शन होतें असें म्हणतां येणार नाही. येवढेंच म्हणतां येईल की सुरवातीला तरी सहकारी व सामुदायिक शेतींत प्रवेश हा स्वेच्छेवर अवलंबून होता. त्याबाबत फारशी जुलूमजबरदस्ती दिसत नव्हती. २५ हेक्टरांच्या सीलिंगनंतर जी जमीन सरकारच्या हातीं आली, त्यापैकी केवळ २·६% येवढ्यावरच सहकारी शेती होऊं शकली. सीलिंगनंतर जी जमीन सरकारच्या हातीं आली ती केवळ ७·८% होती. व यापैकी ८०% गरीब व भूमिहीन शेतकऱ्यांना वाटण्यांत आली. बाकीच्या जमिनीवर व्यक्तिगत शेतीच झाली. प्रचार अर्थातच सुरु होता. पण तो फारसा सफल झाल्याचीं लक्षणें दिसत नव्हतीं. एवढेंच नव्हे तर पुढे झालेल्या भांडणांत रशियाचा युगोस्लावियावर हा एक आक्षेप होता की शेतकऱ्यांच्या बाबतींत युगोस्लावियाचें जें धोरण आहे त्यावरून तो खरा मार्क्सवादी देशच नाही असें दिसतें.

याला कारणेंहि बरींच होतीं. युगोस्लावियांतील शेतकरी हा पुष्कळसा पार्टीझन पक्षांतला होता. त्याला एकदम नाराज करतां येणें शक्य नव्हतें. दुसरें, श्रीमंत शेतकरीवर्ग अगोदरच नामशेष झाल्यामुळे सीलिंगने जें कांही परिवर्तन झालें तें कायद्याने घडलें, वर्गविग्रहांतून घडलें नाही. श्रीमंत शेतकऱ्यांच्या विरुद्ध इतर, अशा भांडणांतून त्याची निष्पत्ति झाली नव्हती. त्यामुळे प्रचाराला कांही धार नव्हती. शिवाय कॉम्युनिस्ट पार्टीमध्ये शेतकरी फार मोठ्या संख्येंत होता. १९४८ सालीं पार्टीतील शेतकऱ्यांची संख्या ४९.१५% एवढी होती. सुरवातीला ती याहून जास्त असावी.

१९४६ सालीं 'बेसिक लॉ ऑन कोऑपरेटिव्हज' ( सहकारी समित्यांबाबत मूळ कायदा ) पास करण्यांत आला. त्यानुसार रशियासारखी स्टेट-ट्रॅक्टर-स्टेशनांची ठिकठिकाणीं स्थापना झाली व शहरांतील माल सहकारी समित्यांमार्फत खेड्यांतून विकण्याची व्यवस्था झाली. या कायद्याप्रमाणे सुरवातीला, ज्याला आज आपल्या देशांत 'सर्विस कोऑपरेटिव्हज' म्हणतात, अशा प्रकारच्या नाना तऱ्हेच्या समित्यांची ठिकठिकाणीं स्थापना झाली. यांना 'जनरल कोऑपरेटिव्हज' असें संबोधण्यांत आलें. याशिवाय चार तऱ्हेच्या 'कामकरी शेतकऱ्यांच्या समित्यां' ची (पेझंट वर्किंग कोऑपरेटिव्हजची) स्थापना झाली. त्यांत एक प्रकार 'कोलखोज' किंवा 'कलेक्टिव्ह' पद्धतीचा होता. त्यांत सामील झालेल्या शेतकऱ्यांना जमिनीच्या मालकीबद्दल कांही मिळत नव्हतें. उत्पन्नाची वांटणी प्रत्येकाच्या श्रमानुसार होत होती. दुसऱ्या टोकाला अशा समित्या होत्या की, ज्यांत ज्याला त्याला आपली जमीन, अवजारें, इत्यादि साधनांच्या किमतीप्रमाणे, खर्च वजा जातां उत्पन्नांत हिस्सा मिळत होता. तीन वर्षांनंतर वाटल्यास समितींतून निघतां येत असे. इतर दोन पद्धति या दोन टोकांच्या मध्ये होत्या, म्हणजे मजुरी व मालकी या दोन्हींवर वांटणी आधारित होती. व्यवस्थापक-मंडळाची निवड संपूर्णपणे स्थानिक समितीवर अवलंबून असे. त्यांत वरून हस्तक्षेप होत नव्हता. अर्थात 'पेझंट वर्किंग कोऑपरेटिव्हज' ह्या जनरल कोऑपरेटिव्हजच्या सभासद असत.

आश्चर्याची गोष्ट ही की १९४८ नंतर याबाबत फरक झाला. त्यानंतर कांही जबरदस्ती सुरू झाली. त्याला मुख्य कारण माझ्या मतें अन्नधान्याची परिस्थिति हें होतें. १९४५ नंतर २–३ वर्षांत उत्पादन वाढायला लागलें होतें. त्याला कारण लढाईनंतरची निवळलेली परिस्थिति हें होतें. परंतु वाढत्या लोकसंख्येला व झपाट्याने चाललेल्या औद्योगिक विकासाला तें पुरेसें नव्हतें. रशियाशीं फाटल्यावर भोवतालच्या देशांतून धान्याची मदत होणार नाही हीहि भीति युगोस्लावियाच्या नेत्यांना वाटली असावी. व अजूनपर्यंत पाश्चात्य राष्ट्रांशीं

संबंध जोडले गेले नव्हते. म्हणून देशांतील अन्नपरिस्थिति सुधारण्याकरिता विशेष कारवाई करायला पाहिजे असें युगोस्लावियन् नेत्यांना वाटणें स्वाभाविक होतें.

सामूहीकरणाची गति वाढविण्याकरिता एक मोठें आंदोलन सुरू झालें. बऱ्याच लोकांना त्यांच्या इच्छेविरुद्ध या पेझंट वर्किंग कोऑपरेटिव्हजमध्ये घालण्यांत आलें. त्यांची संख्या १९४८ मध्ये १३१८ होती ती १९५० च्या शेवटी ६९६४ झाली. तरीसुद्धा शेकडा १७ शेतकरी व शेकडा २५ जमीन एवढीच या समित्यांत सामील झाली. परंतु शेतीची परिस्थिति सुधारली नाही. उत्पादन घटलें व पशुसंख्या वाढली नाही. तशांत १९५० सालीं दुष्काळ पडला. अमेरिकेंतून बरेंचसें धान्य आणावें लागलें. त्यानंतर हें आंदोलन थांबविण्यांत आलें व झालेल्या सहकारी शेतीच्या समित्यांना कार्यक्षम बनविण्याचें ठरलें. त्याकरिता सक्तीच्या धान्यवसूलींत कांही सवलती देण्यांत आल्या. समित्यांना सुद्धा आपला कारभार चालविण्याबाबत जास्त सवलती दिल्या गेल्या. प्रत्येक सभासदासाठी १ हेक्टर जमीन व्यक्तिगत शेतीकरिता ठेवण्यांत आली. परंतु परिस्थिति कांही सुधारली नाही. १९५२ सालीं असें दिसलें की या समित्यांपैकी ⅓ समित्या नुकसानींत होत्या, ⅓ जेमतेम चालल्या होत्या व बाकीच्या ⅓ मध्ये कांही फायदा होता. यानंतर आणखी कांही सुधारणा करण्यांत आल्या. पूर्वी प्रत्येक कोऑपरेटिव्हचें बजेट मध्यवर्ती सरकार मंजूर करीत असे. तिच्या नफानुकसानीची बरीच जबावदारी केंद्र-सरकारावर असे. ती काढून ती त्या समित्यांवर टाकण्यांत आली. परंतु एवढें करूनहि कांही विशेष फरक दिसून आला नाही. पुन्हा १९५२ सालीं अनावर्षण झालें. आणि समित्यांची परिस्थिति खराब व्हावयाला लागली. या वर्षाच्या शेवटीं ४६९७ समित्याच कशाबशा तग धरून होत्या.

शेवटी १९५३ च्या सुरवातीला एका नवीन कायद्यान्वये या समितियांच्या विसर्जनाला मंजुरी देण्यांत आली. फक्त सरकारी जमिनीवर झालेल्या समित्यांना सोडून, कोणत्याहि शेतकऱ्याला आपली जमीन समितींतून काढून घेण्याचा अधिकार मिळाला. अर्थात त्यांच्या जमिनीवर झालेल्या सुधारणांबाबत व समितीच्या कर्जाबाबत त्यांना कांही जबाबदारी उचलावी लागली. त्यानंतर अशा केवळ १२५८ समित्या राहिल्या. परंतु जनरल कोऑपरेटिव्हची संख्या १९५२ सालीं ६९७३ होती, ती १९५३ सालीं ७११४ वर गेली. अशा तऱ्हेने बरेच श्रीमंत शेतकरी निघाल्यानंतर राहिलेल्या समित्यांत सभासदांच्या मानाने जमीन फार कमी होती. ही भरपाई करण्याकरिता पूर्वीचें २५ हेक्टरांचें सीलिंग १० हेक्टरांवर आणण्यांत आलें. ही नवीन जमीन व्यक्तिशः न वांटतां जुन्या व नवीन सामुदायिक संस्थांनाच देण्यांत आली. या जमिनीची किंमत सरकारने, बाजारभावाप्रमाणे २० वर्षांनी फेडावयाच्या कर्जरोख्यांच्या रूपाने मालकांना चुकविली.

आम्ही गेलों त्या वेळेला युगोस्लावियामध्ये तीन तऱ्हेने सर्व शेतजमीन वांटली गेली होती.

१. **सरकारी फार्मस्**—यांला युगोस्लावियांत 'सोशल फार्मस्' म्हणतात. यांची व्यवस्था वर्कर्स सेल्फ गव्हर्नमेंटच्या तत्त्वावर चालते. म्हणजे काम करणारेच आपला चालकवर्ग निवडतात व जें उत्पादन येईल तें एका निश्चित तऱ्हेने वांटण्यांत येतें. याविषयी विस्ताराने पुढे लिहावयाचें आहे. येथे मुद्दा एवढाच लक्षांत घ्यावयाचा की तात्पुरती मजुरी सोडून दिली तर या सोशल फार्मवर काम करणाऱ्या लोकांचे पगार बांधलेले नसून त्यांचें वार्षिक उत्पन्न त्यांनी केलेल्या त्या वर्षाच्या उत्पादनावर अवलंबून असतें. हा नियम केवळ मजुराकरिता नसून चालकवर्गाकरिता सुद्धा आहे.

२. **पेझंट वर्किंग कोऑपरेटिव्हज**—या शेतकऱ्यांच्या सामुदायिक शेतीच्या समित्या आहेत. जी जमीन सरकारमार्फत मिळाली आहे (हिला सोशल लँड म्हणतात) व जी जमीन व्यक्तिगत मालकीची आहे, त्या दोहींची शेती एकत्र होते. फरक एवढाच की व्यक्तिगत जमिनीबाबत मालकाला कांही निश्चित रक्कम ठेका म्हणून मिळते. या समित्या आपले सर्व व्यवहार वर सांगितलेल्या सोशल सेल्फ गव्हर्नमेंटच्याच तत्त्वावर चालवितात. इथे नमूद करण्यासारखी एक विशेष गोष्ट म्हणजे, जे मजूर हंगामी असतात, त्यांना सुद्धा या समित्यांचे सभासद मानण्यांत येते. जनरल कोऑपरेटिव्हजच्या याहि समित्या सभासद असतात.

३. **व्यक्तिगत शेतकरी**—यांची संख्या अर्थातच सर्वांत जास्त आहे व यांच्या जवळ युगोस्लावियांतील शेतजमिनीपैकी सुमारे शेकडा ९० जमीन आहे. या व्यक्तिगत शेतकऱ्यांपैकी सुमारे शेकडा ७० शेतकरी जनरल कोऑपरेटिव्हजचे सभासद आहेत.

## जनरल कोऑपरेटिव्हजचें कार्य

वर आलेंच आहे की जनरल कोऑपरेटिव्हज या, आपल्याकडील सर्विस कोऑपरेटिव्ह किंवा मल्टीपर्पज (विविध उद्देशी) सहकारी संस्था या सारख्या आहेत. शेतकऱ्याला लागणाऱ्या सर्व गरजा ह्या पुरवितात. बीं, खतें, अवजारें, जनावरें, औषधें, कर्ज, इत्यादींची, तसेंच खरेदी-विक्रीची व्यवस्था व ह्याशिवाय ट्रॅक्टर्सची सुद्धा व्यवस्था या संस्था करतात. युगोस्लावियामध्ये कोणत्याहि शेतकऱ्याला नवीन ट्रॅक्टर घेतां येत नाही. पूर्वीचा जुना ट्रॅक्टर असेल तर तो ठेवतां येतो. जनरल कोऑपरेटिव्हज, सोशल फार्म्स व पेझंट वर्किंग कोऑपरेटिव्ह यांनाच ट्रॅक्टर्स ठेवतां येतात. व्यक्तिगत शेतकऱ्यांचें प्रस्थ वाढूं नये म्हणून हा नियम आहे. जनरल कोऑपरेटिव्हजच्या वर डिस्ट्रिक्ट् कोऑपरेटिव्ह असते. प्रत्येक लोकराज्याच्या केंद्रांत एक प्रमुख

कोऑपरेटिव्ह् संस्था असते. या सहकारी संघटनेच्या जोडीलाच बिझिनेस युनियन्स म्हणून कांही व्यापारी कामें करणाऱ्या संघटना आहेत. त्या विशेषकरून खरेदी-विक्री व कच्च्या मालाचा पक्का माल करणाऱ्या संस्था आहेत. दोन्ही संस्थांच्या शाखा जरी वेगवेगळ्या असल्या तरी लोकराज्याच्या स्तरावर त्यांच्यांत एकसूत्रता आणण्याची व्यवस्था केलेली असते.

जनरल कोऑपरेटिव्हजचें दुसरें वैशिष्टय म्हणजे तिचा प्रत्येक सभासदाशीं व्यक्तिगत संबंध असतो. व त्याला जी जी व जसजशी मदत हवी असेल त्याप्रमाणे त्याला ती ती मदत मिळते. साधारणपणे प्रत्येक तऱ्हेच्या मदतीकरिता, ठराविक पद्धतीप्रमाणे शेतकरी व कोऑपरेटिव्ह् यांच्यामध्ये एक करार होत असतो व त्याप्रमाणे परस्परांचे व्यवहार होतात. युगोस्लाविया जरी मार्क्सिस्ट देश असला तरी तेथे जमिनीची खरेदी व विक्री किंवा जमीन ठेक्यानें देणें या गोष्टी सर्रास चालतात. व या बाबतींत जनरल कोऑपरेटिव्हजला सरकारचे असे आदेश आहेत की, शेतकऱ्यापासून भाड्यानें, किंवा त्याची इच्छा असल्यास जमीन विकत घेऊन त्यावर जनरल कोऑपरेटिव्हजनी शेती करावी. या तऱ्हेनें कोऑपरेटिव्ह्च्या देखरेखीखाली असलेली जमीन वाढते. याशिवाय जनरल कोऑपरेटिव्हजमार्फत प्रसारित केल्या जाणाऱ्या नवीन सुधारणा अमलांत आणण्याकरिता शेतकऱ्याला हुरूप यावा म्हणून त्याला उत्पन्नाची किमान गॅरंटी देण्याची प्रथा आहे. म्हणजे एवढें उत्पन्न त्याला मिळायलाच पाहिजे. जें जास्त उत्पन्न होतें तें खर्च वजा जातां शेतकरी व कोऑपरेटिव्ह् यांच्यांत ⅔ ते ⅓ या प्रमाणांत वांटलें जातें. ही पद्धति युगोस्लावियांत फार लोकप्रिय झाली आहे व पुष्कळसे शेतकरी या पद्धतीचा फायदा घेऊन उत्पादन वाढवीत आहेत. आम्हांला असें सांगण्यांत आलें की सध्या युगोस्लावियाला जो दरवर्षी १,०००,००० टन गहू बाहेरून आणावा लागतो, त्याची जरूरी १९६०–६१ नंतर राहणार नाही. या जनरल कोऑपरेटिव्हजवर युगोस्लवियाचा आज जो एवढा विश्वास आहे व आम्हीं त्यांचें जे प्रत्यक्ष काम पाहिलें त्यावरून हा लक्ष्यांक ते गाठतील असा विश्वास वाटतो. याचें मुख्य कारण हें की, जसा आपल्याकडे जपानी भातशेतीमुळे हमखास पीक वाढल्याचा अनुभव आला तसा युगोस्लावियांत 'इटालियन गव्हा' च्या बाबत अनुभव आला आहे. इटालियन गव्हाची शेती व स्थानिक गव्हाची शेती यांत फारच मोठा फरक दिसून आला. ही एक यशाची गुरुकिल्लीच त्यांना सापडल्यासारखी झाली आहे. केवळ बीं बदलवूनच हा फरक होत नाही, तर त्याबरोबरच खताची सोय व शेतीमशागतीच्याहि बाबी महत्त्वाच्या आहेत. परंतु या सर्व बाबतींत जनरल कोऑपरेटिव्हजला एवढा विश्वास आहे की, त्या शेतकऱ्यांना त्यांच्या उत्पन्नाची किमान हमी देऊं शकतात. यामुळे एकदा एखाद्या शेतकऱ्याचा विश्वास बसला की मग तो इतर बाबींकडे सुद्धा

लक्ष देऊं लागतो. सुधारलेल्या जातींचीं जनावरें ठेवण्याबाबत हाच अनुभव आहे. इंग्लंडमधील डुकरांची जात युगोस्लावियांत आणून स्थानिक डुकरांची जात सुधारण्याचा प्रयत्न फारच सफल झाला आहे. त्याचप्रमाणे हॉलंडमधील गाईंची जात युगोस्लावियांत मोठ्या प्रमाणांत येत आहे. एका पेझंट वर्कर्स को-ऑपरेटिव्हमध्ये आम्ही गेलों असतां तिथला मॅनेजर हा ४०० गाईंची ऑर्डर देण्याकरिता हॉलंडला गेला होता असें कळलें. अशा शेतीसुधारणेच्या बऱ्याच गोष्टी आम्हांला दाखविण्यांत आल्या. त्यावरून या सहकारी आंदोलनाचा युगोस्लाविया मोठ्या प्रमाणांत फायदा उचलेल असें दिसतें. आपल्याकडे कापसांच्या नव्या जाती-विषयी असेंच नाही का होत ? तसेंच सर्व शेतमालासंबंधी म्हणजे, गायी, डुकरें, फळें, गहू, टोमॅटो इत्यादीबाबत आज युगोस्लावियांत होत आहे असें म्हटल्यास हरकत नाही.

यामुळे येथील शेतकरी दिवसेंदिवस जनरल कोऑपरेटिव्हजचा सभासद होऊन आपला धंदा करील हें स्पष्ट दिसतें. या समित्या कशा चालविल्या जातात हें समजून घेण्यासारखें आहे व थोडा विस्तार झाला तरी त्याची पर्वा न करतां हा महत्त्वाचा भाग मुद्दामच येथे देत आहे. साधारणपणे जनरल कोऑपरेटिव्हजमध्ये (१) काम करणाऱ्यांचा व (२) सभासदांचा असे दोन वर्ग असतात. पहिल्या-सदरांत या समित्यांचा नोकरवर्ग, ट्रॅक्टर-ड्रायव्हर्स, दुकानांत काम करणारे, शेतीचा सल्ला देणारे, गुरांबाबत मार्गदर्शन करणारे इत्यादि येतात. दुसऱ्या वर्गांत शेती करणारे सभासद व जे या सर्व बाबींपासून फायदा घेतात असे लोक येतात. ही समिति सोशल सेल्फ गव्हर्नमेंटच्या तत्त्वावरच चालते. म्हणजे हे दोन्ही वर्ग मिळून समितीचा कारभार चालवितात. फरक इतकाच की, दुसऱ्या वर्गाला म्हणजे सभासदांना शेअरस् घ्यावे लागतात पण शेअरवर कसल्याहि तऱ्हेचा डिव्हिडंड नसतो. समितीकडून ज्या सवलती मिळतात तोच शेअर घेण्याचा मूळ उद्देश. तुम्हीं शेअर घेतला नाही व सभासद झालां नाहीत तर तुम्हाला या सवलती उशीरा मिळतील व जास्त किंमत द्यावी लागेल. किंवा सवलती सभासदांनाच पुरेशा नसल्या तर त्या मिळतहि नाहीत. याशिवाय सभासदांना समितीचें धोरण ठरवितां येते. पण समितीच्या नफ्यावर सभासदांचा कांहीहि हक्क नसतो. याचें मुख्य कारण असें सांगण्यांत आलें की, या समित्यांना सरकार इतकें कर्ज देतें व अन्य तऱ्हेने मदत करतें की, त्या खरोखरच समाजाच्याच आहेत, पण स्थानिक शेतकऱ्यांना त्या चालविण्याकरिता समाज देत आहे असें वाटतें. हीच दृष्टि इतर उद्योगाबाबतसुद्धा आहे. याविषयी पुढे उल्लेख येईल. पण आश्चर्याची गोष्ट ही की, या नफ्यावर पहिल्या वर्गाच्या सभासदांचा कांही हक्क असतो. कारण त्यांना जें कांही वर्षाकाठीं मिळावयाचें, त्याचा सीधा संबंध वर्षाच्या शेवटी समितीने किती नफा मिळविला यावर असतो. त्यामुळे समितीच्या प्रत्येक

कर्मचाऱ्याला आपलें काम चोख व चांगल्या तऱ्हेने बजावण्यास हुरूप असतोच. वाईट झालें तर सर्वांनाच कमी मिळेल. याशिवाय प्रत्येक विभागाचे असे अलग अलग हिशेब असल्यामुळे ही जबाबदारी फार दूरवर नेतां येते. ज्या विभागांत नुकसान आलें तिथल्या कर्मचाऱ्यांना कमी नफा मिळेल. परंतु नफ्याचा हिस्सा कर्मचाऱ्यांनी किती घ्यावा व समितीच्या भांडवलांत किती घातला जावा हें ठरविण्यांत दोन्ही तऱ्हेचे सभासद भाग घेतात. अर्थातच शेतकरी-सभासद किती तरी जास्त असतात. हिस्सा कमी दिला तर नोकरवर्ग नाराज, जास्त दिला तर समितीची प्रगति व्हावी तशी लौकर व्हावयाची नाही, या दोन्ही अडचणींतून सुवर्णमध्य चांगल्या प्रकारें गाठतां येतो.

पेझंट्स वर्कर्स कोऑपरेटिव्हज किंवा सोशल फार्म्स सुद्धा असेच चालतात. फरक इतकाच की, त्यांत असे दोन वर्ग नसतात. सर्वच सभासद एका श्रेणीचे. एक सामुदायिक धंदा या नात्याने ह्या संस्था चालतात व इतर सामुदायिक धंद्यांना (यांना युगोस्लावियामध्ये एंटरप्रायजेस म्हणतात) जे नियम व जे कायदे लागूं आहेत ते सर्व यांना लागूं पडतात. फरक इतकाच की, शेतीचें उत्पन्न वाढविण्याकरिता असल्या धंद्यावर सरकारी कर म्हणून जी आमदनी होते, ती थोडा अपवाद सोडून, सरकार पुन्हा या संस्थांना परत करते. पण ती या अटीवर की, ही देणगी त्यांच्या पुंजींत सामील करून त्यांतून शेती सुधारण्याचीं अवजारें किंवा तत्सम अन्य खर्च होईल, सभासदांची वार्षिक आमदनी वाढविण्यांत ती खर्च होणार नाही.

आम्हाला माहिती देतांना असें सांगण्यांत आलें की, शेती करणाऱ्या या तिन्ही मंडळींत उत्पादनाचें प्रमाण सर्वांत जास्त सोशल फार्म्स, त्यानंतर पेझंट वर्कर्स कोऑपरेटिव्हज, त्यानंतर व्यक्तिगत शेतकरी ज्याने सहकारी समितीशीं करार करून काम केलें व शेवटी स्वतः काम करणारा व्यक्तिगत शेतकरी ह्याचें असतें. एका सोसायटीमध्ये '५७ व '५८ या सालांकरिता गव्हाच्या उत्पादनाचे आंकडे खालीलप्रमाणे देण्यांत आले.

| | सोशल फार्म्स | पेझंट वर्कर्स कोऑपरेटिव्हज | व्यक्तिगत |
|---|---|---|---|
| ५७ | २३.५ | २२.६ | १८.१ |
| ५८ | २३.८ | २२.२ | १२.६ |

(आकडे दर हेक्टरीं व क्विंटाल्समध्यें आहेत. '५८ हें वर्ष '५७ पेक्षा वाईट होतें. क्विंटाल = १०० किलोग्रॅम = १०० शेरांहून थोडें जास्त.)

आणखी एका ठिकाणीं हे आकडे खालील प्रमाणे देण्यांत आले—

| | व्यक्तिगत | समितींत पण व्यक्तिगत '५७ | सोशल फार्म | व्यक्तिगत | समितींत पण व्यक्तिगत '५८ | सोशल फार्म |
|---|---|---|---|---|---|---|
| गहू | १४७० | २००० | २३७० | ११४० | २१३० | २४३० |
| मका | २००० | ३७०० | ३९०० | १४८० | ३८७० | ४२०० |

( आंकडे किलोग्राम्समध्ये. ५८ हे वर्ष ५७ पेक्षा वाईट होतें. एक किलोग्रॅम = जवळ जवळ १ शेर.)

ही एकाच ठिकाणची माहिती आहे असें नसून सबंध युगोस्लावियाचा हा अनुभव आहे असें सांगण्यांत आलें. आणि हें कांही धान्याच्या बाबत अशक्य वाटत नाही. कारण धान्याची शेती मोठ्याच प्रमाणांत किफायतशीर होऊं शकते हा इतर देशाचा सुद्धा अनुभव आहे. याशिवाय ही माहिती अन्य तऱ्हेने तपासून घेण्याचा आम्हीं प्रयत्न केला. श्री. समरपाल सिंग या नांवाचे भारतीय विद्यार्थी युगोस्लावियांत केवळ सहकारी आंदोलनाचा अभ्यास करण्याकरिता १/१॥ वर्षाची शिष्यवृत्ति घेऊन आले होते. त्यांची भेट घेऊन व त्यांच्या थिसीसवरून सुद्धा ही माहिती आम्हीं पडताळून पाहिली. पण मग असें असून या पेझंट वर्कर्स समित्या वाढल्या कां नाहीत? या प्रश्नाला युगोस्लावियांत योग्य उत्तर मिळालें नाही. त्यांच्या बाबतचा शेतकऱ्यांचा जुना अनुभवच याला कदाचित कारणीभूत असूं शकेल. पण युगोस्लावियाच्या सरकारला मात्र असें हमखास वाटतें की, या जनरल को-ऑपरेटिव्हजच्याच मार्फत आपल्या देशांत शेवटी सामुदायिक शेती येईल. सामुदायिक शेतीची त्यांनी आशा बिलकूल सोडली नाही. ती तर मुळीं मार्क्सिझमचें एक ब्रीद आहे. याबाबत त्यांची कल्पना अशी आहे की, हळूहळू जनरल को-ऑपरेटिव्हजवर शेतकरी सर्व बाबींकरिता इतका अवलंबून राहील की, त्याला त्यांच्या मदतीशिवाय शेती करतांच येणार नाही व त्या परिस्थितींत त्याला जमिनीच्या मालकीविषयीची किंवा आपलेपणाची भावना फार कमी राहील. त्या परिस्थितींत उत्पादन जमिनीच्या प्रतीवर एवढें अवलंबून न राहतां, शेतीच्या साधनांवर अवलंबून राहील व मग सामुदायिक शेतीकडे तो स्वेच्छेने व ओघानेच जाईल. आज मात्र जनरल कोऑपरेटिव्हजमध्ये कराराच्या स्वरूपांत शेतकरी जितका जास्त येईल तितका यावा ही सरकारची दृष्टि आहे. त्याकरिता मार्क्सिस्ट तत्त्वज्ञान बाजूला सारून सुद्धा या समित्यांना शेतकऱ्याच्या जमीनी ठेक्याने करा असा सल्ला देण्यांत आला आहे. साधारण शेतकरी मात्र हिस्सेदारीने हे करार करतो. आज मितीला जवळ जवळ

२० लक्ष हेक्टर जमीन अशा करारांत आली आहे. या समित्यांजवळ एकूण २०,००० ट्रॅक्टर्स आहेत व २०,००० वर टर्बाईन्स आहेत. युगोस्लावियांत एकंदर ७५ लक्ष हेक्टर जमीन आहे. यावरून तेथील प्रगतीची कल्पना येईल.

युगोस्लावियांत शेतकऱ्यांचें जीवन कसें आहे ? अजूनहि जवळ जवळ शेकडा ६० लोक शेतीवर आहेत. म्हणजे शेतकरीवर्ग बहुसंख्य आहे. उत्तरेंत हें प्रमाण केवळ ४०% आहे तर दक्षिणेंत ७०%च्या वर आहे. एवढ्या मोठ्या संख्येंत असणाऱ्या वर्गाची राहणी कशी आहे ह्या प्रश्नाचें एक निश्चित उत्तर देणें म्हणजे, चांगली आहे किंवा वाईट आहे हें सांगणें शक्य नाही. कारण जरी सीलिंग १० हेक्टराचें लादण्यांत आलें तरी किती तरी शेतकऱ्यांच्या जवळ ५ हेक्टरांहून कमी जमीन असणार. आणि जमिनीच्या प्रमाणांवर शेतकऱ्यांची आर्थिक स्थिति अवलंबून असणार. ठिकठिकाणीं शेतकऱ्यांच्या घरीं जाऊन त्यांची आर्थिक स्थिति पाहण्याचा आम्हीं प्रयत्न केला. उत्तरेकडे गरीबी कमी व दक्षिणेकडे जास्त असें भौगोलिक प्रमाण आहे दक्षिणेंत विशेषत: मॅसिडोनियामध्ये, शेतकऱ्यांचीं घरें अगदी हिंदुस्थानांतील शेतकऱ्यांच्या घरासारखीं दिसलीं. पण एकंदर तुलनात्मक दृष्टीने तेथील शेतकरी इतर यूरोपियन शेतकऱ्यांपेक्षा विशेषत: पश्चिम यूरोपियन शेतकऱ्यांपेक्षा गरीब असला तरी आपल्याकडील शेतकऱ्यांपेक्षा पुष्कळ बरा आहे. कोणताहि शेतकरी आता मका खात नाही. दुसऱ्या लढाईपूर्वी पुष्कळ गरीब शेतकऱ्यांचें मका हेंच खाण्याचें धान्य होतें. आता मका गुरांकरिता वापरला जातो. या एकाच बाबीवरून परिस्थितीची व सुधारणेची कांहीशी कल्पना येईल. पुष्कळ शेतकऱ्यांच्या घरांत रेडियो, स्वयंपाक-घरांत गॅसची चूल इत्यादि सोयी आम्हाला आढळल्या. शेतकरी सुखांत किंवा चैनींत नसला तरी अडचणींत दिसला नाही. घरांतील मनुष्य बाहेर कांही कमावून शेतींत भर घालत असल्यामुळे पुष्कळ ठिकाणीं शेती स्त्रियाच बघतात. शेती बैलांनी व घोड्यांनी करण्याची पद्धति आहे. घोड्याने काम लवकर होतें, पण बैल जास्त ओढूं शकतो असा समज आहे. शेतकरी इथून तिथून सारखाच, दैववादी व आहे त्या परिस्थितींत सुख मानणारा दिसला. यापूर्वी मात्र त्याला युगोस्लावियांत बराच त्रास भोगावा लागत असला पाहिजे. सामूहीकरण त्याच्या इच्छेविरुद्ध होतेंच. याशिवाय मध्यंतरीच्या काळांत धान्यवसूलीची सक्ति त्याला भोगावी लागली. ही वसूली पिकावर होत असे. व पीक किती झालें हें ठरविणारे स्थानिक अधिकारी त्यांचा शेतकऱ्यांवरच काहीसा कटाक्ष असणार. त्यांतल्या त्यांत सहकारी समितींतल्या सभासदांवर कमी असणार. पण तो बाहेर असला तर त्याचें पीक जास्त लागण्याचा संभव व मग त्या प्रमाणात सक्तीची वसूली जास्त. या सर्व बाबीमुळ ४८ ते ५३ या काळांत शेतकरीवर्ग त्रासून गेला होता. त्यांतून तो हळूहळू निघत आहे व आता त्याची परिस्थिति सुधरूं लागली आहे. तशांतच शेतमालाच्या

किमतीबावत युगोस्लाव सरकारचें जें धोरण आहे तें आता कुठे सुरूं झालें आहे. यापूर्वी किमती फारच कमी होत्या. त्यामुळे शेतकऱ्यांच्या आमदनीवर त्यांचा अनिष्ट परिणाम झाला. देशाच्या औद्योगीकरणाला त्यामुळे कांही मदत झाली असेल. पण ती एवढ्या मोठ्या शेतकरीवर्गाच्या आपत्तींतूनच झाली. आणि जणू, या सर्व बाबीवर कहरच म्हणून की काय, सुरवातीला सरकारचें लक्ष शेतीपेक्षा उद्योगावरच जास्त होतें. त्यामुळे शेती सुधारण्याच्या कामाला पाहिजे तेवढा भरपूर पैसा मिळत नव्हता. ५३ सालापासूनच खरोखर सरकारचें लक्ष शेतीकडे गेलें. त्या वर्षीं एक शेतीसुधारणेचा दहा वर्षांचा कार्यक्रम आखण्यात आला आणि आगामी दहा वर्षांत ६४० बिलियन म्हणजे ६४००० कोटी दिनार (८०० दिनार १३ रु. १० आणे) शेतीवर खर्च करण्याचा सरकारचा निर्णय झाला. तुलना करितांना हें दाखवायला पाहिजे की, ४८ ते ५३ या सहा वर्षांत उद्योगांवर ११६ बिलियन खर्च करण्यांत आले होते. १९५६ सालच्या युगोस्लावियाच्या योजनेमध्ये उद्योगावर शेकडा १७ खर्च कमी करून शेतीवरील खर्चांत ५५ सालापेक्षा शेकडा १९ नी वाढ करण्यांत आली. शेतीवरील इन्व्हेस्टमेंटचें प्रमाण कसें वाढत गेलें हें खालील आकड्यावरून ध्यानांत येईल.

| वर्ष | एकूण इनव्हेस्टमेन्ट | शेतीवर | प्रमाण |
|---|---|---|---|
| १९४७ | २०२ बिलियन | ९.५ | ४.२ |
| १९४९ | ३२१ बिलियन | ३३ | १० |
| १९५७ | ३३४ बिलियन | ४७ | १५ |

सध्या हें प्रमाण शेकडा १५ आहे. त्याच प्रमाणांत हळूहळू शेतमालाच्या किमती पण वाढावयाला लागल्या. आजहि इतर औद्योगिक मालांच्या किमतीच्या मानाने व यूरोपांतील इतर देशांच्या मानाने त्या कमीच आहेत. याचा अर्थ असा की, औद्योगीकरणाचा बराचसा भार शेतकऱ्यावर पडला.

प्रत्येक गावांत कांही शेतकरी अत्यंत गरीब आहेत. त्यांच्याजवळ जमीन फारच कमी आहे. त्यांना इतर उद्योग करतां येत नाहीत. त्यांच्याबद्दल सांगण्यांत आलें की,ते नीट जगूंहि शकत नाहीत व मरूंहि शकत नाहीत. त्यांच्याकरिता सहकारी शेतींत प्रवेश हा एकमेव उपाय आहे पण आज तसें होत नाही. ५ हेक्टरांच्यावर ज्यांच्याजवळ जमीन आहे किंवा जे हॉप्स, द्राक्षें इत्यादि व्यापारी पिकें काढतात त्यांची स्थिति बरी आहे. सर्वसाधारणपणे असें म्हणतां येईल की, शहरांतील मजुरांशीं तुलना करतांना ५ हेक्टरचा शेतकरी त्याच्या बरोबरीला येईल, वरचा चांगला राहील व खालचा गरीब राहील.

पण या मार्क्सवादी देशांत स्वतःच्या शेतावर राबणाऱ्या शेतकऱ्यावर सुद्धा बरेच निर्बंध आहेत. तसें पाहिल्यास स्वतःच्या शेतावर राबणारा शेतकरी कुणाचेंहि शोषण करीत नाही. परंतु तो पेझंट वर्कर्स कोऑपरेटिव्हमध्ये नाही व उत्पादनांच्या साधनांचा मालक आहे एवढ्याच कारणास्तव त्याला सोशल इन्शुअरन्सचे फायदे मिळत नाहीत. युगोस्लावियांत असा नियम आहे की प्रत्येक वेतनभोगी (यांत मजूर व सर्व तऱ्हेचे नोकर आले) मनुष्याला (मुलांच्या तरतुदी-करिता) दर मुलामागे महिन्याला ३००० दिनार मिळतात. हा आकडा जसजशी मुलांची संख्या वाढेल तसतसा थोडा कमी होतो. शेतावर काम करणाऱ्या शेतकऱ्याला हा नियम लागू नाही. त्याला त्या सवलती मिळत नाहीत. पेझंट वर्कर्स को-ऑपरेटिव्हजच्या सभासदांना या सवलती मिळतात, जर आपल्या शेतीच्या मालकी-चा ते कांही खंड घेत नसतील. अर्थात त्यांनी सोशल इंशुरन्समध्ये भागी-दार होऊन त्याची भरणी (काँट्रिब्यूशन) भरली पाहिजे. पण व्यक्तिगत शेतकऱ्याला, तो जनरल कोऑपरेटिव्हचा सभासद असला तरी हा अधिकार नाही. हेल्थ इंशुरन्सच्या बाबत जे शेतकरी जनरल कोऑपरेटिव्हजचे सभासद आहेत त्यांच्या करिता कायद्यांत कांही सूट मिळणार आहे असें आम्हास सांगण्यांत आलें. कांही विशिष्ट संसर्गजन्य रोगांकरिता आज अशी सवलत आहे. व्यक्तिगत शेतकरी जर जनरल कोऑपरेटिव्हजचा सभासद नसेल तर त्याला 'कौंसिल ऑफ प्रोड्युसर्स' या मतदार संघाकरिता मत देतां येणार नाही. व्यक्तिगत शेतकऱ्याला, पेझंट वर्कर्स कोऑपरेटिव्हमध्ये सामील असलेल्या शेतकऱ्यांपेक्षा सरकारला काहीं टॅक्स जास्ता द्यावा लागतो.

शेतकऱ्याला आपला माल खुल्या बाजारांत विकतां येतो. शहरांत मोठ्या गावांत ठिकठिकाणीं बाजार भरतात. त्यांत भोवतालचे लोक आपला माल विक्रीला आणतात. हा बाजार बहुतेक भाजीपाला, फळें, दुधाचे पदार्थ, अंडीं यांचा असतो. इतर माल सहकारी समित्यांमार्फत विकण्यांत येतो. त्यांची कायदेशीर मॉनोपली नसली तरी प्रत्यक्षांत तशीच आहे. काही मालांचे भाव, विशेषतः गव्हाचे भाव सरकारकडून बांधलेले असतात, त्यांची खरेदीविक्री त्या बांधलेल्या भावांत होते. इतर माल बाजारभावाप्रमाणे विकला जातो.

पूर्वी शेतीसंबंधीचे सर्व निर्णय संघराज्यांत ॲग्रिकल्चरल मिनिस्ट्रीमार्फत घेतले जात असत. १९५४ सालीं यांत बदल झाला. त्यावर्षी 'युनियन ऑफ चेंबर्स ऑफ ॲग्रिकल्चर अँड फोरेस्ट्री', या नांवाची शेतकऱ्यांचे प्रश्न सोडविण्याकरिता एक संघटना तयार करण्यांत आली. हिची शाखा लोकसरकारांतहि असते. या

चेंबरकडे ॲग्रिकल्चरल मिनिस्ट्रीचे बरेचसे विभाग सोपविण्यांत आले. चेंबरच्या सल्ल्याने जे निर्णय घेण्यांत येतील ते कार्यान्वित करणें येवढेंच ॲग्रिकल्चरल मिनिस्ट्रीचें काम राहिलें. 'सेंट्रल कोऑपरेटिव्ह फेडरेशन ऑफ युगोस्लाविया' ही सर्व सहकारी समित्यांचें प्रतिनिधित्व करते. तीसुद्धा या चेंबरची सभासद आहे. याशिवाय शेती-तज्ञ, अर्थ-तज्ञ, व्यापारी संस्था यांचेहि प्रतिनिधि या चेंबरवर असतात. केवळ लोकांनी निवडून दिलेल्या प्रतिनिधींच्या मतावर राज्यकारभार न चालवितां संबंधित जाणत्या लोकांची संघटना तयार करवून, त्या संघटनांच्या विचारानुसार राज्य-कारभार चालविण्याची जी युगोस्लावियांत पद्धति आहे ती अनुसार या चेंबरची उभारणी केली गेली आहे.

★ ★ ★

# कारखाने, उद्योग व इतर सामूहिक संस्थांची व्यवस्था : ५

युगोस्लावियामध्ये 'सोशल डेमॉक्रसी' (सामाजिक लोकशाही) हा शब्द-प्रयोग नेहमी वापरण्यांत येतो. राजकीय व आर्थिक लोकशाही मिळून सामाजिक लोकशाही होते. राजकीय लोकशाहीबाबत पुढे विचार करूं. सध्या आर्थिक लोकशाहीचा विचार प्रस्तुत आहे. आर्थिक लोकशाही म्हणजे कोणतीहि अर्थव्यवस्था, तींत काम करीत असलेल्या लोकांच्या इच्छेप्रमाणे चालविणें. प्रत्येक व्यक्तीला आपल्या श्रमाचा पूर्ण मोबदला मिळावा ही स्वाभाविक इच्छा असते व ती इच्छा पूर्ण झाल्या-मुळेच त्या व्यक्तीचा आर्थिक, सामाजिक व सांस्कृतिक विकास होऊं शकतो. परंतु व्यक्ति ही समाजाचें एक अंग आहे. तिचा विकास समाजाच्या आर्थिक, सामाजिक व सांस्कृतिक विकासावर अवलंबून आहे. म्हणून तिला समाजाच्या विकासाकरिता मदत करायला पाहिजे व आपल्या उत्पन्नाचा कांही हिस्सा समजाला द्यायला पाहिजे.

जी गोष्ट व्यक्तीची तीच समुदायाची. समाजाचा समुदायावर जो हक्क आहे तो कायम ठेवून कोणत्याहि अर्थ-उत्पादनांत लागलेल्या समुदायाला त्या अर्थव्यवस्थेबाबत निर्णय घेण्याचा अधिकार असला पाहिजे. या निर्णयांत समाजाचे प्रतिनिधि म्हणून समाजाचा शेवटचा घटक 'कॉम्यून' याचा संबंध येतो. याशिवाय नियोजित अर्थव्यवस्थेंत केंद्रीय नियोजनालाच जर सर्वस्वी प्राधान्य देण्यांत आलें तर अर्थव्यवस्थेच्या प्रत्येक लहान मोठ्या घटकाचें नियोजन करण्याची जबाबदारी केंद्रीय नियोजनावर येऊन पडते. व तसें झाल्यावर स्थानिक अभिक्रम त्याच प्रमाणांत कमी होतो. एवढेंच नव्हे तर केंद्रीय नियोजनाला प्राधान्य दिल्यास नोकरशाही बळावते. तिचें समाजांतील प्रस्थ अतोनात वाढतें व त्याच प्रमाणांत त्यामुळे सोशल डेमॉक्रसी कमी होते..

यावरून हें स्पष्ट होईल की, जे प्रत्यक्ष काम करतात त्यांच्यावरच संबंधित उद्योगाची व्यवस्था सोपविण्यांत कितीतरी फायदे असतात. एकतर त्यांची जबाबदारी वाढते व त्यामुळे त्या उद्योगांत त्यांचें जास्त लक्ष लागतें. व्यवस्था त्यांच्या हातांत नसली व त्यांनी तयार केलेला माल खपविण्याची जबाबदारी दुसऱ्यावर असली, तर स्वाभाविकपणेच त्या मालाच्या गुणदोषांबद्दल व त्याच्या किमतीबद्दल जास्त

जबाबदारी त्यांना वाटणार नाही. पण ही जबाबदारी जर त्यांच्यावर टाकण्यांत आली तर तो माल चांगल्या तऱ्हेने खपला जावा, त्याची किंमत माफक असावी ही खबरदारी घेण्याकडे त्यांची प्रवृत्ति राहील. त्याचबरोबर कांही अटीवर त्या उद्योगांत जें कांही नफानुकसान होईल त्याची सर्व जबाबदारी जर त्या काम करणाऱ्यावर राहील तर जास्तींत जास्त मेहनत करून आपली आमदनी वाढवावी ही सुद्धा जबाबदारी त्यांना वाटेल. तो सर्व कारखाना आपलाच आहे असें त्यांना वाटेल. आपण कुणाचे नोकर आहोंत व आपला संबंध पगाराशीं आहे ही भावना न राहतां, ज्या प्रमाणांत आपण उत्पादन करूं त्या प्रमाणांत आपलें उत्पन्न वाढेल ही भावना राहील. अशा विकेंद्रित अर्थ-व्यवस्थेचा पहिला फायदा हा दिसतो की, मालाची प्रत (क्वालिटी) वाढून श्रमिकांना जास्त काम करण्याकरिता पूर्ण उत्साह व अवकाश मिळेल.

दुसरा फायदा असा की, अशा व्यवस्थेंत नोकरशाहीचें प्रस्थ कमींत कमी राहील. उद्योगाच्या अन्तर्गत व्यवस्थेंत तर नोकरशाहीचा प्रश्नच उद्‌भवत नाही. देशाच्या अर्थव्यवस्थेच्या मूलभूत सिद्धांतांचें पालन जोपर्यंत हा उद्योग करीत राहील तोपर्यंत कोणत्याहि नोकरशाहीचा हस्तक्षेप त्यांच्या कामांत होण्याची कसलीहि जरूरी नाही. एरवी उद्योगावर देखरेख करणाऱ्या केंद्रीय नियोजनाच्या प्रतिनिधींची जरूरी राहील. आणि ही नवीन पद्धति सुरूं होईपर्यंत अशा तऱ्हेचे प्रतिनिधि युगोस्लावियांत राहतच असत. म्हणजे या पद्धतींत शासनव्यवस्थेचेहि सुकणें ( विदरिंग ) जास्त सुलभ आहे.

अशा पद्धतींत खरी अडचण असते ती ही की या विकेंद्रीकरणानंतर उद्योगांत काम करणारा समुदाय आपली सामाजिक जबाबदारी योग्य तऱ्हेनें कशी पार पाडील ? आपल्या अधिकारांत उद्योगाचा सर्वच नफा जर त्यांनी उचलला तर त्यासाठी प्रतिबंध कोणता ? ही परिस्थिति निर्माण होऊं नये म्हणून युगोस्लावियांत दोन उपाययोजना केल्या आहेत. एक तर या बाबतींत 'लॉ ऑन दि मॅनेजमेंट ऑफ एंटरप्रायजेस १९५०' या नांवाचा, सर्व संघराज्याकरिता एक कायदा करून, प्रत्येक उद्योगाने आपली व्यवस्था कशी करावी याबाबत सर्वांना लागूं होणारे कांही नियम घालून देण्यांत आले आहेत. प्रत्येक उद्योगाला या कायद्याच्या कक्षेंतच आपले निर्णय घ्यावे लागतात. दुसरें, प्रत्येक उद्योगाबाबत, तो लहान असल्यास स्थानिक कॉम्यूनला, त्याहून मोठा असल्यास लोकराज्याला व कांही केंद्रित उद्योगांकरिता संघराज्याला कांही अधिकार याच कायद्यान्वये देण्यांत आले आहेत. आर्थिक दृष्टचा उद्योगाची जबाबदारी जशी त्या उद्योगांत गुंतलेल्या लोकांवर आहे तशी सामाजिक दृष्टचा तो उद्योग आपली जबाबदारी योग्य तऱ्हेने पार पाडतो किंवा नाही हें पाहण्याची जबाबदारी, त्या उद्योगाच्या महत्त्वाप्रमाणे कॉम्यूनवर, लोकराज्यावर किंवा

संघराज्यावर आहे. याशिवाय देशांत सुसूत्रता आणण्याची जबाबदारी कांही संस्थावर आहे. उदाहरणार्थ, राजकीय बाबतींत सोशालिस्ट अलायन्स ऑफ दी पीपल ऑफ युगोस्लाविया, मजूरवर्गाच्या बाबतींत ट्रेड युनियन कॉंग्रेस, उद्योगाच्या बाबतींत उद्योगाची संघटना. या सर्वांच्या प्रतिनिधींना उद्योग-व्यवस्थेंत भाग घेतां येतो व त्यांच्यावर असलेल्या जबाबदारीला अनुसरून त्या उद्योगाचें धोरण अमलांत येत आहे किंवा नाही हें बघतां येतें.

१९४५ व १९४६सालीं झालेल्या राष्ट्रियीकरणांचा उल्लेख पूर्वीच आलेला आहे. १९४८ मध्ये आणखी एक राष्ट्रियीकरणाचा कायदा होऊन राहिलेले उद्योग सुद्धा सरकारने आपल्या ताब्यांत घेतले. सुरवातीला या सर्व उद्योगांची देखरेख मिनिस्ट्रीज व डायरेक्टरेट्स्च्या मार्फत बेलग्रेडच्या संघराज्याकडे होती. या वेळीं कितीतरी मिनिस्ट्रीज व डायरेक्टरेट्स्चीं ऑफिसें बेलग्रेडला होतीं. प्रत्येक उद्योगाचा हिशेब अलग असे. परंतु राज्याच्या आर्थिक योजनेनुसार ज्या मर्यादा ठरविल्या गेल्या होत्या त्याप्रमाणे प्रत्येक उद्योग चालत असे. उत्पादनाची मर्यादा, त्याची प्रत, कामगारांची संख्या, मजूरी, किमती, विक्रीचे दर, पुंजीची लागत, इत्यादि सर्व बाबी बेलग्रेडवरून ठरून येत असत. आणि स्थानिक उद्योगांना त्यांची केवळ अंमलबजावणी करावी लागे. प्रत्येक उद्योगाचें नफानुकसान संघराज्याच्या बजेटमध्ये दाखविण्यांत येत असे. प्रत्येक उद्योगावर एक डायरेक्टर नेमला जात असे. तो सरकारला जबाबदार असे व त्याच्या नेतृत्वाखाली सर्व उद्योग चालत असत. नव्या राज्याचा जम बसेपर्यंत अशाहि व्यवस्थेचे कांही फायदे असतात. सर्व आर्थिक क्षेत्र ताब्यांत असल्यामुळे अत्यंत महत्त्वाच्या आर्थिक बाबींकडे अनिर्वेध लक्ष पुरवितां येतें, आणि भावी विकासाचा पाया घालतां येतो. परंतु नेहमीच्या विकासाच्या भरधाव कामाला ही पद्धति अपुरी पडते असें निदर्शनास आलें. वर दाखविलेले दोष तिच्यांत शिरावयास लागले. व त्यामुळे या नवीन पद्धतीचा अवलंब करणें भाग पडलें.

या नवीन पद्धतीची मूळ कल्पना ही आहे की 'आर्थिक संस्था' (एकॉनमिक एंटरप्रायजेस) ह्या समाजाच्या मालकीच्या आहेत व त्यांची व्यवस्था समाजातर्फे त्यांत काम करणाऱ्या कामगारांकडे दिलेली आहे. काम करणाऱ्या सर्व कामगारांना "वर्किंग कलेक्टिव्ह' हें संबोधन आहे. देखरेखीची जबाबदारी पार पाडण्याकरिता ही वर्किंग कलेक्टिव्ह खाली दर्शविलेल्या तीन संस्था अस्तित्वांत आणते. (१) वर्कर्स कौंसिल, (२) मॅनेजिंग बोर्ड, (३) डायरेक्टर. ज्या एंटरप्राइजमध्ये तीस किंवा त्यापेक्षा कमी लोक आहेत त्यामध्ये वर्किंग कलेक्टिव्हच वर्किंग कौंसिल बनते व ६ किंवा ह्यापेक्षा कमी लोक असल्यास मॅनेजिंग बोर्डाचें कामसुद्धा तीच करते. जसें वर्किंग कलेक्टिव्ह वर्कर्स कौंसिल निर्माण करूं शकते तसेंच तिला किंवा

तिच्यापैकी कांही सभासदांना परत बोलवण्याचा अधिकार तिला आहे. मॅनेजिंग बोर्ड हें वर्कर्स कौंसिलला जबाबदार असल्यामुळे वर्किंग कलेक्टिव्हचा पूर्ण अधिकार मॅनेजिंग बोर्डावरसुद्धा चालतो. वर्कर्स कौंसिलला (हा अधिकार कलेक्टिव्हला नाही) डायरेक्टराच्या नियुक्तीचे व बरखास्तीचे कांही अधिकार आहेत. डायरेक्टराची नेमणुक संबंधित कॉम्यूनची पीपल्स कमिटी करते. त्याकरिता एक खास कमिशन कायम करण्यात येतें, ज्यांत अर्धे लोक वर्कर्स कौंसिलचे असतात आणि अर्धे पीपल्स कमिटीचे असतात. हें कमिशन उघडपणे जाहिरात देऊन डायरेक्टरच्या जागेकरिता दरखास्ती मागविते आणि सर्वांत योग्य जो दिसेल त्याची शिफारस करते. ही शिफारस जर पीपल्स कमिटीला संमत नसली तर जिल्ह्याची (कॉम्यूनच्या वरची) पीपल्स कमिटी एक नवें कमिशन नेमते व तिच्या शिफारशीनुसार नेमणुक होते. डायरेक्टरला काढावयाचें असल्यास वर्कर्स कौंसिल तसा ठराव करून पीपल्स कमिटीकडे पाठविते व ती शेवटचा निर्णय घेते.

प्रत्येक एंटरप्राइजची व्यवस्था पाहण्याचा सर्वश्रेष्ठ अधिकार जरी वर्कर्स कौंसिलला असला तरी संपूर्ण कलेक्टिव्हला कांही अधिकार आहेत. जसें, राजकीय क्षेत्रांत व्होटर्स मीटिंग्ज मार्फत लोकमत अजमावण्याचा प्रयत्न होतो. त्याचप्रमाणे कलेक्टिव्हचें मत ('मीटिंग्ज ऑफ वर्कर्स') कामगाराच्या सभांमार्फत अजमाविलें जातें. ही सभा वर्कर्स कौंसिल, मॅनेजिंग बोर्ड किंवा ट्रेड युनियनचे प्रतिनिधि किंवा कामगारांची ठराविक संख्या ह्या तऱ्हेने बोलावली जाते. तीन महिन्यांतून एकदा वर्कर्स कौंसिलनी ही सभा बोलावलीच पाहिजे. कांही महत्त्वाच्या बाबी तिच्याकडे द्यावयासच पाहिजेत, जसे, एंटरप्राइजच्या कायद्यांत बदल, कामगारांच्या पगाराचे दर, वार्षिक आर्थिक योजना, वार्षिक रिपोर्ट इत्यादि. या सभांत जी चर्चा होते व त्यांतून ज्या शिफारशी होतात त्या वर्कर्स कौंसिलने विचारांत घ्यावयलाच पाहिजेत, आणि आपला निर्णय कामगारांच्या सभेंत कळवायला पाहिजे. कामगारांना जर तो निर्णय पटला नाही तर त्यांना वर्कर्स कौंसिल परत बोलावतां येते. याशिवाय एक रेफरेंडम्चीहि सोय आहे. एखादा प्रश्न रेफरेंडम्मध्ये बहुमताने निर्णयाला आल्यावर तें मत वर्कर्स कौंसिलने मानायलाच पाहिजे.

**वर्कर्स कौंसिल**—उद्योग चालविण्याची सर्व जबाबदारी हिच्यावर असते. गुप्त मतदानाने हिची निवड होते. काम करणाऱ्यामध्ये कामगार (वर्कर्स) व नोकर (एम्प्लॉईज) असे दोन भाग असतात. वर्कर्स कौंसिलमध्ये दोघाचेंहि प्रमाण तेंच पाहिजे, जें त्या उद्योगांत आहे. वर्कर्स कौंसिलची कालमर्यादा दोन वर्षाची असते व दोनपेक्षा जास्त वेळा कुणालाहि सभासद होतां येत नाही. ट्रेड युनियन किंवा कांही ठराविक सभासदानांच नॉमिनशेन करतां येते. सर्व निर्णय बहुमताने घेतले जातात. हिच्या सभांना मॅनेजिंग बोर्डाचे सभासद व डायरेक्टर

हजर असतात. परंतु हिचा चेअरमन मॅनेजिंग बोर्डाचा सभासद नसतो. उद्योगाच्या बाबतींत सर्व तऱ्हेचे निर्णय घेण्याचा अधिकार वर्कर्स कौंसिलला आहे. वर्कर्स कौंसिलची संख्या १५ ते १२० असते. ती उद्योगांच्या आकारावर अवलंबून असते.

**मॅनेजिंग बोर्ड**—वर्कर्स कौंसिल मॅनेजिंग बोर्डाची निवड करते. मॅनेजिंग बोर्डात ३ ते ११ सभासद असतात. मॅनेजिंग बोर्डाचीं कामें खालीलप्रमाणे असतात. (१) ज्या बाबींवर वर्कर्स कौंसिलला निर्णय घ्यावयास पाहिजे त्याबाबत सूचना करणें. (२) वर्कर्स कौंसिलचे निर्णय अमलांत आणणें. (३) कायद्याने इतर ज्या जबाबदाऱ्या तिच्याकडे सोपविल्या आहेत त्या पार पाडणें. मॅनेजिंग बोर्ड वर्कर्स कौंसिलला जबाबदार असतें. याचे ¾ सभासद हे कामगार असले पाहिजेत.

वर्कर्स कौंसिल व मॅनेजिंग बोर्ड यांच्या सभासदांना पगार नसतात. जेवढा वेळ ते या कामाला देतात तेवढा वेळ ते आपल्या नेहमीच्या कामावर आहेत असें समजलें जातें.

उद्योगाचे जे डायरेक्टर असतात त्यांची जागा फार महत्त्वाची असते. डायरेक्टर वर्कर्स कौंसिलला व सरकारला जबाबदार असतो. जर वर्कर्स कौंसिलचा कोणताहि निर्णय त्याला बेकायदेशीर वाटला, अगर उद्योगाबाबत त्याची जी जबाबदारी आहे त्या जबाबदारीच्या आड येतांना वाटला, तर तो निर्णय स्थगित करण्याचा त्याला अधिकार आहे. जर पुन्हा वर्कर्स कौंसिलनी तो निर्णय घेतला तर डायरेक्टरला ती बाब पीपल्स कमिटीपुढे आणतां येते. डायरेक्टरला सर्व कामगार व नोकर वर्गाला तुरळक बाबीकरता शासन करण्याचा अधिकार असतो. पण महत्त्वाच्या बाबीकरिता निर्णय डिसिप्लिनरी कमिशन घेत असते. यावरून हें स्पष्ट होईल की उद्योगांत डायरेक्टरची जागा फार महत्त्वाची असते. वर्कर्स कौंसिलला व मॅनेजिंग बोर्डाला योग्य नेतृत्व देणें हें त्याचें काम आहे. त्याच बरोबर इतर तंत्रज्ञांचा सल्ला या संस्थानी मंजूर करायला पाहिजे. ह्याचीहि त्याला खबरदारी घ्यावी लागते. उद्योगांतील तंत्रज्ञ अधिकारी वर्ग व कामगारांचे प्रतिनिधि या सर्वांचे संबंध गुण्या-गोविंदाचे ठेवून, कामगार वर्गाला जास्त काम करण्याकरिता कसें प्रोत्साहन देतां येईल हें पाहणें डायरेक्टरची मुख्य जबाबदारी असते.

वर्षाच्या शेवटी उद्योगाच्या एकंदर उत्पन्नांतून, सामानावर खर्च, घसारा, कामगारांचे व नोकरांचे पगार, (सोशल इंशुअरन्स हाउसिंग कॉंट्रिब्यूशन सहित) व पब्लिक फंड्स् हे काढावे लागतात. पब्लिक फंड्स् मध्ये, अचल (फिक्स्ड) व चल (वर्किंग) पुंजी (कॅपिटल) वर व्याज, टर्न ओव्हर टॅक्स, फेडरेशन, कॉम्यून इत्यादींना द्यावयाचा टॅक्स, व संघराज्याने ठरविल्याप्रमाणे इतर देणें दिल्यानंतर जें उरेल तो निव्वळ नफा. या नफ्यांतून संघराज्याचा प्रॉफिट टॅक्स जातो

व बाकी राहिलेल्यांतून प्रॉफिट-शेअरिंग होतें. परंतु मजूर व नोकर ह्या वर्गाने स्वतःच्या खर्चाकरिता कमी दाम घ्यावे व उद्योगाच्या वाढीकरिता किंवा सामाजिक कामाकरिता जास्त शक्ति लावावी या उद्देशाने जो नफा प्रॉफिट-शेअरिंगकडे लावतात त्याच्यावर विशेष कर असतो परंतु तो कर जर उद्योगांत किंवा सामाजिक कामांकरिता लावला तर तो आकारला जात नाही.

वर झालेल्या चर्चेवरून हें दिसून येईल की, कॉम्यूनची पीपल्स कमिटी व वर्कर्स मॅनेजमेंटच्या संस्था यांचे संबंध फार घनिष्ट आहेत. डायरेक्टरच्या नेमणुकींत पीपल्स कमिटीचा हात असतो. डायरेक्टर व वर्कर्स कौंसिल यांच्यांत कांही मतभेद झाले तरी ते पीपल्स कमिटीकडे येतात. याशिवाय प्रत्येक उद्योगांतील पगाराचें व मजुरीचें जें प्रमाण असतें तें वर्षाच्या सुरवातीला ठरवितांना पीपल्स कमिटीची संमति घ्यावी लागते. ही संमति देतांना पीपल्स कमिटी खालील बाबींकडे ध्यान देते.

(१) कामगारांच्या व नोकरांच्या व्यक्तिगत आमदनींत जर वाढ सुचविली असेल तर ती उत्पादनवाढीच्या बरोबर असावयास पाहिजे.

(२) व्यक्तिगत आमदनीकरिता ठेवलेली रक्कम व उद्योगांत लावलेलें भांडवल यांचें प्रमाण पूर्वीपेक्षा कमी नसावें.

(३) ठराविक पगारवाढींत खर्च कमींत कमी व्हावा व जास्तींत जास्त नॉर्म्सप्रमाणे तो उत्पादनवाढींत व्हावा. याशिवाय प्रत्येक उद्योगावर टॅक्स लावण्याचा कॉम्यूनला अधिकार आहे. उद्योगांतील वर्कर्स मॅनेजमेंट व कॉम्यून-मधील सोशल मॅनेजमेंट यांचा संगम अशा तऱ्हेने साधलेला आहे.

पुष्कळदा अशी शंका घेण्यांत येते की जर एखाद्या उद्योगांत नुकसान आलें तर कसें ? सुरवातीला प्रत्येक उद्योगाबाबत संघराज्याला अशी हमी द्यावी लागे की, प्रत्येक कामगाराला त्याच्या किमान वेतनश्रेणीचा कमींत कमी ८०% हिस्सा मिळालाच पाहिजे. एवढा हिस्सा जर उद्योगांतून मिळत नसला तर त्या उद्योगाने कर्ज काढून तो कामगारांना द्यावयास पाहिजे. आता ही हमी काढून घेण्यांत आली आहे. प्रत्येक उद्योगाला वर्षाच्या सुरवातीला आपला टॅरिफ स्केल ठरविण्याचा पूर्ण हक्क मिळाला आहे. उद्योगांत उत्पन्न कमी झालें तर त्या प्रमाणांत सर्वांना कमी मिळेल. या प्रश्नाबाबत आम्हाला असें सांगण्यांत आलें की किमान वेतनश्रेणीची हमी सरकारने जरी घेतली होती तरी ती व्यवहारांत आणण्याचा प्रसंग आला नाही.

नुकतीच ही पद्धति रेल्वे व पोस्ट खात्यांना सुद्धा लागू केली आहे. रेल्वेचे झोन्स पाडले आहेत. व झोनमधील कोणत्याहि विभागांत तेथील काम करणाऱ्या लोकांनी मिळून खर्च कमी करून दाखविला किंवा काम जास्त करून दाखविलें तर त्याचा फायदा त्यांना मिळतो व कामांतहि बढती मिळते.



मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्थळप्रत.
अनुक्रम 31..83.. वि: ..

ही व्यवस्था खुल्या बाजाराशिवाय अमलांत येऊं शकत नाही. प्रत्येक उद्योगाला आपला माल खुल्या बाजारांत विकण्याची पूर्ण मोकळीक असल्याशिवाय वर्कर्स मॅनेजमेंटपासून पूर्ण लाभ घेतां येणार नाही. म्हणूनच ही पद्धति अमलांत आल्याबरोबर युगोस्लावियांत बाजार खुला करण्यांत आला. खुल्या बाजारापासून सुद्धा योजनाबद्ध विकास कसा होऊं शकतो याची चर्चा पुढे करूं.

युगोस्लावियांत ही पद्धति सफल झाली यांत शंकाच नाही. आम्हीं निदान ५–७ उद्योग या दृष्टीने पाहिले. त्यांतील वर्कर्स कौंसिलच्या व मॅनेजमेंट बोर्डाच्या बैठकींत सामील झालों. डायरेक्टरांशीं बोलणें केलें. वर्कर्स कौंसिलच्या सभांना हजर राहिलों. आमच्या मनावर निःसंशय अशी फार मोठी छाप पडली की, या देशांत ही पद्धति फारच सफल झाली आहे. सुरवातीला ही शंका जरूर भेडसावीत असे की, मजुरांच्या हातून वर्कर्स कौंसिल व मॅनेजमेंट बोर्ड चालवण्याचीं हीं जबाबदारीचीं कामें होतील काय? परंतु युगोस्लावियांतील वर्कर्स कॉलेजेसनी या बाबतींत फारच मोठी कामगिरी बजावली. थोड्या अवधीचे लहान कोर्सेस मुद्दाम वर्कर्स कौंसिलच्या व मॅनेजमेंट बोर्डांच्या सभासदांकरिता घेण्यांत आले. व आज या योजनेइतकी सफल योजना युगोस्लावियांत दुसरी नसेल. एरवी युगोस्लावियाला कॉम्युनिस्ट, टोटॅलिटेरियन इत्यादि विशेषणें लावणाऱ्या निरीक्षकांना हें तर मान्यच करावें लागेल की या योजनेंतून कामगारवर्ग सुशिक्षित झाला, त्याला आपल्या जबाबदारीची जाणीव झाली व उत्पादनवाढींत त्याला उत्साहाने भाग घेतां आला. या एका योजनेमुळे प्रत्यक्ष उत्पादनवाढ किती झाली हें जरी सांगणें शक्य नसलें तरी या योजनेबाबत सर्व परदेशी निरीक्षकांचें फारच चांगलें मत आहे. युगोस्लावियांतील उद्योग चालविणारे डायरेक्टर व इतर चालक आणि मजूर हे सर्व अभिनंदनाला पात्र आहेत.

हीच योजना भांडवलशाही समाजरचनेंत कां चालूं नये? व्यवसायांत गुंतलेल्या भांडवलांवर कांही व्याज सुटणें, यापेक्षा दुसरा फरक करण्यांत ही योजना कार्यान्वित होण्याची कांही जरूरी नाही. उद्योगाचें आजचें जें स्वरूप आहे तें तसेंच राहूं शकेल. तोच मॅनेजर, तोच व्यवस्थापक-वर्ग, तोच कामगार-वर्ग. फक्त त्या सर्वांचे पारस्परिक संबंध व उद्योगाचा एकंदर दृष्टिकोण बदलेल. हें जर मान्य केलें की, या पद्धतीने कामगारांचें शिक्षण होतें, त्यांच्यांत जबाबदारीची जाणीव येते, आपण केवळ पगारी नसून समाजाचे एक उपयुक्त घटक आहों ही भावना निर्माण होते, तर मग हे सर्व लाभ आपण कां घेऊं नयेत? ज्यांचें भांडवल गुंतलेलें आहे त्यांना त्याबद्दल कांही निश्चित मोबदला ठरवून देतां येईल. त्याकरिता सरकारने वाटल्यास हमी घ्यावी. अर्थात् भांडवलशाहीचा अर्थ जर जास्त व्यापक घेतला व त्यांतून केवळ पुंजीला प्राप्तीएवढेंच मिळावयाचें नसून, उद्योग चालविण्याचा अधिकारहि

मिळावयाला पाहिजे हा भाव घेतला तर असें होऊं शकणार नाही. याचा कांहीसा अनुभव मला इझ्राईल देशांत आला. त्या देशांतसुद्धा मार्क्सिस्ट पद्धतीचा तात्त्विक समाजवाद जरी रूढ नसला, तरी लोकांत आर्थिक समतेच्या दृष्टीने तो खास रूढ आहे. कोणत्याहि कारखान्यांत तुम्ही जा, काम करणाऱ्यांच्या व त्यांवर देख-रेख करणाऱ्यांच्या आमदनींत फार फरक दिसून येत नाही. याबद्दल पुढे उल्लेख येईलच. इथे एवढें सांगायला पाहिजे की, इझ्राईलचे कारखाने पाहिल्यावर जेव्हा हा विचार तिथे मांडण्याचा प्रसंग आला तेव्हा तेथील लोकांना फार उत्सुकता व आश्चर्य वाटलें. पण माझ्या चटकन् लक्षांत आलें की, इथे अशी प्रथा पडणें शक्य नाही. कारण ज्यांचें भांडवल उद्योगांत गुंतलेंलें आहे त्यांनी याला मान्यता द्यावयाला पाहिजे. इझ्राईलमधील विकास खाजगी पुंजीवर एवढ्या प्रमाणांत झाला आहे. अशी कांही प्रथा जर तिथे सुरूं केली तर आज जो मोठा खाजगी पुंजीचा स्रोत त्या देशांत सुरूं आहे तो बंद होईल अशी भीति त्यांना वाटते. याशिवाय तेथील सरकार मिश्र अर्थव्यवस्था (मिक्सड् अेकॉनॉमी) मान्य करतें. त्यांना सोशालिझमचें संपूर्ण तत्त्व मान्य नाही. आपली परिस्थिति याहून थोडीशी भिन्न आहें. आपल्याला सोशालिझम मान्य आहे. मिश्र अर्थव्यवस्था ही त्या समाजवादाकडे नेणारा एक मार्ग आहे असें आपण मानतों. तेव्हा आपल्या देशांत असलें परिवर्तन होणें फार कठिण जाऊं नये.

शेवटी एका प्रश्नाचा विचार करून हें प्रकरण संपवायला पाहिजे. या एका योजनेने उत्पादनांत किती वाढ झाली हें जरी सांगतां येण्यासारखें नसलें तरी जेव्हापासून ही योजना युगोस्लावियांत सुरूं झाली तेव्हापासून उद्योगाची कशी प्रगति झाली हें एखाद्या कोष्टकावरून दाखवितां आलें तर या दोन्ही बाबींचा अप्रत्यक्ष संबंध दिसूनच येईल. या बाबतींत उद्योगवाढीचे युगोस्लावियाचे आंकडे खालीलप्रमाणे आहेत.

| | | |
|---|---|---|
| १९४७ | — | १२१ |
| १९५१ | — | १६६ |
| १९५२ | — | १६४ |
| १९५३ | — | १८३ |
| १९५४ | — | २०८ |
| १९५५ | — | २८२ |
| १९५६ | — | २६६ |
| १९५७ | — | ३११ |
| १९५८ | — | ३४५ |

युगोस्लावियाच्या बाबतींत हें म्हणतां येईल की, तेथील आकडे फार विश्वसनीय आहेत. याबाबत ग्वाही अनेकांनी व यू. एन. ओ. ने सुद्धा दिली आहे. तेव्हा या आंकड्यांवरून उद्योगाच्या वाढींत या पद्धतीचा कांही तरी हिस्सा राहूं शकतो हें उघड आहे. याच प्रश्नाकडे पाहण्याची आणखी एक दृष्टि राहूं शकेल. या अवधींत कामगारवर्गाच्या आमदनींत व जीवनांत किती फरक झाला ? युगोस्लावियांत तर प्रत्येक ठिकाणीं असें सांगण्यांतच येतें की, आमचें उत्पादन वाढलें व जीवनस्तरहि वाढला. येथे हें लक्षांत घ्यावयास पाहिजे की, त्या देशांतील समाजवादाचा उद्देश व्यक्तिगत आमदनी वाढविण्याचा नसून (सोशल बेनिफिट्स्) सामाजिक फायदे वाढविण्याचा आहे. त्याप्रमाणे तेथे होत आहे. प्रत्येक उद्योगाच्या बाबतींत हें म्हणतां येईल. कामगारांकरिता नवीन घरें, दवाखाने, शाळा, सहकारी दुकानें, काम करण्यांत नाना तऱ्हेच्या सोयी या निश्चित वाढल्या आहेत. कांही खाणमजूर व कांही शहरांतील मजूर यांचीं घरें पाहून ह्या गोष्टी आमच्या लक्षांत आल्या. परंतु एक दोन कारखाने घेऊन मागील ८ वर्षांत त्यांनी किती नफा कमावला, त्यांतील किती नफा कामगारवर्गांत वांटला गेला, किती भांडवल वाढविलें, सामाजिक सोयी करण्यांत किती खर्च केला व व्यक्तिगत आमदनी वाढविण्यांत किती खर्च केला, ह्याचा अभ्यास करण्यासारखा होता. भाषेच्या अडचणीमुळे व वेळेच्या अभावीं आम्ही तो करूं शकलों नाहीं.

★ ★ ★

# आदर्श समाजरचनेबाबत कांही विचार : ६

आदर्श समाजरचनेचे आम्हीं दोन भाग कल्पिले. ती शोषणरहित असली पाहिजे व शासनरहित असली पाहिजे. शोषणरहित समाजरचना म्हणजे काय? याचें स्पष्ट अुत्तर, मीं शोधून काढलेंलें आहे, तें मांडू इच्छितों. कोणताहि धंदा तुम्ही करा, त्यापासून तुम्हांला जी कांही आमदनी होईल तिच्यांत व इतर धंद्यांतील आमदनींत फार फरक नसला पाहिजे. ज्या प्रमाणांत हा फरक राहील त्या प्रमाणांत शोषण आहे असें समजलें पाहिजे. या दृष्टीने युगोस्लावियाकडे पाहिलें तर असें दिसून येईल की, उद्योगाच्या क्षेत्रांत फरक १–६ आहे. राजकीय क्षेत्र घेतलें तर फरक १–१० येईल. शेतीच्या बाबतींत विचार केला तर ५ हेक्टराखाली जसजसे आपण जाऊं तसतशी स्थिति वाईट दिसेल. व खालच्या शेतकऱ्याची स्थिति तर अधिकच वाईट दिसेल. विशेष म्हणजे, ती सुधारण्याचा रामबाण उपाय–सहकारी शेतीचा प्रयोग–तो असफल झाल्यावर आता दुसरा कांही उपाय त्यांच्याजवळ उरला नाही. जनरल कोऑपरेटिव्हजचें क्षेत्र वाढेल व त्यांतून सहकारी शेती येईल तेव्हा येईल. पण तूर्त या शेतकऱ्यांची स्थिति सुधारण्याकरिता कांही जुजबी उपाय आहेत काय अशी आम्हीं एके ठिकाणीं विचारणा केली पण कांही समाधानकारक उत्तर मिळालें नाही. एकंदर आर्थिक प्रगतींत तेहि भाग घेतील अशाच स्वरूपाचें तें उत्तर होतें. जमिनीची समान वांटणी तर कधी शक्यच नाही. जमिनी-जमिनींत कितीतरी फरक असतो. विशेषत: कोरडवाहू जमिनींत तर जास्तच फरक असतो. अशा परिस्थितींत कोरडवाहू जमीन व्यक्तिगत रीतीने कसून ग्रामीण विभागांत शोषणरहित समाज निर्माण करण्याची कल्पना करणें कठिण दिसतें. ह्याच्या कांहीसा उलट अनुभव इस्राईलमध्ये आला. तिथे व्यक्तिगत शेतकरी व सामूहिक शेतकरी यांच्या जीवनमानांत फरक नाही. उलट कांही वर्षांनंतर व्यक्तिगत शेतकरी आपली परिस्थिति जास्त चांगली करूं शकतो हा अनुभव आहे. परंतु तेथील शेती सुधारण्याकरिता जो सुरवातीचा फार मोठा खर्च करावा लागतो तो शेतकऱ्यावर बसत नाही. शेतीसुधारणेची सर्व व्यवस्था जर आपण करूं शकलों व तशा तऱ्हेची सुधारलेली जमीन प्रत्येक शेतकऱ्याला देऊं शकलों तरच अशा समाजाची निर्मिति आपण करूं शकूं. इस्राईलमध्ये हीच परिस्थिति आहे. प्रत्येक नवीन शेतकऱ्याला जीं साधनें देण्यांत येतात

तीं सर्वांना सारखीं देण्यांत येतात. त्याला लागणारा खर्च वगैरे राष्ट्र सहन करतें. हिंदुस्थानांत अशी परिस्थिति येणें किती कठिण आहे याची सहज कल्पना येईल. तेव्हा शोषणराहित्याच्या दृष्टीने प्रगति करणें म्हणजे सहकारी शेतीशिवाय मार्ग नाही असेंच दिसेल. अशा तऱ्हेच्या शेती करण्याच्या पद्धतींत शेतजमिनीची मालकी कांही काळ राहील. त्याकरिता शेतमालकाला स्वामित्वाचा कांही मोबदला सुद्धा मिळेल. परंतु हें लक्षांत ठेवलें पाहिजे की, सहकारी शेतीचें म्हणजे जॉइंट फार्मिंगचें पर्यवसान सामुदायिक शेतींतच होईल. आज आम्ही, लोकांनी घाबरून जाऊं नये म्हणून, असें बोलत नसूं ती गोष्ट वेगळी. कारण स्पष्ट आहे. सहकारी शेतींत मी व माझी जमीन यांचा प्रत्यक्ष संबंध तुटतो व यांतूनच जमीन ही स्वामित्वाकरिता नाही, श्रमाकरिता आहे ही कल्पना वाढते. याशिवाय या दोन पद्धतींत दुसरा कांही फरकच नाही. सामुदायिक म्हणजे वरून देखरेख व सहकारी म्हणजे स्थानिक देखरेख हा फरक योग्य नाही. दोन्ही परिस्थितींत देखरेख स्थानिक राहूं शकते किंवा वरून होऊं शकते.

पण एका गांवची जमीन चांगली व दुसऱ्या गांवची वाईट; एका गांवाला पाण्याची सोय आहे व दुसऱ्या गांवाला ती नाही; अशा स्थितींत, जमिनीवर आम्ही सर्वच काम करणारे आहों म्हणून आम्हांला सर्वांना सारखेंच मिळावें ही भावना निर्माण होते. तिची पूर्ति करण्यासाठी कॉम्यूनसारखें उत्पादनांचें एक मोठें क्षेत्र शोधून त्यांत (शेतीवर) काम करणाऱ्या सर्वांना समान पगार व समान रोजी देणें आवश्यक होऊन बसते. चीनमध्ये सध्या असें सुरुं आहे. म्हणजे शेवटी शेती हा सुद्धा एक उद्योगच आहे व त्यावर काम करणाऱ्यांना इतर उद्योगाप्रमाणेच लेखलें पाहिजे, या निर्णयावर आपण येतों व मग शोषणराहित्याच्या दृष्टीने दोन्ही उद्योगांत आर्थिक समानता आणणें एवढेंच कार्य उरतें.

शेतीपेक्षा उद्योगाचें थोडेंसें सोपें आहे, कारण वर्कर्स मॅनेजमेंटसारख्या एखाद्या उद्योगांतून जें कांही मिळेल तें सर्वांना समान मिळण्याची सोय होऊं शकते. व मग निरनिराळ्या उद्योगांत लागलेल्या लोकांच्या आमदनींत समानता कशी येईल एवढाच प्रश्न उरतो. प्रत्येक राष्ट्राचा अशी समानता आणण्याचा प्रयत्न आहे. परंतु युगोस्लावियांत व कांही अंशीं इस्राईलमध्ये आम्हाला एक नवीन अनुभव आला. युगोस्लावियामध्ये आम्हाला असें सांगण्यांत आलें की, उद्योगाच्या क्षेत्रांत जिथे आज आमदनींतील फरक १–६ आहे तिथे पूर्वी तो १–३ होता. तो वाढवावा लागला. अजूनहि हा फरक वाढवावा लागेल असें तेथील लोकांना वाटतें. कारण एवढ्याशा फरकावर लोक जबाबदाऱ्या घ्यावयाला पुढे येत नाहीत असा त्यांचा अनुभव आहे. ‘एका अशिक्षित मजुरापेक्षा आम्हांला जर कांही जास्त मिळणार नाही तर एवढें शिकावें तरी कशासाठी’ असा प्रश्न विचारला जातो, असें आम्हांला सांगण्यांत आलें

तरुणांनी जास्त जबाबदारीचीं कामें घ्यावीं ही आमची इच्छा असल्यामुळे आम्हाला त्यांची आमदनी वाढवावी लागली व आणखीहि ती वाढवावी लागेल असा संभव आहे असें त्यांचें म्हणणें आहे. हें सर्व तुमच्या समाजवादाच्या विरुद्ध नाही काय ? हा जेव्हा त्यांना आम्हीं प्रश्न केला तेव्हा नाही असें उत्तर मिळालें. जो ज्या प्रमाणांत उत्पादनाला मदत करील त्याला त्या प्रमाणांत मोबदला मिळाला पाहिजे हें समाजवादाचें तत्त्व असल्यामुळे असें होणें योग्यच आहे. जसजसें उत्पादन वाढेल तसतशी समाजवादाकडे आमची जास्त प्रगति होईल व नंतर आर्थिक समानताहि येईल, हा त्यांचा युक्तिवाद. परंतु उत्पादनवाढीबरोबर मानवाच्या गरजाहि वाढणार. त्या गरजा पूर्ण व्हाव्या म्हणून त्याची मागणीहि वाढणार. तेव्हा आजच्या परिस्थितीपुढे हात टेकून तुम्ही जास्त आर्थिक आकर्षण मंजूर करतां त्यामुळे ही परिस्थिति कायमची राहणार आहे व तिच्यांतून तुम्ही सुटूं शकणार नाही असा विचार आम्हीं त्यांच्यापुढे मांडला. हा युक्तिवाद एक तर ते समजले नाहीत किंवा आम्ही त्यांना समजावूं शकलों नाहीं.

याचबरोबर आम्हीं असेंहि पाहिलें की, युगोस्लावियांत बँकांतील, लोकांच्या खाजगी ठेवी वाढत आहेत. चालू खात्यावर व्याज शेकडा ५ व मुदतीच्या खात्यावर शेकडा ७ आहे. ठेववाढीचें प्रमाण खालीलप्रमाणे आहे.

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| १९५२ | — | ३.८ | १९५६ | — | १८.८ |
| १९५३ | — | ५.८ | १९५७ | — | ३१.७ |
| १९५४ | — | ९.४ | १९५८ | — | ४६.७ |
| १९५५ | — | १४.१ | १९५९ | — | ५१.५ |

म्हणजे मानवाची संग्रह करण्याची वृत्ति उत्पादनाचीं सर्व साधनें समाजाचीं केल्यावरहि कायम राहते व व्याज वगैरे देऊन आम्ही ती वाढवितों. या दोन्ही प्रवृत्त्या एकमेकांना पूरक आहेत. आर्थिक असमानतेंतून व्यक्तिगत संचय होऊं शकतो. व व्यक्तिगत जीवनस्तर वाढविण्याकरिता आर्थिक असमानता लागते. यामुळे या दोन्ही बाबींवर कांही नियंत्रण असल्याशिवाय शोषणरहित समाजरचना कायमची टिकूं शकणार नाही. आज समानता आणण्याचा कांही प्रयत्न झाला तरी उद्यापासूनच असमानता निर्माण होण्याला सुरवात होईल. समानता आणणें व ती टिकविणें ह्याकरिता समाजावर नियंत्रण लागेल. कारण माणसाच्या स्वाभाविक प्रवृत्तींतूनच असमानता निर्माण होते.

इस्राईलविषयी माझा अनुभव कांहीसा निराळा आहे. खालील आंकड्यांवरून त्याची कल्पना येईल.

पगारावर काम करणाऱ्या लोकांच्या उत्पन्नाचे आंकडे (१९५८)

| मासिक उत्पन्न | काम करणारांची संख्या | एकूण उत्पन्न |
|---|---|---|
| २०० पौंडांपर्यंत | ९३,००० | ९,३००,००० |
| २०१–२४० ,, | १०५,००० | २३,१००,००० |
| २४१–२८० ,, | ८८,००० | २२,८००,००० |
| २८१–३०० ,, | ३४,००० | ९,९००,००० |
| ३०१–५०० ,, | ८८,००० | ३५,२००,००० |
| ५०१ पौंडांच्या वर | १२,००० | ६,६००,००० |
| | ४,२०,००० | १०६,९००,००० |

आंकडे इझ्रायली पौंडांत. १ पौंड = २.७५ रुपये.
साधारण मासिक उत्पन्न २५५ पौंड.

वरील आंकडयांवरून त्या देशांतील समानतेची कल्पना येईल. अगदी नवीन सुरवात करणाऱ्या शेतकऱ्याला महिन्याला १५० पौंडांची हमी ज्युइश एजन्सीकडून देण्यांत येते. जे जुने शेतकरी आहेत त्यांची आमदनी, सरकारी नोकरींत जो जास्तींत जास्त पगार मिळूं शकतो त्यापेक्षा जास्त आहे. या देशांत मार्क्सवाद नाही. खाजगी संपत्तीवर व्याज व डिव्हिडंड मिळतो. परंतु उत्पादनाचें शेकडा ७० एवढें क्षेत्र श्रमिकांच्या हातांत आहे. सर्व शेतकरी यांत सामील आहेत. खाजगी भांडवलदार जरी विशेष नफा मिळवूं शकत असले तरी त्यांची संख्या फारच कमी आहे.

त्यांचे अेक मोठे अधिकारी पूर्वी रशियांत राजदूत म्हणून होते. त्यांची मुदत संपल्यावर सध्या ते डायरेक्टर जनरल ऑफ लेबर म्हणून काम करीत आहेत. पण त्यांचा पगार सहाशे व सातशे पौंडांच्या मध्यें होता. एखाद्या जुन्या शेतकऱ्याला सुद्धा इतकी आमदनी होईल. ह्या गृहस्थाशीं बोलतांना हा प्रश्न निघाला. तो असें म्हणाला की आमच्याहि देशांत हा प्रश्न आहे. शिक्षित लोक जास्त पगारवाढ मागतात. पण आम्ही ती होऊं देणार नाहीं. त्यामुळे कांही अनिष्ट परिणाम होतील असें आम्हांला वाटत नाही.

इथे ओधानेच एका गोष्टीचा उल्लेख करणें इष्ट वाटतें. इझ्राईलमध्ये हिस्त्राद्रुत नांवाची श्रमिकांची एक संघटना आहे. तिच्या एका मोठ्या अधिकाऱ्याशीं याबाबत चर्चा करण्याचा प्रसंग आला असतां ते म्हणाले, 'आम्हाला सर्व उद्योग किबुत्सच्याच पद्धतीवर आणावयाचे आहेत'. किबुत्स ही इझ्राईलची विशेषता आहे. तें सविस्तर वर्णन पुढे येईलच. इथे एवढेंच नमूद करणें जरूर आहे की, किबुत्समध्ये प्रत्येकाला आपल्या शक्त्यनुसार काम करावें लागतें व त्याच्या गरजेनुसार त्याला किबुत्सकडून मिळत असतें. मार्क्सवादाच्या आदर्श समाजाचा तो एक नमूना आहे. अशा २५८ संस्था इझ्राईलमध्ये आहेत व ४५–५० वर्षांपासून

त्या चांगल्या चालत आहेत. कौटुंबिक भावनेंतून किबुत्सचा सर्व व्यवहार चालतो. उद्योगालाहि जर तसेंच स्वरूप आलें तर खचित आदर्शाकडे नेणारी ती गोष्ट होईल. शेवटी वर्कर्स मॅनेजमेंटचा दुसरा कोणताहि उद्देश असूं शकत नाही.

असो, इथे एवढाच मुद्दा ध्यानांत घ्यावयाचा की, समाजामध्ये ही मागणी होणारच. व या मागणीची विल्हेवाट आपण कशीं लावणार यावर शोषणरहित समाजरचनेचें भवितव्य अवलंबून आहे.

येथपर्यंत शोषणरहित समाजरचनेबाबत चर्चा केली. शासनविहीनता म्हणजे काय ? कॉम्युनिस्टांच्या भाषेंत शासन विरतें म्हणजे काय होतें ? या प्रश्नाची चर्चा करण्याची संधि आम्हाला युगोस्लावियांत कांहीशी लाभली. कारण त्याच्याहि मार्क्सिस्ट तत्त्वज्ञानाप्रमाणे शासनाचा समाजावर पूर्ण अधिकार जमल्यावर लोकांच्या व्यक्तिगत व सामूहिक आणि स्वतंत्र प्रवृत्तींतून नवीन समाजवादी समाज-रचनेचा आविष्कार व्हावयास पाहिजे. रशियांत असें झालें नाही. कारण रशियन कॉम्युनिस्ट पार्टी व रशियन नोकरशाही यांचें संगनमत होऊन त्या दोन्ही, जनतेच्या सेवक न बनतां जनतेच्या मालक बनल्या. असें आपल्या देशांत होऊं नये याकरिता त्यांनी आपल्या पार्टीचें म्हणजे कॉम्युनिस्ट पार्टीचें स्वरूप बदललें. ती आता पार्टी राहिलेली नाही. तिचें विसर्जन झालें. ती केवळ एक समुदाय आहे. तिचें दुसऱ्या एका मोठ्या पक्षांत (सोशालिस्ट अलायन्स ऑफ दि पीपल ऑफ युगोस्लाविया) विलीनीकरण झालें आहे. म्हणजे आपल्या ध्येयपूर्तीसाठी त्यांनी कांही त्याग केला आहे. कांही सत्तांतर केलें आहे. आपण होऊन सत्ता कांही उच्च ध्येयाशिवाय सुटूं शकत नाही. तीच परिस्थिति तेथील नोकरशाहीची सुद्धा आहे. तेव्हा शासनसंस्थेचें व पक्षाचें विरणें ही कल्पना काय आहे व ती कार्यान्वित कशी होऊं शकते आणि त्याकरिता पायऱ्या कोणत्या या सर्व बाबी समजावून घेण्याकरिता युगोस्लाविया ही योग्य भूमि आहे. याबाबतींत कांही प्रमुख लोकांशीं आमच्या ज्या चर्चा झाल्या त्यांचा सारांश इथे देण्यांत येत आहे. परंतु तत्पूर्वी सरकारला शासनाचा अधिकार कां व कसा येतो या संबंधीची थोडी चर्चा उपयुक्त होईल.

समाजांत राहणाऱ्या मनुष्याला समाजाचें नियंत्रण मानलें पाहिजे हें नियंत्रण समाज आपल्या सुस्थितीकरिता करतो. म्हणूनच समाजानें केलेल्या नियमांचें उल्लंघन करणाऱ्याला शिक्षा करण्याचा व तसें उल्लंघन पुन्हा न होऊं देण्याचा अधिकार समाजाला प्राप्त होतो. हा अधिकार समाज सरकारमार्फत चालवितो. इंग्रजींत ज्याला 'स्टेट' (राज्य) म्हणतात त्याच्या अधिकाराची ही उत्पत्ति आहे. आपल्यावर कांही नियंत्रण होत आहे असा जर व्यक्तीला भासच होत नसला तर मग त्याच्या उल्लंघनाचाहि प्रश्न येत नाही. व त्यामुळे शासनाचाहि प्रश्न येत नाही. हा भास व्यक्तीला होऊं नये हा खरा लोकशाहीचा उद्देश आहे. व्यक्तीवर जें नियंत्रण व्हावयाचें आहे तें तिच्या सल्ल्याप्रमाणें व तिच्या अनुमतीने

व्हावें. म्हणजे तिला त्या नियंत्रणाचा भास होणार नाही. परंतु मोठ्या समाजांत हें साधणार कसें? प्रतिनिधींमार्फत जरी निर्णय घेतले गेले तरी कांही असे लोक राहणारच की, ज्यांना बहुमताचा निर्णय मान्य होणार नाही. 'व्यक्ति तितक्या प्रकृति' ही म्हणच आहे. अर्थात् मान्यता-अमान्यता ह्यांच्याहि श्रेण्या असतात. अनुमति नसूनहि तो निर्णय मानायला पुष्कळ लोक तयार असतात परंतु प्रश्न त्यांचाच येतो की, ज्यांची अमान्यतेची ज्योत एवढी प्रखर आहे की, त्यांना त्याचा विरोध करावासा वाटतो. हा विरोध दोन तऱ्हेने होऊं शकतो. एक तऱ्हा अशी की विरोध करून लोकमतच बदलावयाचें. ज्या लोकमताने आपल्याला अमान्य असलेली बाब मान्य केली तेंच लोकमत आपल्या बाजूचें करून त्याकडून ती बाब पुन्हा अमान्य करावयाची. ह्या पद्धतीला घटनात्मक पद्धति म्हणतां येईल. दुसरी तऱ्हा सत्याग्रहाची. दुसऱ्या तऱ्हेचा सध्या येथे विचार प्रस्तुत नाही. सत्याग्रहीला समाज शिक्षा करीलच. त्याच्या बाजूचें जर लोकमत प्रबळ असलें तर मग सत्याग्रहीचा विजय होईल व पहिल्याच पद्धतींतून परिस्थिति सुधारूं शकेल. तात्पर्य हेंच की, जोपर्यंत समाज व्यक्तींचा बनला आहे—आणि तो तसा राहणारच—तोपर्यंत कांही व्यक्तींना समाजाचें नियंत्रण बोचतच राहील. या दृष्टीनें शासनसत्तेचा किंवा व्यवस्था-शक्तीचा लोप होणें अशक्य दिसतें.

सरकारी सत्तेच्या किंवा स्टेटच्या कार्याचे दोन विभाग करण्याची पद्धति आहे. (१) शासनाचा विभाग व (२) व्यवस्थेचा विभाग. सत्तेचा अंश पहिल्याच विभागाशीं येतो असा समज आहे. पण हें तितकेंसें बरोबर वाटत नाही. कारण व्यवस्था सुद्धा अमान्य करणाऱ्या व्यक्ति निघणारच. असें होणें शक्य आहे की, व्यक्तीचा एवढा विकास होईल की, बहुमताने समाज जें ठरवील तें तिला मान्यच राहील. हा एक मानवी गुणच समजला जाईल. व त्याप्रमाणे व्यक्ति आचरण करतील. हें शक्य असो किंवा नसो, जोपर्यंत ही भिन्नता आहे तोपर्यंत समाजाची शासनशक्ति व्यक्तीला आवश्यक वाटत राहील.

परंतु असें मानलें जातें की, व्यक्ति व समाजांतील विरोध हा पुंजीवादांतून किंवा पुंजीवादाच्या अवशेषांतून निर्माण होतो. त्यांचें म्हणणें असें की, समाजांत ज्या प्रमाणांत समाजवादी संबंधांची प्रस्थापना होईल त्या प्रमाणांत हे विरोध नाहीसे होतील व आदर्श स्थितींत म्हणजे समाजवादी संबंध जेव्हा समाजांत पूर्णपणें रूढ होतील तेव्हा असले विरोध बिलकुलच राहणार नाहीत व शासनसंस्थेला कांही कार्य नसल्यामुळे ती आपोआपच गळून जाईल. समाज आपलें नियंत्रण करील व त्या नियंत्रणाला व्यक्ति स्वाभाविक समजून पूर्ण मान्यता देईल. अशी युगोस्लावियांतील नेत्यांची श्रद्धा आहे. ते असें मानतात की, जगांत जर शांतता नांदली तर हा दिवस आज दिसतो तेवढा लांब नाही. जसजशी विपुलता वाढेल

तसतसे समाजांतील समाजवादी संबंध (सोशालिस्ट रिलेशन्स) वाढतील व हा दिवस लौकर उजाडेल.

वरील अपवाद सोडल्यास अशा आणखी कोणत्या बाबी आहेत की, ज्या अंगीकारल्याने सत्ता नाहीशी होऊं शकेल ? ह्याचें खरें एकच उत्तर आहे- समाजाच्या लहान लहान घटकांना जेवढें स्थानिक स्वातंत्र्य देतां येईल तेवढें देऊन टाकावें. याला विकेंद्रीकरण म्हणतां येईल. पण 'स्थानिक स्वातंत्र्य' हा शब्दप्रयोग मला जास्त अर्थपूर्ण वाटतो. पूर्वी आपण हा विचार केला आहेच की, समाजाचें व्यक्तीवर जें नियंत्रण व्हावयाचें तें तिच्या सल्ल्याने व अनुमतीने झाल्यास तिला तें नियंत्रणासारखें बोचक वाटणार नाही. तिला तें हवेंसेंच वाटेल. 'स्थानिक स्वातंत्र्य' हें असें घडवून आणण्याचा रस्ता आहे. केंद्रीय सरकारवर अंतर्गत (इंटरनल) व बहिर्गत (एक्सटर्नल) संरक्षणाची जबाबदारी टाकून जिथे जिथे स्थानिक स्वातंत्र्य देतां येईल तिथे तिथे तें दिलें पाहिजे. याचे दोन फायदे आहेत. एकाचा निर्देश तर वर केलेलाच आहे. दुसरा फायदा हा आहे की, यामुळेच जास्तींत जास्त लोकांना समाजाच्या सर्वांगीण विकासांत प्रत्यक्ष भाग घेतां येईल व वर्कर्स सेल्फ गवर्मेंटसारखी त्यांची स्वतःवरील जबाबदारीची जाणीव वाढेल. हा निर्णय आपण शुद्ध विचारांतीं तर घेऊं शकतोंच परंतु हा केवळ आदर्शवाद नसून त्याचें प्रत्यक्ष आचरण झालें पाहिजे. हें धोरण युगोस्लावियाने अमलांत आणण्याचा प्रयत्न केला आहे. या बाबतींतले प्रसिद्ध तत्त्ववेत्ते श्री एडवर्ड कार्डेल म्हणतात, 'दि काँस्टंटली इनक्रीजिंग पार्टीसिपेशन ऑफ दि वर्किंग मासेस अिन दि अॅडमिनिस्ट्रेशन ऑफ दि स्टेट अफेअर्स अॅंड ऑफ सोशल फंक्शन्स इन जनरल अॅंड ऑफ इकॉनमिक् अफेअर्स इन पर्टीक्युलर इज दी एसेन्स ऑफ दि विदरिंग अवे ऑफ दि स्टेट.' (समाजाच्या राजकीय, सामाजिक व विशेषत: आर्थिक बाबतींत सारख्या वाढत्या प्रमाणांत काम करणाऱ्या साधारण जनसमाजाने भाग घेणें हेंच सत्तेच्या सुकण्याचें मुख्य अंग आहे.) शेवटी सर्व प्रश्न समजाने स्वतः अगर प्रतिनिधींमार्फत आपल्या सामाजिक स्तरावर सोडविले पाहिजेत. जितक्या जास्त प्रमाणांत हे प्रश्न अगदी खालच्या थरावरून सुटतील तितक्या जास्त प्रमाणांत—'डायरेक्ट डेमॉक्रसीचें'—प्रत्यक्ष लोकशाहीचें प्रमाण वाढू शकेल. जींत सर्व लोक प्रत्यक्ष भाग घेतात व जींत प्रतिनिधींमार्फत भाग घेण्याची जरूरी नसते तिला डायरेक्ट डेमॉक्रसी म्हणतात.

ह्या पद्धतींतून लोकशिक्षणहि लौकर होईल व लोकांना आपल्या जबाबदारी-चीहि जाणीव होईल. आपल्याकडे ज्या ग्रामपंचायती आहेत त्यांचें कार्यक्षेत्र वाढविल्याने हें साधण्यासारखें आहे. अगदी महत्त्वाचा म्हणजे जमिनीचाच प्रश्न घ्या. आज प्रत्येक राज्यांत जमिनीच्या सीलिंगचे कायदे होत आहेत. हे अमलांत येणार

मात्र प्रत्येक खेड्यांत. पण त्या खेड्यांत याबाबत काय मत आहे, तेथील लोकांना याबद्दल काय वाटतें यांची कांही तरी आपण चौकशी केली आहे काय? ६० ते ७५ हजार लोकसंख्येमार्फत एक प्रतिनिधि असावयाचा. तो १००–१५० गांवांतील लोकमत अजमावणार तरी कसा? याच्या उलट प्रत्येक गांवांतील सर्व लोक जमवून त्यांना परिस्थिति समजावून त्यांचें मत अजमावण्याचा प्रयत्न केला तर? त्यांतून आजच्यापेक्षा उत्तर जास्त चांगलें निघणार नाही असें कोण म्हणूं शकेल? निदान सर्व लोकांना प्रश्न तर कळून येईल! त्यांचे विचार तर आपल्यास समजतील! या प्रश्नाच्या सर्व बाजू मांडून गावकऱ्यांचा विचार घेऊन मग वाटल्यास त्यांच्या प्रतिनिधींशीं विचारविनिमय करतां येईल. पण आज हें सर्व आपण करीत नाहीं. याचें मुख्य कारण म्हणजे गांवकऱ्यांवर आपला विश्वास नाही. ते योग्य निर्णय घेऊं शकतील असें आपण मानत नाहीं. त्यांना कांही समजतच नाही ही आपली समजूत आहे. प्रतिनिधींना निवडून देणें त्यांना समजतें, पण प्रतिनिधींनी काय करावें हें मात्र त्यांना सांगतां येत नाही. त्यांच्यातर्फे बोलणारे अजाण प्रतिनिधि मात्र योग्य निर्णय घेतील असें आपण समजतों. असें मानण्यांत घोर आंतर्विरोध आहे. म्हणून युगोस्लावियामध्ये 'व्होटर्स मीटिंग' चें एवढें महत्त्व आहे. या मतदारांच्या सभा प्रत्यक्ष लोकशाहीच्या कृतिसंस्था आहेत. त्यांना कायद्यानेच अस्तित्व दिलें आहे. त्या प्रतिनिधि उभे करूं शकतात. त्यांना आपले प्रतिनिधि परत बोलावतां येतात. त्याशिवाय सर्व महत्त्वाच्या प्रश्नांची चर्चा त्यांच्यासमोर होऊन त्यांचें मत अजमाविलें जातें. व त्या मतावर प्रतिनिधि-सभेंत चर्चा होऊन निर्णय घेतला जातो. म्हणजे जरी प्रतिनिधि-सभेला कोणताहि निर्णय घेण्याचा पूर्ण अधिकार असला तरी मतदारांच्या सभेचें मत समोर ठेवून चर्चा व्हावी व मग प्रतिनिधि-सभेने आपलें मत बनवावें असा नियम आहे. कॉम्यूनचा जो वार्षिक सोशल प्लॅन (म्हणजे आपल्याकडील बजेट) असतो तो प्रथम मतदारांच्या सभांतून मांडून त्यावर चर्चा होते व त्या चर्चेप्रमाणे त्याची विल्हेवाट मग कॉम्यूनमध्ये लागते. आमच्या दुर्दैवाने आम्हाला अशा मतदारांच्या सभेची कारवाई प्रत्यक्ष पाहावयाला मिळाली नाही. परंतु त्याबद्दल आम्ही जी माहिती मिळविली तीवरून आम्ही एवढें निश्चित म्हणूं शकतों की, या सभा प्रत्यक्षांत तेवढ्याच प्रभावी असतात जेवढ्या त्या कागदावर दिसतात. युगोस्लावियाबद्दल असें म्हणतां येईल की, त्याची आजची शक्तिहि मुख्यतः यामुळेच आहे की, आपल्या विचाराप्रमाणे प्रत्यक्ष कृति करण्याचा त्यांचा निर्धार आहे व त्यांच्या आड लोकांचे कितीहि स्वार्थ आले तरी त्यांची ते पर्वा करीत नाहीत. कॉम्युनिस्ट पार्टीचें विसर्जन जेव्हा झालें तेव्हा पार्टीच्या लोकांनी असें करण्याला पुष्कळ विरोध केला. पण शेवटी तें घडून आलेंच.

अशा तऱ्हेचें स्थानिक स्वातंत्र्य किंवा विकेंद्रीकरण यांनी राज्यसत्तेचें विघटन होतेंच. या विघटनाची आणखी एक तऱ्हा युगोस्लावियांत मोठ्या प्रमाणांत चालू आहे. ती म्हणजे जीं अधिकारसूत्रें राज्यसत्तेमार्फत चालावयाचीं आहेत तीं सुद्धा अशीं चालावयाचीं की, त्याबाबत समाजाच्या संस्था निर्माण करून त्यांना निर्णय घेण्याचें स्वातंत्र्य द्यावयाचें किंवा त्यांचा निर्णय मानण्याचा प्रघात पाडावयाचा. उदाहरणार्थ शिक्षणाचे प्रश्न घ्या. यांतील कांही प्रश्न संघराज्याच्या स्तरावरच सोडवावे लागतील. त्यासाठी संघराज्याच्या स्तरावर एक शिक्षण-कौंसिलसारखी संस्था कायम करून त्या संस्थेमार्फत किंवा तिच्या सल्ल्यानुसार हे प्रश्न सोडवावयाचे. शिक्षण-कौंसिल कॉम्यून, जिल्हा, लोकराज्य व संघराज्य या प्रत्येक स्तरावर राहील. व वरचा स्तर खालच्या स्तरामार्फत निवडला गेला असेल. अशा तऱ्हेच्या संस्थांना ते सेल्फ गव्हर्निंग सोशल ऑर्गन्स मानतात. अशा तऱ्हेच्या संघटना शिक्षण, स्वास्थ्य, संस्कृति, रस्ते, इत्यादि किती तरी बाबतींत आहेत. म्हणजे निर्णयाची जबाबदारी तत्संबंधी माहितगार लोकांच्या सल्ल्यानुसार घेण्यांत येते. त्यांचा सल्ला सहसा अमान्य होत नाही. अशा तऱ्हेने सत्तेचें विघटन होतें. इथे हें लक्षांत घेतलें पाहिजे की, अशा संस्थांचीं मुळें जनसमुदायांत पसरलेलीं असतात. आपल्या संस्था स्वयंनिर्णयाच्या आधारावर चालविण्याचें स्वातंत्र्य त्याना असतें.

अशीच आणखी एक प्रथा युगोस्लावियांत आहे, जिच्यामुळे सत्तेच्या विकेंद्रीकरणाला मदत होते. प्रत्येक राज्यघटकाच्या थरावर, म्हणजे प्रत्येक कॉम्यून, जिल्हा लोकराज्य व संघराज्य यांच्या स्तरावर, दोन निवडून आलेल्या प्रतिनिधिसंस्था असतात. या दोहींच्याहि मतानुसार त्या त्या घटकाचा राज्यकारभार चालावयाचा असतो. हा राज्यकारभार चालविण्यास मदत म्हणून बऱ्याचशा कमिटया कायम करण्याची पद्धति आहे. या कमिटयांत त्या त्या विभागाशीं संबंधित अशा नामांकित व निष्णात लोकांचा समावेश करून घेतात. प्रातिनिधिक संस्थांतील लोक विशेष जाणकार म्हणून किंवा संबंध (कोऑर्डिनेशन) राहावा म्हणून समाविष्ट केलेले असतात. या कमिटयांचे सेक्रेटरी त्या घटकाचे सरकारी नोकर असतात. या कमिटयांना कमिशन्स म्हणतात. त्या विभागासमोरील महत्त्वाचे प्रश्न या कमिशन्सपुढे येतात. आणि त्यांच्या निर्णयानुसार त्यावर अंमलबजावणी होते. एकटया बेलग्रेड जिल्ह्याकरिता १८ कमिशन्स आहेत. याशिवाय कमिटया, कौंसिलें ॲडमिन्स्ट्रेशन्स अशा नांवाच्या इतर संस्था आहेत. त्यांत अशाच तऱ्हेने साधारण लोकांचा समावेश होतो. बेलग्रेड शहराबद्दल आम्हाला तिथल्या व्हाइस मेअर साहेबांनी सांगितलें की, अशा तऱ्हेने बेलग्रेडच्या ७,००,००० लोकसंख्येपैकी ७०,००० लोक शासनाशीं निगडित झालेले आहेत.

खालच्या संस्थांना जास्तींत जास्त अधिकार देणें त्यांतहि विशेषज्ञांच्या मतानुसार निर्णय घेणें, शासनाशीं जनसाधारणांचा जास्तींतजास्त संबंध जोडणें ह्या प्रकारें सत्ता लुप्त होऊं लागते. पण हे सर्व योग्य तऱ्हेने होण्याकरिता शासनाच्या सर्व व्यवहारांत लोकशाहीची स्वच्छ हवा खेळत असली पाहिजे. आज या बाबतींत पक्षसंघटना ही एक प्रतिबंध होऊन बसलेली आहे. आपण असें म्हणतों की, लोकशाहीला पक्षसंघटना अत्यंत आवश्यक आहे पण ती पक्षसंघटनाच लोकशाहीला कशी मारक होते इकडे आपण लक्ष देत नाहीं. पक्षांतील अधिकाऱ्यांच्या भीतीमळे लोकप्रतिनिधि खरें बोलूं शकत नाहीत. विधेयकांवर पक्ष ठरवील त्याप्रमाणे बोलणें व मतें देणें हे सर्व दोष आज लोकशाहींत फार मोठ्या प्रमाणांत घुसले आहेत. जनता व शासन यांच्यामध्ये पक्ष दलालासारखा होऊन बसला आहे. विरोधी पक्ष असला की, पक्षसंघटनेला जास्तच बळकटी येते. विरोधी पक्ष नसला तर पक्षाला हुकूमशाहीचें स्वरूप येतें. ज्याप्रमाणे राज्यसत्तेचें विघटन शासनविहीनतेच्या दृष्टीने होणें जरूरीचें आहे त्याचप्रमाणे पक्षमुक्तीचीहि जरूरी आहे.

पक्ष कां व कसे निर्माण होतात ? ज्या लोकांचे विचार एक आहेत अशांनी एकत्र येणें हें स्वाभाविक नाही काय ? या प्रश्नांचा थोडा जास्त विचार करावयास पाहिजे. एखाद्या मतदारसंघातर्फे जेव्हा एखादा पक्ष एखादा उमेदवार उभा करतो व तो निवडून येतो तेव्हा लोक उमेदवाराला निवडतात की पक्षाला निवडतात हा एक प्रश्नच आहे. त्याचा परिणाम असा होतो की, एका पक्षाचेंच प्रतिनिधित्व तो उमेदवार करीत असल्यामुळे आपल्याच मतदारसंघांतील इतर लोकांचें प्रतिनिधित्व तो करूं शकत नाही. एवढेंच नव्हे तर विरोधी पक्षांशीं तो संबंध ठेवावावयाला लागल्यास तो 'चांगला पक्षसभासद नाही' असें समजलें जातें. जर पक्षाला मतें मागावयाचीं असतील तर मग मतदारसंघातर्फे लोक उभे न करतां पक्षातर्फे करावे. प्रत्येक पक्ष निवडणुकीकरिता उभा राहतो. व त्या पक्षाला जितकीं मतें मिळतात त्या प्रमाणांत तो पक्ष आपले लोक निवडून पाठवितो. लोक पक्षाला निवडतात व पक्ष मग आपले लोक निवडून पाठवितो. अशी मतदानपद्धति इझ्राईलमध्ये आहे. याचा आणखी एक फायदा असा की, पक्षाला ज्या प्रमाणांत मतें मिळतात त्या प्रमाणांत उमेदवार संसदेंत किंवा विधानसभेंत येऊं शकतात. मतदारसंघांतर्फे निवडणूक असल्यास असें होतेंच असें नाही. अशी कल्पना करा की, एकंदर १०० मतदारसंघ आहेत व प्रत्येक मतदारसंघांत एका पक्षाला (अ ला) शेकडा ५५ मतें पडलीं व दुसऱ्या पक्षाला (ब ला) शेकडा ४५ पडलीं. परिणाम असा होईल की, केवळ अर्ध्यापेक्षा थोडीं जास्त मतें पडून अ पक्षाचें सर्व उमेदवार निवडून येतील व ब पक्षाला जवळजवळ अर्धी मतें पडून सुद्धा त्या पक्षाचा एकहि उमेदवार निवडून येणार नाही. या पद्धतीने कधीकधी तर असेंहि होतें

की, एका पक्षाला कमी मतें पडून त्या पक्षाचे जास्त उमेदवार निवडून येतात व दुसऱ्या पक्षाला जास्त मतें पडून त्या पक्षाचे कमी उमेदवार निवडून येतात. वरील उदाहरणांतच अशी कल्पना करा की, अ पक्षाला ४० मतदारसंघांत शेकडा ८० मतें पडलीं व बाकीच्या ६० मतदारसंघांत शेकडा ४० मतें पडलीं. बाकी सर्व मतें ब पक्षाला मिळालीं. परिणाम असा झाला की, अ पक्षाला ५६०० मतें पडून त्याचे ४० च प्रतिनिधि आले व ब पक्षाला ४४०० मतें पडून त्याचे ६० प्रतिनिधि निवडून आले. अशा अनेक व्यस्त गोष्टी होत असतात. पक्षाला मतें मागितलीं तर असें होणें शक्य नसतें. वर सांगितलें आहे की, इझ्राईल देशांत पक्षालाच मतें मागण्याची पद्धति आहे. त्यामुळे लोकमताचें प्रत्यक्ष चित्र संसदेंत दिसून पडतें.

मतदारसंघातर्फे, निवडलेली व्यक्ति स्थानिक लोकांचा प्रतिनिधि म्हणून जाते. याचे कांही फायदे आहेत. त्यामुळे स्थानिक प्रश्न सुटूं शकतात व स्थानिक प्रश्नांचा चांगला अभ्यास होऊन त्यांतून देशाच्या प्रश्नांचीहि कल्पना येऊं लागते इत्यादि, इत्यादि. पण मग निवडून आलेला मनुष्य स्थानिक लोकांनी निवडून द्यावा. पक्षातर्फे त्याला निवडून येण्याचें प्रयोजन काय? आता इथे अशी शंका येणें स्वाभाविक आहे की, निवडणुकींत प्रत्येक उमेदवार कांही लोकांची मदत घेतोच. कांही अंशीं त्यांचा तो बांधलेला होतो. त्याला त्यांचेंच जास्त ऐकावें लागतें. त्यामुळे कांही प्रमाणांत तो त्यांचा प्रतिनिधि बनतो, जनतेचा बनत नाही हें खरेंहि आहे. याला उपाय निवडणुकीचें तंत्र सुधारणें हा आहे, कॅन्व्हासिंगच्या पद्धतींत सुधारणा करणें हाच आहे. मतदारांशीं संबंध कसे ठेवावे हें ठरविण्यांत आलें पाहिजे. युगोस्लावियाच्या पद्धतीबद्दल पुढे बोलूंच पण सध्या हें नमूद केलें पाहिजे की, तिथे खुल्या निवडणुका होत असल्या तरी आपल्याकडल्यासारखें कॅन्व्हासिंग नाही. निवडणुकीला उभे राहिल्यावर आपल्याकडे जसा उमेदवार ईरेस पेटल्यासारखा दिसतो. व कसेंहि करून निवडणूक जिंकण्याची त्याची प्रवृत्ति असते. असें कांहीहि तेथे होत नाही. उमेदवारांचीं नांवें जाहीर होतात. मतदारसंघ ज्याला निवडेल तो प्रतिनिधि निवडून आल्यावर निवडून न आलेल्या उमेदवाराला कांही वैषम्य वाटूं नये असा संकेत आहे. सर्व उमेदवार एकाच पक्षातर्फे उभे असतात.

तेव्हा जर आपण निवडणुकीची पद्धति सुधारूं शकलों व पक्षातर्फे उमेदवार उभे न राहतील याची खबरदारी घेतली तर निवडून आलेला उमेदवार खऱ्या अर्थानें जनतेचा प्रतिनिधि होऊं शकतो. व मग पक्ष व जनता यांच्या विषयींची त्याची निष्ठा दुभंगण्याची कांहीहि जरूरी राहणार नाही. अशा तऱ्हेनें निवडून आलेल्या अपक्ष प्रतिनिधींतर्फे समाजाचा कारभार चांगला कां चालूं नये? अर्थात् असलेहि अपक्ष प्रतिनिधि, संसदेंत किंवा विधानसभेंत जर कांही गट पडले तर त्या गटांत सामील

होतील. पंडित नेहरूंसारख्या प्रतिभावान् व्यक्ति नेहमी आपल्या भोवती आपली प्रभावळ निर्माणच करतील. व आमचा हा अपक्ष प्रतिनिधि नेहमीच पंडित नेहरूंचा पाठपुरावा देखील करील. परंतु तरीहि तो अपक्ष राहूं शकेल. कारण (१) त्याची पुढची निवडणूक कोणत्याहि पक्षाच्या मदतीवर अवलंबून राहणार नाही. पुन्हा मला अमक्या पक्षाने तिकीट दिलें तरच मी निवडून येऊं शकेन, एरवी नाही, अशी जी आज परिस्थिति आहे ती राहणार नाही. जोपर्यंत तो उमेदवार आपल्या मतदार संघाशीं योग्य संबंध प्रस्थापित करून ते कायम ठेवूं शकेल तोपर्यंत त्याला निवडून येण्याची संधि राहील. (२) कोणत्याहि मुद्यावर आमच्या ह्या अपक्ष प्रतिनिधीला पंडित नेहरूंच्या मताहून भिन्न मत व्यक्त करतां येईल. तो असेंहि म्हणूं शकेल की, या प्रश्नावर माझें मत व माझ्या मतदार संघांतील बहुतेक लोकांचें मत पंडित नेहरूंच्या मताहून भिन्न आहे. (३) असें झाल्याने विकासकार्यांत सर्व लोकांचा आजच्यापेक्षा जास्त सहयोग मिळूं शकेल. आज पक्षांच्या झगडयामुळे असा सहयोग मिळविण्या-करिता अनेक अडचणी निर्माण होतात. विरोधी पक्षाला वाटतें की, सत्तारूढ पक्षाला सहयोगाने बळकटी येईल. सत्तारूढ पक्षाला वाटतें की विरोधी पक्षाचा सहयोग प्रभावी झाला तरी त्यालाच बळकटी येईल व पुढील निवडणुकीवर त्याचा अनिष्ट ( त्याच्या दृष्टीने ) परिणाम होईल. या सर्व अडचणींतून सुटका करून घ्यावयाची झाल्यास निवडणुकांत पक्षातर्फे उमेदवार निवडलेच जावयाला नकोत. अशा पद्धतीपासून कांही नुकसान संभवतें काय ? हें खरें आहे की, पक्षाच्या संघटनेमुळे पक्षाच्या सरकाराला जास्त स्थैर्य येतें. पक्षाच्या शिस्तीवर त्याला भिस्त ठेवतां येते. अपक्ष-प्रतिनिधींचा पाठिंबा हा केव्हाहि इतका पक्का होणार नाही. हें जरी खरें असलें तरी हेंहि तितकेंच खरें आहे की, शुद्ध व प्रभावी लोकशाहीच्या दष्टीने मंत्रिमंडळाचे व प्रतिनिधींचे संबंध जितके एकात्मतेचे अपक्ष-पद्धतींत होऊं शकतील तितके केव्हाहि पक्ष-पद्धतींत होऊं शकणार नाहीत. देशांत जर पुजीवादी श्रीमंत वर्ग नसला तर मग पैशाच्या लोभाने त्याकडून प्रतिनिधींचा बुद्धिभेद होण्याचा संभवहि कमीच असतो. शुद्ध प्रभावी लोकशाहीच्या दृष्टीने या पद्धतीचा विचार करणें योग्य होईल. निदान हा अनुभव कांही क्षेत्रांत घेऊन पाहण्यासारखा आहे.

परंतु याहि पद्धतींतून हळूहळू पक्षनिर्मिति होण्याचा संभव दिसतो. अपक्ष म्हणून जरी प्रतिनिधि निवडून आला तरी संसदेंत कोणत्या तरी मोठ्या पुढाऱ्याच्या प्रभावळींत तो बसेल व हळूहळू या पुढाऱ्याचा अनुयायी समजला जाईल. त्याच भावनेने स्थानिक लोकहि त्याच्याकडे पाहतील. त्याला मदत करणारे स्थानिक लोक असणारच. अशा तऱ्हेने हळूहळू एक पक्ष निर्माण होईल. ऐतिहासिक दष्टया पक्षनिर्मितीचा असाच इतिहास असेल. अशा तऱ्हेने लोकशाहींत पक्ष पडणें हें अनिवार्यच ठरेल काय ? मग यावर काय उपाययोजना

करतां येईल ? यावर कायमची तोड अशी कांहीच दिसत नाही. अपक्ष पद्धतीनें निवडून आलेल्या प्रतिनिधींनी मंत्र्यांची किंवा कार्यवाहांची निवड करणें हा एक सकृद्दर्शनीं उपाय सुचतो. या पद्धतींत प्रत्येक मंत्री सर्व सभागृहाला जबाबदार राहील. सभागृहाच्या संमतीप्रमाणें तो आपलें काम करील. त्याचें म्हणणें अमान्य झाल्यास तो राजिनामा देऊं शकेल व त्याच्या जागीं सभागृह दुसरा मंत्री कायम करूं शकेल. आजच्या पद्धतींत व या पद्धतींत मूलभूत फरक हा आहे की, सभागृह एका व्यक्तीला नेता म्हणून निवडतें व तो नेता आपले साथी निवडतो अशी ही पद्धति नसून, नेता कुणींच न निवडतां काम चालविण्याकरिता जेवढे लोक लागतील त्या सर्वांना सभागृहानेच निवडावयाचे. अशा पद्धतींतून पक्षनिर्मितीची शक्यता कमी होईल. पण ती अजीबात नाहीशी होईल असें कांही दिसत नाही.

सध्या तरी युगोस्लवियांत दुसरा पक्ष निर्माण होणार नाही याची सोय त्या पक्षाच्या पुढाऱ्यांना जेलमध्ये टाकूनच केली आहे असें म्हणणें योग्य होईल. कॉम्युनिस्ट पुढारी श्री. मिलोव्हान जिलास हा एक दुसरा पक्ष कदाचित् स्थापन करूं शकला असता. परंतु त्यावर खटला भरून त्याला जेलमध्ये टाकण्यांत आलें. व आज तरी युगोस्लावियांत ही परिस्थिति आहे की, तिथे दुसरा पक्ष काढूं देत नाहीत म्हणून तो निघूं शकत नाही.

याबाबत युगोस्लावियातील विचारवंताचें काय मत आहे व तें तेथील प्रत्यक्ष परिस्थितींत कितपत उतरलें आहे याचा आता विचार करूं. हें तर सर्वांनाच मान्य आहे की, राज्यसत्तेच्या विघटनाबरोबर पक्षसंघटनेचें सुद्धा विघटन झालें नाही तर शेवटी पक्ष व नोकरशाही यांची जोडी बनून ती जनसेवेला मारक होईल. कारण सामाजिक लोकशाही (सोशल डेमॉक्रसी) च्या त्यांच्या आदर्श कल्पनेंत नोकर-वर्ग हा तंत्रज्ञांचा व शास्त्रज्ञांचा राहील व तो जनतेच्या स्थानिक प्रतिनिधींना व शासनसंस्थांना जबाबदार राहील. खालच्या श्रेणीवर जनतेचें बहुतेक सर्व काम होईल. व केंद्रांत कांही जुजबी अधिकार राहतील. या बैठकींत जनतेला स्थान आहे. पक्षाला बिलकुल नाही. तेव्हा जनतेहून निराळी अशी पक्षाची संघटना असेल तर ती तुटली पाहिजे. जेव्हा युगोस्लावियांत नवीन वळणाला सुरवात झाली तेव्हा हा प्रश्न प्रामुख्याने पुढे आला. तोपर्यंत युगोस्लाव कॉम्युनिस्ट पार्टीची संघटना इतर कॉम्युनिस्ट पक्षाप्रमाणेच होती. अगदी खाली 'सेल्स' व अगदी वरची पार्टी काँग्रेस. काँग्रेसचे सर्व सभासद 'सेल्स' मधून निवडलेले असले पाहिजेत. पार्टी काँग्रेस सेंट्रल कमिटी निवडते व सेंट्रल कमिटी एक्झिक्युटिव्ह कमिटी निवडते. पार्टी काँग्रेस दर चार वर्षांनी भरावी असा नियम असे. कॉम्युनिस्ट पार्टीप्रमाणेच

युगोस्लावियांत एक 'पीपल्स फ्रंट ऑर्गनायजेशन' म्हणून संघटना असे व या संघटने-खाली युगोस्लावियांतील सर्व राजकीय पक्ष एकत्र येत असत.

या दोन्ही संस्थांत पुढे काय बदल झाले हें पाहण्यापूर्वी, तत्संबंधी दोन प्रश्नांचा विचार झाला पाहिजे. हें जरी मानलें की, राज्यसत्तेच्या विघटनाबरोबर पक्षाचेंहि विघटन झालें पाहिजे तरी ह्या दोन्ही क्रिया एकसमयावच्छेदेकरून होतील की मागे पुढे होतील ? दुसरें, हें विघटन इतर पक्ष निर्माण होऊन व्हावें की, आहे तोच पक्ष नामशेष होऊन घडावें ? आणि तिसरें, या दरम्यानच्या काळांत लोकशाहीची शुद्ध हवा वाहत राहील ह्याबद्दल काय काळजी घेतली पाहिजे ?

युगोस्लावियांत साधारण सूर असा होता की, राज्यसत्तेचें विघटन व पक्षाचें विघटन दोन्ही बरोबर व एकसमयावच्छेदेकरून होईल. याबाबत टिटोचें म्हणणें असें आहे, 'राज्यसत्ता क्षीण होत जाईल तर कॉम्युनिस्ट पक्ष जुन्याप्रमाणे चालणें शक्य नाही. जर राज्यसत्ता क्षीण होत जाणार नाही तर शासनसत्तेचें साधन म्हणून पक्षाची जरूरी राहील. पण जर राज्यसत्ता नष्ट होत गेली तर पक्षहि नष्ट होईल.' आणि पुन्हा तो म्हणतो, 'ऐतिहासिक दृष्टया (कॉम्युनिस्ट) पक्षाचें कार्य कांही थोडया कालमर्यादेपर्यंत असतें. त्यानंतर समाज आपला कारभार कसा चालवील हें इतिहासच दाखवूं शकेल. पण एकाहि पक्षाची जरूरी राहणार नाही. पक्षाचा हळूहळू ऱ्हास होईल.' याचा अर्थ असा नव्हे की, अेक-पक्षपद्धति जाऊन तिच्या जागीं बहु-पक्षपद्धति येईल. ह्याचा केवळ अर्थ हाच की, बहुपक्ष-पद्धतीच्या पुढची पायरी असलेल्या एकपक्षपद्धतीचाहि लोप होईल. त्यांची एकंदर विचारपद्धति अशी आहे की, जर पक्षाचेंच विसर्जन व्हावयाचें आहे, तर मग पक्ष वाढवा कशाला ? वर्कर्स मॅनेजमेंट व सोशल सेल्फ गव्हर्मेंट ह्यासारख्या संस्थांतून अशी समाजरचना निर्माण होईल की, जींत प्रत्येक व्यक्तीला मोकळेपणाने हवे ते विचार मांडतां येतील. मग दुसऱ्या पक्षाची जरूरी काय ? या उलट दुसरा पक्ष काढणें म्हणजे पाठीमागे जाण्यासारखें होईल असें त्यांना वाटतें. कारण आजच्या पद्धतींतून पार्टीची शक्ति हळूहळू कमी होत जाऊन 'पार्टीरहित प्रत्यक्ष लोकशाहीचा' (पार्टीलेस डायरेक्ट डेमॉक्रसीचा) युगोस्लावियांत उदय होत आहे. वर्कर्स सेल्फ मॅनेजमेंट आणि सोशल सेल्फ गव्हर्नमेंट यांच्या सारख्या वाढींतून, युगोस्लावियांत प्रत्यक्ष लोकशाहीचा (डायरेक्ट डेमॉक्रसीचा) उदय होत आहे व पक्षाच्या मिरासदारीचा लोप होत आहे.

या सर्व विचारसरणींतून कॉम्युनिस्ट पक्षाची शक्ति हळूहळू कमी करण्यांत आली. पूर्वी त्याचें कार्य सरकार चालविण्याचें व राज्यसत्ता राबवून घेण्याचें होतें. तें बदलून त्याचें कार्य 'समाजवादाच्या प्रगतींत लोकांचें नेतृत्व करणें' हें ठरविण्यांत आलें. शासनाच्या निरनिराळ्या अंगांत हात न घालतां कॉम्युनिस्ट पक्षाने आपलें लक्ष

१२९८९



सैद्धांतिक प्रश्नांवर केंद्रित करावें व समाजवादाच्या वाढत्या प्रगतींत लोकांचें नेतृत्व करावें असें ठरलें. हें सर्व घडवून आणण्याकरिता १९५३ सालीं पीपल्स फ्रंटचें रूपान्तर सोशालिस्ट आलायन्समध्ये करण्यांत आलें. हा जवळ जवळ जनतेचाच पक्ष आहे. याची सभासद-संख्या लोकसंख्येच्या शेकडा ७०-७५ ह्या प्रमाणांत आहे. सभासदाकरिता मासिक वर्गणी केवळ ५ दिनार आहे. प्रत्येक शहरांत आणि खेडयांत या संघटनेची शाखा आहे. इतर ज्या संस्था आहेत उदा. तरुणांची ट्रेड युनियन, व्हैटरन्स इत्यादि, त्या सर्वांनी सोशालिस्ट अलायन्समार्फत काम करावयाचें असा नियम घालण्यांत आला. ही अेक आम जनतेची संघटना आहे. सर्वांनी त्या संघटनेमार्फत आपलें काम करावें अशी पद्धति युगोस्लावियांत पडली आहे. जुने कॉम्युनिस्ट पक्षाचे सभासद हे जरी लीग ऑफ कॉम्युनिस्टचे सभासद असले तरी त्यांना सोशालिस्ट अलायन्सचे सभासद व्हावेच लागते. आणि जरी बरेचसे कॉम्युनिस्ट सोशालिस्ट अलायन्सचें नेतृत्व करीत असले तरी तिची सभासदसंख्या एवढ्या मोठ्या प्रमाणांत वाढल्यामुळे व पुष्कळशा प्रमाणांत नवें रक्त तींत आल्यामुळे, पूर्वीसारखें आता सोशालिस्ट अलायन्स-मध्ये केवळ कॉम्युनिस्टांचें वजन राहिलें नाही. पुष्कळशा वर्कर्स कौंसिलमध्ये व कॉम्यूनसमध्ये असे बरेच वजनदार लोक आले आहेत की, जे लीग ऑफ कॉम्युनिस्टचे सभासद नाहीत. तरीहि कॉम्युनिस्टांची जुनी सेवा एवढी मोठी आहे व अजूनहि जुन्या लोकांचें वजन इतकें जास्त आहे की, प्रमुख ठिकाणीं अजूनहि तेच आहेत.

अशा परिस्थितींत लोकशाहीचें वातावरण युगोस्लावियांत कितपत आहे? त्या देशांत सध्या येण्याजाण्याला पूर्ण मुभा आहे. व्हिसा लवकर मिळतो. युगोस्लावियातील लोकांना सुद्धा बाहेर जातां येतें. देशांत प्रवासाकरिता कांही अडचणी नाहीत. पास वगैरेची कांही जरूरी नाही. व्यक्तिस्वातंत्र्य मोठ्या प्रमाणांत आहे. स्थानीय लोक परकीयांशीं मोकळ्या मनाने बोलतात. त्यांना आपल्या घरीं बोलावतात व त्यांचें आदरातिथ्य करतात. सरकारवर टीकाहि करतात. येथील वर्तमानपत्रांत पाश्चात्य राष्ट्रांतील माहिती पूर्णपण देण्यांत येते. शासना-विषयी सविस्तर माहिती छापण्यांत येते. एवढी माहिती इतर लोकशाही देशांत सुद्धा मिळणार नाही. येथे खुला बाजार आहे. लोक आनंदी दिसतात. परंतु दुसरा पक्ष काढतां येत नाही. जिलासच्या आणि टिटोच्या भांडणाचें हेंच मूळ आहे. जिलासचें म्हणणें असें की, आता युगोस्लावियांत समाजवाद अितका पुढे गेला आहे की, पक्षसंघटना पूर्णपणे मोडून टाकली पाहिजे. तो म्हणतो, "आज सर्व समाजाच्या प्रत्यक्ष गरजांची पूर्ति कोणताहि एक पक्ष करूं शकत नाही, मग तो कोणताहि पक्ष असो. आज देशापुढे एकच रस्ता आहे व तो म्हणजे जास्त प्रमाणांत लोकशाही आणणें, जास्त खुली चर्चा, ठिकठिकाणीं अगदी खुली निवडणूक व कायद्याची रोख-ठोक

अंमलबजावणी." टिटोचें सुद्धा हेंच ध्येय दिसतें. दोघांत जो फरक आहे तो तात्त्विक नसून योग्य काळाचा आहे. टिटोचें म्हणणें असें की, एवढी मोठी पायरी एकदम चढतां येणार नाही; क्रमाक्रमाने घेतलें पाहिजे. आजपर्यंत जें कमावलें आहे तें सांभाळून पुढे गेलें पाहिजे. जिलास जास्त उतावळा आहे. शुद्ध आणि पूर्ण लोकशाही त्याला त्वरित पाहिजे आहे. टिटोला अशी भीति वाटते की, जर एकदम एवढी सवलत दिली तर कदाचित् समाजांतील पुंजीवादी अवशेष बळावतील. विशेषत: मोठ्या शेतकऱ्यांच्या बाबतींत त्यांचा आजपर्यंतचा अनुभवहि तेंच सांगत आहे. त्यामुळे टिटो व त्याचे साथीदार या निर्णयावर आले आहेत की, या देशांत दुसरा पक्ष तयार होऊं द्यावयाचा नाही. तो पक्ष युगोस्लावियाचा पक्ष किंवा समाजवादी पक्ष म्हणून राहूं शकणार नाही.

या दृष्टीने पाहिल्यास चीन, रशिया किंवा इतर साम्यवादी राष्ट्रांची एक-पक्षाबाबतची जी वृत्ति आहे तिच्यांत व युगोस्लावियाच्या वृत्तींत मूलभूत फरक नाही. परंतु विकासाच्या क्षेत्रांत युगोस्लावियाने राज्यसत्तेचे अधिकार क्षीण करण्यांत, पक्षाचें प्रभुत्व कमी करण्यांत, सामाजिक स्वराज्याच्या व आर्थिक लोकशाहीच्या विकासाकरिता पुष्कळ मोठ्या प्रमाणांत पावलें उचललीं आहेत यांत शंका नाही. युगोस्लावियांत आता खुल्या निवडणुका व खुली चर्चा सुरूं असल्यामुळे पाश्चात्य लोकशाहीला पूर्णपणे संमत नसलेलें परंतु दिवसेंदिवस जास्त विकास पावणारें असें, एका विशिष्ट प्रकारच्या लोकशाहीचें वातावरण त्या देशांत आहे असें म्हणणें योग्य होईल.

★ ★ ★

ठाणे. स्थ
अनुक्रम ........ वि: ........
क्रमांक ........................ नों: दि: ........

# युगोस्लावियांतील राज्य-व्यवस्था : ७

वाचकांना युगोस्लावियाच्या राज्यव्यवस्थेच्या ठळक बाबींसंबंधी माहिती व्हावी हा या प्रकरणाचा उद्देश आहे. तेथील कॉम्यून पद्धतीचा विस्ताराने उल्लेख करण्यांत येईल.

युगोस्लाविया हें सहा लोकराज्यें मिळून झालेलें अेक संघराज्य आहे. फेडरेशन, रिपब्लिक, डिस्ट्रिक्ट व कॉम्यून असे तेथील शासनाचे चार थर पाडलेले आहेत. प्रत्येक थरावर दोन सभागृहें आहेत. पहिल्याला पीपल्स कौंसिल म्हणतात व दुसऱ्याला कौंसिल ऑफ प्रोड्युसर्स म्हणतात. दोन्ही मिळून एक पीपल्स कमिटी होते. पीपल्स कमिटी ऑफ दी कॉम्यून, डिस्ट्रिक्ट, रिपब्लिक व फेडरेशन अशी म्हणण्याची प्रथा आहे. त्या क्षेत्रांतील सर्व लोक प्रौढ मतदार-संघामार्फत पीपल्स कौंसिल निवडून देतात. मात्र फक्त उत्पादनाशीं प्रत्यक्ष संबंध असलेले लोक, ज्या प्रमाणांत त्या क्षेत्रांतील उत्पादनांत त्यांचा हिस्सा असेल त्या प्रमाणांत कौंसिल ऑफ प्रोड्युसर्स निवडतात. कौंसिल ऑफ प्रोड्युसर्सचा मतदार-संघ दोन भागांत वांटला जातो. पहिल्यांत उद्योग, व्यापार, हस्तव्यवसाय इत्यादि, म्हणजे औद्योगिक बाबी येतात व दुसऱ्यांत शेती येते. प्रत्येक विभागांतील निरनिराळ्या धंद्यांचें प्रतिनिधित्व, त्यांत काम करणाऱ्या लोकांच्या संख्येवर अवलंबून आहे. म्हणजे जर एखाद्या क्षेत्रांत, उद्योग व शेती यांचें प्रमाण सारखें असेल तर दोन्ही क्षेत्रांतून सारखे प्रतिनिधि कौंसिल ऑफ प्रोड्युसर्समध्ये घेतले जातील. उद्योगाच्या क्षेत्रांतील प्रतिनिधींच्या संख्येंतून खाण, कापड, हॉटेल इत्यादि धंद्यांच्या प्रतिनिधींची संख्या त्या त्या धंद्यांत काम करणाऱ्या लोकांच्या संख्येवर अवलंबून राहील.

युगोस्लावियांतील कौंसिल ऑफ प्रोड्युसर्सचा विशेष हा आहे की, त्यांत सरकारी नोकर, वकील, डॉक्टर, इ. धंदेवाईक सामील नाहीत. कारखान्यांशीं संबंधित असा व्यवस्थापकवर्ग मात्र त्यांत सामील आहे. व्यक्तिगत शेतकरी जर जनरल कोऑपरेटिव्हजचा सभासद नसेल तर त्यालाहि वगळण्यांत आलें आहे. हें सभागृह कायम करण्याचा उद्देश हा की, सरकारामध्ये श्रम करणाऱ्यांचा प्रमुख हिस्सा असावा. या सभागृहांतून श्रम करणाऱ्यांना आपल्या कॉम्यूनच्या व्यवस्थेंत प्रत्यक्ष भाग घेतां येतो. वर्कर्स मॅनेजमेंटमधून आपल्या उद्योगांतील उत्पन्न कसें वाढविलें

जाईल हें ठरविण्याचा अधिकार त्याला मिळतो. कौंसिल ऑफ प्रोडयुसर्सच्या मार्फत तें उत्पन्न किती असावें हें ठरविण्याचा त्याला अधिकार मिळतो. कारण याबाबत कांही अधिकार स्थानिक पीपल्स कमिटीला असतात.

डिस्ट्रिक्ट पीपल्स कमिटीखेरीज बाकी सर्व पीपल्स कमिटयांच्या निवडणुकी मतदारसंघामार्फत प्रत्यक्षपणे म्हणजे डायरेक्ट होतात. डिस्ट्रिक्ट पीपल्स कमिटीचें पीपल्स कौंसिल, त्याच्या क्षेत्रांत असलेल्या कॉम्यून्सच्या पीपल्स कौंसिलमार्फत, त्याच्या लोकसंख्येनुसार निवडलें जातें. म्हणजे प्रत्येक कॉम्यूनचें पीपल्स कौंसिल, आपल्या लोकसंख्येनुसार आपल्यातर्फे डिस्ट्रिक्टवर प्रतिनिधि पाठवितें. कौंसिल ऑफ प्रोडयुसर्समध्येहि तीच पद्धति आहे.

बाकींच्या सभागृहांकरिता गुप्त मतदानपद्धतीने निवडणुका होत असतात. सुरवातीला इतर कॉम्युनिस्ट देशांप्रमाणे युगोस्लावियांत सुद्धा निवडणुकींत एकच उमेदवार उभा राहावयाचा अशी पद्धति असे. परंतु दिवसेंदिवस ही पद्धति बदलत असून तिला खुल्या निवडणुकीचें स्वरूप येत आहे. आम्हांला असें सांगण्यांत आलें की, लोकराज्याच्या (रिपब्लिक) मागील निवडणुकींत ८७९ जागांपैकी ६९ जागां-करिता निवडणुकी झाल्या. व संघराज्याकरिता ३०७ जागांपैकी केवळ ६ जागांकरिता निवडणुकी झाल्या. कॉम्यून्समध्ये मात्र यापेक्षा जास्त प्रमाणांत निवडणुकी होतात. पण ह्या निवडणुकीसुद्धा आता व्हावयाला लागल्या आहेत व यापुढे त्या जास्त प्रमाणांत होतील असा विश्वास वाटतो. निवडणुकींकरिता सोशालिस्ट अलायन्स उमेदवार उभे करते. परंतु स्थानिक व्होटर्स मीटिंग किंवा २२० मतदारांच्या सह्यांनिशी कुणालाहि उभें राहतां येतें.

फेडरेशन, व रिपब्लिक यांच्या अधिकारक्षेत्राची मर्यादा घटनेने ठरविली नाही. फेडरेशनला संपूर्ण युगोस्लावियाकरिता मूलभूत (बेसिक) किंवा सर्व-साधारण तऱ्हेचे (जनरल) कायदे करण्याचा अधिकार आहे व रिपब्लिकला ते कायदे आपल्या स्थानिक परिस्थितीला अनुसरून करून घ्यावयाचे असतात. असा कायदा रिपब्लिकने पास केला की, मग तिला तो बेसिक कायदा लागू पडत नाही. जनरल कायदा मात्र नेहमीकरिता लागू असतो. त्याचप्रमाणे अर्थव्यवस्था आहे. संघराज्याचे टॅक्स वेगळे व रिपब्लिकचे टॅक्स वेगळे असें नसतें. एकाच कराच्या आकारणींतून फेडरेशन, रिपब्लिक हे आपले हिस्से घेत असतात. कॉम्यून्स मात्र कांही बाबतींत स्वतंत्रपणे टॅक्स लावतें.

प्रत्येक विभागाचे सरकारी नोकर त्या त्या विभागाच्या पीपल्स कमिटीला जबाबदार असतात. म्हणजे फेडरेशनच्या सरकारी नोकरांना रिपब्लिकमध्ये अधिकार नाहीत व रिपब्लिकच्या नोकरांना ते जिल्ह्यांत नाहीत. त्याचप्रमाणे कॉम्यूनमध्ये. याचा अर्थ असा की, पीपल्स कमिटीच्या क्षेत्रांत तिचे पूर्ण अधिकार चालतात. रिपब्लिक

किंवा फेडरेशनचे अधिकार तिच्या क्षेत्रांत चालत नाहीत. पोलिस खातें जरी पीपल्स कमिटीच्या अधिकारक्षेत्रांत येत नसलें तरी तिच्या क्षेत्रांत काम करीत असतांना पोलिस सुद्धा पीपल्स कमिटीच्या देखरेखीखाली असतात. डिस्ट्रिक्ट कमिटीला तिच्या कामांत कांहीहि हस्तक्षेप करतां येत नाही. ती आपल्या कक्षेंत पूर्णपणे स्वतंत्र आहे. फक्त कायद्याच्या कक्षेंत तिचें काम नसलें तरच त्या सबबीवर डिस्ट्रिक्ट कमिटीला तिचा हुकूम डावलतां येतो. आणि तो सुद्धा तिचा अधिकारी-वर्ग डावलूं शकत नाही. कॉम्यूनच्या पीपल्स कमिटीनें केलेला निर्णय डिस्ट्रिक्ट पीपल्स कमिटीच बदलूं शकते. कॉम्यूनच्या पीपल्स कमिटीला असें वाटलें की, वरच्या कांहीं कायद्यानें किंवा हुकमानें तिच्या अधिकारावर गदा आणली गेली आहे, तर तिला आपल्या अधिकाराचें रक्षण करण्याकरिता अपील करतां येतें. आजपर्यंत अशा घटनात्मक बाबींचा निर्णय लावण्याकरिता युगोस्लावियांत कांही विशेष सवलत नव्हती. अपील सरकारकडेच करावें लागत असे. पण या व असल्याच बाबींकरिता एक कॉंस्टिटचूशनल कोर्ट युगोस्लावियांत कायम करण्यांत येत आहे.

कॉम्यूनचें उत्पन्न करावर आधारलेलें असतें. हे कर तिच्या क्षेत्रांत चाललेल्या उद्योगांतून शेतकरी व इतर धंदेवाईकांकडून मिळतात. उद्योगांवर कॉम्यूनला कर लादण्याचा स्वतंत्र अधिकार आहे. अर्थात् हे कर उद्योगांत काम करणाऱ्यांच्या आमदनीवर अवलंबून असतात. म्हणून त्यांची आमदनी वाढावी यांत कॉम्यूनचेंहि हित असतें. आपल्या क्षेत्रांतील कोणत्याहि उद्योगाला कर्ज, भांडवल, किंवा इतर सवलतींची जरूरी असली तर त्या मिळवून देण्यांत कॉम्यूनचेंहि हित असतें. कारण त्यांच्या आमदनीच्या वाढीवर कॉम्यूनच्याहि आमदनीची वाढ अवलंबून आहे. शेतकऱ्यांकडून त्यांच्या शेतीच्या आराजीप्रमाणे एक ठराविक कर वसूल करण्यांत येतो. पूर्वी हा कर वार्षिक उत्पन्नावर अवलंबून असल्यामुळे, स्थानिक अधिकाऱ्यांना तो एक शेतकऱ्यांवर अन्याय करण्याचें साधन बनला होता. त्यानंतर प्रत्येक जमिनीचें क्षेत्रफळ व प्रत ठरवून तिच्यांतून सर्व साधारण जें उत्पन्न निघतें त्यावर एक ठराविक कर आकारण्यांत आला. या कराचें प्रमाण वाढतें आहे; म्हणजे जास्त जमीनवाल्यांवर जास्त कर बसवण्यात येतो.

आम्हीं दोन नवीन कॉम्यून्सना भेट दिली व त्यांचें बजेट तपासलें. त्यांच्या कामाचा व्याप पाहिला. स्वाभाविकपणे कांही ठिकाणीं लोक गोळा झाले. त्यांच्याशीं आम्ही बोललों. त्यावरून कॉम्यूनची विशेषता ही वाटली की, फार मोठ्या प्रमाणांत, स्वयंशासित व जबाबदार असा तो एक राज्याचा लहानसा घटक आहे. शेती, उद्योग, दळणवळण, व्यापार, आरोग्य, शिक्षण, थोडक्यांत जीवनाच्या सर्व बाबींत कॉम्यून्सना लक्ष घालतां येत असल्याकारणानें, कॉम्यूनचें शासन म्हणजे एक छोटसें सरकारच वाटतें. याच्या अनेक फायद्यांपैकी हा तर एक मोठाच फायदा आहे की,

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे, ग्रंथालय.

स्थानिक कर्तबगार लोकांना आपल्या क्षेत्रांत सेवेची भरपूर संधि मिळूं शकते. व यांतूनच पुढे संघराज्याच्या सभांत ते जातात.

कॉम्यूनचें क्षेत्रफळ व लोकसंख्या अनेक बाबींवर अवलंबून असते. कांही कॉम्यून्सची लोकसंख्या १० ते १२ हजारच आहे. जंगली विभाग किंवा खेडे विभाग या भागांत असले कॉम्यून्स आहेत. शहरांतील कॉम्यून्सची संख्या ४०–५० हजारांपर्यंत आहे. कॉम्यूनच्या खाली आणखी तीन संस्था असतात त्यांचाहि निर्देश येथें केला पाहिजे. लोकल कमिटी, हाउसिंग कॉम्युनिटी व हाऊस कमिटी अशा ह्या तीन संस्था आहेत.

लोकल कमिटी––ह्या संस्था बनविणें अनिवार्य नाही. सोयीप्रमाणे त्या बनविल्या जातात. कांही खेडीं मिळून एक लोकल कमिटी तयार होऊं शकते. हिचा उद्देश स्थानिक स्वराज्य आणखी जवळ आणणें हा आहे. कांही भाग दूर असल्यामुळे लोकांची विशेष सोयींची मागणी असते, अशा वेळीं किंवा लोकांची मागणी होईल त्या ठिकाणीं ह्या लोकल कमिटीज निर्माण होतात. ह्यांच्या मार्फत कॉम्यूनच्या पीपल्स कमिटीचें म्युनिसिपालीटीबाबतचें बहुतेक काम होत असतें. परंतु ह्यांच्यावर कॉम्यूनची पूर्ण देखरेख असते व त्यांनी केलेला कोणताहि हुकूम बदलविण्याचा अधिकार कॉम्यूनला आहे. त्यांच्या खर्चाकरिता लागणारी रक्कम कॉम्यून त्यांना देते व कॉम्यूनचाच कर्मचारी-वर्ग त्यांचेंहि काम करतो. त्या विभागांतून निवडून आलेले पीपल्स कमिटीचे सभासद व स्थानिक लोकांनी निवडून दिलेले इतर लोक मिळून ही कमिटी तयार होत असते.

हाउसिंग कॉम्युनिटी—मोठ्या शहरांत मोठमोठ्या नवीन ब्लॉक्समार्फत, जिथे नवीन वस्त्या होत आहेत तिथे ह्या संस्थांचा उपयोग करतात. एका मोठ्या ब्लॉकमध्ये धोबी, अंतर्गत सजावट, मुलांकरिता नर्सरीज, मुलांचें क्रीडांगण, दररोज लागणाऱ्या चिल्लर वस्तूंचें दुकान, अविवाहितांकरिता जेवणाची सोय, बगीचा इत्यादींचा पुरवठा ह्या हाउसिंग कॉम्युनिटीज करीत असतात. ह्या ब्लॉकचे सर्व लोक एकत्र येऊन ३० सभासदाचें एक बोर्ड निवडतात. बोर्डाची एक्झिक्युटिव्ह कमिटी असते. व याशिवाय मुलांची सोय, सोशल सिक्युरिटी, इलेक्ट्रिक रिपेअर, स्वास्थ्य इत्यादि बाबींकरिता अलग कमिट्या असतात. एका लहान प्रमाणावर हें कॉम्यूनच समजलें पाहिजे. या कॉम्युनिटीच्या लोकसंख्येप्रमाणे कॉम्यूनकडून यांना ग्रँट्स् मिळतात. तितक्याच प्रमाणांत कॉम्यून्सची जबाबदारी कमी होते. हाउसिंग कॉम्युनिटीबाबत सर्व युगोस्लावियाला लागू असणारा एक कायदा आहे.

हाउस कमिटी––मोठ्या शहरांत जे प्लॉट्स असतात त्यांत राहणारे एक हाउस कमिटी निवडतात. प्लॉट्स सफाई, दुरुस्ती व इतर व्यवस्थाहि त्यांच्या

हातांत असते. हाउस कमिटीच भाडेंवसुली करते व प्लॉटच्या खर्चाबद्दल बजेट तयार करते. प्लॉटमधील जागा देणें किंवा जागा सोडण्याची नोटिस देणें हे अधिकार हाउस कमिटीकडे असतात. व्हाइटवॉशिंग वगैरे सर्व कामें हाऊस कमिटीकडे असतात. मुंबईसारख्या शहरांत या कमिटचा बरींच कामें करूं शकतील.

या एकंदर संस्थांतून स्थानिक स्वराज्याच्या कामांत किती लोक काम करतात याची कल्पना येण्याकरिता खालील आंकडे बोधप्रद वाटतील. एकंदर वर्कर्स कौंसिलें व मॅनेजिंग बोर्ड यांत काम करणारे सभासद व कारकून अनुक्रमे २७०,००० व ३८,००० आहेत. ४०,००० लोक स्वास्थ्य, १३०,००० शाळा, १४०,००० हाउसिंग कमिटीज व १००,००० कोऑपरेटिव्हजच्या मॅनेजिंग बोर्ड ह्यांत आहेत. पब्लिक कमिटी व तिच्या निरनिराळया कमिटचा, कमिशन्स व स्थानिक कमिटचा मिळून २२३,००० लोक आहेत. अशा तऱ्हेने एकंदर १०,०००,००० लोक स्थानिक स्वराज्याच्या कामांत कोणत्या ना कोणत्या स्वरूपांत भाग घेत आहेत. एकंदर युगोस्लावियाची लोकसंख्या १ कोटी ८० लक्ष धरली तर त्यापैकी १ कोटी लोक प्रौढ धरतां येतील. म्हणजे दर दहा माणसांमागे एक मनुष्य हा कोणती तरी सामाजिक जबाबदारी पार पाडण्याचें काम करीत आहे. शहरांत तर हें प्रमाण फारच जास्त आहे. बेलग्रेड शहराबद्दल पूर्वी ह्याविषयी उल्लेख आलेलाच आहे. आणि दरवर्षी यांपैकी कांही सदस्य बदलतात, जुने जाऊन नवे येतात इकडे लक्ष दिलें तर मग हें ध्यानांत येईल की, जवळजवळ सर्वच लोक कमी जास्त प्रमाणांत या कॉम्यूनच्या मूलभूत व्यवस्थेंत भाग घेत आहेत. कारण या सर्व संस्था कॉम्यूनच्या अंतर्गत काम करीत आहेत.

शाळा, दवाखाने, सडका, प्रसूतीकेंद्रें, इत्यादि बाबबींत जी स्थानिक स्वराज्याची व्यवस्था आहे, तिच्यांतील एक बाब लक्षांत ठेवण्यासारखी आहे. उद्योगाच्या बाबतींत वर्कर्स मॅनेजमेंटचें तत्त्व असें आहे की, उद्योगाची मालकी जरी समाजाची आहे तरी त्यावर काम करीत असलेले कामगारच समाजाचे हितसंबंध चांगल्या तऱ्हेनें सांभाळूं शकतात, कारण त्यांचे व समाजाचे हितसंबंध एकच आहेत. त्याचप्रमाणे स्थानिक स्वराज्याच्या व्यवस्थेच्याहि बाबतींत तसेंच आहे. शाळेच्या बाबतींत कमिटी करावयाची झाल्यास तिच्यांत, शिक्षक, पालक, विद्यार्थी व शिक्षणतज्ञ या सर्वांचे अधिकारी राहतील. त्याच बरोबर कॉम्यूनच्या शाळाखात्यातर्फे कांही हुकूम आले, तरी त्यांची अंमलबजावणी हीच कमिटी करील. म्हणजे एकाच संस्थेमार्फत स्थानिक स्वराज्य व सरकारी यंत्रणा दोन्ही पूर्ण केल्या जातात. कॉम्यूनचें जें शिक्षणाचें बोर्ड राहील, त्यांत शिक्षकांचे, विद्यार्थ्यांचे, पालकांचे, व शिक्षणतज्ञांचे प्रतिनिधि राहतील. ह्याच बोर्डामार्फत कॉम्यूनमधील शिक्षणाचें काम पार पाडलें जाईल व वरून आलेल्या सूचनांवर अंमलबजावणी करतां येईल.

जिल्ह्याचें शिक्षणबोर्ड कॉम्यून्स्च्या शिक्षणबोर्डानें निवडलेलें असेल व लोकराज्याचें बोर्ड जिल्ह्यांनी निवडलेलें असेल. हे सर्व बोर्ड्स् आपापल्या क्षेत्रांत स्वयंचलित असतात. ते निर्णय घेतात. त्यांच्या खर्चाकरिता, कॉम्यून, जिल्हा इत्यादि पैसे काढून देतात. अशा तऱ्हेनें स्वयंनिर्णयाचें व स्वयंशासनाचें तत्त्व फार दूरवर लागू केलेलें आहे. युनिव्हर्सिटया, दवाखाने, सिनेमा, लायब्ऱ्या, इत्यादि सर्व तऱ्हांच्या संस्थांना ही पद्धति लागू आहे.

व्होटर्स मीटिंग नांवाच्या आणखी एका संस्थेचें वर्णन करून कॉम्यूनची ही माहिती संपविली पाहिजे. प्रत्येक लहानांतल्या लहान निवडणूकमंडळाला व्होटर्स मीटिंग असें नांव आहे. कॉम्यूनचा मतदारसंघ सर्वांत लहान. परंतु लोकराज्याच्या किंवा संघराज्याच्या मतदारसंघांत पुष्कळ व्होटर्स मीटिंग्ज सामील असतात. व्होटर्स मीटिंग म्हणजे त्या विभागांत राहणाऱ्या सर्व प्रौढ मतदारांची सभा. कॉम्यूनच्या कायद्यानेच हिचें अस्तित्व मानलें जातें. उदाहरणार्थ, निवडणुकीकरिता उभे राहणाऱ्या लोकांची नेमणूक (नॉमिनेशन) करणें व त्यांना परत बोलावणें इत्यादि कांही गोष्टी व्होटर्स मीटिंगमध्येंच होऊं शकतात. परंतु याशिवाय ह्या संस्था इतर महत्त्वाचीं कामेंहि करतात. आपल्या विभागांतून निवडून गेलेल्या व्यक्तींच्या कामावर देखरेख करणें हें एक त्यांचें महत्त्वाचें काम असतें. प्रत्येक प्रतिनिधीनें पीपल्स कमिटींत काय काम केलें याचा आढावा ठराविक वेळांत आपल्या व्होटर्स मीटिंगला दिलाच पाहिजे. हा आढावा रिपोर्टाच्या स्वरूपांत असतो. या रिपोर्टावर व्होटर्स मीटिंग चर्चा करते आणि त्यांत काय फरक असावे हेंहि सुचवूं शकते. किंवा कांही बाबतींत त्यांचा विरोध असला तर तोहि ती दर्शवूं शकते. विशेषत: स्थानिक बाबतींत या सभा कांही विशेष सूचना सुद्धा करूं शकतात. उदाहरणार्थ, एखादा स्थानिक रस्ता हवा असला किंवा शाळा अथवा दवाखाना हवा असला तर व्होटर्स मीटिंग असा ठराव करूं शकते की, ही बाब झाली पाहिजे व त्याकरिता स्थानिक रीतीने आम्ही एवढी जबाबदारी घ्यावयाला तयार आहों. ही सूचना जर कॉम्यूननें मंजूर केली तर कायदेशीर रीतीनें ती जबाबदारी व्होटर्स मीटिंगच्या प्रत्येक व्यक्तीला पार पाडावी लागते. त्यांनी ती तशी पार न पाडल्यास कायदेशीर रीतीनें व सक्तीनें ती त्यांच्याकडून पूर्ण करवून घेण्यांत येऊं शकते. शिवाय वर्कर्स कलेक्टिव्हजसारखा व्होटर्स मीटिंगच्या बाबत सुद्धा नियम असा आहे की, कॉम्यूनमध्ये, किंवा जिल्ह्यांत कांहीहि महत्त्वाचा फेरबदल करावयाचा असला तरी प्रथम व्होटर्स मीटिंगचें म्हणणें त्या बदलाबाबत काय आहे तें पाहावें लागतें. एवढेंच नव्हें तर त्या फेरबदलाबाबत व्होटर्स मीटिंगच्या ज्या महत्त्वाच्या सूचना असतील त्या सर्व सूचनांचा विचार पीपल्स कमिटीनें केलाच पाहिजे. व ती जो कांही निर्णय घेईल तो निर्णय व्होटर्स मीटिंगला कळविला पाहिजे. विशेषत:

कॉम्यूनचें बजेट, ज्याला सोशल प्लॅन म्हणतात त्यांतील महत्त्वाचे बदल आगाऊ व्होटर्स मीटिंगपुढे ठेऊन त्यावर तिचें काय म्हणणें आहे तें संकलित करून मग तो सोशल प्लॅन पीपल्स कमिटीपुढे मांडण्यांत येतो.

याशिवाय महत्त्वाच्या प्रश्नांवर रेफरेंडम म्हणजे सार्वमत मिळविण्याचाहि अधिकार या व्होटर्स मीटिंगला आहे. परंतु हें क्वचितच घडतें. सध्या युगोस्लावियांत व्होटर्स मीटिंग्ज ह्या नेहमी भरतात आणि वस्तुस्थितींत त्यांचा उपयोग जनता व तिचे प्रतिनिधि यांचे संबंध निगडित करण्यांत होतो. त्यांच्या द्वारा लोकांच्या तक्रारी व अडचणी तर नजरेला येतातच, पण त्याहिपेक्षा त्यांचा उपयोग लोकशिक्षण व प्रत्यक्ष लोकशाही (डायरेक्ट डेमॉक्रसी) वाढविण्याकडे जास्तींत जास्त होतो.

युगोस्लावियाबाबत जे दोन तीन प्रश्न वारंवार विचारण्यांत येतात त्यांचा उल्लेख करून हें प्रकरण संपवितों. इथे हें लक्षांत ठेवलें पाहिजे की, प्रश्नांचीं उत्तरें ढोबळ मानाने देण्यांत येत आहेत. केवळ ६ आठवड्यांच्या वास्तव्यांत ज्या गोष्टी लक्षांत आल्या त्यांच्याच आधारावर हीं उत्तरें देण्यांत येत आहेत. त्यांनी संपूर्ण समाधान न झाल्यास त्या प्रश्नांचा खोल अभ्यास करण्याची जरूरी आहे असें समजावें.

पहिला प्रश्न असा की, योजनाबद्ध नियोजनांत खुला व्यापार बसतो कसा ? खुल्या व्यापारांत किमतींत चढउतार होत नाही काय ? तो होत असल्यास मग योजनेचें काय होतें ? हा प्रश्न अत्यंत महत्त्वाचा आहे व याचा जास्त अभ्यास होणें जरूरीचें आहे. सुरवातीला, युगोस्लावियन लोक या प्रश्नांचें काय उत्तर देतात तें समजून घेतलें पाहिजे. पहिली गोष्ट ही की, त्यांचें योजनाबद्ध नियोजन सुरवातीप्रमाणे संपूर्ण नियोजन नाही. सुरवातीला प्रत्येक उद्योगाचें संपूर्ण नियोजन होतें. त्याला लागणारा कच्चा माल पुरविणें व मजुरांची संख्या, त्यांचे पगार, उत्पादनाची मर्यादा, त्याच्या किमती इत्यादि सर्व फेडरल प्लॅनिंग कमिशनमार्फत ठरविण्यांत येत होतें. आज तसें होत नाही. आजचें फेडरल सरकार प्रत्येक वर्षी नियोजनाचीं मूलभूत अंगेंच ठरवितें. त्याला बेसिक प्रपोर्शन्स म्हणतात. म्हणजे राष्ट्राच्या सर्वसाधारण दृष्टीने विचार करून, उत्पादनाचा कोणता हिस्सा खर्चाकरिता (कंझम्शनकरिता) कोणता हिस्सा 'कॅपिटल इन्व्हेस्टमेंट' करिता, कोणता हिस्सा सोशल सर्व्हिसेसकरिता व कोणता हिस्सा डिप्रिसियेशनकरिता खर्च करावा हें ठरवितात. हें स्थूल प्लॅनिंग झालें. याच पायावर, डिप्रिसियेशन किती असावें, फिक्स्ड कॅपिटलवर व वर्किंग कॅपिटलवर व्याजाचा दर किती असावा, इन्कमटॅक्सचा दर काय, टर्न ओव्हर टॅक्स किती, या बाबी फेडरल सरकार दरवर्षी ठरवितें. या मूलभूत पायावर लोकराज्य, कॉम्यून व सर्व एंटरप्राइजेस आपापल्या योजना बनवितात. या विस्तारावर फेडरल

सरकारचें कायदेशीर रीत्या कांही नियंत्रण नसतें. परंतु लोकराज्यांतील नियोजन समितीचे अध्यक्ष संघराज्यांतील नियोजन बोर्डावर असल्यामुळे योजनांमध्ये बराचसा एकसूत्रीपणा येतो.

बऱ्याचशा मालांचे भाव खुल्या बाजारांतच ठरतात. तें लक्षांत घेऊन प्रत्येक एंटरप्राइज आपापली योजना बनवितें. त्यामुळे अर्थातच् उत्पादनक्षमता वाढते. व उत्पादनांत जास्त वास्तवता येते. परंतु वस्तूंचे भाव एका विशिष्ट मर्यादेच्या आंत राहावे याबद्दल सरकार नेहमी दक्ष असतें. कांही मर्यादांच्या बाहेर भाव वाढवितां येत नाहीत. त्याकरिता परवानगी घ्यावी लागते. इथे हाहि एक मुद्दा लक्षांत ठेवण्यासारखा आहे की, भाववाढ ही भांडवलवादी देशांत पुष्कळदा जास्त नफा मिळविण्याच्या उद्देशाने होत असते. बाजार खुला असला व व्यापार करण्याला भांडवल असलें तर हें असें व्हावयाचेंच. युगोस्लावियांत असें खुलें भांडवल नाही. सर्व भांडवल बँकांच्या स्वाधीन् असतें व अशा कामाकरिता तें मिळत नसल्यामुळे भाववाढीचें हें एक कारण तिथे अजीबात राहिलें नाही. बाजारांतील कमी जास्त मागणी किंवा पुरवठा यांवरच भाव अवलंबून राहणार. त्याबावत कोऑपरेटिव्हजचा बराचसा हिस्सा असल्यामुळे मागणीनुसार पुरवठा राहील अशी व्यवस्था करणें सोपें जातें. जो माल उत्पादनाकरिता महत्त्वाचा आहे परंतु ज्याची देशांत उणीव आहे अशा मालाचें भावनियंत्रण व पुरवठानियंत्रण होत असतें. व तयार मालाला बाजारभावाप्रमाणे आपली किंमत मिळवतां येते. कच्च्या मालांच्या किंमती किंवा जीवनाला लागणारा खर्च हा मागील ६–७ वर्षांत साधारण स्थिर आहे व त्यांत फार फरक दिसत नाही. यावरून या बाबतींत युगोस्लाव सरकारला किती यश मिळालें याची कल्पना येईल.

दुसरा प्रश्न असा की, परदेशी व्यापार युगोस्लावियांत कसा चालतो? यांतहि खुल्या बाजाराचें तत्त्व अमलांत आणलें जातें काय? या प्रश्नाचें उत्तर स्थूल मानानें असें देतां येईल की, यांतहि खुल्या बाजाराचें तत्त्व अमलांत येतें. निरनिराळ्या वस्तूंत परदेशाशीं व्यापार करणारे एंटरप्राइजेस आहेत. त्या सर्वांची एक संघटना असते. ह्या संघटनेच्या शाखा लोकराज्याच्या (रिपब्लिकच्या) स्तरावर सुद्धा असतात. परदेशी व्यापार सर्व 'दि बँक ऑफ फॉरिन ट्रेड' मार्फत होतो. या बँकेचा परदेशी चलनावर अधिकार आहे व परदेशी व्यापार करणाऱ्या संघटनेमार्फत ती बँक परदेशी चलन वांटत असते. व्यापार करणाऱ्या एंटरप्राइजेसनी जर जास्त नफा मिळविला तर त्यावर कायद्याप्रमाणे संघराज्याचें नियंत्रण असतेंच.

तिसरा प्रश्न असा की, युगोस्लावियांतील कर आकारण्याची (टॅक्सेशनची) पद्धति कशी आहे? मुख्य मुख्य कर कोणते आहेत व त्यांपासून उत्पन्न किती होतें? (१) युगोस्लावियांत मुख्य टॅक्स इन्कमटॅक्स—यापासून १०० बिलियन इतकी

आमदनी होते. सर्व लोकांना हा टॅक्स आपल्या आमदनीच्या प्रमाणांत द्यावा लागतो. परंतु सरकारी नोकरांवर हा टॅक्स आहे किंवा नाही याबद्दल शंका आहे. दोन ठिकाणीं दोन भिन्न भिन्न उत्तरें मिळालीं. तथापि हा कर सरकारी नोकरांनाहि द्यावा लागत असला पाहिजे असें वाटतें. पूर्वी हा टॅक्स प्रोग्रेसिव्ह स्वरूपाचा होता. जास्त पगारवाल्यांवर जास्त टॅक्स असे परंतु आता तो ५००,००० आमदनीपर्यंत एकाच दराने आकारण्यांत येतो. ज्यांची आमदनी ५००,००० च्या वर आहे त्यांना मात्र शेकडा ५ ते ५० या प्रमाणांत एक विशेष कर द्यावा लागतो. जवळ जवळ ४०,००० लोक या श्रेणींत येतात. एकंदर पगार व रोजी मिळविणारे ३,०००,००० लोक आहेत व त्यांना ६०० बिलियन दिनार वर्षाकाठीं मिळतात. (२) शेतकऱ्यांकडून येणारा कर-- पूर्वी सांगितल्याप्रमाणे जरी हा कर प्रोग्रेसिव्ह असला (जास्त जमीन असणारावर जास्त कर असला) तरी आराजी व जमिनीची उत्पादनक्षमता यांच्यावर ठरल्याप्रमाणे दरवर्षी ह्याची आकारणी होते. उत्पन्नाच्या कमीजास्त प्रमाणावर याची आकारणी अवलंबून नाही. साधारणपणे हा उत्पन्नाच्या शेकडा ९ ते २० ह्या प्रमाणांत असतो. यापासून आमदनी ३० बिलियन आहे. (३) लोकल टॅक्सेस---हे कॉम्यून्सकडे असतात. हेहि शेतकऱ्यांवर व हस्तउद्योगांवरच आकारले जातात. पण कोऑपरेटिव्हजवर हे लागत नाहीत. यांपासून आमदनी २२ बिलियन आहे. (४) टर्न ओव्हर टॅक्स---हा निरनिराळ्या वस्तूंवर भिन्न-भिन्न प्रमाणांत लागतो; पण याची व्याप्ति किमतीच्या शेंकडा ५ ते ४० इतक्या प्रमाणांत असते. यापासून आमदनी १८० बिलियन आहे. (५) कॉम्यूनचा टॅक्स---हा टॅक्स चिल्लर व्यापारावर आकारतात व त्याची आमदनी २० बिलियन दिनार आहे. आणि (६) एंटर प्राइज टॅक्स---यापासून १९५९ सालीं २२० बिलियन दिनार आमदनी होते.

शेवटी मागील दहा वर्षांत युगोस्लावियाने केलेल्या प्रगतीचा आढावा खालीलप्रमाणे आहे. औद्योगिक प्रगतीबाबत पूर्वी माहिती दिलीच आहे. मागील दहा वर्षांत औद्योगिक उत्पादन सव्वातीन पटींनी वाढलें आहे. एकंदर राष्ट्राच्या उत्पादनांत उद्योगाचें प्रमाण शेकडा ४५, शेतीचें शेकडा ३० व इतर शेकडा २५ आहे. आहे. शेतीचें उत्पन्न वाढावें तसें वाढलें नाही. पण तें वाढेल अशी उमेद आहे. राष्ट्रीय आमदनीचा $\frac{1}{3}$ हिस्सा दरवर्षी भांडवल (इन्व्हेस्टमेंट) म्हणून लावला जातो. मागील तीन वर्षांत शेंकडा २५ या प्रमाणांत जीवनस्तर वाढला. सध्या भांडवलाचा १५% हिस्सा शेतीसुधारणेकडे व २५% हिस्सा सोशल सर्व्हिसेसवर लावण्यांत येत आहे.

★ ★ ★

# युगोस्लावियासंबंधी कांही विचार : ८

युगोस्लावियांत फिरल्यावर तेथे झपाट्याने प्रगति झाल्याचीं लक्षणें स्पष्टपणे दिसतात. मागील जागतिक युद्धांत त्याचें बरेंच मोठें नुकसान झालें असतांनाहि तो फार त्वरेने वर आला. त्याचें तर असें म्हणणें आहे की, मध्यंतरीं सोव्हियट रशियाशीं जर भांडण झालें नसतें व जुन्या योजना सर्व कार्यान्वित झाल्या असत्या तर आणखीहि प्रगति झाली असती. कांही राष्ट्रांनी आपली प्रगति अशीच फार त्वरेने केली आहे. ह्याचें पश्चिम जर्मनी हें एक मोठें उदाहरण आहे. आज असें म्हणतात की, पश्चिम जर्मनीची परिस्थिति इंग्लंडपेक्षा सुद्धा चांगली आहे. यूरोपमध्ये जर्मन मार्कसारखें स्थिर नाणें दुसरें नाही. पण पश्चिम जर्मनी हें बोलून चालून फार पुढे आलेलें राष्ट्र होतें. युगोस्लाविया हा अगदी मागासलेला देश होता. जवळ जवळ शेकडा ७० लोक जमिनीवर उपजीविका करीत होते. अशा अप्रगत अवस्थेंतून व कांहीशा प्रतिकूल परिस्थितींतून इतक्या त्वरेने या राष्ट्राची प्रगति कशी झाली हाच प्रश्न प्रथम उभा राहतो. तेथील नेत्यांना विचारलें तर ते त्यांची समाजवादी पद्धति व सुरवातीची अत्यंत काटकसरीची राहणी हीं दोन कारणें त्वरित प्रगतीला कारणीभूत झालीं असें सांगतात. आणखी एक कारण असें असावें की, युगोस्लावियामध्ये जुना इंडस्ट्रियल बेस (जुनी औद्योगिक प्रगति) बराच मजबूत असावा. विशेषत: स्लोव्हिनिया व क्रोयेशिया या प्रदेशांत. पण हें मान्य करूनहि युगोस्लावियाची प्रगति इतर बाल्कन राष्ट्रांच्या मानाने बरी आहे ह्याची ग्वाही इतर बाल्कन देशांत जाऊन आलेले लोक देतात. दुसरी डोळ्यांत भरण्यासारखी गोष्ट म्हणजे तेथील शासन ही होय. अमेरिकेची C. A. R. E म्हणून एक संस्था आहे, जिचा उद्देश इतर राष्ट्रांना. गैरसरकारी तऱ्हेने मदत द्यावयाची हा आहे. आम्ही बेलग्रेडला तेथील C. A. R. E च्या प्रमुखांना भेटलों. त्यांनी अशी स्पष्ट कबूली दिली की, आम्हीं पाठविलेला सर्व माल युगोस्लावियामध्ये ज्यांना मिळावयाला पाहिजे होता त्यांनाच मिळाला. या बाबतींत आमची इतकी पक्की खात्री झाली आहे की आता आम्हाला त्याविषयी देखरेखीची कांही जरूरी वाटत नाही. व याचें मुख्य कारण म्हणजे त्यांची प्रभावी शासनसंस्था. याचा अनुभव आम्हाला युगोस्लावियांत ठिकठिकाणीं आला. जेवढ्या सरकारी नोकरांशीं आमचा संबंध आला तेवढ्यांचीहि छाप आमच्यावर फारच चांगली पडली. फक्त

एकच अपवाद आम्हाला मिळाला. या सर्व वर्गांत आपल्या राष्ट्राला शक्य तेवढ्या लवकर वर आणण्याची दुर्दम्य इच्छा दिसली. समाजवादावर त्यांचा मोठा विश्वास दिसला. तिसरी बाब म्हणजे युगोस्लावियांतील शेतकरीवर्ग. आज व्यक्तिगत शेतकऱ्यांजवळ जी जमीन आहे तिचें प्रमाण खलीलप्रमाणे आहे.

| | होल्डिंगची संख्या | क्षेत्रफळ (१००० हेक्टरांत) |
|---|---|---|
| २ एकरांच्या खाली | ४९८,६२० | ८३१ |
| २–५ एकरांपर्यंत | ९३३,९३६ | ३,३२२ |
| ५–८ ,, | ३८५,२२९ | २,५२६ |
| ८ एकरांच्या वर | ३१७,६१० | ४,२५५ |

यावरून असें दिसेल की, ¾ शेतकऱ्यांजवळ ५ हेक्टरांपेक्षा कमी जमीन आहे. बऱ्याच लोकांजवळ तर दोन हेक्टरांपेक्षाहि कमी जमीन आहे. यांची स्थिति बरीच खालावलेली आहे. जमिनीच्या उत्पादनाचा प्रश्न अजून युगोस्लावियाने सोडविलेला नाही. पण तो सुटेल अशी त्याला आशा वाटते. म्हणजे उत्पादन वाढेल व धान्य बाहेरून आणावें लागणार नाही. परंतु लहान शेतकऱ्यांची स्थिति त्यामुळे सुधारेलच असें कांही सांगतां येत नाही. सध्याच सहकारी शेतीची संभावना नाही. याशिवाय आतापर्यंतची प्रगति बहुसंख्य शेतकऱ्यांच्या जास्त त्यागावर आधारलेली होती. युगोस्लावियांतील राष्ट्रीय विकासाकरिता शेतकऱ्याला औद्योगिक क्षेत्रांतील कामकऱ्यांपेक्षा जास्त त्याग सहन करावा लागला. पूर्वीपेक्षा आज परिस्थिति बरी आहे, परंतु मूळ परिस्थिति बदलली असें अजून म्हणतां येत नाही.

युगोस्लावियांत भिन्न भिन्न सामाजिक स्तरांतील आर्थिक विषमता १० पटींची आहे. राजकीय क्षेत्र जर सोडलें तर ही विषमता ६ पटींची येईल. परंतु हा फरक वाढेल अशीं लक्षणें दिसतात. मार्क्सवादाच्या विकासांत युगोस्लावियाने खरी प्रगति केली आहे. तेथील वर्कर्स मॅनेजमेंट व ठिकठिकाणीं स्थानिक संघटनांच्या द्वारे चालणारीं कामें ही युगोस्लावियाची विशेषता आहे. पार्टी व शासन यांच्या विघटनाबद्दल सुद्धा युगोस्लावियाने बरीच प्रगति केली आहे. पक्षरहित लोकशाहीकडे अजून प्रत्यक्ष तो जरी पाऊल टाकूं शकत नसला तरी त्याच्या तत्त्वज्ञानाप्रमाणे अपक्ष लोकशाहीकडे प्रगति करण्याचा त्याचा प्रामाणिक प्रयत्न आहे. त्याने आपल्या शासनाला कसलाहि धक्का न पोहोचूं देतां विकेंद्रीकरण साधलें आहे. यामुळे उत्पादनवाढ झाली आहे असें म्हणण्याला जरी पुरावा नसला तरी तसें झालें असावें असें मानण्यास कांही हरकत नाही. फार मोठ्या प्रमाणांत जनतेला शासनसंस्थांमध्ये गोवलें आहे. युगोस्लावियापासून हिंदुस्थान काय घेऊं शकतो याचा विचार पुढे करूं.

युगोस्लावियामध्ये जर तुम्ही कुठेहि पगारी नोकर असलांत तर तुम्हांला पूर्णपणे सामाजिक संरक्षण राहील. आजारी झाल्यास सर्व तऱ्हेच्या औषधपाण्याची फुकट सोय, शिवाय हॉस्पिटमध्ये प्रवेश, आजारी असलेल्या वेळेचा पगार, मुलांचा (चिल्ड्रन्स) अलाउंस, काम करीत असतां इजा झाल्यास त्याबद्दल मोबदला, इनव्हॅलिड पेंशन, ओल्ड एज पेंशन, अकाली मृत्यु आल्यास कुटुंबाला पेंशन इत्यादि सर्व सोयी मिळतील. पस्तीस वर्षे काम केल्यावर ५५ व्या वर्षी जितका शेवटला पगार होता तेवढेंच पेंशन मरेपर्यंत मिळतें. स्त्रियांना तें ५० व्या वर्षी मिळतें. तुम्ही कुणालाहि खाजगी नोकर म्हणून ठेवलें तर त्याच्या पगाराचा शेंकडा ३० हा भाग सोशल इंशुअरन्स म्हणून तुम्हांलाच भरावा लागतो. त्यामुळे पतिपत्नीला दोघांनाहि काम करावें लागतें, त्याशिवाय खाजगी नोकर ठेवणें अशक्यच असतें.

युगोस्लावियांत संपूर्णपणे कायद्याचें राज्य (रूल ऑफ लॉ) आहे. इतर कॉम्युनिस्ट देशांत न्याय देणारी संस्था जशी एक्झिक्युटिव्हच्या खाली असते तसें येथे नाही. त्यामुळे वकीलवर्गाचें चांगलेंच चालतें. व्यक्तीला विशिष्ट मर्यादेपर्यंत जमीन, घर, इत्यादि संपत्ति व्यक्तिगत मालकीची म्हणून ठेवतां येत असल्यामुळे कायद्याचीं कामेंहि बरींच असतात. म्हणून वकीलवर्गाची आमदनी चांगली आहे. परंतु आजची परिस्थिति आरंभापासून तशी होती असें समजूं नये. सुरवातीला कॉम्युनिस्ट सरकारने कोर्टाची जुनी पद्धति मोडून पोपल्स कोर्टाची नवी पद्धति आणली. त्या पद्धतीप्रमाणे पोलिसांना अटक व शिक्षा करण्याची फार मोठी सवलत होती. पण १९५१ नंतर हळूहळू सर्व बदलत गेलें. १९५१ व १९५२ सालीं नवीन कायदे होऊन सरकारच्या अन्यायी कृत्यांबद्दल जनतेला अपील करण्याचे अधिकार मिळाले. १९५२ सालापूर्वी ज्या खात्याविरुद्ध तुमची तक्रार असेल त्या खात्याकडेच तुमचें अपील असे. पण १९५२ सालापासून हें काम कोर्टाकडे आलें. आता एक फेडरल सुप्रीम कोर्ट व त्याखाली प्रत्येक लोकराज्यांत रिपब्लिक सुप्रीम कोर्ट आणि त्याखाली रीजनल व डिस्ट्रिक्ट कोर्ट्स् आहेत. याशिवाय घटनात्मक बाबींकरिता एक कॉंस्टिटयूशन कोर्ट कायम करण्याचाहि सरकारचा विचार आहे. वर्कर्स मॅनेजमेंट वगैरे नवीन पद्धति कायद्यानेच अंमलांत आल्यामुळे कोर्टांत कायद्याचें काम बरेंच असतें.

आर्थिक (एकॉनॉमिक) व फौजी (मिलिटरी) बाबींकरिता वेगळें कोर्ट असतें. पण हीं सर्व फेडरल सुप्रीम कोर्टाखाली येतात. न्यायदानाच्या पद्धतींत एक जज्ज व त्याला मदत करण्याकरिता दोन जज्ज ज्यूरर्स नेमतात.


युगोस्लावियांत नवीन उद्योग सुरू करावयाचा झाल्यास किंवा जुना उद्योग वाढवावयाचा असल्यास त्यांत पुढाकार कॉम्यूनच घेतें. कॉम्यूनला याकरिता जें कर्ज लागतें त्याबद्दल सिक्युरिटी व गॅरंटी द्यावी लागते. मोठ्या उद्योगाबाबत

रिपब्लिकला व फेडरेशनला तेंच करावें लागतें. व कर्जाकरिता असे पुष्कळ अर्ज जेव्हा येतात तेव्हा त्यांत निवड करतांना जास्तींत जास्त फायद्याच्या दृष्टीने निवड करण्यांत येते. फेडरल प्लॅनच्या अनुसार, शेती, उद्योग सोशल सर्व्हिसेस व्यापार, इत्यादिकांवर इन्व्हेस्टमेंट करावयाची हें ठरल्यावर प्रत्येक क्षेत्रांत कोणत्या योजनेवर किती खर्च करावयाचा हें सर्वस्वी त्या योजनेच्या उत्पादनक्षमतेवर व फायद्यावर अवलंबून आहे.

अशा तऱ्हेने आज युगोस्लावियांत कांही सोशालिस्ट, कांही पुंजीवादी, कांही लोकशाहीचीं व कांही हुकुमशाहीचीं अशीं निरनिराळीं अंगें आहेत. युगोस्लावियाचे नेते तात्त्विक भानगडींत विशेष पडत नाहीत. पुढे दिसेल त्या अडचणींतून मार्ग काढणें ह्या धोपट मार्गानेच हा देश आज पुढे जात आहे. त्यामुळे दोन्ही पद्धतीचे फायदे त्याला मिळतात व दोन्ही पद्धतीचे दोष तो टाळूं शकतो. अर्थात् याच्या उलटहि होऊं शकतें. म्हणून दोन्ही पद्धतीचे दोष तेवढे नेमके पदरांत पडून लाभापासून वंचित राहणें शक्य आहे. परंतु तात्त्विक विचाराला जर फार बळकटपणें धरून ठेवण्याची वृत्ति सोडली व खरी अडचण काय हें जाणून ती दूर करण्याचा क्रम चालू ठेवला तर त्याचा परिणाम लाभांतच होतो, असा साधारण नियम आहे. व तो युगोस्लावियाला पूर्णपणे लागू आहे. तत्त्व हें सुद्धा मानवाच्या सुखाकरिताच आहे. व जर अनुभवांतीं असें दृष्टीस आलें, की तत्त्वाचें आचरण करीत असतांना मनुष्याला अडचणी जास्त निर्माण होतात तर मग त्या मार्गाने न जातां त्यांत बदल करणें हें ओघानेच येतें. युगोस्लावियाची अशीच परिस्थिति आहे. तो अस्सल सोशालिस्ट वृत्तीचा आहे यांत शंका नाही. परंतु मार्क्सिझम्चे जे जनस्वातंत्र्यविरोधी परिणाम रशियांत व इतर देशांत झाले ते तो टाळूं इच्छितो. व त्याप्रमाणे वागण्याचा त्याचा प्रामाणिक प्रयत्न सुरू आहे. अशा परिस्थितींत कांही समाजवादाच्या व कांही लोकशाहीच्या कल्पनांची भेसळ होणें स्वाभाविक आहे. प्रश्न हा आहे की, या भेसळीपासून तेथील समाजाला उत्तरोत्तर स्वातंत्र्य व सुख मिळेल की नाही ? या प्रश्नाचें उत्तर एकमुखाने अस्तिपक्षींच द्यावें लागेल यांत बिलकुल शंका नाही. या दृष्टीने युगोस्लावियांतील वर्कर्स मॅनेजमेंट व त्यांची कॉम्यून्ची पद्धति या दोन बाबी कोणत्याहि वर्धिष्णु राष्ट्राला लागूं शकतील. व हिंदुस्थानलाहि त्याच दृष्टीने विचार करतां येईल.

★ ★ ★

# इस्राईल


लॅबॅनॉन
सिरिया
गॅलिली
अफुल
बैसान
तेल अविव
जाफ्फा
रेहावॉट
जेरुसलेम
गाझा
बीर शेबा
सोदोम
बीर अस्लुज
औजा
नेजेब
इस्राएल

# इस्राइलची समाजव्यवस्था : ९

शोषणरहित समाजरचनेच्या दृष्टीने इस्राईल देशाची समाजरचना अभ्यास करण्यासारखी आहे. याबाबत थोडीशी माहिती यापूर्वी आलेलीच आहे. पगारी लोकांच्या किंवा रोजमजुरी करणाऱ्या लोकांच्या मिळकतींत अंतर ४ पटीचें आहे व टॅक्स इत्यादि वजा केल्यास तें अंतर ३ पटीचेंच येईल. एकंदर उत्पादनाचा ७० टक्के हिस्सा मजूर-संघटनेच्या व सहकारी संस्थांच्या हातीं असल्यामुळे हें प्रमाण किती व्यापक क्षेत्राला लागू आहे याची कल्पना येईल. या देशांत एका जुन्या शेतकऱ्याचें केवळ स्वतःच्या व कुटुंबियांच्या श्रमावर काढलेलें उत्पन्न, सरकारी नोकरींत मिळणाऱ्या जास्तींत जास्त पगारपेक्षा जास्त आहे असें म्हटल्यावर, या देशांत कोणत्याहि धंद्यांत उत्पन्नवाढीला किती वाव आहे याची कल्पना येईल. केवळ शारीरिक मेहनत करणाऱ्या मजुराला (अन्स्किल्ड लेबरला) देखील रोज ६ ते ७ इस्रायली पाउंड मिळतात ( १ इस्रायली पाउंड=२.७५ रुपये ) व सरकारी नोकरींत कमींत कमी १६९.४० व जास्तींत जास्त ७५४.६० हें पगाराचें प्रमाण असतें. एवढी समानता कोणत्याहि समाजवादी राष्ट्रांत सुद्धा दिसणार नाही अशी माझी कल्पना आहे. अर्थात् या देशांत मिश्र अर्थव्यवस्था ( मिक्सड एकॉनमी ) आहे. आपल्या संपत्तीच्या भरवशावर कोणताहि धंदा करण्याची तुम्हांला मुभा आहे. गुंतविलेल्या संपत्तीवर व्याज, डिव्हिडंड इत्यादि मिळतात. या देशांत व्याजाचा दर तसा जास्तच आहे. परंतु कोणत्याहि धंद्यांत नोकर ठेवावयाचा झाल्यास त्याची, युगोस्लावियाप्रमाणे सामाजिक स्थैर्याच्या (सोशल सिक्युरिटीच्या) दृष्टीनें आजारीपणा, बेकारी, म्हातारपणा, मुलांची सोय, इत्यादींकरिता पगाराशिवाय आणखी सोय मालकाला करावी लागते. त्यामुळे शोषणाला आळा बसतो. अर्थात् संपत्तिवंतांच्या मिळकतीवर त्यामुळे प्रत्यक्ष नियंत्रण होत नाही. पण अशा लोकांची संख्या फारच थोडी आहे.

आश्चर्याची गोष्ट ही की, एवढी समानता असून सुद्धा इस्राईल हें एक लोकशाहीप्रधान राष्ट्र आहे. विचार, आचार व प्रचार ह्यांचें तेथे संपूर्ण स्वातंत्र्य आहे. ७-८ राजकीय पक्ष आहेत. निवडणुका मोठ्या चुरशीच्या होतात. स्वातंत्र्य किंवा समानता असा विकल्प आज जगापुढे आहे. स्वातंत्र्य पाहिजे असल्यास समानतेचा

बळि द्यावा, किंवा समानता पाहिजे असल्यास स्वातंत्र्याचा बळि द्यावा असा जो पर्याय आज सर्वसाधारणपणे जगांत दिसतो, त्याला इझ्राईल हा खचित अपवाद आहे. आपल्या आर्थिक व सामाजिक रचनेंतून इझ्राईल हा जगाला असें ओरडून सांगत आहे की, स्वातंत्र्य व समानता यांची जोडी साधणें शक्य आहे. अर्थात् कांही बाबतींत इझ्राईल देशाची परिस्थिति अपवादात्मकच समजली पाहिजे. शोषणावर आधारलेली अशी समाजाची जुनी घडी बदलवून इझ्राईल राष्ट्राने समानतेवर आधारलेली नवी घडी तिच्या जागीं बसविली नाही. तसें असतें तर असें परिवर्तन घडवून आणूं इच्छिणाऱ्या सर्व राष्ट्रांना इझ्राईलचा इतिहास हा कित्यासारखा झाला असता. पण इझ्राईल हें बाहेरून येणाऱ्या ज्यू लोकांनी वसविलेलें राष्ट्र आहे. व बाहेरून येणारे लोक हे बहुतेक अकिंचन परिस्थितींतच आले असल्यामुळे देशाच्या समाजरचनेंत त्यांना एका विशिष्ट धोरणाने वसविणें सोपें गेलें. त्याबरोबरच जगांतील ज्यू लोकांनी या नवीन राष्ट्राला ज्या आपुलकीच्या भावनेने मदत केली व अत्यंत उदार हस्ताने या राष्ट्राच्या विकासाकरिता धन पाठविलें, त्यामुळेहि ज्यू लोकांना इतक्या उंच स्तराच्या जीवनमानावर वसविणें शक्य झालें. परंतु या दोन्ही गोष्टी मान्य केल्यावर आर्थिक समानतेच्या आदर्शावर लोकशाहीचा मार्ग न सोडतां उभारलेल्या समाज-रचनेबद्दल तें राष्ट्र आदरालाच पात्र आहे. असें सांगतात की, सुरवातीला तर ही समानतेची व आदर्शाची भूमिका फारच मोठी होती. त्यांच्या मजुरांच्या संस्थेला हिस्ताद्रुत म्हणतात. सुरवातीला या संस्थेंत काम करणाऱ्यांना त्यांच्या गरजेनुसार वेतन मिळत असे. याचा परिणाम असा होत असे की, संस्थेच्या चालकांना जर कमी मुलें असलीं व चपराश्याला जास्त मुलें असलीं तर चालकापेक्षा चपराश्याला जास्त वेतन मिळत असे. कांही वर्षांपूर्वीच या पद्धतींत बदल करण्यांत आला व सध्या हिस्ताद्रुतमध्येहि इतर सरकारी दफ्तरांप्रमाणे वेतनश्रेण्या कायम करण्यांत आल्या आहेत.

एवढ्या कमी फरकांत येथील समाजव्यवस्था कशी चालते ही एक आश्चर्य करण्यासारखी बाब आहे. इझ्राईल देशांत इतर कांही संस्था अशाच आश्चर्य करण्यासारख्या आहेत. त्यांचें वर्णन ओघाने येईलच. परंतु तरुण वर्गांत अशी एक भावना आज इझ्राईलमध्ये सुद्धा आहे की, हा मिळकतींतील फरक फार कमी आहे. तो वाढावा ही त्यांची इच्छाहि आहे. हीच परिस्थिति नेमकी युगोस्लावियांत आहे व तेथील नेत्यांचा विचार मिळकतींतील फरक वाढविण्याचा आहे. इझ्राईल-मध्ये मात्र तसें नाही. अशी ही मागणी आहे हें तेथील नेते मान्य करतात. परंतु आम्ही हा फरक वाढविणार नाही व मागणी करणारांची आम्ही समजूत घालूं अशी इझ्राईलच्या नेत्यांची वृत्ति आहे. हा फरक कां ? समाजवादी समाजरचनेचा पुरस्कार करणारा देश मिळकतींतील फरक वाढवितो व पुंजीवादी

समाजरचना मान्य करणारा देश मिळकतींतील फरक वाढवूं नये या मताचा आहे हें कसें? याचें उत्तर असें आहे की, इस्राईलमध्ये आज जे पुढारी लोक अधिकारावर आहेत त्यांपैकी बहुतेकांनी आपलें इस्राईमधील जीवन, शेतावर मजुरीचें काम करण्यापासून सुरू केलेलें आहे. या त्यांच्या श्रमिक जीवनाचा परिणाम त्यांच्या विचारावर इतका पक्का झाला आहे की, त्यांच्याकडून आर्थिक असमानतेला पोषक अशीं पावलें पडतील असें वाटत नाही. याउलट श्रमिक जीवनाचा प्रत्यक्ष अनुभव नसला तर समाजावादी समाजरचनेचा आदर्श मानणारे लोक सुद्धा विपरीत करणी करूं शकतात हा बऱ्याच समाजवादी राष्ट्रांचा अनुभव आहे. यावरून हा निष्कर्ष काढतां येईल की, शोषणरहित समाजाकडे प्रगति करीत असतां आर्थिक असमानतेकडे नेणाऱ्या मानवाच्या स्वाभाविक प्रवृत्तींशीं सारखें झगडावें लागेल. व शासनसंस्थेची गरज, जोंपर्यंत मानवांत अशी प्रवृत्ति आहे तोंपर्यंत राहीलच. मानवाची ही प्रवृत्ति कायमची राहील काय? याबाबत कोणतेंहि भविष्य वर्तविणें कठिण आहे. आधुनिक समाजवादाची मात्र अशी भूमिका दिसते की, ज्या प्रमाणांत उत्पादन वाढेल व लोकांच्या गरजा पूर्ण होतील त्या प्रमाणांत ही प्रवृत्ति कमी होईल. ‘न जातु कामः कामानां उपभोगेत शाम्यति’ हें तत्त्वच जणू त्यांना मान्य नाही. उत्पादनाच्या प्रचुरतेनें मानवाची संग्रही वृत्ति कमी कमी होऊन तिला पूर्ण आळा बसेल किंवा परिस्थितिहि आजच्या सारखीच राहील व त्या वृत्तीवर नियंत्रण ठेवण्याकरिता शासन-संस्था कायमची लागेल या प्रश्नाचें उत्तर भविष्यांतील इतिहासच देऊं शकेल. एवढें मात्र स्पष्ट वाटतें की, ज्या प्रमाणांत मानवाचें जीवन कुटुंबसंस्थेच्या मर्यादा उल्लंघून सामुदायिकतेकडे जाईल, त्या प्रमाणांत ही वृत्ति कमी होत जाईल. व्यक्तिगत जीवनाची प्रवृत्ति स्वार्थाकडे जास्त असते. सामुदायिक जीवनांतून ती प्रवृत्ति कमी होते. सामुदायिक उत्पादन सामुदायिक जीवनाचाच एक भाग आहे. त्यामुळे ज्या प्रमाणांत सामुदायिक उत्पादन होईल त्या प्रमाणांत स्वार्थवृत्तीवर नियंत्रण राहील. या दृष्टीने युगोस्लावियाने वर्कर्स 'मॅनेजमेंटच्या पद्धतीचा स्वीकार केला असें दिसतें. सामुदायिक जीवनाच्या पुष्कळ तऱ्हा आहेत. परंतु आदर्श समाजरचनेंत सामुदायिक जीवन कसें असेल? ‘प्रत्येकाने आपल्या शक्तीप्रमाणे काम करावें व गरजेप्रमाणे दाम घ्यावे’ या आदर्श परिस्थितींत समाजजीवन कसें राहील? याची थोडीशी चुणूक इस्राईलच्या ‘किबुत्झ’ नांवाच्या संस्थेंत दिसते. पण तिचें वर्णन करण्यापूर्वी ज्यू लोकांचा थोडासा अितिहास पाहिला पाहिजे.

★ ★ ★

# ज्यू लोकांचा इतिहास : १०

ज्यू लोकांचा इतिहास कांही विशेष घटनांनी भरलेला आहे. ज्यू राष्ट्राचा इतिहास इसवीसनापूर्वी १३५० पासून उपलब्ध आहे. जगाच्या पाठीवर असें दुसरें कोणतेंहि राष्ट्र दिसत नाही की, जें एवढें जुनें आहे व जें एवढें नवें आहे ! रोमन साम्राज्याच्या काळांत दुसऱ्या शतकानंतर जगाच्या इतिहासांतून हें राष्ट्र जें एकदा लोपलें, तें पुन्हा सरासरी दोन हजार वर्षांनंतर म्हणजे १९४८ सालीं जन्माला आलें. रोमन लोकांच्या सत्तेविरुद्ध अनेकदा ज्यूंनी उठाव केले. परंतु शेवटी त्यांना आपली मायभूमि म्हणजे आजचा पॅलेस्टाईन देश सोडावा लागला. हा देश सोडून हे ज्यू जगभर भटकले व निरनिराळ्या देशांत स्थायिक झाले. जिथेजिथे ते स्थायिक झाले तिथेतिथे पुष्कळ धंद्यांत त्यांनी नांवलौकिक मिळवला. जगांतील कांही प्रमुख श्रीमंत जमातींत ज्यू लोकांचें स्थान आहे. पैशाचे लोभी व व्याज घेणारे म्हणून ज्यू लोकांची अपकीर्ति पुष्कळ देशांत आहे. परंतु जगांतील मोठमोठे शास्त्रवेत्ते सुद्धा बरेचसे ज्यू होते. आइनस्टाईन, हाबर, वाईसमॅन, कार्ल मार्क्स अशीं बरींच नांवें घेतां येतील. ज्या देशांत ते स्थायिक झाले त्या देशाचे ते नागरिक बनले. परंतु स्वतःचें भिन्नत्व ते विसरले नाहीत व त्या देशांतील लोकांशीं एकरूप होऊं शकले नाहीत. त्यांचा धर्म निराळा, त्यांचा राहण्याचा मोहल्ला निराळा व त्यांच्या प्रार्थनेच्या जागा निराळ्या. आणि आपल्या धर्मांतच लग्न करण्याचा दंडक फार कटाक्षाने ते पाळत असल्याकारणामुळे हे ज्यू लोक जरी निरनिराळ्या देशाचे नागरिक होते तरी जगांतील सर्व ज्यू एक आहेत ही त्यांची भावना जाऊं शकली नाही. आणि म्हणूनच ज्या देशांत ते स्थायिक झाले त्या देशांचे ते पूर्णत्वाने नागरिक बनूं शकले नाहीत व कदाचित् यामुळेच त्यांना तसें वागविण्यांतहि येत नसावें. त्यांच्या प्रार्थनेंत पुन्हा आपल्या मूळच्या देशांत नेण्याकरिता प्रेषित येईल असें वचन असे व त्या घटनेकडे त्यांचें स्वाभाविकच लक्ष लागलें होतें. त्यामुळे मुसलमानांच्या मक्का-मदिनेसारखें पॅलेस्टाईन हें ज्यू लोकांचें एक श्रद्धास्थान बनलें होतें. त्यांची पितृभू व पुण्यभूहि पॅलेस्टाईन. म्हणून स्वाभाविकपणेच आपल्या स्थायी देशाविषयी त्यांच्या भावना त्या देशाच्या इतर नागरिकांपेक्षा भिन्नच राहणार. व सर्वसाधारणपणे त्या देशांतील लोकहि त्यांना तसेच वागवीत.

या प्रवृत्तीला 'अॅन्टी सेमेटिक' (ज्यू लोक सेमिटिक वंशाचे आहेत) असें म्हणतात. याला एक कारण हेंहि की, बायबलप्रमाणे जीसस ख्राइस्टला क्रुसावर चढविण्यांत आलें त्यांचें एक कारण म्हणजे जूडास नांवाच्या त्याच्या ज्यू शिष्याने त्याच्याशीं दगलबाजी केली. त्यामुळे सर्व ख्रिश्चन लोकांत ज्यू लोकांविषयी एक प्रकारचा तिरस्कार व द्वेष भरलेला आहे.

जसजसा मनुष्याच्या मनाचा व देशाचा विकास व्हावयाला लागला तसतसें हें भिन्नत्व कांही देशांत तरी कमी व्हावयाला लागलें. पण कांही देशांत तें तसेंच राहिलें व हिटलरच्या काळांत जर्मनी व पोलंड ह्या देशांत तर त्याचा अतिरेक झाला. इस्राईलमधील ज्यू लोकांच्या तर्काप्रमाणे मागील लढाईच्या काळांत एकंदर ६० लक्ष ज्यू लोक हिटलरने मारले. जगांत एकंदर १६० ते १८० लक्ष ज्यू लोक आहेत. इस्राईलमध्ये केवळ २० लक्ष ज्यू आहेत. यावरून या संहाराची थोडी कल्पना येईल. जेरुसेलमध्ये अेका मोठ्या संग्रहालयांत या सर्व संहाराची माहिती ठेवलेली आहे. आमच्या अमक्याअमक्याचें काय झालें अशी विचारणा वारंवार होते म्हणून या सर्व लोकांची सविस्तर माहिती न्यूरेमबर्गच्या खटल्यांत बाहेर आली त्याप्रमाणे ती संकलित करून ठेवली आहे. 'अ' पासून 'ज्ञ' पर्यंतच्या प्रत्येक कामास आलेल्या मनुष्याचा इतिहास त्यांनी जपून ठेवला आहे. आजकालच्या यूरोपच्या व अमेरिकेच्या प्रगत परिस्थितींत सुद्धा ही अॅन्टिसेमेटिक भावना पुष्कळदा उसळी खाते अशी ज्यू लोकांची तक्रार आहे. अनेक वर्षांच्या हालअपेष्टांतून दिवस काढल्यामुळे याबाबत त्यांची वृत्तिहि फार संवेदनशील झालेली आहे. थोडेंसें कुठे कांही ज्यू लोकांविरुद्ध झालें की, त्यांत त्यांना या भावनेचा वास येतो. अशी यांची कांहीशी न्यूनगंडात्मक प्रवृत्ति झालेली आहे.

परंतु इतिहासांत असे कांही दाखले दिसत नाहीत की, ज्या देशांत ते राहिले त्या देशांशीं ते बेइमान झाले किंवा संकटकाळीं त्यांना त्यांनी सोडलें. त्या देशांशीं ते प्रामाणिकच राहिले. त्याकरिता ते लढले व त्यांनी प्राणहि अर्पण केले. पहिल्या जागतिक युद्धांत जर्मनींतील सर्व ज्यू जर्मनांच्याच बाजूने लढत होते. इतिहासाचा हा दाखला आहे की, लढाई सुरू झाल्यावर हवेंतील नायट्रोजनापासून रासायनिक खतें तयार करण्याची कृति जर प्रसिद्ध जर्मन शास्त्रज्ञ प्रोफेसर हाबर याने शोधून काढली नसती तर जर्मनीला लौकरच हात टेकावे लागले असते. असें असून सुद्धा हिटलर ज्यू लोकांविरुद्ध कां झाला व त्यांचें एवढें शिरकाण त्याने कां केलें हा एक प्रश्नच आहे. अमेरिका, इंग्लंड इत्यादि राष्ट्रांतील ज्यू हिटलरच्या विरुद्ध असणें स्वाभाविकच होतें. तीं राष्ट्रें जर्मनीच्या विरुद्धच लढत होतीं.

परंतु हें शिरकाण फार मोठ्या प्रमाणांत व जगांतील इतिहासांत 'न भूतो न भविष्यति' असें एक कृत्य घडलें यांत शंका नाही. त्याची भरपाई म्हणून पश्चिम

जर्मनी इझ्राईलला दर वर्षी आता खंडणी देत आहे. जे ज्यू लोक मारले गेले व ज्यांची संपत्ति जर्मनींतच राहिली त्यांची नुकसानभरपाईच्या स्वरूपाची ही वार्षिक खंडणी (जवळ जवळ ४० लक्ष मार्क्स) पश्चिम जर्मनी दरवर्षी इझ्राईलला देत आहे.

ज्यू लोकांचा धर्म ज्युडाईझम हा आहे. परंतु त्यांचे बरेचसे आचार मुसलमानी लोकांप्रमाणे आहेत. लहान मुलांची सुन्ता ते करतात. व आपल्या-कडील बारशासारखाहि एक मोठा विधि त्यांच्यांत असतो. त्यांची लिपि अरबी लिपीप्रमाणे उजवीकडून डावीकडे लिहिली जाते. मुसलमानाप्रमाणे डुकरांचें मांस ते निषिद्ध मानतात. मुसलमानाप्रमाणेच त्यांच्या समाजांत स्त्रियांचा दर्जा खालचा होता. त्यांच्या प्रार्थनामंदिरांना सिनेगॉग म्हणतात. त्यांत प्रार्थनेच्या वेळीं स्त्रियांना पुरुषांबरोबर जातां येत नाही. त्यांना अलग बसावें लागतें. त्यांच्या प्रार्थनेंत असेंहि अेक वचन आहे की, "हे परमेश्वरा, तूं मला स्त्री न केल्यामुळे तुझे माझ्यावर फार उपकार आहेत व त्यासाठी मी तुला धन्यवाद देतों." जुन्या काळीं लग्न झाल्यावर स्त्रियांनी केशवपन केलें पाहिजे अशीहि पद्धति होती. लैंगिक संबंध विषयोपभोगाकरिता नसून प्रजोत्पादनाकरिता आहेत या विचाराची ही परमा-वधि दिसते. परंतु स्त्रिया ह्या शेवटी स्त्रियाच. केस काढून सुद्धा नकली केसांची टोपी त्या डोक्यावर घालत. आता ती पद्धति बंद झाली आहे. अजूनहि जे अगदी सना-तनी ज्यू आहेत ते दाढी ठेवतात व डोक्यावरील केस गालांच्या दोन्ही बाजूला रुळत सोडतात. काळी हॅट व गालांवर असे रुळत असलेले केस यावरून हा गृहस्थ सनातनी आहे असें समजण्यांत येतें.

त्यांच्या सिनेगॉगमध्ये प्रार्थना कशी होते हें पाहण्याकरिता मी गेलों होतों. उघडया डोक्यांने प्रार्थनामंदिरांत जातां येत नाही. डोक्यावर एक लहानशी टोपी घालावी लागते. प्रार्थनामंदिरांत गाभाऱ्यांत जुन्या बायबलची प्रत असते. सिनेगॉगच्या मध्यभागीं एक उंच चबुत्रा असतो. गाभाऱ्यांतून बायबलमधील वचनें गात गात ती प्रतच चबुत्र्यावर आणतात. त्यानंतर पुन्हा असेंच गायन होतें. व नंतर पुन्हा ती प्रत गाभाऱ्यांत नेऊन ठेवतात. ज्यांना विशेष मान द्यावयाचा आहे किंवा ज्यांना कांही दीक्षा द्यावयाची आहे अशा लोकांना चबुत्र्या-वर आणतात. इतर लोक चर्चप्रमाणेच बाकावर बसून बघत असतात. फक्त सामुदायिक रीतीने प्रार्थनेचें पालुपद मधूनमधून उभे राहून म्हणतात. सीनेगॉग-मधील एकंदर वातावरणाने माझ्या मनावर मात्र विशेष अनुकूल परिणाम घडला नाही. आंतील वातावरण प्रार्थनेच्या वेळीं असावें तसें धीरगंभीर नव्हतें. लोक आपसांत बोलत होते. ख्रिश्चन चर्चमध्ये जें एक आदरयुक्त वातावरण प्रार्थनेच्या वेळीं दृष्टीस पडतें त्याचा अभाव होता. माझ्या बरोबर जे ज्यू गृहस्थ

होते त्यांना मीं जेव्हा असें सांगितलें तेव्हा त्यांनी ही बाब कबूल केली. मात्र ते असें म्हणाले की, हिंदुस्थानांत सिनेगॉगमधील वातावरण याहून चांगलें असतें. ते हिंदुस्थानी ज्यू होते.

यूरोपियन लोकांच्या आणि ज्यू लोकांच्या संस्कृतींत असा फरक असून सुद्धा त्यांची साधारण राहणी यूरोपियन लोकांसारखीच आहे. अगदी वरवर पाहणाऱ्याला हे यूरोपियन लोक आहेत असेंच वाटतें. व नवीन पिढी तर जुन्या धार्मिक विधींपासून व विचारांपासून बरीच पुढे गेलेली आहे. मी ज्या शेतकऱ्याच्या घरीं कांही दिवस होतों तो सिनेगॉगमध्ये जात नसे. "तूं कां जात नाहीस सिनेगॉगमध्ये ?" असें विचारल्यावर तो म्हणाला, "मी स्त्रियांचा दर्जा पुरुषांबरोबरीचा मानतों. अशा परिस्थितींत वर नमूद केलेली प्रार्थना मी कशी म्हणूं शकेन ?" त्याच्याशीं बोलल्यावर माझ्या मनावर अशी छाप पडली की, तरुण पिढीला फारसे धार्मिक-वळण नाही. देशांतील आचार-विचार जुन्या धर्माप्रमाणेच चालावे अशी आजच्या इस्रायली नेत्यांची कल्पना दिसते. ज्यू लोकांचें लग्न ज्यू लोकांशींच झालें पाहिजे व तें सिनेगॉगमध्ये धार्मिक विधीनेच झालें पाहिजे हा त्यांचा कायदा आहे. इस्राईलच्या कायद्याप्रमाणे रजिस्टर्ड पद्धतीचें लग्न कायदेशीर नाही. जुन्या काळीं ख्रिश्चन लोकांतहि हीच पद्धत व हाच कायदा होता. पण कालांतराने तें बदलून रजिस्टर्ड पद्धति आली. असेंच रूपांतर इस्राईलमध्येहि कालांतराने होईल अशीं लक्षणें दिसतात. कांही कांही चाली-रीति अर्थातच सांस्कृतिक सोयीच्या म्हणून चालूं राहतील. 'सबाथ' मानण्याची अशी एक चाल आहे. आठवड्यांतून एक दिवस सुट्टीचा मानावयाचा. त्या दिवशीं काही काम करावयाचें नाही. स्वयंपाक सुद्धा करावयाचा नाही. चूलच पेटवायची नाही. सर्व कांही आदल्या दिवशीचें शिजविलेलें खावयाचें. हा नियम अगदी काटेकोरपणे पाळणें शक्यच नसतें. कारण कांही कामें तर केलींच पाहिजेत. गाईंची धार काढलीच पाहिजे. पाणी गरम केलेंच पाहिजे. कांही ठिकाणीं तर असें सांगण्यांत आलें की, 'सबाथ' च्या दिवशीं चूल पेटविण्याचा प्रसंग येऊं नये म्हणून आदल्या दिवसापासूनच चूल जळत ठेवावयाची प्रथा कांही ठिकाणीं आहे. 'सबाथ' शुक्रवारीं सायंकाळ-पासून तों शनिवारीं सायंकाळपर्यंत चालूं असतो. शहरांतील वाहनें वगैरे सर्व बंद असतात. सर्व दुकानें तर बंद असतातच. शुक्रवारीं रात्रीं प्रत्येक ज्यू आपल्या घरीं मेणबत्या लावतो व जेवणांत कांही विशेष पदार्थ करतो. कांही दिवसांपूर्वी ख्रिश्चन लोकांमध्ये सुद्धा रविवार अशा तऱ्हेने पाळीत असत. त्या दिवशीं कसल्या-हि तऱ्हेचें मनोरंजन करणें किंवा खेळणें सुद्धा निषिद्ध व पाप समजलें जात असे. परंतु हळूहळू हा आदर्शवाद ढिला व्हावयाला लागला. इस्राईलमधील 'सबाथ' मध्ये अशा स्वरुपाचें परिवर्तन होईल अशीं चिन्हें दिसतात. माझा दौरा

सबाथच्या दिवशीं बंद नव्हता. आज स्त्रीपुरुष-संबंधांत स्त्रियांना पूर्ण स्वातंत्र्य आहे. वरवर पाहणाराला इझ्राईलमध्ये आल्यावर आपण एखाद्या यूरोपियन राष्ट्रांतच आलों आहों अशी कल्पना येईल.

पॅलेस्टाईनचा बराचसा भाग रेताळ आहे. त्यामुळे तिथें अगोदर लोकवस्तीच कमी होती. पावसाचें प्रमाण उत्तरेकडून दक्षिणेकडे कमी कमी होत जातें. उत्तरेकडे ३०–४० इंच पाऊस पडतो, तर अगदी दक्षिणेच्या टोकाला अवघा १–२ इंचच. बऱ्याच वर्षांच्या हलगर्जीपणामुळे किंवा दुर्लक्ष केल्यामुळे त्या देशांतील पहाडावर गवताची किंवा जंगलांची वाढ झालेली दिसत नाही. जिथे तिथे दगड उघडा पडलेला दिसतो. त्या देशांतील मुख्य नदी जॉर्डन. ही उत्तरेकडून दक्षिणेकडे वाहते व डेड सीला (मेलेल्या समुद्राला) मिळते. ह्या समुद्राची पातळी समुद्रसपाटीच्याहि खाली १२०० फूट आहे. ह्या नदीची लांबी केवळ ७३ मैल आहे. बाकीच्या दोन नद्या यार्कोन (१६ मैल) व किशोन (८ मैल) या फार लहान आहेत. उष्णतामान जास्तींत जास्त उन्हाळयांत अगदी दक्षिणेच्या टोकाला ऑगस्ट महिन्यांत ७८–१०५ (फॅरनहीट) अंश व हिवाळयांत जानेवारींत कमींत कमी ४९–७० अंश असतें. तेंच उत्तरेकडे ऑगस्टमध्ये ६५–८५ अंश व जानेवारींत ४०–५० अंश असतें. बहुतेक सर्व पाऊस डिसेंबर, जानेवारी व फेब्रुवारी या तीन महिन्यांतच पडतो. सूर्यप्रकाश नेहमी प्रखर असतो. मुख्य पिकें गहू, जव, ऑलिव्ह व संत्रीं हीं होत. आजकाल कापूस, भुईमूग यांची नव्याने लागवड सुरू झाली आहे.

अशा या देशांत ज्यू लोक येण्यापूर्वी अरब लोक राहात होते. इ. स. ७०० पासून अरब लोकांचा पॅलेस्टाईनशीं संबंध आहे. ख्रिश्चन लोकांनी पवित्र मानलेलीं सर्व तीर्थक्षेत्रें या प्रदेशांत आहेत. बेथलहेम येथे ख्रिस्ताचा जन्म झाला. नाझारेथ इथे बरींच वर्षें तो राहिला व जेरुसेलम इथे त्याला क्रॉसवर चढविण्यांत आलें. पहाडावरील प्रवचन (सर्मन ऑन दि माउंटन) ज्या ठिकाणावरून देण्यांत आलें ती जागा सुद्धा याच प्रदेशांत आहे. सहाजिकच हीं सर्व तीर्थस्थानें आपल्या कबज्यांत असावीं असें मध्ययुगांत यूरोपमधील ख्रिश्चन राष्ट्रांना वाटलें व त्याकरिता त्या सर्व राष्ट्रांनी एकजूट करून हीं सर्व तीर्थस्थानें घेण्याचे अनेक प्रयत्न केले. या लढायांना 'वॉर्स ऑफ दि क्रूसेडस' (क्रूसेडसच्या लढाया) म्हणतात पण शेवटी हा सर्व प्रदेश अरब लोकांच्याच कबज्यांत राहिला.

१८७० सालापूर्वी या देशांत ज्यू लोक नांवाचेच होते. त्या वेळेला आपण पुन्हा पॅलेस्टाईनमध्ये राहावयाला जावें ही कल्पना केवळ प्रार्थनेंतच होती. त्या वेळेला असें जर कोणीं भविष्य वर्तविलें असतें की, पॅलेस्टाईनच्या कांही भागांत पुन्हा ज्यू लोकांचें राज्य होईल तर त्याची गणना वेडयांतच करण्यांत आली असती. ज्यू लोकांचें एक स्वतंत्र राष्ट्र पाहिजे ही कल्पना प्रथम जाहीर रीतीने थिओडोर हर्झल याने १८९७

सालीं मांडली. त्या वेळीसुद्धां तें पॅलेस्टाईनच्याच प्रदेशांत असलें पाहिजे, अशी नक्की कल्पना नव्हती. कांही इतर ठिकाणेंहि सुचविण्यांत आलीं होतीं. पूर्व आफ्रिकेमध्ये युगांडा व त्याच्या जवळचा प्रदेश याचाहि विचार करण्यांत आला होता. पण इतिहासाचा क्रम असाच व्हावयाचा होता की, पॅलेस्टाईनच्याच भागांत ज्यू लोकांचें एक नवीन राज्य प्रस्थापित व्हावें. १८७० सालानंतर कांही ज्यू लोक पॅलेस्टाईनमध्ये वस्ती करावयास आले. पण या प्रवृत्तीला सामूहिक स्वरूप १८८२ सालीं आलें. त्या वर्षीं रशियांतील ज्यू लोकांनी वसाहतीला सुरवात केली. सुरवातीच्या वसाहतींना सुप्रसिद्ध फ्रेंच करोडपति बॅरन रॉथ्सचाईल्ड यांची मदत होती. १९ व्या शतकाच्या शेवटी अदमासे २० ज्यू लोकांच्या वसाहती पॅलेस्टाईनमध्ये वसविण्यांत आल्या. यानंतर मात्र त्यांची संख्या झपाटयाने वाढावयास लागली. जगांतील सर्व ज्यू लोकांनी या वसाहतींना मदत करण्याकरिता एक मोठा फंड उभारला. त्याला ‘ ज्युइश नॅशनल फंड ’ असें संबोधण्यांत आलें. त्याचा मुख्य उद्देश पॅलेस्टाईनमध्ये ज्यू लोकांकरिता जमीन विकत घेऊन त्यावर ज्यू लोकांच्या वसाहती वसविणें हा होता. अगदी सुरवातीला जे ज्यू लोक पॅलेस्टाईनमध्ये आले त्यांनी तिथे संत्र्यांचे बगीचे लावावयाला सुरवात केली. अरब लोक गरीब होते. मजुरी स्वस्त होती. त्यांची मजुरी आणि ज्यू लोकांची जमीन व पैसा अशा तऱ्हेने बगीचे लावण्यांत आले. परंतु नंतरचे जे ज्यू लोक आले ते एका विशिष्ट ध्येयाने भारलेले होते. पॅलेस्टाईनमध्ये केवळ शेतीच नाही करावयाची तर तेथील जमिनीवर स्वतः शेतकरी म्हणून नांदावयाचें हें त्यांचें ध्येय होतें. ‘टु बिल्ड दि सॉईल अॅन्ड टु बी बिल्ट इन इट ’. (जमीन तयार करावयाची व स्वतःला त्या जमिनींत बांधून घ्यावयाचें) हें त्यांचें घोषवाक्य होतें. स्वतःच्याच श्रमावर शेती करावयाची हें त्यामुळे ओघानेच आलें. १९०४–१९१४ या दरम्यान बऱ्याच मोठया संख्येंत ज्यू लोकांचे समूह पॅलेस्टाईनमध्ये आले व पहिल्या लढाईच्या पूर्वी त्यांची संख्या ८५,००० झाली.

या लढाईत जर्मनीचा पराभव झाल्यावर ज्यू लोकांचें पॅलेस्टाईनमध्ये एक ‘नॅशनल होम ’ (राष्ट्रीय घर) असावें अशी दोस्त राष्ट्रांत कल्पना प्रसृत झाली. त्या लढाईत ज्यू लोकांनी दोस्त राष्ट्रांना जी पुष्कळशी मदत केली त्याचा हा परिणाम असावा. तें कोणतेंहि कारण असेना, १९१७ सालीं इंग्लंडचे फॉरिन सेक्रेटरी लॉर्ड बाल्फोर यांनी याबाबत एक घोषणा केली. त्याप्रमाणे पॅलेस्टाईनमध्ये ज्यू लोकांना वसाहत करण्यास सवलती द्याव्या व तिथे त्यांचें नॅशनल होम स्थापण्यांत यावें याबाबत इंग्रज सरकारने जबाबदारी उचलली. त्याबरोबरच पॅलेस्टाईनमध्ये सध्या जे अरब लोक राहात आहेत त्यांच्या हितसंबंधांना कसलाहि धक्का पोहोचणार नाही व याच शर्तीवर ज्यू लोकांचें नॅशनल होम राहील असेंहि म्हटलें गेलें होतें.

पहिल्या महायुद्धापर्यंत पॅलेस्टाईनवर तुर्की लोकांचें राज्य होतें. या लढाईंत तुर्कांचा पराभव झाला व पॅलेस्टाईनचा प्रदेश लीग ऑफ नेशन्सने इंग्रजांच्याच मॅंडेटखाली ठेवला. बॅल्फोर घोषणा अमलांत आणण्याची जबाबदारी इंग्रजांकडेच आली. पुढील घटनांवरून असें दिसतें की, बॅल्फोर घोषणेचा अर्थ इंग्रजांनी कांही निराळाच केला असावा व ज्यू लोक त्याचा अर्थ निराळाच समजले असावे. इंग्रजांची कल्पना अशी दिसते की, बॅल्फोर घोषणेप्रमाणे पॅलेस्टाईनमध्ये लोकांनी वसाहत करावी व कालांतराने ज्यू व तेथील पूर्वीचे अरब रहिवासी यांचें एक संयुक्त राज्य निर्माण व्हावें. याशिवाय या घोषणेप्रमाणे ज्यू लोकांच्या पॅलेस्टाईनमधील प्रवेशाचें प्रमाण एवढें मोठें होईल की, अरब लोकांना त्यांच्या भवितव्याबाबत शंका निर्माण होईल याची कल्पना इंग्रजी मुत्सद्यांना आली नसावी. पॅलेस्टाईन हा देशच डोंगराळ व रेताड. त्यांना वाटलें असावें, अशा प्रदेशांत असे किती ज्यू लोक येतील ? कारण जेव्हा ज्यू लोकांची संख्या वाढावयाला लागली तेव्हा पॅलेस्टाईनमध्ये ज्यू लोकांनी जास्त प्रमाणांत येऊं नये याबाबत अनेक निर्बंध पॅलेस्टाईनमधील इंग्रज अधिकाऱ्यांनी घातले.

ज्यू लोक असें समजले की, बॅल्फोर घोषणेप्रमाणे पॅलेस्टाईनमध्ये त्यांचें स्वतंत्र राज्य होईल. त्यामुळे जास्तींत जास्त संख्येंत पॅलेस्टाईनमध्ये जाऊन आपलें संख्याबळ वाढवून आपली बाजू मजबूत केली पाहिजे हा त्यांचा दृष्टिकोण होता. पॅलेस्टाईन-मधील इंग्रज अधिकाऱ्यांची परिस्थिति मात्र यामुळे फार पेचाची झाली. व ज्यू लोकांचा त्यांच्यावर असा आक्षेप होता की, ते अरबांची बाजू घेऊन ज्यू लोकांच्या प्रवेशाला प्रतिबंध करीत होते. इकडे अरब लोकांचा ज्यू लोकांच्या प्रवेशाला विरोध होता. कारण ज्यू लोक जर जास्त संख्येंत आले तर त्यांचें बहुमत होऊन आपली परिस्थिति वाईट होईल ही त्यांना भीति होती.

अशा परिस्थितींत दुसरें महायुद्ध सुरू झालें. महायुद्धाच्या काळांत जर्मनीमध्ये ज्यू लोकांचें फार मोठें शिरकाण झालें. त्यामुळे जागतिक सहानुभूति ज्यू लोकांकडे झुकली व या महायुद्धाच्या अवधींत बरेच ज्यू लोक पॅलेस्टाईनमध्ये आले. त्यांना प्रवेश न देण्याचें इंग्रजांचें धोरण असून सुद्धा नाना युक्त्या-प्रयुक्त्यांनी ज्यू लोक आपला शिरकाव पॅलेस्टाईनमध्ये करून घेत होते. तशांतच इंग्लंड, अमेरिका या राष्ट्रांना मदत करण्याकरिता म्हणून पॅलेस्टाईनमधील ज्यू लोकांनी आपली फौज उभी केली. याचा परिणाम अरब राष्ट्रांवर वाईट होईल या भीतीमुळे इंग्रजांनी सुरवातीला अशी फौज उभारण्याला आपली संमति दिली नाही. परंतु जसजशी लढाई वाढावयाला लागली व सुरवातीला इंग्रजांचा पराजय व्हावयाला लागला, तसतशी बदललेल्या परिस्थितींत ही परवानगी देण्यांत आली. ही फौज पॅलेस्टाईनच्या सरहद्दीवर होती व ज्यू लोकांच्या बेकायदेशीर प्रवेशास तिचा कांही

लाभ होणार नव्हता. परंतु या फौजेचा कांही अदृश्य परिणाम ज्यू लोकांच्या पॅलेस्टाईनमधील प्रवेशावर झालाच. जेव्हा लढाई संपली तेव्हा तर पुष्कळ ज्यू लोकांनी पॅलेस्टाईनमध्ये येण्याचा प्रयत्न केला. १९४७ च्या शेवटी पॅलेस्टाईनमधील ज्यू व अरब लोकांचें प्रमाण खालीलप्रमाणे होतें.

| ज्यू | अरब |
| --- | --- |
| ६३०,००० (३२.३%) | १,३१९,००० (६७.७%) |

पॅलेस्टाईनमधील परिस्थिति मात्र इतकी चिघळली की, इंग्लंडला मँडेट चालविणें अशक्य झालें व हें मँडेट युनायटेड नेशन्सनी परत घ्यावें अशी मागणी इंग्लंडने केली. युनायटेड नेशन्सनी पॅलेस्टाईनचें पुढे काय करावें या प्रश्नाचा विचार करण्याकरिता एक कमिटी बसविली. त्या कमिटीने आपल्या रिपोर्टांत पॅलेस्टाईनची अरब व ज्यू लोकांत विभागणी व्हावी अशी शिफारस केली व त्याच अर्थाचा ठराव युनायटेड नेशन्सनी नोव्हेंबर १९४७ सालीं केला. ज्यू लोकांनी हा ठराव मान्य केला, पण अरबांना तो मान्य नव्हता. ज्यू लोकांचें एक स्वतंत्र राष्ट्र व्हावें ही कल्पनाच त्यांना असह्य होत होती. यामुळे अरब व ज्यू लोकांत सारखीं भांडणें व मारामाऱ्या सुरू झाल्या. सर्व पॅलेस्टाईनमध्ये असुरक्षिततेची परिस्थिति निर्माण झाली. अशांतच १५ मे १९५८ ला ब्रिटिशांनी आपली फौज पॅलेस्टाईनमधून काढून घेतली. त्याच्या आधल्या दिवशींच ज्यू लोकांनी आपल्या स्वतंत्र राज्याची घोषणा केली. या नव्या राष्ट्राचें नांव इस्राईल. इंग्रजी फौज निघाल्याबरोबर उघड उघड लढाईला सुरवात झाली. अरबांच्या बाजूने इजिप्त, सीरिया, जॉर्डन, इत्यादि अरब राष्ट्रांच्या फौजा लढायला होत्या. ज्यू लोकांनी 'हगना' नांवाची आपली एक लढाऊ फौज तयार केली व लढाईला सुरवात झाली. अशा परिस्थितींत पॅलेस्टाईनमधील पुष्कळसे अरब रहिवासी पॅलेस्टाईन सोडून शेजारच्या अरब राष्ट्रांच्या प्रदेशांत चालते झाले. ज्यू लोकांचें म्हणणें असें होतें की, भोवतालच्या अरब राष्ट्रांचा प्रचार असा होता की, पॅलेस्टाईनमधील अरब जर पॅलेस्टाईन सोडतील तर मग अरब फौजांना ज्यू लोकांशीं लढणें सोपें जाईल व त्यांचा पराभव केल्यावर विजेत्या अरब फौजांबरोबर पुन्हा त्यांना पॅलेस्टाईनमध्ये परततां येईल. किंवा त्यांना पॅलेस्टाईनमध्ये राहणें शक्य न झाल्यामुळे त्यांनी तेथून पाय काढला असें म्हणतां येईल. काहीहि का कारण असेना, जवळजवळ ८ ते १० लक्ष अरब लोक या काळांत पॅलेस्टाईन सोडून भोवतालच्या अरब प्रदेशांत जाऊन राहिले.

लढाई जवळजवळ एक वर्ष चालली. सुरवातीला अरब लोकांची सरशी झाली. जेरूसेलम व तेल अव्हीह यांच्यांतील दळणवळण तुटलें व जेरुसेलमला अरब फौजांनी वेढा दिला. ट्रान्स जॉर्डनची फौज बरीच पुढे सरकली. परंतु शेवटी अरबांना माघार घ्यावी लागली व असें ठरलें की, शस्त्रसंधीच्या तारखेला

जो विभाग ज्या फौजांच्या हातीं असेल त्या विभागावर त्यांचा अधिकार आहे असें समजावें. आजच्या इझ्राईलच्या सीमा या शस्त्रसंधीप्रमाणेच आहेत. पूर्वीच्या पॅलेस्टाईनची पूर्व सीमा जॉर्डन नदीपर्यंत होती. व जॉर्डनच्या पूर्वेकडील भागाला ट्रान्स जॉर्डन असें म्हणत. या लढाईत ट्रान्स जॉर्डनची फौज जॉर्डन ओलांडून बरीच पुढे आली. जेरूसेलमला तिने वेढा घातला. शस्त्रसंधीच्या वेळेला जेरुसेलमचा कांही भाग या फौजेच्या ताब्यांत होता. तो तसाच अजूनपर्यंत आहे. याला जुनें जेरूसेलम म्हणतात. जुनें जेरूसेलम व नवें जेरुसेलम अगदी एकच शहर. घरें एकमेकाला लागून आहेत. परंतु शस्त्रसंधीच्या वेळेला अरब फौज ज्या भागांत होती तो भाग जॉर्डनकडे गेला. यामुळे जेरुसेलम शहराचे दोन भाग पडले. ज्यू लोकांकडे नवीन भाग व अरबांकडे जुना भाग. जॉर्डन नदीच्या पश्चिमेकडे आता अरब फौजा आल्याकारणाने ट्रान्स जॉर्डन हें नांव उपयुक्त राहिलें नाही. म्हणून ट्रान्स जॉर्डनचा जुना व नवीन प्रदेश मिळून जॉर्डनचें एक नवीन राज्य कायम झालें.

इझ्राईल राष्ट्र अशा रीतीने अस्तित्वांत आलें. एकदा स्वतंत्र राष्ट्र म्हणून अस्तित्वांत आल्यावर ज्यू लोकांचें इझ्राईलमध्ये प्रवेशाचें प्रमाण फारच झपाट्याने वाढलें. १९४९–१९५९ या दरम्यान सरासरी १० लक्ष ज्यू इझ्राईल-मध्ये आले व आज इझ्राईलमध्ये ज्यू लोकांची एकूण संख्या २० लक्षाच्या आसपास आहे. अरब लोकांची संख्या आता केवळ २ लक्षांच्या आंत आहे. इझ्राईलच्या सीमेबाहेर जवळजवळ ६ ते १० लक्ष अरब निर्वासित तंबू ठोकून आहेत. आज त्यांचा कुणीच वाली नाही. युनायटेड नेशन्स या निर्वासितांना दरमहा प्रत्येक कुटुंबामागे कांही पेशगी देत असते. अरब राष्ट्रांचें म्हणणें असें की, या निर्वासितांनी परत इझ्राईलमध्ये गेलें पाहिजे व तेथे त्यांचें पुनर्वसन झालें पाहिजे. इझ्राईलचें म्हणणें असें की, भोवतालच्या अरब राष्ट्रांत या निर्वासितांच्या पुनर्वसनाकरिता पुष्कळ जागा आहे. तेथे त्यांचें पुनर्वसन व्हावें. या निर्वासितांना परत इझ्राईल-मध्ये येऊं देण्यास सरकार तयार नाही, परंतु सभोवतालच्या अरब राष्ट्रांत त्यांचें पुनर्वसन झाल्यास त्याबाबतचा खर्च देण्यास त्यांची तयारी आहे.

या सर्व प्रकारामुळे भोवतालच्या अरब राष्ट्रांचें व इझ्राईलचें वितुष्ट आलें आहे. त्यांनी इझ्राईलला मान्यता दिली नाही. त्यामुळे सुवेझ कालव्यांतून इझ्रायली जहाजांना जाऊं द्यावयाला इजिप्त तयार नाही. इझ्राईलच्या भोवती अरब राष्ट्रें असल्यामुळे इझ्राईलला आपल्या भवितव्याविषयी भीति वाटते. मध्यंतरीं १९५६ सालीं इजिप्तच्या सरहद्दीवर आपल्यावर हल्ला करण्याकरिता मोठी फौज व शस्त्रास्त्रें गोळा करण्यांत आलीं आहेत या सबबीवर इझ्राईलने इजिप्तवर स्वारी करून सिनाई पेनिन्शुला नांवाचा प्रदेश व्यापून टाकला. त्याच सुमारास अँग्लो फ्रेंचांनी इजिप्तवर स्वारी केली. अमेरिका व रशिया यांच्या विरोधामुळे इंग्रज व

फ्रेंच फौजा इजिप्तमधून काढून घेण्यांत आल्या. इस्राईलने सुद्धा आपली फौज सिनाई भागांतून काढून टाकली. परंतु या प्रकरणामुळे इस्राईलची आक्रमण करण्याची तयारी जगाच्या नजरेला आली.

जगांतील सर्व ज्यू लोकांना इस्राईलमध्ये स्थान आहे अशी घोषणा इस्राईलने १९५० सालीं केली. परंतु सध्याच्या इस्राईलमध्ये आणखी ३०–४० लक्ष ज्यू लोक वसविण्याचीच शक्यता आहे. बाकी राहिलेल्या जवळजवळ १ कोटी ज्यू लोकांना जर वसवावयाचें असेल तर इस्राईलला आणखी कांही प्रदेशांवर कब्जा करावा लागेल. यामुळे व सिनाई प्रदेशांवर झालेल्या आक्रमणामुळे इस्राईलच्या आक्रमणकारी भूमिकेबाबत संदेह निर्माण झालेला आहे.

आपल्या अस्तित्वाच्या दहा वर्षांत इस्राईलने कांही अभूतपूर्ण गोष्टी घडवून आणल्या आहेत. पहिली महत्त्वाची बाब म्हणजे हिब्रू भाषेचें पुनरुज्जीवन. ही भाषा ज्यू लोकांच्या धर्मग्रंथाची भाषा. ही बहुतेक संपूर्णपणे मृतप्राय झाली होती. हिंदुस्थानांत संस्कृत भाषा त्या मानाने पुष्कळच उर्जितावस्थेंत आहे. ती जरी व्यवहारांतील भाषा नसली तरी संस्कृत वाङमयाचा अभ्यास पुष्कळ लोक करतात. हिब्रूचें तसें कांहीच नव्हतें. आज मात्र ही भाषा इस्राईलमध्ये राज्य-भाषा तर झालीच आहे पण लोकभाषाहि झाली आहे. इस्राईलमधील सर्व व्यव-हार, शिक्षण इत्यादि हिब्रूंतूनच होतात. इस्राईलमध्ये नवीन प्रवेश करणाऱ्या ज्यू लोकांकरिता 'अल्पान' नांवाचे विशेष वर्ग हिब्रू शिकविण्याकरिता आहेत. आधुनिक विज्ञान हिब्रूंतून शिकविलें जातें. यावरून हिब्रूच्या पुनरुज्जीवनाकरिता केवढा प्रचंड परिश्रम करावा लागला असेल याची कल्पना येईल. नवीन ग्रंथ निर्माण करणें, जुन्या ग्रंथांचें भाषांतर करणें, सर्व लोकांनी ही भाषा शिकावी याकरिता शिक्षणाची सोय करणें, अशा अनेक गोष्टी त्यांना कराव्या लागल्या. आपल्या देशांत प्रादेशिक भाषा किंवा हिंदी भाषा सुरू करण्यांत किती विरोध व अडचणी आल्या याची कल्पना केली म्हणजे १० वर्षांत केलेल्या ज्यू लोकांच्या कामगिरीचें कौतुक करावेसें वाटतें.

इस्त्राईलमध्ये बाहेरचा मनुष्य नव्याने गेला म्हणजे या राष्ट्राने शेतीचें उत्पादन अत्यंत प्रतिकूल परिस्थितींत मोठ्या प्रमाणांत वाढविलें आहे अशी छाप त्याच्यावर पडल्याशिवाय राहात नाही. दहा वर्षांत शेतीखालील जमीन ४११,००० एकरांवरून ९६०,००० एकरांवर गेली. पाण्याखालची जमीन ७५,००० एकरां-पासून ३०८,००० एकरांपर्यंत गेली. दहा वर्षांत शेतीचें उत्पादन तिप्पट झालें. इस्राईलला लागणारें जवळजवळ ७५% अन्न इस्राईलमध्येच होतें. इस्राईल-मध्ये फिरत असतांना जिकडे तिकडे कारंजीं उडत असतांना दिसतात. ही त्यांची

ओलित करण्याची पद्धत आहे. नद्या, तळीं, विहीरी इत्यादि पाण्याच्या सर्व प्रकारचा (सोर्सेसचा) योग्य उपयोग करून सर्व देशाला एका केंद्रीभूत व्यवस्थेंतून पाणी पुरविण्याची सोय करण्यांत आली आहे. सर्व पाणी नळांतून पुरविण्यांत येतें. उघडे कालवे कुठेच नाहीत. कालव्यांतून पाणी दिल्याने शोषण व बाष्पीभवन या क्रियांतून फार नुकसान होतें अशी यांची कल्पना आहे. इझ्राईलमध्ये पाण्याची फार कमतरता असल्यामुळे अत्यंत काटकसरीने पाणी वापरावें लागतें. म्हणून प्रत्येक शेताला नळांतून पाणी देण्याची व्यवस्था केली आहे. मुख्य नळाला जोडून पाणी घेण्याकरिता प्रत्येक शेतकऱ्याजवळ त्याचे स्वत:चे नळ असतात. त्या नळांना काटकोनांवर छोटे नळ बसविलेले असतात. पाण्याच्या दाबाने या छोटया नळांतून कारंज्यासारखें पाणी उडतें व जमीन भिजते. पाणी सुद्धा मोजून दिलें जातें. प्रत्येक शेतकऱ्याच्या मुख्य नळावर एक मीटर लावण्यांत येतो व त्या मीटरवरून पाणी आकारलें जातें.

धान्याची शेती कोरडवाहू आहे. हिवाळ्यांत पडणाऱ्या पावसांवर ती पिकते. मुख्य धान्य म्हणजे गहूं आणि जव. परंतु ओलिताचीं पिकें म्हणजे गुरांकरिता हिरवा चारा, संत्रीं, भाज्या, द्राक्षें व इतर फळें हींच मुख्यत: आहेत. नुकतीच कापसाची लागवड ओलिताच्या भरवशावर करण्यास सुरवात झाली आहे. येथील शेतकऱ्यांचें उत्पन्नाचें मुख्य साधन म्हणजे डेअरी व त्यांत होणारें दूध व जनावरें ह्यांपासूनचें मुख्य उत्पन्न. दुसरें उत्पन्नाचें साधन म्हणजे कोंबडया पाळणें. कोंबडया अशा तऱ्हेने ठेवण्यांत येतात की, त्यांचें खाणेंपिणें ठेवल्या जागींच होतें. कोंबडीने अंडें दिल्याबरोबर तें गलंडून एका पेटींत पडतें. पेटींतून अंडीं काढणें, खाद्य पुरविणें व त्यांच्या सुस्थितीकडे बघणें एवढेंच काम असतें. मोठाल्या तारांच्या पिंजऱ्यांत कोंबडया जागच्या जागींच ठेवण्याची सोय आहे. फळें, भाज्या, द्राक्षें इत्यादि तिसरी उत्पन्नाची बाब. धान्याची शेती, सहकारी किंवा सामुदायिकच परवडते, व्यक्तिगत शेती परवडत नाही असा यांचा अनुभव आहे. शेकडा १७–१८ लोक शेतीवर उपजीविका करीत असतात त्यामुळे शेतीवरील आमदनी चांगली असते व इतर धंद्यांची ती बरोबरी करूं शकते.

इझ्राईलमध्ये डोळ्यांत भरणारी विशेष गोष्ट म्हणजे तेथील समानता. मागे एक तक्ता देण्यांत आला होता. त्यांत २०० ते ५०० इझ्रायली पौंड यांच्या दरम्यानच तेथील वेतनाच्या प्रमाणांत फरक आहे हें दर्शविलें होतें. परंतु आणखी हातीं आलेल्या माहितीवरून ही माहिती पुरेशी नाही असें दिसावयाला लागलें आहे. १९५८ सालच्या इझ्राईलच्या माहितीपत्रकावरून सरकारी नोकरांच्या पगारांतील फरक खालीलप्रमाणे दाखविला गेला आहे. पगाराच्या एकंदर १५ श्रेण्या खालीलप्रमाणे आहेत.

| Grade | Basic Salary | Grade | Basic Salary | Grade | Basic Salary |
|---|---|---|---|---|---|
| 1 | 540 | 6 | 155 | 11 | 85 |
| 2 | 430 | 7 | 135 | 12 | 78 |
| 3 | 345 | 8 | 155 | 13 | 72 |
| 4 | 270 | 9 | 100 | 14 | 68 |
| 5 | 210 | 10 | 92 | 15 | 63 |

ग्रेड १ पेक्षा इस्राईलमध्ये कुणालाहि जास्त पगार नाही.

त्याच पुस्तकांत दिलेल्या माहितीवरून या ग्रेड्सप्रमाणे सरकारी नोकरांचें वर्गीकरण खालीलप्रमाणे आहे.

| | | | |
|---|---|---|---|
| Officials—Administration | Grades | (1–5) | —1034 |
| Executive | Grades | (6–9) | —7476 |
| Clerical | Grades | (10–15) | —7765 |
| Miscellaneous | | | —2863 |
| | | | 19,938 |

वर दिलेला तक्ता मूळ पगाराचा (बेसिक सॅलरीचा) आहे. याशिवाय महागाई-भत्ता (डीयरनेस अलाउंस), कुटुंबाचा भत्ता (फॅमिली अलाउंस) व नोकरीच्या मुदतीप्रमाणे पगार असतो. ग्रेड १ पेक्षा जास्त पगार सरकारी नोकरींत नाही. यावरून हें स्पष्ट आहे की, आमदनींतील फरक १ ते ८ एवढा तरी आहे. पूर्वी मिळालेल्या माहितींत व या नवीन मिळालेल्या माहितींत बराच फरक असल्यामुळे, याबाबत मीं हिस्राद्रुतच्या एका अधिकाऱ्याकडून स्पष्टीकरण मागितलें होतें. त्याचें उत्तर खालीलप्रमाणे आहे.

'तुमची समजूत बरोबर आहे. इस्राईलमध्ये सरकारी नोकरांत १५ निरनिराळ्या श्रेण्या आहेत व त्यांत कमींत कमी ६३ ते जास्तींत जास्त ५८० एवढा फरक आहे, परंतु तुम्ही हें विसरलांत की, पगाराच्या जोडीला महागाई भत्ता धरला तर फरक खालीलप्रमाणे दिसेल.

| | |
|---|---|
| १ ली ग्रेड—मूळ पगार | ५८० |
| महागाई | १७४.८० |
| | ७५४.८० |
| १५ वी ग्रेड—मूळ पगार | ६३ |
| महागाई | १०६.४०० |
| | १६९.४०० |

यावरून तुम्हांला असें दिसेल की, एकंदर मिळकतीचा हिशेब केल्यास कमींत कमी व जास्तींत जास्त पगारांत १ ते ४ च्याच जवळपास फरक आहे. मी आणखी सांगूं इच्छितों की, ४०,००० सरकारी नोकरांत १५ व्या ग्रेडमध्ये २०० हूनहि कमी लोक आहेत'.

या ४० हजारांत वर दिलेल्या १९ हजारांव्यतिरिक्त खालील लोक सामील आहेत.

| | |
|---|---|
| मजूर— | ९२९७ |
| डॉक्टर व गुरांचे डॉक्टर— | ४५१ |
| न्यायाधीश— | ४१५ |
| अर्थशास्त्री, शेतकी-तज्ञ, फिजिसिस्ट, केमिस्ट इत्यादि— | ३८९ |
| इंजीनियर्स— | ५५९ |
| लॅबोरेटरी, फार्मसी— | २२७ |
| नर्सेस व समाज सेवक— | १९८० |
| इन्स्पेक्टर्स् (शैक्षणिक)— | ३७४ |
| " इतर— | ५९ |
| पोलिस व जेल— | ७३७२ |

इझ्राईलमध्ये सामुदायिक जीवनावर आधारलेली अशी एक संस्था आहे. हिला किबुत्झ म्हणतात. साम्यवादाचा जो आदर्श 'प्रत्येकाकडून त्याच्या योग्यतेप्रमाणे काम व प्रत्येकाला त्याच्या गरजेप्रमाणे दाम' यांत ही संस्था तंतोतंत बसते. याशिवाय संस्थेचें सभासदत्व सर्वस्वी स्वखुशीवर आहे. त्यांत जबरदस्तीचा अंशहि नाही. ह्या संस्थांची संख्या जवळजवळ २८५ आहे व त्यांत १००,००० लोक राहतात. सुरवातीला तर शेतावर काम करणारे जेवढे नवीन ज्यू इझ्राईलमध्ये आले त्यांनी अशाच संस्थांत राहणें व त्यांची संख्या वाढविणें पसंत केलें. शेतीवर काम करणाऱ्या इतरहि संस्था होत्या. व्यक्तिगत शेतकऱ्यांचीं गावें वसविण्याचें काम इझ्राईलमध्ये १९०७ पासूनच सुरू झालें होतें. परंतु आदर्शवाद व परिस्थिति या दोन्ही कारणांनी याच संस्था सुरवातीला वाढल्या.

किबुत्झमध्ये प्रामुख्याने दोन मुख्य कल्पनांचा अंतर्भाव होतो. पहिली कल्पना म्हणजे श्रमआधारित जीवन. ही सर्वांत महत्त्वाची कल्पना आहे. या कल्पनेचें महत्त्व एवढें मोठें आहे की; लेखनांत, शिक्षणांत, किंवा इतर कोणत्याहि बौद्धिक क्षेत्रांत तुम्हीं कितीहि नांव कमावलेलें असलें तरी किबुत्झच्या विचारसरणीच्या

दृष्टीने तुमचें जीवन न्यूनतमच ठरावयाचें. तेथे तेंच जीवन श्रेष्ठ ठरतें व तोच मनुष्य नेता होऊं शकतो की जो श्रम करण्यांत पुढाकार घेऊं शकतो. अशाच लोकांच्याकडे किबुत्झचें नेतृत्व असतें. या योगाने जर तो बुद्धिवान् असला तर फारच चांगलें. अशा व्यक्तीला ते जास्तच मान देतील. याला ते बहुगुणी व्यक्तित्व किंवा सिंथेटिक पर्सनॅलिटी असें म्हणतात. पण मुख्य गुण म्हणजे आपल्या हातांनी काम करण्याची कला. दुसरा गुण म्हणजे समुदायाला समर्पण होणें. ज्या प्रमाणांत तुम्ही समूदायांत मिसळून राहूं शकाल, काम करूं शकाल त्या प्रमाणांत तुम्ही किबुत्झचे चांगले सभासद होऊं शकाल. एकलकोंडेपणा, आप्पलपोटेपणा हे दोष किबुत्झमध्ये बिलकुल चालत नाहीत. ज्या समुदायांत आपण राहतों त्या समुदायाविषयी नेहमी इमानदारी बाळगणें, त्याच्या सुखदु:खाविषयी नेहमी काळजी बाळगणें हे गुण सभासदामध्ये असले पाहिजेत. या वृत्तीला जयप्रकाशजी पारिवारिक (कॉम्युनिटेरियन) वृत्ति म्हणतात. मला प्रथम माझ्या परिवाराकडे पाहिलें पाहिजे म्हणजे मग परिवारहि माझ्याकडे पाहूं शकेल याच भावनें-तून किबुत्झ चाललेले असतात. मनुष्याची कौटुंबिक भावना याच्या अगदी उलट असते. तो प्रथम आपल्याकडे व आपल्या कुटुंबाकडे पाहतो. माझें कसें चांगलें होईल या चिंतेंतच तो गर्क असतो. किबुत्झ आपल्या प्रत्येक सभासदाची चिंता वाहत असल्याकारणाने किबुत्झच्या सभासदाला आपलें सर्व लक्ष किबुत्झकडे देणें शक्य होतें.

किबुत्झमध्ये श्रमाची प्रतिष्ठा तर आहेच पण त्यातल्यात्यांत शेतीवरील श्रम सर्वांत महत्त्वाचे समजले जातात. कारण तेच प्राथमिक श्रम आहेत. 'अन्नाद् भवन्ति भूतानि' हें सूत्र सर्व जगाला लागूं आहे. म्हणून मानवाची प्राथमिक गरज श्रम, जे पुरे करूं शकतात त्यांचें महत्त्व सर्वांत जास्त आहे आणि सुरवातीला 'शेतकीवरच्या' (ॲग्रिकल्चरल सेटलमेंट्स) म्हणूनच किबुत्झच्या वसाहती झाल्या. पुढे पुढे इतर उद्योगांचाहि समावेश त्यांत व्हावयाला लागला. श्रमाच्या प्रतिष्ठेंतून हेंहि तत्त्व ओघानेच निघतें की दुसऱ्याच्या श्रमापासून लाभ घ्यावयाचा नाही. म्हणूनच नोकर किंवा मजूरीने कुणीहि मनुष्य लावावयाचा नाही असा सुरुवातीला या सर्व संस्थांत दंडक असे. कालांतराने ही अट पुढे सैल करावी लागली. पण आज सुद्धा ज्या गृहस्थाला किबुत्झ नोकर म्हणून ठेवीत आहे त्याने जर त्या किबुत्झमध्ये मला प्रवेश मिळावा अशी विनंती केली व त्याच्या विरुद्ध इतर कांही म्हणणें नसलें तर केवळ तो नोकर आहे या सबबीवर त्या किबुत्झला त्याला नाकारतां येणार नाही. त्याची सभासद होण्याची तयारी नसल्यास वेगळी गोष्ट. पण तसें असल्यास त्याला किबुत्झचा सभासद करून घेतलेंच पाहिजे असा नियम आहे.

कोणत्याहि नव्या माणसाला प्रवेश मिळण्यापूर्वी वर्षभर त्याला उमेदवार म्हणून राहावें लागतें. या अवधीनंतर किब्ुत्झच्या सभासदांच्या सर्वसाधारण सभेंत त्याला घेण्याबद्दल विचार होतो आणि नंतर त्याला किबुत्झचा सभासद करण्यांत येते. एखाद्या जुन्या सभासदाने लग्न केलें तर त्याच्या पत्नीच्या बाबत सुद्धा हीच पद्धति अमलांत येते. कांही वेळा पत्नीची प्रवृत्ति किब्ुत्झच्या वातावरणाशीं जुळत नाही या सबबीवर कांही जुन्या सभासदांना सुद्धा किबुत्झ सोडावा लागतो. असें होऊं नये म्हणून लग्न करण्यापूर्वीच आपल्या भावी पतीची अथवा पत्नीची प्रवृत्ति किबुत्झमध्ये राहण्याला योग्य आहे की नाही याची खात्री करूनच लग्न लावण्यांत येतें.

किबुत्झमध्ये प्रवेश केल्यावर सुरवातीला तरी आपण एका नवीन जगांत प्रवेश केल्याचा भास होतो. सभासदाला किब्ुत्झकडून सर्व कांही मिळतें. कपडे, राहण्याकरिता खोली, टूथब्रश, तेल इत्यादि सर्व गरजा किबुत्झ भागवितें. एवढेंच नव्हे तर सिगरेटी सुद्धा एका मर्यादेंत पुरविल्या जातात. कांही किबुत्झमध्ये महिन्याला एक अलाउंस सुद्धा बांधलेला असतो. दर वर्षाला ठराविक सुटी मिळते. सुटींत लागणारा कांही विशिष्ट खर्च सुद्धा किब्ुत्झच देतें. तुमच्या अलाउंस-मधून तुम्हाला वाटेल तें घेतां येतें. प्रत्येक सभासदाचें किब्ुत्झ हें घर आहे. तें त्याच्या सर्व गरजा भागवितें. त्याने मात्र आपल्या किबुत्झच्या भरभराटीकरिता आपल्या घरासारखें खपलें पाहिजे. आपल्यासारख्या एखाद्या बाहेरच्या माणसाला पहिला प्रश्न पडतो तो हा की, अशा परिस्थितींत मन लावून व भरपूर काम होतें कसें ? किबुत्झमध्ये काम करण्याकरिता प्रेरणा कोणती ? तुमच्या कामाचा व किबुत्झ-कडून तुम्हांला मिळणारें जेवण, राहणें, कपडे, इत्यादींचा काही संबंध नसतो. या अर्थानें नसतो की, त्यांचें प्रमाण तुम्हीं केलेल्या कामावर अवलंबून नसतें. तुम्ही काम कितीहि करा. एखाद्या दिवशीं तुम्हांलाच असें वाटलें की, आज आपलें काम बरोबर झालें नाही तरी तुम्हांला कोणी बोलणार नाही. अशा स्थितींत निष्काळजीपणा व कामचुकारपणा हा किबुत्झमध्ये वाढत नाही काय ? ज्या कामाची जबाबदारी निश्चितपणें कुणावरच टाकतां येत नाही, त्या कामाची आबाळ नाही का होत ? असे बरेच प्रश्न मनापुढे उभे राहतात.

त्याचें थोडेसें उत्तर किबुत्झच्या लोकांकडे पाहून मिळतें. जो तो आपल्या कामांत अगदी चूर असतो. जणू कांही किब्ुत्झची सर्व जबाबदारी आपल्यावरच आहे या भावनेंतून सर्व कामें होत असतात. इझ्राईलमधील जवळजवळ २६० किबुत्झपैकी केवळ तोटयांत असें कोणतेंहि किबुत्झ नाही. कांहींना जास्त नफा, कांहींना कमी नफा, कांही किबुत्झिमध्ये उत्पन्न जास्त त्यांची राहणी चांगली, कांहींचें उत्पन्न कमी त्यांची राहणी कमी दर्जाची, असले फरक आहेत. परंतु कामचुकारपणामुळे किंवा इतर तऱ्हेच्या हलगर्जीपणामुळे बसलेलें किबुत्झ कांही ऐकिवांत नाही. याचा अर्थ

इस्त्राईलमधील किबुत्झवासी ज्यू लोकांच्या मानवी वृत्तींतच बदल झाला असें नसून शिक्षण, व्यवस्था, देखरेख, इत्यादि संरक्षणाच्या भरवशावर तेथील किबुत्झिम (हें किबुत्झचें अनेकवचन) चांगले चालले आहेत. कांही लोकांची प्रवृत्तिच अशी असते की, समाजाकरिता काम करावयाचें व समाजाकरिता झटावयाचें. ही प्रवृत्ति इतकी जाज्वल्य असते की, अशा लोकांना आपल्या स्वार्थाकरिता कामच करतां येत नाही. असे सर्व लोक स्वाभाविकपणेच किबुत्झकडे आकृष्ट होतात. किबुत्झ-मध्ये पूर्ण प्रवेश मिळण्यापूर्वी एक वर्ष उमेदवारी करावी लागते हें यापूर्वीं आलेंच आहे. याशिवाय साधारणपणें प्रत्येक माणसाला रुचेल तेंच काम देण्यांत येतें. त्यामुळे हें काम आपण निवडलेलें आहे या भावनेनें चांगलें केलें पाहिजे ही स्वाभाविकच प्रवृत्ति असते. याशिवाय प्रत्येक कामावर एका अनुभवी व जबाब-दार व्यक्तीची नेमणूक वर्षाच्या सुरवातीलाच होत असते. त्या विभागाकरिता तो जबाबदार असतो. पुष्कळ वर्षांचा अनुभव असल्यामुळे त्या विभागाची सर्व माहिती त्याला असते. त्या विभागांत जे इतर काम करणारे असतात त्यांना या म्होरक्याच्या देखरेखीखाली काम करावें लागतें. दुसऱ्या दिवशीं काम करण्याकरिता कामाच्या स्वरूपाप्रमाणे किती लोक कोणत्या कामाकरिता लागणार, याची चर्चा आधल्याच दिवशीं होऊन प्रत्येक मनुष्याला कामाचा एखादा विभाग देण्यांत येतो. दर दिवशीं सायंकाळीं दुसऱ्या दिवसाच्या कामाचा चार्ट तयार होऊन बोर्डावर लावण्यांत येतो. सायंकाळच्या जेवणाच्या वेळीं दुसऱ्या दिवसाचें आपलें काम कोणतें याची माहिती प्रत्येकाला त्या बोर्डावरून होत असते. म्होरक्याच्या देखरेखीखाली काम करावें लागत असल्यामुळे कामचुकार-पणा किंवा निष्काळजीपणा लौकर दृष्टोत्पत्तीस येतो व आपलें काम सुधारण्याचा प्रत्येकजण पूर्णपणे प्रयत्न करतो. एवढें सर्व झाल्यावर सुद्धा कांही माणसांकडून कमीच काम होत असतें व कांही माणसें राक्षसासारखें काम करतात. किबुत्झमध्ये हें स्वाभाविक मानलें जातें. तुम्ही आपलें सर्व तनमनधन लावून काम करा. मग तुमचें काम कमी झालें तरी पर्वा नाही. पण तुम्ही काम-चुकारपणा किंवा आळशीपणा बिलकुल करतां कामा नये. त्यामुळे तुम्ही तर किबुत्झचें नुकसान करतांच पण किबुत्झचें सर्व वातावरण बिघडविण्याचा दोष तुमच्या-कडे येतो. किबुत्झमध्ये अशा गोष्टी सहसा घडत नाहीत. पण घडल्याच तर त्या सभासदाला खाजगी रीतया बोलावून, त्याबद्दल ताकीद देण्यांत येते. याचाहि कांही परिणाम होत नाही असें दिसल्यास ‘ किबुत्झच्या सभेपुढे तुला आणूं ’ अशी त्याला ताकीद देण्यांत येते. किबुत्झच्या सभेपुढे आपल्यावर आगळीक येणें यासारखी दुसरी लाजीरवाणी बाब किबुत्झमध्ये कोणतीच मानली जात नाही. याचाहि जर कांही परिणाम झाला नाही तर मग त्या सभासदाला काढून टाकण्यांत येते. अशी शिक्षा क्वचितच देण्याची पाळी येते. सर्वसाधारण किबुत्झिमचा

हा अनुभव आहे की, असल्या शिक्षेची पाळीच कुणी येऊं देत नाही. किबुत्झचें वातावरण आपल्याला अनुकूल नाही असें दिसतांच तो सभासद स्वतःच तेथून निघून जाण्याच्या प्रयत्नांत असतो.

इझ्राईलच्या वसाहतींत किबुत्झिमचा फार मोठा हिस्सा आहे. सुरवातीला बहुतेक सर्व शेती वसाहतींची असे. नव्या जागीं विशेषतः सभोवतालची परिस्थिति प्रतिकूल असली तर अशा संस्थांचा मोठाच फायदा असतो. परस्परांना मदत व संघशक्ति यांच्या भरवशावर बरीचशीं अवघड कामें होऊं शकत होतीं. भोवताली प्रतिकूल अरब लोकांच्या वसाहती. त्यामुळे व्यक्ति व पीक या दोहोंच्याहि रक्षणाला किबुत्झची पद्धति फार उपयुक्त वाटली. याशिवाय सुरवातीचें पीक बहुतेक पावसाच्या पाण्यावरच अवलंबून असल्यामुळे कोरडवाहू शेतीची सामुदायिक पद्धति विशेषच उपयुक्त होती. यामुळे जरी 'मोशाव्ह ओवदिम्' या नांवाची व्यक्तिगत शेतीची पद्धति १९१६–१९१९ च्या दरम्यान सुरू झाली होती तरी या पद्धतीचीं गावें सुरवातीला कमी होतीं. नवीन येणाऱ्या वसाहतकरूंची प्रवृत्ति किबुत्झकडेच जास्त असे. यांत आदर्शवादाचा कांही हिस्सा होताच. इझ्राईलमध्ये सुरवातीला येणारे सर्वच ज्यू आपल्या देशांतील परिस्थितीने गांजलेले होते. यामुळे आदर्शवादाकडे त्यांची प्रवृत्ति स्वाभाविकच होती. नवीन देशांत नवीन वसाहतींची आदर्शवादी पद्धति वर आलेल्या कारणांमुळे विशेषच आकर्षक वाटल्यास नवल नाही. परंतु जसजशी ओलिताची सोय वाढत गेली व देशांत स्थिरतेची व सुरक्षिततेची परिस्थितिहि वाढीला लागली तसतशी व्यक्तिगत शेतीच्या पद्धतीचीं गावें वाढीला लागलीं. इझ्राईल स्वतंत्र झाल्यावर तर ही वाढ इतकी झपाट्याने झाली की आता 'मोशाव्ह ओव्हदिम्' या शेतीच्या पद्धतीचीं गावें किबुत्झपेक्षा पुष्कळ जास्त झालीं आहेत. खालील आंकड्यांवरून त्यांच्या वाढीची कल्पना येईल.

| | किबुत्झ | लोकसंख्या | मोशाव्ह | लोकसंख्या |
|---|---|---|---|---|
| १९०९–१९४७ | १४५ | ४३,२५८ | ७२ | १८,२६८ |
| १९४७–१९५३ | १४५ | ५९,६५१ | ७२ | २२,०४५ |
| | | नवीन वसाहती | | |
| १९४७–१९५३ | ७७ | ७१,५६९ | १७० | ७४,५८८ |

वरील आंकड्यावरून हें स्पष्ट होईल की, ४७–५३ या काल-खंडांत किबुत्झपेक्षा मोशॉव्ह जास्त स्थापन झाले. त्यामुळे त्यांतील एकूण लोकसंख्या किबुत्झपेक्षा जास्त झाली. परंतु याच काळांत जुन्या १४५ किबुत्झमध्ये १६००० नवीन लोकांचा प्रवेश झाला. जुन्या ७२ मोशाव्हांत मात्र ही संख्या केवळ ४००० नी

वाढली. नवीन लोकांचा समावेश ज्या प्रमाणांत किबुत्झच्या सामुदायिक जीवनांत होऊं शकतो त्या मानाने मोशाव्हच्या व्यक्तिगत जीवनांत फारच कमी असतो.

१९५३–१९५८ या कालखंडांत हें वाढीचें प्रमाण आणखी किबुत्झच्या विरुद्ध गेलेलें आहे. आज एकंदर २५५ किबुत्झ संस्था आहेत व त्यांची लोकसंख्या ८५००० आहे. मोशाव्ह ओव्हदिम् जवळजवळ ३५५ आहेत व त्यांची लोकसंख्या बरीच जास्त आहे.

ही माहिती विस्ताराने सांगण्याचा उद्देश हा की, वाचकांना इस्राईलमधील या संस्थांच्या भविष्याविषयी कांही कल्पना यावी. किबुत्झ या आदर्शवादी संस्था आहेत हें तर स्पष्टच आहे. प्रश्न हा आहे की, यांचें भवितव्य काय ? त्या अशाच टिकून राहतील की त्यांचा हळूहळू लोप होईल ? ज्या एका परिस्थितींत त्यांचा जन्म झाला ती परिस्थिति आज बिलकुल बदलल्यामुळे जीवनांतील आदर्शवादी सिद्धांताच्याच बळावर त्यांना यापुढे जगतां येईल. अजूनहि नवीन किबुत्झ स्थापन होतात. पण त्यांची संख्या फारच अल्प. वाळवंटांत किंवा सरहद्दीवर जिथे सामुदायिकतेची जरूरी आहे अशा परिस्थितींत नवीन वसाहत किबुत्झच्याच धर्तीची वसविण्यांत येत असते. इस्राईलमधील जन्मलेले व वाढलेले तरुण साधारणपणें किबुत्झपद्धतीचीच शेतवसाहत पसंत करतात. याशिवाय किबुत्झमधील शिक्षणाचा मुख्य उद्देश किबुत्झपद्धतीचें जीवन चालू ठेवणें हा असल्यामुळे त्यांच्यातील लोकसंख्या कमी होणें संभवत नाही.

आजपर्यंतचा अनुभव तरी असा आहे की, किबुत्झ ह्या संस्था भविष्यांत लोप पावतील अशा अर्थाचीं कांहीच लक्षणें दिसत नाहीत. चाळीस वर्षें त्या टिकल्या. त्यांची भरभराट झाली. त्यांचें जीवनमान सारखें उंचावत गेलें. हिस्ताद्रुतमधील एका विभागाच्या प्रमुखाशीं जेव्हा चर्चा करण्याचा प्रसंग आला तेव्हा तर त्या प्रमुखाने असे उद्गार काढले की, आम्हांला आमचे सर्व उद्योग किबुत्झच्या पद्धतीनेच चालवावयाचे आहेत. तें आमचें ध्येय आहे. यावरून या विचाराच्या प्रखरतेची जाणीव होते. पण या संस्था टिकून राहतील याची सर्वांत जास्त शाश्वती त्या संस्थांतील वातावरणावर अवलंबून आहे. सर्व कांही किबुत्झकडून मिळतच आहे हा विचार प्रबळ होऊन, जर सभासदांचें लक्ष श्रमावरून कमी होईल तर निश्चितच या संस्था कोलमडूं लागतील. अजूनपर्यंत अशी स्थिति नजरेला आली नाही एवढें मात्र जरूर म्हणतां येईल.

किबुत्झमधील व्यक्तीच्या कामाचें प्रमाण मोशाव्हमधील व्यक्तीच्या तुलनेंत कसें असतें ? मोशाव्हमध्ये शेती व्यक्तिगत असल्यामुळे प्रत्येक शेतकऱ्याचें उत्पन्न त्याच्या मेहनतीवर अवलंबून असतें. यामुळे तो जास्तींत जास्त मेहनत करीत असेल हें गृहित धरून त्या मानाने किबुत्झमधील व्यक्तीचे श्रम किती होतात या तुलनेंतून कांही महत्त्वाच्या बाबी मानवी स्वभावाविषयी व भविष्यांतील त्याच्यांत होणाऱ्या स्थित्यंतराविषयी निघण्यासारख्या आहेत.

मानवी जीवनाकडे बारकाईने पाहिल्यास असें दिसून येईल की, पूर्वी ज्या कौटुंबिक जवाबदाऱ्या समजल्या जात होत्या त्या आता सामाजिक जबाबदाऱ्या समजल्या जातात. समाजाची प्रगति या दृष्टीने होत आहे. एकत्र कुटुंबपद्धति मोडण्याचाहि हा परिणाम असेल. प्रसूतिगृहें, म्हातारपणच्या पेन्शनी, आजाऱ्यांचीं शुश्रूषागृहें, अनेक तऱ्हेचीं खानपानगृहें, क्लब्ज हीं सर्व या प्रवृत्तीचींच द्योतकें आहेत. एवढेंच नव्हे तर सामाजिक जबाबदाऱ्यांचें क्षेत्र आता फार वाढलेलें आहे. प्रत्येक व्यक्तीला उद्योग, गृह, शिक्षण, उद्योगापासून अन्न-वस्त्र इत्यादि गरजा पूर्ण होतील एवढी आय, निरुद्योगी झाल्यास तरतूद, म्हातारपणाची व आजारीपणाची तरतूद, ह्या सर्व सोयी व्यक्तीला समाजाकडून मिळण्याचा हक्क आहे ही आजची विचारसरणी आहे. संपत्तीची निर्मित्ति समाज संघशः करतो म्हणून त्या संपत्तीपासून उपलब्ध होणाऱ्या सोयींवर सर्वांचाच समान अधिकार असला पाहिजे ही आजची प्रचलित विचारसरणी आहे.

जीवन व्यक्तिगत व उत्पादनाच्या साधनांची मालकी व्यक्तिगत, अशा परिस्थितींत वरील सोयी पुरविण्याची जबाबदारी, समाजाचा प्रतिनिधि जें सरकार त्यावर येते. परंतु जीवन जर सामुदायिक असलें व उत्पादनाच्या साधनांची मालकी जर सामुदायिक असली तर मग या सर्व जबाबदाऱ्या तो समाजच उचलूं शकेल. अशा परिस्थितींत आज ज्याला आपण कल्याणकारी राज्य म्हणतों त्याच्या बहुतेक सर्व जबाबदाऱ्या हा विकेंद्रित समाज उचलूं शकेल व केंद्रीय सत्तेकडे फौज, संरक्षण, आयात-निर्यात, चलन इत्यादि राष्ट्रीय स्तरावरच्या बाबी तेवढ्या राहतील.

इस्राईलच्या किबुत्झची हीच परिस्थिति आहे. ज्या ज्या सोयी एखाद्या प्रगत राष्ट्रांत सरकारमार्फत करण्यांत येतात त्या सर्व सोयी किबुत्झ करतें. प्रश्न असा येतो की, जर ही पद्धति एवढी चांगली आहे तर तिचा जास्त फैलाव कां झाला नाही? सुरवातीप्रमाणे किबुत्झिमची संख्या सारखी वाढत कां गेली नाही? हा प्रश्न वारंवार माझ्या मनांत इस्राईलमध्ये येत असे. याचीं अनेक उत्तरें आहेत. एकतर कांही मनुष्यांचा स्वभावच असा असतो की, त्यांच्यांत समुहाहून आपण कांही अलग असलों पाहिजे ही भावना असते. आपल्या कर्तृत्वशक्तीला स्वतंत्र वाव असला पाहिजे असें त्यांना वाटतें. तसें पाहिलें तर कर्तृत्वशक्तीला स्वतंत्र वाव प्रत्येक संघटनेंत असतो. तसा तो किबुत्झमध्येंहि असतो. किबुत्झचा सर्व कारभार तत्त्वतः जरी सभासदांच्या बहुमतावर शेवटी अवलंबून असला तरी ८–१० प्रमुख कार्यकर्त्यांच्या विचारावरच साधारणपणें बहुमत अवलंबून असतें. व हे ८–१० प्रमुख कार्यकर्ते आपल्या कर्तृत्वाने किबुत्झचे म्होरके बनतात. ज्याची काम करण्याची व करवून घेण्याची शक्ति जास्त असते त्याला किबुत्झमध्ये प्रथम स्थान असतें. मग ज्याला आपण आज बुद्धिमान् समजतों असा तो असो अगर नसो. कार्यशक्ति असून बुद्धि असली तर फारच चांगलें. आज जे इस्राईलचे नेते आहेत ते बहुतेक सर्व

किबुत्झमधून काम करून पुढे आलेले लोक आहेत. परंतु कांही लोकांना किबुत्झ-मधील जीवन व विचारसरणी पसंत नसते. आपण आपली स्वतंत्र शेती करावी, आपली स्वतंत्र संपत्ति असावी ही त्यांची भावना असते. इझ्राईलमध्ये जमिनीची मालकी व्यक्तिगत नसतेच. परंतु जमिनींतून घेतलेलें उत्पन्न आणि जमिनीवर उभारण्यांत आलेल्या इमारती व गुरें, अवजारें, इत्यादि सर्व शेतकऱ्याच्या मालकीचीं असतात. तेव्हा स्वतंत्र मालकीची भावना, व्यक्तिगत संपत्तीची कल्पना, स्वतंत्र जीवन जगण्याची इच्छा इत्यादि कारणांमुळे 'मोशाव्ह ओव्हदिम्' यासारख्या व्यक्तिगत शेतीच्या संस्था पुढे आल्या. याहि संस्थांत नोकरांमार्फत शेती करतां येतच नाही. प्रत्येकाला ठराविक जमीन दिली जाते व त्या जमिनीवर त्याने आपल्या कुटुंबासहित मेहनत करून पीक घ्यावें अशी ती योजना असते. विशेष अडचण असली तर मोशाव्हच्या व्यवस्थापकमंडळाच्या संमतीने आठवड्यांतून एक दोन (जसा मोशाव्हचा नियम असेल तसा) दिवस नोकरांमार्फत काम करतां येतें.

या दोन पद्धतींच्या तुलनेंत उत्पादनाच्या दृष्टीने कोणती पद्धति श्रेष्ठ ? कोणत्या पद्धतींत दर एकरीं व दर माणशीं उत्पादनाचें प्रमाण जास्त पडेल ? या प्रश्नाला समाधानपूर्वक उत्तर देण्यासारखीं साधनें उपलब्ध नाहीत. म्हणजे अशा तऱ्हेचा तुलनात्मक अभ्यास इझ्राईलमध्ये झालेला नाही. तुलनात्मक अभ्यास करण्यांत अनेक अडचणी आहेत. तुलना करण्याइतपत समान परिस्थिति किबुत्झ व मोशाव्ह यांची नसते. किबुत्झमध्ये कामाला माणसें पुष्कळदा पुरेशीं नसल्यामुळे शेतीचें यांत्रिकीकरण (मेकेनायझेशन) हें बरेंच झालेलें असतें. याशिवाय किबुत्झ शेतीशिवाय इतर उद्योग करूं शकतें. या दोन्ही सवलती मोशाव्ह ओव्हदिम्‌मध्ये नसतात. जो तो आपापली शेती करणार. यामुळे यांत्रिकीकरणाला वाव कमी. शिवाय सर्वच इसम शेतींत गुंतल्यामुळे मोशाव्हची सहकारी समिति इतर उद्योगांत लक्ष घालूं शकत नाही. किबुत्झमध्ये एक मनुष्य एकच काम घेऊन बसला असतो. कुणी बगीच्याकडे तर कुणी कोंबड्यांकडे, कुणी मेंढ्यांकडे तर कुणी दुधाकडे अशी कामाची वांटणी झाल्यामुळे कालांतराने तो मनुष्य आपल्या कामांत विशेष कसब मिळवतो. अशी संधि मोशाव्हमध्ये नसते. पण मोशाव्हांतील मनुष्य हा जास्त हरहुन्नरी व आत्मविश्वासी असावयाला पाहिजे.

हे भेद असून सुद्धा शेतीच्या बाबतींत व इतर संलग्न धंद्यांत किबुत्झ व मोशाव्ह यांच्यांतील कामाची उत्पादनक्षमतेच्या दृष्टीने तुलना व्हावयाला पाहिजे. ती अजून झाली नाही. केवळ एक मोशाव्ह व एक किबुत्झ यांचें तुलनात्मक अध्ययन करून इझ्राईलमधील एका अर्थशास्त्राज्ञाने तुलना केली आहे व त्याचा निष्कर्ष खालीलप्रमाणे आहे.

'शेतावर काम करणाऱ्या लोकांची तुलना केल्यास असें दिसतें की, मोशाव्हमध्ये दर कुटुंबामागे जमीन कमी आहे. परंतु जमिनीवर लावण्यांत आलेली

पुंजी बरीच जास्त आहे. मोशाव्हमधील शेतांत किबुत्झपेक्षा जिवंत प्राणी (लाइव्हस्टॉक—गुरें, डुकरें, मेंढया इत्यादि) जास्त आहेत. मोशाव्हमध्ये किबुत्झपेक्षा उत्पन्नाच्या बाबी कमी आहेत. साधारणपणें मोशाव्हमध्ये, दुभत्याचें उत्पादन सोडल्यास अन्य क्षेत्रांत उत्पादन जास्त आहे. पोल्ट्रीमध्ये मोशाव्हचें उत्पादन जास्त आहे. मोशाव्हमध्ये किबुत्झपेक्षा कामाचें प्रमाण शेंकडा ९ ने जास्त आहे.

'दोहोंमध्ये लागत (इनपुट), उत्पन्न (आउटपुट) व खर्च वजा जातां उत्पन्न (नेट इनकम) हें जवळजवळ सारखेंच आहे. मोशाव्हमध्ये किबुत्झ-पेक्षा राहणीचा खर्च जास्त आहे त्यामुळे नफा (नेट प्रॉफिट) कमी पडतो. ज्या मानाने पुंजी लावण्यांत आली आहे त्या मानाने मोशाव्हमध्ये फायदा कमी आहे. ही पुजी त्यांची स्वतःची असल्यामुळे व त्यावर व्याज देण्याची जरूरी नसल्यामुळे त्यांत विशेष नुकसान येत नाही.

'निव्वळ फायद्याच्या दृष्टीने दोन्ही पद्धति सारख्याच योग्यतेच्या दिसतात.... केवळ आर्थिक कसोटीवरून मोशाव्ह चांगलें की किबुत्झ चांगलें हा वाद सोडविणें शक्य नाही. शेवटी व्यक्तीच्या इच्छेवर व तिच्या आवडीवर या गोष्टी अवलंबून राहतील.'

एवढें मात्र खरें की, केवळ आदर्शवादाच्या दृष्टीने विचार केल्यास किबुत्झ-मधील जीवन हें मोशाव्हच्या जीवनापेक्षा केव्हाहि उच्च प्रतीचें आहे. त्यांत कामाचा संबंध कर्तव्यपूर्तीशीं आहे. त्यांतून मिळणाऱ्या फायद्यांवर नाही. उत्पादनाचीं साधनें समाजाचीं असून सुद्धा मोशाव्हमध्ये कामाचा संबंध प्रत्यक्ष उत्पादनाशीं आहे.

पुरुषार्थासाठी पूर्ण वाव व त्याचबरोबर आळशीपणा व निष्काळजीपणा याकरिता शिक्षा अशी सोय समाजरचनेंत असावयास पाहिजे. जेव्हा उत्पादनाचीं साधनें खाजगी व्यक्तींच्या हातीं असतात तेव्हा हें अपोआपच साधतें. प्रत्येक शेतकऱ्याजवळ जर शेत असलें व प्रत्येक विणकराजवळ माग असला तर तो आपल्या शक्तीप्रमाणे कमावून खाईल. येथे पुरुषार्थ किंवा त्याचा अभाव याला अनुरूप असें चांगलें किंवा वाईट फळ ओघानेच ठेवलेंलें आहे. परंतु जिथे उत्पादनाचीं साधनें विखुरतां येत नाहीत व त्यामुळे काम समूहांत करावेंच लागतें तिथे अशी सोय होण्या-करता कांही विशेष सोयी कराव्या लागणारच. एक सोय अशी की, समुहांत सुद्धा प्रत्येकाला काम वांटून द्यावयाचें व दिवसाकाठीं तें मोजून घ्यावयाचें. जिथे हें शक्य आहे तिथे हें करणेंच योग्य. जिथे हें शक्य नाही तिथे दुसऱ्या कांही उपायांचें अवलंबन करावें लागेल.

साम्यवादी देशांत व्यक्तिगत व सामूहिक काम वाढलें पाहिजे याकरिता आकर्षण, शिक्षण इत्यादि नाना उपायांचें अवलंबन करण्यांत येत असतें. इझ्राईलच्या किबुत्झिमची ही विशेषता आहे की तिथे ह्या गोष्टी स्वाभाविक तऱ्हेनेच घडवून आणण्याचा प्रयत्न होत आहे.

★ ★ ★

# आदर्श समाजरचनेकडे : ११

आदर्श समाजरचना समाजवादी राहील की पुंजीवादी ? सकृत्‌दर्शनीं या प्रश्नाचें उत्तर पूर्वपक्षींच असलें पाहिजे असें वाटतें. कारण पुंजीवाद हा प्रतिगामी म्हणून आता एवढा गाजला आहे की, समाजवादच आदर्शाकडे नेईल असें वाटावयाला लागतें. पण समाजवादी राष्ट्रांत मिश्र अर्थव्यवस्थेपेक्षा सुद्धा जास्त असमानता व शोषण आहे व पुढेहि राहूं शकतें असें आपण पाहतच आहों. आज सोव्हियट रशियावर हा आक्षेप आहे. इंग्लंडमध्ये जी नुकतीच निवडणूक झाली तींत मजूरपक्ष पडला. याचें असें मुख्य कारण सांगतात की, बहुसंख्य इंग्लिश जनतेला आजची मिश्र अर्थव्यवस्थाच पसंत आहे. समाजवादांतून मिळणारी शांति जर एखाद्या राष्ट्राला मिश्र अर्थव्यवस्थेंतूनच मिळत असेल तर व्यक्तिगत मालकी काढण्यांतच काय स्वारस्य ? आपण हेंहि पाहिलें आहे की, समाजवादी राष्ट्रांत सुद्धा संग्रह वाढत आहे व तेथे आर्थिक असमानता वाढविण्याची जरूरी वाटतें असें सांगण्यांत आलें आहे. हा आमचा युगोस्लावियांतील अनुभव आहे.

समाजवाद चांगला की, पुंजीवाद चांगला हा प्रश्न आता केवळ तात्त्विक चर्चेचा राहिला नसून, तो व्यक्तिगत वृत्तीचा व जागतिक राजकारणाचाहि प्रश्न होऊन बसला आहे. निःपक्षबुद्धीने या प्रश्नाचें उत्तर देणें सुद्धा कठिण झालें आहे. पहिला प्रश्न म्हणजे चांगला की वाईट याला निकष काय ? समानता सर्वांनाच पाहिजे आहे. पण या समानतेच्या शोधांत जर मनुष्य आळशी बनेल व त्याची उत्पादनक्षमता कमी होईल तर त्या समानतेचा काय उपयोग ? ती केवळ गरीबीची वांटणी होईल व त्या गरीबींतून श्रीमंतीकडे जाण्याचा मार्गच खुंटेल. समाजवादावर हाच खरा आक्षेप आहे. सध्याच्या पुंजीवादांतील दोष तर फार स्पष्ट आहेत. दुसऱ्यांच्या गरीबीवरच मुळी तो आधारलेला आहे. जें कांही लोकांजवळ आहे व आपल्याजवळ नाही, त्या संपत्तीचा वांटा मिळविण्याची धडपड पुंजीवादी समाजरचनेंत होत असते. त्यामुळे धडपडीला एक उद्देश मिळतो. या धडपडींत कांही थोडेच लोक सफल होणार ही गोष्ट निराळी. प्रत्येक प्रामाणिक मनुष्य आपल्या मृत्यूपर्यंत या उत्पादक संपत्तीचा कांही थोडा भाग साठवूंच शकेल यांत शंका नाही. पण या चढाओढींत किती शक्ति विनाकारण

खर्च होतें ? तिचा उपयोग इतर चांगल्या कामाला होऊं शकला असता. इथे मी एक चढाओढीचा समाज (कॉम्पिटेटिव्ह सोसायटी) व एक योजनाबद्ध सहकारी समाज (प्लॅन्ड कोऑपरेटिव्ह सोसायटी) यांचाच विचार करीत आहे. पहिल्या समाजांत सर्वच आपापले घोडे पुढे दामटण्याचा प्रयत्न करीत असल्यामुळे चढाओढ, ईर्ष्या, मनस्ताप, लोभी वृत्ति इत्यादि मानसिक भावनांतूनच समाजाला गेलें पाहिजे. याउलट, योजनाबद्ध समाजांत आंखलेल्या चाकोरींतूनच सर्वांना जावें लागेल. यांतून निर्माण होणारे कांही दोष युगोस्लावियाने कसे टाळले हें आपण पाहिलें आहेच. व्यक्ति-व्यक्तींत चढाओढ ठेवली नाही तरी समूहा-समूहांत चढाओढ युगोस्लावियाने मान्य केली आहे. एका विशिष्ट पद्धतीची चढाओढ ही राहणारच. दोन शेतकऱ्यांच्या जमिनी व सर्व सोयी सारख्याच असतांना, एक जर जास्त पीक काढीत असेल तर त्याला जास्त मिळालेंच पाहिजे. दोन दुकानदार इतर सर्व बाबतींत समान आहेत पण एकाचा व्यापार केवळ यामुळेच जास्त चालतो, कां की गिऱ्हाईकांशीं तो फारच चांगला वागतो. तेंव्हा तर त्याला जास्त नफा मिळणें स्वाभाविकच आहे. व त्याची जास्त मिळकत ही योग्यच समजली जाईल. ज्या समाजांत गणिती समानता राहील तो समाजच वर्धमान् राहणार नाही. व कदाचित् तो मानवी समाजच राहूं शकणार नाही.

मग समाजवादाचीं प्रमुख तत्त्वें कोणतीं ?

(१) प्रत्येक व्यक्तीला आपल्या उत्कर्षासाठी समान संधि असणें. उत्पादनाचीं साधनें समाजाच्या मालकीचीं असणें हा समान संधि मिळण्याचा एकमेव रस्ता असल्याकारणाने या बाबींवर समाजवादी साहित्यांत विशेष जोर देण्यांत आला आहे. परंतु जास्त महत्त्वाची बाब पहिली आहे.

(२) प्रत्येक व्यक्तीला सामाजिक सुरक्षितता (सोशल सिक्युरिटी) मिळावी. यांत त्याला काम, त्याबद्दल योग्य दाम, घर, म्हातारपणाची सोय, मुलांचें शिक्षण इत्यादींचा समावेश होईल.

(३) समाजांत जास्तींत जास्त समानता असावी. फार फरक नसावा.

या अटी पाळून समाजामध्ये कांही विशिष्ट प्रमाणांत चढाओढ ठेवणें अयोग्य होणार नाही.

आणि त्या पाळल्यानंतर उत्पादनाच्या सर्व साधनांचें सामाजिकीकरण झालेंच पाहिजे हा आग्रह सुद्धा धरण्याची जरूरी नाही.

इंग्लंडमध्ये सध्या परिस्थिति अशी आहे की, मिश्र अर्थव्यवस्था असून सुद्धा समाजवादाकडे झुकण्याचा त्या देशाचा सध्या तरी कल दिसत नाही. मागील निवडणुकीचें हेंच रहस्य समजलें गेलें आहे. परंतु उत्पादनाचीं साधनें खाजगी मालकीचीं असून सुद्धा वर दर्शविलेल्या समाजवादाच्या पूर्तीसाठी इंग्लंड फारच त्वरेने पुढे जात आहे.

शेतीची व्यवस्था कशी राहील ? मोशाव्हसारखी व्यक्तिगतहि ती राहूं शकेल या किबुत्झसारखी सामुदायिकहि राहूं शकेल. पण जो कसेल तोच जमिनीवरील सर्व पीक घेईल व जमिनीवरील मालकी समाजाची राहील. व्यापार सहकारी पद्धतीचा राहील. इतर उद्योगांची व्यवस्था वर्कर्स मॅनेजमेंटच्या धर्तीवर करतां येईल. अशा तऱ्हेने समाजवादावर जो मुख्य आक्षेप आहे की, त्यांत व्यक्तीला आपलें उत्पादन वाढविण्याकरिता कांही आकर्षण नसतें व त्यामुळे जबरदस्ती किंवा अन्य मार्गानें साम्यवादी राष्ट्रांना आपलें उत्पादन वाढविण्याकरिता प्रयत्न करावे लागतात, तो टाळतां येईल. कारण उत्पादनाच्या साधनांवर उत्पादकांचेंच पूर्ण नियंत्रण असल्यामुळे, व्यक्तीच्या बाबत जो नियम लागू पडतो, तोच समुहाबाबतहि लागू पडेल. पुरुषार्थाकरिता पूर्ण वाव व त्याचबरोबर आळशीपणा व निष्काळजीपणा याबाबत स्वाभाविकपणेंच होणारी मिळकतीमधील घट ही सोय या समाजरचनेंत पूर्णपणें होते. याला जोडूनच जर शासन-व्यवस्था व समाज यांच्यांत आमदनीचा फरक राहणार नाही तर असा समाज समाज-वादाकडे लौकर प्रगति करूं शकेल.

अर्थातच अशा समाजाचा भर अर्थव्यवस्थेच्या व शासनव्यवस्थेच्या विकेंद्रीकरणावर जास्त राहील. ज्याला आपण आजकालच्या भाषेंत 'ॲग्रो-इंडस्ट्रियल कॉम्युनिटि' म्हणतों अशाच स्वरूपाचा स्वयंशासित समाज हा शासनाचा घटक होईल. या समजांत 'कॉम्यून' च्या व्यवस्थेंत वर्णन केलें त्याप्रमाणे व्यक्तींचें उत्पन्न व समुदायाचें उत्पन्न वाढविण्याचा प्रयत्न होईल. राष्ट्रीय आयोजनांतर्गत या विभागांना आपली योजना बनविण्याचें पूर्ण स्वातंत्र्य राहील. अशा या परस्पर सहयोगी समाजाचें घटक राष्ट्र आपल्याकडे एका राष्ट्राच्या दृष्टीने जरूरीचे तेवढेच अधिकार ठेऊन बाकी सर्व अधिकार या समाजघटकांना देईल.

खरा आदर्शवादी समाज म्हणजे इस्राईलचें किबुत्झच. तुम्ही शेती करा की कोणताहि उद्योग करा किंवा इतर कोणत्याहि समुहांत काम करीत राहा, तेथे समाजाकरिता काम करावयाचें व समाजाने काम करणाऱ्याच्या गरजा पुरवावयाच्या. 'मोशाव्ह शितुफी' म्हणून एक किबुझच्याच पद्धतीची दुसरी आवृत्ति आहे. यांत काम व उत्पादन सामुदायिकच असतें पण प्रत्येक कुटुंब स्वतंत्रपणें राहतें व त्याचें जेवणहि स्वतंत्र असतें. मुलें सुद्धा घरींच असतात. या पद्धतींत किबुत्झची सामुदायिकता व मोशाव्ह ओव्हदिम्ची स्वतंत्रता या दोन्हींचा संगम झालेला आहे. या पद्धतींत प्रत्येक कुटुंबाला त्याच्या कुटुंबांतील माणसाच्या हिशेबाने प्रत्येक महिन्याचा बांधलेला पगार मिळतो. अर्थात् वर्षाच्या आमदनीशीं याचा संबंध असतो.

सामुदायिक उत्पादनाच्या पद्धतीवर आक्षेप हाच येऊं शकतो की, तींत व्यक्तीच्या अभिक्रमाला कांही वाव राहत नाही. जिथे उत्पादन सामुदायिकच होऊं

खर्च होतें ? तिचा उपयोग इतर चांगल्या कामाला होऊं शकला असता. इथे मी एक चढाओढीचा समाज (कॉम्पिटेटिव्ह सोसायटी) व एक योजनाबद्ध सहकारी समाज (प्लॅन्ड कोऑपरेटिव्ह सोसायटी) यांचाच विचार करीत आहे. पहिल्या समाजांत सर्वच आपापले घोडे पुढे दामटण्याचा प्रयत्न करीत असल्यामुळे चढाओढ, ईर्ष्या, मनस्ताप, लोभी वृत्ति इत्यादि मानसिक भावनांतूनच समाजाला गेलें पाहिजे. याउलट, योजनाबद्ध समाजांत आंखलेल्या चाकोरींतूनच सर्वांना जावें लागेल. यांतून निर्माण होणारे कांही दोष युगोस्लावियाने कसे टाळले हें आपण पाहिलें आहेच. व्यक्ति-व्यक्तींत चढाओढ ठेवली नाही तरी समूहा-समूहांत चढाओढ युगोस्लावियाने मान्य केली आहे. एका विशिष्ट पद्धतीची चढाओढ ही राहणारच. दोन शेतकऱ्यांच्या जमिनी व सर्व सोयी सारख्याच असतांना, एक जर जास्त पीक काढीत असेल तर त्याला जास्त मिळालेंच पाहिजे. दोन दुकानदार इतर सर्व बाबतींत समान आहेत पण एकाचा व्यापार केवळ यामुळेच जास्त चालतो, कां की गिऱ्हाईकांशीं तो फारच चांगला वागतो. तेंव्हा तर त्याला जास्त नफा मिळणें स्वाभाविकच आहे. व त्याची जास्त मिळकत ही योग्यच समजली जाईल. ज्या समाजांत गणिती समानता राहील तो समाजच वर्धमान् राहणार नाही. व कदाचित् तो मानवी समाजच राहूं शकणार नाही.

मग समाजवादाचीं प्रमुख तत्त्वें कोणतीं ?

(१) प्रत्येक व्यक्तीला आपल्या उत्कर्षासाठी समान संधि असणें. उत्पादनाचीं साधनें समाजाच्या मालकीचीं असणें हा समान संधि मिळण्याचा एकमेव रस्ता असल्याकारणाने या बाबींवर समाजवादी साहित्यांत विशेष जोर देण्यांत आला आहे. परंतु जास्त महत्त्वाची बाब पहिली आहे.

(२) प्रत्येक व्यक्तीला सामाजिक सुरक्षितता (सोशल सिक्युरिटी) मिळावी. यांत त्याला काम, त्याबद्दल योग्य दाम, घर, म्हातारपणाची सोय, मुलांचें शिक्षण इत्यादींचा समावेश होईल.

(३) समाजांत जास्तींत जास्त समानता असावी. फार फरक नसावा.

या अटी पाळून समाजामध्ये कांही विशिष्ट प्रमाणांत चढाओढ ठेवणें अयोग्य होणार नाही.

आणि त्या पाळल्यानंतर उत्पादनाच्या सर्व साधनांचें सामाजिकीकरण झालेंच पाहिजे हा आग्रह सुद्धा धरण्याची जरूरी नाही.

इंग्लंडमध्ये सध्या परिस्थिति अशी आहे की, मिश्र अर्थव्यवस्था असून सुद्धा समाजवादाकडे झुकण्याचा त्या देशाचा सध्या तरी कल दिसत नाही. मागील निवडणुकीचें हेंच रहस्य समजलें गेलें आहे. परंतु उत्पादनाचीं साधनें खाजगी मालकीचीं असून सुद्धा वर दर्शविलेल्या समाजवादाच्या पूर्तीसाठी इंग्लंड फारच त्वरेनें पुढे जात आहे.

शेतीची व्यवस्था कशी राहील ? मोशाव्हसारखी व्यक्तिगतहि ती राहूं शकेल या किबुत्झसारखी सामुदायिकहि राहूं शकेल. पण जो कसेल तोच जमिनीवरील सर्व पीक घेईल व जमिनीवरील मालकी समाजाची राहील.. व्यापार सहकारी पद्धतीचा राहील. इतर उद्योगांची व्यवस्था वर्कर्स मॅनेजमेंटच्या धर्तीवर करतां येईल. अशा तऱ्हेने समाजवादावर जो मुख्य आक्षेप आहे की, त्यांत व्यक्तीला आपलें उत्पादन वाढविण्याकरिता कांही आकर्षण नसतें व त्यामुळे जबरदस्ती किंवा अन्य मार्गाने साम्यवादी राष्ट्रांना आपलें उत्पादन वाढविण्याकरिता प्रयत्न करावे लागतात, तो टाळतां येईल. कारण उत्पादनाच्या साधनांवर उत्पादकांचेंच पूर्ण नियंत्रण असल्यामुळे, व्यक्तीच्या बाबत जो नियम लागूं पडतो, तोच समुहाबाबतहि लागू पडेल. पुरुषार्थाकरिता पूर्ण वाव व त्याचबरोबर आळशीपणा व निष्काळजीपणा याबाबत स्वाभाविकपणेंच होणारी मिळकतीमधील घट ही सोय या समाजरचनेंत पूर्णपणें होते. याला जोडूनच जर शासन-व्यवस्था व समाज यांच्यांत आमदनीचा फरक राहणार नाही तर असा समाज समाज-वादाकडे लौकर प्रगति करूं शकेल.

अर्थातच अशा समाजाचा भर अर्थव्यवस्थेच्या व शासनव्यवस्थेच्या विकेंद्रीकरणावर जास्त राहील. ज्याला आपण आजकालच्या भाषेंत 'अॅग्रो-इंडस्ट्रियल कॉम्युनिटि' म्हणतों अशाच स्वरूपाचा स्वयंशासित समाज हा शासनाचा घटक होईल. या समजांत 'कॉम्यून' च्या व्यवस्थेंत वर्णन केलें त्याप्रमाणे व्यक्तींचें उत्पन्न व समुदायाचें उत्पन्न वाढविण्याचा प्रयत्न होईल. राष्ट्रीय आयोजनांतर्गत या विभागांना आपली योजना बनविण्याचें पूर्ण स्वातंत्र्य राहील. अशा या परस्पर सहयोगी समाजाचें घटक राष्ट्र आपल्याकडे एका राष्ट्राच्या दष्टीने जरूरीचे तेवढेच अधिकार ठेऊन बाकी सर्व अधिकार या समाजघटकांना देईल.

खरा आदर्शवादी समाज म्हणजे इझ्राईलचें किबुत्झच. तुम्ही शेती करा की कोणताहि उद्योग करा किंवा इतर कोणत्याहि समुहांत काम करीत राहा, तेथे समाजाकरिता काम करावयाचें व समाजाने काम करणाऱ्याच्या गरजा पुरवावयाच्या. 'मोशाव्ह शितुफी' म्हणून एक किबुत्झच्याच पद्धतीची दुसरी आवृत्ति आहे. यांत काम व उत्पादन सामुदायिकच असतें पण प्रत्येक कुटुंब स्वतंत्रपणें राहतें व त्याचें जेवणहि स्वतंत्र असतें. मुलें सुद्धा घरींच असतात. या पद्धतींत किबुत्झची सामुदायिकता व मोशाव्ह ओव्हदिम्‌ची स्वतंत्रता या दोन्हींचा संगम झालेला आहे. या पद्धतींत प्रत्येक कुटुंबाला त्याच्या कुटुंबांतील माणसाच्या हिशेबाने प्रत्येक महिन्याचा बांधलेला पगार मिळतो. अर्थात् वर्षाच्या आमदनीशीं याचा संबंध असतो.

सामुदायिक उत्पादनाच्या पद्धतीवर आक्षेप हाच येऊं शकतो की, तींत व्यक्तीच्या अभिक्रमाला कांही वाव राहत नाही. जिथे उत्पादन सामुदायिकच होऊं

शकतें तिथे अर्थातच ही टीका लागूं होत नाही. पण अशाहि उद्योगांत व्यक्तीच्या कामाची मोजणी करण्याच्या पद्धति अमलांत आणल्याच जातात. पंण शेतीच्या बाबतींत मात्र आपली ही भावना झालेली आहे की, शेतजमीनीचा उद्योग हा व्यक्तिगतच असला पाहिजे, सामुदायिक नको. उद्योगांत सामुदायिकपणा चालतो पण शेतींत नाही. परंपरागत रूढ भावना ह्याच या विरोधाच्या मुळाशीं आहेत. याच्या पाठीमागे खोल विचार दिसत नाही. व्यक्तिगत शेतींत मनुष्य जास्त लक्ष लावून जास्त उत्पादन करील व सामुदायिक शेतींत हें शक्य नाही, हा आक्षेप नेहमी घेतला जातो व सकृद्दर्शनीं तो बरोबरच वाटतो. पण सामुदायिक शेतींत कांही मजूर नसतात. सर्वच स्वतःची शेती समजून तींत काम करतात. व पीक किंवा इतर उत्पन्न वांटून घेतात. व्यक्तिगत शेती जशी आपली वाटते तशी सामुदायिक कां वाटूं नये ? व व्यक्तिगत शेतींत काय किंवा सामुदायिक शेतींत काय मनुष्य आपल्या शक्तीप्रमाणेच काम करणार. मग व्यक्तिगत शेतींत त्याने जास्त काम कां करावें व सामुदायिक शेतींत कमी कां करावें ? अर्थातच सामुदायिक शेतींत तो स्वेच्छेने सामील झाला असला पाहिजे.

इस्राईलच्या किबुत्झमध्ये व मोशाव्ह ओव्हदिम्‌मध्ये शेतीच्या उत्पादनाच्या दृष्टीने कोणती पद्धति जास्त उपयुक्त आहे याचें परीक्षण मोठ्या प्रमाणावर झालें पाहिजे. हिंदुस्थानच्या दृष्टीने मात्र मोठ्या प्रमाणांत जमिनीची सुधारणा होई-पर्यंत सहकारी शेतीशिवाय गत्यंतर दिसत नाही. इस्राईलमध्ये व्यक्तिगत शेतीकरिता जमिनीची पूर्ण दुरुस्ती केल्यावरच जमीन देण्यांत येते. त्याकरिता पुष्कळसा पैसा 'जूइश नॅशनल फंड' खर्च करीत असतो. अशी जमिनीची दुरुस्ती हिंदुस्थानांत जनतेच्या श्रमशक्तींतूनच भूमिसंरक्षण (सॉईल कॉन्झर्वेशन) करून करतां येईल. हें करण्याकरिता सहकारी शेतीचें अवलंबन करणें जरूरीचें आहे. परंतु ही बाब लोकाच्या इच्छेवरच ठेवली पाहिजे. आपल्या प्रभावी दर्शनानेच सहकारी शेतीची प्रगति झाली पाहिजे.

हें सर्व परिवर्तन घडून कसें येणार ? अर्थातच लोकशाहीच्या मार्गानें. साम्यवाद्यांचा मार्ग हिंदुस्थानाला मानवणार नाही. त्यांत आकर्षण पुष्कळ आहे पण दोषहि तितकेच आहेत. परंतु लोकशाहीचा मार्ग योग्य तऱ्हेने आक्रमण करण्याकरिता विकेंद्रीकरणाची जरूरी आहे. आज संसद व राज्यसरकार यांच्याखालील कोणत्याहि शासनसंस्थेला कायदा करण्याचा अधिकार नाही. यामुळे प्रगति खुंटते. पंचायतींना कांही नवीन अधिकार मिळाले आहेत. व ब्लॉकच्या स्तरावर पंचायत-समित्यांमार्फत काम चालावें असें ठरलें आहे. पण हें एवढेंसें पुरें नाही. या संस्थांना त्यांच्या क्षेत्रांत कायदे करण्याचे अधिकार पाहिजेत. वाटल्यास स्थूल कायदे (बेसिक लॉज) राज्यसरकारांच्या कायदे-मंडळांनी करावे. पण त्यांना आकार देण्याची जबाबदारी

खालच्या स्तरावर टाकतां आली पाहिजे. त्याशिवाय खरें विकेंद्रीकरण होणार नाही. व त्याशिवाय प्रगतीचा वेग वाढणार नाही. शासनांत भरीवपणा व रेखीवपणा येणार नाही.

या सर्व बाबी कायद्याने झाल्या पाहिजेत.

"Yon would govern non-violently but all Legislation is violence," the questioner persisted. Gandhiji answered, "No, not all legislation. Legislation imposed by the people upon themselves is non-violence to the extent it is possible in society. A society organised and run on the basis of complete non-violence would be purest anarchy......The nearest approach to purest anarchy would be a democracy based on non-violence."

यावरून हें स्पष्ट होईल की, गांधीजींना सुद्धा कायद्याने समाजपरिवर्तनाचा मार्ग संमत होता. अर्थातच आज ज्या पद्धतीने आम्ही कायदे करीत आहों ती ही पद्धति नव्हे. 'Legislation imposed by the people upon themselves' यांत सर्वसंमतीची कल्पना दिसते. एखाद्या सर्वमान्य कल्पनेचें उल्लंघन होऊं नये म्हणून तिला कायद्याचें स्वरूप द्यावें व उल्लंघनाकरिता दंड ठेवावा अशाच स्वरूपाचा कायदा वरील व्याख्येंत बसूं शकेल. लहानलहान समूहांत कदाचित् हें संभवेल पण राज्यसरकारच्या किंवा संसदेच्या स्तरावर हें शक्य दिसत नाही. तिथे आज बहुमताच्या निर्णयाला कांही पर्याय आहे असें दिसत नाही. फार झालें तर बहुमतापेक्षा शेकडा ८० किंवा असें कांही तरी निर्णायक बहुमत ठरवितां येईल.

आज लोकशाहींत अनेक पक्ष निर्माण होतात आणि त्यामुळे जनशक्ति कमी होतें यांत शंकाच नाही. लोकशाहींत पक्ष असलेच पाहिजेत, त्याशिवाय लोकशाही राहणार नाही हा जवळजवळ सिद्धांत बनल्यासारखा दिसतो. श्री जयप्रकाशजींसारखे कांही विचारवंत हें मानीत नाहीत. त्यांच्या मतें पक्ष नसतांना सुद्धा लोकशाही राहूं शकते. शेवटी लोकशाही ही एक मनाची वृत्ति आहे. आपल्या विरोधी मताला तुम्ही कसें लेखतां, विरोधकांशीं कसे वागतां, यावर लोकशाहीचें वातावरण अवलंबून आहे. विरोधकाशीं जास्तींत जास्त जुळवून घेण्याची तुमची वृत्ति असणें हें लोकशाहीचें वातावरण आहे. व याला एक किंवा अनेक पक्ष असलेच पाहिजेत हें कांही अनिवार्य दिसत नाही. परंतु या प्रश्नाची पूर्वी चर्चा केल्याप्रमाणे कांही प्रभावी व्यक्तींच्या मागे लोकप्रतिनिधि जाणें अनिवार्य असल्यामुळें पक्ष पडणेंहि

अनिवार्यच दिसतें. जिथे एकाच मनुष्याचें व्यक्तित्व फार मोठें आहे व दुसरा पक्ष निघूं द्यावयाचा नाही हा सरकारचा निर्धार आहे तिथेंच पक्ष निघणार नाही. युगोस्लावियांत आज हीच परिस्थिति आहे. हें जरी खरें असलें की, शेकडा ६० ते ७० एवढ्या जनतेची तिथे एक संघटना आहे तरीहि लीग ऑफ कॉम्युनिस्टचे लोकच त्या संघटनेचे अध्वर्यू आहेत. युगोस्लावियाच्या जुन्या इतिहासामुळे दुसरें कांही होणें शक्य नाही. आजच्या नेतृत्वाला उघड उघड शह देण्याची कुणाची शक्ति नसल्यामुळे आम्ही पक्षाचें विसर्जन करीत आहों ही भाषा त्यांच्या तोंडीं चांगली शोभते. परंतु हें विसर्जन कसें होईल याबाबत तिथल्याहि लोकांना अजून शंका आहे. यामुळेच या बाबतींत लोकशाही राष्ट्रांपेक्षा युगोस्लावियाचें चीन व रशिया या देशांशीं जास्त साम्य आहे.

पक्ष राहतील, परंतु त्यांचे दोष आजच्यापेक्षा कमी करणें शक्य आहे. विकेंद्रीकरण केलें व स्थानिक निवडणुकी पक्षातर्फे लढविण्यांत येऊं नये अशी प्रथा पाडली तरी पक्षाचे दोष बऱ्याच प्रमाणांत कमी होतील. अधिकाराच्या लालसेने व महत्त्वाकांक्षेने प्रेरित होणें ही बाब चांगली की वाईट हा विचार इथे करण्याची जरूरी नाही. मानवी प्रवृत्ति गृहीत धरूनच अधिकाराचीं स्थानें, सेवास्थानें बनविलीं पाहिजेत. त्यांतून संपत्तीचा संचय होईल अशी सवलत नसावी.

हिंदुस्थानापुढे जे आज अनेक प्रश्न आहेत त्यांपैकी खालील महत्त्वाचे आहेत.

संपत्तीचें वितरण होऊन आपला विकास होईल अगर त्याशिवायहि तो होईल ? संपत्तीचें वितरण म्हणजे जमिनीची शक्य तेवढी समान वांटणी; घरांचें व इतर संपत्तीचें सामाजिकीकरण इत्यादि. यापेक्षा भिन्न मार्ग म्हणजे व्यक्तिगत संपत्ति पवित्र मानून तिला हात न लावतां इंग्लंड-अमेरिकेसारखा विकास. आजकाल पश्चिम जर्मनीने ज्या पद्धतीने आपला विकास केला आहे तिकडे हिंदुस्थानी अर्थशास्त्रज्ञांचें विशेष लक्ष लागलें आहे. खुला बाजार व व्यक्तिगत संपत्तीवरील हक्क कायम राखून पश्चिम जर्मनीने आपला विकास फारच अल्पावधींत करून दाखविला आहे. अगदी याच्या उलट पूर्व जर्मनीची परिस्थिति आहे. दोन्ही देशांत एक मोठा फरक आहे व तो म्हणजे पश्चिम जर्मनीला फौजी खर्च कांहीच करावा लागत नाही. पूर्व जर्मनीला तो भरपूर प्रमाणांत करावा लागतो. दोन्ही देशांच्या अर्थ-व्यवस्थेंत जमीनअस्मानचा फरक आहे. एक व्यक्तिगत संपत्तीवर आधारलेली आहे तर दुसरी व्यक्तिगत संपत्तीच्या सामाजिकीरणावर. एकींत नियंत्रित अर्थव्यवस्था व योजनाबद्ध विकास तर दुसरींत खुला बाजार व व्यक्तीला आपला आर्थिक विकास करण्याकरिता पूर्ण अवसर. अशा परिस्थितींत कोणती पद्धति आर्थिक विकासाला जास्त अनुकूल आहे याचें कांही निश्चित उत्तर देतां येईल काय ? या प्रश्नाला नकारार्थी उत्तर द्यावें लागेल. पश्चिम जर्मनींत जेवढी भरभराटीची परिस्थिति आहे तेवढी

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्थळप्रत.
अनुक्रम ३७७.२६७ वि: ... १९
क्रमांक ...२९७५........ नों: दि: ८।८।६७



पूर्व जर्मनींत नाही. समाजवादाने विकास लवकर होतो तर असा फरक कां असा प्रश्न स्वाभाविकपणेंच उद्‌भवतो. पश्चिम जर्मनीला अमेरिकेची बरीच मदत झाली, तिचा लष्करी खर्च नाही, अशा ठराविक उत्तराने समाधान होत नाही. दर माणशीं उत्पादनवाढ समाजवादी अर्थव्यवस्थेंत लवकर होईल की पुंजीवादी अर्थ-व्यवस्थेंत लवकर होईल हाच खरा प्रश्न होईल. मला वाटतें या प्रश्नाचें नक्की उत्तर मिळणें कठिण आहे. समाजवादी राष्ट्रांचा आर्थिक विकास लवकर होण्याचें हें एक कारण असूं शकेल की, तीं राष्ट्रें जनतेच्या वापराच्या वस्तूंवर (कंझम्शन गुड्‌स्‌वर) नियंत्रण ठेवून जास्तींत जास्त रक्कम विकासकार्यांत खर्च करतात. परंतु त्यामुळेच उत्पादनवाढीला हवें तेवढें आकर्षण तिथे नसावें. म्हणूनच राष्ट्रवाद इत्यादि भावनांचा अवलंब करून तिथे उत्पादन वाढवावें लागतें. युगोस्लावियाचा सुद्धा अनुभव हा आहे की, आपलें उत्पादन वाढतें असें व्यक्तीला दिसल्याशिवाय जास्त काळजी व मेहनत घ्यावयाला तिला उत्साह वाटत नाही.

कदाचित् आपल्या देशांत मधला मार्ग अवलंबितां येईल. जिथे प्रत्यक्ष मालकीवरच उत्पादनाची विशेषता अवलंबून आहे तिथे ती कायम ठेवावी व जिथे परिस्थिति याच्याविरुद्ध असेल तिथे ती काढून टाकावी. उदाहरणार्थ, शेतीच्या क्षेत्रांत गैरहजर मालकांची शेती काढावी व खेड्यावर राहून आपल्या शेतीची प्रत्यक्ष देखरेख करणाऱ्या जमीनमालकांची शेती राहूं द्यावी. असा संपूर्ण समाजवाद व संपूर्ण पुंजीवाद यांत भेद करतां येणें शक्य आहे. तीच बाब उद्योगालाहि लावतां येईल. मालक जिथे स्वतः लक्ष घालतो असे लहान उद्योग व्यक्तिगत मालकीचे ठेवावे. पण जिथे असंख्य शेअर-होल्डर्सच्या पुंजीवर उद्योग चालतो तिथे त्याचें राष्ट्रीयीकरण करण्याला कांहीच प्रत्यवाय दिसत नाही. यांतूनच पुढे हळूहळू 'प्रत्यक्ष काम करणाऱ्यांची व्यवस्था' (वर्कर्स मॅनेजमेंट) या कल्पनेचा उदय होऊं शकेल.

दुसरा एक महत्त्वाचा प्रश्न लोकशाहीचा आहे. लोकशाही ही एक जीवननिष्ठा आहे. मनाची ती एक प्रवृत्ति आहे. तिचा मुख्य मानबिंदु प्रतिपक्षी किंवा विरोधी मताबद्दल आदर बाळगून शक्यतोंवर त्याची समजूत घालून आपला विचार अमलांत आणणें हा आहे. इंग्रजींत एक म्हण आहे, 'आपल्या प्रतिपक्षाचें तोंड बंद करून तुम्ही त्याचें मतपरिवर्तन घडवून आणूं शकत नाही.' (यू कॅनॉट कनव्हर्ट ए पर्सन बाय सायलेन्सिंग हिम्.) लोकशाहीची सुद्धा हीच निष्ठा आहे. परंतु एका विशिष्ट समाज-रचनेवरच लोकशाही अवलंबून आहे की काय हा खरा प्रश्न आहे. आज जगांत पूर्व आणि पश्चिम असे जे दोन गट निर्माण झाले आहेत त्यांत सुद्धा हीच सुप्त भावना आहे. व्यक्तिवाद की समूहवाद हा खरा लोकशाही किंवा समाजवाद अथवा साम्यवाद यातील प्रश्न आहे. या दृष्टीने विचार केल्यास समाजवाद अथवा साम्यवाद यांत फरक नाही. श्री मानवेंद्र रॉय यांच्या मतें लोकशाही ही व्यक्तिवादावर आधारलेली

आहे आणि समाजवाद व साम्यवाद हे समूहवादावर आधारलेले आहेत. व्यक्तिवादांत उत्पादनाच्या साधनांची मालकी व्यक्तीकडे असते. साम्यवादांत व समूहवादांत ती समुहाकडे असते. या दृष्टीने विचार केल्यास संयुक्त सहकारी शेती ही समूहवादावर आधारलेली आहे. तिच्यांत व्यक्तिगत मालकी जरी कायम राहिली तरी ती व्यक्तिगत कसण्याचें बंद होतें व व्यक्तिगत मालकीचें स्वरूप सुद्धा बदलतें. ग्रामदान तर उघडपणें समूहवादावर आधारलेलें आहे. जसजसें औद्योगीकरण वाढेल तसतशी उत्पादनाची पद्धति व्यक्तिगत न राहतां सामूहिक होईल. उद्योगाच्या बाबतींत तर हें दिसून येतच आहे. पण शेतीच्या बाबतींत सुद्धा हें दिसावयास लागेल. युगोस्लावियामध्ये व्यक्तिगत शेतीचें रूपांतर सामुदायिक शेतींत होईल ही आशा याच स्थित्यंतरावर आधारलेली आहे. सामूदायिक शेती, कॉम्यून्स इत्यादि याच स्थित्यंतराचीं प्रतीकें आहेत. सर्व जगामध्येच हें स्थित्यंतर घडून येईल असें आज सांगतां येत नाही. दोन्ही पद्धति सहज जीवनाच्या तत्त्वाप्रमाणे जगांत किंवा एकाच राष्ट्रांत नांदू शकतील. इस्राईलमध्ये किबुत्झ व मोशाव्ह ओव्हदिम् अशा दोन तऱ्हेच्या शेतकऱ्यांच्या वसाहती आहेत. पहिली समूहवादावर आधारलेली आहे तर दुसरी व्यक्तिवादावर. जगांत तर आज दोन्ही पद्धति नांदतच आहेत. साम्यवादी राष्ट्रांत जी आज पोलादी चौकट नांदत आहे तीमुळे तिथे समूहवादावर आधारलेली एकच पद्धति सुरु आहे. पण कालांतराने जेव्हा ही चौकट ढिली होईल तेव्हा तिथेहि या दोन्ही पद्धति नांदतील. युगोस्लावियांत शेतीच्या व्यवस्थेंत आज दोन्ही पद्धति नांदत आहेत. जवळजवळ शेकडा १० एवढी जमीन सामूहिक शेतीच्या क्षेत्रांत बसते.

आदर्श समाजरचनेच्या दृष्टीने व्यक्तिवादापेक्षा समूहवाद चांगला काय ? व चांगला असेल तर तो कां ? व्यक्ति ही स्वभावतःच आपल्यापुरतें पाहणारी असल्यामुळे समुहांत ती मिसळल्यावर तिच्या ह्या वृत्तीला आळा बसू शकेल. समाजाच्या सुखांत माझें सुख आहे असें जेव्हा व्यक्ति स्वाभाविकपणेंच समजावयाला लागेल तेव्हाच समूहवादाच्या पुष्टयर्थ ज्या सांस्थिक (इंस्टिट्युशनल) रचनांची आज जरूरी भासते ती भासणार नाही. परंतु या सांस्थिक रचनेच्याहि बऱ्याच श्रेण्या आहेत. चीनच्या कॉम्यून्समध्ये कुटुंबसंस्थेवरच आघात झाले आहेत. पति व पत्नी हे निरनिराळ्या ब्रिगेडस्मध्ये काम करीत असल्यामुळे कित्येकदा बरेच दिवसपर्यंत त्यांची भेट होत नाही असें ऐकिवांत आहे. याच्या उलट इस्राईलच्या मोशाव्ह शितुफीमध्ये सामुदायिक काम करण्याची प्रथा असून कुटुंबसंस्था पूर्णपणें अस्तित्वांत आहे. प्रत्येक कुटुंबाला त्या कुटुंबांतील माणसांच्या संख्येनुसार व मोशाव्हच्या आर्थिक परिस्थितीप्रमाणे मासिक पगार ठरलेला असतो. अर्थातच त्याची व्याप्ति मोशाव्हच्या आर्थिक परिस्थितीवर अवलंबून असते. परंतु त्या मासिक वेतनांत प्रत्येक कुटुंबाला हवा तसा संसार थाटतां येतो.

७२१८

समूहवादाची जरूरी आज अशाकरितां भासते की, त्याशिवाय व्यक्तीची जी स्वतःकडे पाहण्याची प्रवृत्ति आहे तिला आळा बसणार नाही. पण समूहवादांत दोष कोणते आहेत ? एक दोष असा संभवतो की, जास्तीत जास्त काम करण्याच्या व्यक्तीच्या प्रवृत्तीला धक्का बसण्याची शक्यता आहे. जिथे समूहवादावर आधारलेल्या संस्था आहेत तिथे या प्रवृत्तीचा प्रादुर्भाव होऊं नये म्हणून विशेष खबरदारी घेण्यांत येते. इस्राईलमध्ये मात्र साधारण अनुभव असा आहे की, देशप्रेमाचें आवाहन, कामाप्रमाणे वेतनाची तरतूद, प्रत्येकाच्या कामाची एक तुलनात्मक मोजदाद इत्यादि विशेष तरतुदीशिवाय प्रत्येक मनुष्याकडून त्याच्या शक्तीप्रमाणे काम होतें. यावरून असें अनुमान काढतां येईल की, अशाच तऱ्हेची प्रवृत्ति मानवाचा स्थायी भाव होऊं शकत नाही व स्वेच्छेने उद्भवणाऱ्या समूहवादांत अशाच तऱ्हेची प्रवृत्ति राहावयाला नको.

परंतु आज तरी परिस्थिति अशी दिसते की, व्यक्तीची स्वतःकडे प्रथम पाहण्याची प्रवृत्ति समूहवादाशिवाय उत्तरोत्तर दृढ होत आहे. युगोस्लावियांत जमिनीवर कमाल मर्यादा घातल्यानंतर जे अगदी लहान लहान शेतकरी आहेत त्यांची स्थिति फारच खराब आहे. तेथील एका शेतकऱ्याच्याच भाषेंत बोलावयाचें म्हणजे 'त्यांना धड जगतांहि येत नाही व धड मरतांहि येत नाही.' पण तेथील समाज त्यांच्याकरिता आज कांही विशेष करीत नाही व करूंहि शकत नाही. आम्ही काय करावें असा तेथील शेतकऱ्यांनीच मला प्रश्न केला. सहकारी शेती हा एक उपाय होता, पण तो त्यांना पचला नाही. शेती सोडून इतर धंद्यांत जसजसा अवकाश मिळेल तसतसा त्यांचा त्यांत समावेश करावा लागेल.

इस्राईलच्या मोशाव्ह ओव्हदिम्‌मध्ये सर्वांजवळ सारखीच व सारख्याच सोयीची जमीन असल्यामुळे विशेष फरक दिसत नाही. याशिवाय जमीन ही ज्यूइश नॅशनल एजंसीची असल्यामुळे तिच्या खरेदीविक्रीच्या अशक्यतेमुळे ती एकाजवळ जास्त व एकाजवळ कमी असें होण्याचा संभव नाही. कांही कुटुंबांत जास्त माणसें व कांही कुटुंबांत कमी माणसें असतात. त्यामुळे निरनिराळ्या कुटुंबांच्या राहणीच्या दर्जांत कांही फरक संभवतो.

याशिवाय आपण हेंहि पाहिलें की, उत्पादनाच्या साधनांचें सामाजिकीकरण होऊन सुद्धा व्यक्तिगत बचतीचें प्रमाण युगोस्लावियांत वाढत आहे. मनुष्याच्या संग्रह करण्याच्या प्रवृत्तीचें हें द्योतक आहे. आणि युगोस्लावियांतील तत्त्वज्ञ ह्या प्रवृत्तीची तरफदारीच करतात की, आमचा देश समाजवादाच्या परिस्थितींतून जात आहे. आपल्या कामाच्या प्रमाणांत प्रत्येकाला वेतन मिळणें हा समाजवादाचा सिद्धांत आहे. त्यांतून जी बचत होते ती योग्यच आहे. एवढेंच नव्हे तर तशा बचतीला पोषक

असें आकर्षक व्याजाचे दर युगोस्लावियांत आहेत. रशियांत सुद्धा हीच परिस्थिति आहे. समूहवादी संस्थांतूनच ही प्रवृत्ति कमींत कमी प्रमाणांत दृष्टीस पडते.

समूहवादावर दुसरा आक्षेप हा आहे की, त्यामुळे व्यक्तिस्वातंत्र्याला धक्का पोहोचतो व समूहाच्या अधीन बनण्याची व्यक्तीची प्रवृत्ति बळावते. त्यामुळे व्यक्ति ही समाजाची गुलाम बनून तिचें व्यक्तित्वच नष्ट होतें. हें तर मान्य केलेंच पाहिजे की, सामुदायिक संस्थांत व्यक्तिगत संस्थांपेक्षा स्वातंत्र्य कमी. व्यक्तिगत शेतकरी आपल्या शेतावर काम करण्याबाबत जेवढा स्वतंत्र असतो तेवढा सामुदायिक शेतींत काम करणारा शेतकरी राहूं शकत नाही. आपल्या घरीं पॉवरलूम लावून त्यावर काम करणारा विणकर व गिरणींत काम करणारा विणकर यांत फरक असणारच. परंतु दिवसेंदिवस उत्पादनाच्या प्रकारांत बदल होत असून व्यक्तिगत उत्पादनाचें रूपांतर सामूहिक उत्पादनांत होत आहे. उद्योगाच्या बाबतींत तर हें स्पष्टच आहे. शेतीच्या बाबतींत अजून हें एवढें स्पष्ट नाही. अर्थातच सामूहिक उत्पादनांतील विशेष लाभामुळे शेतीच्या बाबतींत सुद्धा त्या मार्गाचा अवलंब करावा लागेल तर तो केला पाहिजे. कारण ज्या स्वातंत्र्याचा उल्लेख वर केलेला आहे त्यांत लहर, शिस्तीचा अभाव, अनियमितपणा ह्यांचा सुद्धा समावेश आहे. पण ही बाब सोडल्यास, प्रयोग इत्यादि स्पृहणीय बाबतींत व्यक्तींचें स्वातंत्र्य जाईल यांत शंका नाही. समाजाच्या उत्कर्षाकरिता तें जरूरीचें समजण्यांत आलें पाहिजे. गिरणींतील कामगारांचें स्वातंत्र्य जातें असें आपण मानत नाहीं तर तें स्वखुशीने झालेल्या सामुदायिक शेतींत जातें असें कां मानावें तें समजत नाही.

ग्रामदानाच्या दृष्टीने तर जमिनीचें व्यक्तिगत स्वामित्व विसर्जित झाल्यावर तें स्वामित्व ग्रामसभेकडे येतें. म्हणजेच जुन्या व्यक्तिगत स्वामित्वाचें सामूहिक स्वामित्वांत विलिनीकरण होतें. अशा व्यवस्थेंत जुन्या कल्पनांप्रमाणे व्यक्तिगत स्वामित्वाला कांही धक्का पोहोचणें अपरिहार्य आहे.

ग्रामदानांतून मोशाव्ह ओव्हदिम्सारखी ग्रामरचना होऊं शकणार नाही काय ? होऊं शकेल. गावच्या जमिनीची सुधारणा पूर्ण होईपर्यंत मात्र वारंवार जमिनीचें पुर्नवितरण करावें लागेल. इझ्राईलचा सुद्धा हाच अनुभव आहे. अर्थातच जमिनीच्या सुधाराची संपूर्ण जबाबदारी ग्रामसभेवर राहील.

किवुत्झ किंवा मोशाव्ह ओव्हदिमसारखी जमिनीची व्यवस्था, युगोस्लाविया-सारखी उद्योगाची व्यवस्था, त्यांत राबणाऱ्या कामगारांमार्फत व्होटर्स मीटिंग, ग्रामसभा, ग्रामसभांच्या समूहाला जास्तींत जास्त अधिकार, निरनिराळ्या धंद्यांत कमींत कमी आर्थिक विषमता, देशांत संपूर्ण लोकशाहीचें वातावरण इत्यादि सर्व योजनांच्या अमलांतून आदर्श समाजरचनेचा उगम होऊं शकेल.

आपल्या देशाच्या आजच्या परिस्थितींत हें कसें साध्य होईल ? व या मार्गांत अडचणी काय आहेत ? हे प्रश्न विचारणें जितकें सोपें आहे तितकेंच त्यांचीं उत्तरें देणें कठिण आहे. आपल्या देशाची ऐतिहासिक पार्श्वभूमि ही आहे की, स्वराज्याकरिता प्रामुख्याने चळवळ करणारी जी संस्था होती, तिची मुख्य प्रेरक शक्ति 'स्वराज्य-भावना' होती. इंग्रजी सत्ता घालवून तिच्या जागीं भारतीय सत्ता प्रस्थापित करणें हा काँग्रेसचा प्रमुख उद्देश होता. स्वराज्यानंतर तिचें ध्येय जरी आवडीला बदललें असलें, तरी त्या ध्येयाच्या प्राप्तीकरिता जी जाज्वल्यता पाहिजे ती आज काँग्रेसमध्ये दिसत नाही. संपत्ति व जुने अधिकार यांना संरक्षण देण्याकडेच तिचा कल आहे. येरवी एवढया गरीब देशांतील एवढी मोठी विषमता तिला मानवणें शक्यच झालें नसतें. काँग्रेसची जी आज अध्वर्यू मंडळी आहेत त्यांच्या मनांत अधिकाराचा उपयोग समाजावादाचें वातावरण देशांत निर्माण करण्याकरिता करावा अशीं लक्षणें दिसत नाहीत. गुलामगिरीविरुद्ध आत्यंतिक चीड ही जशी स्वातंत्र्यपूर्व काळांत लोकप्रियेतेची खूण होती तशी पुंजीवादाविषयी आत्यंतिक चीड ही आज काँग्रेसमध्ये लोकप्रियतेची खूण नाही. उलट बरेचसे काँग्रेसश्रेष्ठी हे स्वतःच पुंजीवादी मनोवृत्तीचे आहेत. व अजूनहि काँग्रेस हाच पक्ष लोकमानसांत रुजलेला आहे. म्हणून आपल्या देशाचें समाजवादाकडे जाणारें पाऊल फार मंद गतीने पडत आहे.

पंडित नेहरू यांनी काँग्रेसला समाजवादाकडे द्रुतगतीने नेण्याचा बराच प्रयत्न केला आहे. आवडीचा ठराव व नागपूरचा ठराव हें याचें द्योतक आहे. पण पुष्कळांना असें कोडें पडलें आहे की, लोकशाहीच्या मर्यादांमुळे पंडित नेहरू जास्त प्रभाव पाडूं शकत नाहीत. किंवा जॉन गंथर यांनी आपल्या 'इनसाइड एशिया' या पुस्तकांत म्हटल्याप्रमाणे "ते डावीकडे पाहतात व उजवीकडे चालतात" (ही लुक्स लेफ्ट अॅण्ड वॉक्स राईट) यांतच सत्य आहे ? माझ्या मतें पहिली बाब जास्त खरी आहे. आपल्या देशांत पुंजीवाद इतका रूढ आहे की, लोकशाहीच्या मार्गाने त्याचें उच्चाटन होण्याला कालावधि लागणें स्वाभाविक आहे. याकरिता एक फार मोठें आंदोलन व्हावयास पाहिजे. तें आन्दोलन करण्याची शक्ति आज काँग्रेस पक्षांत नाही व काँग्रेस संघटनेमार्फतच पंडित नेहरू काम करूं शकत असल्यामुळे या मर्यादेच्या बाहेर ते जाऊं शकत नाहीत.

यावरून निष्कर्ष हा निघतो की, दुसरा प्रभावी पक्ष निर्माण होईपर्यंत हें असेंच चालावयाचें; किंवा अशी एखादी परिस्थिति निर्माण होईल की, जीमुळे सर्व प्रगतिशील पक्ष एकत्र येऊन देशांत एक नवचैतन्य निर्माण करतील व देशाची गति आणखी वाढेल. आज देशांत असमाधानाची व वैफल्याची भावना फार मोठ्या प्रमाणांत पसरली आहे, हें सर्वच कबूल करतील. तरूण-वर्गांत ध्येयवाद

व कर्तृत्वशक्ति दिसत नाही पंडित नेहरूंना सुद्धा हें दु:खाने कबूल करावें लागलें. आपल्या देशांतील कोटयवधि गरीबांची परिस्थिति सुधारणें, जीवनांत ज्या सुखसोयी आज वरच्या वर्गाला मिळत आहेत त्या सार्वत्रिक करण्याचा प्रयत्न करणें याशिवाय दुसरें ध्येय तें काय असूं शकतें ? देशभक्तीचा तरी अर्थ हाच नाही काय ? आमचा तरुणवर्ग बेशिस्त, सुखासीन, चारित्र्यहीन व ध्येयहीन कां आहे ? शेवटी प्रश्न असा येतो की, हें सर्व घडवून आणण्यांत सरकारची जबाबदारी किती व जनतेची किती ? लोक-कल्याणकारी राज्य म्हटलें की, सर्व जबाबदारी सरकारची आलीच. या बाबत 'राजा कालस्य कारणम्' हें पुष्कळ अंशीं खरें वाटतें. जीवनाच्या सर्व क्षेत्रांत सरकारने पदार्पण केल्यामुळे कांहीहि बिघडलें तरी त्याबाबत सरकारवर दोष येणें स्वाभाविक आहे.

आजच्यापेक्षा जास्त त्वरित गतीने जाण्याची सरकारची तयारी नसावी किंवा सरकारला प्रामाणिकपणें असें वाटत असावें की, आपण यापेक्षा जास्त वेगानें पुढे गेल्यास आपल्या पाठीमागचें लोकमतच चाललें जाईल. कदाचित् दोन्ही बाबतींत थोडेसें सत्य असावें. एवढें मात्र खरें की, शासन व पक्ष या दोहोंच्याहि प्रभावी नेतृत्वाशिवाय मोठ्या प्रमाणांत जनजागृति होणें शक्य नाही. साम्यवादी देशांचाहि हाच अनुभव आहे.

लोकशाहीच्या पद्धतींत आणखी ऐक वैगुण्य हें आहे की, एखाद्या पुरोगामी कार्यक्रमाचा अवास्तव फायदा इतर विरोधी पक्ष घेतील या भीतीने एकतर असे कार्यक्रमच पुढे येत नाहीत व आले तरी ते जोर धरत नाहीत. ही लोकशाहीची शक्ति आहे व तीच तिची कमजोरीहि आहे. सर्व-पक्षसंमत कार्यक्रम निघल तरच ही परिस्थिति टळूं शकेल. सर्व पुरोगामी पक्ष एकत्र येण्यात काय अडचण आहे ? समाजवादी, कॉंग्रेस, कॉम्युनिस्ट या सर्वांनाच समाजवाद हवा आहे. मग हे सर्व पक्ष एकत्र येऊन एक कार्यक्रम कां निश्चित करूं शकत नाहीत ? याशिवाय लोकशाहीच्या पद्धतींत त्वरित प्रगतीची आशा कठिण दिसते.

★ ★ ★

युगोस्लावियांतील वास्तव्याची

# दैनंदिनी

## शनिवार ता. ११-४-५९

शेवटी उशीरा का होईना, पण माझी फार दिवसांची इच्छा पूर्ण होण्याचीं लक्षणें दिसूं लागलीं. चीनवरून परत आल्यावर लगेच युगोस्लावियाला जाऊन तेथील आर्थिक, सामाजिक व राजकीय परिस्थितीचा अभ्यास करावा अशी मला सारखी प्रेरणा होऊं लागली होती, एवढें युगोस्लावियाचें वैशिष्टय काय होतें ? मीं असें ऐकलें होतें की, तिथे नियोजित अर्थव्यवस्था असून सुद्धा खुल्या बाजारपेठेची सोय आहे. चीनमध्ये कुठेहि गेलें तरी एकच किंमत आढळते तशी तेथे परिस्थिति नाही. आपला माल विकला गेलाच पाहिजे अशी दुकानदाराची आतुरता आम्हांला चीनमध्ये दिसली नाही. दुकानदार उर्मट दिसत नव्हता परंतु गिऱ्हाईकाने माल घेतला किंवा न घेतला तरी त्याबद्दल तो बेफिकीर व निश्चिंत दिसत होता. त्याचें कारणहि उघडच होतें. दुकानदाराला पगार मिळत असे. मालाच्या खपावर त्याचा चरितार्थ अवलंबून नसे व एकंदर उत्पादनच कमी असल्यामुळे सर्व चीनमध्ये बाजारपेठ दुकानदारांचीच होती. It was a sellers' market. तुम्हांला माल पाहिजे असेल तर घ्या, नाही तर दुसरा कुणी तरी तो घेईलच. व तो खपला नाही तरी जबाबदारी सरकारचीच. न खपणारा माल म्हणून कांही काळाने रिपोर्ट व्हावयाचा व मग थोडया किंमतींत तो विकून टाकण्याचा हुकूम मिळवावयाचा.

युगोस्लाविया हा सुद्धा कॉम्युनिस्टच देश. मार्क्सिस्ट व लेनिनिस्ट तत्त्वज्ञानावरच तो आधारलेला. पण तिथे आपला माल विकण्याची जबाबदारी दुकानदारावर आहे. व आपला माल खपविण्याची जबाबदारी कारखानदारावर आहे. अर्थातच त्यामुळे दुकानदाराला किंवा कारखानदाराला विशेष जागरूकता ठेवावी लागते. पण हें सर्व होतें कसें ? यामुळे पुंजीवादी (capitalist) विचारसरणीचा प्रादुर्भाव तर होत नाही ? व तो तसा होऊं नये म्हणून काय काळजी घेण्यांत येते ? वगैरे वगैरे पुष्कळ प्रश्नांचें काहूर माझ्या मनांत उठलें होतें व नियोजित अर्थव्यवस्थेंत (प्लॅन्ड एकॉनमींत) स्वातंत्र्य कसें राहूं शकतें हें जाणण्याची खूप जिज्ञासा होती. हें स्वातंत्र्य केवळ किमतीच्याच क्षेत्रांत नाही तर सर्वसाधारण व्यवहारांत सुद्धा आहे. म्हणजे युगोस्लावियांतील कॉम्युनिस्ट पार्टीचें असेंच मुळी म्हणणें आहे की, रशियांत नोकरशाहीची दडपशाही व दरारा फार झाल्यामुळे खरी लोकशाही तिथे नाहीच व आम्हीं आपल्या देशांत शासनाची अधिसत्ता संपुष्टांत आणून त्याऐवजी जनतेच्या स्वयंस्फूर्त सहकार्यावर अवलंबून असलेल्या संस्था स्थापन केल्या आहेत. म्हणून चीनमधून आल्यानंतर मी युगोस्लाव्ह एम्बसींत जाऊन तिथून युगोस्लावियावरील बरींच पुस्तकें घेऊन आलों होतों.

तशांत जयप्रकाशजींसारख्यांनी १५-२० देश फिरून आल्यावर नेमकी युगोस्लावियाचीच निवड करावी हीहि एक विशेषच गोष्ट वाटूं लागली.

अगोदरच कॉम्युनिस्ट विचारसरणीबद्दल जयप्रकाशजींना विशष वावडें. आणि युगोस्लाविया हा बोलूनचालून कॉम्युनिस्ट देश. परंतु अशा देशांत सुद्धा अभ्यासण्यासारख्या कांही विशेष बाबी आहेत अशी त्यांची खात्री झाल्यावरच या टीमची कल्पना त्यांना सुचली. इतर देशांत फारसें घेण्यासारखें त्यांना दिसलें नाही हाच नाही का निष्कर्ष यावरून निघत ?

* * *

## रविवार ता. १२-४-५९

सध्या मी युगोस्लावियावरील साहित्य वाचत आहे. साहित्य चांगलें मिळालें आहे. विशेषत: युगोस्लावियाचे मुख्य तत्त्वज्ञानी एडवर्ड कार्डेल यांचें लिखाण फारच प्रगल्भ व मुद्देसूद दिसलें. नियोजित अर्थव्यवस्थेंतून देशाची प्रगति लौकर होतें हें जरी मान्य केलें, तरी कॉम्युनिस्ट राष्ट्रांत समाजवादी नियोजित अर्थव्यवस्थेचें जें स्वरूप दिसूं लागलें त्यामुळे जगांतील सामजवादाच्या प्रगतीला धक्काच बसला असें म्हणावयास हरकत नाही. कॉम्युनिस्ट राष्ट्रांतील समाजवाद म्हणजे, (१) व्यक्तिस्वातंत्र्याचा नाश, (२) कॉम्युनिस्ट पक्ष व देशांतील सरकार यांचें एकीकरण, (३) अनियंत्रित सत्तेमुळे होणारें विचारांचें व आचारांचें दमन, (४) इतर पक्षांना बिलकुल वाव नसणें, (५) राष्ट्रीय वृत्तीचा त्याग व रशियाच्या पुढारीपणाखाली आंतरराष्ट्रीय वृत्तीचा अंगीकार, (६) कॉम्युनिस्ट पक्ष व सरकार यांच्या हातीं असलेल्या अनिर्बंध सत्तेमुळे स्वाभाविकपणेंच होणारा नेतृत्वाचा ऱ्हास व (७) एका व्यक्तीचें फाजील महत्त्व वाढणें. ह्या दोषांमुळे मानवी मूल्यांना महत्त्व देणाऱ्या सर्व विचारवंतात आजकाल कॉम्युनिस्ट राष्ट्रांविषयी व कॉम्युनिस्ट पद्धतीविषयी एक प्रकारची बेदिली व अश्रद्धा निर्माण झाली आहे. रशियाच्या कॉम्युनिस्ट पार्टीच्या विसाव्या अधिवेशनांत ख्रुश्चेव्ह यांनी स्टालिनच्या राजवटीचा जो इतिहास सांगितला त्यामुळे तर आतापर्यंत कट्टर अशा प्रामाणिक कॉम्युनिस्टांच्या मनांत सुद्धा 'आपलें कुठे कांही चुकत तर नाही ना ?' या शंकेने प्रवेश केला. अशीं कांही उदाहरणें स्वत: माझ्या निकटच्या परिचयाचीं आहेत. सोव्हियट रशियाने मार्क्सिस्ट व लेनिनिस्ट तत्त्वज्ञानाप्रमाणे आपला सामाजिक व आर्थिक विकास करण्याच्या दृढ निश्चयाला अनुसरून सुरवातीचीं पावलें जरी बरोबर टाकलीं तरी पुढे पुढे व विशेषत: स्टालिनच्या नंतरच्या कारकिर्दींत रशियन तत्त्वज्ञान परिस्थित्यनुरूप विकास पावूं शकलें नाही. पक्ष व सरकार यांच्या अनियंत्रित सत्तेमुळे त्यांत विकृति निर्माण होऊन, व्यक्तिस्वातंत्र्य व प्रामाणिकपणा याचा जवळ जवळ खूनच रशियांत पडला व प्रचलित सत्ताधाऱ्यांच्या पुढे मान लवविण्याऱ्या लोकांची प्रजा

निर्माण होऊन मानवी मूल्यें नष्ट झालीं. याचें एक सुंदर उदाहरण ख्रुश्चेव्हनी २० व्या पार्टीला केलेल्या निवेदनाच्या वेळचें आहे. विसावी पार्टी कांग्रेस चालू असातांना ख्रुश्चेव्हच्या भाषणाच्या वेळीं एक चिठ्ठी त्याच्या हातांत देण्यांत आली. श्रोतृवर्गांतून कुणीं तरी ती त्याच्याकडे पाठविली होती. चिठ्ठी वाचून ख्रुश्चेव्ह म्हणाला, 'कुणीं ही चिठ्ठी लिहिली?' कुणीच उठलें नाही. त्याने पुन्हा एकदा तोच प्रश्न विचारला. पुन्हा तोच प्रकार. कुणीच पुढे आलें नाही. तेव्हा ख्रुश्चेव्ह म्हणाला, 'आता तुम्हांला समजलें मी स्टालिनच्या जिवंतपणीं याबाबत कां टीका करूं शकलों नाही तें? ज्याने ही चिठ्ठी लिहिली तो गृहस्थ ज्या कारणास्तव पुढे येत नाही, नेमकें तेंच हें कारण. स्टालिनच्या हयातींत मीं टीका केली असती तर तुमच्यापुढे आज मी उभा राहिलोंच नसतों. चिठ्ठींत मला विचारण्यांत आलें की, स्टालिनच्या हयातींत मला हें सर्व माहीत असतां मीं त्याला उघडपणें विरोध कां केला नाही? त्याचें हें उत्तर आहे.' त्यामुळे पूर्व यूरोपांतील नवीनच बनलेल्या कॉम्युनिस्ट राष्ट्रांत राष्ट्रीय वृत्तीला वाव न मिळाल्यामुळे त्यांना रशियाचे उपग्रह बनावे लागले, त्यांचा विकास योग्य तऱ्हेनें झाला नाही व अगदी बंडखोरीपर्यंत जेव्हा तेथल्या जनतेची विरोधी वृत्ति कळसाला गेली तेव्हा कुठे रशियाने पोलंड व हंगारी इत्यादि देशांत आपले पंजे ढिले केले, हा एकंदर रशियावरचा आरोप. युगोस्लावियाचें म्हणणें असें की, रशियाच्या अंधानुकरणाच्या या महापुराला एकटचा ह्या राष्ट्रानेंच अडविण्याचा प्रयत्न केला. त्यामुळे त्याला अत्यंत कठिण परिस्थितींत राहून दिवस काढावे लागले. जवळजवळ वाळींत पडल्यासारखें त्याला राहावें लागलें व रशियाची वक्र दृष्टि सहन करावी लागली, तरी हें सर्व सहन करून त्याने जगाला एक नवीन दर्शन घडवून दिलें आहे. समाजवाद व मानवी स्वातंत्र्य ह्या परस्परविरोधी बाबी नाहीत. एवढेंच नव्हे तर दोघांचा बेमालूम असा जेव्हा संयोग होईल तेव्हाच खऱ्या समाजवादाच्या प्रगतीचीं पावलें कशीं पडलीं पाहिजेत याचें मार्गदर्शन होऊं शकेल. समाजवादी व्यवस्थेंत मानवी स्वातंत्र्याचा उत्तरोत्तर विकास व्हावयाला पाहिजे. त्याची गळचेपी व्हावयास नको. आज समाजवाद व मानवी स्वातंत्र्य या परस्परविरोधी बाबी आहेत असें जें ऐतिहासिक दर्शन तथाकथित समाजवादी राष्ट्रांत दिसून येतें ती एक विकृति आहे. आम्ही त्यांतून बचावलों व आमचा अनुभव अगदी याच्या विरोधी आहे हें त्यांचें थोडक्यांत म्हणणें. या निर्णयावर ते कसे आले, त्याकरितां त्यांनी काय केलें व त्याचे परिणाम ते म्हणतात तसेच झाले काय हेंच खरोखर युगोस्लावियांत जाऊन पाहावयाचें.

या एकंदर प्रक्रियेचें एक तात्त्विक दर्शन त्यांच्या साहित्यांत पाहण्यास मिळतें. पण एवढ्याने माझें समाधान होईना. माझी अशी एक प्रवृत्ति आहे

की, कोणताहि निर्णय घेण्यापूर्वी दोन्ही बाजू पूर्णपणें समजून घ्यावयाच्या. चीनला जाण्यापूर्वी चीनबाबत भिन्नभिन्न दृष्टिकोणाचें बरेंचसें साहित्य मीं वाचलें होतें. युगोस्लावियाच्या तर्फेचें साहित्य तर मी वाचत आहेच. याशिवाय रशियाचें म्हणणें काय आहे हें समजून घेण्याचा प्रयत्न केला पाहिजे या विचारांतून कांही कॉम्युनिस्ट मित्रांना मीं पत्रें लिहिलीं व एकाने तर एक चोपडें मला आणून दिलेंहि. त्यांत इतर सर्व समाजवादी पक्षांचे युगोस्लावियाबाबत काय आक्षेप आहेत याचें मुद्देसूद वर्णन आहे. असेंच आणखीहि साहित्य मिळाल्यास ठीक होईल.

* * *

## गुरुवार ता. १६–४–५९

ता. २०–४ ला श्री जयप्रकाशजी युगोस्लावियांत जाणाऱ्या टीमचें मार्गदर्शन करणार आहेत. तेथील सरकार व कॉम्युनिस्ट पक्ष यांचें असें म्हणणें आहे की, समाजवादी समाजरचनेंत, रशिया व इतर समाजवादी राष्ट्रांत दिसून येणारे दोष येथे टाळले आहेत. तेव्हा ही बाब अगदी ठळकपणें व ठसठशीतपणें नजरेंत भरावयास पाहिजे. म्हणजे इतर समाजवादी राष्ट्रांत दिसून येणारे फायदे, उदाहरणार्थ लोक कामांत गढलेले दिसणें, लोकांच्या आर्थिक जीवनांत बरीच जास्त समानता, स्त्रियांच्या मुक्तीच्या दृष्टीने परिस्थितींत आणि विचारांत व आचारांत झालेला बराच मोठा फरक, वेश्याव्यवसायाचें व भिक्षेचें अुच्चाटन, देशाच्या आर्थिक विकासाचा दृश्य परिणाम म्हणून आर्थिक विषमता कमी होणें इत्यादि, हे तर युगोस्लास्लावियांत दिसलेच पाहिजेत पण त्याबरोबरच पाश्चात्य लोकशाहींतील स्वातंत्र्य, विकेंद्रीकरण, जबाबदारीची भावना इत्यादि गुणांचा परिपोष सुद्धा युगोस्लावियांत दिसून आला पाहिजे. किंवा याच्या अगदी उलट म्हणजे दोन्ही पद्धतींचे केवळ दोष युगोस्लावियांत पाहावयाला मिळावे व सद्‌गुणांचा लोप झालेला दिसावा. कांही पाश्चात्य राष्ट्रांचें तर असेंच म्हणणें दिसतें !

याच् दृष्टिकोणांतून युगोस्लावियांतील वातावरण कसें आहे हें पाहिलें पाहिजे. मुख्य प्रश्न वातावरणाचा आहे. त्याचें निरीक्षण करणें व त्याबाबत निर्णय घेणें हाच आमच्या अभ्यासाचा मुख्य विषय असला पाहिजे. वरपांगी तर सर्व देशांत सारखीच परिस्थिति दिसावयाची. आजकालच्या यांत्रिक युगांत शहरांमध्ये तर या बाबतींत पूर्ण समानता आलेली दिसते. तीच मौज, त्याच इमारती, तींच हॉटेलें, तेच कारखाने, तींच उद्यानें व त्यांत इतःस्ततः फिरणारे तेच लोक, हें सर्व दृश्य सर्वत्र एकच. या सर्व लोकांच्या मनांत काय चाललें आहे, सरकार-

अनुक्रम ...........
क्रमांक ........... नों: दि: ......


विषयी व प्रमुख राजकीय पक्षांविषयी त्यांचें काय मत आहे, सरकार व जनता यांचे परस्पर संबंध कसे आहेत, व्यक्तिस्वातंत्र्यावर जोर दिल्यावर तेथील वातावरणांत व लोकशाही राष्ट्रांतील वातावरणांत काय फारक आहे, हें खरोखर पाहिलें पाहिजे. त्यानंतर ज्या संस्थांतून हें वातावरण निर्माण होण्याला मदत झाली त्या संस्थांचा अभ्यास केला पाहिजे. युगोस्लावियांत या संस्था मुख्यत्वें (अ) कॉम्युन्स, (ब) कामगारांची व्यवस्था (वर्कर्स मॅनेजमेंट), (क) विकेंद्रित शासनपद्धति व (ड) प्रत्यक्ष लोकशाही (डायरेक्ट डेमॉक्रसी) या आहेत.

* * *

## सोमवार ता. २०-४-५९

आज सायंकाळीं श्री जयप्रकाशजींनी आमच्या टीमला मार्गदर्शन केलें. ते फक्त एकच आठवडा युगोस्लावियांत राहिले पण तेवढ्या वेळांत त्यांनी तेथें जें कांही पाहिलें त्यावरून त्यांना असें वाटूं लागलें की, आणखी बारकाईने ह्या गोष्टी पाहिल्या पाहिजेत. एवढेंच नव्हे तर राजकीय किंवा आर्थिक विषयांचे जे तज्ज्ञ आहेत त्यांच्याकडून हें निरीक्षण झालें पाहिजे; म्हणजेच खऱ्या परिस्थितीची जाणीव होईल. युगोस्लावियांतील तत्त्वज्ञांचें म्हणणें हें की, खाजगी मालमत्ता नष्ट करून तिच्या जागीं समाजाची मालकी स्थापन केल्याबरोबर परिस्थितिच अशी निर्माण होते की, तीमुळे नोकरशाहीची सत्ता वाढते. नोकरशाहीची सत्ता वाढली की, त्याच प्रमाणांत लोकांचा अभिक्रम (initiative) कमी होतो. व त्यामुळे एक दुश्चक्र सुरू होतें. लोकांचा अभिक्रम कमी झाल्यामुळे सरकार नोकरशाहीच्या सत्तेवर जास्त अवलंबून राहतें. व ज्या प्रमाणांत नोकरशाही चोख रीतीने (efficiently) काम करूं शकेल त्याच प्रमाणांत कामाची व्याप्ति व कस (Quality and quantity) अवलंबून राहील. याबाबत कार्डेल म्हणतात, "A system like that, of course, is dependant exclusively upon the better or poorer functioning of the state apparatus. With that object Stalin introduced a specific system as well in the economic functioning of that apparatus. The apparatus gets better pay provided it keeps achieving better results. This economic stimulant then does not serve the maximum incentive to the creative initiative of those doing the work, but above all, it encourages the system

which should exercise control over those actually working. Thereby the state managing apparatus begins to enjoy an entirely specific economic position in social relationships." आणि हें पाहा, "In carrying out its functions in the economy the state tends to deprive the economy of its internal driving forces in order to establish and present itself as a social necessity........ The inevitable result is a growing tendency towards greater centralisation of power and closer association of the state and party machinery which grows stronger and stirner to divorce themselves from society and impose their power on it......and they (bureaucracy and bureacaratic deformities) strive to transform the state administration into the master of society instead of its servant and executive agent."

आम्हांला हे अनुभव आले व म्हणून आम्हीं त्यांतून वांचण्याकरिता समाजांतील संबंधांना नवीन आकार देण्याचा प्रयत्न केला. 'A new orientaion and form to social relationships' यांतून workers' councils ची कल्पना निघाली. कोणतीहि enterprise म्हणजे उद्योग, ह्यावर मालकी समाजाची असल्यामुळे केवळ चालविण्याकरिता तो काम करणाऱ्यांच्या स्वाधीन केल्यामुळे समाजाचें नियंत्रण workers' councils वर असलें पाहिजे. म्हणून peoples' committees व communes च्या चौकटींत उद्योगांना बसविलें आहे. सरकारच्या बरोबर पक्षाची सत्ताहि बळावत जाते, सरकार व पक्ष यांचें समीकरण व बेमालूम मिश्रण बनतें. तें टाळण्याकरिता पक्षाचें विसर्जन झालें पाहिजे. म्हणूनच सरकारच्या बरोबरच पक्षाचेंहि विसर्जन झालें पाहिजे. The withering away of the state and the party must be simultaneus and proceed almost on parallel lines म्हणून त्यांनी communist पक्षाला विसर्जित करून त्याला league of yugoslav communists असें नांव दिलें व socialist alliance या व्यापक नांवाखाली जनतेची संघटना करण्याचा यत्न केला आहे. त्याचप्रमाणे निवडणूका एका विशिष्ट तऱ्हेनें तिथे होत असतात. त्यांतून व्यक्तिगत भावनांना आपल्याकडे जेवढें प्राधान्य मिळतें तेवढें तेथे मिळत नाही. (जयप्रकाशजींनी निवडणुकीच्या पद्धतीचें वर्णन केलें.) तेथील उद्योगांबाबत त्यांनी सांगितलें की, शास्त्रीय शोधांमुळे

व पॉवरच्या वापरामुळे केंद्रीकरण होतें व जनतेची शक्ति नोकरशाहींत येते, अशी जी येथे आपली कल्पना आहे ती त्यांची नाही. ते म्हणतात की, त्यांचा अनुभव याच्या उलट आहे. म्हणजे उद्योग व शेती किंवा ग्रामोद्योग यांचें सामंजस्य कसें प्रस्थापित होऊं शकतें हेंहि पाहिलें पाहिजे.

जयप्रकाशजींनी स्वीडनच्या कारखानदारांचें उदाहरण दिलें. त्यांचा अनुभव असा आहे की, स्वीडनमध्ये मजुरांना आपल्या कारखान्याविषयी कांहीच चिंता वाटत नाही. त्यांची सर्व चिंता आपल्या सुट्टचा चागल्या कशा जातील, आपणांस जास्त सुखांत कसें राहतां येईल याबद्दलच असते. जेव्हा युगोस्लावियांत हा प्रश्न त्यांनी विचारला की, पुढारलेल्या स्वीडनमध्येहि ही परिस्थिति आहे तर मागसलेल्या युगोस्लावियांत तींत एवढा फरक कां असवा ? तेव्हा त्यांनी उत्तर दिलें की, हा फरक समाजातील संबंधांचें नातें बदलल्यामुळे झाला आहे. A change in the quality of social relationships.

मग मी असें म्हणालों की, राष्ट्रप्रेम आणि आपली आर्थिक परिस्थिति सुधारण्याची इच्छा यामुळे सुद्धा ही वृत्ति जागृत होऊं शकेल.

शेवटी प्रश्न असा उद्‌भवतो की, आम्हीं युगोस्लावियांत काय पाहावयाचें ? कोणत्या दृष्टिकोणांतून पाहावयाचें ? नोकरशाहीविरुद्ध अुठाव, पक्षाच्या विलिनीकरणाला सुरवात, कामगाराना उद्योग देणें व विकेंद्रीकरण करणें या सर्व बाबी मुळांतच चागल्या. हेंहि खरेंच की, केवळ दिखावटीकरिता त्या युगोस्लावियाच्या नेत्यांनी उचलल्या नाहीत. त्याकरिता स्टालिनशीं व नंतर ख्रुश्चेवशीं त्यांनी हाडवैर पत्करलें व वाळींत राहण्याचें मनोधैर्य दाखविलें. या सर्व बाबींचें मूल्यमापनच तेवढें करावयाचें. म्हणजे त्यापासून माणसांच्या परस्परांच्या व्यवहारांत भावनात्मक (snbiectiue) फायदे काय झाले व प्रत्यक्ष आर्थिक व्यवहारांत काय फायदे झाले हें पाहतां येईल. पहिल्या सदरांत सरकारी नोकरांच्या लोकांशीं होणाऱ्या व्यवहारांत व वृत्तींत फरक, लोकांची त्यांच्याकडे पाहण्याची बदललेली दृष्टि, पक्षांतील लोकांची साधारण जनतेंत मिसळण्याची वाढलेली प्रवृत्ति आणि कामगारांमध्ये वाढती जबाबदारीची जाणीव व वृत्ति ह्या बाबी येतील. व या सर्वांचा प्रत्यक्ष परिणाम वाढत्या उत्पादनांत व नोकरशाहीवर होणाऱ्या कमी खर्चांत झाला पाहिजे. असा अनुभव युगोस्लावियांत आला किंवा नाही ? पक्षरहित लोकशाही (पार्टीलेस डेमॉक्रसी) च्या प्रयोगांतून निवडणुकींत दिसून येणारी अहमहमिका, पारस्परिक द्वेष, मत्सर या प्रवृत्तींवर नियंत्रण झालें काय ? हे सर्व फायदे दिसत नसल्यास त्याची कारणें काय ही एकंदर पाहण्याची दृष्टि असावी. ह्या सर्व बाबी हळूहळू वाढणाऱ्या आहेत. त्यांचें मूल्यमापन विहंगम दृष्टीनेच (in a perspective) केलें पाहिजे. नव्या परिस्थितींत जून्या परिस्थितीच्या तुलनेंत काय बदल होतो

हीच नव्या संस्थांच्या मूल्यमापनाची कसोटी राहील. आमच्यापैकी कोणीहि यापूर्वी युगोस्लावियांत गेलेला नाही. तिघांनी तर हिंदुस्थानांबाहेर कधीहि प्रवासच केलेला नाही. याशिवाय आम्ही सर्व लोकशाही व स्वातंत्र्य यांचा पूर्णपणें उपभोग घेणाऱ्या देशांतून आलों आहोंत. ही बाब लक्षांत घेऊनच युगोस्लावियाच्या परिस्थितीचें व त्यांत झालेल्या बदलाचें परीक्षण व मूल्यमापन आम्हीं केलें पाहिजे.

* * *

## गुरुवार ता. २३–४–५९

आज जयप्रकाशजींची दुसरी बैठक झाली. तत्पूर्वी थोडा वेळ माझी व त्यांची खाजगी भेट झाली. मीं त्यांना माझे विचार सागितले. सर्वोदयाचा अर्थ व्यक्ति व समाज यांच्यामधील आदर्श संबंध (A perfect balance between the individual and society) असा घेतला तर या दृष्टिकोनांतून युगोस्लावियांतील विकेंद्रीकरण, पक्षरहित लोकशाही, कामगारांची व्यवस्था (management) इत्यादि बाजूंकडे पाहिलें पाहिजे त्यांतून मानवा-मानवांतील संबंधांत काय फरक पडला व आधिभौतिक प्रगति किती झाली हें पाहतां येईल. त्याचप्रमाणे टिटो व जिलास यांच्यांतील जो मुख्य फरक म्हणजे लोकशाहींतून समाजवाद की समाजवादांतून लोकशाही हा लक्षांत घेऊन समाजवादांतून येऊं घातलेल्या लोकशाहींत काय अडचणी आहेत, तिचें काय भविष्य आहे, तिच्यांत व कॉम्युनिस्ट राष्ट्रांत चाललेल्या लोकशाहींत काय फरक आहे हेंहि पाहतां येईल. जयप्रकाशजी म्हणाले की, फार खोल तात्त्विक विचारांत न जातां तेथील विचारांचें व व्यवस्थेचें प्रत्यक्ष स्वरूप पाहून तुम्हीं आपलें मत बनविलें पाहिजे. साधारणपणें अशी आपली समजूत आहे की, हिंसेंतून अहिंसेच्या वातावरणांत जातां येत नाही. गांधीजी सुद्धा असेंच म्हणाले की, हिंसेंतून जास्त हिंसा निघणार. पण युगोस्लावियामध्ये जो प्रयत्न सुरूं आहे तो याच्या विरुद्ध आहे. त्यांची राज्यक्रांति हिंसेंतूनच झाली. पण आता ते, आपण अहिंसेशीं जोडतों तशा पद्धतीचें शासन आणूं पाहतात. हा प्रयोग कितपत सफल झाला आहे हाहि एक पाहण्याचा दृष्टिकोण होऊं शकतो. हिंसेंतून प्रतिहिंसाच निघाली हा दृष्टिकोण तितकासा बरोबर नाही. हिंसेंतून सुद्धा मानवाच्या प्रगतीचीं साधनें निर्माण झालीं आहेत. फ्रेंच राज्यक्रांतींतूनच आधुनिक लोकशाही व पुंजीवादांतूनच आजची प्रचुरता व समाजवाद निर्माण झाला. म्हणन हिंसेचा आश्रय घेऊन सुद्धा त्यांतून चांगलें निघूं शकतें हाहि पाहण्याचा दृष्टिकोण असावा. त्याचबरोबर आधुनिक यंत्रें व शास्त्रीय ज्ञान यांच्या वापरावर कांहीहि नियंत्रण न ठेवतां आम्ही विकेंद्रीकरणांकडे

जात आहों हा जो त्यांचा दावा आहे त्याचेंहि परीक्षण केलें पाहिजे. श्री जयप्रकाशजींनी असें सांगितलें की, १०–१२ हजार कामगारांचा एक मोठा कारखाना त्यांना दाखविण्यांत आला व त्यांत निरनिराळीं खातीं विकेंद्रित रूपानें काम करीत होतीं. तसेंच त्यांच्या रेल्वेचे झोन्स पडले असून प्रत्येक झोन विकेंद्रित पद्धतीनें काम करीत आहे. ही व्यवस्था विस्तारानें पाहून या असा त्यांनी सल्ला दिला.

विकेंद्रीकरण व स्वयंपूर्ति यांचे परस्पर संबंध काय असावे असा प्रश्न मीं विचारला. स्वयंपूर्तीच्या विचारांत संकुचित स्वार्थभावना तर येत नाहीना असें मला अलीकडे वाटूं लागलें आहे. माझ्या सभोवतालची जी परिस्थिति असेल तिचा मी माझ्याकरिता व माझ्या समाजाकरिता पूरेपूर उपयोग केला पाहिजे. स्वयंपूर्तीकरिता उत्पादन झालें नाही तर एखाद्या व्यवस्थापकवर्गाची जरूरी भासेल. पण कितीहि स्वयंपूर्ति झाली तरी कांही प्रमाणांत व्यवस्थापकवर्ग लागणारच. या कोंडींतून तारतम्यानेच मार्ग काढावा लागेल. व्यवहाराचा युनिट फार लहान असून उपयोगी नाही. तो फार लहान असला तर आर्थिक कोंडमारा होईल. फार मोठा असला तर बाहेरील व्यवस्थापक-वर्गावर अवलंबून राहावें लागेल. आज तरी जगांत राष्ट्रापुरती या विचाराची व्याप्ति दिसते.

परंतु हें सर्व तात्त्विक विचार आम्हांला केलेच पाहिजेत. त्यांतून निसटून कसें चालेल ? मग या टीमचा उपयोग तरी काय ? राज्यशास्त्र, अर्थशास्त्र यांतील निष्णात माणसें जर आमच्याबरोबर दिलीं आहेत तर तीं या सर्व प्रश्नांचा सांगोपांग विचार करण्याकरिताच. निदान माझ्यापुरती तरी मी याची काळजी घेईन व या सर्व प्रश्नांबाबत आमच्या टीममधील लोकांचें काय म्हणणें आहे तें समजून घेण्याचा प्रयत्न करीन. एवढें मात्र खरें की, केवळ तात्त्विक चर्चेंत फसून जें पाहण्याचें आहे व जें समजून घेण्याचें आहे त्याकडे दुर्लक्ष व्हावयास नको.

याच सदरांतील आणखी एक प्रश्न म्हणजे लोकशाहीचा. खरी लोकशाही पद्धति कोणती म्हणावयाची ? जशी लोकशाही पक्षविरहित असूं शकते तशीच ती निवडणूकविरहितहि असूं शकेल काय ? आमचा म्हणजे सर्वोदयी लोकांचा सर्वानुमतीबद्दल जो आग्रह आहे त्याचें पर्यवसान निवडणुकविरहित लोकशाहींतच आहे. पक्षांची निर्मिति निवडणुकीच्या पद्धतींतून होते की, अधिकाराच्या लालसेंतून ?

टिटो व व जिलास यांच्या मतभेदांचें कारण कोणतें ? जिलासचें म्हणणें असें की, अगोदर लोकशाही येणार व तींतून खरा समाजवाद पुढे येणार. टिटोचें म्हणणें असें की, समाजवादाच्या खऱ्या आचरणांतूनच लोकशाहीची निर्मिति होईल.

युगोस्लावियाच्या आजच्या परिस्थितींत टिटोचें म्हणणें जास्त वास्तववादी वाटतें. कारण क्रांतीचें रूपांतर जर पक्षरहित लोकशाहींत व्हावयाचें असेल तर आहे त्या एकाच पक्षाच्या विसर्जनांतून तें होऊं शकेल. याच्या उलट जर पाश्चात्य लोकशाहीचें स्वरूप अशांतच युगोस्लावियांत निर्माण केलें तर नाना पक्ष स्थापन होऊन राष्ट्रांत अराजकता माजेल किंवा समाजवादाचें रोपटें खोल गेलें नसल्यामुळे त्याला धक्का पोहचेल. जिलासची कृति व विशेषत: पाश्चात्य राष्ट्रांचीं वर्तमानपत्रें, नियतकालिकें यांतून झालेला प्रचार हा योग्य नव्हता असाच बऱ्याच समंजस लोकांचा अभिप्राय पडला असें वाटतें.

शेवटी आज घरचें पत्र आलें व मनाला थोडेंसें समाधान वाटलें. माझ्या पत्नीने मोकळ्या अंत:करणाने मला निरोप दिला होता. या वेळीं तर तिच्या वृत्ती-विषयी व स्वभावाविषयी माझ्या मनांत फारच आदर व कौतुक निर्माण झालें. तिची माझ्याबरोबर येण्याची अत्यंत उत्कट इच्छा होती हें मला माहीत होतें. त्याप्रमाणे तिने पैशाची सोय वगैरे पूर्वतयारी केली होती. परंतु सरकारने परकीय चलन न दिल्यामुळे तो बेत रहित करावा लागला. त्यामुळे तिचा फार मोठा आशाभंग झाला व तिच्या मनाला ही गोष्ट फार लागली होती. तरी फार उदार अंत:करणाने तिने मला निरोप दिला. घरादाराविषयी तुम्ही आपल्या मनावर कसलाहि भार ठेऊं नका, प्रकृति सांभाळून व काम चांगल्या तऱ्हेने आटोपून तुम्ही लौकर परत या असा तिच्या पत्राचा सारांश होता.

शेवटी आम्ही सर्वोदयचें काम करणारे लोक सुद्धा किती स्वार्थी आहोंत याचा एक अत्यंत लाजीरवाणा अनुभव माझ्या नजरेला आला. मुंबईच्या एका सज्जनाने आम्हांला आपली कार ड्रायव्हरसहित वापरावयाला दिली होती. दुपार-पर्यंत राबवून १॥–२ च्या सुमारास आम्हीं त्याला रजा दिली. त्याची रवानगी होण्यापूर्वी त्याने आम्हांला जेवणाच्या हॉटेलपावेतो आणून सोडलें. पण तूं जेऊन घे असें सुद्धा आम्हीं त्याला म्हटलें नव्हतें. त्यामुळे मनाला फार वेदना झाल्या होत्या. त्याची भरपाई करण्याचा प्रसंग आज येत आहे. तोच ड्रायव्हर पुन्हा आमच्या खिदमतीला मिळत आहे. जर पश्चात्तापांतून खरी संशुद्धि होत असेल तर आज त्या ड्रायव्हरजवळ खरा पश्चात्ताप व्यक्त केला पाहिजे.

मागील दोन दिवसांपासून भूदानांतील एक कार्यकर्ता अत्यंत निरलसपणें माझ्याबरोबर जवळजवळ छायेसारखा फिरत आहे. अगदी अतिशयोक्ति न करतां मला रघुवंशांतील खालील श्लोकाची आठवण झाली.

**स्थित: स्थितामुच्चलित: प्रयाताम् निशेदुषीदासनबंध धीर:**
**जलाभिलाषी जलमाददानां छायेव तां भूपतिरन्वगच्छत् ।**

या सर्व सेवेचें मर्म काय ? अत्यंत निरपेक्ष सेवा होती ती, यांत शंकाच नाही. माझी जरी ती व्यक्तिगत सेवा वाटत असली तरी ती देशाच्या सेवेच्या भावनेंतून केलेली सेवा होती. असे तरुण कार्यकर्ते असून सुद्धा आमचें भूदान-कार्य प्रभावी कां होऊं शकत नाही ? असले कार्यकर्ते आणखी मोठ्या प्रमाणांत कां मिळूं शकत नाहीत. या प्रश्नाचें मला फिरून फिरून एकच उत्तर मिळतें की, या तऱ्हेचें वातावरण आम्ही निर्माण करूं शकलों नाहीं. वातावरण निर्माण न करतां मोठ्या प्रमाणांत काम व्हावें ही जी आमची इच्छा आहे हाच अंतर्गत विरोध (internal contradiction) याच्या मुळाशीं आहे. आणि हें वातावरण समाजांतील जे प्रमुख सत्तास्थान आहे त्यामार्फतच निर्माण करावें लागेल. एरवी आमच्या मित्रासारखे थोडकेच कार्यकर्ते आम्हांला मिळतील. त्यांची जमात वाढणार नाही. ती वाढण्याकरिता देशांतील वातावरण बदललें पाहिजे. व त्याकरिता सरकार अशा त्यागी लोकांच्या मतानुवर्ती झालें पाहिजे. पण यांतूनच पक्षाची कल्पना नाही का निर्माण होत ? व व्यापक प्रमाणावर असें झाल्यानंतर मूळचा आदर्श वितळतो त्याचें काय ? तो वितळूं नये म्हणून शासन व इतर प्रयत्न करावे लागतात. हाच जगाचा अनुभव आहे. एरवी आमच्या मित्रासारख्यांचीं निरपेक्ष सेवेचीं उदाहरणें तेवढीं आढळतील. पण त्यापासून अपेक्षित लाभ मात्र होणार नाही.

आज मुंबई सोडण्याचा दिवस. रात्रीं ११ वाजतां आम्ही विमानाने निघणार. सारा दिवस गडबडींत गेला. प्रवासांत लागणारें सर्व कांही आजच घेतलें पाहिजे एकदा हिंदुस्थान सोडला की, मग एवढ्या प्रयासाने मिळविलेला foreign exchange खर्च करावा लागणार. परदेशांत आमच्या संस्कृतीला किती मान आहे याचा एक विचित्र अनुभव आज आला. थॉमस कूक एण्ड सन ही उतारूंची परदेशांत सोय करणारी एक कंपनी आहे. परदेशांत लागणारे पैसे ट्रॅव्हलर्स चेक्स-च्या स्वरूपांत ही कंपनी देत असते. मला १०० पौंडांची परवानगी मिळाल्यामुळे त्या किमतीचे ट्रॅव्हलर्स चेक्स घेण्याकरिता मी या कंपनीच्या ऑफिसांत गेलों. माझ्या अर्जावर नेहमीच्या माझ्या पद्धतीप्रमाणे ' रा. कृ. पाटील ' अशी सही देवनागरी लिपींत मीं केली होती. अशीच सही माझ्या पासपोर्टवर देखील होती. तुम्ही इंग्रजींत सही करा, देवनागरी लिपींतील सहीवर आम्ही तुम्हांला टॅव्हलर्स चेक्स देऊं शकत नाहीं असें थॉमस कूकच्या मॅनेजर साहेबांचें म्हणणें पडलें. दोन सह्या या एकाच माणसाच्या आहेत किंवा नाहीत हें त्यांना त्या सह्या जुळवूनच पाहावयाचें असतें. त्याच्या लिपीचा त्या जुळवणीशीं कांहीहि संबंध नसतो. तुम्हांला जर देवनागरी लिपींतील सही जुळवितांना कांही अडचण जात असेल तर मी त्या सहीखाली इंग्रजी अक्षरें काढून तुम्हांला ती सही जुळविण्याला मदत करूं शकेन असेंहि त्यांना मीं कळविलें.

म्हणजे मग माझी सही रा. कृ. पाटील अशी दिसली असती. परंतु मॅनेजर
R. K. Patil
महोदयाचें म्हणणें असें की, तुम्ही देवनागरी लिपींत आपली सही करूंच नका. केवळ इंग्रजी लिपींत करा. जणू देवनागरी लिपीने त्यांचे ट्रॅव्हलर्स चेक्स हे विटाळून जात होते. हें पाहून मला फार वाईट वाटलें. समजा मला इंग्रजी लिपि येतच नसती तर मग मीं काय केलें असतें? किंवा मी रशियन, चिनी अगर जपानी असतों व मला इंग्रजी लिपि येतच नसती तर मग काय झालें असतें? याशिवाय हिंदुस्थान-च्या मुंबई शहरांत काम करणाऱ्या एका कंपनीने हिंदुस्थानच्या राष्ट्रीय लिपीबाबत असा विटाळ पाळावा हें माझ्या स्वाभिमानाला बिलकुल खपलें नाही. पण आज जाण्याचा शेवटचा दिवस. त्यामुळे 'ऐकून घ्याना याचें म्हणणें. कशाला उगीच नसती अुठाठेव करतां!' असा एक विचार मनांत येऊन गेला. पण माझ्या राष्ट्राच्या लिपीचा हा अपमान आहे ही भावना मला सोडीना. मीं निश्चय केला की, जरूर पडल्यास विना पैशाने जाईन पण अशा अपमानाच्या परिस्थितींत ट्रॅव्हलर्स चेक्स मी घेणार नाहीं. मी तसाच रिझर्व्ह बँकेंत गेलों व तेथील अधिकाऱ्यांना ही परिस्थिति समजावून सांगितली. त्यांना माझें म्हणणें पटलें. तुम्ही एक लेखी तक्रार करा व त्यावर आम्ही रीतसर कारवाई करूं असें त्यांनी कळविल्यावरून मीं तावडतोब लेखी तक्रार केली व स्टेट बँक ऑफ इंडिया यांच्याकडून एक १०० पौंडांचा ड्राफ्ट बेळग्रेडला इंडियन एम्बसीमार्फत मिळावा अशी सोय केली. आता या प्रकरणांत पुढे काय होतें तें पाहावें. माझे ३।४ तास या सर्व गडबडींत गेले पण माझें व माझ्या देशाच्या अभिमानाचें मीं रक्षण केलें हें समाधान मला मिळालें. तसेंच ४-५ रुपयांचा फायदाहि झाला. कारण स्टेट बँक ऑफ इंडियाने थॉमस कूकपेक्षा भाव चांगला दिला. या प्रकरणाचा शेवट असा झाला की, हिंदुस्थानांत परत आल्यावर मला रिझर्व बँकेचें पत्र मिळालें की, या बाबतींत त्यांना कांहीच करतां येत नाही. कारण ही एक आन्तर राष्ट्रीय पद्धति आहे. इतर राष्ट्रांत सुद्धा सही इंग्रजी लिपींतच करावी लागते.

सायंकाळीं दादरच्या स्वाध्याय मंडळातर्फे माझें भाषण झालें व बरींच प्रश्नोत्तरें झालीं. आमचें प्लेन दोन तास उशीरा येणार अशी आगाऊच बातमी असल्यामुळे आम्ही एअरपोर्टवर सावकाश गेलों. विमलाताईंना निरोप द्यावयाला बरीच मंडळी जमली होती. दादा होते. तुम्ही विमलाताईबद्दल कांही काळजी करूं नका असें आश्वासन मीं त्यांना दिलें तरी त्यांचें हळवें मन काळजींतच होतें. शकुंतलेला निरोप देतांना कण्वाची जी परिस्थिति झाली होती तीच आज दादांची होती अशी माझ्यावर छाप पडली.

रात्रभर प्रवास करून प्रातःकाळीं आम्हांला अरबी वाळवंटाचें दर्शन झालें. सुरवातीला नुसतें वाळवंट दिसलें. झाडांचा किंवा दुसऱ्या हिरवळीचा

कांही मागमूसहि नव्हता. परंतु जसा आम्हीं लेबॅननच्या हद्दींत प्रवेश केला तसें सृष्टि-सौंदर्यानें आमचें मन वेधून घेतलें. एकामागे एक अशा तीन चार पर्वतांच्या रांगा त्या वाळवंटांत दिसूं लागल्या. आमच्या विमानांतून त्या रांगा फारच स्पष्ट दिसत होत्या. सभोवताली वाळवंटच वाळवंट. झाडाचा मागमूस नाही. अगदी शेवटच्या रांगेवर बर्फाच्छादित शिखरें दिसत होतीं. थोड्या वेळानें सृष्टिसौंदर्यांत आणखी बदल झाला. आता लहान लहान पर्वतांच्या शिखरांवरून आमचें विमान जात होतें. जणू पंचमढीच्या आसमंतांतील प्रदेशावरून आम्ही जात होतों. पर्वतांच्या शिखरांवर बर्फाचे पट्टे अगदी चुनखडीच्या पांढऱ्या पट्ट्यासारखे दिसत होते. तो बर्फ आहे यावर आमचा विश्वासच बसेना. दिवस उन्हाळ्याचे. पर्वतांची उंची समुद्रसपाटीपासून ६-७ हजार फूट असावी. ऊन खूप प्रखर. अशा स्थितींत बर्फ राहणार कसा? पण परिचारिकेला विचारल्यावर तो बर्फच आहे असें तिनें सांगितलें. पहाडांच्या मध्ये नद्यांच्या ओघांना अनुसरून हिरवळ दिसत होती. एकंदर दृश्य फारच आकर्षक वाटलें.

बैरूटला आम्ही मुंबईच्या वेळेप्रमाणे दहा वाजतां व बैरूटच्या वेळेप्रमाणे ७ वाजतां पोहोंचलों. एरोड्रोम फारच मोठें वाटलें. विमानांतून बैरूट शहर फार संपन्न असावें असा भास झाला. डॉ. व्यास असें म्हणाले की, मध्यपूर्वेचा सर्व व्यापार या बंदरांतून होतो. त्यामुळे हा भाग फार श्रीमंत आहे.

बैरूटचें विमानतळ फारच मोठें आहे. या विमानतळावर सध्या काम सुरू आहे. काम करणारे अरब लोक गौरवर्णाचे व धट्टेकट्टे दिसले. मेडिटरेनियन समुद्रावरील थंड हवेचा हा परिणाम असावा. हिंदुस्थानांत जी लोकांची किरकोळ शरीरयष्टि दिसते त्यांत इतर सर्व कारणांशिवाय आमच्या देशांतील उष्ण हवेचाहि परिणाम असला पाहिजे. हें जर खरें असेल तर उष्ण कटिबंधांतील राष्ट्रांना कायमचें मागासलेलें राहावें लागेल काय ?

आपल्या देशांत बाहेरच्या लोकांनी येऊं नये याबद्दल येथे केवढी खबरदारी घेतली जाते ! व्हिसाशिवाय कोणाला येतां येत तर नाहीच. परंतु एरोड्रोमवर चुकून एखादा उतारू न कळत शिरेल याबद्दल केवढी खबरदारी घेतली जाते ! बैरूटला तर याचा एक विलक्षण अनुभव आला. बाहेर निघण्याच्या दाराला कुलूपच लावून टाकण्यांत आलें होतें. आम्ही सर्व जण दारावर येऊन कुलूप उघडण्याची वाट पाहात उभे राहिलों.

बैरूटला एक घटना घडली. माझा कॅमेरा विमानतळावरील संडासांत राहून गेला. बऱ्याच वेळानें ती गोष्ट माझ्या लक्षांत आली. परत जाऊन पाहतों तों संडासांत कॅमेरा नव्हता. बाहेर येऊन चौकशी करतांच कळलें की, तो कॅमेरा

काळजीपूर्वक उचलून ठेवलेला आहे. हा प्रामाणिकपणा पाहून मला आश्चर्य वाटलें. मागासलें समजल्या जाणाऱ्या अरब राष्ट्रांत हा प्रामाणिकपणा दिसला. आमच्यापैकी एकानें तर म्हटलेंच की, हिंदुस्थानांत आपण असतों तर कॅमेरा हातीं लागला नसता.

* * *

## शनिवार ता० २५–४–५९

वैरूट ते रोम हा प्रवास कंटाळवाणाच झाला. रोमजवळ पुन्हा वैरूटसारखींच बर्फाच्छादित शिखरें दिसावयाला लागलीं. रोमला डॉ. सुखात्मे भेटायाला आले होते. एफ. ए. ओ. च्या स्टॅटिस्टिकल विभागाचे ते प्रमुख आहेत. पूर्व जर्मनींत व पाश्चात्य जर्मनींत युद्धानंतर जी प्रगति झाली तींत एवढा फरक कां असें मीं विचारल्यावर, पूर्व जर्मनींत बऱ्याच मोठ्या प्रमाणावर होणाऱ्या लष्करी खर्चामुळे हा फरक पडला आहे असें त्यांनी सांगितलें. यामुळे माझ्या मनांत वारंवार येणाऱ्या एका प्रश्नाचें मला उत्तर मिळालें. जर रशियांतल्यासारख्या नियंत्रित योजनेंतून आर्थिक विकास लौकर होऊं शकतो तर मग पश्चिम जर्मनीची प्रगति पूर्व जर्मनीपेक्षा एवढी जास्त कशी झाली? याचें एक उत्तर दोन्ही देशांत होणाऱ्या फौजी खर्चावर अवलंबून आहे. पश्चिम जर्मनींत हा खर्च नगण्यसा आहे. पूर्व जर्मनींत त्याचें प्रमाण फार मोठें आहे.

वेळेच्या अभावीं आमचें फारसें बोलणें होऊं शकलें नाही. आम्हांला बेलग्रेडला लगेच जावयाचें होतें. तरी हिंदुस्थानांतील शेतीचें नियोजन फार अपुरें व असमाधानकारक आहे असें त्यांनी सांगितलें. शेतीविषयक कायद्यांपासून उत्पादन वाढणार नाही असें त्यांचें मत दिसलें. शेतीसुधारणा जर करावयाच्या असतील तर पूर्ण सामूहिकीकरणापर्यंत गेल्याशिवाय उत्पादनावर त्याचा इष्ट परिणाम दिसणार नाही असें त्यांचें मत दिसलें. परत येतांना जरूर रोमला उतरा असें आम्हांला त्यांनी आग्रहानें सांगितलें व भारत आणि चीन ह्या पुस्तकाची एक प्रत हि मागितली.

आमचें विमान दोनला निघालें व ५ च्या सुमारास बेलग्रेडला पोचलें. विमान डाकोटा क्लासचें असल्यामुळे प्रवासांत त्रास झाला. विमान फारच खालीवर होत होतें. आमच्यापैकी कांहींना तर मळमळावयाला लागलें. शेवटी एकदाचें बेळग्रेड आलें तेव्हाच आम्हांला समाधान वाटलें. बेळग्रेड ही युगोस्लावियाची राजधानी, पण विमानतळावरची इमारत अगदीच किरकोळ. मला स्वाभाविकच चीनच्या विमानतळांची आठवण झाली. वैरूट, रोम येथील इमारती केवढाल्या व बेलग्रेडची इमारत केवढीशी! हें खरें की, बेळग्रेड आंतरराष्ट्रीय रस्त्यावर

नसल्यामुळे तिथे येजा फारच कमी. परंतु 'आपल्या राष्ट्राच्या मोठेपणाला साजेल अशी इमारत असावी' ही भावना इमारतीच्या बांधकामांत दिसली नाही. आमचें व आमच्याबरोबर परंतु ट्रेड युनियन काँग्रेसकरिता आलेले श्री भगवती यांचें अलग-अलग स्वागत झालें. स्वागत करणारी मंडळी निरनिराळी. दोन निरनिराळ्या बैठकीच एका लहानशा खोलींत होत्या. स्वागत करणारी मंडळी फारच मोकळ्या मनाची दिसली. स्वागत करणाऱ्या मंडळीचे प्रमुख श्री बेब्लर ह्यांनी माझ्यावर चांगली छाप पाडली. ते हिंदुस्थानांत एका डेलेगेशनबरोबर आले होते.

मेट्रोपोल हॉटेलमध्ये आम्हांला उतरविण्यांत आलें. बेळग्रेडमधील हें सर्वांत चांगलें हॉटेल. आमचें आदरातिथ्य अगदी चांगलें होणार असा सुरवातीपासूनच रंग दिसूं लागला. आमचा युगोस्लाव्ह सरकारशीं जरी कांही संबंध नव्हता व सोशालिस्ट अलायन्स ऑफ दि वर्किंग पीपल ऑफ युगोस्लावियाचेच जरी आम्ही पाहुणे होतों, तरी त्यामुळे स्वागतांत काही फरक पडेल असें दिसलें नाही. सरकारी पाहुणें समजून आमची बरदास्त ठेवण्यांत आली.

रात्रौ जेवावयाला आमच्या बरोबर श्री ......... व श्री ....... हे गृहस्थ होते. श्री ......... हा अत्यंत बोलका व फार हुशार वाटला. आपल्या राष्ट्राची बाजू मांडण्याची त्याची दृष्टि त्याच्या बोलण्यांतून स्पष्ट दिसत होती. पण दुसऱ्या पक्षाचें म्हणणें काय आहे तें खोडून काढण्याचा तो जाणूनबुजून प्रयत्न करीत असे. जेवण होईपर्यंत तोच बोलत होता. आमचें राष्ट्र जर्मनीशीं लढाई करून पार्टीझन फौजेच्या मार्फत निर्माण कसें झालें, एक राष्ट्र व भिन्न संस्कृत्या (one nation and many nationalities) यांचा समन्वय करण्याचा आम्ही प्रयत्न कसा करतों, पॉवर-ब्लॉक्सच्या बाहेर राहण्याचें आमचें धोरण कां व कसें आहे, रशियाशीं आमचें कां फाटलें, समाजवाद राष्ट्रवाद आणि आंतरराष्ट्रीयवाद या तिन्हींत सामंजस्य कसें आणलें पाहिजे इत्यादि तात्त्विक गोष्टींची भूमिका प्रत्यक्ष युगोस्लावियाच्या इतिहासाचीं उदाहरणें देऊन समजावून सांगण्याचा त्याचा प्रयत्न होता. मधूनमधून मलाहि प्रश्न विचारून हिंदुस्थानाविषयी तो माहिती घेत असे. पण ती तेवढ्यापुरतीच. आपणच बोलण्याचा ठेका घेतला आहे असें दिसूं नये म्हणून, डॉ. राधाकृष्णन्‌ने आमच्या देशाचें वर्णन ६ प्रांत, ५ कल्चरल ग्रूप्स (nationalities), ४ धर्म, ३ भाषा व २ लिप्या अशा तऱ्हेने केलें, असें तो म्हणाला. फक्त एकाच प्रश्नाचें तो समाधानकारक उत्तर देऊं शकला नाही. किंवा त्या उत्तराने माझें समाधान झालें नाही असें म्हणा. प्रत्येक समाजवादी राष्ट्र जर आपल्या वेगवेगळ्या आर्थिक व राजकीय धोरणाला अनुसरून वागूं लागलें तर जगांत समाजवाद स्थापन व्हावयाला फार उशीर लागेल पण जर तीं राष्ट्रें एकजुटीने वागलीं तर ही गोष्ट लौकर घडून येईल असें माझें

म्हणणें. तो म्हणाला, एका सोशालिस्ट ब्लॉकच्या पाठीमागे जरी हें तत्त्व असलें तरी आमच्या अनुभवांतून आम्हीं असें पाहिलें की, यामुळे एका देशाची दुसऱ्या देशावर कुरघोडी होऊन एक तऱ्हेचा साम्राज्यवाद निर्माण होतो. रशियाचे व इतर पूर्व यूरोपीय राष्ट्रांचे संबंध अशाच स्वरूपाचे होते व अजूनहि आहेत. या राष्ट्रांत जर खुल्या निवडणुका झाल्या तर येथील सरकारें तावडतोब कोलमडून पडतील. पोलंड, हंगारी, पूर्व जर्मनी, इत्यादि राष्ट्रांत अशीच परिस्थिति आहे. मीं जरी हें मान्य केलें तरी यावरून निष्कर्ष हा निघेल की, आजची जागतिक परिस्थितिच अशी आहे आणि राष्ट्रवाद हा एवढा बलवत्तर आहे की, त्यापुढे जागतिक समाजवादाची भूमिका लंगडीच पडते. यामुळेच प्रत्येक राष्ट्र (तें जरी समाजवादी असलें तरी) आपापल्या वेगळ्या हिताच्या दृष्टीने आपला विकास व्हावा ही स्वाभाविक इच्छा करतें. ट्रॉट्स्की व स्टालिन यांचें जें भांडण झालें तेंहि यावरूनच झालें नाही काय ? ट्रॉट्स्की आंतरराष्ट्रीय समाजवादाचा पुरस्कार करणारा होता तर स्टालिन एकाच राष्ट्रांत सफलतेने समाजवाद स्थापन करण्याच्या विचाराचा होता. एका दृष्टीने दोघांचेंहि म्हणणें बरोबर होतें. समाजवादाचा आंतर राष्ट्रीय स्वरूपांत विकास झाला नाही तर त्याचें स्वरूप राष्ट्रीय पुंजीवादाचेंच राहील. व्यक्तिगत पुंजीवादांत कांही व्यक्ति मागसलेल्या राष्ट्रांतील लोकांचें शोषण करून स्वत: श्रीमंत बनत असतात. राष्ट्रांच्याच पातळीवर जर समाजवाद राहिला तर, कांही व्यक्ति हें शोषण करीत असत, त्याऐवजी त्या राष्ट्रांतील समाज तें करील. एकूण शोषण चालूंच राहील व त्याच्या मात्रेंत कांहीहि फरक पडणार नाही. दुसरें असें की, जर ही वास्तविक परिस्थिति आहे तर मग ती युगोस्लाव्ह लोकांनी स्पष्टपणें कां कबूल करूं नये ? सर्वच राष्ट्रें कमी जास्त प्रमाणांत समाजवादाकडे झुकत आहेत. म्हणून सर्वांशीं सहकार करण्याची मोकळिक असावी या तात्त्विक भूमिकेवर हा सहकार कां नसावा हें मला समजेना. याच्या पाठीमागे युगोस्लाव्ह तत्त्वज्ञानाचें आणखी एक प्रमेय आहे. तें असें की सर्व जगच हळूहळू समाजवादाकडे चाललें आहे. समाजवादाचें evolutionary तत्त्व ते प्रतिपादन करतात. रशियाचें म्हणणें असें दिसतें की, समाजवादाकरिता क्रांतीची जरूरी आहे. हळूहळू होणाऱ्या विकासांतून तो स्थापन होऊं शकणार नाही. ज्यावेळीं पुंजीवादाचें रूपांतर समाजवादांत होईल त्यावेळीं तें क्रांतींतूनच होईल ही रशियाची भूमिका दिसते. ती बरोबर आहे काय ? व ती बरोबर असली किंवा नसली तरी साध्या राष्ट्रीयवादाच्या भूमिकेवरून युगोस्लावियाने आपल्या धोरणाचें समर्थन कां करूं नये ? असे अनेक विचार माझ्या मनांत डोकावूं लागले.

* * *

**रविवार ता. २६-४-५९**

आज रविवार होता. तरीहि येथील चौथ्या ट्रेड युनियन काँग्रेसच्या अधिवेशनाचा हा शेवटचा दिवस आहे असें समजल्यावरून, आम्हीं अधिवेशनास जाण्याचें ठरविलें. जगांतील सर्व राष्ट्रांच्या प्रतिनिधींना आमंत्रण देण्यांत आलें होतें. हिंदुस्थानांतून इन्टुक, हिंद मजदूर सभा आणि ट्रेड युनियन काँग्रेस यांचेहि प्रतिनिधि आले होते. यांपैकी कांही तर आमच्याच बरोबर मुंबईहून आले होते. अधिवेशन एका मोठ्या थियेटरमध्ये भरलें होतें. एकाच वेळेला इंग्रजी, फ्रेंच व जर्मन या भाषेंतून भाषणें ऐकण्याची सोय केली होती. जो कोणी बोलत असे त्याचें भाषांतर तावडतोब या तिन्ही भाषांतून होत असे व एका यंत्राच्या सहाय्याने यांपैकी कोणत्याहि भाषेंतून भाषण ऐकण्याची सोय केलेली होती. बाहेरील देशांतून जवळजवळ ८० प्रतिनिधि बोलावले होते. सर्व राष्ट्रांतून प्रतिनिधि आले होते. फक्त चीन व आल्बेनिया यांतून कोणीहि आले नाही. सोव्हियट रशियांतून सुद्धा प्रतिनिधि आले होते. आता चीनचे व युगोस्लावियाचे संबंध चांगले नाहीत. सर्व कॉम्युनिस्ट राष्ट्रांनी रशियाच्या नेतृत्वाखाली युगोस्लावियाला जवळजवळ वाळींत टाकल्यासारखें केलें आहे. रशियाने आपला प्रतिनिधि पाठविला पण चीनने मात्र पाठविला नाही असें आम्हांला सांगण्यांत आलें. नवीन धर्मांतर केलेला माणूस विशेष कडवा असतो म्हणतात तसेंच हें दिसतें.

अधिवेशनांत ज्या कमिटचा निर्माण झाल्या त्यांचे रिपोर्ट मुख्य सभेपुढे यावयाचे होते. मुख्य कार्य मागील १-२ दिवसांत झाल्यामुळे आज गर्दी बरीच कमी होती. कांही देशांचे प्रतिनिधि परत आपल्या देशांत निघून गेले होते. आम्हांला अधिवेशनाची कारवाई फारच अनाकर्षक (dull) वाटली. कोणीहि बोलले तरी सभागृहांतून टाळ्या पडत होत्या. सारख्या एक दोन वाक्यागणिक टाळ्या. जणू काय टाळ्यांना कांही किंमतच नाही. फक्त रशियाला चागलें म्हटलेलें सोडून बाकी सर्व विचारांना टाळ्या मिळतील असें मला वाटलें. बहुसंख्य सभासद युगोस्लावियांतले. मार्क्सिझम्-लेनिनिझम्वर त्यांचा विश्वास. परंतु हिंदुस्थानांतल्या प्रतिनिधीने महात्मा गांधींचा उल्लेख करून सत्य, अहिंसा या मार्गाने समाजरचना बदलली पाहिजे असें म्हटल्यावर सुद्धा टाळ्या पडल्या. नंतर मला आपल्या ॲम्बॅसेडरकडून समजलें की, हिंदुस्थांतून आलेल्या कॉम्युनिस्ट प्रतिनिधीने आपल्या देशांतील सरकारवर बरीच टीका केली. सरकार पुजीवादी आहे, मजुरांना कांहीच संरक्षण नाही, गिरण्या बंद पडतात व ते उपाशी राहतात इत्यादि इत्यादि. त्यामुळे युगोस्लावियांतील लोकांना तें आवडलें नाही. हा विचार व्यक्त करणाऱ्याची रशियाशीं सहानुभूति असणें व आपल्या राष्ट्राविषयी त्याने अभिमान न बाळगणें हें येथील लोकांना कसेंसेंच वाटलें.

सरासरी दोन तास अधिवेशनांत राहिल्यानंतर आपले राजदूत श्री अलियवारजंग यांना भेटण्याकरिता आम्ही त्यांच्या निवासस्थानीं गेलों. जवळजवळ १॥ तास ते आमच्याशीं फारच मोकळेपणाने बोलले. 'युगोस्लावियांतून कांही गोष्टी खरोखरच घेण्यासारख्या आहेत. विकेंद्रीकरण करण्याचा त्यांचा प्रामाणिक प्रयत्न आहे व जरी कॉम्युनिस्ट लीग व तिचाच भाऊ सोशालिस्ट अलायन्स यांच्याच हातीं अजून ही सत्ता आहे तरी ती सत्ता आपल्या हातीं न राहतां खरोखरच लोकांच्या हातीं राहावी याचा प्रामाणिक प्रयत्न ते करीत आहेत' असें त्यांनी सांगितलें. मिलोव्हान जिलासच्या प्रकरणांत चुकी जिलासचीच आहे. त्याच्या विचारांत व सध्याच्या सरकारच्या विचारांत मूलतः कांही भेद नाही. सध्याच्या परिस्थितींत त्या विचारानुसार कोणत्या मर्यादेपर्यंत व कसें वागावयाचें हाच काय तो भेद. जिलासचें म्हणणें असें की, पाश्चात्य राष्ट्रांत जशी सांसदीय लोकशाही चालते तशी लोकशाही ताबडतोब सुरूं केल्याशिवाय खरी लोकशाही येणार नाही व सध्याच्या परिस्थितींतील दोष जाणार नाहीत. इतरांचें म्हणणें असें की, असें केल्यास नाना पक्ष निर्माण होऊन समाजवादाचाच चुथडा होईल. तेव्हा या बाबतींत हळूहळू पुढे गेलें पाहिजे.

कायद्याचें राज्य (Rule of law) येथे आहे. परंतु हिंदुस्थानसारखी किंवा इंग्लंडसारखी येथील परिस्थिति नाही. कांही कांही बाबी कायद्याच्या कक्षेंतूनच काढून टाकून सरकारच्या कक्षेंत आणल्या आहेत. प्रचलित सरकारविरुद्ध तुम्हांला प्रचार करतां येणार नाही. सभा भरविण्याला परवानगी घ्यावी लागते. खाजगी रीतीने तुम्हांला कांहीहि विचार प्रदर्शित करतां येतील. कॉम्युनिस्ट देशांत जसें भीतीचें वातावरण असतें तसें येथे नाही. परतु विरुद्ध पक्ष जसा उघडपणें प्रचार करतो तसा येथे होऊं शकत नाही. येथील विकेंद्रीकरण फक्त कॉम्यूनपर्यंत आहे. अगदी खेड्यापर्यंत नाही. खेडयांपर्यंत तें कसें जाईल हा विचार करण्यासारखा प्रश्न आहे.

अँबॅसिडर महोदयाने मदतीचें भरपूर आश्वासन दिलें. त्यांच्याजवळ असलेलें साहित्य, रिपोर्ट इत्यादि आम्हांला जरूर पुरवण्यांत येईल असें ते म्हणाले.

दुपारीं आम्ही येथून १० मैलांवर असलेल्या एका टेकडीवर पहिल्या महायुद्धांत धारातीर्थी पडलेल्या एका अज्ञात सैनिकाचें स्मारक पाहावयाला गेलों. याची गोष्ट अशी आहे की, पहिल्या महायुद्धांत जेव्हा ऑस्ट्रियनांनी बेलग्रेड सर केलें तेव्हा या टेकडीवर सर्बियन लोकांनी शेवटचा लढा दिला. यांत अखेरपर्यंत या टेकडीवरून ऑस्ट्रियन लोकांवर मारा सुरू होता. शेवटी एकच शिपाई राहिला. पण तो सुद्धा शेवटपर्यंत लढत राहिला. तो कोण होता याचा कांहीच

पत्ता लागला नाही. म्हणून हें स्मारक उभारण्यांत आलें. टेकडीवर एक मोठा चवुत्रा उभारण्यांत आला व त्यावर समोर दोन व मागे दोन अशा चार युगोस्लावियांतील निरनिराळ्या भागांतील स्त्रिया डोक्यावर कांही सामान घेऊन आपली श्रद्धांजलि देत आहेत असा स्मारकाचा अर्थ आहे. टेकडीवर एक हॉटेल आहे. तिथे आम्हीं जेवण केलें.

वाटेंत, मागच्या लढाईंत जर्मनांनी ८०,००० लोकांना जिथे गोळ्या घालून मारलें ती जागा आम्हीं पाहिली. बेलग्रेडवरून ५।६ मैलांवर एका जंगलांत ही जागा आहे. ४ वर्षांत एकंदर ८०,००० लोकांना येथे गोळ्या घालून मारण्यांत आलें. बेलग्रेडवरून त्यांना पकडून आणावयाचें व बंदुकीच्या फैरी झाडावायच्या आणि शेजारींच खोदलेल्या खड्ड्यांत लोटून द्यावयाचें असा हा क्रम होता. जर्मनांची व येथील लोकांची एवढें झाल्यावरहि दोस्ती कशी होणार? पण आज रशियापेक्षा या लोकांना पश्चिम जर्मनी जवळचा वाटत आहे असें वाटतें. पश्चिम जर्मनीशीं युगोस्लावियाचे राजकीय संबंध नाहीत, पण व्यापारी संबंध आहेत. पूर्व जर्मनीशीं दोन्ही प्रकारचे संबंध आहेत. युगोस्लावियांत अशी म्हण आहे की, पश्चिम जर्मनीशीं आमचे राजकीय संबंध नसूनहि आमचे संबंध चांगले आहेत. पण पूर्व जर्मनीशीं आमचे राजकीय संबंध असूनहि ते वाईट आहेत.

रात्रीं आम्ही एका हॉटेलांत जेवलों. जेवण सुरूं असतां युगोस्लाव्ह संगीत चालू होतें. गाण्याची चाल अगदी आपल्या हिंदुस्थानांतील गाण्यासारखी होती. मला गाण्याचा विलकुल नाद नाही. परंतु येथील गाणें मला आकर्षक वाटलें. इंग्लंड, जर्मनी येथील संगीतापेक्षा हें कितीतरी आपल्या जवळचें वाटलें. ताल, तान व चाल ह्या तिन्ही आपल्याशीं मिळत्याजुळत्या होत्या.

* * *

### सोमवार ता० २७-४-५९

आजपासून आमच्या कामाला सुरवात झाली. सोशालिस्ट अलायन्सच्या कचेरींत आम्ही ९ वाजतां गेलों व आमचा कार्यक्रम ठरविला. 'पहिले दहा दिवस तुम्ही बेलग्रेडलाच राहून कांही व्यक्तींना भेटा व मग युगोस्लावियांत फिरून कॉम्यून्स, कारखाने, इत्यादि पाहा व पुन्हा एकदा शेवटी बेलग्रेडला या. असा एकंदर कार्यक्रम आम्ही आखतों. तुम्हांला वाटेल तो बदल त्यांत तुम्ही करूं शकतां. एखाद्या ठिकाणीं तुमचें मन रमलें व तुम्हांला तेथे राहून आणखी कांही चौकशी करावीशी वाटली

तर तसा तुम्ही कार्यक्रमांत बदल करूं शकतां. आमच्या इथे तुम्ही हवी तशी चौकशी करूं शकाल.' इत्यादि स्वरूपाच्या गोष्टी झाल्यावर पक्का कार्यक्रम उदयिक ९ वाजेपर्यंत देण्याचें ठरलें. नंतर १० वाजतां श्री पॉपोव्हिच यांनी 'युगोस्लावियांतील आर्थिक व राजकीय विकेंद्रीरणाचें तत्त्वज्ञान' या विषयावर एक तास व्याख्यान दिलें. त्यांच्याबरोबर एक बाई दुभाषी म्हणून आली होती. सांसदीय लोकशाही असलेल्या देशांत असलें विकेंद्रीकरण करणें शक्य नाही काय या माझ्या प्रश्नाला त्यांनी होकारार्थी उत्तर दिलें. भाषणांत हें शक्य नाही असा सूर होता. म्हणून मीं हा प्रश्न विचारला होता. परंतु कांही तरी गैरसमज झाला असावा असें ते म्हणाले.

नंतर आम्ही एम्बसींत गेलों. श्री धवन (पहिले सेक्रेटरी) यांचें म्हणणें असें की, जर्मनांशीं झालेल्या लढाईत जुना वर्ग सपशेल नष्ट झाला. त्यामुळे समानता आणणें यांना शक्य झालें. जुन्या वर्गाचा नाश, अत्यंत प्रखर राष्ट्रीय भावना व समानता आणण्याचे जाणून बुजून केलेले प्रयत्न या तीन कारणांमुळे हा देश पुढे आला आणि रशियासारख्या बलाढ्य राष्ट्राशीं त्याला टक्कर देतां आली. पूर्व यूरोपमधील राष्ट्रभावनेला रशियाच्या व्यवहाराने धक्का पोहोचल्यामुळे तीं राष्ट्रें असंतुष्ट आहेत व त्यांच्यांत स्थैर्य न येण्याचें हें एक कारण आहे असें ते म्हणाले.

आज सायंकाळीं 'युगोस्लावियांतील घटनेचा व निवडणुकीचा कायदा' या विषयावर आम्हीं एक व्याख्यान ऐकलें. व्याख्यान फेडरल एक्झिक्युटिव्ह कौन्सिलमध्ये होतें. ही इमारत फारच मोठी व कांचांनी सुशोभित केली होती. व्याख्यानांतून बरीच माहिती मिळाली परंतु आम्ही थोडेसे गोंधळल्यासारखे सुद्धा झालों. या विषयाचा आणखी अभ्यास करण्याची जरूरी आहे.

रात्रौ युगोस्लाव्ह फोक डान्सचे प्रयोग पाहावयाला आम्ही गेलों. तिकीट अदमासे २ रू. होतें. गर्दी बरीच होती. प्रयोग साधारणच वाटले. मध्यंतरापर्यंत बसून नंतर आम्ही निघून आलों.

* * *

## बुधवार ता. २९-४-५९

आज सकाळीं ९ वाजतां मि. सिमिक, व्हाईस प्रेसिडेंट, नॅशनल असेंब्ली यांना भेटावयाला आम्ही गेलों. हा गृहस्थ साधारणपणें ६० च्या वर असावा. नंतर आम्हांला असें कळलें की, सर्वियांत सिमिक हें घराणें फार प्रख्यात आहे. ह्या वंशांत अनेक राजकारणी लोक होऊन गेले. त्यांतीलच मि. सिमिक एक होते. ते कॉम्युनिस्ट लीगचे सभासद नव्हते. व दुसऱ्या लढाईपूर्वी तर ते एका डेमॉक्रॅटिक पक्षाचे पुढारी

होते. जवळजवळ एक तास या वयोवृद्ध पुढाऱ्याने आम्हांला अगदी मनमोकळेपणाने येथील परिस्थितीची माहिती करून दिली. ते म्हणाले, "मी आता म्हातारा झालों, पण मीं पुष्कळ काळ पाहिला आहे. या राष्ट्राचे किती वेळा तरी तुकडे झाले आहेत. प्रथम टर्कीने नंतर ऑस्ट्रियाने या राष्ट्राला वर येऊंच दिलें नाही. तसा ११ व्या १२ व्या शतकाचा यूरोपचा इतिहास पाहिला, तर राजा दुशानच्या वेळीं हें राष्ट्र पुढे आलेलें व संपन्न असें होतें. राजा दुशानच्या वेळचे कायदे येथे अजूनहि उपयोगांत आणले जातात. पण त्यानंतर आमचे ग्रह बदलले. आम्ही आपसांत भांडावयाला लागलों. प्रथम तुर्क लोक व नंतर आस्ट्रिया-हंगारी यांनी आम्हांला हैराण केलें. येथे तुर्कांचें ४।५ शे वर्षे राज्य होतें. पण तुम्हांला आता इथे त्यांच्या राज्याचा कांहीच अवशेष दिसणार नाही. जेवढ्या मशीदी होत्या तेवढ्या सर्व आम्हीं नामशेष करून टाकल्या. आता या दुसऱ्या लढाईनंतर पुन्हा एकदा आम्ही एकत्र आलों आहों. लढाईपूर्वी मी डेमॉक्रेटिक पक्षांत होतों. अजूनहि मी कॉम्युनिस्ट नाहीं. पण कॉम्युनिस्ट पक्षाच्या नेतृत्वाशिवाय आम्ही आज येथपर्यंत आलोंच नसतों. जुने सरकार तीन दिवस सुद्धा टिकाव धरूं शकलें नाही. त्याला हिटलरशीं तह करावा लागला. पण कॉम्युनिस्ट पार्टीच्या नेतृत्वाखाली पुन्हा सर्व पक्षांनी उचल खाल्ली. यांतून 'पार्टीझन्स' किंवा 'नॅशनल लिबरेशन फ्रंट' तयार झाली. अजूनहि आम्हांला शत्रु बरेच आहेत. पण आता कुठे पुन्हा एकदा देश एक झाला आहे. मी तुम्हांला अगदी खरें सांगतों, कॉम्युनिस्ट पक्षाचें विसर्जन होईल असें मला वाटत नाही. आणि झालेंच तरी तें केव्हा होईल हेंहि सांगतां येत नाही. ती एक आदर्शवादी कल्पना आहे."

फेडरल नॅशनल असेंब्लीचा हा गृहस्थ व्हाइस प्रेसिडेंट होता. त्या फेडरल असेंब्लींची घटना त्याने आम्हांला समजावून सांगितली. फेडरल असेंब्लीच्या निवडणुका कशा होतात ? मतदारांच्या सभेचें कार्य कोणतें ? एकदा निवडणूक झाल्या-वर पुन्हा उमेदवारला परत बोलावण्याची किती उदाहरणें आहेत ? या सर्व प्रश्नांचीं त्यानें मोकळेपणाने उत्तरें दिलीं. "उमेदवाराला परत बोलावण्याचीं बरींच उदाहरणें आहेत. कॉम्युनिस्ट पार्टीचें वजन एवढें आहे की, सहसा फेडरल असेंब्लीकरिता तिच्या विरुद्ध उमेदवार उभा राहत नाही. व राहिल्यास निवडून येण्याचा संभव कमी." असें त्यांनी सांगितलें. एक लोकप्रिय कर्नल मतदारांच्या सभेंतून निवडला गेला नाही, परंतु २०० लोकांच्या सह्या घेऊन तो निवडणुकीला उभा राहिला व व्होटर्स मीटिंगने उभा केलेला उमेदवार हरवून तो निवडून आला असें सांगितलें. पण अशा घटना अपवादरूपच आहेत.

यानंतर श्री व्हलॉडिमीर सेरीक, अस्सिटंट सेक्रेटरी फॉर दि एकॉनमी ऑफ दि फेडरल एक्झिक्युटिव्ह कौंसिल, यांची आम्हीं भेट घेतली. युगोस्लावियाच्या आर्थिक

परिस्थितीबाबत त्यांनी पुढील माहिती दिली, ती ऐकून आम्ही चकितच झालों. "राष्ट्राच्या एकंदर उत्पन्नाचा शेकडा २८.५ इतका हिस्सा इन्व्हेस्ट केला जातो. लढाईनंतर औद्योगिक उत्पादन साडेतीन पटीने म्हणजे ३५०% वाढलें आहे. मागील तीन वर्षांत जीवनमान (स्टँडर्ड ऑफ लिव्हिंग) शेकडा २३ ने वाढलें. बाहेरून येणारी मदत (फॉरिन एड) ही सर्व कर्जाच्या रूपाने येत आहे व इन्व्हेस्टमेंटचा शेकडा १० वा हिस्सा अशा स्वरूपांत येतो. मागील ५ वर्षांत आम्हीं निर्यात दुपटीने वाढविली आहे. राष्ट्रीय उत्पन्नाची वर्गवारी खालीलप्रमाणे आहे. उद्योग ४५%; शेती व जंगल ३०%; व्यापार, वाहतूक इ. २५%." आम्हांला डॉ. अलेस बॅक्लर यांनी त्यांच्या क्लबमध्ये लंचचें आमंत्रण १॥ वाजताचें दिलें असल्यामुळे तिथे जाण्याची घाई होती. म्हणून श्री सेरिक यांचा घाईघाईने निरोप घेऊन आम्ही लंचला गेलों. लंचला श्री पोपोव्हिक-युगोस्लाव्हियाची मुख्य व्यक्ति–हे होते. ते फेडरल कौंसिलचे सभासद आहेत व फॉरिन अफेअर्स कमिटीचे प्रमुख आहेत. त्यांच्या शेजारींच मी बसलों. "सुरवातीलाच जेवणाच्या वेळीं गहन प्रश्नांची चर्चा करावयाची नसते. परंतु आपणांशीं बोलण्याचा मला योग केव्हा येणार तें सांगतां येत नाही. तेव्हा कांही प्रश्न माझ्या मनांत आहेत, ते मीं विचारल्यास आपण गैर मानूं नये" असें मीं त्यांना म्हटलें. अर्थात् हें सर्व बोलणें दुभाष्यामार्फत चाललें होतें. दुभाषी एक विदुषी होती. आपल्या कामांत ती फार तरबेज होती. श्री पोपोव्हिक म्हणाले की, आपल्या मनांतील गोष्ट बोला व कोणत्याहि तऱ्हेचा संकोच करूं नका. मीं म्हटलें, "स्टालिनशीं भांडून जरी तुम्हीं स्वतःला अडचणींत टाकलें, तरी त्यामुळे इतर जगाला मोठा फायदा झाला आहे. कारण मार्क्सिझमचा एक नवीन अध्याय त्यामुळे तुम्हांला उघडतां आला. एरवी रशियाचा कित्ता तुम्हीं गिरविला असता. हा एक जगावर युगोस्लावियाचा मोठा उपकारच आहे." त्यांना या माझ्या बोलण्यापासून बरें वाटलें. पण लगेच मीं म्हटलें, "समाजवादाला वाहून घेतलेल्या राष्ट्रांची एकजूट असावी असें नाही का तुम्हांला वाटत ? त्यामुळे जगांत समाजवाद लौकर येणार नाही काय ? व या एकजुटीला राष्ट्रवाद ही एक अडचण नाही काय ?" श्री पोपोव्हिक यांना असें वाटलें की, कॉमिन फॉर्मपासून युगोस्लाविया अलग झाला आहे, त्यावर माझी ही टीका आहे. त्याला अनुलक्षून ते म्हणाले, "आम्हांला असें वाटत नाही. प्रत्येक राष्ट्र आपल्या पद्धतीने व परिश्रमाने जागतिक समाजवाद आणण्याचा प्रयत्न करूं शकतें असें आमचें मत आहे व त्यामुळे समाजवाद पसरेल." मी म्हणालों, "यांत मुख्य अडचणी दोन आहेत. एक तर प्रत्येक राष्ट्र आपापल्यापुरतें पाहावयाला लागलें तर सामजवादी राष्ट्रांची जूट राहूं शकणार नाही व पुंजीवादी राष्ट्रें याचा फायदा घेऊं शकतील व समाजवादाची प्रगतिच थांबेल किंवा ती धीमी पडेल. दुसरें असें की, प्रत्येक राष्ट्र आपापल्यापुरतें पाहील तर राष्ट्रवाद वाढून तो समाजवादाला खाऊन टाकेल. आज कांही प्रमाणांत असेंच

होऊन राहिलें आहे. प्रत्येक राष्ट्र आपापल्या प्रगतीच्या मागे लागल्यामुळे प्रगत राष्ट्रें व अप्रगत राष्ट्रें यांच्या मधील अंतर वाढत जात आहे. व आर्थिक दृष्टचा अप्रगत राष्ट्रांचें प्रगत राष्ट्रें शोषण करीत आहेत. पुंजीवादांत कांही व्यक्ति, अप्रगत राष्ट्रांचें शोषण करीत होत्या. आजच्या समाजवादांत पूर्ण राष्ट्रच अप्रगत राष्ट्रांचें शोषण करीत आहेत." मीं असें म्हटल्यावर माझ्या म्हणण्याचा रोख श्री पोपोव्हिक यांच्या लक्षांत आला व ते म्हणाले, "लढाईनंतर याच कल्पनेंतून रशियाशीं आम्ही आपले संबंध वाढवूं इच्छित होतों. पण आम्हीं काय अनुभवलें ? आज इतर पूर्व यूरोपियन राष्ट्रांचा काय अनुभव आहे ? आम्ही रशियाशीं भांडून निघालों म्हणून पोलंड, हंगारी या राष्ट्रांशीं वागण्याची पद्धत रशियाला बदलावी लागली. नाही तर परिस्थिति आणखीच खराब झाली असती. तेव्हा समाजवादी राष्ट्रांची एकजूट असावीं हें तुमचें म्हणणें तात्त्विक दृष्टचा मला मान्य असलें तरी आमचा अनुभव याच्या अगदी विरुद्ध आहे. आज राष्ट्रवाद समाजवादाला खाऊन टाकत आहे हें तुमचें म्हणणें मला मान्य आहे. पण या परिस्थितितींतून तुम्ही कांही उपाय सुचवूं शकतां काय ? आज काय केलें पाहिजे ?" मी म्हणालों, "प्रत्येक राष्ट्राने आपल्या वाढत्या राष्ट्रीय उत्पन्नांतून एका प्रमाणांत कांही हिस्सा अप्रगत राष्ट्राकरिता काढून तो त्यांच्या विकासाकरिता खर्च करावा. म्हणजे राष्ट्रांराष्ट्रांत समाजवादाच्या दृष्टिकोणांतून व्यवहार होईल व सर्व जग समाजवादाकडे लौकर जाऊं शकेल." श्री पोपोव्हिकांला हा विचार ऐकून समाधान वाटलें. व ते म्हणाले की, ही विचार करण्यासारखी बाब आहे. त्यानंतर भाषण आजच्या जागतिक परिस्थितीकडे वळलें. अण्वस्त्रांच्या निर्माणामुळे जागतिक युद्ध होण्याची शक्यता कमी झाली आहे कारण अण्वस्त्रांचा प्रयोग सृष्टिसंहारक होईल ही साधार भीति युद्धेच्छु राष्ट्रांना वाटत आहे. म्हणून या परिस्थितींत केवळ अण्वस्त्रांचे प्रयोग बंद करण्याचा आग्रह बरोबर नाही. कारण त्यामुळे लढाईबाबतची आजची जी भीति आहे ती भीति थांबवून लढाई आपण जवळ आणूं. म्हणून संपूर्ण शस्त्र-संन्यासाच्या (Total Disrmment) मागणीला अण्वस्त्रांच्या बंदीशीं जोडलें पाहिजे, असें हिंदुस्थानांतील कांही विचारवंतांना वाटतें; असें मी म्हणालों. श्री पोपोव्हिक यांना तो मुद्दा पटला. व ते म्हणाले की, याबाबत असाच प्रयत्न केला पाहिजे. यानंतर श्री पोपोव्हिक यांनी सर्व-सेवा-संघाबाबत व सर्वोदय चळवळीबाबत माहिती विचारली. सर्वोदयाचाहि उद्देश समाजवाद आणावयाचा आहे काय व तसें असल्यास या चळवळीचें वैशिष्टय काय असा श्री पोपोव्हिक यांचा प्रश्न होता. गांधीजींचा साध्यसाधनांबाबत आग्रह कां व कसा होता, चुकीच्या साधनांनी साध्य मिळाल्यासारखें जरी दिसलें तरी त्याचें स्वरूप इतकें विकृत होऊन जातें की तें 'साध्य' राहत नाही; याबाबत हिंदुस्थानच्या स्वराज्याच्या इतिहसाचा दाखला

देऊन, सर्वोदयचा उद्देश शुद्ध मार्गानें आदर्श समाजाची स्थापना करण्याचा आहे असें मीं सांगितलें. यानंतर जेवण संपलें व आम्ही कॉफी घेण्याकरिता बाहेर आलों. त्यानंतर श्री पोपोव्हिक यांनी सर्व सेवा संघाची संघटना कशी आहे, आजपर्यंत या संघटनेने काय काम केलें व पुढे ती काय करणार आहे, आदर्श समाज तुम्ही कसा स्थापन करणार इत्यादि प्रश्न कॉफी घेत असतां विचारले. जेवणांतील सर्व मंडळी एकत्र आली व माझ्याकडून याबाबत काय उत्तरें मिळतात हें ऐकण्याची उत्सुकता त्यांनी दर्शविली. भूदान चळवळ सुरू कशी झाली, हिंदुस्थान सरकारच्या भूमि सुधाराबाबत ज्या कल्पना आहेत त्यांवर या चळवळीचा काय परिणाम झाला, पहिल्या पंचवार्षिक योजनेंत आम्हीं जमीन वांटपाबाबत विरोधी धोरण कसें स्वीकारलें व नंतर या चळवळीमुळे तें कसें बदललें, ग्रामदानांत भूदानाचे दोष कसे टळतात, आज ग्रामदानी गावांची कशी परिस्थिति आहे याचें मीं संपूर्ण विवेचन केलें. श्री पोपोव्हिक यांनी नंतर नागपूर काँग्रेसचा उल्लेख केला व विचारलें, "नागपूरला पास झालेल्या ठरावामुळे काँग्रेस व सर्व सेवा संघ याच्यांतील मतभेद वाढणार तर नाहीत? समाजवादी पक्ष आज सर्व सेवा संघाला मदत करीत आहे ही गोष्ट कितपत बरोबर आहे?" त्यावर सर्व सेवा संघाची अपक्ष भूमिका मीं समजावून सांगितली व श्री जयप्रकाश नारायण ह्यांनी समाजवादी पक्ष आता सोडला आहे हेंहि सांगितलें. याबाबत त्यांना माहिती नसावी असें दिसलें. आजपर्यंत जसें एका एंजिनाप्रमाणे काँग्रेसच्या भूमिविषकक कल्पना भूदानग्रामदान-चळवळीने पुढे ढकलल्या त्याचप्रमाणे नागपूर ठरावांतल्या उणीवाहि ग्रामदान-चळवळ काढून टाकेल असें मी म्हणालों. ग्रामदानानंतर काय होतें? जमीनीची वांटणी कशी होते व शेती कशी होते? या प्रश्नांचीं मीं उत्तरें दिल्यावर बराच वेळ झाल्यामुळे आम्ही निघून आलों. सुमारे चार वाजतां आमचें लंच संपलें. जातेवेळीं श्री पोपोव्हिक गंमतीने म्हणाले, "आतापर्यंत तुम्हीं आम्हांला प्रश्न विचारले होते, आता आम्हीं तुम्हांला प्रश्न विचारून आपली फिटंफाट केली आहे. पुढच्या भेटीकरिता तुम्ही आपले प्रश्न तयार करून ठेवा व मीहि आपले प्रश्न तयार करून ठेवतों."

सायंकाळीं श्री सेल या अमेरिकन गृहस्थाकडे आम्हांला जेवावयाला जावयाचें होतें. श्री सेल हे C. A. R. E. या अमेरिकन संघटनेचे युगोस्लावियांतील प्रतिनिधि आहेत. यापूर्वी ते हिंदुस्थानांत होते व तेथेच त्यांनी श्री सुवर्णा या हिंदुस्थानी विदुषीशीं लग्न लावलें होतें. आम्हांला श्री सेल यांच्याककडून युगोस्लावियाविषयी माहिती घ्यावयाची होती व तिथेच श्री सिंग या हिंदी गृहस्थांनाहि भेटावयाचें होतें. श्री सिंग हे एक शेतकरी घराण्यांतील मुरादाबाद जिल्ह्यांतील गृहस्थ होते. हिंदुस्थानांत त्यांनी नाना तऱ्हेचे अनुभव घेतले होते व आपल्या गावांत

५ वर्षें सहकारी शेती चालविली होती. असेंब्लीकरिता ते उभे राहिले होते. सरकारी नोकरींतहि त्यांनी काम केलें होतें. १५ महिन्यांपूर्वी युगोस्लाव्ह सरकारकडून त्यांना एक शिष्यवृत्ति मिळाली होती व येथील सहकारी शेतीचा अभ्यास ते करीत होते. त्यांनी पी. एच. डी. करिता नुकताच प्रबंध पाठविला होता. मागच्या १॥ वर्षांत त्यांनी युगोस्लावियाच्या शेतीचा पूर्ण अनुभव घेतला होता. येथील भाषाहि त्यांना चांगली अवगत झाली होती. तेव्हा त्यांच्याशीं चर्चा करणें आम्हांला फार फायद्याचें होणार होतें. याशिवाय युगोस्लवियांत एकंदर परिस्थिति कशी काय आहे, लोकांना कितपत स्वातंत्र्य आहे याबाबतहि त्यांचे विचार आम्हांला ऐकून घ्यावयाचे होते.

श्री सिंग म्हणाले की, सुरवातीला युगोस्लाव्ह सरकारने रशियाचें अनुकरण करून सामुदायिक शेती करण्याचा बराच प्रयत्न केला, पण तो असफल झाला. यानंतर १९५३ सालापासून शेतीबाबत त्यांनी आपल्या धोरणांत संपूर्ण बदल केला आहे. जबरदस्तीची वसूली, शेतमालाच्या किमतीवर नियंत्रण, सामुदायिक शेती या सर्व गोष्टींचा आग्रह आता त्यांनी सोडला आहे. पण या गोष्टीला जरी आता ५ वर्षें झालीं तरी अगदी परवापर्यंत येथील शेतकऱ्यांच्या मनांत ही भीति होतीच की, न जाणों हें सरकार आपली जमीन केव्हा काढून घेईल. म्हणून येथे जमिनीला किंमत नाही. परंतु एका वर्षाचा जमिनीचा ठेका मात्र पुष्कळ येतो. जमिनीची किंमत पुरी देण्याला मनुष्य धजत नाही पण ठेक्याने जमीन घेतो. येथील सहकारी शेतीचे प्रयोग फार यशस्वी झाले आहेत. हिंदुस्थानांत सर्व्हिस कोऑपरेटिव्हपासून सुरुवात केली पाहिजे. जॉईंट कोऑपरेटिव्हचा आतापासून विचार करूं नये. परंतु एवढें खरें की, जॉईंट कोऑपरेटिव्हपासूनच उत्पादनवाढीची फार मोठी शक्यता आहे. शेतकरी मात्र आपल्या जमिनीला फारच चिकटलेला असल्यामुळे ही बाब त्याच्याकडून हळूहळू घ्यावी लागेल. युगोस्लावियाचा अनुभव मात्र हा आहे की, जॉईंट कोऑपरेटिव्हजचें उत्पादन व्यक्तिगत शेतकऱ्यापेक्षा फार जास्त आहे.

या देशांत स्वातंत्र्य आहे. सरकारला विरोध करण्याची सोय नसली तरी सरकारबाबत भीति किंवा सरकारचा दबाव नाही. श्री सेल यांचें मत मात्र याच्या उलट होतें. ते म्हणत की, सरकारबाबत या देशांत फार असंतोष आहे व किती तरी लोक त्याच्याकडे येऊन सरकारबद्दल असंतोष दर्शवीत असतात. मार्शल टिटो मात्र फारच लोकप्रिय आहेत याबद्दल दुमत नव्हतें. लोक सरकारविषयी कितीहि असंतुष्ट असले तरी मार्शल टिटोच्याच पाठीमागे ते आहेत. रात्रौ १०॥ वाजतां आम्ही हॉटेलांत पोहोचलों.

* * *

### गुरुवार ता. ३०–४–५९

आज सकाळीं येथील शेतीउद्योगांसंबंधी आम्हीं माहिती करून घेतली. रात्रौ ८ वाजतां युगोस्लाविया व इटाली यांच्यांत फुटबॉलची मॅच होणार होती. त्यासाठी तिकीटें आगाऊ काढण्यांत आलीं होतीं. जवळजवळ ९ रुपये तिकीट पडलें. ही मॅच बेलग्रेड स्टेडियममध्ये बरोबर ८ वाजतां सुरू झाली. स्टेडियम अगदी चिकार भरून गेला होता. एक सुद्धा जागा खाली नव्हती. असा अंदाज करण्यांत आला होता की, ६०,००० स्त्री-पुरुष मॅच पाहावयाला आले असतील. बेलग्रेडची जनसंख्या ६००,००० असल्यामुळे प्रत्येक दहा माणसांपैकी एक मनुष्य मॅच पाहावयाला आला असें म्हणावयाला हरकत नाही. आमचा ड्रायव्हर तर मॅच पाहावयाला फारच उतावळा झाला होता. आमच्यापैकी दोघे मॅचला येऊं शकले नाहीत, तेव्हा त्यांच्यापैकी एक आमच्या अनुमतीने आपल्या बायकोला मॅच पाहावयाला घेऊन आला. इटालीची टीम खेळांत जास्त तरबेज होती, तर युगोस्लावियाचे, खळाडू जास्त धावणारे व जोरकस दिसले. सुरवातीलाच इटालियन टीमने एका पाठीमागून एक असे चार गोल केले. परंतु हाफ-टाईमनंतर युगोस्लावियाने तीन गोल केले. प्रेक्षकांमध्ये उत्साह फार दिसला. परंतु युगोस्लाविया हरल्याबद्दल त्यांना विषाद वाटत होता. रात्रौ १० वाजतां आम्ही मॅच पाहून परतलों.

* * *

### शुक्रवार ता. १–५–५९

आज मेची १ तारीख. हा दिवस जगभर कामगारांचा दिवस म्हणून पाळला जातो. बेलग्रेडला सुद्धा हा दिवस साजरा करण्याची जय्यत तयारी दिसत होती. जिकडे तिकडे राष्ट्रीय झेंडे लागले होते. ता. ३० च्या रात्रीं शहरांत आतसबाजी होती. 'कॉम्युनिस्ट देशांत एक मोठी मिरवणूक काढतात किंवा कांही तरी जनजागरण होईल अशा पद्धतीने हा दिवस साजरा करतात. आम्हीं युगोस्लावियांत मेचा हा दिवस अशा तऱ्हेने साजरा करण्याचें सोडलें आहे. घरोघरी जसा ख्रिसमस साजरा करण्यांत येतो तसा मेचा दिवसहि येथे साजरा करण्यांत येतो. संबंध युगोस्लावियांत अशा तऱ्हेनेच हा दिवस साजरा होईल.' असें आम्हांस सांगण्यांत आलें.

आज आम्ही सकाळींच विमानाने टिटोग्रॅडला गेलों. १॥ तासांत तेथे पोहोचलों. विमानतळावर नेहमीप्रमाणे स्वागत झालें व आम्ही आमच्या हॉटेलांत गेलों. येथील कांही प्रेक्षणीय स्थळें पाहण्याचा आमचा कार्यक्रम ठरला होता.

पण पाऊस पडत असल्यामुळे हा कार्यक्रम स्थगित करण्यांत आला. व आम्हांला आमच्या खोलींतच बसून टिटोग्रॅडबद्दल माहिती करून घ्यावी लागली.

मागील लढाईंत या शहरांवर ६६ बॉंबहल्ले झाले. हें शहर जवळजवळ संपूर्णपणें नामशेष झालें होतें. आता हें संपूर्ण शहर नव्याने बांधून निघालें आहे. लढाईच्या नासधुसीचा कांहीहि मागमूस दिसत नांही. टिटोग्रॅड हें शहर आज मॉंटिनिग्रो या युगोस्लावियांतील रिपब्लिकचें मुख्य शहर. पूर्वी मॉंटिनिग्रोची राजधानी सेटिन्ये होती. परंतु वाहतुकीला ती एकीकडे पडत असल्यामुळे ती आता टिटोग्रॅडला आणली गेली. मॉंटिनिग्रो हें युगोस्लावियांतील सर्वांत लहान रिपब्लिक. प्रदेश डोंगरी व समुद्राला लागून असल्यामुळे सृष्टिसौंदर्य फारच आकर्षक आहे. म्हणूनच २–३ दिवसांकरिता बेलग्रेडवरून आम्ही येथे आलों आहों. १२ वाजतां टिटोग्रॅडच्या पीपल्स कमेटीचे प्रमुख हे आमच्या हॉटेलांत आले व १२। वाजतां आमचें लंच सुरू झालें. सध्याच्या परिस्थितींत लीग ऑफ कॉम्युनिस्टचें कार्य कोणतें हा प्रश्न मीं विचारला. जनतेच्या सर्व अडचणींची चर्चा करून त्या सोडविणें हें काम सोशालिस्ट अलायन्स ऑफ दि वर्किंग पीपल ऑफ युगोस्लाविया या संस्थेचें आहे. अर्थात् प्रत्येक कॉम्युनिस्ट या संस्थेचा सभासद तर आहेच. या संस्थेंत कॉम्युनिस्टांचेंच प्राबल्य आहे. तरी पण इतरहि कांही लोक व पक्ष, जे कॉम्युनिस्ट नाहीत त्यांचाहि या संस्थेंत समावेश होतो. 'जनतेची आघाडी' या सदराखाली ही संस्था मोडते. असें असून सुद्धा 'लीग ऑफ कॉम्युनिस्ट ऑफ युगोस्लाविया' अशी स्वतंत्र संस्था कॉम्युनिस्ट पक्षाला काढावी लागली, ती कां व तिचें आताचें कार्य काय हा माझा प्रश्न होता. या संस्थेचें मुख्य कार्य लोकांचें तात्त्विक मार्गदर्शन करणें हें आहे असें सांगण्यांत आलें. प्रत्यक्ष कार्य सोशालिस्ट अलायन्समार्फत व तात्त्विक मार्गदर्शन लीग ऑफ कॉम्युनिस्टामार्फत होतें. तात्त्विक मार्गदर्शन म्हणजे काय व तें कसें करतात, या माझ्या प्रश्नाला विचारप्रवर्तक उत्तर देण्यांत आलें. "अजूनहि आमच्या समाजांत पूर्ण समाजवादी प्रवृत्ति भिनली नाही. आजहि 'कामाप्रमाणे दाम' आम्ही देतों. समाजामध्ये निरनिराळे आर्थिक व सामाजिक भेद आहेत. हे सर्व जाऊन आदर्श परिस्थितींत 'प्रत्येक मनुष्य आपल्या मगदुराप्रमाणे काम करतों व गरजेप्रमाणे दाम घेतो' ही स्थिति निर्माण होईल, येथपर्यंत येण्याकरिता तात्त्विक मार्गदर्शन करावें लागेल. पण हें मार्गदर्शन केवळ शाब्दिक नसून याकडे प्रत्यक्ष कार्यक्रमामार्फतच जावें लागेल. परंतु या कार्यक्रमाची भूमिका या ध्येयाकडे नेणारी राहील. अर्थात् उत्पादन वाढविणें या कार्यक्रमाचा एक भाग राहील. हा कार्यक्रम प्रत्येक ठिकाणीं



मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्थळप्रत

सारखाच राहणार नाही. प्रत्येक विभागांत त्या त्या विभागाच्या गरजांनुसार हा कार्यक्रम बदलेल. व त्याप्रमाणे तेथील लीग ऑफ कॉम्युनिस्टचे कार्यक्रम बदलतील. तरीपण कार्यकर्त्यांच्या सभा, त्यांचे सेमिनार्स, त्यांचें प्रशिक्षण इत्यादि बाबी प्रत्येक भागांत सारख्याच राहतील."

आमचा हा युगोस्लावियाच्या रिपब्लिकला येण्याचा पहिलाच प्रसंग आहे. रिपब्लिकचे फेडरल सरकारशीं संबंध व खाली जिल्ह्याशीं व कॉम्यूनशीं संबंध व कॉम्यूनचे खेडयाशीं संबंध याबाबत आम्हांला माहिती द्यावी असा मीं नंतर प्रश्न केला. रिपब्लिकचें मुख्य कार्य कॉम्यूनसची सर्वसाधारण योग्य वाढ करणें, मागासलेल्या कॉम्यून्सना जास्त सवलती देऊन त्यांना पुढे आणणें रिपब्लिकमध्ये जी स्वाभाविक संपत्ति आहे तिचा पूर्ण उपयोग करणें निरनिराळ्या कॉम्यून्सच्या कार्यांत एकसूत्रीपणा आणणें हें आहे असें सांगण्यांत आलें.

कॉम्यून ही सोशल सेल्फ गव्हर्मेंटची शेवटची कडी. तिचा मूळ उद्देश जनतेने आपलें राज्य आपण चालविणें (Sociel self Government) हा आहे. कॉम्यून्सच्या परिसरांत, सर्व कामें कॉम्यून्समार्फत होतात. ज्या गोष्टी कॉम्यूनच्याच अधिकारांत असतात त्या कॉम्यून करतेंच. ज्या रिपब्लिकच्या किंवा फेडरल सरकारच्या अधिकारांत असतात त्या कॉम्यूनमार्फत करविल्या जातात. कॉम्यूनमध्ये रिपब्लिकचा किंवा फेडरल सरकारचा कुणी कर्मचारी नसतो. याला कांही अपवाद आहेत. फेडरल किंवा रिपब्लिकन सरकार आपलें सर्व काम कॉम्यूनमार्फत करीत असतें.

कॉम्यून आणि खेडें यांचे संबंध कसे असतात, याविषयी बोलतांना मेयर साहेब म्हणाले, "प्रत्येक खेडयाला खेडयांतील लोकांनी निवडलेला एक प्रमुख असतो. याशिवाय शाळा व कोऑपरेटिव्ह सोसायटी या संस्था चालविण्याकरिता स्थानिक सभासद असतात. कॉम्यूनमध्ये कोणतीहि महत्त्वाची गोष्ट असली तरी अगाऊ 'मतदारांच्या सभांतून' तिची चर्चा होते व त्यानंतरच मग पीपल्स कमिटींतील दोन्ही सभागृहें निर्णय घेतात. त्यामुळे प्रचलित घडामोडींशीं लोकांचा दाट संबंध येतो. मतदारांच्या सभा याच लोकांना शासनव्यवस्थेशीं निगडित करणाऱ्या खऱ्या संस्था आहेत. कॉम्यूनचा सोशल प्लॅन दर वर्षी तयार करण्यांत येतो, तोच या लोकांच्या सभेंत चर्चा झाल्यानंतरच पीपल्स कमिटी पास करते. त्यामुळे लोकांचें म्हणणें काय आहे याची पूर्ण कल्पना पीपल्स कमिटीला असते." असें बोलणें झाल्यावर आम्हीं त्यांचा निरोप घेऊन, मोटारींतून मॉंटिनिग्रोंतील प्रेक्षणीय स्थळें पाहण्याच्या कार्यक्रमाला सुरवात केली.

मॉंटेनिग्रो हा प्रदेश पहाडी आहे व समुद्रकिनाऱ्याला लागूनहि आहे. ठिकठिकाणीं समुद्र हा पहाडांतून आंत आला आहे. तिन्ही बाजूंला उंच पहाड, मध्ये समुद्र, समुद्रकिनाऱ्यावर लोकांची वस्ती, हें दृश्य फार प्रेक्षणीय आहे. ५००० फूट उंच पहाड, त्यावर किल्ले, खाली वर्तुळाकृति समुद्र व भोवताल वस्ती असें हें कोटोर गाव तर आम्हांला फारच आकर्षक वाटलें. टिटोग्रॅडवरून आमची सडक स्कडर लेकच्या काठाने जात होती. २००० फूट खाली स्कडर लेक व बाजूला उंच पहाड अशा थाटांत नागमोडी वळणें घेत आमच्या दोन मोटारी जात होत्या. मोटारी चालविणारे ड्रायव्हर तर फारच कुशल दिसले. नागमोडी वळणावरून सुद्धा १००-१२० किलोमिटरच्या वेगाने ते मोटार चालवीत होते. सरासरी चार वाजतां आम्ही मॉंटिनिग्रोच्या जुन्या राजधानींत 'सेटिनिये' येथे आलों. ढग व पाऊस असल्यामुळे प्रवासाची यावी तशी मौज आली नाही. सेटिनियेमध्ये तेथील राजाचा जुना राजवाडा, एक म्युझियम् व एक जुनी मोन्यास्टरी (जिथे पाद्रीलोक राहतात ती जागा) आम्ही पाहायला गेलों. म्युझियम् पाहण्यासारखा होता. १९४१ नंतर इटालियन व जर्मन फौजांनी केलेल्या आक्रमणाविरुद्ध स्थानिक लोकांनी सतत लढाई सुरू ठेवली. मार्शल टिटो हा सुद्धा या दरम्यान इकडे येऊन गेला. टिटोग्रॅडला ज्या घरीं मार्शल टिटो व एडवर्ड कार्डेल राहिले होते, त्या घरावर स्मृतिचिन्हांच्या पाट्या लावल्या आहेत. एकंदर २६० लोक इटालियनांनी व जर्मनांनी निरनिराळ्या आरोपांवरून गोळ्या घालून मारले. याशिवाय प्रत्यक्ष लढाईंत जे मेले ते वेगळेच. या एवढ्या लहानशा प्रदेशांत एवढें मोठें बलिदान हें येथील लोकांच्या स्वातंत्र्य-प्रियतेचें निदर्शक आहे. इतिहासांत सुद्धा मॉंटेनिग्रो येथील लोक लढवय्ये व सेनापति म्हणून गाजलेले आहेत. जे लोक मारले गेले त्या सर्वांचे फोटो म्युझियम्मध्ये लावले होते. याशिवाय लढाईमध्ये पार्टीझन फौजेने वापरलेलीं शस्त्रें, बॉंबगोळे, इटालियन व जर्मन फौजेने काढलेले अन्यायी हुकूम हे सर्व व्यवस्थित रीतीने दाखविण्यांत आले होते. लढणारे व बलिदान देणारे हे सर्व कॉम्युनिस्ट पार्टीचे सभासद. त्यामुळे लढाईनंतर या पक्षाला खूप लोक मिळाले. त्यांचें वजन वाढलें. जर्मनी, इटाली यांचें राज्य मान्य करणारे जमीनदार व इतर श्रीमंत लोक हे शत्रूंना मदत करणारे म्हणून राष्ट्रद्रोही ठरले. म्हणून त्यांच्या इस्टेटी व इतर संपत्तिहि नवीन सरकारने जप्त केली. म्युझियम् पाहिल्यानंतर, सध्याचें सरकार केवढ्या महान् त्यागाच्या भक्कम पायावर उभें आहे याची जाणीव झाली. सायंकाळीं आम्हीं 'बुदवा' नांवाच्या समद्रकिनारीं असलेल्या गावीं येऊन पोहोचलों.

मॉंटिनिग्रोमधील समुद्रकिनाऱ्यावरील एक रम्य स्थळ म्हणून 'बुदवा' प्रसिद्ध आहे. येथील हॉटेल व कांही घरें अगदी समद्रकिनाऱ्याला लागून आहेत.

घरांच्या भितींना भरतीच्या वेळीं समुद्राच्या खाऱ्या पाण्याचें सारवण मिळतें. बाजूला पहाड व सभोवताल फिरण्याकरिता पुष्कळ रमणीय स्थळें, समुद्रस्नान व वाळवंट या आकर्षणामुळे पुष्कळ भटके आपल्या सुटीचे दिवस येथे घालवितात. आम्ही रात्रीं ७ वाजतां हॉटेलांत आलों व जेवून लवकर निजलों. आमच्यापैकी एक मित्र मे दिनानिमित्त गावांत नाच व इतर आनंदाचे समारंभ सुरू होते ते पाहण्याकरिता गेले.

* * *

## शनिवार ता. २–५–५९

येथील हॉटेल इतर धंद्याप्रमाणे काम करणाऱ्यांमार्फत चालविलेलें आहे. सकाळीं तें कसें चालतें याची आम्हीं माहिती घेतली. एकंदर चाळीस नोकर हॉटेलांत काम करीत होते. त्यांनी आपल्यामधून एक मंडळ निवडून दिलें होतें. हें मंडळ किंवा 'वर्कर्स कौंसिल' ह्याच्यावर हॉटेल चालविण्याची सर्व जबाबदारी आहे. या वर्कर्स कौंसिलच्या मदतीला म्हणून एक मॅनेजिंग कमेटी निवडली जाते. कुणीहि कामगार दोनपेक्षा जास्त वेळा वर्कर्स कौंसिलवर किंवा मॅनेजिंग कमेटीवर राहूं शकत नाही. मॅनेजिंग कमेटी ही हॉटेलच्या दैनंदिन कामाबद्दल जबाबदार आहे, तर वर्कर्स कौंसिल ही धोरण आंखते व इतर सर्व प्रश्न सोडविते. हॉटेलांत दोन डायरेक्टर होते—एक टेक्निकल डायरेक्टर व एक अॅडमिनिस्ट्रेटिव्ह डायरेक्टर. दोघांचीहि नेमणूक जाहिरात देऊन निवडीनंतर झाली होती. वर्कर्स कौंसिलचे कांही सभासद व पीपल्स कमिटीचे कांही सभासद असे निवडून मंडळ बनविण्यांत येते व त्याच्या शिफारशीवर नेमणूक होत असते. वर्कर्स कौंसिलचें म्हणणें व मॅनेजिंग कमेटीची शिफारस यानुसार डायरेक्टरला काम करावें लागतें. परंतु जर यांचा सल्ला कायद्याच्या विरुद्ध असला तर त्याला पीपल्स कमिटीकडे अपील करण्याचा अधिकार आहे. हॉटेलमध्ये कमींतकमी पगार ९००० दिनार व जास्तींत जास्त ४०,००० दिनार आहे. कर्मचाऱ्यांना खाण्याचे व राहण्याचे ३००० दिनार कापून द्यावे लागतात. हॉटेलांत नुकसान आलें तर काय होतें या आमच्या प्रश्नाला फार सविस्तरपणें उत्तर देण्यांत आलें. सर्व कामगारांचे पगार वर्कर्स कौंसिल ठरवते. या पगाराप्रमाणे जर हॉटेल नुकसानींत चाललें तर फेडरल सरकारने ठरविलेलें किमान वेतन त्या कर्मचाऱ्यांना दिलें जातें. ह्या वेतनाचें शेकडा ८० एवढें प्रमाण मात्र प्रत्येक नोकराला मिळालेंच पाहिजे. या हॉटेलांत सर्वांत कमी पगार ९००० दिनार होता. फेडरल सरकारचें ठरविलेलें वेतनमान

७००० दिनार आहे. येथे मिळालेल्या माहितीप्रमाणे त्या वर्षाकरिता खालील-प्रमाणे किमान वेतनाच्या श्रेणी ठरविल्या होत्या.

| | | |
|---|---|---|
| केवळ मजूर | (unqualified)— | ७,००० दिनार |
| अर्धशिक्षित | (half-qualified)— | ९,००० ,, |
| शिक्षित | (qualified)— | १३,००० ,, |
| विशेष शिक्षित | (extra-qualified)— | १८,००० ,, |

फेडरेशनने ठरविलेल्या किमान वेतनाच्या शेकडा ८० भाग देऊनहि जर हॉटेल तोटयांत राहिलें तर मग कर्ज काढून तोटा भरून काढावा लागतो. ह्या कर्जाचें प्रमाण कमी असलें तर तें कॉम्यून देतें व जास्त असलें तर फेडरेशन देतें. आम्ही या हॉटेलच्या एका वर्षाच्या उत्पन्नाचा व खर्चाचा पूरा अभ्यास केला. मागील दोन वर्षांपासून या हॉटेलला फायदा झाला होता.

हॉटेलसंबंधी माहिती घेत असतांना तिथे कॉम्यूनचेहि अध्यक्ष व त्यांचे सहकारी नोकर येऊन पोहोचले. त्यांच्याकडून कॉम्यूनची माहिती आम्हीं घेतली. या कॉम्यूनची लोकसंख्या ५००० आंत होती. एवढ्या लोकसंख्येकरिता दोन दवाखाने, आठ वर्षांच्या मुलांकरिता २ व ११ वर्षांच्या मुलांकरिता ४ शाळा व २ किंडर-गार्टनच्या शाळा आहेत. एकंदर ८०० ते ९०० विद्यार्थी या शाळांतून आहेत. एकंदर कॉम्यूनचें बजेट ५९,०००,००० दिनार आहे. ह्यापैकी केवळ शिक्षणावर १८,५००,००० दिनार आहे. फक्त शेकडा ३ लोक अशिक्षित आहेत. कॉम्यूनचे अध्यक्ष व त्यांचे सहकारी नोकर यांचें चांगलें सूत्र दिसलें.

दुपारीं आम्ही कोटॉरला आलों. अगदी समुद्रकिनाऱ्यावर आमचें हॉटेल होतें व समुद्राकडे बघत बघत आमचें लंच चाललें होतें. लंचला कोटॉरच्या कॉम्यूनचे अध्यक्ष हजर होते. हा कॉम्यून बुदवाच्या कॉम्यूनपेक्षा मोठा होता. यांत बरेच उद्योग सामील आहेत. कोटॉरला १२।१३ उद्योगांची यादी मेयरने आम्हांला दिली. तरी शेतीच्या विकासाकरिता कॉम्यून २०,०००,००० दिनार खर्च करणार आहे. व यांत शेतीला पाणी पुरविण्याची एक मोठी योजना आहे असें सांगण्यांत आलें. कॉम्यूनमधील लोक व्होटर्स मीटिंगमार्फत कॉम्यूनच्या कारभारांत भाग घेतात. कॉम्यूनचें सर्व बजेट पास होण्यापूर्वी तें व्होटर्स-मीटिंगपुढे मांडण्यांत येतें. कॉम्युनचे प्रमुख हे संपूर्ण वेळ कॉम्युनच्या कामाला देतात. ते दुसरा उद्योग करीत नाहीत व त्यांना दरमहा २५–३० हजार दिनार पगार मिळतो.

दुपारीं आम्ही डुब्राव्हनिक या आड्रियाटिक समुद्रावरील अत्यंत प्रसिद्ध अशा गावीं जाण्याकरिता निघालों. रस्ता फारच सुंदर होता. कुठे समुद्राचा किनारा तर कुठे उंच पहाडावरील नागमोडी रस्ता, नि दोन पहाडांमधील शेतीने भरगच्च

भरलेली दरी, असें सुंदर दृश्य होतें. याशिवाय आता चांगलें ऊन पडल्यामुळे वातावरण जास्त प्रसन्न झालें होतें. जिकडे तिकडे शेतकऱ्यांचीं घरें पाहून, आमच्या बरोबर असणाऱ्या इसमाला मीं असें सुचविलें की, एखाद्या शेतकऱ्याच्या घरीं जाऊन त्याची शेती, राहण्याची पद्धति व त्याचा जीवनदर्जा पाहावा असें वाटतें. मोटर थांबवून, हें करणें शक्य नाही काय असें मीं त्याला विचारलें. तो म्हणाला की, आपल्या कार्यक्रमांत हें ठरलेंलें नाही. नंतर कांही वेळाने म्हणाला की, आता आपण मॉंटिनिग्रोची सरहद्द सोडून क्रोयेशियांत आलों आहों व मला येथे कोणी ओळखत नाही. मी अर्थातच पुढे जास्त कांही बोललों नाहीं, पण एवढी साधीशी विनंती सुद्धा अमान्य व्हावी याचें मला कसेंसेंच वाटलें. आमच्या मित्रमंडळीजवळ त्याप्रमाणे मीं बोलून सुद्धा दाखविलें. त्यांचें म्हणणें असें की, डुब्राव्हनिकला तेथील मेयरशीं बोलून हें ठरवावें. आम्ही सायंकाळीं पांच वाजतां डुब्रॉव्हनिकला पोहोचलों. सामान खोलींत ठेवल्यावर लगेच डुब्रॉव्हनिक गाव पाहावयाला मंडळी गेली. पण कांही काम असल्यामुळे मला माझ्या खोलींतच राहावें लागलें.

रात्रौ ७ वाजतां येथील मेयर आमच्या बरोबर जेवावयाला होते. चीन-प्रमाणेच इथें आम्ही कोणाच्याहि घरीं उतरलों नव्हतों. आमचें जेवण नेहमी हॉटेलांत होत असे. मेयर व गावची इतर मंडळी आम्हांला भेटावयाला व आमच्या बरोबर जेवायला हॉटेलांत यावयाची. अर्थात् हें आम्ही समजूं शकलों. एक तर घरीं इतक्या माणसांची सोय होणें कठिण व दुसरें, असें करण्यांत जो वेळ जाणार तो उगाच जाणार. चीनपेक्षा येथील राहणीचें मान फारच उच्च होतें. मेयर आल्यानंतर आम्हीं त्यांच्याशीं कॉम्यूनबाबत बोलणें सुरू केलें. रेल्वे, पोस्ट हीं जीं केंद्रित संस्थांचीं अंगें कॉम्यूनमध्ये असतात त्यांच्याशीं कॉम्यून सरकारचा काय संबंध असतो असा माझा प्रश्न होता. मेयर साहेबांचें म्हणणें असें की, इतर उद्योगांप्रमाणे गावचें रेल्वे-स्टेशन हाहि एक उद्योगच समजला जातो. तिथेंहि एक वर्कर्स कौंसिल असतें. स्टेशनची व्यवस्था तें इतर वर्कर्स कौंसिलप्रमाणे ठेवतें. त्या उद्योगांतून जो लाभ होईल तो मात्र वांटला जात नाही. तो सर्व केंद्र-सरकारांत जमा होतो. म्हणजे निश्चित पगारावर जरी स्टेशनावरील कर्मचाऱ्यांची नेमणूक होत असली, तरी स्टेशन-ची सर्व व्यवस्था वर्कर्स कौंसिलच्या नेहमीच्या रिवाजाप्रमाणे चालते. मीं विचारलें, "यामुळे केंद्रीय शासनांत हस्तक्षेप होऊन घोटाळे होण्याचा संभव नाही काय? समजा वर्कर्स कौंसिलला एक स्टेशनमास्तर नको असला व त्याला काढून टाकावें असा त्यांनी ठराव केला परंतु वरिष्ठ अधिकाऱ्यांची तशी इच्छा नसली, तर मग काय होतें?" मेयर साहेब म्हणाले, "प्रोड्युसर्स कौंसिलमार्फत तेथील मजूर सरकारावर वजन आणून त्या माणसाला बदलवूं शकतात. कॉम्यूनच्या

हद्दींतील जंगल, खाणी, यांचीहि व्यवस्था याच प्रकारची असते." परंतु या उत्तराने आमचें पूर्ण समाधान झालें नाही. खालील प्रश्न शिल्लक राहतातच. (१) राष्ट्रीय संपत्तीचा लाभ समाजाला कसा मिळतो? या संपत्तीच्या निर्मितींत वर्कर्स कौंसिलचें तत्त्व लागूंच शकत नाही. कारण या उद्योगांतून जो लाभ मिळेल तो समाजाचा राहील. उदाहरणादाखल एक खाण घ्या. खाणींतील कोळसा वगैरेची किंमत उद्योगांत लावावयाची कशी? (२) अशा उद्योगांत वर्कर्स कौंसिलचें तत्त्व जर लागू केलें तर शासनव्यवस्था कशी चालणार? अशा उद्योगांतील कर्मचाऱ्यांचें, त्यांच्यावरील अधिकाऱ्यांचे व खालील मजुरांचे परस्पर संबंध कसे असतात? या दोन प्रश्नांचीं उत्तरें स्पष्टपणें मिळालीं नाहींत?

जेवतां जेवतां पुढल्या कार्यक्रमाविषयी प्रश्न निघाला. मीं मेयर साहेबांना विनंती केली की, सभोवतालच्या एका शेतकऱ्याच्या घरीं जाऊन त्याची परिस्थिति बघण्याची आमच्या टीमची इच्छा आहे. त्यावर मेयर साहेब म्हणाले, "यापेक्षा येथील शेतीच्या रोगांवर आम्ही कशी उपाययोजना करतों तें तुम्ही पाहा." मी म्हणालों, "याबाबत तुमचें म्हणणें आम्ही मान्य करूं. फक्त आमच्या टीमची काय इच्छा आहे तें आपणांस कळविणें हें माझें कर्तव्य होतें म्हणून तें मीं केलें." त्यावर आमच्या बरोबर असलेले श्री पाव्हलोव्हिच हे म्हणाले, "मला सुद्धा असें वाटतें की, या विभागांतील शेतकरी पाहण्याचा आग्रह सोडून द्यावा." मी गप्पच राहिलों. मग मेयर साहेबांना काय वाटलें कोण जाणे. ते म्हणाले, "तुमचा आग्रहच आहे तर तुम्ही जरूर एका शेतकऱ्याचें घर पाहा. माझें मात्र तुमच्याबरोबर येणें व्हावयाचें नाही. आमचें व्हाइस मेयर तुमच्या बरोबर येतील." माझ्या लक्षांत आलें की, मेयर साहेबांना माझ्या आग्रहामुळे राग आला. पण त्याला माझा नाइलाज होता. त्यानंतर ते माझ्याशीं कांहीच बोलले नाहीत. येथील शेतकऱ्यांचें घर पाहण्याबाबत या लोकांचा एवढा अडथळा कां यावा याचा विचार करीतच मी झोपलों.

* * *

## रविवार ता. ३-५-५९

आज सकाळपासून डुब्रॉव्हनिक शहर पाहण्याचाच आमचा कार्यक्रम होता. मेयर साहेबांनी तेथील एक गाइड शहर दाखवण्याकरिता आमच्या बरोबर दिला होता. तेथील चांगल्याचांगल्या सृष्टिसौंदर्याच्या स्थळीं तो आम्हांला घेऊन जात होता.

डालमेशियाच्या किनाऱ्यावर डुब्रॉव्हनिक हें एक सृष्टिसौंदर्याबद्दल प्रसिद्ध स्थान आहे. उन्हाळ्यांत हवा खाण्याचें व आनंदांत कालक्रमणा करण्याचें स्थान म्हणून-हि तें प्रसिद्ध ठिकाण आहे. दरवर्षीं कितीतरी लोक या निमित्ताने येथे येतात. त्यांत युगोस्लावियाचे लोक तर असतातच, शिवाय बाहेरचेहि असतात. विशेषत: जर्मनी, ऑस्ट्रिया; हंगारी, इटाली या देशांतील लोकांचा भरणा येथे जास्त असतो. हें गाव जवळजवळ या कालक्रमणा करणाऱ्या प्रवाशांवरच जगत आहे, असें म्हटलें तर अतिशयोक्ति होणार नाही. किती तरी हॉटेल्समध्ये व लोकांच्या घरीं खाजगी रीतीने उतरण्याच्या सोयी येथे आहेत. हें पाहून आपल्याकडील एखाद्या यात्रेच्या स्थळाची आठवण येते. पण हें गाव फार स्वच्छ व आकर्षक असें मुद्दाम ठेवण्यांत आलें आहे. आकर्षक तर सृष्टिसौंदर्यामुळे तें आहेच. पाठीमागे हजार दोन हजार फूट उंचीच्या पर्वतांच्या रांगा व पुढे धनुष्याकृति समुद्र अशी या गावाची रचना आहे. समुद्राच्या कडेला वर्तुळाकृति पहाडावर हें गाव वसलेलें असल्यामुळे चढउतार फार आहेत. गावांतच मध्यभागीं समुद्राला लागून एक मोठा जुनाट किल्ला आहे. गावाच्या मानाने किल्ला फारच भव्य वाटला. किल्ला दगडाचा व त्याचा तट १५–२० फूट तरी जाड असल्यामुळे तो फारच उठावदार दिसतो. असें सांगतात की, जुन्या काळीं किल्ल्याच्या भोंवती समुद्र होता. व समुद्राचा आयता खंदक किल्ल्याभोवती असे. पण आता तो खंदक बुजविला आहे. व त्याच्या जागीं एक सुंदर वर्तुळाकृति सडक करण्यांत आली आहे. गावची कांही वस्ती व मुख्य बाजारपेठ किल्ल्यांतच आहे. अगदी समोर समुद्राभिमुख स्वातंत्र्याच्या लढ्यांतील हुतात्म्यांचें स्मारक आहे. गावचा समुद्र नेहमी शांत व सूर्यप्रकाश नेहमीच भरपूर असल्यामुळे समुद्रांत किती तरी होड्या इतस्तत: फिरत असतात. याशिवाय आठवड्यांतून दोनदा इटालीला जाण्याकरिता बोटी सुद्धा सुटतात. जवळजवळ पाव ते अर्धा मैल अंतरावर समुद्रांत एक लहानसें बेट आहे. त्यावरहि एक लहान किल्ला आहे. वनश्री भरपूर असल्यामुळे प्रवाशांचें तें एक विहाराचें स्थान बनलें आहे. गावांत सिनेमा थियेटर, निरनिराळ्या ठिकाणीं समुद्रस्नानाच्या जागा, टेनिसकोर्ट इत्यादि करमणुकीचीं साधनें भरपूर असल्यामुळे मनोरंजनाला कांही तोटा नाही.

सुमारे १–१॥ तास गावाच्या भोवती व किल्ल्यांत आम्ही फिरलों. रवि-वारचा सुट्टीचा दिवस होता व बाजार बंद होता, तरी किल्ल्यांतील मुख्य रस्त्यावर गावचें गाव लोटल्यासारखें वाटलें. सहल करणाऱ्या लोकांची एवढी गर्दी बाजारांतील मुख्य रस्त्यावर होती. मुख्य चौरस्त्यावर कबुतरांना मक्याचे दाणे देण्यांत पुष्कळसे लोक गढलेले दिसले. एकंदर लोक आनंदी व सुखासीन दिसले. सुमारे साडेदहा वाजतां आम्ही जवळच्या एका खेड्यांत जाण्याकरिता निघालों. वाटेंत एका चर्चच्या समोर

लोकांची खूपच गर्दी दिसली. चौकशी केल्यावर कळलें की हें चर्च वर्षांतून एकाच रविवारीं उघडतें. व आजचाच तो दिवस होता. कांही तरी विशेष माहात्म्य त्या स्थानाचें होतें. २–३ शें लोकांची रीघ त्या चर्चमध्ये जाण्याकरिता लागली होती व आंतहि सुमारे १००–१५० लोक असतील. हा मार्क्सिझमला वाहिलेला देश असून सुद्धा देवावर विश्वास ठेवणारे व नियमितपणें चर्चमध्ये जाणारे असे लहान मोठे सर्व वयाचे लोक दिसले. चीनपेक्षा हा येथे फार मोठा फरक वाटला. इथे असणाऱ्या जास्त स्वातंत्र्याचा किंवा या देशांतील विशेष इतिहासाचा तो परिणाम असावा. शेकडों वर्षांपासून, पूर्वेकडून व पश्चिमेकडून येणाऱ्या विजिगीषु व लढाऊ टोळयांच्या कचाटयांत सापडलेल्या लोकांची जर देवावर श्रद्धा नसली तर ती कुणाची असणार ?

त्यानंतर आम्ही येथील एका साधारण शेतकऱ्याच्या घरीं जाण्याकरिता निघालों. आदल्या रात्रीं ठरल्याप्रमाणे आमच्याबरोबर कॉम्यूनचे व्हाइस प्रेसिडेंट यावयाचे होते. परंतु कॉम्यूनचे मुख्य सेक्रेटरी आले व त्यांनी सांगितलें की, त्यांचें येणें न झाल्यामुळे त्यांनी माफी मागितली आहे. गावांतील कोऑपरेटिव्हच्या ऑफिसमध्ये आम्ही प्रथम गेलों. ऑफिस दुमजली होतें व खाली एक हॉटेल-वजा दुकान होतें. ऑफिससमोरच तीन चार लोक एकत्र आले होते. कुठे जावें, याबाबत कांही चर्चा झाल्यानंतर एका शेतकऱ्याच्या घरीं आम्हांस नेण्यांत आलें. त्याचें घर खेडयाबाहेर होतें. आम्ही येणार याची त्या शेतकऱ्याला अगाऊ कल्पना नसावी, कारण तो शेतावर गेला होता. त्याला बोलावून आणलें व मग त्याच्या घरीं बसून आम्हीं गप्पागोष्टी केल्या. त्याच्या जवळ सुमारे दहा-बारा एकर जमीन होती. मुख्यत: फुलें, भाज्या व फळें यांची त्याची शेती होती. शेतावर विहीर होती व विजेचा पंप होता. त्याचें घर मात्र दुमजली व शेतीच्या मानाने फारच अवाढव्य होतें. समोर सिमेंटचें मोठें आंगण व त्या आंगणांत बाग होती. खाली मोठाल्या चार-पांच खोल्या व वरहि तितक्याच खोल्या आणि गच्ची होती. घरीं रेडिओ, जेवणाचा मोठा टेबल, सुंदर बिछाने व शोभेच्या काही वस्तु होत्या. हें घर तुम्हीं बांधलें काय या माझ्या प्रश्नाला पूर्वजांकडून तें आलें आहे असें त्याचें उत्तर मिळालें. नंतर कांही दिवसांनी मला अशी शंका आली की, हें घर एखाद्या जुन्या जमीनदाराचें असावें व जमीनदार गेल्यावर या शेतकऱ्याच्या ताब्यांत तें आलें असावें. त्याच्या घरीं त्याची बायको, आई, बहिणीची मुलगी, त्याचा एक मुलगा व मुलगी अशीं सहा माणसें होतीं. आम्ही बसलों असतांनाच मुलगा व मुलगी शाळेंतून आली. घरीं येतांच दोघांनीहि आमच्याशीं हस्तांदोलन केलें. मुलगा व मुलगी दोघेंहि हुशार व चुणचुणीत दिसलीं. तुला तुझा मुलगा कोण व्हावा असें वाटतें असा

त्या शेतकऱ्याला प्रश्न विचारतांच, 'त्याला चांगलें शेतीचें ज्ञान व्हावें व पुढे मग त्याने कांहीहि केलें तरी चालेल' असें उत्तर मिळालें. त्या शेतकऱ्याने आपलें वर्षाचें उत्पन्न ३५०,००० दिनार आहे असें सांगितलें. त्याला कोणत्याहि तऱ्हेचा त्रास किंवा इतर अडचणी आहेत असें आम्हांला दिसलें नाही.

ही भेट जास्त सुलभतेने कां झाली नाही याचें मला राहून राहून आश्चर्य वाटलें. शेतकऱ्याच्या घरून आम्ही सरळ आमच्या हॉटेलमध्ये जेवावयाला गेलों. लंचला डुब्रॉव्हनिक येथील सोशालिस्ट अलायन्सचे प्रमुख, तेथील स्त्री-संघटनेचे प्रमुख व तेथील कॉम्यूनमधील एक एंजिनीयर एवढी मंडळी होती. सोशालिस्ट अलायन्सचे प्रमुख तेथील सरकारी वकीलाचेंहि काम करीत होते. कॉम्यून आपलें काम कायद्याला धरून करतें की नाही हें पाहण्याचें त्यांचें काम होतें. सोशालिस्ट अलायन्समध्ये गावांतील शेकडा ९० लोक आहेत, असें त्यांनी सांगितल्यावर बाकीचे दुर्दैवी दहाच लोक कसे वगळले गेले या माझ्या प्रश्नाला, ती आमची कमजोरी आहे असें उत्तर मिळालें. सोशालिस्ट अलायन्स आणि कॉम्युनिस्ट यांच्यांतील फरक असा सांगण्यांत आला की, पहिली संस्था जनतेची व दुसरी एका विशिष्ट विचारसरणीच्या लोकांची आहे. कॉम्युनिस्ट पक्ष सुद्धा आता पक्ष राहिला नसून तो एक समूह झाला आहे. त्याचें काम लोकांचें मार्गदर्शन करणें हें आहे. डुब्रॉव्हनिकला राहण्याला एका कुटुंबाला काय खर्च येईल या प्रश्नांचें उत्तर १० ते १२ हजार दिनार येईल असें मिळालें. इतर ठिकाणीं ७ ते ९ हजारांत काम होईल असें सांगण्यांत आलें. दुपारीं जवळजवळ १८० किलोमिटरचा प्रवास पहाडांतून करावयाचा असल्यामुळे आम्हीं २॥ वाजतां डुब्रॉव्हनिक सोडलें व रात्रीं ७॥ वाजतां टिटोग्रॅडला परत आलों. प्रवासांतील वनश्री पाहून आम्ही दंग झालों. रस्ता पुन्हा सेटिनियेवरून होता. परंतु मध्यंतरीं ५०० फुटापेक्षा उंच असा पहाड ओलांडावयाचा होता. पहाडांतील लोकांची परिस्थिति अत्यंत गरीबीची दिसली. बऱ्याच लोकांचीं घरें गवतानेच शाकारलेलीं होतीं. घरें अगदी लहान, एक दोन खणांचींच दिसलीं. लोक मळकटले कपडे घातलेले, बरेच दिवस हजामत न केलेले व बेलग्रेडच्या मानाने किंवा टिटोग्रॅडच्याहि मानाने मागासलेले दिसले. मध्यंतरीं आम्ही फक्त दोन जागीं थांबलों. पहाड ओलांडल्यावर एका गावीं मॉंटिनिग्रोमधील लोकांचें राष्ट्रीय पेय आम्हांला मिळालें. मद्य व गरम पाणी मिसळून केलेंलें तें पेय होतें. सेटिनियेला एका हॉटेलांत आम्हीं चहा घेतला. तिथे इटालीवरून दर्शविलेला टेलिव्हिजनाचा एक कार्यक्रम चालू होता तो थोडा वेळ आम्हीं पाहिला.

रात्रौ हॉटेलमध्ये जेवण झालें. जेवणाला मॉंटिनिग्रोच्या रिपब्लिकच्या योजना-समितीचे प्रमुख आमच्यासोबत होते. येथील पहाडी लोकांची परिस्थिति फार गरीबीची दिसली. वर्षभर त्यांना भरपूर काम असेल असें दिसत नाही. त्यांच्या आर्थिक विकासाकरिता तुमच्या जवळ कांही योजना आहे काय असा प्रश्न मीं केला. यापूर्वी त्यांच्या आर्थिक परिस्थितीचा सोशियो-एकॉनॉमिक सर्व्हे झाला आहे काय, या माझ्या प्रश्नाला नकारात्मक उत्तर मिळालें. 'या पहाडांत कांही उद्योग देतां येत नाही. येथे खनिजसंपत्ति भरपूर आहे. ती काढण्याची आमची योजना आहे. आमच्या कल्पनेप्रमाणे या लोकांना फॅक्टरींतच भरपूर काम देतां येईल, इतर तऱ्हेने यांची आर्थिक स्थिति सुधारणार नाही' असें सांगण्यांत आलें. पहाडांत मेंढ्या पाळण्याचा व लोकर विणण्याचा धंदा विकेंद्रित पद्धतीने करतां येईल काय या माझ्या प्रश्नाला त्यांनी नकारात्मक उत्तर दिलें. 'मेंढ्या येथे फार नाहीत व असल्या विकेंद्रित धंद्यांतून विकास होईल असें आम्हांला वाटत नाही' असें सांगण्यांत आलें.

त्यानंतर जेवण संपलें व मॉंटिनिग्रोच्या अधिकाऱ्यांनी शेवटची भेट घेऊन आम्हांला निरोप दिला. आम्हां तिघांना तीन मॉंटिनिग्रो टोप्या, मॉंटिनिग्रो व सर्वियाच्या एकीकरणाच्या चित्रासह देण्यांत आल्या. आम्हींहि कांही वस्तु भेटीकरिता नेल्या होत्या. त्या दुसऱ्या दिवशीं देण्याचें आम्हीं ठरविलें.

* * *

### सोमवार ता. ४–५–५९

सकाळींच आम्ही चहा घेऊन विमानतळावर जाण्याकरिता निघालों. मॉंटिनिग्रोच्या भेटीबद्दल तुमचें काय मत आहे तें लिहून द्या अशी सूचना मला अगाऊच करण्यांत आली होती. त्याप्रमाणे पहाटें एक निवेदन मीं तयार केलें होतें. तें सर्वांना पसंत पडलें. आमच्या बरोबर दोन ड्रायव्हर होते. त्यांना विमानतळावर आम्हीं निरोप दिला व ब्लॅंडोला भेटा म्हणून सांगितलें. एकाला पुस्तकाचीं पानें कापण्याची एक सुरी व दुसऱ्याला त्याच्या बायकोकरिता कानांत घालण्याच्या कुड्या ही भेट आम्हीं दिली. मीं तयार केलेलें वक्तव्य रेडिओवर देण्याकरिता रेकॉर्ड करण्यांत आल्यावर आम्ही विमानांत चढलों व १०॥ वाजतां बेलग्रेडला पोहोचलों.

१२ वाजतां येथील ट्रेड युनियन-ऑफिसमध्ये श्री .... यांची आम्हीं भेट घेतली. वर्कर्स मॅनेजमेंट सुरू झाल्यावर ट्रेड युनियनची जरूरी काय, हा आमच्यापुढे प्रश्न होता. कारखाने मालकांचे असले तर मग कामगारांना आपले पगार, आपल्या सुखसोयी, आपले कामाचे तास, बोनस इत्यादि बाबींकरिता झगडावें लागतें

व या झगड्यांत त्यांना ट्रेड युनियनन्सचें सहाय्य मिळतें. किंबहुना अशा झगड्यांत कामगारांची बाजू घेऊन त्यांचे झगडे सफलतेने शेवटास नेणें हें ट्रेड युनियन्सचें कर्तव्य असतें. पण मालकवर्ग व चालकवर्ग दोन्ही नाहीसे होऊन जेव्हा कारखानेच कामगार चालवितात, तेव्हा ट्रेड युनियन्सचें काय काम असतें हा आमच्यापुढील प्रश्न होता. श्री······यांनी या प्रश्नाचें फारच समाधानकारक उत्तर दिलें. आम्हां सर्वांवर त्यांच्या व्यक्तित्वाची, बुद्धिमत्तेची व कार्यशक्तीची चांगली छाप पडली. सिगारेट, दारू इत्यादि कसलेहि व्यसन नसलेला हा गृहस्थ जन्मभर कामगारांच्या सेवेला वाहिलेला दिसला. वर्कर्स कौंसिलनंतर ट्रेड युनियन्सचें मुख्य कार्य कामगारांना आपल्या नवीन जबाबदारीकरिता तयार करणें हें आहे. ट्रेड युनियन्स व अर्थशास्त्रज्ञ यांच्यांत नेहमीच झगडा असतो. जास्त पगाराशिवाय उत्पादन वाढणार नाही हें ट्रेड-युनयिन्सचें म्हणणें व जास्त पगार दिल्यास भांडवल कमी पडून त्यामुळे विकासाची गति शिथिल होईल हें अर्थशास्त्रज्ञांचें म्हणणें असतें. वर्कर्स मॅनेजमेंट झाल्यानंतर याबाबत निर्णय कामगारांना द्यावयाचा असल्यामुळे त्यांचें शिक्षण व ज्ञान वाढलें पाहिजे, ही जबाबदारी ट्रेड युनियन्सची आहे. याशिवाय वर्कर्स मॅनेजमेंट असून सुद्धा पुष्कळ वर्कर्स कौंसिल्स कामगारांना विश्वासांत न घेतांच काम करतात. आपलेच कायदे करण्याचा त्या प्रयत्न करतात. कामगारांवर आपला अधिकार गाजविण्याचा प्रयत्न करतात. कित्येक कारखान्यांत कामगार कारखान्याच्या कामांत विशेष उत्साहाने भाग घ्यावयास लागले तर मॅनेजर त्यांचा राग करतात इत्यादि दोष दूर करणें हें ट्रेड युनियन्सचें कार्य आहे. आणि ठिकठिकाणीं कामगारांना शास्त्रीय प्रशिक्षण देऊन त्यांच्या योग्यतेचा स्तर वर आणणें हें ट्रेड युनियनचें काम आहे. संपाबाबत आम्हीं त्यांना कांही प्रश्न विचारले. युगोस्लावियांत संप कायदेशीर असला तरी आम्हांला त्या मार्गाची कांही जरूरी नाही असें ते म्हणाले. कामगारांचाच कारखाना असतो. अशा परिस्थितींत संप कुणाविरुद्ध करावयाचा ? संप होतच नाही काय असें विचारल्यावर, क्वचित् प्रसंगीं अचानकपणें संप घडून येतात पण आम्ही तें चांगलें लक्षण समजत नाहीं. आम्ही आमच्या असफलतेचें व अयोग्य किंवा अपुऱ्या कामाच्या निदर्शकतेचें तें चिन्ह समजतों, असें ते म्हणाले. कामगारांचें अयोग्य मार्गदर्शन झाल्याचा तो परिणाम होय असेंहि ते म्हणाले.

दुपारीं युगोस्लावियाच्या तरुणांच्या संघटनेंतील एका प्रमुख व्यक्तीची आम्हीं भेट घेतली. तरुणांनी युगोस्लावियांत पुष्कळ कामें केलीं आहेत, असें मीं वाचलें होतें. सडका व रेल्वे यांचे मार्ग बनविणें, वाया जात असलेल्या वस्तु एकत्र करून त्यांतून राष्ट्रोपयोगी संपत्ति निर्माण करणें इत्यादि बाबतींत फार मोठ्या प्रमाणांत झालेल्या कामांचीं वर्णनें माझ्या वाचण्यांत आलीं होतीं. नुकतेंच मार्शल टिटोने कुठे तरी एक वक्तव्य दिलें होतें. त्यांत असें म्हटलें होतें की, तरुणांच्या अशा

कामाकडे केवळ आर्थिक दृष्टिकोणांतून पाहूं नये. त्याचे इतर फायदे आहेत. त्याकडेहि लक्ष दिलें पाहिजे. आणि ही पद्धति पुन्हा मोठ्या प्रमाणांत चालू केली पाहिजे. इतर बाबतींत ज्याप्रमाणे रशियाशीं फाटल्यावर विचारांत व आचारांत परिवर्तन घडून आलेलें युगोस्लावियांत दिसून आलें, त्याचें प्रतिबिंब तरुणांच्या संघटनेवरहि फार मोठ्या प्रमाणांत पडलेलें दिसतें कांही उदाहरणें देऊनच ही बाब स्पष्ट केली पाहिजे. आम्ही ज्या हॉटेलमध्ये बेलग्रेडला राहत होतों, त्यांत १००० माणसांची राहण्याची सोय आहे. प्रत्येक खोलीला शौचाची व स्नानाची स्वतंत्र व्यवस्था आहे व कांही खोल्यांतील दोन लोकांच्या निजण्याची सोय जर जमेस धरली, तर १५०० च्या वर लोक एकत्र राहूं शकतील एवढी मोठी ती इमारत आहे. ही इमारत पूर्वी युगोस्लावियांतील तरुणांकरितां म्हणून बांधण्यांत आली होती. इतके तरुण निरनिराळ्या संघटनांतून बेलग्रेडला येतील व त्यांची सोय झाली पाहिजे या दृष्टि-कोणांतून ही इमारत तयार करण्यांत आली होती. आज तिची तशी कांहीच जरूरी वाटत नसल्यामुळे तिचें बेलग्रेडमधील सर्वांत चांगलें हॉटेल, 'हॉटेल मेट्रोपोल' यांत रूपांतर करण्यांत आलें आहे. आणखी कांही ठिकाणीं आम्हांला अशींच उदाहरणें दाखविण्यांत आलीं. चांगल्या रमणीय स्थळीं मुद्दाम तरुणांकरिता म्हणून उभ्या केलेल्या इमारतींत आज हॉटेल्स आहेत. जुन्या काळची तरुणांची ती मोठी संघटना, त्या कवायती, डोळ्यांत भरणारी ती कामाची उठावणी इत्यादि आज युगोस्लावियांत दिसत नाहीत. नाही म्हणावयाला, ल्युब्लियाना-झाग्रेब हा रस्ता तरुणांनी नुकताच बांधल्याचें उदाहरण आम्हांला दाखवण्यांत आलें. व हें काम पाहावें असा आमचा कार्यक्रमहि आंखण्यांत आला आहे. पण आमचे भारतीय राजदूत यांनी या कामांत कांही अर्थ नाही, तरुणांच्या शक्तीचा तो अपव्यय आहे असें आपलें मत प्रदर्शित केलें. ज्यांनी आपला वेळ वैद्यक, इंजिनियरिंग, इत्यादि कामांत लावावयाचा त्यांनी गाढवासारखें केवळ मेहनतीचें काम करीत राहावें, हें त्यांच्या मनाला पटेना. शेवटी या बाब-तींत दोन भिन्न दृष्टिकोण मान्यच करावे लागतील. एक मार्शल टिटोचा व दुसरा आमच्या अँबॅसिडर साहेबांचा. एवढें मात्र खरें की, केवळ पैशाच्या दृष्टीने जर या कामाकडे पाहावयाला लागलों, तर झालेलें फुकट काम कितपत फायद्यांत पडतें हा एक मोठाच प्रश्न आहे. हा प्रश्न मीं विचारला असतां मला उत्तर मिळालें की, ल्युब्लियाना-झाग्रेब हा रस्ता व्हावयाला ३–४ वर्षे नेहमीच्या पद्धतीने लागलीं असतीं. हें काम सहा महिन्यांत आम्हीं पुरें केलें. ही बचत लक्षांत घेतल्यास हें काम आर्थिक दृष्टीनेहि फायद्याचें होतें. आज मात्र ही संघटना जरी कायम असली व कांही साहित्य तिच्या मार्फत निर्माण होत असलें तरी ती फार प्रभावी संघटना राहिली आहे असें दिसत नाही.

* * *

**मंगळवार ता. ५–५–५९**

सोशालिस्ट अलायन्सच्या केंद्रीय समितीची शेतकी विषयक एक बैठक दोन दिवस बेलग्रेडला चालावयाची होती. व कॉम्रेड एडवर्ड कार्डेल, जे आज युगोस्लावियांतील राजकीय व सामाजिक तत्त्वज्ञान्यांचे अध्वर्यू आहेत, त्यांचें प्रमुख भाषण होणार होतें. म्हणून सकाळीं या बैठकीस हजर राहावें या विचाराने आम्हीं कार्यक्रम आंखला होता. बैठक युगोस्लावियांतील पार्लमेंटच्या मुख्य सभागृहांत होती. बैठकीला मार्शल टिटो हेहि हजर होते. सभागृह पूर्णपणें भरलेलें होतें. बरोबर नऊ वाजतां, मार्शल टिटो, कार्डेल व सोशालिस्ट अलायन्सचे प्रमुख हे आंत शिरले. त्याबरोबर सर्व सभागृहाने त्यांना उत्थापन दिलें. आम्ही प्रेक्षकांच्या गॅलरींत होतों. सभागृहाचा तो एक भाग नाही अशी आमच्याकडे समजूत आहे. त्यामुळे सुरवातीला आम्ही उठून उभे राहिलों नाहीं. परंतु जेव्हा सर्वच उभे राहिले असें आम्हीं पाहिलें तेव्हा आम्हीहि उठून उभे राहिलों. सर्वच लोक–गॅलरींतील लोकहि–टाळ्या वाजवीत होते. आम्हींहि त्यांचें अनुकरण केलें. मार्शल टिटो खाली बसले तरी सर्व लोक उभे राहून टाळ्या वाजवीत होते. पुन्हा एकदा मार्शल टिटो उभे राहिले व टाळ्यांचा गजर आपणांस मंजूर आहे असें आपल्या वागणुकीने दर्शवून खाली बसलें. त्यानंतर टाळ्या संपल्या व सर्व लोक आपापल्या जागीं बसले.

मार्शल टिटोंच्याच अध्यक्षतेखाली कामाला सुरवात झाली. मागील सभेची कारवाई वाचून दाखवल्यावर सर्वांनी हात वर उचलून तिला संमति दिली. त्यानंतर मार्शल टिटोंनी कॉम्रेड कार्डेल यांना आपलें भाषण वाचण्यांस सांगितलें. कॉम्रेड कार्डेल ही व्यक्तिहि नवोदित युगोस्लावियांतील नंबर दोनची व्यक्ति. पहिला नंबर अर्थात् मार्शल टिटोंचा. कॉम्रेड कार्डेल हे पूर्वी एक शाळेंतील साधे पंतोजी होते. आज मार्शल टिटोनंतर तेच युगोस्लावियांतील पहिले मानकरी होणार असें सर्वत्र बोललें जातें. इथेहि कॉम्युनिस्ट पक्षांत गट ( Groups ) आहेतच. कांही कॉर्डेलच्या बाजूचे व कांही . . . . . . आहेत. आम्हीं आमच्या गाइडला विचारलें की, मार्शल टिटोनंतर कोण प्रमुख होणार? तर तो स्वाभाविकपणेंच म्हणाला की, हा मोठा कठिण प्रश्न आहे. याचें उत्तर देतां येणार नाही. खरोखर असा प्रश्न विचारणेंच चूक आहे नेहरूनंतर हिंदुस्थानांत कोण प्रमुख होणार असें जर आम्हांला विचारलें, तर आम्ही काय सांगणार?

कॉर्डेलचें भाषण जरा कंटाळवाणेंच वाटलें. भाषणाच्या वेळीं सभागृह जेवढें शांत असावयाला पाहिजे तेवढें नव्हतें. मार्शल टिटो मधूनमधून इकडे तिकडे

पाहत होते. कार्डेलचें म्हणणें आम्हांला मधून मधून भाषांतर करून आमचा दुभाषी सांगत होता. ४५ मिनिटांनंतर आम्हीं सभागृह सोडलें.

त्यानंतर शेतीचीं औजारें तयार करणारा एक मोठा कारखाना आम्ही पाहावयाला गेलों. सरासरी २००० कामगार येथें काम करतात व हार्वेस्ट कम्बाईन्स त्या कारखान्यांत तयार होतात. गव्हाचें पीक कापावयाचें, पोत्यांत गहू भरावयाचे व पेंढयांचे गठ्ठे बांधावयाचे, असें तिहेरी काम एकाच वेळीं या यंत्राच्या सहाय्याने होतें. गव्हाचें शेत कापणीला तयार झालें की, हें यंत्र त्यांतून चालवण्यांत येतें व त्याच्या एका बाजूने गव्हाने भरलेलीं पोतीं व दुसऱ्या बाजुने पेंढयांचे गठ्ठे आपोआप बाहेर पडतात. कामगारांनी चालविलेली एक मोठी फॅक्टरी दाखविण्याकरिता आम्हांला येथे आणण्यांत आलें होतें.

कामगार फॅक्टरी कशी चालवितात याचें स्थूल वर्णन येथे दिलें पाहिजे. फॅक्टरींत काम करणाऱ्यांमध्ये दोन विभाग पडतात. हातांनी काम करणारे कामगार व हातांनी काम न करणारे एम्प्लॉईज म्हणजे नोकर. प्रत्येक फॅक्टरीमधील कामगार व नोकर मिळून एक वर्कर्स कौंसिल निवडतात. यामध्ये कमींत कमी ¾ लोक तरी कामगार असलेच पाहिजेत. कौंसिल आपल्यामधूनच एक मॅनेजिंग बोर्ड निवडतें. मॅनेजिंग बोर्डाकडे कारखान्याचें दैनंदिन काम चालविण्याची जबाबदारी असते. व वर्कर्स कौंसिलकडे कारखाना चालविण्याचें मूळ धोरण ठरविण्याची जबाबदारी असते. कायद्याच्या अंतर्गत कारखान्यासंबंधी सर्व निर्णय घेण्याची जबाबदारी वर्कर्स कौंसिलची असते. हीच मुख्य मॅनेजर नेमते व प्रत्येक कामाकरिता पगार किती असावे व त्याप्रमाणे काम किती असावें हेंहि ठरविते. साधारणपणें ह्या सर्व कामाकरिता वर्कर्स कौंसिल निरनिराळया कमिटया बनवितें. पगाराकरिता कामाकरिता, कामगारांच्या सुरक्षिततेकरिता, स्वास्थ्य इत्यादि बाबींकरिता कमिटया असतात. अर्थात् कमिटयांच्याहि शिफारशीवर शेवटीं निर्णय वर्कर्स कौंसिलचाच प्रमाण मानण्यांत येतो. कारखान्याचा मुख्य चालक जाहिरात देऊन निवडण्यांत येतो. निवड करणाऱ्या कमिटीवर वर्कर्स कौंसिलचा प्रतिनिधि व कॉम्यूनमधील पीपल्स कमिटीचे प्रतिनिधि असतात. निवड योग्यतेवरच करण्यांत येते.

प्रत्येक कामगाराच्या कामाचें किमान वेतन ठरविण्यांत येतें व त्याप्रमाणे कमींत कमी शेकडा ८० तरी उत्पन्न त्याला मिळालेंच पाहिजे असा कायदा आहे. कारखाना तोटयांत असला तरी ही रक्कम मिळालीच पाहिजे. एरवी कॉम्यूनमधून किंवा इतर फंडामधून ही रक्कम पुरी करावी लागते. हे पगार इतके किमान असतात की, सहसा अशी पाळी येत नाही.

वर्षाकाठीं कारखान्याचा हिशेब करण्यांत येतो. त्यांत एकंदर जी कमाई होते तींतून कच्च्या मालाचा खर्च व मजुरांच्या किमान वेतनाचा खर्च काढण्यांत येतो. खर्चांत कारखान्यांत लागलेल्या कायम पुंजीवर व चल पुंजीवर व्याजाहि आकारण्यांत येतें. ही रक्कम घटीकरिता म्हणून अलग काढण्यांत येते. राहिलेल्या रकमेवर सरकारने ठरविल्याप्रमाणे कर लादण्यांत येतात. पहिला कर फेडरल सरकारचा व दुसरा कर कॉम्यूनचा. हे दोन कर लादल्यानंतर बाकीच्या रकमेचे दोन भाग करतात. एक कारखान्याची पुंजी वाढविण्यासाठी, दुसरा कामगारांच्या पगाराकरिता व सुखसोयींकरिता. कामगारांच्या पगाराकरिता व सुखसोयींकरिता जो भाग काढण्यांत येतो, त्यावर पुन्हा सरकारला कर द्यावा लागतो.

कराचें प्रमाण कायद्यानेच ठरविलेलें असतें. बचत रकमेंतून पुंजीकरिता किती तरतूद करावयाची व पगारवाढ व कामगारांच्या सुखसोयी यांकरिता किती तरतूद करावयाची याबाबत निर्णय वर्कर्स कौंसिल घेतें. परंतु प्रस्ताव मॅनेजिंग बोर्ड मांडतें. निर्णय घेण्यापूर्वी कामगारांची सर्वसाधारण सभा बोलावण्यांत येते व त्यांचा कल काय आहे हें समजून घेण्याचा प्रयत्न करण्यांत येतो. परंतु कामगारांच्या सभेचा निर्णय वर्कर्स कौंसिलवर बंधनकारक नसतो. तिला स्वतंत्रपणें निर्णय घेतां येतो. कामगारांच्या सभेला वर्कर्स कौंसिल बरखास्त करण्याचा अधिकार आहे. परंतु आपलें म्हणणें वर्कर्स कौंसिलने मानलेंच पाहिजे हा आग्रह तिला धरतां येत नाही. याला अपवाद एकच. कांही बाबींचा निर्णय जर रेफरेंडम्च्या पद्धतीने वर्कर्स कौंसिलने कामगारांकडून घेतला तर मात्र तो बंधनकारक होतो.

साधारणपणें मॅनेजिंग बोर्डाचें म्हणणें वर्कर्स कौंसिल मंजूर करतें. पण याला अपवादहि पुष्कळ असतात. वर्कर्स कौंसिलचा अध्यक्ष हा कायद्याने मॅनेजिंग बोर्डाचा सभासद राहूं शकत नाही. त्यामुळे मॅनेजिंग बोर्डाच्या म्हणण्यावर वर्कर्स कौंसिलला स्वतंत्र पद्धतीने विचार करण्याकरिता वाव असतो. वास्तव्यांत खाजगी तऱ्हेने मॅनेजिंग बोर्ड त्याच्याशीं सल्लामसलत करूनच आपलें मत बनवीत असतें.

या पद्धतींत कामगारांवर जास्त जबाबदारी येते, कारखान्याच्या सर्व व्यवहारांची त्यांना माहिती होते व मजुरांत जी एक बेजबाबदारपणाची वृत्ति असते ती जाऊन कारखान्याबद्दल आपलेपणा त्यांना वाटूं लागतो. कारखान्याचा सर्व खर्च व उत्पन्न कामगारांसमोर येत असल्याकारणाने आपल्या वाढू शकणाऱ्या जीवनस्तराविषयी खोटया कल्पना किंवा अतियोक्तीने भरलेलीं कल्पनाचित्रें त्यांच्यापुढे राहत नाहीत. परंतु प्रथम दर्शनीं वाटते तेवढी स्वतंत्रता या पद्धतींत सुद्धा कामगारांना नसते. एक तर कायद्याने बरीचशी रक्कम अगोदरच काढली जाते. दुसरें, राहिलेली रक्कम इतकी थोडी असते की, तिच्या विनियोगाबाबत

फारशी भिन्न भिन्न मतें राहूं शकत नाहीत. तरीहि आजपर्यंत निघालेल्या पद्धतींत कामगारांना जबाबदारी शिकविण्यास ह्यापेक्षा दुसऱ्या पद्धतीची कल्पना करवत नाही. भांडवलदारी पद्धतींत सुद्धा हिचा उपयोग करण्यासारखा आहे. भांडवलदारांच्या शेअर्सवर येणाऱ्या डिव्हिडंडवर जर मर्यादा घालतां आली तर आजच्या पद्धतींत सुद्धा या योजनेने पुष्कळ फायदा करता येईल.

सायंकाळीं बेलग्रेड युनिव्हर्सिटीच्या रेक्टरांना भेटावयाला आम्ही गेलों. एकंदर ५०ते६० हजार विद्यार्थी बेलग्रेडला निरनिराळ्या हायस्कुलांतून व कॉलेजांतून उच्च शिक्षण घेत आहेत. एरोड्रोम आणि शहर यांच्यामध्ये, केवळ विद्यार्थ्यांकरिता ५।६ मोठाल्या इमारती बांधल्या आहेत. कांही खोलींत एकेकाची व कांहींत दोघांची राहण्याची सोय केलेली आहे. ६ ते ८ हजार विद्यार्थी या वसतिगृहांत राहत आहेत. राहणें आणि खाणें मिळून ६० ते ७० रु. मासिक खर्च येतो. बेलग्रेडच्या मानाने हा खर्च माफकच म्हणावा लागेल.

स्वस्त पद्धतीने जेवण्याची सुद्धा येथे सोय आहे. प्रत्येकाच्या खोलींत एक इलेक्ट्रिक स्टोव्ह ठेवण्याची सोय आहे. आम्ही सायंकाळीं तेथे गेलों होतों. पुष्कळसे विद्यार्थी दूध व रोटी बाजारांतून आणून आपल्या खोलींतच खात होते. रेक्टर साहेबांशीं भेटून आम्ही रात्रीं ८ वाजतां परतलों.

* * *

## बुधवार ता. ६–५–५९

आज सकाळीं एक बॉलबेअरिंग फॅक्टरी पाहण्यास आम्ही निघालों. अगदी बेलग्रेड शहराच्या मध्यभागीं ही फॅक्टरी होती. आमच्या कार्यक्रमांत एका लहान फॅक्टरीला भेट देण्याचें लिहिलें होतें. फॅक्टरींत ६० लोक काम करीत होते, त्यांपैकी अर्ध्या तरी स्त्रिया होत्या. शहराच्या मध्यभागीं असून सुद्धा प्रवेश करण्याच्या वेळीं आपण फॅक्टरींत प्रवेश करीत आहों असा आम्हांला भास झाला नाही. बाहेरच्या रस्त्यावर दार उघडत होतें व नेहमीप्रमाणे एखाद्या घरांत किंवा ऑफिस-मध्ये प्रवेश करीत आहों असाच प्रथम भास झाला. आंत गेल्यावर जेव्हा फॅक्टरीची निरनिराळीं दालनें पाहिलीं तेव्हाच फॅक्टरीच्या मोठेपणाविषयी कल्पना आली.

सायकलीपासून तो रेल्वेच्या वॅगनीपर्यंत सर्व तऱ्हेच्या बॉलबेअरिंग येथे तयार होत आहेत. हिंदुस्थानच्या आगगाड्यांकरिता मागील वर्षी आम्हांला ऑर्डर मिळाली. यंदा ती मिळते की नाही तें बघावयाचें असें तेथील मॅनेजरने आम्हांला

सांगितलें. फॅक्टरी पाहिल्यावर असें वाटलें की, बॉलबेअरिंगचें काम विकेंद्रीकरणाला सुलभ आहे. निदान तशी आमच्यावर छाप पडली. कामाच्या निरनिराळ्या क्रियांपैकी कांही क्रिया तरी घरोघरीं होऊं शकल्या असत्या. परंतु सर्वच क्रिया एकाच ठिकाणीं व्हाव्या अशाच कल्पनेने फॅक्टरीची आंखणी केली होती. फॅक्टरींत ठिकठिकाणीं क्रोटनच्या व फुलझाडांच्या कुंड्या ठेवल्या होत्या. काम करणाऱ्या स्त्रियांनी केस बांधून काम केलें पाहिजे असा नियम होता. कारण मशीनमध्ये केस सापडून धोका होण्याचा संभव. म्हणून प्रत्येक स्त्री आपल्या डोक्याला एक मोठा रुमाल बांधून काम करीत होती. परंतु ठिकठिकाणीं नेलपॉलिश स्त्रियांनी लावलेंच होतें. व प्रत्येक स्त्रीच्या ओठावर लिपस्टिक खुलून दिसतच होती. याबाबत युगोस्लावियांत अगदी मागासलेलीं खेडीं सोडलीं तर आम्हांला कुठेहि फरक दिसला नाही.

सर्व कामगारांना, स्त्रीपुरुषांना सर्वांना, काम करण्याचा ड्रेस फॅक्टरीं-कडून पुरविलेला होता. फॅक्टरीला जोडून अेक क्लिनिक होतें. त्यांत डॉक्टर, नर्स, औषधपाण्याची सोय इत्यादि सर्व व्यवस्था होती. हा सर्व खर्च फॅक्टरीच करीत होती. दातांची परीक्षा करून काम करणाऱ्यांना सल्ला व उपचार करण्या-करिता एक अर्धा वेळ देणारी दातांची (स्त्री) डॉक्टरहि होती.

प्रत्येक फॅक्टरीला आपल्या कामगारांकरिता सोशल इन्शुअरन्स म्हणून कामगारांच्या पगाराच्या शेकडा ३५ एवढी रक्कम द्यावी लागते. यांत हेल्थ इंशुअरन्स, अन्‌एम्प्लॉयमेन्ट इंशुअरन्स, चिल्ड्रन्स अलाउंस व ओल्ड एज पेंशन या बाबी सामील आहेत. युगोस्लावियाभर ही पद्धति आहे. एवढेंच नव्हे तर खाजगी नोकरांना सुद्धा ती लागू आहे. एका खाजगी व्यक्तीला पांचापेक्षा जास्त नोकरच ठेवतां येत नाहीत. परंतु तुम्हीं पगारी नोकर ठेवला की, त्याच्याकरिता सोशल इन्शुअरन्स म्हणून तुम्हांला त्याच्या पगाराच्या शेकडा ३५ एवढा हिस्सा सोशल इन्शुअरन्स फंडाला द्यावा लागतो. यामुळे कामगार आजारी पडला तर त्याची शुश्रूषा, औषध, इतर उपचार व शक्ति भरून येण्याकरिता म्हणून विश्रांति, त्याकरिता लागणारा प्रवास व इतर खर्च हें सर्व या फंडाकडून मिळतें. या सवलतीचा कांही गैरवाजवी फायदाहि घेण्यांत येत आहे. परंतु या सवलतींत कांही बदल होत नाही. आजारीपणांत कांही पगाराच्याहि सवलती आहेत.

कांही कारणांमुळे काम नसलें तर कामगाराला या फंडामार्फत पगार चालूं राहतो. ६० वर्षांनंतर मनुष्याला व ५५ वर्षांनंतर स्त्रीला शेवटचा पगार जेवढा असेल तेवढें पेंशन मरेपर्यंत मिळतें. याशिवाय प्रत्येक मुलाबाबत मुलाचें शिक्षण होईपर्यंत चिल्ड्रन्स अलाउन्स म्हणून एक निश्चित रक्कम ३००० दिनार–मिळत असते. ह्या सोयी फक्त कामगारांकरिता आहेत. जमिनीची मालकी बाळगून असलेल्या शेतकऱ्यांकरिता नाहीत. परंतु ज्यांनी जमिनीची मालकी सोडली आहे किंवा

ज्यांच्या जवळ जमीन नाही असे शेतीवर काम करणारे मजूर व निरनिराळे तज्ञ या सर्वांना या सोयी लागू आहेत. उत्पादनाच्या साधनांची मालकी नसली व कुठे तरी काम असलें की, या सर्व सोयी त्याबरोबर आल्याच. या बाबतींत जास्त पगार व कमी पगार हा फरक नाही. चिल्ड्रन्स अलाउन्स व औषधपाणी व तब्यतदुरुस्तीची सोय सर्वांना सारखीच उपलब्ध आहे.

नुकतेंच कोठे-कोठे लागट रोगाकरिता शेतकऱ्यांना इन्शुअरन्सच्या कांही सोयी लागू केल्या आहेत. पण ही पद्धति वाढविण्याची आता अडचण भासत आहे. कामगारांकरिता सवलतींचा व्याप एवढा मोठा वाढविला आहे की, आता त्यांना त्या वाढविणें फार खर्चाचें वाटत आहे. माझ्या मनांत एकदम कल्पना आली की, जर युगोस्लावियांतील सर्व शेतकऱ्यांनी आपली जमिनीवरील मालकी सोडली तर काय होईल ? एकतर कामगारांच्या या सवलती काढाव्या लागतील किंवा त्या बऱ्याच कमी कराव्या लागतील. त्या आज एवढ्या मोठ्या प्रमाणांत आहेत की, शेतीवर काम करणाऱ्या सर्व लोकांना त्या सरसकट लागू करणें आज तरी शक्य दिसत नाही.

बॉलबेअरिंगच्या कामाची कल्पना येण्याकरिता येथे एक गोष्ट नमूद करून ठेवली पाहिजे की, या सर्व फॅक्टरीच्या वर्षाच्या उत्पन्न झालेल्या वस्तूंचें वजन केवळ ५०० टन होतें, तें ६१ सालीं १००० टन होणार आहे. एक टन म्हणजे २८ मण या हिशेबाने ६५० मजूर लावणाऱ्या फॅक्टरींत बॉलबेअरिंगची संख्या व आकार काय असेल याची कल्पना करतां येईल.

प्रत्येक फॅक्टरींत एक ट्रेड युनियनची शाखा असते. ती आपलें बहुतेक काम वर्कर्स कौंसिलमार्फत करीत असते. ज्याप्रमाणे कॉम्युनिस्ट पार्टी सोशालिस्ट अलायन्समार्फत आपलें राजकीय काम करतें त्याचप्रमाणें ट्रेड युनियन संघटना वर्कर्स कौंसिलमार्फत आपलें कामगारांविषयीचें धोरण चालवीत असावी असा माझा समज होत आहे.

वर्कर्स कौंसिल प्रथम कामगारांचें सर्वसाधारण स्केल ठरवितें. त्यानंतर विशिष्ट कमिटचा बनविण्यांत येतात. यांत मॅनेजिंग कमेटीतर्फे फोरमन व वर्कर्स कौंसिलतर्फे कांही कामगारांचे प्रतिनिधि असे मिळून प्रत्येक कामाचे पगार व त्यानुसार काम ठरवितात. शेवटी आमदनीचें प्रमाण कामावरच असतें. ठरल्याप्रमाणे काम झाल्यास किमान पगाराच्या शेकडा ८० एवढें कामगाराला मिळालेंच पाहिजे असा कायदा आहे. तूट पडल्यास बाकीची तरतूद कॉम्यून, किंवा रिपब्लिक यांनी केली पाहिजे असें आहे.

एकदा पगार ठरले की, मग खालच्या लोकांचे पगार वाढले पाहिजेत व त्यानुसार कारखान्याचें धोरण पाहिजे असें कांही दिसून आलें नाही. म्हणजे कामगारांचा कारखाना या भावनेंतून सर्व कामगारांत जास्त बंधुभाव दिसून

आला नाही. कारखान्याच्या नफ्यांतून वांटले जाणारे बोनस सर्वांना त्यांच्या पगाराच्या अनुसारच मिळावयाचे. लहान पगाराच्या लोकांना जास्त व मोठ्या पगाराच्या लोकांना कमी असा भेद नाही. तसें करण्याची वृत्तिहि तेथे दिसत नाही. उलट येथील लोकांचें म्हणणें तर याविरुद्ध दिसतें. 'लिबरेशननंतरच्या आमच्या राजवटींत लहान शेतकरी व मजूर सुखी झाला. परंतु कारखाने व राज्य चालविणारा मध्यम वर्ग असंतुष्ट आहे. आपली जबाबदारी पार पाडण्याकरिता पुरेसें आर्थिक आकर्षण नाही असें त्याला वाटतें. म्हणून आम्ही या वर्गाचे पगार वाढविण्याच्या विचारांत आहों' असें आम्हांला सांगण्यांत आलें.

सुमारे दहा वाजतां आम्ही फॅक्टरी पाहून व हिंदुस्थानाकडून तुम्हांला पुन्हा ऑर्डर मिळेल अशी शुभेच्छा प्रगट करून आम्ही नोविसाद येथे तेथील शेतकी जत्रा पाहावयाला गेलों.

सर्वियाच्या एका स्वायत्त भागाला व्हावव्होदिना असें नांव आहे. सर्वियन रिपब्लिकमध्ये असे दोन स्वायत्त भाग आहेत. एक व्हायव्होदिना व दुसरा कॉस्मेट. व्हावव्होदिना भागाचें मुख्य शहर नोविसाद. व्हावव्होदिना हा प्रदेश युगोस्लावियाचें धान्याचें कोठार आहे. या लहानशा प्रदेशांत संपूर्ण युगोस्लावियांत उत्पन्न होणाऱ्या धान्याचा $\frac{3}{4}$ हिस्सा उत्पन्न होतो. युगोस्लावियांत शेतीच्या दृष्टीने हा सर्वांत भरभराटीचा प्रदेश. कांही दिवसांनी आम्ही जेव्हा येथील फार्मवर पीकपाहणीकरिता गेलों तेव्हा तेथील गव्हाचें पीक पाहून मन थक्क झालें. गव्हाला पाणी दिलें नसून सुद्धा गहू फारच छान होता. युगोस्लावियांत आता इटालियन गव्हाचें बीं लावण्यांत आलें आहे. तें जास्त पीक देतें. मला तर असें सांगण्यांत आलें की, इटालींत एका एकरांत जेवढा गहू उत्पन्न होतो तेवढा इतर कोणत्याहि देशांत होत नाही. इतर कसल्याहि बाबतींत जगांतला पहिला नंबर पटकावेल अशी कांही इटालीची कीर्ति नाही. मग शेतीच्या बाबतींत कां, असा मीं प्रश्न केला असतां, अत्यंत दाट लोकसंख्या असल्यामुळे त्यांना आपली सर्व शक्ति लावून जास्त पीक काढणें भाग पडतें असें उत्तर देण्यांत आलें.

व्हायव्होदिना बेलग्रेडहून उत्तरेकडे जवळजवळ ५० मैल आहे. रस्ता फारच चांगला होता. आंतर राष्ट्रीय आम सडक (Internetional high way) असल्यामुळे ती विशेषच चांगल्या स्थितींत होती. आमची मोटार १०० ते १२५ किलोमिटर ह्या वेगानें चालली होती. भोवतालचा प्रदेश फारच सुंदर व रमणीय दिसत होता. युगोस्लावियांत जवळजवळ बाराहि महिने पाऊस पडत असल्यामुळे नेहमी हिरवळ असते. बाजूचीं खेडीं-पाडीं सुद्धा नीटनेटकीं व व्यवस्थित दिसत होतीं. जणू काय कोणी पाहणी करण्याकरिता येणार म्हणून व्यवस्थितपणा मुद्दाम आणण्यांत आला आहे, असें वाटत होतें. कांही मोठ्या गावांतून रस्ता जात

होता. दोन्हीकडील घरें व्यवस्थित पद्धतीने बांधलेलीं व रस्त्याच्या दोन्ही बाजूंला दुतर्फा झाडें लावलेलीं होतीं. अधूनमधून गरीबांचीं घरेंहि दिसलीं पण त्यांतहि व्यवस्थितपणा दिसला. पन्नास मैल आमच्या खेड्यांतून व शहरांतून आम्ही फिरलों तर किती अव्यवस्थितपणा दिसेल? कांही घरें पुढे आलेलीं, कांही पाठीमागे झालेलीं, मध्येच मोकळी जागा पडलेली, कुठे पाण्याचें डबकें सांचलें आहे, कुठे घाण पडली आहे, कुठे झाडेंच नाहीत तर कुठे कशींबशीं वेडीवाकडीं झाडें निघालेलीं आहेत, एक घर तीन मजली तर बाजूलाच लहानसें खोपटें, असा किती तरी गबाळेपणा दिसून येईल.

नोविसाद डॅन्यूब नदीच्या किनाऱ्यावर आहे. शहराच्या एका बाजूला चांगलें तीन चार चौरस मैलांचें मोकळें पटांगण आहे. तिथे ही जत्रा भरलेली होती. जत्रा फक्त दहाच दिवस चालणार होती. पण तिच्याकरिता व्यवस्था व सोय एवढी करण्यांत आली होती की, जणू ती कांही एक दोन महिने चालणार आहे. रशिया, पोलंड, जर्मनी, हंगारी ऑस्ट्रिया, रुमानिया, बल्गारिया इत्यादि देशांनी या जत्रेंत किंवा प्रदर्शनांत भाग घेतला होता. ती जत्राहि होती व प्रदर्शनहि होतें. परंतु सर्व वस्तु शेतीच्या किंवा शेती-संबंधीच्या होत्या. शेतीचीं अवजारें, घोडा, गायी, सांड, डुकरें, कोंबड्या, बीं, कीडनाशक व प्रतिबंधक औषधें, ट्रॅक्टर व इतर शेतीविषयक मशिनरी, हीं सर्व तेथे होतीं. कारखानदार आपापल्या वस्तूंकरिता शेतकऱ्यांकडून ऑर्डर्स घेत. म्हणून या प्रदर्शनाला जत्राहि म्हणतां येईल. आणि शेतीची प्रगति लोकांना कळावी व उत्तम पीक काढणाऱ्यांना बक्षिसें देण्यांत यावीं अशीहि कल्पना असल्यामुळे हें प्रदर्शन-हि होतें. युगोस्लाव्ह सरकारने स्वत: प्रत्येक रिपब्लिकमार्फत केलेल्या प्रगतीचें दिग्दर्शन फार मोठ्या प्रमाणावर केलें होतें.

दहा दिवसांनंतर ही जत्रा दुसऱ्या ठिकाणीं जाणार होती. मला कळलें की, प्रत्येक देशांत दहा-दहा दिवस ही जत्रा फिरत असते. हिचा उद्देश ठिक-ठिकाणच्या व्यापाऱ्यांना आपला माल शेतकऱ्यांच्या नजरेला आणतां यावा हा आहे.

प्रदर्शन फार अवाढव्य व उठावदार होतें. युगोस्लावियांत फळें पुष्कळ होतात व नाना तऱ्हेचीं होतात. त्यापासून फार मोठ्या प्रमाणांत दारू तयार कर-तात. आम्हांला विशेष आकर्षक असा पशु-विभाग वाटला. गायी, घोडे, सांड हे फार मोठे व डोळ्यांत भरण्यासारखे होते. तरी या सर्व बाबींत युगोस्लाविया मागे आहे. डेनमार्क, हॉलंड व स्विट्झरलंड येथून सांड व गायी आणून युगोस्लावियांतील गायींचा वंश सुधारण्याचा येथील लोकांचा प्रयत्न आहे. तरी देखील वर्षांतून सरासरी ३०४ दिवस येथील गाय दूध देते व एका वितांत १०,००० लिटर्स दूध मिळतें. थंड प्रदेशांतील हीं जनावरें असल्यामुळे कांही गायींच्या अंगावर मेंढ्यासारखे केस होते. सांड मोठे होते पण चपळ दिसत नव्हते. येथे बैलांकडूनहि शेती करण्यांत येते.

तरी पण बैल लठ्ठ करून मारण्याचा धंदा फार मोठ्या प्रमाणावर सुरूं आहे. आपल्या देशाच्या मानाने युगोस्लावियाने शेतींत फार मोठी प्रगति केली आहे. यावरून इतर प्रगत यूरोपियन राष्ट्रांच्या मानाने आपण किती मागे आहोंत याची कल्पना येईल.

जत्रेंत ठिकठिकाणीं हॉटेल्स व करमणुकीचीं साधनें होतीं. सभोवतालचे बरेचसे लोक आपापल्या पेट्या घेऊन ठिकठिकाणीं उतरले होते. दिवसभर राहून ते रात्रीं घरीं जाणार होते. आपल्याबरोबर खाण्यापिण्याची सामुग्री त्यांनी आणलेली होती. पुष्कळसे विद्यार्थ्यांचे थवे त्यांच्या शिक्षकांबरोबर व्यवस्थितपणें इकडून तिकडे फिरत होते. आम्हा हिंदुस्थानी लोकांना पाहून व विशेषतः आमच्याबरोबर असणाऱ्या दोन स्त्रियांच्या साड्या पाहून या मोठ्या प्रदर्शनांत आमचेंहि छोटेसें प्रदर्शन होत होतें. एका शाळेंतील विद्यार्थ्यांनी आपल्या शाळा-मास्तरला गळ घातली की, शाळेंतील सर्व विद्यार्थ्यांचा फोटो आमच्याबरोबर घेण्यांत यावा. तो मास्तर आमच्याकडे त्याप्रमाणे विनंती करावयाला आला व आम्हीं त्या विनंतीला मानहि दिला. त्याबरोबर इतरहि लोक इतक्या विनंत्या करूं लागले की, आम्हांला तिथून काढतां पाय घ्यावा लागला.

दुपारीं नोविसादला जेवण करून आम्ही सायंकाळीं बेलग्रेडला परतलों. ६ वाजतां बेलग्रेड शहराच्या म्युनिसिपल विभागाच्या उपाध्यक्षाची आम्हीं भेट घेतली. शहराचा कारभार आणि खेड्यांनी बनलेल्या कॉम्यून्समध्ये जीं थोडीशीं शहरें आहेत त्यांचा कारभार कसा चालतो याचें त्यांनी चांगलें मार्गदर्शन केलें.

रात्रौ अंब्यॅसेडर श्री अलीयवार जंग यांचेकडे जेवण होतें. त्यांनी येथील एक कॉम्युनिस्ट पार्टीचे सभासद व ईस्टर्न अफेअर्स इन्स्टिटयूटचे प्रमुख श्री स्टॅनोव्हनिक यांना मुद्दाम आमच्या भेटीकरितां जेवावयाला बोलावलें होतें. सुरवातीला जिलासबद्दल बोलणें झालें. जिलास हा पार्टीचा फार लाडका. पण त्याने पहिल्या बायकोशीं काडीमोड करून आपल्या सेक्रेटरीशीं लग्न लावल्यानंतर हळूहळू तो पार्टीच्या मर्जीतून उतरला. मला तावडतोब नेपोलियन बोनापार्टची आठवण झाली. जोशेपाईनशीं काडीमोड करून त्याने दुसरें लग्न केलें तेव्हापासून त्याला उतरती कळा लागली, असें त्याच्या एका प्रसिद्ध चरित्रकाराने (अॅबॉटने) लिहिलें आहे. जिलासचें मुख्य म्हणणें हें की, पाश्चात्य राष्ट्रांत ज्याप्रमाणे पुष्कळ पक्ष असतात, त्याप्रमाणे पक्ष उभारण्याची सोय युगोस्लावियांत झाल्याशिवाय खरी लोकशाही या देशांत येऊं शकणार नाही व त्याशिवाय खऱ्या सामजवादाकडे आम्ही जाऊं शकणार नाहीं. प्रथम लोकशाही व नंतर समाजवाद. लोकशाहीमार्फत समाजवाद ही त्याची घोषणा. त्याच्या पक्षाच्या लोकांना ही भीति वाटे की, नाना पक्ष निर्माण झाल्यास समाजवादच धोक्यांत येईल व आतापर्यंत केलेली प्रगति व्यर्थ जाईल.

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे
अनुक्रम ३११३७ दि: ५-५-१९५८
क्रमांक २९५ नों: दि: ८।८।५९

## युगोस्लावियातील वास्तव्याची दैनंदिनी

जिलास हा पूर्वीपासूनच स्वत:विषयी बेफिकिर असणारा, लोकांशीं अत्यंत मिळूनमिसळून वागणारा, फार मोठाचा मनाचा व प्रेमळ स्वभावाचा मनुष्य होता. सुरवातीपासूनच त्याचें रशियाशीं सूत नव्हतें. त्यामुळे तर रशियाशीं युगोस्लावियाचें फाटल्यावर तो विशेषच लोकप्रिय झाला. परंतु हळूहळू त्याच्या मनांत परिवर्तन व्हावयाला सुरवात झाली. कदाचित् कॉम्युनिस्ट पार्टीचे बरेच लोक ज्या ऐषआरामांत राहतात त्यामुळे त्याच्या मनावर परिणाम झाला असावा. 'दी न्यू क्लास' या त्याच्या नंतरच्या पुस्तकावरून याबाबत थोडीशी कल्पना करतां येते. कॉम्युनिस्ट पार्टीच्या जुन्या सभासदांच्या वागणुकीवर, त्यांच्या स्त्रियांच्या वागणुकीवर, त्याने पार्टीच्या मुख्य पत्रांतून (बोर्बा म्हणजे स्ट्रगल) टीका सुरु केली. सुरवातीला तो आपले लेख मार्शल टिटोला दाखवून छापत असे असें म्हणतात. पण नंतर स्वतंत्र रीतीने तो ते छापावयाला लागला. एका मोठ्या प्रसिद्ध अशा नियतकालिकांत कॉम्युनिस्ट पार्टीच्या फार मोठ्या लोकांच्या स्त्रियांच्या वागणुकीविरूद्ध त्यानें टीका केली. जिलास याचें पार्टींतहि स्थान असल्यामुळे व पार्टीच्या संघटनेवरहि त्याची पकड असल्यामुळे पार्टीचे खालचे लोक त्याचे विचार फार उत्सुकतेने व आवडीने ग्रहण करूं लागले. तेव्हा मात्र प्रमुख लोकांचें धाबें दणाणलें. पार्टीच्या सेंट्रल कमिटीची सभा बोलावण्यांत आली व त्याला जबाब विचारण्यांत आला. असें म्हणतात की, त्या वेळीं त्याचें धैर्य गळालें. तो रडला. आपली चूक त्याने कबूल केली. म्हणून फक्त सेंट्रल कमिटीच्या त्याच्या अधिकाराच्या जागेवरून त्याला काढण्यांत आलें. पण हळूहळू त्याच्या मनांत फरक घडावयाला लागला. पुन्हा वर्तमानपत्रांत लिहिणें त्यानें सुरूं केलें. कदाचित् आपण आपली चूक कबूल केली याबद्दल त्याला पश्चात्ताप झाला असावा. त्यानंतर त्याने कॉम्युनिस्ट पार्टीचें मेंबरशिप-कार्ड परत केलें व स्वतंत्रपणें आपलें लिखाण सुरूं केलें.

त्यानंतर सरकारची सत्ता नाहीशी कशी होईल, पार्टीची सत्ता नाहीशी कशी होईल व ती नाहीशी झाल्यावर तिची जागा कोणी घेईल काय व घेतल्यास त्या संस्थेचें स्वरूप काय राहील याबद्दल चर्चा झाली. श्री स्टॅनोव्हनिक यांचें म्हणणें असें की, पार्टी व सरकार यांची जागा कोणत्या तरी संस्थेला द्यावीच लागेल. पण तिचें स्वरूप काय राहील याबद्दल त्यांना कल्पना नव्हती. डेमॉक्रसी चांगली की, युगोस्लावियाची आजची पद्धति चांगली याबाबत शेवटी चर्चा झाली. युगोस्लावियाच्या आजच्या पद्धतींत जे दोष एका सर्वंकष कॉम्युनिस्ट पार्टींत राहूं शकतात तेच एका निराळ्या स्वरूपांत राहण्याची भीति आहे असें माझें मत मीं मांडलें. डेमॉक्रसींत जनतेचा कौल घेण्याची जी सोय आहे त्यामुळे अल्पमतवाले कधीच राज्य करूं शकत नाहीत व राज्यकर्त्यांनाहि लोकमत राजी करून घेण्याची जबाबदारी कायमचीच भासत असते. त्यांच्यावर हा एक अंकुश कायमचा असल्यामुळे त्यांना बेपर्वाईने

वागतां येत नाही. विकेंद्रीकरणांतून जोंपर्यंत हा पर्याय साधत नाही तोंपर्यंत युगोस्लावियांतील पद्धति डेमॉक्रसीच्या बरोबरीला येऊं शकत नाही व या दृष्टीनें जिलासचें म्हणणें योग्य आहे असें वाटतें. रात्रीं ११॥ ला आम्ही परतलों. दुसऱ्या दिवशीं श्री स्टॅनोव्हनिकशीं पुन्हा भेट ठरविली.

* * *

## गुरुवार ता. ७–५–५९

दुपारीं श्री स्टॅनोव्हनिकच्या ऑफिसमध्ये आम्ही आधल्या दिवशीं ठरविल्याप्रमाणे गेलों. येथील राज्यपद्धति, निरनिराळ्या लोकांच्या पगाराच्या मर्यादा याबाबत पुष्कळ नवी माहिती मिळाली.

* * *

## शुक्रवार ता. ८-५-५९

आज सकाळीं व्हायव्होदिना विभागाचा दोन दिवसांचा दौरा आम्हीं सुरू केला. सुरवातीला नोव्हीसादला पोहोचून दहा वाजतां तेथील एक्झिक्युटिव्ह कौंसिलच्या प्रमुखांशीं आम्ही भेटलों. स्वायत्त विभागाचे अधिकार काय व त्यांचा रिपब्लिकशीं काय संबंध आहे याबाबत सविस्तर चर्चा झाली. साधारणपणें फेडरेशन जनरल कायदा करतें व रिपब्लिक त्याला आपल्या परिस्थितीला अनुसरून स्वरूप देतें. हेंच नातें रिपब्लिक व ऑटोनमस प्रॉव्हिन्सचें (स्वायत्त विभागाचें) आहे. फरक एवढाच की, स्वायत्त विभागाला कायदा करण्याचा अधिकार नाही. मूळ कायद्याला अनुसरून नियम बनविण्याचा अधिकार आहे. उदाहरणार्थ, काम करण्याला अडथळा येईल अशी कोणतीहि प्रथा असूं नये. या फेडरल कायद्याचा लाभ घेऊन रिपब्लिकन सरकारनें बुरख्याविरुद्ध कायदे केले. हा कायदा व्हायव्होदिनाला सुद्धा लागूं आहे. परंतु जमीन सरकारने दुरुस्त केल्यावर ती कोणत्या शर्तीवर व्यक्तीला किंवा समाजाला किंवा सहकारी सोसायटीला परत द्यावी याबाबत नियम व्हायव्होदिनाच्या पीपल्स कमिटीने बनविले. आपल्या विभागाची अध्यक्षाला पूर्ण माहिती दिसली. केवळ नामधारी अध्यक्ष तो नव्हता. एकंदर व्हायव्होदिनांत १० जिल्हे व १६१ कॉम्यून्स आहेत. शेकडा ५६ लोकसंख्या शेतीवर उपजीविका करते. शेतीपासून ५०% उत्पन्न या स्वायत्त विभागाचें आहे. सर्व युगोस्लावियाच्या एकूण गव्हाचा तिसरा हिस्सा तिथे उत्पन्न होतो. एकंदर १२५ सोशल फार्मस् आहेत व त्यांच्याजवळ २००,००० हेक्टर जमीन आहे.

२२६ पेझंटस वर्किंग कोऑपरेटिव्ह कमिट्या आहेत व त्यांच्याहिजवळ २००,००० हेक्टर जमीन आहे. ३८२ जनरल कोऑपरेटिव्ह समित्या आहेत. त्यांच्याजवळ ४६०,००० हेक्टर जमीन आहे. १९४८ सालीं त्यांच्याजवळ १८०० ट्रॅक्टर होते, आज १०,००० आहेत. अशी माहिती त्यांनी दिली. शेतीच्या दर एकरीं उत्पन्नाचे खालील आंकडे त्यांनी आम्हांला दिले.

| वर्ष | व्यक्तिगत शेतकरी | पेझंटस वर्किंग कोऑपरेटिव्ह | सोशल फार्म |
|---|---|---|---|
| '५७ | १८ . १ | २२ . ६ | २३ . ५ |
| '५८ | १२ . ६ | २२ . २ | २३ . ८ |

५७ हें वर्ष ५८ च्या तुलनेने फार चांगलें असून सुद्धा सोशल फार्म्सवर ५८ सालीं दर एकरीं उत्पन्न वाढलें, वर्किंग पेझंट्स कोऑपरेटिव्हमध्ये फार फरक नव्हता व व्यक्तिगत शेतकऱ्यांचें उत्पन्न मात्र फार माग आहे हें त्यांना दाखवावयाचें होतें. त्याचप्रमाणे डुकरें व गायी यांची संख्या वाढली पण ट्रॅक्टर्स वाढल्यामुळे घोड्यांची संख्या बरीच कमी झाली. सरकारचें धोरण शेतीवर आता जास्त खर्च करण्याचें आहे. पूर्वी जोर इंडस्ट्रियलायझेशनवर होता, आता शेतीवर आहे. याविषयीचे खालील आंकडे अध्यक्षांनी दिले.

| | १९५७ | १९५८ |
|---|---|---|
| शेती | ६ | ३० |
| उद्योग | ५ | ७ |

५८ सालीं आम्हीं शेतीवरील लागत ५ पट वाढविली परंतु उद्योगांत केवळ १॥ पटीने वाढ झाली. शेतकरी व्यक्तिगत असो की सहकारी समितींत असो त्याला सरकारला द्याव्या लागणाऱ्या टॅक्समध्ये कांही फरक नाही असें सांगण्यांत आलें. या विभागांत शेतीबरोबर उद्योगहि पुष्कळ वाढला आहे. शेती ही नेहमी हंगामीच राहणार, औद्योगिक कामगारांप्रमाणे शेतकऱ्याला बाराहि महिने काम मिळणें शक्य नाही. फक्त मेकॅनायझेशनने त्याच्या कामाचे तास, शेतीचें प्रमाण व उत्पन्न एवढें वाढवितां येईल. शेतकऱ्याला पूर्ण उद्योग देण्याकरिता ग्रामोद्योगासारखी कांही कल्पना किंवा योजना आमच्याजवळ नाही असें त्यांनी सांगितलें.

त्यानंतर तेथील एक राष्ट्रीय म्युझियम आम्हांला दाखविण्यांत आला. जुन्या काळापासून तो आजतागायत सर्वियांत जे नामांकित पेंटर्स होऊन गेले त्यांची कृति व कला येथे दर्शविण्यांत आली होती. हिंदुस्थानासारखाच सर्वियाचा इतिहास आहे. सहा-सातशे वर्षें त्याला आपल्या स्वतंत्र्यारिकता झगडावें लागलें. प्रथम तुर्कांनी त्यांचें स्वातंत्र्य हिरावलें. नंतर आस्ट्रिया-हंगारी येथील लोकांविरुद्ध त्यांना लढावें लागलें. हिंदुस्थानासारखे येथे पुष्कळ राष्ट्रिक (Nationalities) आहेत.

व आजपावेतों तरी तरी त्यांच्यांत आपसांत फार मोठें वैमनस्य होतें. विशेषतः क्रोआट्स व सर्वियन्स यांच्यामध्ये तर फारच वितुष्ट होतें. त्यांचा इतिहास हिंदुमुसलमानांच्या इतिहासासारखा आहे. परकी सत्तेने केव्हा एकाला केव्हा दुसऱ्याला आपल्या हातीं धरून आपली सत्ता बळकट करण्याचा प्रयत्न केला. Divide et impera ही नीति सर्वच राज्यकर्त्यांनी अनादि कालापासून वापरलेली दिसते. म्हणून आजच्या सरकारने प्रत्येक राष्ट्रिकाला आपलें स्वतंत्र रिपब्लिक करून दिलें आहे. म्हणूनच श्री राधाकृष्णन् यांनी एक राज्य, ६ रिपब्लिक्स ५ राष्ट्रिकें, ४ भाषा, ३ धर्म, २ लिप्या असें या राज्याचें थट्टेने वर्णन केलें होतें.

या सर्व इतिहासाची छटा म्युझियममध्ये पाहावयाला मिळते. तुर्की-विरुद्ध लढलेल्या सरदारांचीं चित्रें दाखविण्यांत आलीं होतीं. विशेषतः निरनिराळ्या कालखंडांत चित्रकलेंत काय परिवर्तन झालें, तोच ख्रिस्त मेडोना, तेच लास्ट सपर पण निरनिराळ्या कालखंडांत तें कसें दर्शविण्यांत आलें हें सुंदर तऱ्हेने आम्हांला समजाविण्यांत आलें. शेवटचें दालन आधुनिक चित्रकलेचें होतें. आमच्यांपैकी कोणीच फारसे कलाभिज्ञ नव्हते. परंतु आम्हां सर्वांनाच जुन्या कलेच्या मानाने तें कमी आकर्षक व कमी उठावदार वाटलें.

दुपारीं जेवणानंतर येथील शेतकी रिसर्च-स्टेशन व फार्म पाहावयाला आम्ही गेलों. रिसर्च-स्टेशन हिंदुस्थानांतील चांगल्या प्रतीच्या रिसर्च-स्टेशनसारखेंच आम्हांला वाटलें. पुसा ॲग्रिकल्चरल रिसर्च इन्स्टिटयूटबरोबर रिसर्च पेपर्सची कांही देवाणघेवाण आहे काय या माझ्या प्रश्नाला त्यांनी नाही असें उत्तर दिल्यावर मीं पुसा इन्स्टिटयूटचा पत्ता त्यांना दिला. आम्ही जी गव्हाची प्रत तयार करीत आहोंत ती प्रोटीन व ग्लुटेनच्या प्रमाणांत जगांतील सर्वांत चांगल्या गव्हाच्या तोडीची राहील असें त्यांनी आम्हांला सांगितलें. त्यांचीं फार्मवरील पिकें पाहून तर मला फारच आश्चर्य वाटलें. एवढें दाट गव्हाचें पीक मीं आजपर्यंत पाहिलें नव्हतें. गहू चांगला वाढला होता व खूपच दाट होता. गव्हाला पाणी दिलें नव्हतें. व्हरायटी इटालियन होती. सेंद्रीय खत व रासायनिक खत अशीं दोन्ही खतें दिलीं होतीं. एकट्या गव्हाचेंच नव्हे तर फार्मवरील सर्वच पिकें फारच उठावदार दिसत होतीं. मुख्य पिकें गहू, सनफ्लॉवर, राय, कोव्हर, वाटाणे इत्यादि होतीं. त्यानंतर तेथील व्हेटर्नरी सेंटर पाहावयाला आम्ही गेलों. १४-१५ निरनिराळ्या जातीचे सांड ठेवले होते व त्यांचें वीर्य कृत्रिम रेतन पद्धतीने भोवतालच्या साठ उपकेंद्रांतून उपयोगांत आणलें जात होतें. अशीं तीन केंद्रें व्हायव्होदिनांत आहेत अशी माहिती मिळाली. याशिवाय पशूंच्या सर्व बिमाऱ्यांवर संशोधनाची व औषधाची व्यवस्था या केंद्रामार्फत होत आहे. कृत्रिम रेतन शेकडा ७० सफल आहे व साधारण पद्धतींत-हि हेंच प्रमाण पडतें असें सांगण्यांत आलें. याशिवाय साधारण पद्धतींत एक सांड

सरासरी ६० गायींना फळवूं शकतो पण कृत्रिम पद्धतींत एका सांडापासून २०० गायी फळूं शकतात. सुरवातीला या पद्धतीविषयी शेतकऱ्यांच्या मनांत किंतु होता पण आता तो राहिला नाही.

रात्रीं डॅन्यूब नदीच्या काठीं एका रमणीय स्थळीं एका हॉटेलांत आम्हीं मुक्काम केला. युगोस्लावियांत ही फार चांगली सोय आहे. सृष्टिसौंदर्याच्या ठिकाणीं हॉटेल्स आहेत. तिथे राहण्याची व जेवणाची उत्तम सोय असते व रविवारीं किंवा सुट्टीच्या दिवशीं तिथे पुष्कळ लोक राहावयाला येतात. अशाच एका ठिकाणीं हें हॉटेल होतें. भोवतालच्या जंगलांतून वाटा नदीकडे काढल्या होत्या. मुलांना खेळण्याकरिता हॉटेलसमोरच एक पार्क करण्यांत आला होता. हॉटेलांतील रिवाजाप्रमाणे जेवण्याच्या वेळीं ऑर्केस्ट्रा व गाणें–विशेषत: एखाद्या युवतीचें गाणें–चालूं असतें. याप्रमाणे कार्यक्रम झाल्यावर आम्हीं आपापल्या खोलींत विश्रांति घेतली.

* * *

## शनिवार ता. ९-५-५९

आज आम्हीं एक पेझंट्स वर्किंग कोऑपरेटिव्ह व जनरल वर्किंग कोऑपरेटिव्ह या संस्था पाहिल्या. या संस्था एकमेकीपासून बऱ्याच लांब होत्या त्यामुळे जाण्यायेण्यांत आमचा बराच वेळ गेला. या दोन्ही सोसायटयांत फरक हाच आहे की पहिल्या संस्थेंत सभासद आपली जमीन एकत्र आणतात व सामुदायिक पद्धतीने शेती करतात. जमिनीच्या मालकांना जमीनीबाबत कांही ठराविक रक्कम देतात. पण त्यापलीकडे जमिनीच्या मालकाचा व सोसायटीचा कांही संबंध येत नाही. केवळ जमीन संस्थेंत आहे यामुळे मालक सोसायटीचा सभासद होत नाही. याच्या उलट जमीन नसून सुद्धा शेतांत राबणारा मजूर समितीचा सभासद होतो व समितीच्या सर्व कामांत त्याला भाग घेतां येतो. संस्थेंत जमीन देणारा मालक जर मजूर म्हणून काम करीत असेल तर त्याला काम करणारा म्हणून सभासदाचे सर्व हक्क आहेत.

जमीन एकत्र करून सामुदायिक पद्धतीने शेती करतात. संस्थाच शेतकीतज्ज्ञ, पशुशास्त्राचा तज्ञ, ट्रॅक्टर आदि अवजारें व इतर साधनें यांची व्यवस्था करते. ही संस्था १९४७ सालीं स्थापन झाली. गावाचें नांव सस्की. तिच्याजवळ १२५६ हेक्टर जमीन आहे, पैकी ९५४ शेतीखाली व बाकीचें कुरण आहे. २०४ सभासद-मजूर बाराहि महिने काम करतात व २०० मजूर हंगामी काम करतात. संस्थेजवळ पुढील अवजारें आहेत. एकंदर मोठे, लहान व मध्यम मिळून २३ ट्रॅक्टर्स,

५ हार्वेस्टींग मशीन्स, ३ थ्रेशींग मशीन्स, १०७ ट्रॅक्टर्सचीं अवजारें, नांगर, डिस्क इत्यादि, २७० गायी, १५० वासरें व २०० लहान जनावरें, ३००० डुकरें, ८०० मेंढ्या व ६० घोडे. संस्थेचा मॅनेजर हॉलंड देशात ४०० गायी घेण्याकरिता गेला होता.

संस्थेची सर्वांत मोठी अधिकाराची संस्था म्हणजे कोऑपरेटिव्ह कौन्सिल. सर्व सभासद आणि हंगामी व कायमचे मजूर मिळून या संस्थेची निवड करतात. हें कौंसिल आपल्या सभासदांतून १० सभासदांचें मॅनेजिंग बोर्ड निवडतें व या संस्थेचा मॅनेजर इतर एंटरप्रायजेसप्रमाणे जाहिरात देऊन कॉम्यून व कोऑपरेटिव्ह कौंसिलचे कांही सभासद मिळून निवडतात. एकंदर या संस्थेच्या शेतीचे तीन भाग केले होते. प्रत्येक भागाला एकेक असिस्टंट मॅनेजर होता व त्याच्या विभागाला पुन्हा एक वर्कर्स कौंसिल मॅनेजिंग बोर्ड, फक्त मॅनेजर हा मुख्य मॅनेजरने नेमलेला असतो. प्रत्येक भागाचे हिशेब अलगअलग ठेवण्यांत येतात. लहानलहान अवजारें तीनहि विभागांत वांटलेलीं आहेत. मोठीं अवजारें सामुदायिक रीतीने वापरतात. तसेंच शेतीतज्ञ व पशुतज्ञ हे तीनहि विभागांकरिता सामुदायिक आहेत. परंतु प्रत्येक विभागाला त्या विभागांत या तज्ञांनी केलेल्या कामाच्या हिशेबाने त्याच्या पगाराकरिता खर्च म्हणून ैसे भरावे लागतात.

या एकंदर व्यवस्थेची खुबी ही की, सर्वांचे पगार व आमदनी उत्पन्नावर अवलंबून असते. जणू शेती हाहि एक धंदाच आहे व जसे इतर धंद्यांत खर्च कमी व काम जास्त वाढविल्यास , झालेल्या जास्त उत्पन्नांत सर्व काम करणारे भागीदार होऊं शकतात तशीच व्यवस्था या प्रत्येक विभागाची व तीनहि विभाग मिळून मुख्य संस्थेची आहे. आणखी विशेष म्हणजे यामुळे येथील शेतकीतज्ञ व पशुतज्ञ यांना त्यांच्यावरच्या श्रेष्ठ अधिकाऱ्यापेक्षा कांही वर्षांत तरी जास्त आमदनी होते. आम्हीं व्हायव्होदिनाच्या कृत्रिम रेतन-केंद्रांत याबद्दल चौकशी केली असतां आम्हांला सांगण्यांत आलें की, रेतन-केंद्रांतील अधिकाऱ्यांना २०–३५००० दिनार यांच्या दरम्यान पगार आहेत, तर या संस्थांत काम करणाऱ्या पशुतज्ञांना कित्येक वर्षी ५०–६०,००० पर्यंत सुद्धा वेतन मिळतें. सुरवातीला माझा या माहितीवर विश्वास बसेना. वरच्या अधिकाऱ्याला खालच्या अधिकाऱ्यापेक्षा कमी कसें मिळणार ? नाहीतर या खालच्या संस्थांत काम करण्याची एकच घाई सर्व लोकांची व्हावयाची, असें मला वाटत होतें. त्यावर उत्तर असें देण्यांत आलें की, खेड्यांतील राहणी व उत्पन्नाची अनिश्चितता यामुळे अशी गर्दी न होतां पुष्कळसे लोक कमी पण कायम पगार व शहरांतलें सुखी जीवन पसंत करतात. या संस्थेंत आम्ही विचारणी केल्यावर तेथील शेतीतज्ञाला १९५७ सालीं ४०,००० दिनार मिळाले, असें समजलें. वाढलेल्या उत्पन्नाच्या शेकडा २० हिस्सा तज्ञाला मिळतो. बाकीचा मजुरांत वांटला जातो.

संस्था चांगली चालल्यासारखी दिसली. संस्थेजवळ गायींना दोहण्याकरिता इलेक्ट्रिक मशीन्स चार होत्या. मागच्या वर्षी मजुराला कमींत कमी ११,०००, शेतीतज्ञाला ३५,०००, पशुतज्ञाला ३३,०००, व डायरेक्टरला ३०,००० दिनार असें उत्पन्न झालें. त्याच्या मागच्या वर्षी शेतीतज्ञाला ४०,००० मिळालें होतें. तें वर्ष शेतीकरिता चांगलें होतें.

संस्था आपला सर्व माल शेजारच्या मार्केटिंग संस्थेला विकते. संस्थेजवळ जी १२५६ हेक्टर जमीन आहे, त्यापैकी ९५६ हेक्टर समाजाकडून मिळाली, २५० हेक्टर सभासदांची जमीन होती व बाकीची ठेक्यानें घेतलेली होती. नवीन सभासद घेण्यांत येतात काय या आमच्या प्रश्नाला मागच्या वर्षीच ३० नवीन सभासद आम्हीं घेतले असें उत्तर देण्यांत आलें. योग्य सभासद असेल तर आम्ही घेऊं असें ते म्हणाले. वर्षांतून एकंदर काम २०० दिवसांचें असतें. शेतीपासून शेकडा ६० उत्पन्न व जनावरांपासून शेकडा ४०. मागील दोन वर्षांच्या उत्पन्नाचे आंकडे खालीलप्रमाणे देण्यांत आले.

| वर्ष | एकूण उत्पन्न | पगार | बचत फंड |
| --- | --- | --- | --- |
| ५७ | १७०,०००,००० दिनार | ५६,०००,००० दिनार | ३४,०००,००० दिनार |
| ५८ | १८५,०००,००० ,, | ७०,०००,००० ,, | १५,०००,००० ,, |

ही संस्था ज्या कॉम्यूनमध्ये होती त्या कॉम्यूनची परिस्थिति खालीलप्रमाणे होती. एकंदर जमीन ७००० हेक्टर, या संस्थेजवळ १२५६ हेक्टर, जनरल कोऑपरेटिव्हजवळ २६० हेक्टर व बाकीची खाजगी व्यक्तींजवळ. एकंदर कॉम्यून-मधील २२०० घरांपैकी, २०४ या संस्थेचे सभासद, ६५० जनरल कोऑपरेचिटव्हचे सभासद होते व बाकीचे कोणत्याच संस्थेचे सभासद नव्हते.

दुपारीं आम्ही जनरल कोऑपरेटिव्ह सोसायटी पाहावयाला गेलों. ती दुसऱ्याच कॉम्यूनमध्ये होती. तुम्ही कोणतीं कामें करतां असा प्रश्न विचारल्या-वर आम्ही सर्वच कामें करतों असें उत्तर मिळालें. शेतकऱ्याला बीं, खतें, अवजारें, कर्ज, मालाची विक्री, गुरें, डुकरें, गायी, शेत नागरणें इत्यादि ज्या ज्या कामाची व वस्तूंची जरूरी आहे, तीं सर्व कामें आम्ही करतों. सर्व्हिसेस देण्यांत सभासद व गैरसभासद असा फरक नाही. ज्याला जें पाहिजे त्याकरिता कोऑपरेटिव्ह एक करार त्या सभासदांशीं करते व त्याप्रमाणे या दोघांचा व्यवहार चालतो. असे किती तरी करार दर वर्षी होतात. प्रत्येक शेतकऱ्याशीं प्रत्येक कामाकरता व एकाच कामाच्या दोन तीन तऱ्हांकरिता करार करावे लागतात. यामुळे कराराचा समुद्रच बनतो. शेतकऱ्यांच्या जमिनीची मालकी कायम ठेऊन त्याला आपलें उत्पादन वाढविण्याची संधि द्यावी या दृष्टीने

ही उपाययोजना करण्यांत आली आहे. कोऑपरेटिव्हचे सभासद, वर्कर्स कौंसिल व मॅनेजिंग बोर्ड निवडतात. परंतु समितीला जेवढा फायदा होईल त्यांत फक्त प्रत्यक्ष काम करणाऱ्यांना जो कामाबद्दल जास्त मुनाफा मिळावयाचा तो मिळून बाकी सर्व पैसा कोऑपरेटिव्हचा म्हणजे सर्व समाजाचा. रजिस्टरावर जे तिचे सभासद म्हणून आहेत त्या सभासदांचा त्या त्या पैशांवर कांहीहि हक्क नसतो.

उदाहरणादाखल या सोसायटीने तीन शेतकऱ्यांशीं जे करार केले त्यांच्या घरीं आम्हांला नेण्यांत आलें. एका शेतकऱ्याजवळ १० हेक्टर जमीन होती. जमीन त्याच्या घराजवळ होती, पण त्याचा मुलगा नोकरीवर होता व म्हाताऱ्याला जमीन आटोपतां येत नव्हती. त्याने ती जमीन कोऑपरेटिव्हला दिली व खर्च वजा जातां उत्पन्नाचे दोन हिस्से त्याने घ्यावे व एक कोऑपरेटिव्हने घ्यावा असें ठरलें. कोऑपरेटिव्ह त्याला वर्षाकाठीं ठराविक रक्कम द्यावयाला तयार होती. पण कोऑपरेटिव्हमध्ये पीक जास्त निघतें या समजुतीवर म्हातारा पिकाच्या हिश्श्यांत समाधान मानत असे. दुसऱ्या शेतकऱ्याच्या घरीं कोऑपरेटिव्हने एक डुकरी दिली. या डुकरीला शेतकऱ्यानेच पाळावयाचें, तिला खाण्याला कोऑपरेटिव्ह म्हणेल त्याप्रमाणे द्यावयाचें व त्या डुकरीचीं तीन पिलें एका विशिष्ट वजननाचीं झाल्यावर कोऑपरेटिव्हला परत आणून द्यावयाचीं. असाच गायीबाबतहि एक करार होता. अशा तऱ्हेच्या शेतीच्या कोणत्याहि कामाचा करार कोऑपरेटिव्ह करते—केवळ नांगरण्याचा, केवळ शेत पेरून देण्याचा, सर्व शेती करण्याचा, मालविक्रीचा. कसलेंहि तुमचें शेतीचें काम असलें तरी तें कोऑपरेटिव्ह करते व त्याबद्दल ठराविक मुनाफा घेते.

या सोसायटचा आज युगोस्लावियांत फारच लोकप्रिय झाल्या आहेत. व दिवसेंदिवस त्या वाढत आहेत. मालकी कायम राहून शेताशीं आपला संबंध कायम राहतो व उत्पादनवाढींत कोऑपरेटिव्हला म्हणजे समाजाला प्रत्यक्ष भाग घेतां येतो असा दुहेरी फायदा यांत आहे. हळूहळू समाजाचा हिस्सा वाढेल व मालकीचा हिस्सा एवढा कमी होईल की शेतकरी आपली मालकी स्वखुशीने विसर्जन करील अशी येथील तत्त्वज्ञांची अपेक्षा आहे. अर्थात् या सोसायटयांचे कारभार फार अवाढव्य आहेत.

व्हायव्होदिना विभागांत मागच्या लढाईचें एक स्मारक आहे. तें एका सुंदर स्थळीं पहाडावर उभारलेलें आहे. एका ६०, ७० फूट उंच मनोऱ्यावर एक सर्वियन स्त्री दोन्ही हात बाजूला करून लोकांना आवाहन करीत आहे असें तें दृश्य आहे. खाली मनोऱ्याच्या भोवताली चारी बाजूला मागील लढाईंतील निरनिराळीं दृश्यें ओतून बसविलेलीं आहेत. जर्मन फौज दोरांनी बांधून आणलेल्या बंद्यांवर गोळ्या झाडत आहे. टँकांशीं लढून टँक उलटविलेलें आहे.

पार्टीझन्स आवेशांत लढत आहेत, अशीं अनेक चित्रें आहेत. भोवतालीं दऱ्या व गच्च जंगल, वर पहाडावर नेहमीच वाहणारी मोकळी हवा व त्यावर हें दृश्य आहे. तेथें एक हॉटेल बांधलें आहे. त्यांत आम्हीं रात्रीं जेवण केलें. आमच्या बरोबर व्हायव्होदिनाच्या दोन दिवसांच्या दौऱ्यांत डॉ. पोपोव्हिक या नांवाचे एक सहकारी समितीचे तज्ञ होते. त्यांनी आम्हांला सर्व माहिती समजावून सांगण्याकरिता फार मेहनत घेतली. त्यांचे हार्दिक आभार मानून आम्ही रात्रीं ११ वाजतां बेलग्रेडला परत आलों.

* * *

**रविवार ता, १०-५-५९**

आज आम्हीं सुट्टी घेण्याचें ठरविलें. दररोज सारख्या बैठकी, सभा व विद्यार्थ्यांप्रमाणे टिपणें घेणें याला आमच्यापैकी कांही मंडळी कंटाळली होती. सुट्टीशिवाय आमच्या तब्यती बिघडतील, एक दिवस आठवड्यांतून आम्हांला हक्काची सुट्टी पाहिजे; असा आग्रह झाला व आम्हीं तसा निर्णय घेतला. त्याप्रमाणे आज सुट्टीचा दिवस. सकाळीं आम्हीं लिहिण्यावाचण्यांत कांही वेळ घालवला. व सायंकाळीं श्री मिलान्कोव्ह मार्कोव्हिच या गृहस्थाकडे चहा घेण्यास सर्वजण गेलों. तेथे त्यांच्याच ऑफिसमध्ये काम करणारे एक गृहस्थ होते व त्यांची पत्नीहि होती. हे गृहस्थ ऑक्सफर्डमध्ये शिकलेले होते. ते इंग्रजी चांगलें बोलत होते. मीं नुकतेंच ऐकलें होतें की, युगोस्लावियांत वरच्या अधिकारी वर्गाचे पगार वाढविण्याचा निर्णय घेण्यांत आला आहे. सोशॅलिझमच्या विरुद्ध ही बाब आहे. व असें झाल्यास पार्टीची भावनात्मक (idealogical) शक्तिहि कमी पडत आहे याचें हें स्पष्ट निदर्शन आहे असें माझें म्हणणें. तो गृहस्थ प्रथम हें मानीना. नंतर तोच म्हणाला की, आम्ही मोटरकार व रिफ्रिज्रेटर यांचें उत्पादन वाढवीत आहोंत. परंतु याचबरोबर बेलग्रेड शहरांतच किती तरी कुटुंबांना स्वयंपाक करावयाला जागा नसल्यामुळे एकाच स्वयंपाकघरांत काम करावें लागतें. त्यामुळे कितीतरी कुटुंबांत भांडणें होतात. बेलग्रेड शहरांतील कोर्टांतलीं अर्धीं भांडणें या स्वरूपाचीं आहेत. एक नवीन वर्ग तयार होत आहे व हे (आमचे यजमान) त्यांतले प्रमुख तेव्हा त्यांना काय विचारायचें ? मग असें रलें की मीं माझें म्हणणें लिखाणाच्या स्वरूपांत तयार करावें व त्यावर श्री मार्कोव्हिच यांच्या ऑफिसांत कांही निवडक मंडळी-बरोबर चर्चा व्हा ी. रात्रीं ८॥ वाजतां याच चहापार्टीवरून आम्ही परतलों.

* * *

## सोमवार ता. ११-५-५९

आज सकाळीं कॉम्युनिस्ट पार्टीच्या सेंट्रल कमिटीचे एक सभासद श्री .... यांच्याशीं आमची भेट ठरली होती. आम्ही बसलों. मी बोलणें सुरू करावें असें त्यांच्या वृत्तीवरून दिसलें. कालच्या रात्रीचे आमच्या मित्रांचे उद्‌गार माझ्या मनांत घोळत होते. तेव्हा मी त्यांच्यापुढे तीन प्रश्न मांडले. मीं असें ऐकलें आहे की, युगोस्लावियांत उद्योग व शासन यांत काम करीत असलेल्या मोठ्या लोकांचे पगार वाढविण्यांत येणार आहेत. ही गोष्ट सोशियालिझमला कितपत धरून आहे? पार्टी व सरकार यांचा लोप झाल्यावर त्यांच्या जागीं कोणत्या संस्था येतील? व राष्ट्रवाद हा आज समाजवादाच्या आड येऊं पाहत आहे असें त्यांना वाटतें किंवा नाही? पहिल्या प्रश्नाचें त्यांचें उत्तर स्पष्टपणें नकारत्मक होतें. वाढत्या उत्पादनाकरिता वाढतीं आकर्षणें असलीं पाहिजेत हें त्यांचें म्हणणें. "उत्पादन वाढल्यावर निरनिराळ्या स्तरांतील फरक आपोआपच कमी होतात. त्याचें एक मोठें उदाहरण अमेरिका आहे. म्हणून वाढत्या उत्पादनाकडे आम्हीं लक्ष पुरविलें पाहिजे" असें ते म्हणाले. मीं म्हणालों की, अमेरिकेचें उदाहरण सर्वस्वी येथे लागू पडत नाही. तिथे मल्टीपार्टी डेमॉक्रसी असल्यामुळे प्रत्येक प्रकारच्या निर्णयाची युक्तायुक्तता जनतेसमोर मांडणारा एक विरोधी पक्ष असतो. इथे एकच पक्ष व त्याच्या निर्णयाविरुद्ध कुणीहि बोलणारा नाही अशी परिस्थिति आहे. दुसरें, वाढत्या उत्पादनाला आर्थिक आकर्षण पाहिजे असें म्हटलें की, मग पुंजीवादी राष्ट्रें तरी हेंच करीत आहेत किंवा नाही? प्रत्येक काम समाजोपयोगी असल्यामुळे त्याला आर्थिक मोबदला सारखाच द्यावयाचा हा सिद्धांत केव्हा आचरणांत येणार? ज्या कारणांकरिता तो या वेळीं आचरणांत येऊं शकत नाही, नेमकीं तींच कारणें कदाचित् उद्या विशेषच जोराने पुढे येतील. आजच्यापेक्षा त्यांचा जोर जास्त राहील. मग काय हें असेंच चालू ठेवावयाचें आणि लहान व मोठे यांतील फरक वाढतच जावयाचा? तो कमी व्हावयाचा नाही? या माझ्या प्रश्नांना समाधानकारक उत्तरें मिळालीं नाहीत. सर्वच विचार आता कशाला करता? पुढच्या पिढीकरिता कांही तरी काम राहूं द्या असा थोडा पोकळ विचार त्यांनी मांडला. तुम्ही फार तात्त्विक (Philosophical) विचार करतां असेंहि एकदा ते म्हणाले. पण माझ्या मतें हा युगोस्लावियापुढील मूळ प्रश्न आहे. व त्याच्याकडे डोळेझाक करून युगोस्लाविया पुढे जाऊं लागला तर पुन्हा पुंजीवादाची पुनरावृत्ति व्हावयाला कांही कठिण जाणार नाही. जे प्रश्न एकाच राष्ट्रांतील भिन्न भिन्न श्रेणींत समानता निर्माण करण्याबाबात विचारणीय आहेत, नेमके तेच प्रश्न राष्ट्रां-राष्ट्रांतील असमानता दूर करण्याबाबतहि विचारणीय आहेत. आमच्या राष्ट्राचें उत्पन्न वाढूं द्या हा विचार कितीहि योग्य असला तरी जर इतर गरीब राष्ट्रांच्या शोषणावर ही वाढ निर्भर असेल तर याचा कांही तरी

विचार सोशियालिस्ट देशांना करावाच लागेल. तुम्ही वाढूं नका, मला मात्र वाढूं द्या, या वृत्तींतून जर रशियाने पूर्व यूरोपमधील राष्ट्रांशीं वर्तणूक केली असेल तर त्यांची असंतुष्टता वाढणारच. याच्या उलट तुम्हीहि वाढा, मीहि वाढतों, परंतु आपल्यांतील अंतर कायम राहील अशी जर वृत्ति असली तर असंतुष्टता मर्यादेंत राहील. तथापि ती राहीलच. परंतु तुम्ही माझ्याबरोबर येईपर्यंत मी न वाढलों तरी चालेल, पण तुम्हांला वाढविण्याकरिता मी मदत करीन या वृत्तींतूनच असंतुष्टता कायमची नाहीशी होईल. आज सर्व समाजवादी राष्ट्रांपुढे हा प्रश्न आहे. या राष्ट्रांनी आपलें व्यक्तिगत उत्पादन वाढविण्याचा प्रयत्न केला तर भांडवलशाहीची वृत्ति पुन्हा जागृत होण्याची भीति आहे. कारण हें उत्पादन आपली जनता व इतर राष्ट्रें यांच्या शोषणावरच आधारित राहणार. याशिवाय अमेरिकेचा जीवनस्तर हा तेथील विशिष्ट परिस्थितीमुळे नेहमीच फार मोठा राहणार असल्यामुळे तो ध्येयबिंदु ठेऊन जर आमचीं राष्ट्रें आपल्या योजना बनवूं लागलीं किंवा आपल्या वाढीची मर्यादा ठरवूं लागलीं तर मग हें शोषण कायमचें चालेल व याचीं सूत्रें दुसऱ्याच्या हातांत राहतील; या माझ्या प्रश्नांना अजून कुठेच समाधानकारक उत्तर मिळालें नाही. सोशालिस्ट अलायन्स व कॉम्युनिस्ट पार्टी यांचे परस्पर संबंध काय आहेत या प्रश्नाला, कॉम्युनिस्ट पार्टी ही सोशालिस्ट अलायन्समध्ये काम करते, सोशालिस्ट अलायन्स ही सर्व लोकांची (ब्रॉड मासेसची) संस्था आहे. त्यांत कॉम्युनिस्टहि आहेत. जनतेचें शिक्षण व मार्गदर्शन करणें हें कॉम्युनिस्ट पार्टीचें खरें काम आहे. प्रथम सरकारच्या व पार्टीच्या जबरदस्तींतून कामें होत होतीं हीं ठराविक उत्तरें मिळालीं.

सायंकाळीं आम्हीं श्री व्हेल्को व्हूल्याकोव्हिच यांची भेट घेतली. हे सोशालिस्ट अलायन्सच्या फॉरिन कमिटीचे अध्यक्ष. आम्ही सोशालिस्ट अलायन्सचे पाहुणे म्हणून यांच्याच कृपेमुळे आमचा युगोस्लावियाचा दौरा ठरला होता. श्री. जयप्रकाशनारायण यांनी आमच्याबद्दल यांनाच पत्र दिलें होतें व एक भेटहि पाठविली होती. श्री व्हूल्याको यांच्याएवढी धिप्पाड व धीरगम्भीर वृत्तीची व्यक्ति युगोस्लावियांत तरी अजून माझ्या पाहण्यांत आली नाही. जेवढे ते उंच आहेत तेवढेच शरिरानेहि ते रुंद व मोठ्या हाडाचे आहेत. मोठें डोकें, रुंद कपाळ, भव्य मुद्रा; एकूण त्यांचें सर्व शरीरच धिप्पाड. शरिराच्या मानाने आवाज जरी लहान असला तरी तो गंभीर व अगदी आंतून निघालेला असा वाटे. आम्ही सर्वच त्यांच्या व्यक्तित्वाने भारून गेलों.

सोशालिस्ट अलायन्सची सुरवात कशी झाली हें सांगून आज त्या संस्थेचें काय कार्य आहे हें त्यांनी स्पष्ट केलें. जर आजच्या सारखाच जास्त उत्पा-

दनाच्या दृष्टीनें यांत्रिकीकरणाकडे ओढा राहिला तर केंद्रीकरणाची भीति नाही काय या आमच्या प्रश्नाला त्यांनी नाही असें उत्तर दिलें. विकेंद्रीकरणाच्या संदर्भांत जर यांत्रिकीकरण झालें तर केंद्रीकरण टळेल हें त्यांचें म्हणणें. याच तत्त्वावर आमची कॉम्यून्सची पद्धति आधारलेली आहे. व वर्कर्स मॅनेजमेंटमुळे त्यांत अधिकार व सत्ता हे दोष शिरणार नाहीत असें आम्ही समजतों, असेंहि ते म्हणाले.

सोशालिस्ट अलायन्स व कॉम्युनिस्ट पार्टी यांचे संबंध काय आहेत या प्रश्नाला त्यांनी ठराविक उत्तर दिलें.

* * *

**मंगळवार ता. १२-५-५९**

आज सकाळीं मॅसिडोनियाची राजधानी स्कोपियो येथे आम्ही पोहोचलों. मॅसिडोनिया हा सुद्धा पहाडी प्रदेश आहे. आमच्या गाडीला बोगद्यांतून बऱ्याच वेळा जावें लागलें. शेती करण्याची पद्धति व शेतकऱ्यांचीं घरें हिंदुस्थानांतील पद्धती-सारखी व घरांसारखींच दिसलीं. लहानशा चापट कौलांनी शाकारलेलें घर, लागूनच गुरांचा गोठा, गोठ्याच्या बाजूला खताचा ढीग इत्यादि हिंदुस्थानांतील नेहमीचें दृश्य दिसावयाला लागलें. स्कोपियोला आम्ही सकाळीं ७॥ वाजतां पोहोचलों. स्टेशनाबाहेर घोड्यांच्या कांही गाड्या होत्या. लोकांचे कपडे फार गरीबीचे दिसले. स्टेशन सुद्धा फार गलिच्छ दिसलें. जणू काय आपण एका हिंदुस्थानच्या स्टेशनावर आलों असा भास झाला. आम्ही हॉटेलांत उतरलों व दहा वाजतां रिपब्लिकच्या मुख्य कौंसिलच्या कचेरींत गेलों. रिपब्लिकच्या अधिकाराचें क्षेत्र कोणतें, फेडरेशनशीं त्याचा काय संबंध आहे, जिल्हा व रिपब्लिक यांचे परस्पर संबंध काय आहेत याबाबत दिवसभर आम्हीं माहिती घेतली. सायंकाळीं मॅसिडोनियाच्या कॉम्युनिस्ट पार्टीच्या एका सभासदाबरोबर फिरायला गेलों. गृहस्थ अत्यंत उत्साही दिसला. पक्षाचा प्रचार करण्यांत त्याचा हातखंडा होता. कोणत्या मनुष्याची कुठे नेमणूक करावी हें या लोकांना फार चांगलें अवगत झालेलें दिसतें. आतापर्यंत आमचा हाच अनुभव आहे. हा कॉम्युनिस्ट पार्टीच्या सेंट्रल कमिटीचा मनुष्य त्यांपैकीच होता. सायंकाळीं लौकर जेऊन निजलों. दुसऱ्या दिवशीं सकाळींच निघावयाचें होतें.

* * *

**बुधवार ता. १३-५-५९**

सकाळीं ७ वाजतां निघालों. आमच्या तीन मोटारी होत्या. माव्ह-रोव्हो येथील तळें व हायड्रोइलेक्ट्रिक वर्कस् पाहावयाचें होतें.

मॅसिडोनियांत अलेक्झांडर दि ग्रेट जन्मला. तो मूळचा मॅसिडोनियाचा राजा. त्याचें जन्मठिकाण पाहावें अशी आमची फार इच्छा होती. स्कोपियोला आल्यावर कळलें की मॅसिडोनियाच्या ज्या भागांत तो जन्मला होता तो भाग ग्रीस-मध्यें आहे. युगोस्लावियांत नाही. मॅसिडोनिया हा प्रदेश तीन विभागांत वांटला गेला आहे. युगोस्लावियांत जवळजवळ १० लक्ष लोक, ग्रीसमध्ये २॥ लक्ष व बल्गे-रियांत ३॥ लक्ष अशी त्यांची विभागणी झाली आहे. पण मॅसिडोनिया हा प्रदेश एक होऊन एकच राज्य तिथे असावें असें अजूनहि मॅसिडोनियन् लोकांना वाटतें. एक वेळ अशी होती की, मार्शल टिटोनें युगोस्लाविया व बल्गेरिया यांचें मिळून एक फेडरल राज्य व्हावें असा विचार जोरानें मांडला. बल्गेरियानें त्याला संमतिहि दिली होती. परंतु रशिया ऐन वेळीं आडवा आल्यामुळे ही गोष्ट घडून आली नाही असें म्हटलें जातें. आता मात्र बल्गेरियन् व युगोस्लाव्ह लोकांत मॅसिडोनिया-बाबत भांडण आहे.

आमच्या मोटारी फार रमणीय प्रदेशांतून जात होत्या. आम्ही आल्बे-नियाच्या सरहद्दीकडे जात होतों. एका उंच पहाडावरून येणारें पाणी बांधून एक हायड्रोइलेक्ट्रिक स्टेशन बांधण्यांत आलें आहे, तें आम्हांला दाखविण्यांत आलें. तें पाहिल्यावर नांगल पॉवर हाऊसची मला आठवण झाली. फरक इतकाच की, आम्हांला असें सांगण्यांत आलें व आम्हीं जें पाहिलें त्यावरून ही माहिती बरोबर दिसली की, या पॉवर हाऊसमध्ये वापरण्यांत आलेली एकूण एक मशीन युगोस्ला-वियांत बनविलेली आहे. नांगलला वापरण्यांत आलेली मशीनरी बहुतेक सर्व बाहेरील देशांतून आलेली होती. याशिवाय दैनंदिन व्यवस्थेकरिता जो अधिकारी-वर्ग ठेवण्यांत आलेला होता त्यांची संख्या व पगार हिंदुस्थानाच्या मानानें फार कमी आहेत असें वाटलें.

हें स्थान जवळजवळ आल्बेनियाच्या सरहद्दीला लागून आहे. एक नदी इकडील पर्वतांतून निघून आल्बेनियांत वाहत होती. युगोस्लावियाच्या लोकांनी त्या नदीचें पाणी फिरवून आपल्याच हद्दींतील एका तळ्यात आणून सोडलें. व या तळ्यांतील पाण्याच्या साठ्यांवर हें हायड्रोइलेक्ट्रिक स्टेशन चालू आहे. आल्बे-नियानें तेव्हा तक्रार केली नाही काय या प्रश्नाला, तेव्हा आमचे संबंध चांगले होते असें उत्तर मिळालें. स्थान फार रमणीय वाटलें. नदीचें पाणी अडविण्याकरिता तळ्याला बांधलेल्या मोठ्या बांधावर उभे राहून समोरील बर्फाच्छादित

टेकडीचें दृश्य आम्ही बराच वेळ पाहत राहिलों. भोवतालच्या लख्ख सूर्यप्रकाशांत ती बर्फाच्छादित टेकडी फारच खुलून दिसत होती.

त्यानंतर आम्ही टेटेव्हो ह्या जिल्ह्याच्या ठिकाणीं आलों. जिल्हा व कॉम्यून यांचा संबंध कसा असतो, जिल्ह्यांतील शासन-संस्था कोणत्या तऱ्हेची असते, तिचा संबंध कॉम्यूनमधील शासन-संस्थेशीं कसा असतो इत्यादि बाबींची माहिती आम्ही लंचपूर्वी व लंचनंतर घेऊन सायंकाळीं स्कोपियोला परत आलों.

* * *

### गुरुवार ता. १४–५–५९

आज सकाळीं स्केपियोवरून ७०–८० मैल दूर असलेल्या व ग्रीसच्या सरहद्दीला लागून असलेल्या बोगदानसी गावीं जाण्याकरिता निघालों. पाऊस पडत होता. रस्त्यांत दुरस्ती सुरू होती. त्यामुळे कांही वळणें घेऊन आम्हांला खेड्यांतून जावें लागलें. मॅसिडोनिया हा प्रदेश उंच-सखल व पहाडी असाच आहे. सपाट मैदान असें नाहीच. पण पहाडावरहि शेती चांगली आहे. द्राक्षें, ऑलिव्ह, पीचेस इत्यादींच्या बागा आहेत. पॉपीची शेती फार दिसली. आपल्या देशांत पॉपीपासून अफू तयार करतात. इकडे 'मार्फीन' म्हणून एक द्रव्य तयार करतात. औषधांत याचा बराच उपयोग होतो.

आमचा रस्ता 'वरदार' नदीच्या बाजूने होता. एका ठिकाणीं ग्रीक लोकांच्या एका वसाहतीचें उत्खनन आम्हांस दिसलें. वाटेंत एक यूथ कँप पाहण्यांत आला. युगोस्लावियांत तरुणांनी बरींच कामें केलीं आहेत. रेल्वे, सडका, इमारती इत्यादि बांधकामांत त्यांनी फार मोठ्या उत्साहाने भाग घेतला आहे, हें मी वाचलें होतें. तेव्हापासून तरुणांच्या संघटनेबद्दल व कामाच्या स्वरूपाबद्दल बरीच उत्सुकता होती, तें काम पाहण्याची इच्छा आज सफल झाली.

या कँपमध्ये एकंदर ४४० तरुण-तरुणी ४ ब्रिगेडस्‌मध्ये वांटलेले होते. क्रोएशिया, सर्बिया, स्लोव्हेनिया व मॅसिडोनिया या ठिकाणांहून या चार ब्रिगेडस् आल्या होत्या. चारहि ब्रिगेडस् मिळून ४५ तरुणी होत्या. तरुणींची निजण्या-बसण्याची सोय अलग होती. बाकी खाणें पिणें, काम करणें हें सर्व एकत्र. कँपच्या भिंती प्रेस्ड वुडच्या असाव्या. तंबूप्रमाणेच कँपच्या भिंती व छपरें हालवितां येतात. म्हणजे कँपच्या उभारणीला खर्च फार कमी येतो. एका ठिकाणचा कँप काम झाल्यावर दुसऱ्या ठिकाणीं हालवितात. कँप हालविणारे व उभारणारे लोक वेगळे असतात. तरुणांनी तयार झालेल्या कँपांत यावयाचें व मुदत संपल्यावर परत जावयाचें.

या कँपांत २ स्वयंपाकी, ४ शिक्षक व ३ साफसफाईच्या विभागांतील व एक कोठीचा अधिकारी एवढी मंडळी बाहेरची होती. बाकी सर्व काम ती तरुण मंडळीच करीत असत. कँपाचा मुख्य अधिकारी, त्याचा सहायक, प्रत्येक ब्रिगेडचा प्रमुख व वर निर्देशिलेले बाहेरचे कँपचालक या सर्वांची मिळून कँप चालविणारी एक संस्था तयार होते. तिच्यावर कँप चालविण्याची पूर्ण जबाबदारी असते.

या कामाचा एक कार्यक्रम तयार करतात. एवढें एवढें काम तरुणांमार्फत करावयाचें हें प्रथम ठरविण्यांत येतें. त्याला किती तरुण लागतील हा अंदाज इंजिनीयरांमार्फत करण्यांत येतो. मग तरुणांच्या संघटनेकडे ही मागणी जाते. त्यानंतर ही संघटना, इंजिनीयरांच्या सल्ल्याने कुठे कुठे व किती कँप काढावयाचें हें ठरविते. त्याचबरोबर प्रांतिक संघटनांकडे ही माहिती पाठवितात व अमुक तारखांना आमच्या अमक्या कँपवर, एवढे तरुण पाठवा अशी मागणी करतात. याप्रमाणे या संघटना तरुण निवडून पाठवितात. निवडण्यापूर्वी प्रत्येक तरुणाची एक मेडिकल एक्झामिनेशन (वैद्यकीय तपासणी) होते व त्यानंतर त्याला कँपमध्ये पाठवितात.

प्रत्येक ब्रिगेड आपला नायक व इतर उपनायक निवडतात व त्यांच्या मार्फत सर्व काम चालतें. स्त्रियांच्या टोळ्या अलग नसतात. प्रत्येक सदस्याला महिन्याला ३६० दिनार चिल्लर खर्चाकरिता देतात. जें काम तरुणांमार्फत करवून घेतलें जातें तें बहुधा केवळ मेहनतीचें असतें. इंग्रजींत ह्याला अन्स्कील्ड लेबर म्हणतात. हें काम धंदेवाईक (प्रोफेशनल) लोकांच्या देखरेखीखाली करतात. प्रत्येक यूथ-कँपला कांही प्रोफेशनल लोक जोडलेले असतात. कँपांतली मंडळी हा त्यांचा लेबर-फोर्स. त्यांच्याकडून त्यांच्या कमांडर इत्यादींमार्फत त्यांनी काम करवून घ्यावयाचें. काम किती करवून घ्यावयाचें याचें प्रमाण असतें. साधारण मजुरांच्या कामाएवढेंच हें प्रमाण असतें. आम्हांला कँपच्या कमांडरने तर असें सांगितलें की, मजुरापेक्षा आम्ही काम जास्त करतों. एखादा तरुण कमी काम करणारा निघाला तर मग तुम्ही काय करतां? या प्रश्नाला तसें होत नाही हें उत्तर देण्यांत आलें. एखाद्या कामावर ४।५ तरुणांची नियुक्ति होते व त्यांत कुणाचें जास्त वा कुणाचें कमी असें मिळून सरासरी काम साधारण मजुराएवढें पडत असावें अशी माझी समजूत झाली.

कँपची दिनचर्या खालीलप्रमाणे असते--

४ वाजतां उठणें, ४.१५ ला बिछाने साफ करून तयार राहणें. ४.१५ ला सकाळची कसरत. ४.४५ पावेतों तोंड वगैरे धुवून तयार असणें. ५ वाजतां ब्रेक फास्ट. ६ ते १२ काम करणें. १ ला लंच. २ ते ४ विश्रांति व झोप. ४ ते ७ सांस्कृतिक शिक्षण. ह्यांत निरनिराळे अभ्यासक्रम असतात. जसे फोटो काढणें,

ट्रॅक्टर चालविणें, संगीत, मोटरचें ज्ञान, बांधकाम, विजेच्या वायरमनचें काम, इत्यादि. त्यांना प्रशस्तिपत्रें देण्यांत येतात. त्यांचा उपयोग पुढें तसलेंच काम मिळविण्यांत शिबिरार्थ्यांना होतो. कँपच्या सभासदामागे प्रत्येक महिन्याचा १८,००० दिनार खर्च येतो. त्यापैकी ७००० दिनार हा जेवणखर्च व बाकीचा व्यवस्थाखर्च व शिक्षणखर्च असतो.

केवळ पैशाच्या दृष्टीने विचार केला तर हे कँप तोटयांतच असले पाहिजेत. म्हणजे कँपांवर होणारा सर्व खर्च त्यांतून होणाऱ्या कमाईपेक्षा जास्त होतो. परंतु काम फार लौकर होतें. विद्यार्थ्यांचें चारित्र्य बनतें. त्यांना अंगमेहनतीची संवय लागते. राष्ट्रीय वृत्ति वाढते. शरीरश्रमाविषयी प्रेम व आदर निर्माण होतो. श्रीमंत गरीब ह्या भेदाचें भान कमी होतें. इत्यादि अनेक फायदे ह्या कँपांचे आहेत. म्हणून मार्शल टिटोंचें तर असें म्हणणें आहे की, असे कँप त्यांच्या इतर फायद्यांकडे दृष्टि ठेऊन चालू ठेवले पाहिजेत.

आज पाऊस असल्यामुळे कँप बंद होता. व कँपांतील मंडळी आपापल्या बराकींत विश्रांति घेत पडलेली होती. एका बराकींत चारी बाजूंना व मध्ये निजण्या- करिता लाकडी फळयांचे बांक एकावर एक असे बसवलेले असतात. यामुळे थोडया जागेंत जास्त मंडळी राहूं शकते. बराकी हवेशीर होत्या व सर्व मंडळी आनंदांत होती. आम्हांला पाहून सर्व कँप जागा झाला व आमच्या स्वागताकरिता त्यांनी सामुदायिक जयघोष केला.

कँपच्या एका खोलींत बसून आम्हीं कमांडरकडून माहिती घेतली. मार्शल टिटोंबरोबर तो हिंदुस्थानांत आला होता. हिंदुस्थानांत घेतलेले कांही फोटो त्याने आम्हांला दाखविले. कँपमधील जेवण चांगलें होतें. त्याकरिता ७००० दिनार खर्च होतात तेव्हा तें चांगलेंच असणार.

प्रत्येक सभासदाचा कँपांत आल्यावर शपथविधि होतो. 'मी मार्शल टिटोंना असें वचन देतों की, एवढें काम मी इतक्या अवधींत पुरें करीनच करीन' अशी शपथ घेऊन तो कामाला लागतो. अनुभव हा येतो की, काम नेहमी ठराविक वेळेच्या अगोदरच संपतें.

आम्ही कँप पाहून प्रभावित झालों. मला असें वाटलें की, भोजनाच्या मानाने कँपावर इतर खर्च बराच जास्त होतो. पण याबाबत मला प्रत्यक्ष अनुभव नसल्यामुळे मी आपलें ठाम मत बनवूं शकलों नाहीं.

दुपारीं आम्ही बोगदानसी नांवाच्या गावाला गेलों. हें एका कॉम्यूनचें हेड क्वार्टर आहे. तसेंच इथे एक फार जुनी वर्कर्स कोऑपरेटिव्ह आहे. तिथचें द्राक्षाचें व टमाटोचें पीक पाहण्यासारखें होतें. बोगदानसी गाव अगदी आपल्याकडील

खेड्यासारखें आहे असें म्हणतां येईल. नुकताच पाऊस पडला होता. म्हणून गावांतील रस्त्यांवर थोडा चिखल झाला होता. या लहानशा गावांत येथील कोऑपरेटिव्हने एक मोठें हॉटेल बांधलें होतें. तियेच आम्ही उतरलों होतों. तेथील कोऑपरेटिव्ह सोसायटीचे आम्ही पाहुणे होतों. जेवण झाल्यावर कोऑपरेटिव्हची शेती आम्हीं पाहिली. कापूस व तांदूळ सुद्धा त्या शेतींत होता, पण तीं पिकें फार लांब असल्यामुळे आमची इच्छा असून सुद्धा आम्ही तीं पाहूं शकलों नाहीं. ह्या कोऑपरेटिव्हला भाताचें (धानाचें) पीक एका हेक्टरला ६० क्विंटाल्स होतें, असें सांगण्यांत आलें.

या कोऑपरेटिव्हचा इतिहास युगोस्लावियांतील इतर कोऑपरेटिव्हज-सारखाच आहे. सुरवातीला कॉम्युनिस्ट पार्टीने कोऑपरेटिव्ह स्थापन करण्या-करिता पुढाकार घेतला. १९४६ सालीं, भूमिसुधार होण्यापूर्वी, म्हणजे जमीन वांटण्यापूर्वीच येथे कोऑपरेटिव्ह सोसायटी स्थापन झाली. तेव्हा लहानलहान २८ शेतकरी एकत्र आले. त्यांनी आपली जमीन एकाच गटांत आणली व मिळून शेती करावयाला सुरवात केली. त्यानंतर जमीन वांटण्यांत आली. त्यापूर्वी सभासदांची संख्या ४६ पर्यंत वाढली. जमिनीच्या वांटपांत या कोऑपरेटिव्हला १०० हेक्टर जमीन मिळाली. त्यानंतर सभासदांची संख्या वाढूं लागली. १९४९ सालीं सर्व गावचे लोक कोऑपरेटिव्हचे सभासद झाले. त्या वेळीं सभासदांची संख्या ५९८ झाली. परंतु यांपैकी १९५३ सालीं ३०० कुटुंबें बाहेर पडलीं. सध्या १६८ सभासद आहेत. मागील दोन वर्षांत ३३ नवीन सभासद झाले. त्यांपैकी २० मोठे शेतकरी व १३ लहान शेतकरी होते.

कोऑपरेटिव्हचें उत्पादन व्यक्तिगत शेतकऱ्यापेक्षा जास्त आहे. सध्या कोऑपरेटिव्हच्या जमिनीची परिस्थिति खालीलप्रमाणे आहे.

| वर्ष | मेंबरांची संख्या | त्यांच्या जवळची जमीन | सोशल जमीन |
|---|---|---|---|
| १९५४— | १३४ | | |
| १९५६— | १५० | | |
| १९५८— | १६८ | ३१४ | १०५ |
| | | | एकूण—४१९ |

याशिवाय कोऑपरेटिव्हने ४६ एकर जमीन विकत घेतली. १९५८ पर्यंत कोऑपरेटिव्ह जमिनीच्या मालकांना जमिनीबद्दल खंड देत असे. पण आता १९५९ पासून तो बंद करण्यांत आला आहे. १९५८ सालीं कमींत कमी उत्पन्न ८००० दिनार व जास्तींत जास्त ३०,००० दिनार होतें. शेतकीतज्ञाला ३०,००० मिळतात. मॅनेजरला १८,००० मिळतात. कांही काम करणाऱ्याला २४,००० दिनार मिळतात. कोऑपरेटिव्हचा हिशेब खालीलप्रमाणे सांगण्यांत आला—

| | मिलियन दिनार |
|---|---|
| फिक्स्ड कॅपिटल | २२० |
| सर्क्युलेटिंग कॅपिटल | ७५ |
| ग्रॉस प्रॉडक्ट (मटेरियल कॉस्टसहित ) | २१७ |
| सॅलरीज व वेजेस | ४६ |

कोऑपरेटिव्हच्या मॅनेजरला हा विश्वास होता की, हळूहळू जनरल कोऑपरेटिव्हमधील सर्व लोक त्यांच्या कोऑपरेटिव्हमध्ये सामील होतील. आज सुद्धा गावचे सर्व लोक जनरल कोऑपरेटिव्हचे सभासद होते.

नंतर बोगदानसी कॉम्यूनबद्दल आम्हीं माहिती मिळवली. लोकसंख्या १०,०५०. एकंदर खेडीं १८. लहानांतल्या लहान गावाची लोकसंख्या १५०. मोठीं गावें बोगदानसी व डोयरान. कॉम्यून कौंसिलचे सभासद ३२ व कौंसिल ऑफ प्रोडयुसर्सचे २१. तीन लहान गावांतून १ प्रतिनिधि. बाकीचे इतर गावांतून. कॉम्यूनचें काम ५ कौंसिलांमार्फत चालतें. त्यांत एकंदर ४९ सभासद आहेत. त्यांपैकी फक्त ७ (४ कॉम्यून कौंसिल व ३ प्रोडयुसर्स कौंसिल) पीपल्स कमिटीचे सभासद असून बाकीचे बाहेरचे आहेत. परंतु यांचे अध्यक्ष या सातांपैकी आहेत. कॉम्यूनचा प्रेसिडेंट सर्व सभांना हजर राहतो.

कौंसिलाशिवाय चार डिपार्टमेंट्स् आहेत—(१) सर्वसाधारण शासन (२) एकॉनमिक कॉम्यूनबाबत (३) फायनन्स (४) नॅशनल डिफेन्स. या खात्यांचे प्रमुख कौंसिलांबरोबर काम करतात.

कॉम्यूनचें एकंदर उत्पन्न ६२, ७००, ००० दिनार आहे. प्रमुख खर्च शिक्षण २८, सोशल वेलफेअर १.६, पब्लिक हेल्थ ७ व शासन १८. कॉम्यून्समध्ये ९ प्रायमरी शाळा, ३ मिडल शाळा, मोठ्या विद्यार्थ्यांकरिता एक शेतीची शाळा, दोन दवाखाने (यांना इथे हेल्थ स्टेशन्स म्हणतात), गुरांचा दवाखाना इत्यादि होते. शेतीकरिता कॉम्यूनजवळ विशेष तज्ञ नाहीत. हें सर्व काम कोऑपरेटिव्हजमार्फत होत असावें. असें आणखी एक दोन कॉम्यून्समध्ये आम्हांला सांगण्यांत आलें.

त्यानंतर रात्रीं लेक डोयरानला आम्ही गेलों व जेवण करून झोपलों. तें तेथून केवळ ८–१० मैल होतें.

* * *

**शुक्रवार ता. १५–५–५९**

लेक डोयरान ही मॅसिडोनियाची दक्षिण सीमा. तळ्याच्या मध्यांतूनच ग्रीसची सरहद्द लागते. तळें फार रमणीय ठिकाणीं आहे. बाजूला पहाड आहे व त्याच्या खालीं अगदी तळ्याच्या काठीं हॉटेल आहे. सकाळीं उठून मी फिरावयाला पहाडावर गेलों होतों. तेथून आणखीच सुंदर दृश्य दिसत होतें. भोपाळच्या तळ्यापेक्षाहि हें तळें मोठें आहे. परंतु त्यावर कोणतेंहि मोठें शहर वसलेंलें नाही.

दुपारीं आम्ही तेथून ६०–७० मैल दूर असलेल्या स्टीप शहरीं आलों. तेथें स्थापन झालेली एक नवीनच कापडाची गिरणी आम्हांला दाखविण्यांत आली. गावापासून २।३ मैल लांब ही फॅक्टरी आहे. ऐसपैस जागा, अत्यंत स्वच्छ व हवेशीर मोठाल्या इमारती तिथें आम्हीं पाहिल्या. मुंबई किंवा नागपूर येथील गिरण्यांत काम करणें कसें व अशा गिरणींत काम करणें कसें ? एक नर्क व एक स्वर्ग एवढा फरक. अर्थात् हिंदुस्थानांतहि अशाच फॅक्टरीज होतील.

चांगली गिरणी कशी असावी या क्षेत्रांतील आम्ही तज्ञ नव्हतों. पण वरवर जें कांही दिसलें त्यावरून स्वच्छता, नीटनेटकेपणा व टापटीप ही सर्व त्या गिरणींत आम्हीं पाहिली.

गिरणी पाहणें झाल्यानंतर वर्कर्स कौंसिल व मॅनेजिंग बोर्ड यांच्या सभासदांशीं आमचें बोलणें झालें. १९५२ सालीं या फॅक्टरींत केवल सुताचें काम सुरू झालें, १९५४ सालीं विणकामाचे साचे आले व १९५८ सालीं खराब झालेल्या कापसापासून सूत काढण्याचें यंत्र बसविण्यांत आलें. आज २५०० कामगार येथें काम करतात. त्यांपैकी शेकडा ९५ मॅसिडोनियांतीलच आहेत. या फॅक्टरीला जोडून एक इंडस्ट्रियल स्कूल व एक सेकंडरी टेक्स्टाईल स्कूल आहे. १९५५ सालीं दर १००० चात्यां-(स्पिंडल्स) मागे ६.८ कामगार पडत. आज हा आंकडा ५.८ आहे व संपूर्ण युगोस्लावियाचा आंकडा ७.३ आहे. मॅसिडोनिया तर मागासलेला भाग आहे. मग असें कां ? या प्रश्नास आमची मशीनरी नवीन व अगदी आधुनिक आहे परंतु इतर भागांत जुनी मशीनरी आहे असें सांगण्यांत आलें.

वर्कर्स कौंसिलच्या पद्धतीने दर माणशीं उत्पादन वाढण्याला मदत झाली असें सांगण्यांत आलें. त्यामुळें शिस्तपालनांत सुद्धा मदत झाली. स्त्रियांचें प्रमाण शेकडा ४८ आहे. १८ वर्षांखालील स्त्रियांना रात्रपाळी देत नाहीत. १६ वर्षांखालील कुणाहि स्त्री-पुरुषाला कामाला लावत नाहीत. फॅक्टरीमध्ये कामगारांच्या स्वास्थ्यसंरक्षणासाठी एक हेल्थ-स्टेशन आहे. त्यांतून कामगारांना व त्यांच्या कुटुंबियांना मदत होते. याशिवाय मुलांकरिता बगीचा इत्यादि सोयी आहेत. एकंदर

२९,८०० स्पिंडल्स व ९८० लूम्स (मोग) येथे आहेत. आज तेथलें उत्पादन ४३०० टन सुताचें आहे व १५,०००,००० स्क्वेअर मिटर्स कापडाचें आहे.

फॅक्टरी पाहिल्यावर आम्ही येथील जिल्हा कमिटीच्या अध्यक्षाबरोबरच लंच घेतला व कुमानोव्हो येथे सायंकाळीं आलों. येथे आम्हांला एक लहानसें धरण दाखविण्यांत आलें. एक लहान नदी दरींतून जात असतां तिला एका निमुळत्या जागीं बांधण्यांत आलें. व खालून जवळजवळ ३ फूट व्यासाच्या एका लोखंडी पाइपामधून तें पाणी शेतीकरिता नेण्यांत आलें होतें. शेतीला पाणी देण्याची पद्धति ' रेनफेड सिस्टीम ' सारखी होती. जमीनीखालून पाईप लावावयाचे व पाणी देण्याच्या वेळीं, त्यावर दुसरा पाईप लावून कारंज्यासारखें पाणी उडवावयाचें. वर बांधलेल्या धरणांतील पाण्याच्या दाबामुळे पाणी वर उडतें व पावसाने जमीन जशी भिजते तशीच याहि पाण्याने ती भिजते. यामुळे पाण्याची फार बचत होते. नेमकें जितकें पाणी जमिनीला पाहिजे तितकेंच देतां येतें. जास्त पाणी मिळून जमीन वॉटरलॉग्ड होण्याची भीति कमी असते. परंतु या पद्धतीला दर एकरीं खर्च जास्त येतो.

या बांधाची विशेषता ही होती की, सरकारी खात्यामार्फत तो बांधला गेलेला नव्हता. युगोस्लावियांत एक मध्यवर्ती संस्था या कामाकरिता स्थापन झाली आहे. सरकार त्या संस्थेला पैसे पुरवितें, पण या अटीवर की, तें सर्व कर्ज या संस्थेने परत केलें पाहिजे. ही संस्था इंजिनीयर इत्यादि नेमते व त्यांच्या मार्फत हीं कामें होतात. अर्थात् अशींच कामें हातीं घेतलीं जातात की ज्यांतून लागलेला पैसा परत येऊं शकेल. या कामाला जवळजवळ २० लक्ष रुपये खर्च आला होता व ६००० हेक्टर जमीन पाण्याखाली आली होती. हा सर्व खर्च, त्यावरील व्याज व दर वर्षीचा देखरेखीचा खर्च हा सर्व त्या शेतकऱ्यांकडून पाण्यावरील कराच्या रूपाने घेण्यांत येत असे. त्यामुळे मध्यवर्ती संस्था अशाच कामांना संमति देत असे की, ज्यामुळे ही जमीन भिजेल आणि कामाला लागलेला खर्च निघून येईल व शेतकऱ्यांना करावा लागणारा खर्च त्यांच्या आटोक्यांत राहील.

या पाण्याचा उपयोग येथील चालकांनी सहकारी शेती वाढविण्यांत केला होता. ज्या भागांत पाणी जातें तेथील सर्व जमीन जर सहकारी पद्धतीने करण्यांत आली तर जास्त जमीन भिजवितां येईल व पाणी देण्याचा खर्चहि कमी लागेल, म्हणून प्रत्येक शेतकऱ्याला सरकारने अशी हमी दिली होती की, कोरडवाहू जमिनींतून दरवर्षी जेवढें पीक निघतें त्यापेक्षा थोडें जास्त पीक त्याला मिळेल. आणि तें या अटीवर की, दहा दिवस त्या शेतकऱ्याने सहकारी शेतीवर फुकट काम केलें पाहिजे. तो जेव्हा एकटा आपल्या शेतावर काम करीत असे तेव्हा त्याला पीक काढण्याकरिता एकंदर तीस दिवस लागत. आता त्याला दहा दिवसच द्यावे लागत व पूर्वीपेक्षा जास्त पिकाची हमी मिळाली. जमीन एकत्र आल्यावर सहकारी समिति ट्रॅक्टर वगैरे लावून

कामाचे तास कमी करूं शकली व त्यामुळे जें काम पूर्वी तीस दिवसांत होत असे तें काम आता दहा दिवसांतच व्हावयाला लागलें. हा उरलेला वेळ शेतकरी कसा खर्च करतो या प्रश्नाला असें उत्तर देण्यांत आलें की, (१) पाण्यामुळे या शेतीवर आता दुसरें पीक निघूं शकतें व तें पीक कोऑपरेटिव्ह सर्वस्वी घेत असते. तेवढी मजूरी शेतकऱ्याला जास्त मिळाली. (२) कांही पिकांना उदाहरणार्थ, तंबाखाला, मेकॅनायजेशन लागूं पडत नाही. हीं पिकें जुन्या पद्धतीने हातांनीच काढावीं लागतात. राहिलेला वेळ हीं पिकें काढण्यांत तो लावूं लागला. त्याकरिता थोडी जमीन त्याला अलग काढून देण्यांत येत आहे.

हें एक इतिहासप्रसिद्ध शहर आहे. तुर्की लोकांच्या आक्रमणाविरुद्ध चौदाव्या शतकांत सर्बियनांनी एक फार मोठा उठाव करून त्यांना हरविण्याचा प्रयत्न केला. पण तो असफल झाला. त्यांत सर्बियाचे अपरिमित नुकसान झालें. मनुष्य-हानि फार झाली. खर्चहि अतिशय झाला. सर्बियाचें हें पानिपतच झालें. त्यानंतर पुढे ५०० वर्षें तो आपले डोकें वर काढूं शकला नाही. ही लढाई कोसोव्हो येथे झाली होती.* नंतर १९१२ सालीं जेव्हा बाल्कन राष्ट्रांनी मिळून तुर्कीविरुद्ध अुठाव केला तेव्हा कोमानोव्हो शहराजवळ सर्बियाने तुर्कांविरुद्ध फार मोठा जय मिळविला. या लढाईचे परिणाम जवळजवळ कोसोव्होच्या लढाईसारखेच झाले. यूरोपांतून टर्कीची सत्ता जवळजवळ नामशेषच झाली. म्हणून सर्बियांत एक म्हण आहे की, 'कोसोव्होचा बदला आम्हीं कोमानोव्होला घेतला'.

रात्रौ आम्हीं स्कोपियेला परत आलों व जेवण करून निजलों.

* * *

## शनिवार ता. १६–५–५९

आज सकाळला रेल्वेच्या शासनांत विकेंद्रीकरण कसें लागूं पडतें याबद्दल कांही माहिती घेतली. रेल्वेसारखें केंद्र सरकारच्या हातीं असलेलें व केंद्रित व्यवस्थेची ज्याला फार जरूरी आहे असें खातें हें विकेंद्रीकरणाच्या पद्धतीने कसें चालविलें जातें हा विषय होता. त्यानंतर येथील युनिव्हर्सिटींतील रेक्टरशीं आम्हीं बोलणें केलें. मॅसिडोनियन भाषा इथे चालते. परंतु तींत साहित्य—विशेषतः शास्त्रीय विषयांचें साहित्य—कमी असल्यामुळे तुमचें कांही अडतें काय हा आमच्या चौकशीचा मुख्य

---

*या लढाईत त्यांचा राजा मारला गेला व त्याच्या मुलीशीं तुर्की सुलतानाने नंतर जबरदस्तीने लग्न लावलें.

हेतु होता. त्याचबरोबर सर्बोक्रोआट भाषा युगोस्लावियाच्या बऱ्याच भागांत चालत असल्यामुळे तुम्हांला त्यामुळे कांही अडचण होते काय, व्हिजिटींग प्रोफेसर्स कोणत्या भाषेंत लेक्चर्स देतात इत्यादींबाबत आम्हीं चौकशी केली. सर्बोक्रोआट व मॅसिडोनियन यांमध्ये फरक फार कमी आहे. त्यामुळे ज्याला वाटेल ती भाषा तो वापरतो, यामुळे आम्हांला कसलीहि अडचण अजूनपर्यंत जाणवली नाही असें सांगण्यांत आलें. आमच्या भाषेंत साहित्य कमी आहे तें वाढविण्याचा आम्ही प्रयत्न करीत आहोंत. पण जर तें अपुरें पडलें तर सर्बोकोआट भाषेंतील साहित्याचा आम्ही उपयोग करतों, असें रेक्टर साहेब म्हणाले.

या युनिव्हर्सिटींत आज ७००० विद्यार्थी शिक्षण घेत आहेत. मॅसिडोनियाची लोकसंख्या १० लक्ष आहे. विद्यार्थी व शिक्षक यांचें प्रमाण ३५:१ पडतें. विद्यार्थ्यांची संख्या विशेष वाढल्यामुळे शिक्षणाच्या दर्जावर त्याचा परिणाम झाला आहे. तो दूर करण्याकरिता आम्ही प्रवेशापूर्वी एक चांचणीची परीक्षा ठेवणार आहों व टेक्निकल फॅकल्टीज आपल्या परीक्षा ठेवणार आहेत असें रेक्टर म्हणाले.

यानंतर आम्हीं एका खेड्यांत जाण्याचा प्रयत्न केला. पण मध्यंतरीं पूल तुटला असल्यामुळे आमचें जाणें झालें नाही व आम्हांला परतावें लागलें.

दुपारीं येथील अध्यक्ष श्री लाझारकोटलीझोपस्की यांची आम्हीं भेट घेटली. मागील लढाईंत यांना कैद करून बल्गेरियांत ठेवण्यांत आलें होतें. त्यांना मारण्याचा हुकूम झाला होता. पण तो पुढे रद्द झाला. हिंदुस्थानांत कल्चरल मिशनबरोबर हे आले होते सिंद्री, भाक्रानांगल इत्यादि ठिकाणें यांनी पाहिलीं आहेत. मॅसिडोनियन लोकांत एकत्र येण्याची इच्छा आहे हें त्यांनीच सांगितलें. रात्रौ जेवण करून आम्हीं बेलग्रेडची गाडी गाठली.

* * *

## रविवार ता. १७–५–५९

आज सुट्टीचा दिवस. आम्हीं आमच्या हॉटेलमध्ये प्रवासाचा शीण काढला. कांही लिहिणें-वाचणें झालें.

* * *

..., ठा .. स्थळप्रत.
अनुक्रम ........................ वि: ....................


**सोमवार ता. १८-५-५९.**

आज आम्ही कलेक्टिव्ह इकॉनमीच्या चौथ्या इंटरनॅशनल काँग्रेसच्या सभेला गेलों. डोम सिंडिकाटा येथे ही सभा भरली होती. याच इमारतींत ट्रेड युनियनची कचेरी आहे. चौथी ट्रेड युनियन काँग्रेस ही इथेच भरली होती. आम्हांला श्री स्टनोव्हनिक यांनी या काँग्रेसला हजर राहण्याचें निमंत्रण दिलें होतें. ही कलेक्टिव्ह इकॉनमीची कॉन्फरन्स. पण आश्चर्य हें की, जिथे कलेक्टिव्ह इकॉनमीचा जास्तींत जास्त वापर ते सर्व देश या काँग्रेसमध्ये हजर नव्हते. रशिया, पोलंड, रुमानिया, बल्गेरिया, झेकोस्लोव्हाकिया इत्यादि राष्ट्रातर्फे कोणीहि प्रतिनिधि नव्हते. पश्चिम जर्मनी, ऑस्ट्रिया, बेल्जियम, फ्रान्स, ग्रीस, इटाली, स्वीडन, स्वित्झर्लंड, युगोस्लविया व हिंदुस्थान यांच्यातर्फे प्रतिनिधि होते. युगोस्लावियाचेच ५० प्रतिनिधि, पश्चिम जर्मनीचे २५, ऑस्ट्रियाचे २५, बेल्जियमचे ५५, फ्रान्सचे ११, ग्रीसचे ३, इटालीचे ५, स्वीडनचे व स्वित्झरलंडचे १३ व हिंदुस्थानचे आम्ही ५ अशी प्रतिनिधिमंडळी होती. काँग्रेसचे अध्यक्ष श्री एडगर्ड मिलहाऊड यांनी एक फार भावनाप्रधान भाषण केलें. 'पुढारलेले देश व मागासलेले देश असा भेद वाढला आहे, पुढारलेल्या देशांनी मागासलेल्या देशांच्या विकासाला धावून आलें पाहिजे.' इत्यादि, इत्यादि. त्यांचें भाषण झाल्यावर अर्ध्या तासाची सुट्टी दिली होती. तींत ते मला भेटले व हिंदुस्थानाच्या आध्यात्मिक परंपरेची तारीफ करून आजकालच्या जगांत हिंदुस्थानाच्या आध्यात्मिक ( स्पिरिच्युअल) भूमिकेचा फार उपयोग आहे, असें म्हणाले. मी म्हणालों की, या भूमिकेचा आणखी जास्त उपयोग व परिणाम झाला असता जर हिंदुस्थान आपला आर्थिक विकास या भूमिकेच्या आधारावर करून दाखविता. यानंतर पुन्हा कॉन्फरंस सुरू झाली. परंतु आम्हांला श्री एडवर्ड कार्डेल यांना भेटावयाचें असल्यामुळे आम्ही थोडचा वेळाने कॉन्फरंस सोडून निघालों.

बरोबर १२ वाजतां श्री कार्डेल यांच्या खोलींत आम्हीं प्रवेश केला. श्री. कार्डेल हे युगोस्लावियांतील सर्वांत प्रमुख राजकीय तत्त्वज्ञानी मानले जातात. विकासाच्या पार्श्वभूमीबाबत त्यांचें पुष्कळसें लिखाण आमच्या वाचनांत आलें होतें. सोशालिस्ट अलायन्सच्या सेंट्रल कमिटीच्या बैठकींत आम्हीं त्यांना दुरून पाहिलें होतें. प्रत्यक्ष भेटीचा हा पहिलाच प्रसंग. युगोस्लावियांतील लोकांच्या मानाने श्री कार्डेल हे ठेंगणे, पण मजबूत शरीरयष्टीचे गृहस्थ आहेत. ते जुने शाळा-मास्तर, परंतु कॉम्युनिस्ट पार्टीचे फार जुने सभासद व टिटोचे पुष्कळ दिवसांचे सहकारी. त्यांचा चेहरा सौम्य व विचारी दिसला. आमच्याशीं बोलतांना सुद्धा अत्यंत सरळ व नम्रवृत्तीने ते बोलले. मोठेपणाची कसलीहि ऐट त्यांच्या वागण्यांत दिसली नाही. परंतु १॥ तासाच्या भेटींत, आम्ही २० दिवसांत युगोस्लावियांत जेवढें शिकलों नाही तेवढें त्यांच्याकडून आम्हांला मिळालें. आमच्या बहुतेक शंका त्यांनी

दूर केल्या , बऱ्याच गोष्टी स्पष्ट केल्या व कांही बाबींवर नवीन प्रकाश टाकला. सुरवातीला युगोस्लावियाचा दौरा करण्याची संधि दिल्याबद्दल मीं त्यांचे आभार मानले व २० दिवसांच्या प्रवासाचें थोडक्यांत वर्णन करून, पक्षाची किंवा सरकारची सत्ता नाहीशी कशी होईल व ती नाहीशी झाल्यावर तिच्या जागीं काय राहील, असा प्रश्न केला. आपल्या उत्तरांत त्यांनी 'श्री जयप्रकाश नारायण जेव्हा येथे आले तेव्हा मी नव्हतों व त्यांची व माझी भेट होऊं शकली नाही' असा खेद प्रदर्शित केला. 'तुम्ही आलांत, आम्ही तुमचें स्वागत करतों. तुम्हांला जी माहिती पाहिजे ती मिळवा,' वगैरे औपचारिक वाक्यें बोलून ते माझ्या प्रश्नाकडे वळले. ते म्हणाले "प्रथम हें लक्षांत घ्या की, प्रत्यक्ष कृति ही तात्त्विक कल्पनांच्या पाठीमागे असते व युगोस्लावियांतहि हीच परिस्थिति आहे. आम्हीं क्रांतीच्या संदर्भात सत्ता हस्तगत केली. त्याची छाप अजून आमच्यावर आहे. सुरवातीला सत्ता बळकट व केंद्रित होती. तेव्हा तशी जरूरी होती. आता ती आम्ही हळहळू विकेंद्रित करीत आहोंत. पण अजूनहि व्यक्ति व समाज आणि व्यक्ति व सरकार यांच्यांत पूर्ण समन्वय आम्ही करूं शकलों नाहीं. त्यांच्यांत विरोध आहे. सरकारला आर्थिक विकास लौकर करावयाचा आहे. त्याकरिता समाजाकडून व व्यक्तीकडून जास्तींत जास्त पैसा मिळाला पाहिजे. व्यक्तीला तो पैसा आपल्यावर खर्च करण्याची अिच्छा असते. या संदर्भात सरकारी सत्ता विलीन होणें शक्य नाही. ही आज युगोस्लावियाची वास्तविक परिस्थिति आहे. परंतु आम्हीं त्या सत्तेला विकेंद्रित केलें आहे. कामगारांच्या हातीं कारखाने सोपविले. लोकांच्या हातीं कॉम्यून्समार्फत सत्ता सोपविली. अशा तऱ्हेनें सरकारी सत्तेचा बराचसा अंश लोकांच्या हातीं गेला. पण अजून ती विर्सजित झाली नाही. तीच गोष्ट पक्षाची. आता आमचा कॉम्युनिस्ट पक्ष, पक्ष म्हणून राहिला नाही. सोशालिस्ट अलायन्स या लोकांच्या संघटनेंत तो विसर्जित झाला. लीग ऑफ कॉम्युनिस्टचें कार्य आता लोकांचें मार्गदर्शन करण्याचें व त्यांना शिक्षित करण्याचें आहे. सरकार व कॉम्युनिस्ट पार्टी यांची जी जोडी पूर्वी होती ती आता तुटली आहे. अशाच तऱ्हेने हें विसर्जन दिवसेंदिवस जास्त प्रभावी होईल."

यानंतर प्रश्न निघाला समाजांतील आर्थिक स्तरांबाबत. डॉ. दस्तूर म्हणाले, "समाजवादाच्या आचरणांत हा फरक वाढत जाणें कितपत योग्य आहे?" त्यावर डॉ. कार्डेल म्हणाले, "हा फरक एकदम कमी करतां येत नाही. एक वेळ अशी होती की, लहान व मोठ्या पगारांत आम्हीं फारच कमी फरक ठेवला होता. मजुराला सुद्धा वाटलें की, हा फरक फार कमी आहे. परंतु क्रांतीच्या उत्साहांत पुष्कळ गोष्टी होऊं शकतात. तो अुत्साह ओसरल्यावर क्रांतीपासून आपणांला काय मिळालें इकडे लोकांची दृष्टि जाते. क्रांतीपासून आपल्याला कांही तरी मिळालें पाहिजे अशी त्यांची इच्छा असते. म्हणून आम्हीं पगारवाढ केली.

पण हें लक्षांत घ्या की, या पगारवाढीला कामगारांची संमति आहे. आम्ही त्यांना म्हणतों की, तुम्हीच पगार ठरवा. तुम्ही पगार कमी ठरवाल तर तुम्हांला कमी मिळेल. प्रत्येकाला एकच पोट मग सारखाच पगार कां नको अशा विचाराचे आमच्यांतहि लोक आहेत. परंतु ही परिस्थिति पुढे आल्यावर त्यांना वाटतें की, पगारवाढींत आपलाहि फायदा आहे व त्यांच्या संमतीनेच पगारवाढ होते." यावर मी म्हणालों, "या काही थोडया लोकांच्या पगारवाढीकरिता एवढ्या मोठ्या कामगारांची संमति घेण्यापेक्षा या लहान लोकांची संमति त्यांचे पगार न वाढण्याकरिता घेणें जास्त सोपें नाही काय? शेवटी एका परिस्थितीकरिता तयारच करावयाचें तर अल्पसंख्यांक मोठ्या लोकांना आपले पगार तुम्ही वाढवून घेऊं नका हें समजावून कां सांगतां येऊं नये?" या प्रश्नाला उत्तर म्हणून श्री कार्डेल म्हणाले, "कोणत्याहि देशांत थोडेसे अल्पमतवालेच कायमचा त्याग करूं शकतात. सर्व समाजाकडून अशी अपेक्षा करणें योग्य होणार नाही. अशा तऱ्हेचे त्यागी लोक आमच्या देशांत कायमचे राहावे अशी आमचीहि इच्छा आहे. परंतु जगाचा जर इतिहास पाहिला तर साधारण जनसमाज आपला जीवनस्तर वाढविण्याकडेच लक्ष देणार. समाजवादाकरिता तुम्हांला कायमचा त्याग करावा लागेल असें आम्हीं आमच्या लोकांना सांगितलें नाही. तें स्टालिनने केलें. आमच्या समाजवादाच्या कल्पनेप्रमाणे समाजवादाचा परिणाम लोकांचा जीवनस्तर वाढण्यांत झाला पाहिजे. आम्हीं मोठ्या लोकांना सांगितलें की, त्यांच्या कामाच्या अनुरूप त्यांनी एवढेंच घ्यावें की ज्यामुळे त्यांच्यांतील व साधारण मजुरांतील अंतर फार वाढणार नाही. साधारण मजुरांना आम्ही समजावून सांगतों की, तुमचा जीवनस्तर जर वाढावयाचा असेल तर मोठ्या लोकांना थोडा जास्त पगार मंजूर करा. पण जसजसें उत्पादन वाढेल तसतसा हा भेद कमी होईल."

त्यानंतर त्यांची आजची जी एक पक्षपद्धति आहे, ती पार्लमेंटरी पद्धतींतील अनेक पक्षपद्धतीपेक्षा ते चांगली समजतात म्हणून ठेवली आहे की काय, हा प्रश्न मीं विचारला. कारण टिटोंच्या चरित्रांत कुठे तरी असें वाचल्यासारखें मला आठवत होतें. श्री कार्डेल म्हणाले, "असें आमचें मत नाही. एक चांगली व एक वाईट असें आम्ही समजत नाहीं. पार्टीपद्धतीचे व सरकारी शासनाचे दोष दोन्ही पद्धतींत आहेत. जिथे पार्टी व सरकार या दोन्ही संस्थांचा नाश करावयाचा आहे तिथे एक पार्टी काय व जास्त पार्ट्या काय, दोन्ही सारख्याच. दोन्ही पद्धतींतून हें ध्येय गांठतां येईल असें आम्हांस वाटतें. प्रत्येक देश आपल्या इतिहासाप्रमाणे यांपैकी एखादा मार्ग चोखाळूं शकतो."

'जोंपर्यंत प्रातिनिधिक संस्था अस्तित्वांत आहेत तोंपर्यंत डायरेक्ट डेमॉक्रसी येणार कशी? व याकरिता एक तर फार लहान लहान समाज स्थापन करावे

लागतील व त्यांचा परस्परांशीं कांही संबंध राहणार नाही किंवा डायरेक्ट डेमॉक्रसी-ला खो द्यावा लागेल.' यावर डॉ. कार्डेल म्हणाले, "अशा तऱ्हेची आमची कल्पना डायरेक्ट डेमॉक्रसीची नाही. प्रातिनिधिक संस्था राहणारच. त्याशिवाय कसें चालणार? परंतु आपल्या प्रतिनिधींवर लोकांना पूर्ण हक्क असला पाहिजे. प्रतिनिधि व जनता यांच्यामध्ये पक्ष किंवा इतर कसलेंहि बंधन नको. याला आम्ही डायरेक्ट डेमॉक्रसी समजतों. त्या दृष्टीने आम्हांला असें वाटतें की, फेडरल पार्लमेंटकरिता जीं निवडणुकीचीं क्षेत्रें आहेत तीं फार मोठीं आहेत. त्यापेक्षा कॉम्यून्समधून इनडायरेक्ट पद्धतीची निवडणूक जास्त चांगली होईल असें आम्हांस वाटतें व त्या दृष्टीने आम्ही विचार करीत आहोंत."

एकीकडे तुम्ही विकेंद्रीकरण करतां व दुसरीकडे आधुनिक तांत्रिक प्रगतीचा पूर्ण फायदा उचलतां. या दोन्ही बाबी परस्परविरोधी नाहीत काय? तांत्रिक प्रगतीने अेक मॅनेजेरियल वर्ग निर्माण होणार नाही काय? विकेंद्रीकरणाचे फायदे तो हिरावून घेणार नाही काय? या आमच्या प्रश्नावर डॉ. कार्डेल उत्तरले, "या धोक्यांतून आमची वर्कर्स मॅनेजमेंटची पद्धति आमचा पूर्णपणें बचाव करील असें आम्हांस वाटतें. त्याकरिता प्रगति थांबविली पाहिजे असें आम्हांस वाटत नाही."

"इतर राष्ट्रांत सहकारी पद्धति पुष्कळ वाढली. पण त्या वाढींतून व्यक्तिगत मालकीचा लोप झाला नाही. युगोस्लावियांत मात्र शेतीच्या क्षेत्रांत हें घडून येईल अशी आपली अपेक्षा आहे. हें कसें?" यावर डॉ. कार्डेल म्हणाले, "हें समजण्याकरिता आमची सहकारी पद्धतीची कल्पना व पाश्चात्यांची सहकारी पद्धतीची कल्पना यांत काय फरक आहे हें पूर्णपणें समजून घेतलें पाहिजे. व्यक्तिगत मालकीच्या पद्धतीवर पाश्चात्यांची सहकारी पद्धति आधारित आहे. आमचें तसें नाही. कोऑपरेटिव्हची संपत्ति ही सामाजिक आहे. तिच्यावर तिच्यांत काम करणाऱ्यांचा अगर भागीदारांचा विशेष हक्क आहे असें आम्ही समजत नाहीं. जे कोऑपरेटिव्हमध्ये काम करतात त्यांना इतर कोणत्याहि उद्योगाप्रमाणे ज्या प्रमाणांत त्यांच्या मेहनतीने कोऑपरेटिव्हची संपत्ति वाढविण्यांत आली त्या प्रमाणांत त्यांना तिच्यापासून लाभ मिळेल. परंतु बाकी सर्व संपत्ति समाजाची राहील. हा मूळ फरक आहे. आता शेतीची जसजशी वाढ होईल तसतसा कोऑपरेटिव्हचा हिस्सा प्रत्यक्ष शेती करण्यांत वाढेल, हें जर आपणांस मान्य असेल तर मग तें घडून आलेंच पाहिजे. नवीन शोध व तंत्र यांच्या आधारावर जर शेती करावयाची असेल तर ती मोठ्या प्रमाणांत व आधुनिक यंत्रांच्या सहायानेच करावी लागेल. लहान शेतकऱ्याला हें जमणार नाही. म्हणून दिवसेंदिवस कोऑपरेटिव्हवर त्याला जास्त प्रमाणांत अवलंबून राहावें लागेल. व ज्या प्रमाणांत हें अवलंबन वाढेल त्या प्रमाणांत त्याची आपल्या शेतावरील मालकीची भावना कमी होईल."

"तुमच्या राज्यांत व्यक्तिशः शेती करणारे शेकडा ५३ आहेत. पण कामगारांना इन्शुरन्सच्या ज्या सवलती आहेत त्या शेतकऱ्यांना नाहीत. त्यांनी जर आपली शेतीवरील मालकी सोडली तरच त्यांना त्या मिळतात. पण समजा उद्या त्यांनी आपली मालकी सोडली, तर मग एक तर एवढ्या सर्व लोकांना या सवलती तुम्हांला द्याव्या लागतील आणि त्याकरिता लागणारा पैसा तुम्ही उभारूं शकणार नाही, किंवा त्या सवलती काढून टाकाव्या लागतील. हें कसें ?" या प्रश्नावर डॉ. कार्डेल म्हणाले, "हा प्रश्न आम्ही वारंवार चर्चेला घेतों. कमींत कमी ८–१० वेळा तरी या प्रश्नाची चर्चा झाली असेल. शेवटी आम्हीं असें ठरविलें की, जर फार्मर्स कोऑपरेटिव्हज आम्हांला इतर उद्योगांप्रमाणे सोशल इन्शुरन्स फंडांकरिता कर देतील तर त्यांनाहि हे सर्व फायदे मिळतील.

शेवटी जिलास व त्यांच्या पार्टीच्या भांडणांत मूळ मुद्दे कोणते होते असा प्रश्न मीं विचारला. हा प्रश्न विचारण्यापूर्वी, "मला एक नाजुक प्रश्न तुम्हांला विचारावयाचा आहे, आम्ही विद्यार्थी आहोंत, राजकारणी नाहीं. तेव्हा ज्ञान मिळविण्याच्या दृष्टीनेच आम्ही हा प्रश्न विचारीत आहोंत." अशी मीं सुरवात केली. त्यावर क्षणभर का होईना पण श्री कार्डेल यांची वृत्ति बदलली. त्यांचा गोरा चेहरा किंचितसा लाल झाला. पण हें क्षणभरच होतें. लगेच त्यांची वृत्ति पूर्ववत् झाली व जिलासची सर्व हकीकत त्यांनी सांगावयाला सुरवात केली. "जिलास हा एककल्ली वृत्तीचा. कोणतीहि बाब अतिरेकाला नेण्याची त्याची वृत्ति होती. हा त्याचा स्वभाव होता. याचे अनुभव आम्हांला पूर्वी सुद्धा आले होते. स्वातंत्र्याच्या लढाईत बऱ्याच वेळा त्याच्या हातून निष्कारण माणसांचा संहार झाला. रशियाबाबत त्याचें पूर्वीचें धोरण अगदी निराळें. रशियाचा तो पक्षपाती व अगदी अंधानुकरण करणारा. पण आमचें जेव्हा रशियाशीं फाटलें तेव्हा तो अगदी दुसऱ्या टोकाला गेला व पाश्चात्य राष्ट्रांकडे त्याचा कल झुकला. तसे त्याचे गुण म्हणजे तो चांगला लिहीत असे व लोकांत मिसळणें त्याला जमत होतें. वर्तमानपत्र तो चांगलें चालवीत असे. पण शेवटी त्याला सत्तेची लालसा लागली. इतकेंहि होतें तरी आम्हीं त्याच्याशीं जुळतें घेण्याचा पुष्कळ प्रयत्न केला. पण शेवटी जेव्हा देशद्रोही कृत्यें त्याच्या हातून घडलीं, परकीय राष्ट्रांशीं तो बेकायदेशीर संबंध ठेवूं लागला तेव्हा आम्हांला हस्तक्षेप करणें भाग पडलें. म्हणून कायदेशीर रीतीने त्याच्यावर खटला भरून आम्हांला त्याला शिक्षा करावी लागली."

यानंतर आमची मुलाखत संपली. श्री कार्डेल साहेबांची व जयप्रकाशजींची भेट होऊं शकली नाही याबद्दल आम्हीं दिलगिरी व्यक्त केली. पण पुन्हा अशी भेट होऊं शकेल अशी आशा त्यांनी प्रगट केली. "त्याकरिता तुम्ही हिंदुस्थानांतहि

येऊं शकाल तर फार बरें होईल. तुम्हांला आमचा देश प्रत्यक्ष पाहतां येईल व आमच्या अडचणींची जाणीव होईल. लोकांच्या भेटीहि होतील." असें आम्हीं म्हटलें त्यावर कार्डेल साहेब म्हणाले, "कदाचित् पुढच्या वर्षी अशी संधि येईल. तेव्हा बघूं." आम्हीं त्यांना धन्यवाद देऊन जवळजवळ १॥ तासाची ही भेट संपविली.

दुपारीं आमच्यापैकी कांही जण कलेक्टिव्ह इकॉनमीच्या कॉन्फरन्सला गेले व कांही कॉम्यूनचा अभ्यास करण्याकरिता बेलग्रेडच्याच एका कॉम्यूनमध्ये गेले. रात्रौ जेवण व झोप.

* * *

## मंगळवार ता. १९–५–५९

आज सकाळीं आम्ही कलेक्टिव्ह इकॉनमीच्या कॉन्फरन्सकरिता गेलों. ९ वाजतां सुरू होणारी कॉन्फरन्स बरोबर दहा वाजतां सुरू झाली. डेलेगेट्स् हॉलच्या बाहेर बोलत होते व आश्चर्य हें की, एवढया उशीरा कॉन्फरन्स सुरू झाली तरी उशीर होण्याच्या कारणाचा नामोच्चार किंवा त्याकरिता क्षमायाचना हें कांहीहि नाही. १० ला घंटी झाली व एकदम कॉन्फरन्स सुरू झाली. कोणत्याहि कामाला उशीर झाला किंवा कामांत कांही सुस्तपणा आला तर सविनय लोक नेहमी म्हणतात की, 'आम्हीं हे गुण तुर्कांकडून घेतले आहेत' किंवा 'तुर्क कांही ठेऊन गेले असतील तर ही गोष्ट ठेवून गेले.' मी थोडा वेळ कॉन्फरन्समध्ये बसलों व नंतर कंटाळून घरीं आलों.

बरोबर १२॥ वाजतां आपल्या एम्बसीमधील श्री शर्मा हे आले व त्यांच्या बरोबर मी इझ्राईलच्या एम्बसींत गेलों. तेथील फर्स्ट सेक्रेटरी म्हणाले, "तुम्ही आमच्या देशांत येणार हें आम्हांला माहीत होतें. त्याप्रमाणे मुंबईच्या कौंसलचें व दिल्लीचें पत्र आम्हांला आलें आहे. तुम्ही आमचे पाहुणे आहांत. आमच्या देशांतील शेती व सामुदायिक वसाहती तुम्हांला दाखवावयाच्या आहेत. आणखी कशांत तुमची आवड असेल तर ती सांगा, म्हणजे तेंहि दाखविण्याचा आम्ही प्रयत्न करूं." "शेती-बरोबर इतर उद्योग आहेत ते पाहावे अशी माझी इच्छा आहे", असें मी बोललों. सर्वसेवासंघामार्फत ४०–५० लोक एक वर्षभर इझ्राईलमध्ये बिना खर्चाने ठेवायला हे लोक तयार आहेत. त्यांची इच्छा ही आहे की, त्यांचे हिंदुस्थानाबरोबर डिप्लोमॅटिक संबंध जोडले जावे. परंतु अरब राष्ट्रांना तें आवडणार नाही म्हणून हिंदुस्थानाने तिथे आपली एम्बसी ठेवली नाही. इंग्रज व फ्रेंच यांच्या साहाय्याने इझ्राईलने इजिप्तवर चढाई केली तेव्हापासून तर अगदी स्पष्टपणें हा देश पाश्चात्यांच्या ब्लॉकशीं जोडला गेला आहे. तिबेटबाबत आपले व चीनचे जेव्हा संबंध बिघडले तेव्हा मुंबईच्या त्यांच्या कौंसलला पुष्कळ बरें वाटलें हें मीं

पाहिलें आहे. श्री जयप्रजाशजींबरोबर तो याबाबत अगदी जिव्हाळ्याने बोलत होता. यावरून आपलें आंतरराष्ट्रीय धोरण किती चांगलें आहे याची कल्पना येते.

परंतु सोवियट रशियाचे सुद्धा इझ्राईलशीं संबंध आहेत. इझ्राईल सोवियट रशियाला आपला अगदी कट्टर दुष्मन मानतें. कारण इजिप्तवर झालेल्या चढाईंत रशियाने मध्ये पडून इंग्लंडला जेव्हा धमकी दिली व त्यानंतर इंग्लंडने आपला पाय मागे घेतला तेव्हा लढाई बंद झाली. हा इतिहास ताजा आहे. मग तेथे आपली एम्बसी कां असू नये ? अरब राष्ट्रांची एम्बसी नसली म्हणून आपलीहि नसावी काय ? आपली एम्बसी नसण्याचीं कारणें काय आहेत, हें केव्हा तरी समजावून घेतलें पाहिजे.

येथील सरकारी नोकरांची संघटना कशी आहे व खुल्या बाजारांत किमतीला स्थैर्य आणण्याकरिता युगोस्लावियांत काय उपाययोजना करतात ही माहिती काढण्यासाठी संध्याकाळीं ४ ते ८ पर्यंत दोन व्यक्तींना भेटलों. रात्रौ जेवण व झोप.

* * *

## बुधवार ता. २०–५–५९

युगोस्लावियांत टॅक्सेशनची पद्धति कशी काय आहे हें समजावून घेण्याकरिता श्री ...... यांना आम्ही सकाळीं ९ ते १२॥ भेटलों. हे गृहस्थ युगोस्लावियाच्या फेडरल एक्झिक्युटिव्ह कौंसिलचे सभासद आहेत. त्यांनी फार सोप्या पद्धतीने येथील कर लावण्याची पद्धति समजावून सांगितली. त्यानंतर श्री पाव्हलोव्हिच बरोबर आम्ही येथील राष्ट्रीय म्युझियम पाहावयाला गेलों. पाव्हलोव्हिच हा सर्वियन. युगोस्लावियांतील राष्ट्रीय वृत्तींत सर्वियाचा फार मोठा हात आहे. तुर्कांच्या आक्रमणांविरुद्ध सुद्धा सर्वात जास्त उचल सर्वियानेच खाल्ली व मनुष्यबळ सर्वियानेच खर्च केलें.

"पूर्वी आमचें राज्य फार मोठें होतें. ११० व्या शतकांत राजा दुशान हा राज्य करीत होता. त्याने तयार केलेल्या कायद्यांतील बाबी एवढ्या महत्त्वाच्या आहेत की, अजूनहि त्या लागू पडतात. नंतर तुर्क लोक आले व आमच्या विनाशाला सुरवात झाली. हिंदुस्थानांतील मुलसमानांच्या आक्रमणाविषयी जी चीड हिंदी मनुष्याच्या मनांत असते अगदी नेमकी तीच चीड सर्वियनांच्या मनांत तुर्कांविषयी असते."

अशी प्रस्तावना करून या पार्श्वभूमींतून श्री पाव्हलोव्हिच यांनी म्युझियम-मधील कांही चित्रांचें स्पष्टीकरण केलें. दुपारीं १॥ वाजतां आम्ही हॉटेलमध्ये पोहोंचलों. लंचनंतर माझें तिकीट बदलण्याकरिता मी यातच्या ऑफिसांत गेलों व बेलग्रेड–रोम–तेल अव्हीव असें तें करवून घेतलें. पूर्वीं बेलग्रेड-अथेन्स-तेल अव्हीव असें माझें तिकीट होतें. मुंबईला असें तिकीट करून घेण्याचा मीं पुष्कळ प्रयत्न केला पण तो असफल ठरला. बेलग्रेडला मात्र हें काम तावडतोब झालें. हें असें कां व्हावें तें समजलें नाही.

रात्रौ जेवण करून आम्ही क्रोयेशियाच्या दौऱ्यावर निघालों.

* * *

## गुरुवार ता. २१–५–५९

आज सकाळीं गाडींतून आम्हांला क्रोयेशियाचें दर्शन झालें. त्यापूर्वी आम्ही डुब्रॉव्हनिकला गेलों असतां क्रोयेशियांत प्रवेश केला होता. पण तो केवळ एका टोकाला पोचण्याकरिता. आता आम्ही अगदी क्रोयेशियाच्या मध्यांतून त्याच्या राजधानीकडे म्हणजे झाग्रेबला चाललों होतों. सर्विया हा जसा पुष्कळ वर्षे तुर्कांच्या हातीं राहिला तसा क्रोयेशिया हा भाग बरीच वर्षे ऑस्ट्रिया-हंगारीच्या ताब्यांत होता. याची छाप येथील लोकांवर व परिस्थितीवर पडलेली आहे. साधारणपणें येथे सर्वियापेक्षा औद्योगीकरण फार मोठ्या प्रमाणांत झालेलें आहे. झाग्रेबची वस्ती केवळ ४५०,००० आहे परंतु या शहरात १२० फॅक्टरीज आहेत. विमानांतून पाहिलें तर जिकडे तिकडे अहमदाबादसारखीं फॅक्टरीजचीं धुरांडीं दिसतील.

नेहमीप्रमाणे हॉटेलमध्ये गेल्यावर आम्ही येथील खाण्याचे पदार्थ तयार करण्याची फॅक्टरी पाहण्याकरिता गेलों. जवळजवळ ८०० मजूर व इतर लोक तेथे काम करीत होते. टोमॅटोचा रस तयार करण्यासाठी व साखरेच्या कारखान्यां-करिता हवीं असलेलीं फळें डब्यांत भरण्यासाठी लागणारीं अवजारें, तसेंच गुरें मारण्यासाठी व त्यांचें मांस डब्यांत भरण्यासाठी लागणारीं अवजारें ह्या फॅक्टरींत तयार होतात.

यापूर्वी मॅसिडोनियांत स्टीपला आम्हीं एक कापडाची गिरणी पाहिली होती. मीं नागपूरच्या गिरण्या पाहिल्या आहेत. मुंबईच्या पाहिल्या नाहीत. पण त्यासंबंधी मला जी माहिती आहे, त्या हिशेबाने इथल्या फॅक्टरीजचा ले-आउट कामगारांकरिता केलेल्या सोयी व साफसफाई या गोष्टी पाहण्यासारख्या आहेत.

अर्थात् औद्योगीकरण उशीरां सुरू करणाचे जे फायदे आहेत त्यांपैकी हा एक आहे. हिंदुस्थानांत नव्याने सुरू झालेल्या फॅक्टरीज याच स्वरूपाच्या असल्या पाहिजेत. मीं अजून एकहि अशी नवीन मोठी फॅक्टरी पाहिली नाही. तीच बाब येथील लोकांचीहि आहे. आमच्या बरोबर आलेले गाईड (येथे गाईड हा शब्द मी नेहमीच्या अर्थाने वापरत नाहीं) श्री मार्कोव्हिच म्हणाले की, तुमच्याबरोबर आल्यामुळे मलाहि कांही गोष्टी अगदी नव्याने किंवा नव्या दृष्टिकोणांतून पाहावयाला मिळतात.

असो. अशा एका मोठया फॅक्टरींत आम्ही गेलों. फॅक्टरी गावाच्या बाहेर ३–४ मैल असावी. अत्यंत विस्तृत दालनें, मोकळी जागा, मोकळचा जागेंतील ती बाग, वेलींनी पूर्णपणें आच्छादलेलें कारखान्यांचें शेड अशी ती फॅक्टरी होती. एका शेडमध्ये काम करीत असलेल्या कामगारांना विचारलें असतां त्यांनी सांगितलें की, त्यांच्या मजुरींत १० ते १६ हजार दिनारांइतकी वाढ झाली. पूर्वी त्यांना दहा हजार मिळत होते. आता सोळा हजार मिळतात.

टेक्निकल डायरेक्टर, मॅनेजिंग डायरेक्टर, वर्कर्स कौंसिल व मॅनेजिंग बोर्ड या सर्व लोकांना आम्ही भेटलों आणि २–२॥ तास चर्चा केली. वर्कर्स कौंसिल आल्यापासून कामाची एफिशिअन्सी कमी होते, ज्या यंत्रांमुळे मजूर कमी होतील अशीं यंत्रें बसविण्याकरिता अडचण जाते व त्यामुळे खर्च कमी होत नाही, कामगारांतील डिसिप्लिन पूर्वीसारखी राहत नाही इत्यादि जे नेहमीचे आक्षेप आहेत त्यांबाबत बरीच चर्चा झाली. कामगारांच्या प्रतिनिधींनी व डायरेक्टर महाशयांनी चर्चेत मनापासून भाग घेतला व फार हुशारीनें आपली बाजू समजाऊन सांगितली. वर्कर्स कौंसिलचे लोक केवळ नामधारी नसून जबाबदारीने काम करणारे असतात अशी आमच्यावर छाप पडली. दोन्ही पद्धतींची साधकबाधक चर्चा कामगारांच्या प्रतिनिधींनी केली. एक नवीन बाब या कारखान्यांत समजली व ती ही की, कामाचें प्रमाण ठरविणें ही बाब वर्कर्स कौंसिलकडे नसून कारखान्याला जोडलेल्या टेक्निकल युनिटकडे असते.

क्रोयेशिया हें युगोस्लावियांतील सहा रिपब्लिकस्पैकी एक. पण त्याचा झेंडा युगोस्लावियाच्या झेंडयाहून निराळा. प्रत्येक रिपब्लिकचें असेंच आहे. पण क्रोयेशियांत ही बाब विशेष महत्त्वाची. कारण तेथील लोकाची व सर्वियाची जवळजवळ पिढीजात दुश्मनी. आधुनिक इतिहासकार, विशेषत: ते जर कॉम्युनिस्ट असतील तर असे म्हणतील की, ही दुश्मनी जनतेंत नसून, जनतेचें शोषण करणाऱ्या लहानशा वर्गांत होती. पण हा वाद व्यर्थ आहे. कारण जुन्या राष्ट्रांचा इतिहास म्हणजे या शोषण करणाऱ्या लोकांचाच इतिहास आहे.

युगोस्लावियांत आजची राजवट येण्यापूर्वी क्रोयेशियांत त्यांच्या राष्ट्रीय झेंडयाला मनाई होती. तेथे युगोस्लावियाचाच झेंडा वापरला पाहिजे,

क्रोयेशियाचा झेंडा त्यांना वापरतां येणार नाही, अशी तेव्हाच्या सरकारची वृत्ति होती. आता तींत फार बदल झाला आहे. क्रोयेशियांत क्रोयेशियाचाच झेंडा आहे. राष्ट्रीय प्रसंगीं, क्रोयेशियाचा व युगोस्लावियाचा असे दोन्ही झेंडे लावण्यांत येतात. प्रांताभिमान कायम ठेवून राष्ट्राभिमान बाळगतां येतो हें येथील अनुभवावरून प्रत्यक्ष दिसून येतें. युगोस्लावियांतील घटकांत आपसांत जेवढें वैमनस्य पूर्वी होतें तेवढें आमच्यांत खास नव्हतें.

झाग्रेबच्या सर्व दृश्यांत सर्बियापेक्षा हा भाग जास्त पुढे आलेला आहे हें स्पष्ट दिसून येतें. बेलग्रेडच्या मध्यभागाएवढें जरी झाग्रेब सुंदर नसलें तरी दोन्ही शहरांची तुलना केल्यास वरील म्हणण्यांतील सत्यता ह्या शहरांच्या ठेवणीवरून पटते. शहरांत सर्व इमारती बेलग्रेडपेक्षा भव्य आहेत. कामगारांकरिता नवीन बांधलेल्या फ्लॅट्स् फारच मोठ्या, भव्य, सोयीच्या व स्वस्त भाड्याच्या आहेत. आमच्याबरोबर जे गृहस्थ आहेत ते अशाच एका फ्लॅटमध्ये राहत आहेत. त्यांच्याकडून अशी माहिती मिळाली की त्यांना ११०० दिनार महिन्याकाठीं भाडें द्यावें लागतें. म्हणजे महिन्याचे १४ रुपये किंवा रुपयांचा हिशेब सरकारी एक्सचेंज रेटनी केला तर २० रुपये भाडें पडतें. भाडें स्वस्त पण कपडा, जोडे इत्यादि नेहमीच्या वापरण्याच्या वस्तु महाग आहेत. एका चांगल्या जोड्याला ४० ते ५० रुपये व गरम सुटाला १५०—२०० रुपये पडतात.

सकाळीं स्त्रियांचा आणि मुलांचा येथील एक नमुनेदार दवाखाना आम्हांला दाखविण्यांत आला. संस्था खरोखरच नमुनेदार आहे. माता व लहान मुलें (७ वर्षांखालील) यांची तपासणी करून त्यांना योग्य सल्ला देणें एवढाच या संस्थेचा उद्देश आहे. हिचे लहान बालकांचा (१ वर्षाखालील) व मोठ्या मुलांचा (१ ते ७) असे दोन अलग भाग केले आहेत. आजारी मुलें व आजारी नसलेलीं मुलें असेहि भाग आहेत. आजारी मुलांची येण्याजाण्याची अगदी निराळी स्वतंत्र व्यवस्था असल्यामुळे संसर्गजन्य रोग लागण्याचा संभव नाही. संस्थेमध्ये मातांचें शिक्षण, दायांचें शिक्षण, व नर्सेसचें शिक्षण याचीहि सोय आहे. प्रसूतीपूर्वीची सल्लाहि येथे देण्यांत येते.

संस्थेची इमारत अगदी आधुनिक पद्धतीची व युगोस्लावियांतच बनविण्यांत आलेल्या सामानांनी तयार केली आहे. जमिनीवर प्लॅस्टिकची सीमेंटसारखी एक नवीनच वस्तु वापरण्यांत आली आहे. ठिकठिकाणीं काचा वापरल्या आहेत. युगोस्लावियांत एक तर काच स्वस्त असावी किंवा ती वापरण्याचा शौक असावा. बेलग्रेडला काय किंवा झाग्रेबला काय जिथे काच वापरतां येणें शक्य आहे तिथे ती वापरलीच जाते. ह्या इमारतीला केवळ २० लक्ष रुपये खर्च आला.

संस्था फार मोठी आहे. खेड्यांतून काम करणाऱ्या परिचारिकांना सुद्धा येथे शिक्षण देण्यांत येतें. झाग्रेब शहरांतून दररोज १०–१२ नवीन माता

या हिशेबाने ४००० ते ५००० मातांना व त्यांच्या मुलांना या केंद्राचा फायदा मिळत असावा.

सर्व उपकरणें संस्थेला 'युनिसेफ' ( vnicef ) संस्थेमार्फत मिळालीं आहेत. यावरून या संस्थेला जगमान्यता मिळाली आहे असें म्हणावयाला हरकत नाही. आम्हीं जी व्यवस्था पाहिली व तेथील (स्त्री) डॉक्टरची आमच्यावर जी छाप पडली त्यामुळे आम्ही प्रभावित झालों.

सायंकाळीं युगोस्लावियांत बनलेली एक फिल्म पाहावयाला आम्ही गेलों. ओसाड प्रदेशांतून सुपीक प्रदेशांत युगोस्लावियांतील जनता वसावयाला गेली त्याचें हें चित्र होतें. चित्रपटाचें नांव होतें 'वेळेने मर्यादित नसलेली रेलगाडी'. जर्मन किंवा इतर राष्ट्रद्रोही लोकांना युगोस्लावियांतून काढून लावल्यावर, त्यांच्या जागीं युगोस्लावियांतीलच ओसाड भागांतून आणून वसविलेल्या लोकांच्या वसाहतीबाबत हा चित्रपट होता. युगोस्लावियांतील शेतीशीं निगडींत असलेलें जीवन त्यांत चांगलें दिग्दर्शित केलें होतें. मातापित्याच्या परवानगीशिवाय मुलामुलींनी लग्न न करणें, बापानेंच मुलींचें लग्न ठरविणें,आईबापाला मुलगी होण्यापेक्षा मुलगा झालेला आवडणें, नवऱ्याने बायकोला मारणें, विधवेने दुसरें लग्न न करणें इत्यादि सामाजिक बाबींचें चित्रण या चित्रपटांत केलेंलें होतें. रात्रीं १० वाजतां हॉटेलमध्ये जेवण झालें. हॉटेलच्या बाहेरील मैदानांत सर्व मंडळी बसली होती व ऑर्केस्ट्राच्या संगीताबरोबर स्त्री-पुरुषांचा नाच सुरूं होता. तो नाच पाहत व तें संगीत ऐकत बरीच मंडळी जेवत होती.

लग्न झालेल्या स्त्रियांना सुद्धा आपण आकर्षक दिसावें असें कां वाटावें ? एका मनुष्याला तर आपल्या रूपाने त्यांनी आकर्षिलेलें असतेंच. मग आणखी प्रयत्नांची जरूरी काय ?

*　　*　　*

### शुक्रवार ता. २२-५-५९

आज सकाळीं आम्ही येथील वर्कर्स युनिव्हर्सिटी पाहावयास गेलों. झाग्रेबला ट्रेड युनियनची चळवळ फार लौकर सुरूं झाली. १८७० सालापासूनचे कांही दाखले आम्हांला दाखविण्यांत आले. आज येथील काम करणाऱ्यांची संख्या १२०,००० आहे. त्यांत स्त्रिया शेकडा ४० आहेत. अशा परिस्थितींत काम करणाऱ्या लोकांनी जास्त जबाबदाऱ्या संभाळाव्या ह्याकरिता विशेष प्रकारच्या प्रशिक्षणाची जरूरी भासणें स्वाभाविक होतें. यांतून या वर्कर्स युनिवर्सिटीचा जन्म झाला.

या संस्थेला वर्कर्स युनिव्हर्सिटी म्हणणें यथार्थ होणार नाही. कारण येथून निघालेल्या विद्यार्थ्यांना उच्च शिक्षणाकरिता युनिव्हर्सिटींत प्रवेश घ्यावा लागतो. येथील शिक्षण युनिव्हर्सिटीच्या दर्जाचें नाही. म्हणून या संस्थेला कामगारांची शिक्षणसंस्था असें संबोधणें जास्त अर्थपूर्ण होईल.

क्रांतीनंतर जेव्हा झाग्रेवचें व क्रोयाशियाचें औद्योगीकरण जास्त त्वरित गतीने व्हावयाला लागलें व त्यामुळे पुष्कळशा गरीब शेतकऱ्यांना कामाकरिता फॅक्टरींत येण्याची संधि मिळाली, तेव्हां तर अशा संस्थेची फारच गरज भासू लागली. कारण शेतकऱ्यांना साधारण ज्ञान देणाऱ्या सुद्धा संस्था झाग्रेबमध्ये नव्हत्या. तशांतच १९५० नंतर जेव्हा युगोस्लावियांत विकेंद्रीकरणाची लाट सुरू झाली व कामगारांच्या हातीं फॅक्टरीज जावयाला लागल्या तेव्हा वर्कर्स कौंसिल, मॅनेजिंग बोर्ड इत्यादि संस्थांमध्ये नवीनच येणाऱ्या कामगारांच्या प्रतिनिधींकरिता त्यांच्या नवीन जबाबदाऱ्यांना उपयुक्त अशा शिक्षणाची जरूरी भासावयास लागली. या सर्व परिस्थितींतून कामगारांच्या शिक्षणसंस्थेचा जन्म झाला.

या संस्थेंत किती तरी निरनिराळे कोर्सेस आहेत. कामगारांची टेक्निकल कामांत प्रगति व्हावी याकरिता टेक्निकल कोर्सेसपासून केवळ सांस्कृतिक प्रगतीपर्यंत निरनिराळे कोर्सेस आहेत. सामान्य ज्ञानाचेहि कोर्सेस आहेत. एका आठवड्यापासून दोन वर्षांपर्यंत कोर्सेस आहेत. हिंदुस्थानांत अशा स्वरूपाच्या संस्था आहेत काय, या प्रश्नाला आम्हीं नाहीत असें उत्तर दिलें. परंतु औद्योगीकरणाच्या एका विशिष्ट परिस्थितींत अशा संस्थांचा जन्म होतो. ती परिस्थिति आज हिंदुस्थानची नाही असा विचार माझ्या मनांत आला.

या संस्थेंतून आम्ही क्रोयेशियाच्या पार्लमेंटचे प्रमुख व या रिपब्लिकचे पहिले मानकरी डॉ. बाकारिक यांना भेटण्याकरिता गेलों. यांना इंग्रजी चांगलें बोलतां येत होतें. हिंदुस्थानांत एशियन सोशालिस्ट कॉंग्रेस या संस्थेच्या अधिवेशनाकरिता ते मुंबईस आले होते व दहा दिवस हिंदुस्थानांत राहिले होते. मुंबई, अजिंठा, एलोर व नवी दिल्ली इतकीं ठिकाणें त्यांनी पाहिलीं आहेत असें त्यांनी सांगितलें. सुरवातीला इकडच्या तिकडच्या गोष्टी झाल्यावर आम्ही बोलावयाला सुरवात केली. डॉ. बाकारिक एक सौम्य वृत्तीचे गृहस्थ आहेत. विकेंद्रीकरण, कामगारांनीच कारखाने संभाळणें, नोकरशाहीची सत्ता काढणें, या बाबी जर चांगल्या आहेत व त्या चागल्या आहेत याबद्दल वादच घालतां येणार नाही, तर मग इतर मार्क्सिस्ट देश या बाबी कां स्वीकारत नाहीत ? रशिया तुमच्या देशाला रिव्हिजनिस्ट कां म्हणतो ? काय हा केवळ आता प्रतिष्ठेचा प्रश्न राहिला आहे ? या माझ्या प्रश्नाला, प्रतिष्ठेशिवाय यांत दुसरें कांही दिसत नाही, आम्हीहि मार्क्सिस्टच आहोंत व आमच्या आचरणाचा परिणाम इतर राष्ट्रांवर होत आहे. असें उत्तर मिळालें.

साधारण शेतकरी व कारखान्यांतील अकुशल कामगार (अनस्किल्ड वर्कर) यांच्या राहणींत व जीवनमानांत किती अंतर आहे, या प्रश्नाला उत्तर देतांना ते म्हणाले, "युगोस्लावियांतील निरनिराळ्या विभागांत याचीं निरनिराळीं उत्तरें मिळतील. जे भाग सर्वांत जास्त प्रगत झाले आहेत उदाहरणार्थ स्लोविनिया, त्यांत शेतकऱ्याची परिस्थिति अकुशल कामगारापेक्षा चांगली व कुशल कामगारापेक्षा वाईट राहील. पण मॅसिडोनिया किंवा माँटेनिग्रो येथील परिस्थिति याच्या उलट राहील. स्लोविनियामध्ये जमिनीची किंमत पुष्कळ जास्त आहे. एका हेक्टराला ३००,००० किंवा ३५०, ००० दिनार पडतील. पण क्रोयेशियांत परिस्थिति निराळी राहील. कांही भागांत ३०,००० किंवा ४०,००० दिनार हेक्टराला पडतील." जमीन वरीचशी विकली जाते काय व कार्डेल साहेबांच्या नवीन प्रमेयानंतर तर विक्रीचें प्रमाण वाढणार नाही ना, असा मीं प्रश्न केला. सध्या कांही भागांत शेकडा २० इतकें विक्रीचें प्रमाण पडेल असें उत्तर मिळालें.

जमीन विकतां येते व ठेवीवर शेकडा ५ व्याज मिळतें तर शेतकरी जमीन विकून कामगार कां बनत नाहीत? हा माझ्या मनांत वारंवार विचार येत होता. त्याचें एक उत्तर हें आहे की, त्याला मिळणाऱ्या व्याजापेक्षा आज त्याला शेतींतून जास्त उत्पन्न मिळत असावें. याच कारणामुळे ठेक्याने दिल्या जाणाऱ्या जमिनीचें प्रमाणहि वाढत नाही. ठेक्यापेक्षा उत्पन्न जास्त होतें हें स्पष्ट आहे व कामगाराला मिळणारे जे इतर फायदे आहेत ते धरून सुद्धा हीच परिस्थिति कायम राहत असावी. "शेतीचें भविष्य काय आहे" असें मीं विचारलें. "आमच्या काम करणाऱ्या लोकांना पुरेसें अन्न मिळेल एवढी जमीन समाजाच्या अधिकाराखाली आल्यावर हा प्रश्न महत्त्वाचा राहणार नाही. मग शेतकरी कांही का करीना? सहकारी शेतींत तो येवो अगर न येवो. आम्ही त्याला त्याच्याच भरवशावर सोडून देऊं. सहकारी शेतींत तो आला तर ठीकच आहे. न आला तरी कामगारांना लागणारें अन्नधान्य आम्ही आमच्या म्हणजे समाजाच्या अधिकारांत असलेल्या शेतीवर उत्पन्न करूंच. सध्या शेकडा १० जमीन आमच्या जवळ आहे. हें प्रमाण अडीच पट तरी वाढलें पाहिजे. आज ज्या प्रमाणांत सोशालिस्ट विभागांतील पीक वाढत आहे त्यावरून ही आशा सफल होईल असें वाटतें." असें माझ्या प्रश्नाला उत्तर मिळालें.

नंतर अनेक प्रश्न मीं विचारले. "मग राहिलेल्या शेतकऱ्याच्या जीवनस्तराचें काय होईल?" यावर उत्तर मिळालें, "ज्यांना आपण कामगार व्हावें असें वाटेल ते सामाजिक विभागांत प्रवेश करतील व जशा कामगारांच्या चार कॅटेगरीज आहेत तसे शेतकऱ्यांचेहि विभाग पडतील. शेतीचाहि हिशेब एखाद्या उद्योगासारखाच होईल. एखाद्या वर्षीं शेतीपासून उत्पन्न पुरेसें न पडल्यास कॉम्यून

किंवा इतर संस्थांतून त्याला सब्सिडि मिळेल व मग शेतकरी व मजूर समान पातळीवर येतील."

"विकेंद्रीकरणांतून कांही अनिष्ट फलनिष्पत्ति होणार नाही काय ?" असें मीं विचारलें. "आम्ही एकेक पाऊल काळजीपूर्वकच टाकत आहोंत. एक पाऊल बळकट झाल्याशिवाय दुसरें उचलत नाहीं. विकेंद्रीकरणांतून अनिष्ट फल-निष्पत्ति तर झालीच नाही उलट त्यामुळे आमची शक्ति वाढली असेंच आम्हांला वाटतें. रशिया विनाकारण आम्हांला त्रास देत आहे. इथियोपियांत त्याने आम्हांला त्रास दिला, आता अल्बेनियन लोकांना तो उचलून धरीत आहे." असें उत्तर मिळालें.

त्यानंतर आम्ही लंचला गेलों. माझ्या शेजारीं, एक्झिक्युटिव्ह कौंसिलचें शिक्षणाचे विषय हाताळणारे एक सभासद बसले होते. त्यांच्याशीं बुद्धि व श्रम यांना समाजाकडून जें भिन्न भिन्न पारिश्रमिक मिळतें त्याबाबत बोलणें झालें. "ख्रुश्चेव्हने याबाबत असें म्हटलें होतें की, सोव्हियट युनियनमध्ये मागील तीस वर्षांत सतत प्रयत्न करून सुद्धा बुद्धीचें श्रम करणारे व शरीरश्रम करणारे यांच्यांतील खाई शालेय शिक्षणक्रम बुजवूं शकला नाही. तुमच्या लक्षांत हें आलें असेलच व याबाबत तुम्ही कांही सुधारणा करीत आहांत काय ?" असा माझा प्रश्न होता. याचें उत्तर मिळण्यापूर्वीच आमची ताटातूट झाली.

लंचनंतर सकाळच्या युनिव्हर्सिटींत आम्ही पुन्हा गेलों व तेथे चाललेल्या सेमिनारमध्ये भाग घेणाऱ्या विद्यार्थ्यांशीं चर्चा केली. रात्रौ श्री व्यास यांच्या बरोबर येथील एक प्रोफेसर श्री बिचानिच यांना भेटलों. 'रामाय स्वस्ति, रावणाय स्वस्ति' अशा प्रकारचें त्यांचें बोलणें होतें. गृहस्थ फार विनोदी. परंतु त्याला नक्की काय सांगावयाचें होतें हें समजणें फार कठिण गेलें.

* * *

## शनिवार ता. २३-५-५९

आज सकाळीं एक सेंट्रल कोऑपरेटिव्ह युनियन, एक जनरल कोऑपरेटिव्ह सोसायटी व एक कॉम्यून हे पाहावयाला आम्ही निघालों. जनरल को-ऑपरेटिव्ह युनियनमध्ये अचानक १५-२० शेतकरी भेटले. त्यांनी कांही डुकरें विकलीं होतीं. त्यांचे पैसे घेण्याकरिता ते आले होते. आम्हांला जनरल कोऑपरेटिव्हज् आवडतात व त्यांच्यापासून आम्हांला फायदा आहे असें त्यांनी

सांगितलें. हिंदुस्थानांत शेतकऱ्यांची परिस्थिति कशी आहे, तिथे पिकें कोणतीं होतात वगैरेंबाबत त्यांनी आमच्याकडून माहिती मिळविली.

आज रात्रीं कालच्या प्रोफेसरकडे आम्हीं जेवण केलें. जेवणानंतर कांही बोलणें झालें. पण त्याचें स्वरूप कालच्यासारखेंच. दुसरें दिवशीं मीं आमच्या एका मित्राशीं याबाबत चर्चा केली व अशी सूचनाहि केली की, पुन्हा एकदा त्याच्याकडे जाऊन केवळ त्याला प्रश्न विचारून त्याचें नक्की काय म्हणणें आहे तेवढें जाणून घ्यावें. पण तोहि म्हणाला की, त्याचा विशेष उपयोग व्हावयाचा नाही व कदाचित् त्याच्या प्रोफेसर मित्राला त्यामुळे वाईट वाटण्याचाच जास्त संभव आहे. त्यामुळे हा विचार सोडून देण्यांत आला.

आज सायंकाळीं युगोस्लावियाने प्रगति किती केली आहे याचें दिग्दर्शन कांही डॉक्युमेंटरीजमधून पाहण्याचा योग आला. हिंदुस्थानांतल्या डॉक्युमेंटरीज्मध्ये व इथे दाखविण्यांत आलेल्या डॉक्युमेंटरीज्मध्ये कांही फरक निदर्शनास आला. येथील डॉक्युमेंटरीज बऱ्याच लांब वाटल्या. केवळ सृष्टिसौंदर्य किंवा सांस्कृतिक माहिती यासंबंधी त्या नव्हत्या. त्यांचा आम्हीं आपल्या देशाकरिता काय केलें हें दाखविण्याचा उद्देश होता. हायड्रोइलेक्ट्रिक वर्क्स्, लोखंड व पोलादाचे कारखाने, झाग्रेबची वर्ल्ड फेअर, ठिकठिकाणचे मोठे कारखाने, लहान मुलांकरिता केलेल्या सोयी ह्या सर्व विषयांवर डॉक्युमेंटरीज होत्या. याशिवाय शेतीचें उत्पादन वाढविण्याबाबत कांही डॉक्युमेंटरीज होत्या परंतु ऐन वेळेवर कांही यांत्रिक अडचण निर्माण झाली व त्या आम्ही पाहूं शकलों नाहीं.

डॉक्युमेंटरीज ह्या जरी प्रचारकी थाटाच्या मानल्या तरी युगोस्लावियाने केलेल्या प्रगतीची कल्पना त्यावरून येतेच. विशेषतः ३,०००,०००,००० किलोवाट वीज आम्ही वापरत आहों असें आम्हांला सांगण्यांत आलें. पाकिस्तान, आर्जेंटाइन व पोर्टोरिको इत्यादि देशांत हायड्रोइलेक्ट्रिक मशीनरी आमच्या येथून जाते असें त्यांनी अभिमानाने आम्हांला सांगितलें. औद्योगिक राष्ट्रांत हिंदुस्थानचा जरी आठवा नंबर असला तरी, दर माणशीं औद्योगिक प्रगतीचें प्रमाण काय यावरूनच देशाने केलेल्या खऱ्या प्रगतीचा अंदाज येऊं शकतो. त्या दृष्टीने तुलना केल्यास युगोस्लाविया किती पुढे आहे व हिंदुस्थान किती मागासलेला आहे याची कल्पना येते. जवळजवळ प्रत्येक गावांत इथे इलेक्ट्रिसिटी आहे. जपानचीहि तीच स्थिति आहे. येथच्या व जपानच्या परिस्थितींत बरेंच साम्य दिसतें. सृष्टिसौंदर्य व खेड्यांतील लोकांची परिस्थिति यावरूनहि तसाच भास होतो.

* * *

## रविवार ता. २४–५–५९

ठरल्याप्रमाणे आज आमचा सुटीचा दिवस. म्हणून प्लिव्हिटसे ही रमणीय जागा पाहावयाला आम्ही गेलों. समुद्रकिनाऱ्यापासून अदमासे २० ते २५ मैल अंतरावर एक दरी आहे. तींतून एक नदी वाहते. दरींतून वाहतांना २-३ मैलांच्या अंतरांत त्या नदीला लहान मोठे १५-२० धबधबे निसर्गतःच पडलेले आहेत. आणि जिथे पाणी साचतें तिथे मोठालीं तळीं झालेलीं आहेत. मोठालीं तळीं आहेत त्यांच्यावर नौकाविहाराची सोय केलेली आहे. दरीवर व भोवतालच्या प्रदेशांत वनश्री चांगली आहे. ती वाढविण्याकरिता विशेषच प्रयत्न करण्यांत आले आहेत. कुठेहि विस्तव पेटवायचा नाही, कुठेहि निवाऱ्याची जागा पाहून उतरावयाचें नाही, असा नियम आहे. या दोन्ही कामांकरिता कांही विशिष्ट जागा कायम केल्या आहेत. तिथेच उतरलें पाहिजे असा नियम आहे. यांना कँपिंग ग्राउंड्स् म्हणतात. एका मोक्याच्या जागीं एक फार मोठें हॉटेल बांधण्यांत आलें आहे. राहण्याची व जेवण्याची तिथे चांगली सोय आहे.

करमणुकीचें स्थान म्हणून येथे रविवारी अथवा सुट्टीच्या दिवसांत विद्यार्थी, प्रेमी जोडपीं, बघे वगैरे करमणुकीकरिता येतात. आपल्याबरोबर खाण्यापिण्याचे पदार्थ घेऊन येणारेहि पुष्कळ असतात. कांही जरूर वाटलीच तर तेवढी वस्तु हॉटेलांतून घेतात. आम्ही रविवारीं गेलों व दिवसहि चांगला होता. सकाळीं उन खूप पडलें होतें. त्यामुळे बरीच गर्दी होती. आम्ही फिरलों, नावेंत बसलों, हॉटेलांत जेवलों. झाग्रेब-पासून १०० मैलांवर हें स्थान असल्यामुळे वाटेंत खेड्यांची स्थिति, पिकांची परिस्थिति व भोवतालचें सृष्टिसौंदर्य पाहण्याची संधि मिळाली. लोक गरीब, मेहनती पण आनंदी दिसले. सायंकाळच्या वेळीं रस्त्यांतून गायींचे कळप घरीं येत होते. ठिकठिकाणीं, खेड्यांतील माणसें व स्त्रिया गुरें चारीत होत्या. घरापुढील बागेंत पुष्कळ लोक जमीन तयार करीत होते. त्यांत स्त्रियाहि होत्या. अमुक काम स्त्रियांनी व अमुक काम पुरुषांनी करावें असा कांही येथे भेद दिसला नाही.

* * *

**सोमवार ता. २५–५–५९**

आज सकाळीं येथील म्युझियम्स आम्हीं पाहिले. प्रथम कॉम्युनिस्ट पार्टीच्या चाळीस वर्षांच्या इतिहासाचें प्रदर्शन पाहिलें. आज जे लोक अधिकारांवर आहेत त्यांनी मागील चाळीस वर्षांत किती आपत्त्या सोसल्या आहेत याची कल्पना हें प्रदर्शन पाहून येते. एका पाठीमागून एक असें कॉम्युनिस्ट पार्टीचे सेक्रेटरी झाग्रेबला मारले गेले. पोलिसांविरुद्ध त्यांची लढाई सारखी सुरूच राहायची. बेकायदेशीर कारवाया करणें, वर्तमानपत्रें चालविणें, स्ट्राइक घडवून आणणें, मजुरांची संघटना करणें हें त्यांचें काम चालूंच होतें. आज जे लोक अधिकारावर आहेत त्यांना मागच्या लढाईंत तर लपतछपत दिवस काढावे लागले. तरी जर्मन आक्रमणाविरुद्ध त्यांचें मुख्य युद्ध जारीच होतें. असे लोक आज अधिकारांत आहेत याचें आश्चर्य नाही. आमच्या देशांतहि अशाच पुण्याईच्या भरवशावर 'आज काँग्रेस अधिकारावर आहे. फरक इतकाच की येथील लोकांकडून कौल मागण्याची पद्धति निराळी व आमच्या देशांतील पद्धति निराळी.

आज मार्शल टिटोंचा वाढदिवस. त्यांच्या वयाला ६० वर्षें पूर्ण झालीं. आम्हीं त्यांना त्याबाबत तार केली. ती तार वर्तमानपत्रांतून छापून आली होती.

दुपारीं बारा वाजतां येथील इन्स्टिटयूट ऑफ लोकल सेल्फ गव्हर्नमेंट यांत जाऊन तेथील डायरेक्टरची आम्हीं भेट घेतली. डॉ. पुसीच नांवाचे एक प्रोफेसर सुद्धा तेथे आले व त्यांनी येथील निवडणुकांबाबत आम्हांला अत्यंत महत्त्वाची माहिती दिली. आतापर्यंत आम्हांला ही माहिती कुणींहि दिली नव्हती. फेडरेशनच्या निवडणूकी कशा होतात., व्होटर्स मीटिंग्ज उमेदवारांचीं नांवें कशीं सुचवितात, त्यानंतर डिस्ट्रिक्ट डेलेगेट्स् काय करतात, अशा पद्धतीची जरूरी कां आहे, प्रत्यक्ष निवडणुका किती प्रमाणांत होतात इत्यादि आमचे प्रश्न होते. व त्याला त्यांनी समाधानकारक उत्तरें दिलीं. याशिवाय याबाबत आणखी माहिती कुठे मिळेल तेहि पत्ते दिले. त्यांना पुन्हा रात्रौ भेटावयाचें आम्हीं ठरविलें होतें पण ते येऊं शकले नाहीत.

दुपारचा वेळ आज रिकामा गेला. आम्ही ल्युब्ल्यानाला उद्या सकाळपर्यंत जाऊं शकत नव्हतों. तेथे हॉटेल २६ तारखेपासून रिझर्व केलें होतें. म्हणून आज झाग्रेबवरून आम्हांला निघणें शक्य झालें नाही. दुपारीं फिरणें व रात्रीं लौकर झोप.

* * *

**मंगळवार ता. २६–५–५९**

आज सकाळीं मोटारने आम्ही झाग्रेबवरून ल्युब्ल्यानाकडे निघालों. ही सडक येथील तरुणांच्या संघटनेने बांधली आहे. मागच्या वर्षीच ती पूर्ण झाली. सडक पहाडी प्रदेशांतून जात असल्यामुळे वळणें बरींच होतीं. वाटेंत एका शेतकऱ्याच्या घरीं त्याची परिस्थिति पाहण्याकरिता आम्ही उतरलों. घर प्रशस्त व दुमजली होतें. घरधनी वारला होता. त्याची विधवा बायको व तिचीं दहा मलें (६ मुली व चार मुलें) घरांत होतीं. एका मुलीचें लग्न झालें होतें. ती व तिचा नवरा त्याच घरांत एक स्वतंत्र घर करून राहत होते. विधवेने आपला नातू आणून आम्हांला दाखविला. मनुष्याची प्रवृत्ति येथून तेथून सारखीच. या घरांत आम्हीं अचानक प्रवेश केला तेव्हा ती विधवा बाई म्हणाली, "माझें घर अव्यवस्थित आहे, पण तुम्ही आंत येऊं शकतां." स्लोव्हिनिया हें आर्थिक विकासाच्या दृष्टीने सर्वांत पुढे आलेलें रिपब्लिक. पण त्यांत हा दक्षिणेकडील भाग सर्वांत मागासलेला. त्या भागांत हें कुटुंब राहत होतें.

स्लोविनियाच्या मानानें हें कुटुंब बरेंच मोठें होतें. त्या बाईजवळ ४।। हेक्टर जमीन होती. नवरा गवंड्याचें काम करीत असे व बाई नवऱ्याच्या मदतीने घरची शेती करीत असे. नवरा वारल्यावर तिला शेतीच्या कामांत अडचण भासत आहे. तिचा मोठा मुलगा सुताराचें काम करतो. तो १८ वर्षांचा आहे. याच घरांत तो राहतो. या बाईला सरकारला टॅक्सच्या रूपाने वर्षाला ३०,००० दिनार द्यावे लागतात. ती म्हणाली, "माझ्या जरूरीपुरतेंच धान्य मला होतें. वाईट हंगाम आला तर धान्य विकतहि घ्यावें लागतें. भाज्यांची सुद्धा तीच गत. माझें कुटुंब मोठें असल्यामुळे आमच्या आम्हांलाच त्या पुरतात. मी दूध व दारू विकतें व हींच माझी पैसा मिळविण्याचीं साधनें आहेत." तिच्या जवळ एक गाय, दोन घोडे व ४ डुकरें होतीं. कुटुंबाची राहणी चांगली वाटली. घरीं एक स्टोव्ह (कुकिंग रेंज) होता. त्यावर स्वयंपाक चालू होता. आमच्या देखत त्यांत त्या मुलीने काटक्या जाळण्याकरिता गोळा करून आणल्या होत्या. दोन मुलें शाळेंत जाणारीं होतीं. तीं तिसऱ्या व चौथ्या वर्गांत होतीं. घरांत रेडियो व इतर सामान होतें. निजण्याच्या खोलींत ४ बिछाने गाद्यांसहित व पांघरुणांसहित होते. याशिवाय आलमाऱ्या, स्टूल, खुर्च्या व इतर सामान त्या घरांत होतें. आपल्याकडील मध्यम वर्गीय घरासारखें हें घर होतें.

ल्युब्ल्यानाला हॉटेल स्लोनमध्ये आम्ही १२। वाजतां येऊन पोहोचलों. ह्या शहरांत पार्क्स बरेच आहेत. त्याची जाणीव शहरांत आल्याबरोबरच होते. दुपारीं आम्ही जेव्हा किल्ला पाहावयाला गेलों तेव्हा आमच्या बरोबर

असणाऱ्या गृहस्थाने आम्हाला आपल्या गावाची माहिती देतांना सांगितलें की, आमच्या शहरांत फ्रेंच व इंग्लिश या दोन्ही पद्धतीचे पार्क्स आहेत. यांतील फरक काय असा प्रश्न मीं विचारला. तेव्हा "फ्रेंच पार्क्समध्ये फुलें जास्त असतात, त्या बागा असतात. व इंग्लिश पार्क्समध्ये झाडे जास्त असतात. त्यांचें कांही अंशीं राखीव जंगलाचें स्वरूप असतें." असें त्याने सांगितलें.

हॉटेलांत येतांच आमचा कार्यक्रम ठरला. येथील मंडळींनी आम्हांला पुन्हा-पुन्हा बजावून सांगितलें की, तुम्हांला पाहिजे ती माहिती आम्ही देऊं व तुम्हांला जें पाहिजे तें आम्ही दाखवूं. तेव्हा निःशंकपणें तुम्ही आपल्या कार्यक्रमांत काय बदल करावयाचा तो सांगा. आम्हांला तुमच्या येथील शासनपद्धतीबद्दल माहिती पाहिजे असें सांगून त्या दृष्टीने आम्हीं कार्यक्रमांत कांही बदल सुचविला.

दुपारीं येथील किल्ला व मागच्या लढाईनंतर बनविलेलें स्मारक पाहावयाला आम्ही गेलों. येथील किल्ला इतिहासप्रसिद्ध आहे. शहराच्या मध्यभागीं एका लहानशा पहाडावर तो बांधला आहे. मागच्या लढाईत तुरूंग म्हणून याचा उपयोग करण्यात आला होता. कांही लोकांना तुरुंगांतच गोळी घालून मारण्यांत आलें व त्यांचीं नांवें इथे कोरून ठेवलीं आहेत. सध्या तुरुंगांत लोकांची वस्ती आहे. कारण गावांत राहण्याची जागा कमी. परंतु आणखी घरें बांधल्यावर आम्ही इथून ही वस्ती हलवूं असें आम्हांस सांगण्यांत आलें. सध्या एक हॉटेल किल्ल्यांत आहे व तिथे रात्रीं नाच वगैरे होत असतो.

मागील लढाईत जर्मनांनी हा भाग पादाक्रांत केल्यावर येथे दोन पक्ष तयार झाले. पूर्वींहि ते होतेच. परंतु जर्मनांच्या आक्रमणानंतर त्यांच्यांत जास्त तीव्रता निर्माण झाली. एक पक्ष सामाजिक व आर्थिक परिवर्तनाच्या विरुद्ध होता; किंवा हें परिवर्तन क्रमाक्रमाने व्हावें या मताचा होता. दुसरा मार्क्सिस्ट. पुँजीवादी समाजरचना बदलून तिच्या जागीं समाजवादी समाजरचना आणण्याची त्याची आकांक्षा. पहिल्या पक्षाला जर्मनांनी आपल्या हाताशीं धरलें. दुसरा पक्ष पार्टीझन लोकांना जाऊन मिळाला. अशीच परिस्थिति या लहान देशाच्या प्रत्येक रिपब्लिकमध्ये निर्माण झाली. क्रोयेशियांत उस्टाशीन पार्टीझन्स, सर्वियांत चेटनिक्स व पार्टीझन्स इत्यादि. आम्हांला तर असें सांगितलें गेलें की, या आपसांतील यादवींत, लढाईत जितके लोक मेले नसतील त्यापेक्षा कितीतरी जास्त लोक मारले गेले.

दुर्दैवाने पहिल्या पक्षाच्या मागे येथील कॅथॉलिक क्लर्जी व त्यांचा प्रमुख आर्चबिशप होता. सध्या तो अमेरिकेंत राहत आहे. कॅथॉलिक पंथाचें व मार्क्सिझमचें अगदी हाडवैर. तसें तर सर्व धर्माचें व मार्क्सिझमचें हाडवैर आहे. मार्क्स हा पूर्णपणें आधिभौतिकवादी. धर्म ही पुंजीवादी बाब, पुंजीवादी व

शोषणावर आधारलेल्या शासन-संस्थेला टिकवून ठेवणारी व त्याकरिता समाजाला गुंगी देणारी अफू आहे ही त्याची धर्माची व्याख्या. परंतु कॅथॉलिक पंथाचें व त्याचें विशेष हाडवैर. यामुळे पहिल्या पक्षाच्या लोकांनी केलेल्या संहाराला धर्माचें पाठवळ मिळालें. येथील एका चर्चमध्ये ५०–६० लोकांना मारण्यांत आलें. त्यांचे फोटो या चर्चमध्ये लावले आहेत. जवळजवळ अशीच परिस्थिति क्रोयेशियांत व सर्वियांत झाली. म्हणूनच धर्माचें व जुन्या सामाजिक व्यवस्थेचें पार्टीझन लोकांच्या विजयानंतर समूळ उच्चाटन होऊं शकलें.

सायंकाळीं येथील एका प्रोफेसरची आम्हीं भेट घेतली. त्याने सांगितलें, "हा भाग पहिल्या महायुद्धापूर्वी ऑस्ट्रियाच्या हाताखाली होता. हिंदुस्थानांत जशी इंग्रजी तशी येथील लोकांची जर्मन भाषा. पहिल्या चार वर्गांत स्लोव्हीनियन भाषा व नंतर जर्मन भाषा अशी शिक्षणपद्धति तेथे होती. अर्थात् ऑस्ट्रियाची सुद्धा भाषा जर्मनच. या लढाईनंतर युनिव्हर्सिटींत सुद्धा स्लोव्हिनियन भाषा सुरू आहे. मध्यंतरीं व १९१८ नंतर जेव्हा युगोस्लावियाच्या राजाचें राज्य होतें. तेव्हा सर्वियन लोकांचा इथे अधिकार होता. सर्वियन भाषा व सर्वियन राज्य. इथे दोन पक्ष होते. एक क्लेरिकल म्हणजे धार्मिक पक्ष व दुसरा लिबरल पक्ष. यांनाच उचलून धरून तो राजा राज्य करीत होता. कधी एका पक्षाला धरावयाचें तर कधी दुसऱ्या पक्षाला. आता परिस्थिति बदलली आहे. आता आम्हांला आमचें राज्य आलें असें वाटतें. अर्थात् अजूनहि असंतोष आहेच. आमचा भाग सर्वांत पुढे आलेला. आमच्या येथील लोकांची आमदनी सर्वांत जास्त. कारण आमचें उत्पादन जास्त. पण सर्वांना कमींत कमी पगार सारखेंच." "वर्कर्स कौंसिल्स-नंतर उत्पादन कसें वांटावयाचें हें कामगारच ठरवितात काय ?" असें मीं विचारल्यावर "तें खरें आहे पण फेडरेशनचे टॅक्स इत्यादि चुकविल्यावर वांटण्याकरिता फारच थोडें राहतें. तरीहि फार थोडे लोक सोडले तर बाकी सर्व या परिस्थितींत समाधान मानतात. कारण त्यांना प्रश्न पडेल की, आम्ही जर बाहेर स्वतंत्र झालों किंवा राहिलों तर आम्हीं तयार केलेला माल घेणार कोण ? आज युगोस्लावियाची बाजारपेठ तरी आमची ही गरज पुरविते, पण उद्या कसें ? म्हणून कांहीं थोडे लोक सोडले तर बाकी सर्व समाधान मानतात." असें सांगण्यांत आलें.

"असमाधानाची कारणें काय ?" असा मीं प्रश्न केला. "मुख्य कारण जास्त पैसा मिळविण्याची इच्छा" प्रोफेसर महोदयांनी हें स्पष्टपणें सांगितलें व पुढे ते म्हणाले, "विचारस्वातंत्र्य किंवा अचारस्वातंत्र्य नाही हें असंतोषाचें कारण नाही. पुष्कळांना ही कल्पना असतें की बाहेर गेलों तर आपल्याला मोटरगाडी घेतां येईल, निदान मोटर-सायकल तरी ठेवतां येईलच, या भावनेने लोक जातात व एक-दोन वर्षांनी पुन्हा परत येतात. असंतोषाचें दुसरें कारण म्हणजे येथील

राहण्याच्या घरांची कमतरता. पुष्कळशा घरांत एकच स्वयंपाकघर असतें. दोन कुटुंबांना पाळीपाळीने ते वापरावें लागतें. यांतून भांडणें झालीं नाहीत तरच आश्चर्य. याशिवाय येथे कपडंयाची किंमत जास्त आहे. पण त्याबरोबरच अन्नाच्या किंमती फार माफक आहेत. कदाचित् त्या वाजवीपेक्षा सुद्धा कमी असतील." उदाहरणा-दाखल प्रोफेसर महोदयांनी खालील माहिती दिली.

"पश्चिमेकडे इटालीची सरहद्द लागून आहे. व दोन्ही देशांच्या आपसांतील करारप्रमाणे २५ किलोमिटर मधील प्रदेशांत आयडेंटिटी कार्डस् (ओळखपत्रांच्या) च्या साहाय्याने येण्याजाण्याची व आपल्याबरोबर कांही वस्तु आणण्याची परवानगी आहे. आमचे लोक इटालींत जातात व कापड खरेदी करून आणतात. व इटालींतील लोक इकडे येऊन रेस्टॉरंटस्‌मधून जेवून जातात. तसेंच आस्ट्रियांत एका जेवणाला जितका खर्च येतो त्यांत तीनदा येथे जेवण होतें. म्हणून ऑस्ट्रियांतून बरेच प्रवासी येथे येतात." "खाण्यापिण्याचा जर खर्च कमी आहे तर कपडा कां महाग आहे?" असा प्रश्न मीं विचारला. त्याला प्रोफेसर साहेबांनी दोन तीन कारणें दिलीं. "एक तर कापूस बाहेरून आणावा लागतो म्हणून तो जास्त महाग पडतो. दुसरें आयात मालावर बऱ्याच जकाती आहेत. तिसरें, इतर देशांतील मशीनरी आधुनिक व नवीन असल्यामुळे उत्पादनाला त्या देशांत खर्च बराच कमी येतो." परंतु युगोस्लावियांतील बरेचसें यांत्रिकीकरण लढाईनंतरचें व उत्पादन आधुनिक यंत्राच्या साहाय्याने होत असूनहि इथे अन्न स्वस्त असल्यावर इतर वस्तु कां महाग असाव्या हें तितकेंसें नीट समजलें नाही. दुसरें, इटाली, ऑस्ट्रिया या देशांतहि खुल्या बाजाराचें तत्त्व आहे. मग तिथे इथल्यापेक्षा जर अन्न इतकें महाग आहे तर इथे जाणून बुजून अन्नाचे भाव कमी केलेले असावे व त्यामुळे येथील शेतकऱ्यांना उत्पादनाकरिता पुरेंसें आकर्षण मिळत नसावें. त्यानंतर या देशांत इतर सेक्टर्समधून ॲग्रिकल्चर सेक्टरला अप्रत्यक्ष मदत मिळते या विधानाचा अर्थच लागत नाही. (त्याचा अर्थ एवढाच की, कोऑपरे-टिव्हज्‌ला मदत मिळते) हे प्रश्न मी प्रोफेसर महोदयांना विचारले. "अमेरिका व कॅनडा यांत दर माणशीं उत्पादन जास्त आहे," ते म्हणाले "परंतु तें उत्पादन दर एकरीं नसून दर माणशीं आहे. व जास्त उत्पादन दर माणशीं असण्याचें कारण तेथील शेतीवरील कमी मनुष्यसंख्या व अफाट जमीन हें आहे. अशी परिस्थिति इथे येणें शक्य नाही व आलीच तर दुसऱ्या देशांचें शोषण केल्याशिवाय येणार नाही. परंतु आम्हांला आमची उत्पादनक्षमता (प्रॉडक्टिव्हिटी) वाढविली पाहिजे" यापेक्षा जास्त प्रकाश या प्रश्नावर मिळाला नाही.

* * *

बुधवार ता. २७–५–५९

आज सकाळीं येथील 'हाऊसिंग कॉम्युनिटीज' पाहावयाला गेलों. कॉम्यूनच्या खालची ही संस्था आहे. हिंदुस्थानांतील ग्रामराज्याच्या कल्पनेशीं ही जुळती आहे. आतापर्यंत कॉम्यूनच्या खाली कोणतीहि संस्था नाही अशी आमची समजूत होती. निदान तशी कोणतीहि संस्था आम्हीं पाहिली नव्हती. आज शहरामध्ये ही संस्था पाहण्याचा योग आला. ह्या संस्था जिथे नवीन घरें बांधलीं जात आहेत अशाच जागीं असतात असें नाही. कोणत्याहि ५–७ हजार वस्तीच्या गावांत त्या असूं शकतात. आम्हांला जें सांगितलें गेलें त्यावरून असें दिसतें की, शहरांत कॉम्यून्सच्या खाली सोशल सेल्फ गव्हर्नमेंटची जर कोणती संस्था असेल तर ती ही आहे.

खेड्यांत अशी एखादी संस्था असते काय, या माझ्या प्रश्नाला होकारार्थी उत्तर मिळालें. ह्या संस्थांना लोकल कमिटीज म्हणतात. प्रत्येक व्होटर्स-मीटिंगच्या विभागाकरिता असली एक कमिटी असते. तिच्यावर त्या विभागांतून निवडून आलेल्या कॉम्यूनच्या सभासदांशिवाय आणखी पांच लोक निवडलेले असतात. गावची सफाई, रस्ते-दुरुस्ती, पाण्याची सोय इत्यादि बाबी हिच्याकडे असतात. गावांत ज्या समाज-सेवेच्या संस्था चालतात, त्यांच्यावर हिची देखरेख असते व स्थानिक कर्मचारी या कमिटीच्या देखरेखीखाली काम करीत असतात. याशिवाय मोठ्या खेड्यांतून कॉम्यूनच्या कचेरीचाच एक भाग असतो. त्याला लोकल ऑफिस म्हणतात. अर्थात् ज्या गावीं लोकल ऑफिस असतें त्या गावीं लोकल कमिटी असतेच.

दुपारीं आम्ही येथील चेंबर ऑफ कॉमर्सला भेटलों. फेडरेशन, रिपब्लिक, डिस्ट्रिक्ट व कॉम्यून या सर्व ठिकाणीं असाच एक चेंबर असतो. खालच्या चेंबर-च्या प्रतिनिधींमार्फत वरचा चेंबर बनतो. चेंबरमध्ये केवळ व्यापाऱ्यांचेच प्रतिनिधि नसून उद्योगाचेहि प्रतिनिधि असतात. या चेंबर्सचा सल्ला त्या त्या क्षेत्राच्या सरकारला देण्यांत येतो. व तो ते बहुतेक मानतात. मालाच्या किमतीबाबत सुद्धा हे चेंबर्स सल्ला देतात. तुमच्या रिपब्लिकमध्ये शेतमालाच्या किमतींत व इतर मालांच्या किमतींत बरोबरी (Parity) आहे काय व या किमती कशा ठरविल्या जातात, या प्रश्नाला समाधानकारक उत्तर मिळालें नाही.

रात्रौ जेवणानंतर श्री विल्फान यांच्याशीं बोलणें झालें. हे गृहस्थ पूर्वी हिंदुस्थानांत अम्बॅसेडर होते. त्यानंतर बेलग्रेडला फेडरल सरकारामध्ये ते होते. आता हे येथील रिपब्लिकन एक्झिक्युटिव्ह कौंसिलचे व्हाइस प्रेसिडेंट आहेत. सुरवातीला शेतमालाच्या किमती इंडस्ट्रियल प्रॉडक्शन्स्च्या मानाने कमी आहेत काय असा प्रश्न मीं केल्यावर ते म्हणाले, "हें शक्य आहे. ही बाब तुम्हीं आमच्या

विकासाच्या ऐतिहासिक क्रमांतून पाहिली पाहिजे. पूर्वी आम्ही सोवियत पद्धतीचा अंगीकार केला होता. जास्त पुंजी साठवावी या इच्छेने ते शेतमालाच्या किमती कमी ठेवत असत व कंझ्युमर्स गुड्स्च्या किमती जास्त ठेवत असत. त्याचप्रमाणे आमचीहि पद्धत होती. आता आम्ही ती बदलवीत आहोंत. आता शेतमालाच्या किमती दिवसेंदिवस वाढत आहेत. नुकतेच आमच्या देशांत 'मीट' (मांस) बद्दल अल्प प्रमाणांत क्रायसेस निर्माण झाले आहेत. आम्हीं बरेंचसें मांस बाहेर पाठविल्या-मुळे त्याचे भाव वाढले आहेत. हें बरेंच झालें असें आम्ही समजतों. एवढें मात्र मी म्हणूं शकतों की, पूर्वीपेक्षा आमच्या शेतकऱ्यांची परिस्थिति बरी आहे." पुढे त्यांनी त्यांच्या एका बॉय आर्डरलीची हकीकत सांगितली. पूर्वी हा त्यांच्याजवळ नोकर होता. त्याच्याजवळ १० हेक्टर जमीन आहे. तो शेतावर गेला व कांही दिवसांनी शेती परवडत नाही म्हणून परत आला. पण शेतीवर आता तो मजेंत आहे. इत्यादि. यावरून शेतकऱ्याची परिस्थिति पूर्वीपेक्षा चांगली आहे, एवढेंच त्यांना दाखवावयाचें होतें.

त्यानंतर 'सरकार ही संस्था कधी नाहीशी होईल काय? झाल्यास जी संस्था तिच्या जागीं येईल तिचें स्वरूप काय? पक्ष (पार्टी) सरकारच्यापूर्वी जाईल की नंतर? व पक्ष गेल्यावर कोणती तरी संस्था त्याची जागा घेईल काय?' असे प्रश्न मीं विचारले. सुरवात ह्या प्रश्नानेच झाली की, या तुमच्या पद्धतींतून शेवट कोणता होईल? काय तुम्ही पाश्चात्य पद्धतीची मल्टीपार्टी-डेमॉक्रसी आणाल की शेवटपर्यंत, म्हणजे सरकार नाहीसें होईपर्यंत, एकच पक्ष राहील व तो जर तसा राहील तर सर्व समाजाला एकाच पक्षामार्फत आपलें रिप्रेझेंटेशन करावें लागेल. अशा परिस्थितींत अेक तर पक्ष डीजनरेट होईल व त्याचा अनियंत्रितपणा वाढेल ही भीति नाही काय? यावर ते म्हणाले," आम्हांला असें वाटतें की, हळूहळू सरकार व पक्ष दोन्हीचें कार्य कमी होईल. सरकारचें कार्य दोन तऱ्हेचें असतें. एक हिंसात्मक शासनाचें व दुसरें व्यवस्थेचें. पहिलें काम कमी कमी होऊन शेवटी संपेल व दुसरें राहील. ज्या प्रमाणांत हें होईल त्या प्रमाणांत पार्टीचेंहि कार्य राहणार नाही. व या परिस्थितीकडे जाण्याकरिता आम्ही सरकारचें काम इतर संस्थांना देत आहों, विकेंद्रीकरण करीत आहों." त्यावर मीं म्हटलें, "हें सर्व एकाच पक्षाच्या संदर्भात होत आहे, त्याचें काय?" तेव्हा ते म्हणाले, "ही बाब तुम्ही आमच्या इतिहासाच्या क्रमांतून पाहा. प्रथम कॉम्युनिस्ट पक्ष होता, मग पार्टीझन्स आले, सुरवातीला आम्हीं सोवियट सरकारप्रमाणे केंद्रित नियंत्रणाच्या पद्धतीचा अंगीकार केला. नंतर आम्हीं त्यांत बदल केला. हा आमचा क्रम आहे." मीं म्हटलें, "तुम्ही बदल करीत नाही असें माझें म्हणणें नाही. किंवा तुमच्या पाठीमागे या देशांतील पुष्कळसे लोक नाहीत व त्यांना तुम्हीं चांगले

दिवस आणले नाहीत असें मला म्हणावयाचें नाही. पण हाच नेमका दावा चीनच्या लोकांनीहि केला आहे. त्या पक्षानें लोकांचें भलें केलें आहे यांत शंकाच नाही. पण मग त्यांच्या या वृत्तींत व तुमच्या वृत्तींत फरक काय? एकाच पक्षाचा आग्रह तेहि ठेवतात व तुम्हीहि ठेवतां." त्यावर ते म्हणाले, "आमच्या इथे कितीतरी स्वातंत्र्य आहे. आम्ही आपसांत किती भांडतों याची तुम्हांला कल्पना नाही." "परंतु हें भांडण पक्षांतर्गत आहे" असें मी म्हणालों. तेव्हा ते म्हणाले, "तुम्ही असें म्हणा वाटल्यास की, आमच्याहि येथे डिक्टेटरशिप आहे. म्हणजे एकाच पक्षाच्या अंतर्गत आम्ही काम करतों. या बाबतींत आमच्यांत व सोव्हियट युनियनमध्ये जो पक्ष राहील तो समाजवादी किंवा युगोस्लावियाचा पक्ष आहे असें आम्ही मानत नाहीं."

मग ते म्हणाले "व्यक्ति व समाज यांचे संबंध कसे असावे याबाबत तुमचें कांही मत आहे काय? हिंदुस्थानांत या विषयावर कांही चिंतन व आचरण झालें आहे काय?" तेव्हा मीं त्यांना ग्रामदानाचा इतिहास सांगितला. ग्रामदानी गावांत एकमताने कामें होतात व अपक्ष राज्य आणि सर्व पक्षांचें राज्य–पार्टीलेस गव्हर्नमेंट व ऑल पार्टी गव्हर्नमेंट––या दोन कल्पना त्यांच्यापुढे मांडल्या. उदाहरणार्थ, विलायतेंत लढाईच्या वेळेला सर्व पक्ष एकत्र येऊन काम करीत होते. जरी ते सुरवातीला भिन्न होते, तरी भिन्नत्व कायम ठेवून एकत्र आले होते. त्याच-प्रमाणे सर्व पक्ष एकत्र येऊन सर्व पक्षांचें सरकार स्थापन व्हावें अशी सर्वोदयवाद्यांची कल्पना आहे व त्याची सुरवात ग्रामराज्यांत होते. असें मीं स्पष्टीकरण केलें. त्यांत मात्र सर्वानुमतीचा आग्रह असतो. आज हा प्रयोग ग्रामदानी गावांत सुरू आहे व ही कल्पना अव्यवहार्य आहे असें आज तरी वाटत नाही हेंहि मीं त्यांना सांगितलें.

त्यावर श्री विल्फ्रान म्हणाले, "मग तुम्ही असें समजा की, आमची नीति सर्व पक्षांतून पक्ष-विलीनीकरणाकडे जाण्याची आहे. सर्व पक्षांच्या राज्याची कल्पना मीं आजच तुमच्याकडून ऐकली. त्यावर मी विचार करीन."

प्रश्न असा येतो की जर Common consent जाणण्याची वृत्ति निर्माण झाली तर पक्षाची जरूरी आहे काय? पक्षाची उत्पत्ति कां होते? मनुष्याच्या अहंकारांतून त्याची निर्मिति आहे की मानवाच्या सर्वांगीण विकासाकरिता त्याची जरूरी आहे? त्याशिवाय पूर्ण स्वातंत्र्याचा अनुभव येऊंच शकत नाही काय? स्वातंत्र्य म्हणजे काय? केवळ आपलें मत प्रदर्शित करून स्वातंत्र्याचा भाग पुरा होतो की, तें सफल करण्याकरिता पक्षाची जरूरी आहे? म्हणजे सत्याला आपला आग्रह करूं द्या, त्याकरिता सत्याग्रह करण्याची जरूरी नाही, ही वृत्ति ठेवावी किंवा यापेक्षा जास्त आग्रही वृत्ति ठेवावी व आपल्या म्हणण्याप्रमाणे चालणारे

व वागणारे लोक मिळवावे, हा खरा प्रश्न दिसतो. पहिल्याला इथे वाव आहे दुसऱ्याला नाही. एरवी जिलास प्रकरण कदाचित् झालेंच नसतें.

त्यानंतर आम्ही एका सुती, रेशमी व उनीं मालाचा ठोक व्यवहार करणाऱ्या संस्थेंत गेलों. युगोस्लावियांतून ठिकठिकाणांहून ठोक भावांत माल खरेदी करून या संस्थेमार्फत तो चिल्लर दुकानदारांना विकला जात असे. एकट्या स्लोविनियांत असल्या १२० संस्था आहेत असें सांगण्यांत आलें. तुमच्या संस्थेची जरूरी काय, या प्रश्नाला 'नाही तर चिल्लर दुकानदारांना महाग भावांत कापड घ्यावें लागेल' असें अुत्तर मिळालें. तुमच्या संस्थेंत एकंदर नफा किती होतो, असें विचारलें असतां निरनिराळ्या मालांवर शेंकडा ½ टक्का ते ३ टक्के नफा होतो असें उत्तर मिळालें. संस्था बरीच मोठी होती. एकंदर १०२ माणसें या संस्थेंत काम करीत होतीं. वर्कर्स मॅनेजमेंटची पद्धत येथेहि लागू आहे. आमच्यापैकी कांही जणांना असें वाटलें की, समाजवादी रचनेंत असल्या संस्थांना स्थान नाहीं. परंतु एक निश्चित सेवा (Function) ही संस्था करीत आहे. त्याबद्दल योग्य मोबदला तिने कां घेऊं नये? यानंतर येथील असेंब्ली सुरू होती तिचें काम पाहावयाला आम्ही गेलों.

असेंब्लीची इमारत फारच सुंदर वाटली. समोरच्या भागाला अगदी आधुनिक पद्धतीच्या स्त्रीपुरुषांचें पुतळे इमारतीवरच लावले होते. आंतील भागांत भिंतींवर स्लोविनियाच्या इतिहासांतील प्रमुख घटनांचीं चित्रें काढलीं होतीं. असेंब्लीचें दालन चौरस होतें. समोर एक उंच स्टेजसारखी जागा होती. तिथे अध्यक्ष बसलें होते. त्यांच्या शेजारीं त्यांना लागूनच असेंब्लीचे सेक्रेटरी बसले होते. स्टेजच्या खाली मध्यांत वक्त्याकरता जागा होती. वक्त्याला आपल्या जागेवरून बोलण्याची सोय नाही. पण ही पद्धति बरी वाटली. कारण जागेवरून बोलण्यांत मागच्या लोकांना वक्त्याची पाठच दिसते. या पद्धतींत वक्ता सर्वांच्या नजरेसमोर येत असतो.

आम्ही गेलों तेव्हा स्लोविनियाचे चीफ जस्टीस आपला रिपोर्ट वाचत होते. ते असेंब्लीचे सभासद नव्हते. परंतु असेंब्लीच्या आग्रहास्तव वर्षाचा ज्युडिशियल रिपोर्ट ते वाचत होते.

* * *

**गुरुवार ता. २८–५–५९**

आज सकाळीं आम्हीं वर्कर्स युनिव्हर्सिटी पाहावयाला गेलों. झाग्रेबला जशी युनिव्हर्सिटी होती तशीच ही होती. परंतु आता या गावीं आणखी एक पीपल्स युनिव्हर्सिटी स्थापन झाल्यामुळे आता या युनिव्हर्सिटीचें असावें तेवढें महत्त्व राहिलें नाही. त्यामुळे आता या युनिव्हर्सिटीचें प्रत्यक्ष काम कोणतें याचें चांगलें स्पष्टीकरण युनिव्हर्सिटीचे चालक करूं शकले नाहीत. पीपल्स युनिव्हर्सिटी व वर्कर्स युनिव्हर्सिटी यांतील मुख्य फरक म्हणजे पीपल्स युनिव्हर्सिटी ही खेड्यांतील लोकांकरिता व वर्कर्स युनिव्हर्सिटी ही शहरांतील लोकांकरिता. शेतकऱ्यांना शेतीच्या कामामुळे फुरसतीची वेळ 'नेहमीच हंगामानंतर सापडणार. आपल्याकडे उन्हाळ्यांतच शेतकऱ्याला वेळ असतो. पण तेव्हाच शाळा-कॉलेजें नेमकीं बंद असतात. त्यामुळे शेतकऱ्याला उच्च शिक्षणाची गोडी असून सुद्धा कांहीच करतां येत नाही. पीपल्स युनिव्हर्सिटीमुळे ही अडचण दूर होऊं शकते. याशिवाय शहरांत काम शोधण्याकरिता म्हणून जे लोक खेड्यांतून येतात, त्यांची शिक्षणाची सोय सुद्धा या युनिव्हर्सिटींत होऊं शकते. शहरांत जे स्थायी आहेत त्यांची तर सोय होऊंच शकते.

वर्कर्स युनिव्हर्सिटींतून आम्ही पीपल्स युनिव्हर्सिटींत गेलों. स्लोविनियाच्या प्रत्येक जिल्ह्यांत अशी एक युनिव्हर्सिटी आहे असें आम्हांस सांगण्यांत आलें. ही पीपल्स युनिव्हर्सिटी येथील वर्कर्स युनिव्हर्सिटीपेक्षा बरीच मोठी वाटली. वर्कर्स युनिव्हर्सिटीचीं इतर कामें म्हणजे वर्कर्स कौंसिलच्या सभासदांना प्रशिक्षण देणें इत्यादि सुद्धा ही करीत होती. स्लोविनियांत वर्कर्स युनिव्हर्सिटी व पीपल्स युनिव्हर्सिटी या दोन्ही संस्था एकच झाल्या आहेत असें पीपल्स युनिव्हर्सिटीच्या चालकांनी सांगितलें.

दुपारीं आम्हांला कांही विशेष काम नव्हतें. कसलाहि कार्यक्रम नसल्यामुळे मी आमच्या दौऱ्याचा निष्कर्ष लिहून काढण्यास सुरवात केली. या लेखावर सर्वांची संमति मिळवून त्या धर्तीवर रिपोर्ट लिहितां येईल अशी माझी कल्पना होती. दुपारचा सर्व वेळ त्यांतच गेला.

* * *

**शुक्रवार ता. २९–५–५९**

आज आम्हांला क्रांजला जावयाचें होतें. स्लोविनियांत एकंदर आठ जिल्हे आहेत. त्यांपैकी क्रांज हा एक जिल्हा. स्लोविनियाच्या वायव्येकडे हा जिल्हा आहे. ल्युब्लियानावरून त्याचें अंतर ३५–४० मैल असावें. क्रांज हा ल्युब्लियानाचा सर्वांत जास्त औद्योगीकरण झालेला जिल्हा. उद्योगांत असलेल्या लोकांचें येथील प्रमाण शेकडा ८० आहे. शेकडा २० च लोक शेतीवर आहेत. शेतीवर असणाऱ्या कुटुंबांत सुद्धा घरचा एक मनुष्य शेतीवर व बाकीचे उद्योगांत अशी येथील परिस्थिति आहे. त्यामुळे घरीं बरीचशी कमाई होते. त्याचा परिणाम असा होतो की धड शेतीहि होत नाही व धड उद्योगहि होत नाही. अशा कुटुंबांचें शेतीचें उत्पन्नहि कमी व उद्योगावरहि लक्ष कमी. औद्योगीकरणाच्या कांही दुष्परिणामांपैकी हाहि एक दुष्परिणाम समजावयाचा. तरीपण स्लोविनियांतील शेतीचें उत्पन्न इतर रिपब्लिक्सच्या मानानें जास्तच आहे. तें याहून जास्त होणें शक्य आहे. पण शेतकऱ्यांचें असावें तसें लक्ष कांही शेतीकडे दिसत नाही.

क्रांजला आम्हांला श्री हॅफ्नर नांवाची व्यक्ति भेटली. हॅफ्नर हे सध्या डिस्ट्रिक्ट पीपल्स कमिटीचे अध्यक्ष आहेत. नंतर समजलें की, यापूर्वी स्लोविनिया-मध्ये कायद्याच्या सेक्रेटरीच्या जागीं त्यांची नेमणूक झाली होती. कॉम्यून व जिल्हा यांचे संबंध कसे असतात, याबाबत त्यांना जास्त अनुभव आहे. म्हणून लंच-पूर्वी व लंचनंतर ह्याच गृहस्थाची भेट आमच्या प्रोग्रामप्रमाणे ठरली होती. त्या-प्रमाणे त्यांनी आम्हांला खालील माहिती दिली.

"स्लोविनियांतील ८ जिल्ह्यांपैकी क्रांज हा सर्वांत लहान जिल्हा. जिल्ह्याची एकंदर जनसंख्या १,३४,०००. क्रांज जिल्ह्यांत एकंदर ९ कॉम्यून्स आहेत. कॉम्यून्स-ची साधारण जनसंख्या १४,००० आहे. त्यांत सर्वांत मोठा कॉम्यून क्रांज. याची जनसंख्या ४६,०० व सर्वांत लहान कॉम्यून शिरी ह्याची ३६००. जरी कॉम्यून लहानमोठे असले तरी त्याचे अधिकार सारखेच असतात. जिल्ह्यांत एकंदर शेकडा १९ लोकच शेतीवर आहेत. क्रांजच्या कॉम्यूनमध्ये हें प्रमाण शेकडा २१ आहे. जिल्ह्यांत एकंदर कामगारांची संख्या ४२,००० कामगार त्यांनाच म्हणावयाचें ज्यांना कुणीतरी 'रोजी' देतो व ज्यांचें सोशल इन्शुरन्स झालेलें आहे. एकंदर शेकडा ८५ जनसंख्या इन्शुअर्ड् झालेली आहे. ह्या विभागाची झपाट्याने प्रगति होण्याला दोन कारणें आहेत. एक तर लहानलहान उद्योगांची संख्या जास्त व दुसरें म्हणजे या विभागांत एक जुनी कॉम्यून्सची परंपरा चालू आहे. जिल्ह्याचें जर एखादें मोठें शहर असलें व त्या शहरांतच एक कॉम्यून असलें तर इतर कॉम्यून्सचा व जिल्ह्याच्या मुख्य ठिकाणीं असलेल्या कॉम्यूनचा परस्पर संबंध थोडा निराळा

असतो. परंतु क्रांजचें तसें नाही. आम्हांला क्रांजकडे जास्त लक्ष देतां येत नाही. सर्व कॉम्यून्सना एकत्र आणणारें याच भूमिकेवर क्रांज हें शहर आहे.

"आमच्या शासनांत कॉम्यूनपेक्षा जिल्ह्याचें महत्त्व कमी व जिल्ह्यापेक्षा रिपब्लिकचें महत्त्व कमी. कारण सर्वांत जास्त कामें कॉम्यून्सच्या वांट्याला, येतात. असें जरी असलें तरी तीन गोष्टी फेडरेशनच्या हातांत असल्यामुळे राष्ट्राची एकी फेडरेशनला ठेवतां येते. त्या तीन गोष्टी अशा—(१) सामाजिक योजना (सोशल प्लॅन) बनविणें, (२) कायदे करणें व (३) राष्ट्रीय उत्पन्नाचें वांटप करणें. रिपब्लिक व जिल्हे हे कॉम्यून्सना राष्ट्रीय उत्पन्न पोहचविण्याचे मार्ग आहेत. शेवटी सर्व बाबी कॉम्यून्समध्येच झाल्या पाहिजेत. एकंदर शेकडा ८० बाबी कॉम्यून्समध्ये होतात व शेकडा २० जिल्ह्याच्या व रिपब्लिकच्या वांट्याला येतात.

"कोणतीहि इन्व्हेस्टमेंट करण्यापूर्वी त्याकरिता एक टेक्निकल कमिटी जिल्ह्याकरिता असते, तिची मंजुरी घ्यावी लागते. पण ती मंजुरी मिळाल्यावर, जर केवळ कॉम्यूनच्या पैशानें इन्व्हेस्टमेंट व्हायची असेल तर ती करण्याचा पूर्ण अधिकार कॉम्यूनला आहे. पण त्यांत जर जिल्ह्याचा कांही पैसा असेल तर मग जिल्ह्याचीहि संमति तिला घ्यावी लागते. कॉम्यूनच्या हद्दांत कुणालाहि कांहीहि बांधण्याकरिता कॉम्यूनची परवानगी घ्यावी लागते. कांही महिन्यांपूर्वीचीच गोष्ट आहे, आमच्या फौजेच्या खात्याला कांही गॅरेजेस बांधावयाचे होते. त्यांनी एक जागा पसंत केली व कॉम्यूनला न विचारतांच बांधकाम सुरू केलें. पण कॉम्यूनने तक्रार केल्यावर तें काम बंद करण्यांत आलें.

"समाज-कल्याणाच्या बाबतींत कॉम्यून हा पूर्णपणें स्वतंत्र आहे. फक्त अपंगांच्या बाबतींत व सोशल इंशुरन्सच्या बाबतींतच जिल्ह्याकडे कांही अधिकार आहेत. शरीरस्वास्थ्याच्या बाबतींत जिल्ह्याकडे फक्त एक मोठा दवाखाना आहे. बाकी सर्व संस्था कॉम्यून्सच्या स्वाधीन आहेत. शिक्षणाच्या बाबतींत जिल्ह्याकडे तांत्रिक शाळा व माध्यमिक शाळा आहेत. प्राथमिक शिक्षण, सर्व प्रकारचें प्रौढांचें शिक्षण व लहान प्रकारचें तांत्रिक शिक्षण हें सर्व कॉम्यून्सकडे आहे. कॉम्यून्समध्ये चालू असलेल्या सर्व एंटरप्रायजेसना कॉम्यून्सची संमति लागते. एंटरप्रायजेसच्या डायरेक्टरांची नेमणूक एका विशिष्ट प्रकारच्या पद्धतीनें होत असते व त्या नेमणुकीला कॉम्यून्सची संमति लागते. एंटरप्रायजेसच्या टॅरिफ स्केलला कॉम्यून मंजुरी देते.

"पोलिसखातें बहुधा जिल्ह्याकडे असतें. कॉम्यूनकडे जन्ममृत्यूचीनोंद, फायरब्रिगेड व स्थानिक वाहतूक असते. जर एखादें घर मोडकळीस आलें असलें व तें धोक्याचें वांटत असलें तर तें पाडण्याकरिता कॉम्यूनला पोलिस (पिपल्स मिलिशिया)

बोलावितां येतात. कॉम्यूनच्या कोणत्याहि हुकुमाची अंमलबजावणी पोलिसांना करावी लागते. कॉम्यूनला मॅजिस्ट्रेटची नेमणूक करतां येते व हा अधिकारी चिल्लर खटले चालवितो. अस्वच्छता करणें, वाहतुकीचे नियम मोडणें इत्यादि बाबींचे खटले ह्या मॅजिस्ट्रेटकडे असतात. तो ३०,००० दिनारांपर्यंत दंड करूं शकतो. वर वर्णन केलेल्या सदरांत पडणाऱ्या जवळजवळ शेकडा ७० बाबी कॉम्यून्सच्या मॅजिस्ट्रेटकडे येतात व केवळ ३० जिल्ह्याकडे जातात.

"कॉम्यूनच्या निर्णयामुळे जर एखाद्या व्यक्तीचें कांही नुकसान होत असेल तर त्याला त्या निर्णयाविरुद्ध अपील करण्याचा अधिकार आहे. हें अपील जिल्ह्याकडे जातें. कॉम्मूनचा निर्णय जर कायद्याच्या विरुद्ध असला तरच जिल्ह्यांतील अधिकाऱ्यांना तो बाजूला सारतां येतो. परंतु त्या निर्णयाच्या बाजवीपणांत त्यांना जातां येत नाही. जिल्ह्याच्या निर्णयाविरूद्ध, खाजगी व्यक्तीला किंवा कॉम्यूनला सुप्रीम कोर्टाकडे अपील करतां येतें. जर कॉम्यूनमधील सरकारी नोकरांनी एखादा हुकूम काढला असेल तर त्या क्षेत्रांतील जिल्हृयाच्या स्तरावरील सरकारी नोकर तो हुकूम बाजूला सारूं शकतात. पण जर तो हुकूम पीपल्स कमिटीने केला असेल तर मग जिल्हृयाची पीपल्स कमिटीच त्यांत कांही बदल करूं शकते.

"जिल्ह्यांतील सरकारी नोकर कॉम्यूनमधील सरकारी नोकरांच्या कामावर देखरेख करतात. परंतु कॉम्यूनमधील सरकारी नोकरांवर त्यांचा कांहीच अधिकार नसतो. ते सर्वस्वी कॉम्यूनच्या पीपल्स कमिटीला जबाबदार असतात."

यानंतर आम्ही क्रांजमधील एक जोड्याचा कारखाना पाहावयाला गेलों. हा कारखाना केवळ ६ वर्षांपूर्वी उघडण्यांत आला. त्यापूर्वी क्रांजमध्ये जोडे बनविण्याचे लहान लहान कारखाने होते. कारखाना फारच मोठा होता. जोडे बनविण्याचीं सर्वच कामें यंत्रांनी करण्यांत येत होतीं. कारखान्यांत एकंदर १०३० लोक काम करीत होते. त्यापकी २०० लोक स्टोअर-विभागांत काम करतात. कारखान्याची विशेषता ही की, कामगारांना तांत्रिक व सांस्कृतिक शिक्षण देण्याची व्यवस्थाहि या कारखान्यांत आहे. जसें एखाद्या ऑफिसचें काम चांगलें चालण्याकरिता ऑर्गनायजेशन अँड मेथडस् डिव्हिजन असतो. टाईम अँड मोशन यांचा अभ्यास करण्याकरिता एखादी विशेष संस्था कारखान्यांत असते, त्याप्रमाणेच याहि कारखान्यांत ही संस्था काम करीत होती. कामगाराना दोन्ही तऱ्हेचें शिक्षण मिळत असे. एक तर तांत्रिक शिक्षण घेऊन त्यांना आपल्या कामांत प्रगति करतां येत होती. व दुसरें सर्वसाधारण सांस्कृतिक शिक्षण घेऊन त्यांना त्यांचें ज्ञान वाढवितां येत होतें. याशिवाय कामगारांवर देखरेख करणारे जे फोरमन असतात व ज्यांचें काम कामगारांकडून काम करवून घ्यावयाचें असतें त्यांना सुद्धा शिक्षण देण्याची येथे सोय होती. याशिवाय नवीन मनुष्याला कोणतें काम जास्त सोयीचें होईल, हें ठरविण्याकरिता

इंडस्ट्रियल सायकॉलॉजिस्ट व शरीर तज्ज्ञ यांचा उपयोग करण्यात येतो. सर्व तऱ्हेचें शिक्षण व्हॉलंटरी आहे. परंतु कांही सक्तीचें सुद्धा आहे. म्हणजे सक्तीचें शिक्षण प्रत्येक कामगाराने घेतलें पाहिजे. त्याचें जें काम आहे त्याच्याशीं संबंधित शिक्षण सक्तीने कामगाराने घेतलें पाहिजे. परंतु त्याकरिता लागणारा वेळ कामगारांच्या कामाच्या वेळेंतूनच दिला जातो. या शाळेचा उपयोग केवळ फॅक्टरीला होत नसून जिल्हयांतील व कदाचित् आजूबाजूच्या जिल्ह्यांतील फॅक्टरीजना होत आहे.

यानंतर आम्हीं फॅक्टरी पाहिली. एका पांच मजली इमारतींत फॅक्टरीचें काम चालत होतें. रंगाच्या कारखान्यांतून चामडें रंगवून येतें. पण त्यानंतरच्या सर्व क्रिया येथे होतात. कारखान्यांत जेवढे पुरुष तेवढयाच स्त्रिया काम करीत होत्या. प्रत्येक कामगाराला दिवसाचें काम मोजून दिलेलें असे व त्यावरच त्याच्या पगाराचें म्हणजे वेजेसचें प्रमाण अवलंबून असे. एका वर्षाकाठीं १,२००,००० जोडे कारखान्यांत तयार होतात. त्यांपैकी फक्त १५०,००० परदेशांत जातात. परदेशांतील विक्रीची किंमत या देशांतील किंमतीच्या मानाने $\frac{1}{3}$ ते $\frac{1}{2}$ एवढी कमी होती. कारखान्याची कायम पुंजी ६००,०००,००० दिनारांची व चलित पुंजी सुद्धा तेवढीच होती.

कारखाना पाहिल्यावर आम्ही श्री हॅफनरबरोबर लंच घेतला व लंचनंतर पुन्हा श्री हॅफनर यांच्याजवळ कॉम्यून्सबद्दल जास्त माहिती घेण्याकरिता बसलों. त्यांनी सांगितलें की स्लोविनियामध्ये जेवढी टॅक्सवसूली होते त्यापैकी $\frac{1}{3}$ रिपब्लिकला जाते व $\frac{2}{3}$ कॉम्यून्स व जिल्हे यांच्याकडे येते. पूर्वी फेडरेशन हे कामाचे किमान दर चार श्रेणींप्रमाणे ठरवीत असे. पण आता प्रत्येक एंटरप्राईजला आपले दराचें प्रमाण ठरविण्याचा अधिकार आहे. त्यामुळे एंटरप्राईज जरी नुकसानींत आली तरी तिला किमान पगाराच्या शेकडा ८० एवढें कामगारांना दिलेंच पाहिजे, या नियमांत आता बदल झालेला आहे. आता एंटरप्राईज आपलें पगाराचें प्रमाण ठरविते परतु त्याला कॉम्यूनची संमति लागते. ही संमति देतांना कॉम्यून खालील बाबींकडे लक्ष देतें.

(१) व्यक्तिगत आमदनींत वाढ उत्पन्नाच्या वाढीबरोबर असावी; एरवी असू नये.

(२) एंटरप्राईजचे फंड्स व व्यक्तिगत आमदनी यांचें प्रमाण पूर्वीपेक्षा कमी दर्जाचें असू नये.

(३) कायम पगाराच्या माणसाच्या पगारांत कमींत कमी वाढ व्हावी व इतर पगाराची वाढ त्यांच्या उत्पन्नाच्या प्रमाणांत व वाढत्या नॉर्म्सप्रमाणे व्हावी.

ता. १–१–५९ नंतर किमान पगाराची पूर्वीची कल्पना जाऊन एक नवीन कल्पना तिच्या जागीं आली आहे.

फेडरेशन, रिपब्लिक, जिल्हा व कॉम्यून यांचे परस्पर संबंध सारखेच आहेत. आम्हांला श्री हॅफ्नर यांच्याकडून कॉम्यून्सच्या प्रत्यक्ष शासनाबाबत कांही माहिती मिळावी अशी इच्छा होती. पण वेळ झाला होता व आम्हीहि थकलों होतों. म्हणून त्याचा निरोप घेऊन आम्ही परतलों.

श्री हॅफ्नर यांच्यासारखी व्यक्ति आम्हांला आमच्या दौऱ्यांत मिळाली नाही. ज्ञान, बुद्धि व कर्तबगारी या तिहींचाहि सुंदर संगम त्यांच्या व्यक्तित्वांत होता. त्यांची तडफ तर डोळ्यांत भरण्यासारखी होती. क्रांज जिल्ह्याचे तर ते प्रमुख होतेच, पण फेडरल पार्लमेंटचेहि ते सभासद होते. त्यांचें कार्यक्षेत्र मात्र क्रांजच होतें. तात्त्विक विचारावर सुद्धा त्यांची पकड विलक्षण होती. त्याचा प्रत्यक्ष अनुभव आम्हांला त्यांच्या बोलण्यांतून येत होता. पण विशेष हें की, या मनुष्याने क्रांज हेंच आपलें कार्यक्षेत्र बनविलें होतें. त्याच्या कर्तबगारीला पूर्ण वाव त्यांत मिळत होता. हिंदुस्थानांत अगदी ह्याच्या उलट परिस्थिति आहे. सर्वांची ओढ मुंबईकडे किंवा दिल्लीकडे असते; कारण स्थानिक परिस्थितिच अशी आहे की तींत कर्तबगारीला वाव नाही.

क्रांजला येतांना वाटेंत स्लोविनियाची वनश्री पाहण्याचा योग आला. सडक फारच चांगली होती. आमची मोटार वेगानें जात होती. चारी बाजूंनी सुंदर पहाड होता. पाऊस असल्यामुळे आकाश झाकून येत होतें, त्यामुळे टेकड्यांची शोभा हवी तशी दिसत नव्हती., परंतु उघडलें की मग एक रमणीय दृश्य पाहावयाला मिळत होतें. जागोजाग शेती होती. हिरव्या पिकांत मध्येच स्ट्रॉबेरीचें लाल पीक फारच उठून दिसत होतें. टेकड्या सर्व वृक्षाच्छादित. वृक्ष इतके सुंदर होते की जणूं त्यांची मुद्दाम लागवड केली आहे असें वाटत होतें. चौकशीअंतीं असें समजलें की तेथें टेकडीच्या खाली अशी लागवड मुद्दाम करण्यांत येते. सायंकाळीं आम्ही लुब्लियानाला आलों व रात्रौ फेडरेशन व रिपब्लिक यांचे शासकीय व राजकीय संबंध याबाबत एका प्रोफेसरांशीं चर्चा करून झोपलों.

* * *

### शनिवार ता० ३०–५–५९

आज सकाळीं आम्ही येथील राष्ट्रीय म्युझियम पाहावयाला गेलों. त्यांत मागील लढाईंत पार्टीझन लोकांना काय जुलूम सोसावे लागले याचें भडक चित्र रंगविलें होतें. आमचे जे दुभाषी होते त्यांच्या वडिलांना जर्मनांनी गोळी घालून

ठार केलें होतें. अशा २०–२५ लोकांची यादी होती. तींत यांच्या वडिलांचेंहि नांव होतें. यादी छापलेली होती व तीवर जर्मन कमांडरची सही होती. आमचा एक जर्मन शिपाई मारला गेला म्हणून आम्हीं इतक्या लोकांना गोळी घालन ठार केलें आहे असा मजकूर त्या यादींतच होता. अत्यंत दुःखाने आमच्या दुभाष्याने त्यांतील आपल्या वडिलांचें नांव आम्हांला दाखविलें. पार्टीझन लोकांनी इतकीं दुःखें सोसलीं त्याचें त्यांना फळहि मिळालें. देश स्वतंत्र झाला व युगोस्लावियाला कधी न अनुभवलेली समृद्धि प्राप्त झाली.

पण आश्चर्याची गोष्ट ही की, सांस्कृतिक म्युझियममध्ये सर्व कला स्लोविनियन लोकांची. युगोस्लावियाच्या इतर रिपब्लिक्सच्या लोकांच्या कलेचा तिथें मागमूसहि नव्हता. आम्ही १२ वाजेपर्यंत हें म्युझियम पाहत राहिलों. व नंतर ब्लेडला जाण्याकरिता निघालों. ब्लेड क्रांजच्या पुढे ३० मैल आहे. तिथे आम्ही सुमारे १ वाजतां पोहोचलों. ब्लेड पाहून आमच्यापैकी कांहींना नैनिताल-ची आठवण झाली. चारी बाजूला पहाड. मध्यभागीं एक मोठा नैसर्गिक तलाव. या तलावाभोवती एक सुंदर सडक. तळ्याच्या काठीं मोठालीं हॉटेलें. तळ्यांत मध्यभागीं एक मोठें बेट. त्यावर चर्च. भोवतालच्या पहाडावर खूप जंगल. त्यापैकी एका मोठ्या उंच टेकडीवर एक किल्ला. अशी एकंदर ब्लेडची रचना आहे. इथे नेहमी व विशेषतः उन्हाळ्यांत मौज करणारांची गर्दी असते. परदेशांतून इथे लोक येतात. आम्ही गेलों तेव्हा इंग्लंडमधून प्रवाश्यांची एक बस भरून आली होती. आमच्यापैकी एकाला त्यांच्याशीं बोलण्याचा प्रसंग आला. तेव्हा हिंदुस्थान आमची कॉलनी आहे असें ते म्हणाले. त्यांच्या बोलण्यावरून हिंदुस्थान स्वतंत्र झाला आहे ह्याची त्यांना कल्पना नव्हती असें दिसलें. त्या कामकरी स्त्रिया होत्या. त्यांतील एक स्त्री म्हणाली 'मला आय्. सी. एस्. मधील एका जज्जने सांगितलें की, तो हत्तीवर बसून आपल्या कचेरींत जात असे'. 'ही केव्हाची गोष्ट आहे?' असें विचारल्यावर ती ३०–३५ वर्षांपूर्वीची आहे असें म्हणाली. सारांश हा की, एवढ्या दूर प्रवासाकरिता येणाऱ्या स्त्रीला सुद्धा आधुनिक माहिती हिंदुस्थानाबाबत फार कमी. पैसा आणि ज्ञान यांचें नेहमीच सख्य असतें असें नव्हे.

अशा या रमणीय स्थळीं आम्हांला आणण्यांत आलें. उद्देश आमचा काही वेळ मजेंत जावा हाच होता. लंच झाल्यावर आमच्यापैकी कांही मंडळी तळ्यावर नौकाविहाराकरिता गेली. कांहींनी झोपा काढल्या. समोर चार वाजतां पाऊस कमी झाल्यावर आम्ही मोटारींतून भोवतालचीं खेडीं पाहण्याकरिता निघालों. रस्ते फारच चांगले व वनश्री तर त्याहून चागली. दऱ्याखोऱ्यांतून रस्ता जात होता. दरींतून खाली नदी झुळझुळ वाहत आहे. रस्ता नदीचें काठाने जात आहे. दोन्ही बाजूंनी मोठाल्या टेकड्या दाट जंगलान आच्छादिलेल्या

आहेत. अशा ह्या प्रदेशांतील आम्हांला दोन जागा दाखविण्यांत आल्या. दोन्ही ठिकाणीं थडग्यांची रेलचेल होती. थडगींच थडगीं. जर्मनांनी येथें लोकांना पकडून आणून त्यांना गोळ्या घातल्या होत्या. शेजारींच एक तुरूंग दाखविण्यांत आला. तिथें या कैद्यांना बंदींत ठेवण्यांत आलें होतें. व त्यानंतर येथें त्यांना मारण्यांत आलें होतें.

एवढ्या क्रूरतेचें कारण काय ? तर ह्या लोकांनी जर्मनांच्या आक्रमणाला मूक संमति दिली नव्हती. एवढ्या मोठ्या संहाराची आठवण जाणार कशी ? पण आज त्याच ब्लेडला किती तरी जर्मन लोक कालक्रमणा करावयाला येतात. त्यांना हें दृश्य पाहून काय वाटत असेल ? कदाचित् जर्मनींतहि अशाच स्वरूपाचीं किती तरी स्मशानगृहें असतील. आम्हींहि त्यांना ठार केलें व त्यांनीहि आम्हांला असेंच ठार केलें असे परस्परांबद्दल परस्परांच्या मनांत विचार येत असावे. ह्या सिमेट्र्या पाहून माझें मन मात्र फार व्यथित झालें. माझ्या वाडवडिलांना असेंच जर कुणीं मारलें असतें तर मला काय वाटलें असतें, असा विचार मनांत येऊन मन विषण्ण होत असे. तिथून परत आल्यावर तळ्याभोवती आम्हीं एक चक्कर मारला. सडकेची लांबी सुमारे पांच किलोमिटर असावी. ठिकठिकाणीं मोक्क्याच्या जागा पाहून बंगले बांधलेले आहेत. हॉटेल्स आहेत. मार्शल टिटोंचा असाच एक बंगला आहे. त्यांत श्री. जयप्रकाश उतरले होते.

* * *

## रविवार ता. ३१–५–५९

आमच्या कांही मंडळींची इच्छा भोवतालचीं खेडीं पाहण्याची होती. आज सकाळीं आम्ही शेजारच्या खेड्यांवर गेलों. रविवारचा दिवस असल्यामुळे ठिकठिकाणीं लोक चर्चमध्ये जात होते. आज रविवार म्हणून किंवा कांही विशेष सण म्हणून की काय कुणास ठाऊक, ज्या गावांत आम्ही गेलों त्या गावांत रस्त्याच्या बाजूला झाडांच्या उंच फांद्यांच्या दुतर्फा लाइनी लावून ख्रिस्ताच्या प्रतिमेची मिरवणूक काढलेली होती. या गावीं आम्हीं दोन टोळ्यांत स्वतःला वांटलें. व दोन घरांत एकएक टोळी गेली. मी ज्या घरीं गेलों तें घर दुमजली होतें. घराचा कांही भाग अजून बांधावयाचा होता. घरापुढे रस्ता व रस्त्याच्या पुढे गुरांचा गोठा होता. त्या गोठ्यांत डुकरांची अलग सोय केली होती. तो घरधनी त्या गावांतील साधारण सुखवस्तु लोकांपैकी होता. तेथील कोऑपरेटिव्ह सोसायटीचा तो अध्यक्ष होता. गावांत आमच्या वांट्याला आलेल्या घरांहूनहि चांगलीं अशीं कांही घरें आहेत. ह्या घरांत सामान भरपूर होतें. आधुनिक पद्धतीचा कूकर होता, पण त्यांत सर्पण जाळण्याची सोय होती. रेडियो,

चांगले पलंग इत्यादि सामान होतें. खालची जमीन लाकडी फळयांची होती. वरच्या मजल्यावर बसण्याउठण्याची खोली होती. कुटुंब मोठें होतें. घरांत ९–१० माणसें होतीं. तुमच्या गावांत ज्यांची अगदी वाईट परिस्थिति आहे अशीं घरें किती आहेत, असा प्रश्न मीं विचारला. तेव्हा पांच घरें अशीं आहेत की जीं धड जगतहि नाहीत व मरतहि नाहीत असें कळलें. या लोकांकरिता तुम्ही काय करतां असें मीं विचारलें. "आम्ही काय करावें ? सहकारी शेती हाच एकमेव उपाय आहे. त्याकरिता आम्हीं प्रयत्न केला होता. पण तो सफल झाला नाही. अजून आमची वृत्ति समाजवादी बनली नाही. ती बनल्याशिवाय या लोकांचा तरणोपाय नाही." असें उत्तर मिळालें.

सध्या सहकारी समिति या लोकांना मामुली मदत पोचवीत आहे. पण त्यांची जमीनच कमी आहे. त्यामुळे त्यांची परिस्थिति सुधरूं शकत नाही. या गावांत ५१६ कॉम्युनिस्ट लीगचे सभासद आहेत व २००–२५० सोशालिस्ट अलायन्सचे लोक आहेत. गावांत एक स्थानिक समिति आहे. हिला लोकल कमिटी म्हणतात. हिच्या देखरेखीखाली गावाची साफसफाई, सडकदुरुस्ती इत्यादि कामें होत असतात. त्याकरिता लोकांवर कोणताहि कर लादला जात नाही. साफसफाई करणाऱ्यांना कॉम्यून पगार देते.

दुपारीं आम्ही ब्लेडला आलों. लंचनंतर आमच्यापैकी कांही मंडळी पुन्हा खेड्यांत घरांची पाहणी करण्याकरिता गेली. मी मात्र हॉटेलांत थांबलों व युगोस्लावियांतील दौऱ्याचें टिपण पुरें केलें. दुपारीं तळयांत मीं बोटींग केलें.

* * *

## सोमवार ता. १–६–५९

आज स्लोविनियामधील आमचा शेवटचा दिवस. कार्यक्रम भरगच्च होता. अगदी सकाळीं म्हणजे ७ वाजतांच आम्ही निघालों व एका खाणीच्या गावीं गेलों. तेथे कोळशाची खाण होती. कोळसा चांगल्या प्रतीचा नव्हता. पण त्यांचें म्हणणें असें की, यूरोपमधील कोणत्याहि कोळशाच्या खाणीपेक्षा आमचें उत्पादन जास्त कार्यक्षम आहे. यूरोपचें ॲव्हरेज उत्पादन यांच्या मानाने बरेंच कमी आहे. याचें एक कारण म्हणजे खाणींतील कोळसा अशा जागीं आहे की त्याला वर आणण्याला फारच कमी खर्च येतो. मला दुसरें कांही कारण तर दिसेना. इंग्लंड किंवा जर्मनी यांच्यासारख्या जुन्या व खाणउद्योगांत कसलेल्या राष्ट्रांवर युगोस्लाविया ताण करूं शकेल असें कांहीच कारण मला दिसेना. त्यांच्यापुढे

मराठी ग्रंथ सं... वि: ... नों. दि. ... क्रमांक ...

मीं हा मुद्दा मांडला, तेव्हा कोळसा सोयीच्या जागीं आहे, हें तर त्यांनी मान्यच केलें. पण, त्याशिवाय इतर कारणें सुद्धा आमच्या अनुकूलतेला मदत करतात असें त्यांनी सूचित केलें.

दुसरा मुद्दा जो मीं त्यांच्यासमोर मांडला तो असा की, खाणींतला कोळसा ही राष्ट्राची संपत्ति आहे. तिच्यावर पूर्ण हक्क खाणींत काम करणाऱ्या कामगारांचाच असला तर दोन दृष्टीने बाकीच्या समाजाकडून खाणकामगारांनी अवास्तव फायदा मिळविल्यासारखें होईल. एकतर कोळसा ही नाश पावणारी संपत्ति आहे. जंगल किंवा जमीन यांच्यासारखी स्वाभाविक तऱ्हेने पुन्हा नवीन होणारी संपत्ति नाही. एकदा कोळसा खाणींतून काढला की तेवढ्या प्रमाणांत देशांतली खनिज संपत्ति कमी होते. ही झीज पुन्हा भरून येणें शक्य नाही. त्यामुळे या झिजेची भरपाई म्हणून खाणींच्या उत्पन्नांतून कांहीतरी समाजाला मिळालें पाहिजे. हा पहिला मुद्दा. दुसरा मुद्दा असा की, एखाद्या मालाला जर विशेष किंमत आली तर त्या कारखान्यांत काम करणाऱ्यांना इतर मजुरांपेक्षा विशेष फायदा होईल व अन्य मजुरांच्या मानाने त्यांच्या आर्थिक परिस्थितींत एकदम फार मोठा फरक होईल. ही बाब टाळण्याकरिता कांही सोय किंवा योजना असते काय? असे मीं प्रश्न विचारले. पण माझ्या दोन्ही मुद्यांचें स्पष्ट उत्तर मला मिळालें नाही. सुरवातीला तर शेतीच्या उद्योगाचा विचार करतांना जर जमिनीची किंमत आपण लावत नाही, तर मग खाणीचीच किंमत कां लावतां? असा प्रश्न त्यांनीच मला विचारला. मीं त्याचें उत्तर दिलें. पण त्यांचें समाधान कांही होईना. शेवटी जेव्हा मीं असें विचारलें की, इतर उद्योगांतील फायदा काढण्यांत व खाणींतील फायदा काढण्यांत कांही फरक आहे किंवा नाही. तेव्हा असें सांगण्यांत आलें की जेवढा पैसा समाजाकडून कर्ज म्हणून आम्ही घेतों तो सर्व वजा करून मग नफा काढण्यांत येतो. इतर उद्योगांत, त्या रुपयांवरील व्याज फक्त काढून मग नफ्याची वांटणी करतात. दोन्ही उद्योगांत कर्ज म्हणून घेतलेले रुपये पुंजींत जमा होतात व पुंजीघट म्हणून शेकडा ६ प्रमाणे प्रत्येक उद्योगाला कांही रुपये अलग काढून ठेवावे लागतात. पण खाणीच्या उद्योगांत हें सर्व कर्जाऊ रुपये व त्यावरील व्याज प्रत्यक्ष वजा करून मग नफा वांटण्यांत येतो. पहिल्या बाबतींत समाजाकडून कर्ज म्हणून घेतलेले रुपये शेकडा ६ च्या हिशेबाने परत होतात. तर इथे ते सर्व परत करून मग नफा काढण्यांत येतो. ह्यावरून फरक तर स्पष्टच आहे. पण मीं मांडलेल्या तात्त्विक मुद्यांना स्पष्ट उत्तर मिळालें नाही.

खाणींच्या प्रगतीबाबत चर्चा झाल्यावर आम्ही खाण पाहावयाला निघालों. खाणीत जावून पाहावें अशी आमच्यापैकी कांही जणांची तीव्र इच्छा होती. त्याप्रमाणे ही मागणी मीं केली सुद्धा. परंतु त्यामुळे फार वेळ होईल व ठरविलेल्या

कार्यक्रमाप्रमाणे वागतां येणार नाही असें सांगून ती विनंती टाळण्यांत आली. खाण पाहून झाल्यावर आम्ही गाव पाहावयाला गेलों. जवळजवळ खाणमजुरांनीच व्यापलेंलें हें गाव दिसलें. मजुरांकरिता बांधलेलीं घरें आम्हांस दाखविण्यांत आलीं. घरें खरोखरंच फार टुमदार व सोयीचीं वाटलीं. चार खोल्या स्वयंपाक-घर व स्नानगृह आणि शौचकूप अशी सोय प्रत्येक फ्लॉटमध्ये केली होती. व भाडें अत्यंत माफक असल्यामुळे कामगारांना तें परवडत होतें. खाणकामगार व इतर कामगार यांत तुम्ही कांही फरक करत नाही काय, या माझ्या प्रश्नाला त्यांनी उत्तर दिलें की, खाणींतील कामगारांना $\frac{1}{4}$ वेळ कमी काम करून पूर्ण पगारावर काम सोडतां येतें. म्हणजे दररोज ६ तास काम करणें किंवा ९ वर्षें अगोदर काम सोडणें या पर्यायांतून ९ वर्षे अगाऊ त्यांना काम सोडतां येतें.

हें गाव फारच चांगल्या प्रकारें वसविण्याचा येथील चालकांनी प्रयत्न केला आहे. कामगारांच्या घरांशिवाय गावांतील लोकांना सहल करण्याकरिता सुंदर बाग, तींत लहान मुलांची खेळण्याची स्वतंत्र सोय, फुटबॉल व इतर खेळ खेळण्याकरिता पटांगण, सिनेमा, हॉटेल ह्या सर्व सोयी खाणीच्या उद्योगांमार्फतच पुरविण्यांत आल्या आहेत. अर्थात् सिनेमा, हॉटेल हीं सर्व नवीन एंटरप्रायजेस म्हणूनच चालविलीं जात आहेत. पण सुरवातीची इन्व्हेस्टमेंट खाणीच्या उद्योगांतून होते. सभोवतालच्या टेकडचा व मध्यभागीं वसलेलें हें सुंदर गाव पाहून, खाणींतील मजुरांचा श्रमपरिहार येथे राहून चांगलाच होईल असें मला वाटलें. बल्लारशा, चांदा इत्यादि आपल्याकडील कोळशाच्या खाणींशीं तर याची तुलनाच करतां येत नाही. त्या दृष्टीने हें खाणमजुरांचें नंदनवनच समजलें पाहिजे.

संपूर्ण गाव पाहिल्यावर आम्हीं लंच घेतला. नेहमीचीं भाषणें झालीं. खाणीकडून मला एक डेव्हीसेफ्टी लॅंपची प्रतिमा भेट म्हणून देण्यांत आली. जेवणांतील विशेषता ही की, येथील जेवण आपल्या देशांतील पद्धतीप्रमाणे चवदार बनविण्यांत आलें होतें. त्यामुळे तें आम्हांला फारच आवडलें.

जेवणानंतर आम्ही ज्या गावीं हॉप्सची कोऑपरेटिव्ह होती तेथे गेलों. शेतींतील सर्वांत किमती पीक युगोस्लावियांत हॉप्स आहे. आपल्याकडे जसा कापूस किंवा ऊस, तसें येथे हॉप्स हें पीक आहे. सर्व जगांत येथून हॉप्स जातात. एकदा लावलें की दहा वर्षे हें पीक घेतात. विकण्याची येथील सर्व पद्धति सामूहिक. लहान-लहान सहकारी समित्यांतून जो माल येतो तो सर्व अमेरिकेंत असलेल्या युगोस्लाव्ह एजंसीमार्फत विकला जातो. अशा आपल्या एजंसीज इतर राष्ट्रांतून नाहीत असा माझा समज आहे. आपल्याकडेहि चहा, मॅंगनीज ह्या अशाच किमती वस्तु आहेत. परंतु आपलें मॅंगनीज अमेरिकेंत विकण्याकरिता आपली कांही एजंसी आहे

किंवा नाही याबद्दल मला शंकाच आहे. असल्या एजंसीमुळे एक तर आपल्या लोकांना आणखी काम मिळेल व मँगनीज पडत्या भावांत विकावें लागणार नाही. मागे मीं चौकशी केली असतां असें समजलें होतें की, आपणाला अमेरिकेंतील एजन्टामार्फत मँगनीज व इंग्लंडमधील एजंटामार्फत चहा विकावा लागतो. त्यामुळे अर्थातच मालाचा कस, किंमत व काम या तिन्ही बाबींपासून भारतीयांस जो फायदा व्हावयास पाहिजे तो होत नाही.

या भागांत सहकारी समित्यांविषयीं विशेष माहिती मिळाली. पहिली बाब म्हणजे सभासदांनाच समितीकडून हक्काने व ठराविक भावांत निरनिराळ्या तऱ्हेच्या सवलती व सोयी मिळतात. जे सभासद नाहीत त्यांना एक तर या सोयी हक्काने मिळत नाहीत व मिळाल्यास त्यांना जास्त पैसे द्यावे लागतात. शेअरवर सभासदांना कांहीहि व्याज किंवा डिव्हिडंड मिळत नाही. कोऑपरेटिव्हच्या सर्व संपत्तीवर समाजाचा अधिकार आहे. कोऑपरेटिव्ह ही सुद्धा एक एंटरप्राईज आहे. सभासद व तिचे नोकर हे दोन्ही मिळून वर्कर्स कौंसिल, मॅनेजिंग बोर्ड इत्यादि कोऑपरेटिव्हची व्यवस्था करणाऱ्या संस्था निवडतात. दोन तृतीयांश सभासदांची निवड शेअर होल्डर्स व बाकीच्या एक तृतियांश लोकांची निवड कर्मचारी करतात. फरक एवढाच की सभासदांना कांही लाभ मिळत नाही. कर्मचाऱ्यांना वर्षाकाठीं कोऑपरेटिव्हच्या फायद्यांतून जे मिळावयाचें (इतर कामगारांप्रमाणे) तें मिळून बाकीचा पैसा कोऑपरेटिव्हच्या फंडांत जमा होतो. शेतीच्या कोऑपरेटीव्हचा बराचसा पैसा सध्या तरी कोऑपरेटिव्हमध्येच लावण्याची सध्या तरी सरकारचें धोरण आहे. कारण त्यांना शेतीचें उत्पादन वाढवावयाचें आहे. म्हणून इतर एंटरप्राईजेसप्रमाणे त्यांच्याकडून सरकार कर वसूल करीत नाही. इतर एंटरप्राईजेसला सरकारला जें द्यावें लागतें त्या हिशेबाप्रमाणेच यांनाहि द्यावें लागतें. परंतु तेवढी रक्कम पुन्हा शेतींतच लावण्याची सवलत या सोसायट्यांना आहे. म्हणूनच त्यांच्या संपत्तीवर अधिकार समाजाचा आहे, मेंबरांचा नाही.

हॉप्सची शेती फार मेहनतीची व खर्चाची आहे. आमच्या येथील हवा-पाण्याच्या परंपरागत ज्ञानामुळे ही शेती आम्ही चांगली करूं शकतों असें येथील लोकांचें म्हणणें आहे. हॉप्सचा वेल असतो. बारीक लाकडावर तो चढवावा लागतो. आपल्या इकडील पानाच्या तांड्यासारखी हॉप्सची शेती दिसते. इथे आणखी एका बाबीचा शोध लागला. शेतकऱ्याला शेती कोऑपरेटिव्हला खंडाने देणें परवडत नाही. तसेंच ती विकली तर त्या किंमतीपासून जें व्याज मिळेल तें व इतर काम मिळून त्याला जी मिळकत होते ती शेतांतून निघणाऱ्या मिळकतीपेक्षा कमी पडते. म्हणून तर

सरकारचें धोरण कोऑपरेटिव्ह् समित्यांनी शेतकऱ्यांची शेती खंडाने किंवा विकत घ्यावी असें असून सुद्धा बरेचसे शेतकरी या गोष्टीला तयार होत नाहीत.

सायंकाळीं आम्ही एका गरम पाण्याच्या झऱ्याच्या गावीं गेलों. तेथे फार मोठें हॉटेल आहे. बरेचसे लोक तेथे आपली प्रकृति सुधारण्याकरिता आले होते. सायंकाळीं आम्हीं येथे जेवण केलें. जिल्ह्याच्या व्हाइस प्रेसिडेंटनी आम्हांला निरोप दिला. आभारप्रदर्शनपर मीं एक लहानसें भाषण केलें. स्लोविनियाचा आमचा दौरा संपला व रात्रीच्या गाडीनें आम्ही बेलग्रेडला जाण्यास निघालों.

* * *

### मंगळवार ता. २-६-५९

बारा वाजतां येथील बँकेच्या चालकांशीं आमची भेट झाली. येथील बँकांच्या पद्धतीविषयी फारच उद्‌बोधक माहिती त्यांनी आम्हांला दिली. युगोस्लावियांत पुष्कळ तऱ्हेच्या बँका आहेत. मुख्य बँक फेडरल बँक आहे. ही आपल्या रिझर्व बँकेसारखी आहे. याशिवाय इन्व्हेस्टमेंट बँक, परदेशी व्यापाराची बँक व शेतीकरिता बँक, अशा तीन तऱ्हेच्या बँका आहेत. स्थानिक बँका, स्थानिक उद्योगांना —जे बहुतांशीं कॉम्यूनमधे चालतात, त्यांना—पैसे पुरवितात. याशिवाय कोऑपरेटिव्ह् बँका आहेत. त्यांच्याकरिता मुख्य बँक ॲग्रिकल्चलर बँक आहे.

फेडरल बँकेचें मुख्य कार्य इतर बँकांना व मोठ्या उद्योगांना पैसे पुरविण्याचें आहे. तिच्या शाखा फक्त रिपब्लिकच्या राजधानींत आहेत. बाकी बँकांच्या शाखा जिल्ह्याच्या ठिकाणीं व इतर महत्त्वाच्या गावीं आहेत. कॉम्यूनल बँकांची स्थापना पीपल्स कमिट्या करतात. कोऑपरेटिव्ह् बँकांची स्थापना सभासदांचा समूह करतो. कॉम्यूनल बँकांचे डायरेक्टर पीपल्स कमिटी कायम करते. बँकेच्या कर्मचाऱ्यांतर्फे सुद्धा एक डायरेक्टर घेतात. राष्ट्राच्या सोशल प्लॅनप्रमाणे इतर बँकांना किती कर्ज द्यावें व मोठाया उद्योगांकरिता किती द्यावें, हें सर्व फेडरल बँक ठरवितें. याशिवाय बँकांचें कर्तव्य एंटरप्राइजेस व सरकार यांच्यांतील हिशेब ठेवण्याचें असतें. एंटरप्राईजेसना जो कर व इतर पैसा सरकारला द्यावा लागतो तो बँकामार्फतच देण्यांत येतो. यामुळे उद्योगांबाबत फार महत्त्वाची माहिती बँकांना मिळतें व आर्थिक परिस्थितीबाबत धोरण ठरविण्याला बरीच मदत होते. यापूर्वी युगोस्लावियांत एकच बँक होती व तिच्या अनेक शाखा संपूर्ण देशांत होत्या. पण यामुळे बरेच घोटाळे व्हावयाला लागले. म्हणून निरनिराळ्या कामांकरिता निरनिराळ्या बँका स्थापन करण्यांत आल्या.

राष्ट्राच्या सोशल प्लॅनप्रमाणे शेती, उद्योग, व्यापार, वाहतूक, इत्यादि निरनिराळया शाखांकरिता लागणारी रक्कम फेडरल बँकेमार्फत वांटली जाते. परंतु प्रत्येक क्षेत्रांत कोणत्या विशिष्ट योजनेकरिता कर्ज द्यावयाचें हें चढाओढींच्या पद्धतीने ठरवितात. प्रत्येक व्यवसायाला त्याला लागणारें कर्ज, त्या कर्जापासून होणारी उत्पादनांत वाढ, कर्ज परत करण्याची योजना इत्यादि माहिती पुरवावी लागते. व त्यानुसार ज्या योजनेपासून आर्थिक फायदा जास्त दिसेल त्या योजनेला कर्ज देण्यांत येते.

युगोस्लावियामध्ये चालू खात्यांतील ठेवीला शेकडा ५ याप्रमाणे व्याज देण्यांत येतें. मुदतीच्या रकमेकरिता शेकडा ७ सुद्धा व्याज देतात. याशिवाय पोस्टल बँकांची सुद्धा पद्धति या देशांत आहे. मागील सात वर्षांत बँकांतील खाजगी व्यक्तींच्या ठेवी ३.८ पासून ५१.५ पर्यंत वाढल्या आहेत. हे आंकडे बिलियन दिनारांत आहेत. यावरून खाजगी लोकांची बचत किती असेल याची कल्पना येते.

यानंतर दुपारीं युगोस्लावियांविषयी मीं जो लेख तयार केला त्यावर चार तास चर्चा झाली. त्यांतील प्रत्येक वाक्य व प्रत्येक पॅरा वाचून त्यावर चर्चा झाली व तो बहुतेक जसाच्या तसा मंजूर झाला.

* * *

**गुरुवार ता. ४–६–५९**

आज आम्हीं आपले अम्बॅसेडर श्री अलियवार जंग यांची शेवटची भेट घेतली. भेटीच्या वेळेला त्यांचे सेक्रेटरी श्री धवन व दुसरे सेक्रेटरी श्री देसाई हे हजर होते. सुरवातीला एकदम चीनबाबत कोणत्या तरी कारणावरून बोलणें निघालें. चिनी लोक किती लौकर बदलतात याबाबत तें बोलणें होतें. आतापर्यंत ते आपले मित्र होते व आता एकदम बदलले. यापेक्षा युगोस्लाव्ह लोक हे जास्त विश्वासू आहेत व यांची व आपली चांगली मैत्री आहे; हा विषय होता. सुरुवात अशीच झाली की, आमची व्यवस्था येथील लोकांनी फारच चांगली ठेवली होती. आम्हीं जी जी माहिती मागविली त्या त्या माहितीबाबत सर्वच अधिकारी व्यक्तींशीं आमची भेट करवून ती माहिती पुरविण्यांत आली. या त्यांच्या दक्षतेचा आमच्या मनावर फार मोठा परिणाम झाला. अर्थात् त्यांचें आदरातिथ्यहि त्याच तऱ्हेचें होतें. यावरून चिनी लोक कसे बदलतात हा विषय निघाला. तेव्हा मी माझा अनुभव सांगितला की, श्री चाऊ-एन-लॉयशीं माझी चीनमध्ये जेव्हा भेट झाली तेव्हा संततिनियमनाबद्दल त्यांनी आस्था दाखविली व 'याबाबत हिंदुस्थानांत तुमचा जो अनुभव आहे, तो आम्हांला समजावून घ्यावयाचा आहे व

त्याकरिता एक डेलेगेशन आम्ही हिंदुस्थानांत पाठवूं इच्छितों' असें सांगितलें. त्यानंतर तसें एक डेलेगेशन हिंदुस्थानांत आलें व तेथील परिस्थिति पाहून गेलें. कांही दिवसांनी चीनमध्ये संततिनियमनाची मोहीम सुरूं झाली, जाणून-बूजून गर्भपात करणें सुद्धा कायदेशीर मानण्यांत आलें व दोन दिवसांपूर्वीं एका जाणत्या गृहस्थाकडून मीं असें ऐकलें की आता पुन्हा संततिनियमानाची मोहीम त्यांनी बंद केली. यावर अंव्बॅसेडर महोदय म्हणाले की, ही मोहीम बंद झाली हें मींहि ऐकलें आहे.

आमच्यावर येथील परिस्थितीचा काय परिणाम झाला असें विचारतांच, येथील कामगारांनी कारखाने स्वतः चालविण्याच्या पद्धतीबावत आमचें मत विशेष अनुकूल झालें, असें आम्हीं सांगितलें. पुंजीवादी देशांत सुद्धा (हिंदुस्थानसारख्या) ही पद्धति अमलांत कां आणतां येऊं नये ? फार झालें तर या पद्धतींत सरकारला जे कर द्यावे लागतात त्याप्रमाणे शेअरहोल्डर्सला अमूक इतकें मिळालेंच पाहिजे असा नियम करतां येईल. पुंजीवादामध्ये पुंजीकरिता मालकांना एक निश्चित भाग मिळावयाचा अशी सोय झाल्यावर मग समाजवादी व्यवस्थेचे फायदे घेण्यांत काय अडचण असावी ? हें तर स्पष्ट आहे की, या पद्धतींतून कामगारांचें शिक्षण व त्यांची क्षमता दोन्ही वाढतात. उत्पादनवाढीला सुद्धा त्यामुळे मदत होणें हेंहि स्वाभाविक आहे. नाही तरी सिंद्रीच्या कारखान्याची गोष्ट आपल्या हिंदुस्थानांत प्रसिद्धच आहे. एकदा पंडित जवाहरलाल नेहरू हा कारखाना पाहावयाला गेले होते. कारखान्यांत काही बांधकाम सुरूं होतें. त्यावर काम करणाऱ्यांना त्यांनी माहिती विचारली असतां त्यांना फक्त त्यांची रोजीच तेवढी माहीत होती असें त्यांना आढळलें. आशियांतील रासायनिक खताच्या सर्वांत मोठ्या कारखान्यांत आम्ही काम करून राहिलों आहों यावद्दल त्यांना कांहीच माहिती नव्हती. असलें अज्ञान कारखान्यांच्या व्यवस्थेंत बदल केला तर राहणेंच शक्य नाही. याकरिता समाजवाद आलाच पाहिजे अशी कांही जरूरी भासत नाही.

यावर अम्बॅसेडर साहेब म्हणाले की, मलाहि असेंच वाटतें. निदान जे कारखाने सरकारकडून किंवा समाजाकडून चालविले जातात त्यांबावत तरी अशी व्यवस्था चालू करण्याला कांहीच अडचण भासूं नये असें वाटतें. नंतर यांच्या कॉम्यूनच्या पद्धतीबाबत बोलणें निघालें. ही पद्धति चांगली आहे याबाबत तर प्रश्नच नाही. प्रश्न एवढाच आहे की, आपल्या देशांत एकापेक्षा जास्त पक्ष आहेत तेव्हा अशा परिस्थितींत ही पद्धति सफल होईल काय ? मी म्हणालों यांत अडचण कां भासावी ? आजहि केंद्र सरकार कॉंग्रेसच्या हातीं व राज्य सरकार कॉम्युनिस्टांच्या हातीं नाही काय ? त्याचप्रमाणे एका म्युनिसिपालिटींत कॉंग्रेस व दुसऱ्या म्युनिसिपालिटींत समाजवादी पक्ष येतो असें आपण पाहत नाहीं काय ? कॉम्यून हें म्युनिसिपालिटीसारखेंच आहे. फरक एवढाच आहे की, त्यांचें अधिकाराचें

क्षेत्र फार व्यापक आहे. त्यामुळे त्याला एका लहानशा राज्याची उपमा देतां येईल. कॉम्यूनचीं दोन वैशिष्टें आहेत. एकतर त्याच्या क्षेत्रांत चालणारीं सर्व कामें त्यांच्याच नोकरांमार्फत होतात. दुसऱ्या नोकरांकडून त्या क्षेत्रांत हस्तक्षेप होत नाही. सरकारची करवसूली व इतर सर्व कायद्यांची अंमलबजावणी ही त्यांच्यामार्फत व्हावयाची. दुसरें, त्यांच्या क्षेत्रांत चालणारा व्यापार, उद्योग, शेती व इतर सर्व धंदे यांच्याशीं त्यांचा संबंध असतो. त्यावर ते कर लादू शकतात. त्याबाबत त्यांचा सल्ला घेण्यांत येतो. उदाहरणार्थ त्यांच्या क्षेत्रांत चालणाऱ्या व्यापाराबाबत किंवा उद्योगाबाबत, निरनिराळ्या लोकांना पगार किती असावे हा प्रश्न जरी त्या त्या ठिकाणचें वर्कर्स कौंसिल ठरवितें तरी त्याला कॉम्यूनची संमति लागते. त्यांचें मुख्य (डायरेक्टर) जेव्हा निवडले जातात तेव्हा त्या निवडणूक-समितींत कॉम्यूनचे प्रतिनिधि असतात. इतर अनेक तऱ्हेने सुद्धा हे संबंध असतात. अम्बॅसिडर साहेबांचें म्हणणें असें की, यामुळे अधिकाराकरिता होणार लढा जास्त तीव्र होईल व आज त्यामुळे जे दोष दिसून येतात ते वाढतील. मी म्हणालों की, या मुद्द्याचा आणखी विचार केला पाहिजे. मीं याबाबत विचार केला नाही. पण सकृद्दर्शनीं तरी असें वाटतें की, यामुळे पार्लमेंटच्या किंवा असेंम्ब्लीच्या जागांकरिता जें विलक्षण आकर्षण आपल्यांत आहे, व ज्याकरिता नाही नाही त्या गोष्टी आम्ही करतों, तें कमी होईल. हें लोण खालपर्यंत पोहोचेल. पण यामुळे लोकशिक्षण जास्त होईल. शेवटी आपला विश्वास लोकशाहींत असेल तर ज्यामुळे लोकशिक्षण जास्त होईल अशा बाबी आम्हीं घेतल्या पाहिजेत. तिसरी एक बाब ही की, या पद्धतींत सर्वच कामें लोकप्रतिनिधींकडून करवून घेण्याची गरज नाही. आपल्याकडे, प्रत्येक कामाकरिता असेंब्लीचा किंवा पार्लमेंटचा सभासद लागतो. येथे पीपल्स कमिटीच्या कामाच्या इतक्या शाखा आहेत व त्यावर निवडून आलेले लोक एवढ्या प्रमाणांत असतात की ज्या ज्या लोकांना आपण कांही तरी काम करावें अशी इच्छा असते त्या सर्वांची सोय येथे करण्यांत येते. असे बरेच लोक असतात की ज्यांना निवडणुकीकरिता उभें राहावयाचें नसतें परंतु जे जनसेवा करण्याची इच्छा बाळगतात. अशा सर्व लोकांना ही संधि चांगली असते. अर्थात् आज सुद्धा आपल्याकडे या पद्धतीचा अवलंब करतां येईल. परंतु कॉम्यून्स व म्युनिसिपालिटचा यांचे अधिकार ज्या प्रमाणांत वाढतील. त्या प्रमाणांत या कामाकरिता चांगली माणसें मिळणें जास्त संभवनीय. दुसरें, या संस्थांचें कार्यक्षेत्र जर वाढलें तर अधिकारांत जरी एखादी अशिक्षित व्यक्ति असली तरी तिला जास्त शिक्षित व समजदार मनुष्याची जरूरी भासेल.

अम्बॅसेडर साहेब म्हणाले की, त्यांनाहि असेंच वाटतें. याबाबत ते एक सविस्तर लेख लिहून प्राईम मिनिस्टरांना पाठविणार आहेत. नंतर प्रश्न असा निघाला की, युगोस्लावियाने इतक्या लौकर आपला विकास कसा केला?

याचीं मुख्य कारणें काय आहेत ? एक तर लढाईंत यांचें विशेष नुकसान झालें नसावें, व लढाईच्या पूर्वीची परिस्थिति औद्योगीकरणाच्या दृष्टीने जास्त अनुकूल असावी. लढाईंत यांची बरींच माणसें कामास आलीं. परंतु कारखाने व इतर संपत्तीचें नुकसान कमी झालें असावें. हा देश जेवढा शेतकीप्रधान आपणांस वाटतो तेवढा तो विकासाच्या सुरवातीला नसावा. पूर्वीचीच इंडस्ट्रीयल शक्ति जर कांही प्रमाणांत असली तर आर्थिक उत्थान लवकर होतें, हें जर्मनी व इतर राष्ट्रांच्या अनुभवावरून दिसून आलें आहे. ही बाब सर्वांनी मान्य केली. त्याचबरोबर सुरवातीला तर बराचसा हिस्सा इन्व्हेस्टमेंटकरिता व फारच कमी हिस्सा खर्चाकरिता ठेवण्याची अशी वृत्ति राष्ट्रीय उत्पन्नाच्या बाबत होती. आणि तिसरी बाब म्हणजे, इन्व्हेस्टमेंट लवकर फायदा मिळेल अशा कामांत केलें गेलें.

मध्येच अम्बॅसेडर साहेबांनी एक महत्त्वाचा मुद्दा मांडला. ' युगोस्लावियाची विकेंद्रीकरणाची पद्धति कॉम्यून्सपर्यंतच गेली आहे, त्याखाली नाही. याचें मुख्य कारण म्हणजे अजून येथील सरकारचा शेतकऱ्यावर असावा तेवढा विश्वास नाही. त्यांना अशी भीति वाटत असावी की, जर शेतकऱ्यांच्या हातांत सत्ता गेली तर त्यामुळे त्यांची पुंजीवादी वृत्ति बळावेल व समाजवाद मागे पडेल. म्हणून आपल्याकडे जशी प्रत्येक खेड्याला किंवा १/२ लहान खेड्यां मिळून पंचायत आहे तसें येथे नाही. परंतु कॉम्यून्सखाली विकेंद्रीकरण नसण्याचें कारण मात्र ते असें देतात की कॉम्यून हा आर्थिक दृष्ट्या स्वतःच्या पायावर उभा राहील एवढा विभाग असावा. अशी कल्पना यापूर्वी मला सुचली नव्हती हें मला कबूल केलें पाहिजे."

यानंतर आम्ही श्री धवन यांच्याकडे लंचला गेलों व तेथून श्री मिलेंतिये पोपोव्हिच यांची दुसरी भेट घ्यावयाला गेलों. ही त्यांची शेवटची भेट होती. सुरवातीलाच आम्हीं त्यांना विचारलें की कॉम्यून्सचें क्षेत्रफळ हळूहळू वाढेल कीं कमी होईल, याबाबत आपल्या देशांत काय कल्पना आहेत ? याबाबत ते म्हणाले की, सहकारी चळवळ कशी वाढते यावर बरेंचसें अवलंबून आहे. जर सहकारी समिति शेतकऱ्यांचे सर्व प्रश्न सोडविण्याइतकी शक्तिशाली झाली तर मग कॉम्यून्सचें विसर्जन सहकारी समितींत होऊं शकेल. सध्या तरी कॉम्यून्स आहेत तसेच राहतील असा रंग दिसतो.

विकेंद्रीकरण करण्यांत पार्टीचा मोठा हिस्सा होता. पार्टीच्याच समजूतदारीमुळे विकेंद्रीकरण झालें. असें असल्यावर विकेंद्रीकरणाच्या क्रियेंतून पार्टी कशी नामशेष होणार? या प्रश्नाला श्री पोपोव्हिच यांनी उत्तर दिलें. "पहिल्यापेक्षा आता पार्टीचा अधिकार नगण्यसाच राहिला आहे. पूर्वी प्रत्येक कामांत पार्टीचा हात असे. आता तसें नाही. निरनिराळ्या संस्थांतून स्वतंत्रपणें मत बनत असतें. रशियांत पार्टी स्वतंत्रपणें अगाऊ निर्णय घेते व मग तोच निर्णय मानला

जातो. तसें येथे नाही. पण आजच जर पक्षाचें विसर्जन झालें तर, त्याची जागा कोण घेणार? ती जागा घेण्याकरिता लोकांनी तयार झालें पाहिजे. याकरिता त्यांच्या शिक्षणाची जरूरी आहे. व हें शिक्षण त्यांना कॉम्युनिस्ट लीग देईल अशी आमची कल्पना आहे."

यावर मी म्हणालों की, असें होण्याकरिता शासन करणारा व शिक्षण देणारा यांचें कार्य भिन्नभिन्न असलें पाहिजे जो शिक्षण देणारा तोच जर शासन करणारा झाला तर तो योग्य शिक्षण देऊं शकणार नाही. म्हणून लीग ऑफ कॉम्युनिस्टने जर शासनापासून अलग राहून त्यागयुक्त जनसेवेचा मार्ग लोकांना दाखविला तर जनतेचें शिक्षण चांगल्या प्रकारें व लौकर होईल." त्यांना हा मुद्दा पटला असें दिसलें. ते म्हणाले "तुमचें म्हणणें बरोबर आहे. परंतु युगोस्लावियाच्या विशिष्ट परिस्थितींत ते कसें लागूं करावयाचें हा प्रश्न आहे. आमची आजची परिस्थितिच अशी आहे की, हें काम आम्हांला हळूहळू केलें पाहिजे." यापुढची पायरी अशाच स्वरूपाची राहील काय या प्रश्नाला, "मी नक्की उत्तर देऊं शकत नाहीं. कदाचित् राहील कदाचित् राहणार नाही" असें मोघम उत्तर त्यांनी दिले.

सरकारचें विलिनीकरण कसें होईल, हा प्रश्न पुन्हा विचारण्यांत आला. ते म्हणाले, "आज जें काम सरकार करीत आहे तें काम जेव्हा लोक करतील किंवा लोकांच्या अधिकारांत राहील तेव्हाच हें घडेल. ही गोष्ट दोन तऱ्हेने होऊं शकेल. डायरेक्ट डेमॉक्रसीच्या संस्थांना जास्तींत जास्त अधिकार देणें. आज ज्या बाबी प्रातिनिधिक संस्थामार्फत होतात, त्या बाबी डायरेक्ट डेमॉक्रसीच्या संस्था-मार्फत होणें. दुसरें, आज जें सरकारचें कार्य आहे तें लोकप्रतिनिधींच्या निरनिराळ्या संस्थामार्फत व्हावयाला पाहिजे. आज सर्वच बाबींकरता सरकार जवाबदार असते. आज जें काम एक लहानसें सरकार करतें, तें जर विखुरलें गेलें तर सरकारची व्याप्ति एवढी मोठी होईल की सरकार म्हणजे जनता असें समीकरण होईल. इथे एक तिसरी बाब जोडली पाहिजे व ती म्हणजे लोकप्रतिनिधि हे लोकांच्या मताचें पूर्ण प्रतिबिंब आरशासारखें पाडूं शकले पाहिजेत. या तीन गोष्टी साधल्यावर लोकांची सत्ता पूर्ण होईल. त्याच वेळेला पक्षाचा नाश होईल. पक्षाचा उद्देश समाजवादाची पूर्ति करण्याचा आहे. लोकांचा विकास इतका झाला पाहिजे की, समाजाचें हित व व्यक्तीचें हित यांत आज जें अंतर आहे तें राहावयाला नको. मनुष्य नेहमी स्वार्थी प्रवृत्तींतून वागत असतो. ते त्याचें मटेरियल इंटरेस्ट आहे. आम्ही अगदी ठोकळपणें जेव्हा बोलतों तेव्हा असेंच म्हणतों की, अधिक उत्पादनाकरिता आर्थिक आकर्षण पाहिजे पण हें तेवढेंसें बरोबर नाही. मूळ आकर्षण Socio-economic interest वाढविणें हें असलें पाहिजे. म्हणजे तें आकर्षण असें असलें पाहिजे की,

ज्यांत, समाजाचेंहि हित आहे व व्यक्तीचेंहि हित आहे. सामाजिक हितांत व व्यक्तीच्या हितांत अभिन्नता भासली पाहिजे. व हें स्वाभाविक झालें पाहिजे. आज तसें नाही. समाजविरोधी बऱ्याच गोष्टी व्यक्तीला आपल्या हिताच्या वाटतात व त्या ती करते. असें हें जोंपर्यंत चालतें तोंपर्यंत Contradiction राहील व तें राहूं देऊं नये याकरिता समाज सत्तेमार्फत म्हणजे सरकारमार्फत प्रयत्न करील, त्या वेळेला सत्तेचा भास होईल. या सर्व बाबी जेव्हा स्वाभाविकपणेंच होऊं लागतील तेव्हाच सत्ता गळून पडेल. असें होण्याकरिता समाज व व्यक्ति यांची अभिन्नता कशी राहूं शकते याचें प्रत्यक्ष आचरण करणारे, हे दर्शविणारे शिक्षक समाजाला पाहिजेत. हाच लीग ऑफ कॉम्युनिस्टांचा रोल आहे."

हें ऐकल्यावर मनाला तावडतोब असें वाटलें की, ही परिस्थिति येण्याकरिता व्यक्तींनी समाजापासून कमींत कमी घेणें व समाजाला जास्तींत जास्त देणें या वृत्तीचा परिपोष झाला पाहिजे. प्रश्न एवढाच आहे की, समाजाच्या होणाऱ्या आर्थिक विकासांतून ही वृत्ति बळावेल की कमी होईल ? येथील लोकांचें म्हणणें हें दिसतें की, ज्या समाजांत आर्थिक विकास कमी झाला आहे त्या समाजांत समाजवाद स्थापन होणें शक्य नाही किंवा तें कठिण आहे. जास्त उत्पादनाने लोकांच्या गरजा जसजशा पूर्ण होतील तसतशी ही वृत्ति वाढेल. आम्ही गांधीवादी म्हणतों की, असें होणार नाही. ज्या प्रमाणांत आर्थिक विकास वाढेल त्याच प्रमाणांत मानवाची मिळविण्याची इच्छा ही वाढत असल्यामुळे त्याचें समाधान किंवा संतुष्टता ही कधींच व्हावयाची नाही. ही वृत्ति जर मानवाच्या संतुष्टतेंतून निर्माण व्हावयाची असेल तर ही विचारसरणी अगदी बरोबर आहे. पण संतुष्टता ही आर्थिक स्तरावर अवलंबून नसून मानवी प्रवृत्तीवर अवलंबून आहे. म्हणून समाज व व्यक्ति यांचे आदर्श संबंध त्या समाजाच्या आर्थिक स्तरावर अवलंबून न राहतां त्या समाजाच्या तत्त्वज्ञानावर व आचरणावर अवलंबून राहतील.

शेवटी प्रश्न हाच राहतो की, अशा वृत्तींतून समाजाचा जीवनस्तर कमी होईल काय ? समाजाला जास्तींत जास्त देण्याची वृत्ति समाजाकडून कमींत कमी घेण्यामुळे कमी होईल काय ? या प्रश्नाचें उत्तर पुन्हा जीवनाच्या दृष्टिकोणावरच अवलंबून आहे. ज्या प्रमाणांत समाजाला देईन त्याच प्रमाणात घेईन या वृत्तींतून कधी समानता यावयाची नाही. आज जर या वृत्तीशिवाय उत्पादनच वाढत नाही तर मग उत्पादनवाढीकरिता जास्त काम करणाऱ्याला जास्त आकर्षण वाटावें असें केलें पाहिजे परंतु भिन्नभिन्न तऱ्हेच्या कामांत शक्य तेवढा कमी फरक असावा. म्हणजे भंग्यांच्या व प्रोफेसरांच्या वेतनमानांत शक्य तेवढा कमी फरक असावा. पण त्यांतल्यात्यांत जो भंग्यांचें काम चांगलें करील किंवा जास्त करील त्याला

पगार जास्त, व जो कमी करील त्याला पगार कमी अशी व्यवस्था असावी. म्हणजे दोन्ही गोष्टी साधूं शकतील.

युगोस्लावियांत आम्हांला वारंवार असें सांगण्यांत येत होतें की, स्टालीनचें म्हणणें असें की व्यक्तीने नेहमी समाजाच्या हिताकरिताच वागलें पाहिजे. व समाजाचें हित काय तें पार्टी ठरविणार. म्हणून सर्व लोकांनी पार्टीलाईनप्रमाणे चाललें पाहिजे. यामुळे स्वाभाविकच पार्टीची मिरासदारी सर्व समाजावर व सरकारवर चालते. पण आमच्या येथे ही पद्धति नाही. आम्हीं पार्टीचें विसर्जन केलें आहे. सोशालिस्ट अलायन्सच्या मार्फत सर्व लोकांनी धोरण आंखावयाचें असते. आज मात्र आमच्या देशांत परिस्थिति अशी आहे की, व्यक्तीला जर जास्त पैशाचें आकर्षण नसलें तर उत्पादनांत कमतरता येईल. म्हणून आम्हीं जास्त जबाबदारीकरिता जास्त आकर्षण या सिद्धांतावर आलों आहों. जोपर्यंत मनुष्यस्वभाव असा आहे तोपर्यंत त्यांचा हा निर्णय मान्य केला पाहिजे, तो याच अटीवर की भिन्न भिन्न कामाकरिता आर्थिक फरक कमींत कमी असावा."

श्री पोपोव्हिच यांची भेट झाल्यानंतर कोऑपरेटिव्ह सोसायटयांच्या तज्ञांकडन आम्हीं थोडी माहिती घेतली व हॉटेलांत परत आलों.

* * *

### शुक्रवार ता. ५–६–५९

आज सकाळीं श्री व्ही. पोपोव्हिच यांची भेट घेटतली. मी जेव्हा चीनमध्यें गेलों होतों तेव्हा हें गृहस्थ युगोस्लावियाचे अम्बॅसेडर होते. त्यांची भेट मी पेकिंगमध्ये मुद्दाम घेतली होती. कारण त्याच वेळेला युगोस्लावियावरून ८ व्या पार्टी कॉंग्रेसकरिता कांही मंडळी आली होती. त्यांच्याबरोबर चीनची सहकारी शेती पाहण्याकरिता म्हणून एक शिष्टमंडळ सुद्धा मुद्दाम आलें होतें. त्या शिष्टमंडळाची भेट घेण्याकरिता मी युगोस्लावि एम्बसींत जाऊन श्री पोपोव्हिच यांची भेट घेतली होती. या शिष्टमंडळाला भेटण्याचें कारण असें की, युगोस्लावियाने सामुदायिक शेतीचा प्रयोग केला व तो जमला नाही म्हणन सोडून दिला होता, तेव्हा चीनचा प्रयोग ते काकदृष्टीने पाहणार, हें उघडच होतें. अशा परिस्थितींत चीनच्या प्रयोगाबाबत त्यांचें म्हणणें काय आहे हें मला समजून घ्यावयाचें होतें. पेकिंगला मी जेव्हा एम्बसींत गेलों तेव्हा श्री पोपोव्हिच तेथे होते. ते म्हणाले, "आमची मंडळी सहकारी शेती पाहण्याकरिता उत्तरेकडे गेली आहे. म्हणून त्यांची प्रत्यक्ष भेट घेतां येणार नाही. पण ते हिंदुस्थानावरून परतणार आहेत.

तेव्हा दिल्लीला ते तुम्हांला जरूर भेटतील. माझ्या आग्रहावरून त्यांनी सांगितलें की, त्यांचे प्रथमदर्शनीचें मत तरी चीनच्या प्रयोगाबद्दल अनुकूल आहे दिल्लीला परत आल्यावर युगोस्लावियाच्या अम्बॅसेडरला भेटून मीं त्यांना सांगितलें की, तुमची टीम आल्यावर मला जरूर कळवा. त्यांना कां व कशा-करिता भेटावयाचें आहे याचीहि जाणीव त्यांना करून दिली होती. आमची टीम आल्यावर मी तुम्हांला जरूर कळवीन असें त्यांनी मला आश्वासनहि दिलें होतें. परंतु कांही दिवसांनी त्यांना मी पुन्हा जेव्हा भेटावयाला गेलों तेव्हा त्यांनी सांगितलें, "आमची टीम येऊन गेली सुद्धा. तुम्हांला मी कळवूं शकलों नाहीं. कारण ते लोक केवळ एक रात्रच तेथे राहिले होते. परंतु मी त्यांना तुमचा मुद्दा विचारला व त्यांनी मला तुम्हांला कळवायला सांगितलें की चीनच्या प्रयोगाने ते फार प्रभावित झाले आहेत व जिथे आम्हीं हात टेकले तिथे चीनने मात केली हा त्यांचा अभिप्राय आहे." हें तुमचें म्हणणें मी छापूं शकतों काय असें विचारल्यावर खुशाल छापूं शकतां असें ते म्हणाले. जरी मी स्वतंत्रपणें चीनच्या प्रयोगाबद्दल याच निर्ण-यावर आलों होतों तरी युगोस्लावियाच्या या टीमच्या मताचा कांही तरी परिणाम माझ्यावर झालाच. आज याबाबत युगोस्लावियांतील लोकांना काय वाटतें, त्यांचें तेंच मत कायम आहे की, त्यांत कांही बदल झाला हें मला बघावयाचें होतें. बदल होण्याला तशीं कारणें होतीं. एकतर, आज चीनमध्ये कॉम्यून्सची पद्धति आहे. त्यांनी सामुदायिक शेतीला खो दिला आहे. दुसरें, आज चीनचें व युगोस्लावियाचें संबंध मैत्रीचे नाहीत.

दिल्लीचें अम्बॅसेडर भेटले नाहीत तर निदान पेकिंगच्या अम्बॅसेडरांना तरी भेटावें या उद्देशाने मीं श्री व्ही. पोपोव्हिच यांची भेट घेतली. आज त्यांचा रूख बदललेला दिसला. ते म्हणाले "तेव्हा मी पेकिंगला अम्बॅसेडर होतों. मला इतकें मोकळेपणाने तुमच्याशीं बोलतां आलें नाही. परंतु चीनमध्यें शेतकऱ्यावर बरीच जुलूमजबर्दस्ती होते. आजची कॉम्यून्सची पद्धति म्हणजे निव्वळ फौजी कवायत आहे. सर्वांनी एकत्र राहावयाचें, जेवावयाचें व काम करावयाचें, पुरुषांनी अलग राहावयाचें, त्यांच्या स्त्रियांनी अलग राहावयाचें हें कांही मनुष्यस्वभावाला धरून नाही."मी म्हणालों, 'हें जरी आज खरें मानलें तरी उद्या तसें राहणार नाही. सुरवाती-ला जेव्हा समाजवादाची कल्पना पुढे मांडण्यांत आली तेव्हा तिच्याबाबतहि असाच आक्षेप होता. पण आज आपणांस जुनी कल्पना कशीशीच व प्रगतिगामी वाटते. समाजवादी कल्पना आज रूढ वाटते. तें असो. पण चीनने आपलें शेतीचें उत्पादन वाढविलें आहे हें तरी तुम्हांला खरें वाटतें काय ?" ते म्हणाले, "त्यांचे आंकडे फार फुगवलेले असतात. हें जरी खरें असलें की, १९५५ सालापासून त्यांची धान्याची निर्यात वाढत आहे तरी आता त्यांचें म्हणणें असें आहे की, आमचें धान्य आम्हांलाच पुरतें.

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे
... वि: ...
नों: दि: ...
क्रमांक ...


आमचे पूर्वीचे अंदाज चुकलेले होते. तेव्हा काय समजावें हें कळत नाही. एवढें मात्र खरें की, या सर्व प्रश्नांबावत त्यांच्या पार्टीतच फार मतभेद आहेत. खुद्द चेअरमन माओला या सर्व गोष्टी आवडतात की नाही याची मला फार शंका वाटते. मी ५५–५७ सालीं पेकिंगला होतों. सुरवातीला जेव्हा मी माओला भेटलों तेव्हा कोऑपरेटिव्हज् ऑफ दि लोअर ग्रेडवरून कोऑपरेटिव्हज् ऑफ दि हाय्यर ग्रेडलाच जायला कमींत कमी दहा वर्षे लागतील असें चेअरमन माओने मला सांगितलें. पण सहा महिन्यानंतरच जेव्हा सर्व चीनभर कोऑपरेटिव्हज ऑफ दि हाय्यर ग्रेड झाल्या तेव्हा मी पुन्हा माओंना भेटलों व 'हें एकदम तुम्हीं कसें केलें' असा प्रश्न विचारला. ते म्हणाले, 'मी काय करूं? लोकांची तयारी आहे. म्हणून हें झालें.' हें लक्षांत घ्या की, चेअरमन माओबद्दल मला फार आदर आहे. मी असें समजतों की आज चीनच्या कॉम्युनिस्ट पार्टीत त्यांच्या इतका मोठा मनुष्य नाही. त्यांची वृत्ति नेहमी धीमेपणाने प्रगति करण्याची असते. पण सर्वच बाबींत त्यांना आपला अधिकार चालवितां येत नाही."

शेवटी तुमच्या शेतीचें भविष्य काय असा मीं प्रश्न केला, तेव्हा "आम्हीहि सामूदायिक शेतीकडे जाऊं. पण आमची प्रगति लोकशाही मार्गाला धरून राहील. आज लोक तयार नाहीत तेव्हा अशी परिस्थिति निर्माण केली पाहिजे की, ते त्यासाठी तयार होतील. सहकारी समित्यांच्या विकासावर आमच्या शेतीचें भविष्य अवलंबून आहे" असें ते म्हणाले.

त्यांची भेट घेऊन १२ वाजतां आम्ही श्री वेल्को व्हॉकोविच यांची दुसरी भेट घेण्याकरिता गेलों. सुरवातीचे औपचारिक बोलणें झाल्यावर युगोस्लावियाच्या परराष्ट्रीय धोरणाविषयी प्रश्न निघाला. श्री व्हॉकोव्हिच यांचें म्हणणें असें होतें की, "आज युगोस्लावियाची स्थिति अशी आहे की, त्याला कोणत्याहि ब्लॉकशीं जुळून आपलें परदेशी धोरण चालवितां येत नाही. पण याचा अर्थ असा नाही की, तो त्रयस्थासारखा वागतो. इतर देशांत काय घडतें याबाबत आम्ही फार जागरूक आहों. परंतु प्रत्येक प्रश्नाबावत आमचें धोरण स्वतंत्र आहे. यामुळे याबाबत आमचें धोरण हिंदुस्थानासारखें आहे." यावर असा प्रश्न निघाला की, "अशा राष्ट्रांनी एकत्र येऊन वागूं नये काय? एकएकटे जर ते राहिले तर ते प्रभावी होऊं शकतील काय?" त्यावर ते म्हणाले, "कोणत्याहि विशिष्ट प्रश्नावर ते एक होऊं शकतात. परंतु त्यांची एकजूट करून एक तिसरा ब्लॉक करणें योग्य होणार नाही."

युगोस्लावियाच्या तत्त्वज्ञानाचें जें आणखी एक प्रमेय आहे की, नियतीच्या सिद्धांताप्रमाणे सर्वच राष्ट्रें सोशालिझमकडे जात आहेत. अगदी युनायटेड स्टेट्स् सारखें पुंजीवादी राष्ट्रहि घ्या. ते सुद्धा आज पूर्वीपेक्षा जास्त समाजवादी आहे.

इतरहि राष्ट्रें कमी जास्त प्रमाणांत समाजवादाकडे झुकत आहेत. त्याबद्दल श्री व्हॉकोव्हिच बोलले. ही बाब सुद्धा युगोस्लावियाच्या विदेशी धोरणाला समर्थनपरच आहे. अर्थात् ओघानेच असा निष्कर्ष निघेल की, जगांत समाजवाद आणण्याकरिता सर्व सोशालिस्ट राष्ट्रांनी मिळून कांही करण्यासारखें नाही. किंवा तसें करण्याची जरूरी नाही. कॉमिन्फॉर्मचा सभासद असतांना युगोस्लावियाला जो अनुभव आला त्यावरून ही वृत्ति बनली असली पाहिजे. पण याचा हा स्पष्टच परिणाम होईल की, समाजवादाची प्रगति कमी वेगाने होणार आहे. रशियाचा अनुभव पूर्व यूरोपांतील राष्ट्रांना जो आला त्यावरून ही वृत्ति बनली असावी. हें एक जगाचें दुर्दैवच समजलें पाहिजे की, रशियाचा असा कटु अनुभव जगाला यावा. त्यांतल्या त्यांत युगोस्लावियाला हें श्रेय इतिहास देईलच की, त्याच्या स्वतंत्र वृत्तीमुळे रशियाच्या छायेखाली असलेल्या पूर्व यूरोपांतील इतर राष्ट्रांना त्याला मदत करतां आली. कारण त्यामुळेच या राष्ट्रांना जास्त स्वतंत्रता मिळाली.

राष्ट्राच्या गरिबीच्या परिस्थितींत समाजवादाची प्रगति होऊं शकत नाही हें जें युगोस्लावियांतील बऱ्याच लोकांचें म्हणणें होतें त्याचाच पुरस्कार श्री व्हॉकोव्हिच यांनी केला. याचा स्पष्ट अर्थ असा की मागासलेल्या समाजांत समाजवाद रूढ होऊं शकत नाही. पण इथे समाजवाद म्हणजे समाजवादाची आदर्श परिस्थिति जींत मार्क्सच्या कल्पनेप्रमाणे, प्रत्येक जण आपल्या शक्तीप्रमाणे उत्पादन करील व गरजेप्रमाणे घेईल तोपर्यंत उत्पादनाला वाढत्या आमदनीचें आकर्षण हवेंच असें श्री व्हॉकोव्हिच यांचें म्हणणें. कालच्या भेटींतहि श्री पॉपोव्हिच यांनी हा मुद्दा मांडला होता. वाढलेल्या गरजा पुऱ्या झाल्यावर मनुष्य इतका संतुष्ट होईल की मग तो कर्तव्यपूर्तीकरिता म्हणून काम करील. गरजांच्या पूर्तीकरिता तो काम करणार नाही. तेव्हा 'कामाप्रमाणे दाम' ह्या वृत्तीची जरूरी राहणार नाही. असा या सर्व तत्त्वज्ञानाचा आशय दिसतो. या विचारसरणींत एक फॅलसी दिसते. एकतर मनुष्यस्वभावाचें परीक्षण केलें तर असें दिसेल की, वाढलेल्या गरजा पुऱ्या करून मनुष्य कधींहि संतुष्ट होणार नाही, असें आपलें तत्त्वज्ञान सांगतें, व तें विचाराला पटतेंहि. तो संतुष्ट राहणार नाही म्हणून त्याला आपल्या गरजा पुऱ्या करण्याकरिता काम करावें लागेल व जोंपर्यंत ही परिस्थिति आहे तोंपर्यंत 'कामाप्रमाणे दाम' द्यावे लागतील. कामाप्रमाणे दाम म्हटलें की आर्थिक असमानता आलीच. म्हणून ही परिस्थिति निर्माण करण्याकरिता एक नवीन जीवनदृष्टि निर्माण करावी लागेल, जींत संतुष्टता प्रधान राहील. संतुष्टता ही जीवनदृष्टींतून निर्माण होईल, गरजांच्या पूर्तीतून निर्माण होणार नाही.

यानंतर आम्हांला श्री व्हॉकोव्हिच यांच्या आमंत्रणानुसार त्यांच्या क्लबमध्ये नेण्यांत आलें. तिथे श्री बेब्लर, श्री मिलेंतिये पोपोव्हिच, श्री डिलियन्

आसर व ज्या इन्स्टिटच्यूटमध्ये आमची चर्चा झाली त्या इन्स्टिटच्यूटचे मुख्य अशी मंडळी होती. लंचनंतर मीं आजचा शेवटचा दिवस म्हणून एक भाषण केलें. भाषण जमलें नाही असें मला वाटलें. श्री व्हॉकोव्हिच यांनी त्याला उत्तर दिलें. त्यांचें उत्तर अगदी पहिल्याच उत्तराप्रमाणे व पट्टीच्या व अनुभवी वक्त्याप्रमाणे वठलें. ' आमचें सर्वच चांगलें आहे असें आम्ही म्हणत नाहीं. तुम्ही आलोचनात्मक दृष्टीनेच आमच्याकडे बघा. तुमच्या दृष्टींतून आमचाहि विकास होईल.' अशा अर्थाचें तें भाषण होतें. दोन्ही राष्ट्रांची मैत्री वाढेल व सर्वोदयाच्या अभ्यासाकरिता आमच्या येथून कांही मंडळी भारतांत आल्यास त्यांना मदत मिळेल अशी आशा प्रदर्शित करून त्यांचें भाषण संपलें.

त्यानंतर आम्हीं घरीं आलों व श्री हेन्री म्हणून जे अमेरिकन गृहस्थ होते त्यांची भेट घेतली. आमचे विचार पक्के करण्याकरिता म्हणून आम्हीं त्यांना कांही प्रश्न विचारले. युगोस्लावियांत स्वातंत्र्य नाही असें तुमचें म्हणणें असल्यास त्याच्या पुष्टीकरिता तुम्ही कांही उदाहरणें देऊं शकतां काय, असें विचारल्यावर त्यांनी एकच प्रसंग सांगितला. त्यांनी नेमलेल्या एका माणसाला तुरुंगांत टाकण्यांत आलें. त्यांने पैसे खाल्ले हा त्याच्यावर आरोप होता. पण त्याच्यावर खटला वगैरे भरण्यांत आला नाही हें त्यांचें म्हणणें. घरीं त्याची बायको होती, तिला पुन्हा यांनी कामावर घेतलें. तिला घरांतून काढून लावून, त्या घराचा कब्जा घेण्याचा प्रयत्न फौजेंतील कांही अधिकारी करीत आहेत. पण त्याचा ड्रायव्हर, जो पूर्वी वकील होता, त्याने विरुद्ध कारवाई सुरूं केली आहे व तो म्हणतो की, निदान १८ महिने तरी ती बाई घरांतून निघूं शकणार नाही. म्हणजे कोर्टाची पायरी चढल्यास न्याय मिळतो अशी परिस्थिति आहे. आमचाहि साधारण अनुभव तोच होता.

रात्रीं हॉटेलांत जेवण व झोप.

* * *

## शनिवार ता. ६–६–५९

आम्ही पहाटें लौकर उठलों. सामान बांधलें. आमची रीतसर बोळवण झाली. आदल्या दिवशीं सोशालिस्ट अलायन्सकडून आम्हांला कांही वस्तु भेट म्हणून देण्यांत आल्या. एरोड्रोमवर आमचें स्वागत करण्याच्या वेळीं होती तीच मंडळी आम्हांला पोहोचवायला आली होती. आम्ही मोठ्या प्रेमाने निरोप घेऊन विमानांत बसलों.

विमान सुरूं झालें. आमची युगोस्लावियाची यात्रा संपली.

आमचा युगोस्लावियांतील दीड महिना हां हां म्हणतां गेला. आमचा वेळहि मजेंत गेला. आज ज्यांच्या हातीं युगोस्लावियाचें नेतृत्व आहे त्या लोकावद्दल आमचे ग्रह एकंदर फार चांगले झाले. ते सर्व फार वास्तववादी आहेत. कोणत्याहि तत्त्वाच्या आहारीं जाऊन कांहीतरी करावयाचें अशी त्यांची प्रवृत्ति नाही. त्यामुळे आजची त्यांची स्थिति ना धड सोशियालिस्ट ना कॅपिटॅलिस्ट अशी तात्त्विक दृष्टया असली तरी ती दोन्ही पद्धतींतील दोष टाळून त्यांतील फायदे घेण्याची आहे. ते स्वतःला मार्किसस्ट समजतात. समाजवादाला व त्यानुसार होणाऱ्या आदर्श समाजरचनेला ते वाहिले आहेत. पण त्याबरोबरच शक्य तेवढया लौकर उत्पादन वाढवून इतर पाश्चात्य राष्ट्रांच्या जोडीला युगोस्लाविया लौकरांतल्या लौकर कसा येईल याबद्दल त्यांना विशेष चिंता आहे. त्या ध्येयपूर्तीकरिता तत्त्वांत काही भेसळ झाली तरी त्याची त्यांना पर्वा नाही. याशिवाय मिळून मिसळून पद्धतशीर रीतीने काम करण्याचा त्यांचा गुण घेण्यासारखा आहे. त्यांच्या विकेंद्रीकरणामुळे या त्यांच्या वृत्तीला विशेष प्रोत्साहन मिळालें आहे. प्रत्येक मनुष्याला काम करण्याला स्वतंत्र क्षेत्र त्यांच्या बऱ्याचशा संस्थामुळे मिळतें. परंतु एवढें गैरसरकारी लोक शासनांत येऊन सुद्धा शासन ढिलें किंवा बेजबाबदार झालेलें नाही. त्यांच्या शासनाची तारीफ गैरसरकारी त्रयस्थ लोकांकडून झालेली आहे.

मराठी ग्रंथ ... स्थळप्रत.
अनुक्र: .......... वि: ...............
... नों: दि: ...............
दा. क्र. १२१८९
... शाखा



# शुद्धि-पत्र

| पृष्ठ | | ओळ | अशुद्ध | शुद्ध |
|---|---|---|---|---|
| ५ | | १० | निवडने | निवडणें |
| १२ | | ७ | कर्तृत्वशक्क्ति | कर्तृत्वशक्ति |
| १२ | खालून | ७ | तऱ्हने | तऱ्हेने |
| १६ | | ४ | योगुस्लाविया | युगोस्लाविया |
| २३ | | ८ | हीते | होते |
| २६ | खालून | १२ | जास्ता | जास्त |
| ३० | | ३ | क्राँग्रेस | काँग्रेस |
| ३५ | | ३ | दृष्ष्टीने | दृष्टीने |
| ३८ | | ३ | शोषणसहित्याच्या | शोषणरहिततेच्या |
| ४० | खालून | ८ | ओधानेच | ओघानेच |
| ४६ | | ८ | भीतीमळे | भीतीमुळे |
| ४८ | खालून | १३ | दष्टीने | दृष्टीने |
| ४८ | खालून | २ | दष्टया | दृष्टया |
| ६० | खालून | ९ | करणारे | करणाऱ्या |
| ६४ | | ५ | पशन | पेन्शन |
| ६९ | | १ | इझ्राइलची | रझाईलची |
| ७७ | | ८ | रॉय्सचाईल्ड | रॉथ्सचाईल्ड |
| ७८ | | शेवटली | ॅलेस्टाईनच्या | पॅलेस्टाईनच्या |
| ८६ | | १६ | सव | सर्व |
| ९० | | १० | निर्मित्ति | निर्मिति |
| ९५ | | ९ | दष्टीने | दृष्टीने |
| ९५ | खालून | ५ | प्रत्यक | प्रत्येक |
| ९७ | | ५ | Yon | You |
| ९९ | | १० | उत्पादन | उत्पादन |
| १०८ | | १ | विशष | विशेष |
| ११३ | | १० | असवा | असावा |
| ११४ | खालून | ३ | म्हणन | म्हणून |
| १२७ | खालून | १३ | गृहस्य | गृहस्थ |

| पृष्ठ | | ओळ | अशुद्ध | शुद्ध |
|---|---|---|---|---|
| १२९ | खालून | ९ | Disrmment | Disarmment |
| १३० | | १८ | भूमिविषकक | भूमिविषयक |
| १३४ | | १३ | Sociel | Social |
| १३८ | | १० | डुब्राव्हनिक | डुब्रॉव्हनिक |
| १४१ | | शेवटची | व्हावा असें वाटतें | व्हावा असें वाटतें ? |
| १४२ | | २२ | फुंटापेक्षा | फुटांपेक्षा |
| १४२ | खालून | ३ | सेटिनियेला | सेंटिनियेला |
| १४५ | | १ | त्याकडेहि | त्यांकडेहि |
| १४६ | | २० | वाचण्यांस | वाचण्यास |
| ,, | | २५।३० | कॉर्डेल | कार्डेल |
| १४९ | | ९ | खोलींत | खोल्यांत |
| १५० | खालून | ६ | चालं | चालू |
| १५२ | | १२,१४ | व्हावप्होदिना | व्हायवोदिना |
| १५२ | खालून | ७ | Internetional | International |
| १५७ | लालून | ३ | स्त्रातंत्र्यारिकता | स्वातंत्र्याकरिता |
| १५७ | | शेवटची | राष्ट्रिक | राष्ट्रिकें |
| १६५ | | १ | सोशियालिरट | सोशालिस्ट |
| १६५ | खालून | १२ | व्हूल्याकोव्हिच | हुल्याकोव्हिच |
| १६७ | | शेवटची | बर्फाच्याच्छादित | बर्फाच्छादित |
| १७४ | | १ | (मोग) | (माग) |
| १८० | | ८ | इनडायरेक्ट | इन्डायरेक्ट |
| १८० | खालून | ४ | सहायानेच | सहाय्यानेच |
| १८८ | | ७ | क्रोयाशियाचें | क्रोयेशियाचें |
| १८८ | | ८ | तेव्हां | तेव्हा |
| १९० | | १० | कौंसिलचें | कौंसिलचे |
| १९३ | | १ | म्युझियम्स | म्युझियम्स् |
| १९४ | | ७ | मलें | मुलें |
| २०४ | | शेवटची | वांटत; पिपल्स | वाटत; पीपल्स |
| २०६ | | १ | शरीर तज्ज्ञ | शरीरतज्ज्ञ |
| २०८ | | ३ | घालन | घालून |

# नामसूची

## अ


अजिंठा १८८.
अथेन्स १८४.
अॅबॉट १५४.
अमेरिका ९, ६२, ७३, ८०, ९९, १६४, १६५, १९७, २१३.
अलियवारजंग १२४, १५४, २१५.
अलेक्झांडर दि ग्रेट ३, १६७.


## आ


आईन्स्टाइन ७२.
ऑटोमन १.
आफ्रिका ७७.
आर्जेंटाइन १९१.
आल्बेनिया १२३, १६७.
आसर डिलियन २२५.
ऑस्ट्रिया १, १२७, १४०, १५३, १५७, १७७, १८४, १९६, १९७.


## इ


इंग्लंड ७, ७३, ७७, ७८, ७९, ९३, ९४, १२४, १२५, १८३, २०८, २१०, २१३.
इजिप्त ७९, ८०, ८१, १८२, १८३.
इटाली ७, १३२, १४०, १४२, १५२, १७७, १९७.
इन्टुक १२३.
'इन्साइड एशिया' १०३.
इझ्राईल ३५, ३७, ३९, ४०, ४६, ४७, ६९, १०४, १८२, १८३.


## ए


एलोर १८८.
'एशियन सोशॅलिस्ट कॉंग्रेस' १८८.

## क


कण्व ११८.

कॅनडा १९७.

कार्डेल एडवर्ड ४३, १०८, १११, १३५, १४६, १४७, १७७, १७९, १८०, १८१, १८२.

कॉन्स्टँटिनोपल २.

कॉस्मेट २, १५२.

किंग पीटर ३, ४.

किबुत्झ ४०, ७१, ८४, ८५, १०४.

किशोन ७६.

'को-ऑपरेटिव्ह कौन्सिल' १६०, १६२, १७१.

कोटोर १३५, १३७.

कोमोनोव्हो ३, १७४, १७५.

कोसोव्हो मेटोहीजा ३, ४, १७५.

'कौन्सिल ऑफ् प्रोड्युसर्स' २६.

क्रांज २०३, २०४, २०५, २०७, २०८.

क्रोयेशिया १, २, ३, ४, ५, ६, ६२, १३८, १६८, १८४, १८५, १८६, १८८, १८९, १९५, १९६.


## ख


ख्रुश्चेव्ह १०९, ११३, १९०.


## ग


गंथर जॉन १०३.

गांधी ( महात्मा ) ९७.

ग्रीस १६८, १७३, १७७.


## च


चाऊ-एन्-लाय २१५.

चीन ३८, ९८, १०७, ११०, १२०, १२३, १३८, १४१, २००, २१५, २१६, २२१, २२२, २२३.


## ज


'जनरल वर्किंग को-ऑपरेटिव्ह' १५९, १६१.

## ज

जयप्रकाश ९७, १०७, ११०, १११, ११२, ११३, ११४, १३०, १६५, १७८, १८१, १८३, २०९.
जर्मनी ३, ४, ७, ६२, ७३, ७४, ९८, ९९, १२०, १२२, १२५, १२६, १३५, १४०, १५३, १७७, १८७, १९५, २०७, २०९, २१०, २१८.
जॉर्डन ७६, ७९, ८०.
जिलास ५१, ५२, ११४, ११५, ११६, १५४, १५५, १५६, १८१, २०१.
जीझस ख्राइस्ट ७३, २०९.
जूडास ७३.
जेरूसलेम ७३, ७६, ७९, ८०.
जोशेपाइन १५४.
ज्यू ७०, ७२-९२.

## झ

झाग्रेब १४५, १८४, १८६, १८७, १८८, १९४, २०२.
झेकोस्लोव्हाकिया १७७.

## ट

टर्की १२७.
ट्रॉट्स्की १२२.
टिटो ४, ७, ८, ९, ५१, ५२, ११४, ११५, ११६, १३५, १४४, १४५, १४६, १५५, १६७, १७०, १७९, १९३, २०९.
टिटोग्रॅड १३२, १३३, १३५, १४२.
टेटेव्हो १६८.
'ट्रेड युनियन कॉंग्रेस' ३०, १२३.

## ड

डॅन्यूब १५३, १५९.
डुब्राव्हनिक १३७, १३८, १३९, १४२, १८४.
डेन्मार्क १५३.
डोम सिंडिकाट १७७.

## त

तिबेट १८२.
तुर्कस्थान १.
तेल अव्हीव ७९, १८४.

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्थळप्रत.
अनुक्रम ३१७३८ वि: भू...
क्रमांक २२५ ... नों: दि: ८।८।६१

थ

'थॉमस कुक अॅण्ड सन्स' ११७, ११८.

द

दस्तुर (डॉ.) १७८.
दिल्ली १८२, १८८, २०७, २२२.
'दी न्यू क्लास' १५५.
देसाई २१५.

न

नागपूर १३०, १७३.
नाझारेथ ७६.
नेपोलियन १५४.
नेहरू (पं.) ४८, १०३, १०४, २१६.
नोविसाद १५२, १५४, १५६.
न्यूरेन्बर्ग ७३.

ध

धवन १२६, २१५, २१८.

प

पंचमढी ११९.
पॅलेस्टाईन ७२, ७६, ७७, ७८, ७९.
पाकिस्तान १९१.
पाटील रा. कृ. ११७, ११८.
पानिपत १७५.
पॉपोव्हिच मिलिंतिये १२६, १२८, १२९, १३०, १६३ २१८, २२१, २२२, २२४
पॉल प्रिन्स ३.
पाव्हलोव्हिच १३९, १८३, १८४.
'पीपल्स फ्रंट ऑर्गनायझेशन' ५०.
पुसीच (डॉ.) १९३.
पेकिंग २२१, २२२, २२३.
'पेझंट्स् वर्किंग को-ऑपरेटिव्ह' १५९.
पोर्टोरिको १९१.
पोलंड ७३, १२२, १२९, १५३, १७७.

फ

फ्रान्स ३, १७७.

ब

बॅक्लर अॅलेस (डॉ.) १२८.
बल्गारिया १५३, १६७, १७७.
बाकारिक (डॉ.) १८८.
'बायबल' ७३, ७४.
बाल्फोर ७७, ७८.
बॉस्निया-हर्सेगोविना १, २, ३, ४, ५.
बिचानिच १९०.
बुद्वा १३५.
बेथलहेम ७६.
बेब्लर २२५.
बेलग्रेड २, ७, ३०, ४५, ६२, १२०, १२१, १२४, १२५, १३२, १३३, १४२. १४३, १४५, १४९, १५२, १५४, १६३, १७६, १८२, १८४, १८६, १९८, २१४.
बेल्जियम १७७.
बेल्लर १२१.
बैरूट ११९, १२०.
बोगदानसी १६८, १७०, १७२.
ब्लॅंडो १४३.
ब्लेड २०८, २०९.

भ

भगवती १२१.
भाक्रा नांगल १७६.

म

मॅसिडोनिया १, २, ३, ४, ५, २४, १६६, १६७, १६८, १७३, १७६, १८४, १८९.
माओ २२३.
माँटेनिग्रो १, २, ३, ४, ५, १३३, १३४, १३५, १३८, १४२, १४३, १८९.
माव्हरोव्हो १६७.
मार्कोव्हिच मिलान्कोव्ह १६३, १८५.
मार्क्स ९, ७२, १९५.

मार्सेल्स ३.
मिलहाऊड एडगर्ड १७७.
मुंबई ११७, ११८, ११९, १२३, १७३, १८२, १८४, १८८, २०७.
मुरादाबाद १३०.
मेडोना ख्रिस्त १५८.
मोशाव्ह-ओव्हदिम ८८, ९१, ९२, ९५, ९६, १००, १०१.

य

यार्कोन ७६.
युगांडा ७७.
'युनियन् ऑफ् चेंबर्स ऑफ् अॅग्रिकल्चर अँड फॉरेस्ट' २६.
यूरोप २१०, २२४.

र

रशिया ७, ८, १२, १६, ४०, ६२, ७७, ८०, ९३, ९८, १०२, १०८, १०९, १२०, १२२, १२३, १२८, १३१, १४५, १५३, १५५, १६४, १६७, १७७, १८१, १८३, १८८, २२४.
राधाकृष्णन् (डॉ.) १२१, १५८.
रॉय मानवेन्द्र ९९.
रॉथ्स चाइल्ड बॅरन ७७.
रुमानिया १५३, १७७.
रोम १२०, १८४.

ल

लाझार कोटली झोपस्की १७६.
'लीग ऑफ् कॉम्युनिस्ट ऑफ् युगोस्लाव्हिया' १३३.
'लीग ऑफ् नेशन्स' ७८, ७९, ८०.
लेक डोयरान १७२, १७३.
लेनिन ९.
लेबॅनन ११९.
ल्युब्लियाना १४५, १९३, १९४, २०३, २०७.

व

वरदार १६८.
'वर्कर्स कौन्सिल' ३०, ३१.
वाईसमॅन ७२.

विमल ११८.
विल्फ़ान १९८, २००.
व्यास (डॉ.) ११९, १९०.
व्ह्लॅडिमीर सेरीफ १२७, १२८.
व्हायव्होदीना २, ४, १५२, १५६, १५८, १६०, १६२.
व्ह्लॅकोव्हिच व्हेल्को १६५, २२३, २२४, २२५.
व्होटर्स मीटिंग ५८.

श

शकुंतला ११८.
शर्मा १८२.

स

सर्विया १, २, ३, ४, ५, १२६, १५२, १५७, १६८, १७५, १८४, १८६, १९५, १९६.
सिंग १३०, १३१.
सिंद्री १७६, २१६.
सिमिक १२६.
सी. ए. आर्. ई ६२, १३०.
सीरिया ७९.
सुखात्मे (डॉ.) १२०.
सुवर्णा १३०.
सुवेझ ८०.
सेंटिन्ये १३३, १३५, १४२.
'सेंट्रल को-ऑपरेटिव्ह फेडरेशन ऑफ् युगोस्लाविया' २७.
सेरायेव्हो १.
सेल १३०, १३१.
'सोशॅलिस्ट अलायन्स ऑफ् दि पीपल् ऑफ् युगोस्लाविया' ३०, १२१, १२४, १२५, १३३, १४२, १४६, १६५, १६६, २२५.
स्कोपियो १६६, १६७, १६८, १७५.
स्टॅनोव्हनिक १५४, १५५, १५६, १७७.
स्टालिन ८, ९, १२, १३, १०९, ११३, १२२, १२८, १७९, २२१.
स्टीप १७३, १८४.
स्टीफन दुशान २, १८३.
स्लोविनिया १, २, ३, ४, ६, ६२, १६८, १८९, १९४, २०१, २०२, २०३, २०६, २०७, २१०, २१४.

स्वित्झरलंड १५३, १७७.
स्वीडन ११३, १७७.

## ह

हंगारी १, १२२, १२७, १२९, १४०, १५३, १५७.
हॅप्नर २०३, २०६, २०७.
हर्शलथिओडोर ७६.
हॉप्स २१२, २१३.
हाबर ७२, ७३.
हॉलंड १५३.
हिटलर ७३.
हिंद मजदूर सभा १२३.
हिंदुस्थान १, ६३, ७५, ९८, ११४, ११७, ११८, ११९, १२०, १२१, १२२, १२३, १२४, १२५, १२९, १३०, १३१, १४९, १५२, १५७, १५८, १६६, १६७, १७०, १७६, १७७, १८१, १८२, १८३, १८५, १८८, १९२, १९६, १९८, २००, २०७, २०८, २१५, २१६, २२१, २२३.
हेन्री २१२.

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
दा. क्र. १२१८९
मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्वामित्व
अनुक्रम ... विः ...
क्रमांक ... नों: दिः ...
REFBK-0012189
REFBK-0012189